

दस कापिटल
सुबोध परिचय : सुहास परांजपे

कार्ल मार्क्सचे

दास कापिटालः सुबोध परिचय

सुहास परांजपे

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय

दास कापिटाल: सुबोध परिचय

पहिली आवृत्ती: १६ ऑगस्ट १९८४

पुनर्मुद्रण: १ ऑक्टोबर १९८४

ई–आवृत्ती: २ फेब्रुवारी २०१८

प्रकाशक:
सुलभा ब्रह्मे
शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय,
१२९ब/२, एरंडवणे, पुणे ४११००४

अक्षरजुळणी:
यदिश ग्राफिक्स, पुणे. (९४२१०५७७९५)

मुद्रण:
गायत्री ग्राफिक्स
५/८२ उमाशंकर सोसायटी, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३८

मुखपृष्ठ:
सुभाष अवचट

अनुक्रमणिका

ई-आवृत्तीच्या निमित्ताने

सुहास परांजपेने १९८४ साली ‘दास कापिटाल : सुबोध परिचय’ लिहिलं ते केवळ डॉ. सुलभा ब्रह्मेंमुळे. सुलभाताईंनी त्याच्या मागे लागून त्याला लिहितं केलं नसतं, आणि पुढचं सगळं जे काही व्यवस्थापन होतं त्याची जबाबदारी घेतली नसती तर सुबोध परिचय काही लिहिलं गेलं नसतं. मार्क्सच्या मृत्यूदिनाच्या शताब्दी वर्षात ते प्रसिद्ध व्हावं अशी आमची इच्छा होती. ते काही जमलं नाही. थोड्या महिन्यांनी उशीरा प्रसिद्ध झालं. त्या वर्षीचं मराठीतील अर्थशास्त्रावरचं सर्वोत्कृष्ट लिखाण म्हणून त्याला मराठी अर्थशास्त्र परषिदेचं पारितोषक मिळालं, पुस्तकाचं चांगलं स्वागत झालं.

पुस्तकाच्या प्रती संपल्या त्यालाही अनेक वर्षं झाली. पण त्याची सतत चौकशी होत होती. कार्यकर्त्यांकडून विचारणा होत होती. काही वर्षांपूर्वी, कॉ. पानसरे म्हणाले होते की या पुस्तकाची आज गरज आहे, आणि ते पुस्तक आहे त्या स्वरूपातदेखील कार्यकर्त्यांना मिळालं पाहिजे. तिथून पुनर्प्रकाशनाचा विचार सुरू झाला. शेवटी सुलभाताईंनीच ते पुन्हा प्रकाशित करायचा निर्णय घेतला. आणि त्या पुस्तकाच्या पुनर्प्रकाशनाच्या दिशेने आम्ही काम सुरू केलं.

खिळेजुळणीच्या काळातलं ते पुस्तक! त्याचं आज डीटीपी करायचं म्हणजे अगदी मुळापासून त्याची एंट्री, प्रूफिंग, सगळं आलं. यदिश ग्राफिक्ससाठी अस्मिता अभय ढमढेरे यांनी अक्षरजुळणीचं सर्व काम सांभाळलं. आपापली कामं आपापले व्याप सांभाळून आम्ही प्रूफिंगचं काम करत होतो. इथे पूर्णवेळ त्यावर काम करणारं कोणी नव्हतं. पाहिजे तितकं काम सरकत नव्हतं. वेळ लागत होता. मग मध्यंतरी २०१६ मध्ये स्वातीजा आणि सुहास, त्यांच्या मुलीकडं जाणार होतो आणि त्यांना सलग वेळ मिळणार होता. म्हणून मग आम्ही सुलभाताईंना भेटलो. त्यांच्याशी बरीच चर्चा झाली. की हे आता आपण लवकरात लवकर केलं पाहिजे. अद्वैतनी बरंचसं प्रूफिंगचं काम केलेलंच होतं. आणि राहिलेलं प्रूफिंगचं जे काम होतं ते लवकरात लवकर संपवायचं म्हणून सुहास व स्वातीजाने अंगावर घेतलं. ३० नोव्हेंबरला ते प्रूफिंगचं काम

त्यांनी संपवलं आणि तेवढ्यात अघटित घडलं. अत्यंत अनपेक्षित रीतीने सुलभाताई गेल्या.

सुलभाताई गेल्यानंतर आमचं संस्थेचं, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाचं, काम थोडंफार विस्कळित झालेलं आहे. पण सुबोध परिचयचं प्रकाशन करायचं हे मात्र ठरलेलं होतं. सुलभाताईंबरोबर ते प्रकाशन नव्या पद्धतीनं करायचं असंही आमचं ठरलेलं होतं. ते एक वेगळ्या प्रकारचं पाऊल आहे. आम्ही काही प्रती छापणार आहोत. प्रती छापणार नाही असं नाही. पण त्याचबरोबर त्याच्या जोडीने, आम्ही ते पुस्तक पब्लिक डोमेनमध्ये, इंटरनेटवर ई-पब म्हणून, पीडीएफ म्हणून टाकत आहोत. आणि ते कोणालाही डाऊनलोड करायला, त्याचे एक्सपर्ट्स करायला, ते छापायला, अगदी ते छापून विकायला देखील आम्ही परवानगी देत आहोत. अट एकच. ते ज्या प्रती डाऊनलोड करतील, छापतील, वितरित करतील, त्यांना ह्याच अटी लागू पडतील. त्यांनी जर ती प्रत कुणाला दिली तर घेणाऱ्याला ती प्रत विकता आली पाहिजे, छापता आली पाहिजे किंवा वाटलं तर नुसतीच देता आली पाहिजे. ती प्रत घेणाऱ्याचं हे स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे.

फ्री सॉफ्टवेअर मूव्हमेंट सारखं आहे हे. त्यात हे अभिप्रेत आहे की ज्ञान हे खुलं असतं, कुणाच्याही मालकीचं नसतं, त्याला ‘कॉपीराईट’ नसतो. म्हणूनच सुलभाताईंना हे नव्या प्रकारचं ई-प्रकाशन मनापासून पटलं होतं. आज शेवटी २ फेब्रुवारी २०१८ रोजी सुलभाताईंच्या जन्मदिनी आम्ही त्याचं या पद्धतीनं ई-प्रकाशन करत आहोत. शिवाय मार्क्सच्या जन्माच्या द्विशताब्दीचं हे वर्ष आहे. त्याचंही सुलभाताईंना अप्रूप वाटलं असतं. हे ई-प्रकाशन आमच्यासाठी सुलभाताईंच्या प्रतीच्या कृतज्ञतेचं एक पाऊल आहे, आमची आदरांजली आहे.

आमच्या brahmegranthalaya.org या संकेतस्थळावर जाऊन तुम्ही हे पुस्तक डाऊनलोड करू शकता.

२ फेब्रुवारी २०१८, पुणे सुहास परांजपे, अद्वैत पेडणेकर, अमित नारकर

विश्वस्त, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

गेली काही वर्षे ‘दास कापिटाल: सुबोध परिचय’ साठी वाढत्या प्रमाणात विचारणा होत आहे. या वर्षी त्याच्या प्रकाशनाला तीस वर्षे होतील. या काळात प्रचंड घडामोडी होऊन गेल्या आहेत. सोविएत युनियनच्या विघटनानंतर भांडवली व्यवस्थेचे व विचारांचे प्रभुत्व इतके पक्के झाल्यासारखे दिसत होते कि मार्क्सचा विचार आता नामशेषच झाला असे वाटावे. गेल्या दहा वर्षांत मात्र जागतिक मंदीतून उद्भवलेले अरिष्ट, खाऊजा (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणांविरुद्धचे वाढते लढे आणि दक्षिण अमेरिकेतल्या नवसमाजवादी चळवळी यासारख्या गोष्टींमुळे मार्क्सच्या विचारांना पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ही दुसरी आवृत्ती काढत आहोत.

या आवृत्तीमध्ये पुस्तकातील मूळ मजकूर बव्हंशी तसाच ठेवला आहे. गेल्या तीस वर्षांतील घडामोडींचा काही परामर्श घेतला असता तर चांगले झाले असते परंतु हे बदल इतके मोठे आहेत की तो एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. पुस्तकाच्या रचनेत काही बदल केले आहेत. टीपा पुस्तकाच्या शेवटी घालण्याऐवजी प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी घातल्या आहेत. सामान्य वाचकांना अडथळा ठरू शकेल असा गणिताचा भाग लहान टाईपात व थोडा जास्त समास सोडून छापला आहे, तो कठीण वाटल्यास गाळता येईल.

मूळ पुस्तक खिळेजुळणीच्या काळात छापलेले होते. अभय ढमढेरे याने सर्व मजकूर पुन्हा टंकलेखन करून संगणक प्रणालीत आणला. माझी पत्नी स्वातीजा, अनंत फडके, संध्या फडके, दत्ता देसाई, विनया मा. ह., सुलभाताई ब्रह्मे यांनी पुस्तकाच्या पुनर्रचनेबद्दल चर्चा केली, सूचना दिल्या. अश्विनी भावे यांनी मुद्रिते तपासली.

मूळ पुस्तकाप्रमाणे या आवृत्तीचेही स्वागत होईल अशी खात्री आहे.

२ फेब्रुवारी २०१८, पुणे **सुहास परांजपे**

प्रकाशकाचे दोन शब्द

१९८३ साल मार्क्स मृत्यूशताब्दी वर्ष म्हणून जगभर गाजले. मार्क्स-एंगल्सचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८४८ साली प्रकाशित झाला आणि जग बदलण्याची ताकद आपल्या हातात आहे असा विश्वास निर्माण करणारी प्रेरणा त्या काळात अनेक युरोपीय राष्ट्रांत झुंजणाऱ्या कामगार चळवळींना मिळाली. त्यानंतर १८६७ मध्ये मार्क्सचा 'दास कापिटाल' ग्रंथ प्रकाशित झाल्याने कामगारवर्गीय क्रांतीचा शास्त्रीय सैद्धांतिक पाया घातला गेला.

मार्क्सचा सुप्रसिद्ध भौतिकवादी, द्वंद्वात्मक दार्शनिक (फिलॉसॉफिकल) दृष्टिकोन आणि इतिहास मीमांसेबद्दलचा भौतिकवादी दृष्टिकोन त्याच्या सर्वच लिखाणामध्ये समाविष्ट आहे. परंतु 'कॅपिटल' मधील त्याच्या विश्लेषणाने भांडवलशाहीबद्दल व कामगार क्रांतीबद्दल काढलेले निष्कर्ष हे सैद्धांतिक, वैज्ञानिक दृष्ट्या प्रस्थापित होतात. कारण 'कॅपिटल' मध्ये मार्क्सने भांडवली उत्पादनव्यवस्था तिच्या समग्र स्वरूपात विश्लेषणासाठी घेतलेली आहे. तिला आधारभूत संबंध, त्यामधील संगती/विसंगती. कामगारांचे स्थान, उभी राहणारी भांडवली विकासाची दिशा व गतिनियम तो तिथे काटेकोरपणे तपासून आपली समाज विश्लेषण पद्धती कसाला लावतो. इतिहासाबद्दलचा व जगाबद्दलचा त्याचा दृष्टिकोन भांडवलशाही व्यवस्थेच्या विश्लेषणामधील सिद्धांतामध्ये जैवपणे अंतर्भूत होतो. 'कॅपिटल' मधील विश्लेषण जमेस धरले नाही तर मार्क्सने भांडवलशाहीबद्दल काढलेले निष्कर्ष हे केवळ आदर्शवादी, मनोराज्यमय (युटोपियन) निष्कर्ष ठरवले जाऊ शकतात. ते खुद्द भांडवली व्यवस्थेच्या समग्र सैद्धांतिक विश्लेषणातून उभे राहत नसल्यामुळे त्यांची वास्तव जीवनातील सिद्धता नाकारली जाऊ शकते. थोडक्यात 'कॅपिटल' मधील मार्क्सच्या विश्लेषणामार्फतच मार्क्सच्या दृष्टिकोनाला व निष्कर्षांना पूर्ण वैज्ञानिक अधिष्ठान लाभते.

कॅपिटलमध्ये जे विश्लेषण केले आहे ते मुख्यत: भांडवलशाहीच्या उदयाचे व गतिनियमांचे आहे. त्यामुळे 'कॅपिटल' ग्रंथ हा भारतीय संदर्भात विशेष प्रस्तुत कसा ठरतो असा प्रश्न उपस्थित केला जातो. पण हे लक्षात घेतले पाहिजे की,

जागतिक पातळीवर भांडवलशाहीचा पगडा बसून भारतासारखे देश त्यात ओढले गेल्यावर 'कॅपिटल' मधील मूलभूत अन्वेषण पद्धतीचा आधार घेतला तरच आपणास आजच्या आर्थिक-राजकीय शक्तींचा अर्थ लावता येईल. मार्क्सच्या काळात दुसरा एक प्रश्न उपस्थित केला जात होता. निम्नभांडवली देश भांडवलशाही अवस्थेतून गेल्यावरच तेथे क्रांतीजन्य परिस्थिती निर्माण होईल की त्याशिवाय निम्नभांडवली अवस्थेकडून समाजवादी व्यवस्थेकडे क्रांतीकारक मार्गक्रमण करता येईल? याविषयी बरेच वादंग माजून या संदर्भात मार्क्सची भूमिका काय होती याबाबत रशियन विचारवंतांचा मार्क्सशी पत्रव्यवहारही झाला होता. आणि देश-काल परिस्थितीपरत्वे त्याबाबतचा विचार व्हावयास हवा, यांत्रिक पद्धतीने संक्रमण अवस्थांची अपरिहार्यता गृहीत धरणे बरोबर नाही अशी मार्क्सची भूमिका होती. 'कॅपिटल' मधील वैज्ञानिक दृष्टिकोन व विश्लेषणपद्धती आत्मसात केल्यास ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या खोड्यात अडकून पडण्याचे कारण नाही, तर त्या आधारे वस्तुस्थितीचे सर्जकतेने अन्वेषण करता येईल.

'कॅपिटल' या ग्रंथाच्या तीनही खंडांचे समग्र भाषांतर कॉ. वसंतराव तुळपुळे यांच्या प्रदीर्घ परिश्रमाने मराठी वाचकांपुढे आलेले आहे. परंतु युरोपीय संदर्भाबाबतची अपरिचितता, पारिभाषिक शब्दातील अडचणी आणि ग्रंथाची सुमारे २००० पानांची व्याप्ती यासारख्या अडचणींमुळे कॅपिटल ग्रंथ मराठी वाचकांना अजूनही तसा दुर्गमच राहिला आहे. कॅपिटलचा सुबोध परिचय मराठी वाचकांना उपलब्ध व्हावा, त्यातील मूलभूत संकल्पना आणि त्यांचा आजचा संदर्भ स्पष्टपणे पुढे यावा याची निकड गेली अनेक वर्षे जाणवत होती. ह्यासाठी निकराने प्रयत्न झाले पाहिजेत असे १९८३ साली—मार्क्स मृत्यूशताब्दीवर्षी ग्रंथालयाने ठरविले. हे काम हाती घेण्यासाठी एका बाजूला कॅपिटल व मार्क्सच्या दार्शनिक व इतर लिखाणांचा सखोल अभ्यास हवा, कॅपिटलमधील गणिती मांडणी आत्मसात करण्यासाठी गणितशास्त्राचे नेटके आकलन हवे तर दुसऱ्या बाजूला श्रमिकांच्या चळवळींशी नाते हवे, आणि मराठी लिखाणात सुगमता हवी. यासाठी एकच नाव डोळ्यासमोर होते, ते म्हणजे आमचे मित्र सुहास परांजपे ह्यांचे. त्यांच्या बरोबर विचारविनिमय होऊन सुहास परांजपे यांनी ही जबाबदारी स्वीकारली. सव्वा वर्षाच्या काळात त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक समर्थपणे या ग्रंथाचे लिखाण पुरे केले. ह्या ग्रंथात कॅपिटलचा केवळ परिचय नाही तर भांडवली अर्थशास्त्रीय मांडणीच्या मर्यादा

दाखवून मार्क्सच्या विश्लेषणाचे वैशिष्ट्य स्पष्ट केले आहे. मार्क्सने त्याच्या काळात केलेल्या मांडणीत भर घालून त्याच्या काही संकल्पना विकसित करण्याचा प्रयत्न विविध मार्क्सवादी विचारवंतांनी गेल्या ५०-६० वर्षात केला आहे. ही नवीन मांडणी विचारात घेऊन प्रस्तुत ग्रंथातील विवरण केलेले आहे.

१६ ऑगस्ट १८६७ ला मार्क्सने 'कॅपिटल' ग्रंथाच्या पहिल्या खंडाची शेवटची मुद्रिते तपासून छपाईसाठी जर्मनीस पाठविली. १६ ऑगस्ट १९८४ रोजी कॅपिटलचे सुगम विवरण मराठी वाचकांपुढे ठेवण्यास आम्हास विशेष आनंद वाटत आहे. मराठी वाचक ह्या ग्रंथाचे आस्थेने वाचन-मनन-चिंतन करतील, आणि भारतातील आजच्या आव्हानांना भिडण्याच्या तयारीमध्ये कॅपिटलच्या विचारपद्धतीचा यथायोग्य उपयोग करून घेतील असा आम्हास विश्वास वाटतो.

१६ ऑगस्ट १९८४ **सुलभा ब्रह्मे**
शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे

लेखकाचे मनोगत

मार्क्सचा विचार स्वीकारल्यानंतरदेखील अनेक वर्षे मी मार्क्सच्या 'दास कापिटाल'ला हात घालायला धजावलो नव्हतो. राजकीय चर्चेच्या आणि संघर्षाच्या दबावाने मला प्रथम त्याला हात घालावा लागला. त्या पहिल्या प्रयत्नात मी जेमतेम साठ एक पाने वाचेपर्यंत माझी दमछाक झाली आणि तो प्रयत्न तिथेच कोलमडला. तोच मी आज तुमच्यासमोर 'कॅपिटल' बद्दल एक पुस्तक घेऊन येत आहे!

असे घडावे यात एक गमतीशीर अंतर्विरोध तर आहेच, पण एक गंभीर टिप्पणीही अंतर्भूत आहे. माझ्यासारखीच अनेकांची गत होत असेल. मला निदान इंग्रजी येत होते व 'कॅपिटल' बद्दल मला उपलब्ध झालेले बरेच लिखाण मला मदतकारक ठरले. माझ्या कोलमडलेल्या पहिल्या प्रयत्नापासून ते हे पुस्तक लिहिण्यापर्यंत वाटचाल करताना आज मार्क्सच्या 'कॅपिटल' सारखे पुस्तक आत्मसात करण्यामध्ये किती अडथळे उभे राहिलेले असतात याचा मला अनुभव आला. या अडथळ्यांचे भान ठेवून ते शक्य तितके कमी होतील अशा तऱ्हेने हे पुस्तक लिहायचा प्रयत्न केलेला आहे. तरीही हे पुस्तक वाचताना किंवा 'कॅपिटल' मुळात वाचतानाही त्यांची माहिती उपयोगी पडेल म्हणून या पूर्वचर्चेचा प्रपंच मांडला आहे.

'कॅपिटल'मधील मार्क्सच्या विश्लेषण पद्धतीचा एक काटेकोर प्रवाह आहे, सुरुवातीशी व आशयाशी इमान राखणारी त्यात एक संगती आहे. माझा पहिला प्रयत्न कोलमडला कारण मला तिचे भान नव्हते. ज्या राजकीय चर्चेच्या संदर्भात मी 'कॅपिटल' वाचायला घेतले होते ती कामगारवर्गाच्या स्थानाबद्दलची होती. आणि तब्बल दीडशे पानांपर्यंत कामगारवर्गाचा उल्लेखच नव्हता! आता पद्धतीबद्दल भान आल्यावर त्याचे कारण कळते आहे. विश्लेषणाच्या गरजेतून उभे राहील तेव्हाच मार्क्स पुढचा प्रश्न उचलत चालला होता. मला मात्र निष्कर्षाला पोचायची घाई होती. मार्क्सची पद्धती मला गौण वाटत होती.

मार्क्सच्या विश्लेषण पद्धतीबद्दलचे भान ठेवून ती आत्मसात करणे हे काही गोष्टींमुळे जास्त कठीण बनते. गिऱ्हाईक म्हणून आपण जातो तेव्हा वस्तू नीट वेष्टनात हातात पडल्याशी कारण असते, ती कोण आणि कसा बनवतो याच्याशी आपले काय कर्तव्य? ही मानसिकता वैचारिक क्षेत्रातही काम करू शकते. विचार आत्मसात करायला जाताना आकर्षक वेष्टनातील निष्कर्षांना जास्त महत्त्व असते, ते निष्कर्ष कोणी कसे काढले त्या पद्धतीला महत्त्व राहत नाही. अन् अशी मानसिकता आपल्या भोवतालच्या प्रचार माध्यमांमधून सतत आपल्यामध्ये झिरपत असते.

दुसरी बाब सुलभीकरणाच्या फायद्या–तोट्यांशी संबंधित आहे. मार्क्सचा अर्थशास्त्रीय विचार सुलभ करून सांगणारी आज अनेक पुस्तके–पुस्तिका आहेत, अनेक अभ्यासवर्गांमधूनही हे काम होते. आणि हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण अशातूनच मार्क्सचा विचार सर्वदूर पसरू शकतो व एका सामूहिक शक्तीला जन्म देतो. पण या फायद्याबरोबर काही आंतरिक मर्यादाही येतात. सूत्रबद्ध निष्कर्षाच्या स्वरूपात जे मांडले जाऊ शकते त्याला जास्त महत्त्व येते. आणि असे निष्कर्ष अनेकदा स्वायत्तपणे, त्या त्या निष्कर्षापुरती पार्श्वभूमी निर्माण करून मांडणे आवश्यक बनत जाते. मार्क्सच्या समग्रतेची, विश्लेषण पद्धतीची वैशिष्ट्ये मागे सरकू शकतात. सुलभीकरणाच्या या मर्यादांचे भान ठेवायचे तर निष्कर्ष परिचित असूनही तो निष्कर्ष विश्लेषणाच्या प्रवाहात नेमक्या जागी का व कसा आला याचे जाणीवपूर्वक भान ठेवावे लागते.

मार्क्सच्या दृष्टिकोनाला वैज्ञानिक अधिष्ठान देणारे 'कॅपिटल' मधील विश्लेषण हे सर्वसाधारणपणे मार्क्सचे अर्थशास्त्र समजले जाते. हे एका अर्थी खरे आहे, पण अर्धसत्य आहे. मार्क्सचे फक्त अर्थशास्त्र समजून घेण्याच्या अपेक्षेने 'कॅपिटल' वाचू लागले तर विश्लेषणाचा फार थोडा भाग आत्मसात होतो आणि विश्लेषण जास्त दुर्बोध व कठीण वाटू लागते.

खरे तर मार्क्सला अर्थशास्त्राने स्वत:साठी वेचून घेतलेले संकुचित क्षेत्र व त्याची स्वायत्तता दोन्ही मान्य नाहीत. त्याच्यासाठी महत्त्वाचा आहे तो उत्पादन व्यवहार. उत्पादनाच्या आवश्यकतेमधून माणसे जे संबंध बांधतात त्यातून त्यांचे जीवन सर्वांगीणपणे कसे घडत जाते हा त्याच्यासमोरचा प्रश्न आहे, ऐतिहासिक भौतिकवादाची बैठक त्यात अंतर्भूत आहे. त्यामुळे त्याच्या विश्लेषणात अर्थशास्त्राच्या संकुचित पठडीत न बसणारा मजकूर व संदर्भ सतत

येत असतो. अर्थशास्त्राबद्दलच्या संकुचित कल्पना कायम ठेवून 'कॅपिटल' वाचले तर या मजकुरापासून काही शिकणे तर शक्य नसतेच, उलट असे संदर्भ एक अडथळा, दुर्बोधता म्हणून समोर येतात. मार्क्सच्या समग्रतेचे भान ठेवून उपयोग करून घेतला नाही तर मार्क्सची समग्रताच एक अडथळा बनते!

मार्क्सच्या काळात भांडवली व्यवस्थेचे सर्वात विकसित स्वरूप व केंद्रस्थान पश्चिम युरोपात होते. त्यामुळे साहजिकच 'कॅपिटल' मधील लिखाण हे पश्चिम युरोपमधील आर्थिक-सामाजिक-राजकीय-वैचारिक क्षेत्रातील घडामोडींच्या व विचारप्रवाहांच्या संदर्भांनी संपृक्त आहे. आज भारतासारख्या देशातील, विशेषत: इंग्रजी न जाणणाऱ्या वाचकाला हे संदर्भ व तत्संबंधी लक्षित असलेले मुद्दे समजण्यास व पूर्णपणे आत्मसात करण्यास अत्यंत कठीण जाते. वास्तविक कॉ. वसंतराव तुळपुळे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक मार्क्सच्या 'कॅपिटल'च्या तीन खंडांचे भाषांतर मराठीत उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. परंतु ते समजून घेण्यास वरील अडचणींमुळे मर्यादा पडतात.

वरील प्रकारच्या सर्व कारणांचा कमीत कमीत अडथळा व्हावा व जिज्ञासू वाचकाचे मार्क्सच्या 'कॅपिटल' मधील विचाराशी नाते जोडले जावे हा या पुस्तकाचा उद्देश आहे. मार्क्सच्या दृष्टिकोनातील अध्याहृत गृहीते व मुद्दे इ. गोष्टी पुढे याव्यात व ठसाव्यात या दृष्टीने पुस्तकाची रचना केली आहे. बऱ्याच ठिकाणी पूर्ण युरोपीय संदर्भ टाळून त्यातील फक्त मुद्दे घेतले आहेत. जिथे युरोपीय संदर्भ वापरले आहेत तिथे थोडक्यात पार्श्वभूमी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मार्क्सचा क्रांतिकारक वैज्ञानिक दृष्टिकोन 'कॅपिटल'च्या भक्कम आधारावर आत्मसात करणे यामुळे जास्त सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्याबरोबरच ज्यांना मार्क्सचे 'कॅपिटल' मुळात वाचून हा दृष्टिकोन पक्का करावा असे वाटत असेल त्यांनाही यातून मदत होईल.

पुस्तक सुबोध आहे पण 'झटपट' पद्धतीने वाचण्यासारखे मात्र नाही. कुठलेही पुस्तक हे शेवटी एक माध्यम असते. त्याचा आशय पुनर्निर्मित करण्यासाठी वाचकाला दिलेली सहकार्याची हाक असते. मार्क्सच्या विचारांसारखा मूलगामी, समग्र विचार मांडू पाहणाऱ्या पुस्तकाबद्दल तर हे आणखीनच खरे ठरते.

पुस्तकाचा नकाशा : कुठे, काय सापडेल/सापडणार नाही

पुस्तकात कुठे काय सापडेल याचा 'नकाशा' या कामी मदतकारक ठरेल. विभाग-१, विभाग-२ व परिशिष्टे असे पुस्तकाचे तीन मुख्य भाग पडतात. मार्क्सच्या 'कॅपिटल' च्या पहिल्या खंडाचा परिचय विभाग-१ मध्ये आहे. 'कॅपिटल'च्या चार खंडांपैकी मार्क्सने संपूर्ण संपादित केलेला व स्वत:च्या अखत्यारीत मुद्रणासाठी तयार करून छापलेला हा एकमेव खंड आहे. तो एका परिपूर्ण पुस्तकाच्या स्वरूपात वाचता येतो व भावू शकतो. मार्क्सच्या विश्लेषणाचा मध्यवर्ती प्रवाह पकडून विभाग-१ हा देखील वाचकांना एका पूर्ण पुस्तकासारखा स्वतंत्रपणे वाचता येईल.

विभाग-१ बद्दल एका शक्यतेची दखल घेणे जरूरीचे वाटते. 'कॅपिटल'च्या पहिल्या खंडात सुरुवातीलाच क्रयवस्तू व पैसा यांबद्दलची सर्वात महत्त्वाची पण कठीण प्रकरणे येतात. पुस्तकामध्ये हा भाग पहिल्या तीन प्रकरणांमध्ये समाविष्ट आहे. त्याच्याबद्दल काही अडचण भासू लागली तर मला अनुभवातून उपयोगी पडलेली पद्धत उपयुक्त ठरेल (तिचे श्रेय कार्ल कॉर्श या जर्मन मार्क्सवाद्याला जाते.) ही पहिली प्रकरणे प्रथम फक्त वाचून काढावीत, समजेल तितका त्यांचा संदर्भ ठेवावा, पण ताबडतोबीने पूर्ण समजून घेण्यात दमछाक करून घेऊ नये. विभाग-१ पूर्ण झाल्यावर ती पुन्हा वाचावीत. माझा अनुभव असा आहे की असे केल्याने तो मजकूर जास्त चांगला समजतो व त्याचे महत्त्वही जाणवते.

पुस्तकाचा विभाग-२ हा विभाग-१ पेक्षा थोडा कठीण आहे. त्यामध्ये 'कॅपिटल'च्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडातील निवडक महत्त्वाच्या मजकुराचा समावेश केलेला आहे. आज हा भाग महत्त्वाचा आहे कारण मार्क्सच्या मृत्यूनंतर मार्क्सवर होणाऱ्या टीकेचा प्रमुख रोख हा याच मजकुरावर असतो. त्यामुळे या मजकुराचा समावेश करणे व त्याबद्दलच्या मार्क्सच्या मृत्यूनंतर उद्भवलेल्या टीकेचा परामर्ष घेणे हे महत्त्वाचे बनते. मार्क्सवरील ही टीका गणितावर आधारलेली असल्यामुळे तिचा परामर्ष घेताना काही गणिताचाही समावेश करावा लागला आहे. मात्र ते कुठेही प्राथमिक बीजगणिताच्या पलीकडे जात नाही. अडचण आल्यास वर उल्लेखलेली पुनर्वाचनाची पद्धत इथेही उपयोगी पडेल.

मार्क्सच्या 'कॅपिटल' मध्ये सरळपणे समाविष्ट नसलेल्या परंतु महत्त्वाच्या किंवा कठीण भागांचा परिशिष्टांमध्ये समावेश केलेला आहे. पहिल्या परिशिष्टामध्ये

मार्क्सची वादग्रस्त 'आंगिक प्रमाण वाढण्याची प्रवृत्ती' काटेकोर गणिती पद्धतीने सिद्ध केली आहे. मार्क्सच्या या निष्कर्षाची ही नवी सिद्धता आहे. त्याचबरोबर पुस्तकाच्या विभाग-२ मध्ये शेवटच्या प्रकरणात याच पद्धतीने 'नफा घसरण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती' सिद्ध केली आहे.

दुसऱ्या परिशिष्टामध्ये आज बहुचर्चित ठरणाऱ्या एका महत्त्वाच्या विचारप्रवाहाचा परामर्ष घेतलेला आहे. शेती विरुद्ध उद्योग या विभागणीचा संदर्भ (आणि फक्त संदर्भ) घेऊन असमान विनिमयाच्या सिद्धांतांच्या आधारे एका क्षेत्राकडून दुसऱ्या क्षेत्राचे (उद्योग विरुद्ध शेती, शहर विरुद्ध खेडे, संघटित विरुद्ध असंघटित क्षेत्र) शोषण होते असे मांडणाऱ्या विचारप्रवाहांचा त्यात परामर्ष घेतलेला आहे.

तिसऱ्या परिशिष्टात विभाग-२ मध्ये मूल्याच्या भाषेत वर्णन केलेले नफ्याचे वाटप हे प्रत्यक्षात किंमतीतील रूपांतरामार्फत टप्प्याटप्प्याने कसे होते हे दाखवणारी गणिती प्रतिरूपे समाविष्ट केली आहेत.

चौथ्या परिशिष्टात स्त्रियांचा प्रश्न व मूल्यसिद्धांत या संदर्भात घरकामाबाबत एक दीर्घ पण महत्त्वाची मांडणी आहे. मार्क्स स्त्रीमुक्तीचा पुरस्कर्ता असला तरी घरकामाचा मूल्यसिद्धांतामध्ये कसा अंतर्भाव होतो याची सैद्धांतिक तपासणी मार्क्सने केलेली आढळत नाही. हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो कारण घरकाम हे स्त्रियांचे स्त्री या नात्याने उत्पादन व्यवहारातील व्यवच्छेदक काम ठरते. आज हा प्रश्न महत्त्वाचा बनला आहे. या परिशिष्टामध्ये मार्क्सच्या मूल्यसिद्धांताच्या मूलगामी वापरातून घरकामामार्फत स्त्रियांचे होणारे शोषण हे भांडवली शोषणाचा एक जैव भाग म्हणून उभे राहताना आपल्याला आढळेल.

पुस्तकातील टीपा या मुख्यत: एखाद्या मुद्द्याच्या तपशीलाच्या किंवा गुंतागुंतीच्या पैलूंची दखल घेण्यासाठी वापरल्या आहेत. एखादा बारकाव्याचा मुद्दा महत्त्वाचा असूनदेखील तो विश्लेषणप्रवाहात बसत नसेल तर अशा मुद्द्यांसाठीदेखील टीपा आलेल्या आहेत.

पुस्तकात वेतन व श्रमशक्तीच्या मूल्याच्या रूपाबद्दल सविस्तर तपासणी नाही. त्याचबरोबर असमान विनिमयाच्या सिद्धांतांपैकी वेतनामधील तफावतीवर आधारलेल्या सिद्धांतांची दखल घेतलेली नाही. याची दोन कारणे आहेत. मार्क्सने अगोदर 'कॅपिटल' साठी जो आराखडा तयार केला होता त्यापैकी फार थोडा भाग शेवटी तो समाविष्ट करू शकला. या आराखड्यामध्ये वेतन, श्रम,

शासन, आंतरराष्ट्रीय व्यापार, जागतिक बाजारपेठ या सर्व विषयांना प्रत्येकी एक स्वतंत्र खंड योजला होता. त्यामुळे खुद्द 'कॅपिटल' मध्येच वेतनाबाबत फार थोडा मजकूर आहे. त्याबरोबरच या प्रश्नाला न्याय द्यायचा तर आज विकसित झालेली वेतनपद्धती, श्रेणी, मानसिक-शारीरिक श्रमांची विभागणी इत्यादी अनेक गोष्टींची दखल घेणे आवश्यक होते. कारण आज मार्क्सवर या सर्व गोष्टीचा संदर्भ घेऊनच टीका होते. याबाबतींत किमान एक पूर्ण सैद्धांतिक आराखडा तरी उभा राहणे गरजेचे आहे व ते माझ्या सध्याच्या क्षमतेबाहेरचे आहे. या दोन्ही कारणांमुळे वेतनाच्या रूपाच्या मूळ सैद्धांतिक तपासणी पलिकडे या प्रश्नाला पुस्तकामध्ये वेगळे स्थान दिलेले नाही.

पुस्तकामध्ये निरनिराळ्या भांडवली विचारप्रवाहांचा उल्लेख किंवा उपयोग हा मुख्यत: मार्क्सच्या मध्यवर्ती सूत्रांची सुस्पष्ट समज येण्याच्या दृष्टीने केला आहे. उल्लेखलेल्या विचारप्रवाहाचा किंवा त्यातील एखाद्या विचारवंताचा विचार हा प्रत्यक्ष उल्लेखलेल्या सूत्रांपेक्षा जास्त व्यापक, गुंतागुंतीचा व अंतर्विरोधी आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. निरनिराळ्या विचारप्रवाहांचे पूर्ण ऐतिहासिक किंवा सैद्धांतिक मापन त्या उल्लेखांमध्ये सामावलेले आहे असा जराही दावा नाही. हे मापन करणे एक वेगळे व मोठे काम आहे. ते या पुस्तकाच्या कक्षेत न सामावणारे आहे. त्यामुळे भांडवली व अर्थशास्त्रीय विचारांचे त्यांच्या ऐतिहासिक विकासाच्या स्त्रोतात सैद्धांतिक मापन करणारा 'कॅपिटल'च्या चौथ्या खंडाच्या तिन्ही भागातील मजकुराचा समावेश पुस्तकात नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या प्रदीर्घ तेजीच्या काळानंतर १९६६-६७ च्या सुमारास आंतरराष्ट्रीय पातळीवर भांडवलशाहीला एका खोल अरिष्टाने ग्रासले व ते अरिष्ट अजूनही रडत-खडत चालू आहे. दुसऱ्या महायुद्धातून बाहेर येताना भांडवलशाहीने आपल्या मक्तेदारी-साम्राज्यवादी रूपात एक नवीन अवस्था गाठली होती. वासाहतिक देशांच्या स्वातंत्र्यसंग्रामांमधून आणि पूर्व युरोपीय देशांमधल्या व चीनसारख्या इतर देशांमधल्या कम्युनिस्ट नेतृत्वाखालील क्रांतीमधून तिच्यातील शक्तीचे संतुलनही पार बदलून गेलेले होते. त्यातून कामगार-कष्टकरी समूहांच्या चळवळींचे व विचारांचे एक नवे पेव फुटले आहे. मार्क्सच्या विचारांचा प्रभाव वाढत आहे. मार्क्सच्या समर्थकांमधील व कामगार-कष्टकरी समूहांच्या चळवळीमधील मार्क्सच्या विचाराबद्दलची चर्चा, वाद व संघर्षदेखील वाढत आहे. नवनव्या सामाजिक, वैचारिक क्षेत्रात ही घडामोड होत आहे. नवनव्या समूहांच्या आशाआकाक्षांचा संदर्भ त्याला

निर्माण होत आहे. मार्क्सचे अप्रकाशित साहित्य उजेडात येत आहे व उपलब्ध होत आहे. मार्क्सच्या विचारांबद्दल चालू असलेल्या चर्चा/वाद/संघर्षामध्ये उमटणाऱ्या दृष्टिकोनांची व्याप्ती, वैशिष्ट्ये व संख्या वाढलेली आहे. मार्क्सचा विचार सर्वदूर पोचत आहे, समाजजीवनाची जास्तीत जास्त अंगे व्यापीत आहे. खऱ्या अर्थाने तो एक समग्र जीवन दृष्टिकोन बनू पाहतो आहे असाही या घडामोडींचा अर्थ आहे. या घुसळणीमधून मार्क्सच्या विचाराबद्दल विपुल लिखाण आंतरराष्ट्रीय पातळीवर झाले आहे व त्यातील बरेच इंग्रजीत उपलब्ध झालेले आहे. माझ्यावर या साहित्याचे फार मोठे ऋण आहे.

श्रेयनिर्देश

मार्क्सच्या 'कॅपिटल'च्या अभ्यासामध्ये पडण्याची मला ज्यामुळे प्रेरणा निर्माण झाली त्यांचा याठिकाणी श्रेयनिर्देश करणे महत्त्वाचे आहे. १९६६-६७ नंतरच्या नव्या वातावरणात 'मागोवा' मासिकाभोवती घडत असलेल्या घडामोडी व शहादे भागातील 'श्रमिक संघटने'चे काम यांमधील माझ्या सहभागामुळेच माझ्यामध्ये ही प्रेरणा निर्माण होऊ शकली. त्याबरोबरच त्या काळात जायरस व रोहिणी बानाजी व त्यांच्या भोवती जमलेली मंडळी जे मांडत, ते पटत नसले तरी त्यांचा ही सर्व चर्चा मूलगामी प्रश्नांच्या पातळीवर नेण्याचा श्रेयनिर्देशही महत्त्वाचा आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीचे श्रेय मात्र प्रामुख्याने सुलभा ब्रह्मे व अनंत फडके यांना द्यावे लागेल. सुलभाताईंनी मुळात हे पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचवली, आखणीपासून समाप्तीपर्यंत सर्व मजकुरावर तपशीलवार चर्चा केली, प्रुफे तपासण्यापासून प्रकाशनाची व व्यवस्थापनाची सर्व मुख्य जबाबदारी उचलली व ग्रंथालयातर्फे ते प्रकाशित केले. मुद्द्याच्या प्रत्येक पैलूबद्दल तपशीलवार स्पष्टता आली पाहिजे या अनंताच्या आग्रहामुळे पुस्तकाच्या काटेकोरपणात मोठी भर पडली आहे. त्याने व्यवस्थापकीय धावपळीचाही बराच भाग सांभाळला. या दोघांशी झालेल्या तपशीलवार चर्चेमधून बराच कच्चा मजकूर गळाला, लक्षात न आलेले सैद्धांतिक मुद्दे पुढे येऊन स्पष्ट झाले व मांडणी सुधारली. त्यांचे औपचारिक आभार मानून त्यांचा अपमान मला करायचा नाहीय, फक्त तुमच्यापर्यंत त्यांचे श्रेय पोचवायचे आहे.

गोखले इन्स्टिट्यूटच्या प्रा. बापटांनी सर्व मसुदा नजरेखालून घातला, महत्त्वाच्या गोष्टी तपासल्या, व प्रस्तावना लिहून दिली. सुधीर बेडेकरने अंतिम

मसुदा नजरेखालून घातला व जरूर तेथे दुर्बोध रचनेतून नेमका कोणता अर्थ पोचवायचा आहे ते ओखळून योग्य ते बदल केले. त्याशिवाय विजय कान्हेरे, संध्या फडके, पुरुषोत्तम पानसे, रा. प. नेने, अशोक मनोहर, मुक्ता मनोहर, दत्ता देसाई, विनया देशपांडे, मेधा थत्ते, सुजाता गोठोस्कर, कुमार शिराळकर, वाहरु सोनवणे व इतरांनीही अनेकवेळा मसुद्याचा निरनिराळा भाग वाचून त्यावर टिप्पणी केली. मुक्ता मनोहरने सूची करण्यात मदत केली. श्री. ज्ञानेश्वर व चंद्रशेखर कुडले आणि त्यांचे सहकारी यांनी माझ्या सर्वप्रकारच्या कागदांवर सर्वप्रकारच्या अक्षरामध्ये लिहिलेल्या मजकुराशी झगडत खिळेजुळणी केली. पुस्तकाचे बरेचसे काम मी घरीच केले. तेव्हाच्या अनियमित वेळा, कागदांचा पसारा, प्रासंगिक चिडचिड हे घराचा भाग बनले होते व त्याच्याशी घरच्या सर्वांनी जुळवून घेतले. इतके की आमच्या छोट्या मुलीच्या—ऋताच्या दृष्टीने पाठकोऱ्या कागदांना एक नवा अर्थ प्राप्त झाला—बाबाला विचारल्याशिवाय न वापरायचे कागद!

शेवटी एक खेदजनक, तथाकथित खाजगी श्रेयनिर्देशही करायचा आहे. त्याला ‘श्रेय’ म्हणायचे का हाही प्रश्नच आहे. हा श्रेयनिर्देश आहे माझ्याशी आयुष्य बांधून घेतलेल्या माझ्या पत्नीचा—स्वातिजाचा. या पुस्तकासाठी आवश्यक ते लिखाण मी आत्मसात केले ते आमच्या सहजीवनाच्या सुरुवातीच्या काळात. त्यावेळी मला जाणवत नव्हते की या माझ्या उर्मी फुलत असताना तिच्या उर्मी मात्र मारल्या जात होत्या, नव्हे, त्या काळात माझ्या उर्मी फुलण्याला तोच आधार होता. तिने त्याविरुद्ध बंड केले, त्यानंतरही बराच काळ ही गोष्ट मला भावली नव्हती. स्त्रीमुक्ती चळवळीशी व लिखाणाशी आलेला संबंध व स्वातिजाचे त्याआधारे बंड या दोन्हीचाही मला राजकारणाबद्दलची समग्र जाणीव येण्यामध्ये भाग आहे. अन् त्यामुळेच तिच्या आयुष्याची काही वर्षे फुकट जाणे हे या पुस्तकासाठी मी वैचारिक शिदोरी गोळा करण्याचा आधार असावे हे नोंदणे आवश्यक ठरते. पुरुषी वर्चस्ववादाने संपृक्त परिस्थितीमध्ये मार्क्सचे विचार स्वीकारलेल्या एखाद्याला असाही ‘श्रेय’ निर्देश करावा लागतोय ही या व्यवस्थेवरची एक टिप्पणीही ठरावी.

सुहास परांजपे
९, सर्वेश हाऊसिंग सोसायटी, गोविंदनगर, ठाणे (पूर्व)

प्रस्तावना

प्रस्तुत ग्रंथ 'कॅपिटल' चे भाषांतर नाही, किंवा त्याची संक्षिप्त आवृत्तीही नाही. कॅपिटलचे ते एक सुबोध विवेचन आहे. 'कॅपिटल'च्या पहिल्या खंडातील सर्व विषय त्यात आलेले आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या खंडातील निवडक विषय चर्चेला घेतलेले आहेत. त्यांची निवड करताना मार्क्सच्या मूल्यसिद्धांताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या व आज वादग्रस्त ठरलेल्या प्रश्नांवर जाणीवपूर्वक भर दिलेला आहे. त्यामध्ये मूल्य-किंमत रूपांतरणाचा प्रश्न, नफ्याचे वाटप, सर्वसाधारण नफ्याचा दर व त्या दरातील घसरणीची प्रवृत्ती यासंबंधी विवेचन केलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. सुहास परांजपे हे शिक्षणाने यंत्रविशारद आहेत. विद्यापीठातून दिले जाणारे अर्थशास्त्राचे शिक्षण त्यांनी घेतलेले नाही. एका परीने हे चांगले आहे कारण त्यामुळे त्यांच्या विचारावर किंवा विवेचनावर प्रस्थापित अर्थशास्त्रातील पठडीच्या विचारपद्धतीची पुटे चढलेली नाहीत. मार्क्सच्या 'कॅपिटल' चे विवेचन करताना अगदी सहज सुलभ शैलीत मार्क्सच्या अर्थशास्त्राचा त्यांनी मराठी वाचकाला परिचय करून दिलेला आहे. मार्क्सला अमुकच म्हणावयाचे आहे किंवा म्हणावयाचे नाही असे अभिनिवेशपूर्ण विवेचन प्रस्तुत ग्रंथात आढळणार नाही. किंवा मार्क्सच्या अर्थशास्त्राचे सुलभीकरण करण्याच्या हव्यासाने त्यांनी मार्क्सवर आपली आवडती मते किंवा कल्पना लादलेल्या नाहीत. मार्क्सच्या अर्थशास्त्राच्या अंतरंगावरील आपली पकड जराही ढिली पडू न देता मार्क्सला अभिप्रेत असलेला आशय त्यांनी सामान्य वाचकापर्यंत, त्याला समजेल अशा भाषेत समर्थपणे पोचवलेला आहे.

आज मार्क्सचा अभ्यास विद्यापीठीय स्तरावरील विद्वान मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. हे जसे परदेशांतील विद्यापीठात होत आहे तसे आपल्याकडेही होत आहे. मार्क्सच्या विचाराची दखल विद्यापीठात घेतली जात आहे ही एका परीने मार्क्सच्या विचाराचे महत्त्व दर्शविणारी घटना आहे. मार्क्सवरील विद्वान मंडळींनी केलेले लिखाण गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीनी समृद्ध होत आहे.

पण एक गोष्ट खरी. हे लिखाण सामान्य माणसापासून दूर जात आहे. त्या लिखाणातील विश्लेषणाची पातळी, भाषा, मांडणीची गणितीय पद्धत या सर्वांमुळे मार्क्सवरील लिखाण अमूर्त पातळीवर होत आहे असे वाटते. मार्क्सला विद्यापीठात आणून त्याला सामान्य माणसापासून, ज्याच्यासाठी त्याने अर्थशास्त्र लिहिले त्या कामगारवर्गापासून त्याला दूर ठेवले जात आहे असे वाटते. श्री. परांजपे यांनी आपल्या सुबोध शैलीतील विवेचनाने मार्क्सला पुन्हा कामगारांच्या समजुतीच्या कक्षेत आणले आहे. हे करणे आवश्यक होते. मार्क्ससारख्या विद्वानाला याची जाणीव होती म्हणून त्याने कामगारांसाठी, त्यांची जाणीव प्रगल्भ व्हावी, भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील आपले स्थान त्यांनी ओळखावे आणि आपले इतिहासदत्त मानवी विमोचनाचे कार्य डोळसपणे तडीस न्यावे म्हणून आपल्या लिखाणाचा पसारा मांडला. आजच्या कामगार चळवळीने मार्क्स पुन्हा हाती घ्यायला पाहिजे. श्री. परांजपे यांचा प्रस्तुत ग्रंथ त्या दृष्टीने टाकलेले आपल्याकडील महत्त्वाचे पाऊल ठरावे.

(१)

मार्क्सचे अर्थशास्त्र समग्रपणे समजून घेण्यासाठी मार्क्स अर्थशास्त्राकडे ज्या परिस्थितीत वळला किंवा त्याला जाणीवपूर्वक वळावे लागले ती परिस्थिती समजून घेतली पाहिजे. खरे तर मार्क्स हा इतिहास आणि तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी. ग्रीक इतिहासातील एका कालखंडातील तत्त्वज्ञानावर डॉक्टरेटसाठी त्याने प्रबंध लिहिला. डॉक्टरेट मिळवून बॉन विद्यापीठात प्राध्यापकपद मिळवण्याची त्याची मनीषा होती. पण तत्कालीन जर्मनीमधील राजकीय परिस्थितीमुळे मार्क्सला प्राध्यापकाची जागा मिळाली नाही. त्यानंतर प्रचलित व्यावहारिक विषयांच्या निमित्ताने मार्क्सने आपली मते मांडण्यासाठी पत्रकारितेत पदार्पण केले. त्या काळात क्रांतिकारी विचारवंतांना जर्मनीमध्ये पत्रकारिता हे एक अमोल माध्यम आणि शस्त्र वाटत होते. पत्रकारिता आणि सामाजिक वास्तव यांचा संबंध जवळचा असतो. प्रचलित प्रश्नांच्या चर्चेतून मार्क्स त्या प्रश्नांच्या राजकीय बाजूकडे वळलेला आहे. 'ऱ्हायनीशे त्सायटुंग' या वर्तमानपत्राचा संपादक झाल्यानंतर मार्क्सने हाताळलेल्या सामाजिक प्रश्नांच्या बुडाशी त्याला प्रथम राजकीय आणि नंतर आर्थिक भूमिका असल्याचे स्पष्ट जाणवू लागले. त्याला हे जाणवले की आजवरच्या त्याच्या लिखाणातून प्रश्नांच्या आर्थिक बाजूचा विचार पूर्णपणे सुटला होता. यासंबंधी पुढे त्याने असे लिहिले आहे की '१८४२-४३ साली 'ऱ्हायनीशे त्सायटुंग' चा मी संपादक असताना समाजातील

आर्थिक हितसंबंधांविषयी ज्या अनेक चर्चा चालत असत त्यात भाग घेण्याचे अडचणीचे प्रसंग माझ्यावर आले. जंगलातील लाकडाच्या चोरीविषयी आणि जमीन-जुमल्याच्या वाटणीविषयी ऱ्हाईन प्रांतिक सभेत ज्या चर्चा चालत, मोझेल जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीशी संबंधित लिखाणावरून 'ऱ्हायनिशे त्सायटुंग' विरुद्ध सरकारने उघडलेली मोहीम आणि शेवटी खुला व्यापार व उद्योगधंद्यांना संरक्षण देणारी जकात-नीति इत्यादीवरील चर्चेमुळे पहिल्यांदाच आर्थिक प्रश्नांवरील चर्चेकडे लक्ष पुरविणे मला भाग पडले.'[१]

पत्रकारितेच्या काळात मार्क्सच्या हेही लक्षात आले की राज्यसंस्थेविषयीची त्याने हेगेलपासून घेतलेली कल्पना आणि प्रत्यक्षातील राज्यसंस्था यात तफावत पडत होती. राज्यसंस्था सर्वच सामाजिक प्रश्नात खाजगी हितसंबंधाचे संरक्षण करणारी भूमिका घेत होती. जंगलातील लाकडाच्या चोरीसंबंधी नवीन कायद्यावर लिहिताना त्याला सामाजिक वर्गांच्या अस्तित्वाची आणि त्यांच्या प्रभावाची जाणीव झाली. हेगेलप्रणीत राज्यसंस्थेचे कार्य सार्वत्रिक हित जपण्याचे आहे पण प्रत्यक्षात मात्र राज्य खाजगी मालकी हक्कांचे रक्षण करीत आहे. त्यामुळे कायद्याच्या तत्त्वाचा तर भंग होतोच पण मानवी तत्त्वांचाही भंग होतो असे त्याने मांडले आहे. जंगलासारख्या सार्वजनिक संपत्तीवर खाजगी मालकी आणि ठेकेदारी ताबा आहे आणि त्या व्यवस्थेच्या रक्षणाचे काम राज्यसंस्था करीत आहे या वस्तुस्थितीने राज्यसंस्थेचे वर्गीय स्वरूप मार्क्सला कळून चुकले. प्रचलित प्रश्नांवरील लिखाण करताना समाजातील वर्गाचे अस्तित्व, खाजगी मालकीहक्काच्या संरक्षणाचे राज्यसंस्था करीत असलेले कार्य, खाजगी मालकी तत्त्वासंबंधी पक्षपातीपणाचे कायद्याचे स्वरूप, उत्पादनाच्या साधनांपासून पूर्णपणे वंचित होत चाललेला आणि अन्याय्य व्यवस्थेचा बळी होत असलेला गरीब वर्ग इत्यादी परिस्थितीची मार्क्सची जाणीव तीव्र होत होती. 'ज्यूंच्या प्रश्नां'वरील पहिल्या लेखात मार्क्सने राजकीय विमोचन आणि मानवी विमोचन यांतील संबंध स्पष्ट केला आहे.[२] परात्मभूत झालेल्या मानवजातीचे त्याला कामगारवर्गात दर्शन झाले. या काळातील एका निबंधात तर त्याने स्पष्ट लिहिले आहे की कामगारवर्गच स्वतःचे विमोचन करू शकेल आणि तेच मानवजातीचे विमोचन होय.

भांडवलशाही व्यवस्थेतील कामगारवर्गाच्या कळीच्या स्थानाचा मार्क्सला शोध लागला आणि पॅरिसच्या वास्तव्यात तेथील कामगार संघटनांशी संपर्क आल्यावर वास्तवाचे त्याच्या विचाराला समर्थन मिळाले. पण हे वास्तव आणि

त्यातील ताणेबाणे त्याला अजून एका सुसंगत रचनेत बसवता आले नव्हते. आपल्या पुढील प्रश्न कोणता आहे याची मांडणी त्याने फॉयरबॉखवरील अकराव्या सूत्रात रेखीवपणे केली होती, 'तत्त्वज्ञान्यांनी विविध तऱ्हेने जगाचा अर्थ लावला आहे. पण खरा प्रश्न ते जग बदलण्याचा आहे.' आतापर्यंत त्याचे विचारविश्व जर्मन तत्त्वज्ञान आणि फ्रेंच समाजवाद यांनी व्यापलेले होते. पॅरिसमध्ये आल्यावर त्याने इंग्लिश अभिजात अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केल्यावर त्याच्या विचाराला एक नवीन मिती मिळाली. जर्मन तत्त्वज्ञान, फ्रेंच समाजवाद आणि इंग्लिश अभिजात अर्थशास्त्र या त्रिमितीने त्याची विचारसरणी प्रगल्भ होत गेली. एंगेल्सबरोबर लिहिलेल्या 'दि जर्मन आयडिऑलॉजी' या पुस्तकात त्याने हेगेलपासून घेतलेल्या द्वंद्वात्मक विकासरीतीची गुंफण ऐतिहासिक भौतिकवादाच्या मांडणीत केली. अवघी समाजरचना कशी असते, ती कशी बदलते याची मांडणी, स्व:च्या कल्पना स्पष्ट करण्यासाठी त्यानी वरील ग्रंथात केली आहे.

मार्क्सच्या पद्धती विषयक चर्चेत आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. वरती आपण पाहिले आहे की हेगेलच्या तत्त्वज्ञानातील राज्यसंस्थेच्या स्वरूपासंबंधीची संकल्पना आणि हेगेलने केलेले तत्कालीन जर्मन राज्यसंस्थेचे समर्थन हे मार्क्सला त्याच्या पत्रकारितेतील अनुभवांती लटके वाटू लागले. परंतु हेगेलच्या तत्त्वज्ञानातील क्रांतिकारक आशय जिवंत ठेवूनच हेगेलच्या पद्धतीने वास्तवाचा उलगडा करता येईल असे त्याचे निश्चित मत बनले होते. हेगेलचे निष्कर्ष नाकारून हेगेलची विचारपद्धती मार्क्सला स्वीकारायची होती. त्यासाठी त्याला ती विचार पद्धती पुन्हा धूसर अमूर्तातून बाहेर काढून ठोस वास्तवाच्या पायावर उभी करावी लागली.

ऐतिहासिक भौतिकवादाच्या मांडणीनंतर राहिले होते ते काम म्हणजे त्यांतील विश्लेषण पद्धती प्रत्यक्षातील समाजाला लावून दाखविणे. पुढील सर्व आयुष्यभर मार्क्स ते काम करीत होता. त्या कार्याचा यशोबिंदू म्हणजे 'कॅपिटल' ची उभारणी.

पण हे लक्षात ठेवले पाहिजे की १८४२-४३ मध्ये मार्क्स अर्थशास्त्राकडे वळल्यापासून ते 'कॅपिटल' ची रचना होईपर्यंत तब्बल पंचवीस वर्षाचा काळ गेलेला आहे. या काळात मार्क्सच्या अर्थशास्त्राची घडण पायरी पायरीने कशी होत गेली याच्या ठळक खाणाखुणा त्याने 'कॅपिटल' पूर्वी लिहिलेल्या ग्रंथांतून दिसून येतात. मार्क्सच्या अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करणाऱ्यांना 'कॅपिटल'

व्यतिरिक्त ज्या ग्रंथांचे परिशीलन करावे लागेल त्यांचा उल्लेख करणे येथे खचितच उचित ठरेल. ते ग्रंथ असे,

१) इकॉनॉमिक अँड फिलॉसॉफिकल मॅन्युस्क्रिप्टस् ऑफ १८४४.
२) दि पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी (१८४६)
३) दि कम्युनिस्ट मॅनिफेस्टो (१८४८)
४) दि ग्रुंड्रीज (१८५७)
५) ए कॉन्ट्रिब्यूशन टु दि क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (१८५९)

वरील पैकी (१) आणि (४) हे ग्रंथ तर जगाला माहीत झाले ते गेल्या अर्धशतकांत आणि त्यांची इंग्लिश भाषांतरे प्रसिद्ध झाली ती गेल्या वीस-पंचवीस वर्षात. अलीकडे माहीत झालेले हे ग्रंथ अर्थशास्त्राला एक तत्त्वज्ञानात्मक आणि मानवी संदर्भ पुरविणाऱ्या दृष्टिने अतिशय आशयसमृद्ध आहेत. माणसाला अबाधित स्वातंत्र्याचे आश्वासन देणारी नवी समाजव्यवस्था कशी असावी या संबंधी मार्क्सने केलेले आणि आजच्या काळाला मार्गदर्शक होतील असे सूचक अभिप्राय वरील दोन ग्रंथात पदोपदी दृष्टीस पडतात. वास्तवाचा भेद करून त्याच्या पलीकडे पाहण्याची मार्क्सची त्यातील इतिहासशुद्ध दृष्टी थक्क करून सोडणारी आहे. म्हणून तर आजच्या अनेक प्रश्नांवर विचार करताना मार्क्सच्या लिखाणातील मार्गदर्शक संदर्भ उपकारक ठरतात.

मार्क्सचा अर्थशास्त्राच्या अध्ययनाचा प्रारंभ झाला तो स्मिथ, रिकार्डो, जेम्स मिल प्रभृतींच्या अर्थशास्त्रावरील लिखाणातून. मार्क्सच्या असे लक्षात आले की तत्कालीन अर्थशास्त्र तोकडे, विषयाच्या गाभ्याला हात न घालणारे आहे. तत्कालीन अर्थशास्त्राच्या पद्धती, त्याचा हेतू यासंबंधी मार्क्सने आपली टीका 'इकॉनॉमिक आणि फिलॉसॉफिकल मॅन्युस्क्रिप्टस् ऑफ १८४४' या ग्रंथातील पहिल्या निबंधात नोंदवलेली आहे. त्या सर्वांची दखल घेणे आवश्यक असूनही विस्तारभयास्तव येथे तसे करता येत नाही. अर्थशास्त्रासंबंधी त्याची निश्चित कल्पना बनलेली होती. तो म्हणतो 'माझ्या अभ्यासातून मी अशा निष्कर्षाप्रत पोचलो की कायद्यावर आधारित संबंध किंवा राजकीय रचना ही दोन्ही केवळ त्यांच्यावरून किंवा मानवी मनाच्या सर्वसाधारण विकासाच्या आधारे समजून घेता येणार नाहीत. या उलट जीवनाचा भौतिक परिस्थितीत अठराव्या शतकातील इंग्लिश आणि फ्रेंच विचारवंतांप्रमाणे हेगेल ज्यांचा 'नागरी समाज'

या संज्ञेत समावेश करतो अशा परिस्थितीत नागरी समाजाचे शरीरशास्त्र राजकीय अर्थशास्त्रात शोधावे लागेल. याचाच अभ्यास मी पॅरीस येथे सुरू केला आणि पुढे ब्रुसेल्समध्येही चालू ठेवला.'[३] अर्थशास्त्राला नवा आशय, नवी पद्धती, नवा घाट द्यायला पाहिजे आणि त्याचे स्वरूप काय असले पाहिजे याची रूपरेखा मार्क्सच्या मनात पक्की झाली होती. त्याला अर्थशास्त्र सहा भागात मांडावयाचे होते. ते भाग असे: भांडवल, जमीनरूपातील मालमत्ता, वेतनश्रम, राज्यसंस्था, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जागतिक बाजारपेठ. प्रत्यक्षात मात्र मूळच्या आराखड्यात फेरबदल करून तीनच भाग म्हणजे 'कॅपिटल'चे तीन खंड प्रसिद्ध झाले. त्यातील पहिला खंड मार्क्सच्या हयातीत प्रसिद्ध झाला. तदूनंतर त्याच्या जर्मन, फ्रेंच, रशियन भाषेतील आवृत्त्याही निघाल्या. 'कॅपिटल'च्या दुसऱ्या भागाची त्याने छापण्यासाठी बरीच जुळवाजुळव केली होती पण मुद्रण प्रत तयार होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर 'कॅपिटल' चे पुढील दोन भाग मार्क्सने काढलेली टिपणे सुसंगतपणे लावून एंगेल्सने प्रसिद्ध केले. पूर्वीच्या अर्थशास्त्राचे मार्क्सने केलेले चिकित्सक विश्लेषण, 'थियरीज ऑफ सरप्लस व्हॅल्यू' या त्रिखंडात्मक ग्रंथरूपाने मार्क्सच्या मृत्यूनंतर तब्बल वीस वर्षांनी मूळ जर्मन भाषेत प्रथम प्रसिद्ध झाले.

मार्क्सच्या हयातीत 'कॅपिटल' व्यतिरिक्त 'कॅपिटल'ची रचना होईपर्यंत अर्थशास्त्रावरील त्याचे १८५९ साली प्रसिद्ध झालेले पुस्तक म्हणजे 'ए कॉन्ट्रिब्यूशन टु दि क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' हे होय. या ग्रंथातील सारा आशय 'कॅपिटल'च्या पहिल्या खंडात सारांशरूपाने सुरुवातीलाच आलेला आहे. १८५९ मधील ग्रंथ आजही महत्त्वाचा मानला जातो त्याचे कारण असे की मार्क्सने जगाला जे अर्थशास्त्र दिले त्याची नांदी १८५९च्या ग्रंथाने झाली. आणि दुसरे म्हणजे मार्क्सने अर्थशास्त्राच्या पद्धतीविषयी त्यात, पहिल्यांदाच रेखीवपणे मांडणी केलेली आहे. त्या ग्रंथाला मार्क्सने लिहिलेली प्रस्तावना म्हणजे अर्थशास्त्राकडे आपण का व कसे वळलो व त्यासंबंधी आपला दृष्टिकोन कोणता व तो कसा सिद्ध झाला हे सांगणारे महत्त्वाचे आत्मवृत्तात्मक लिखाण आहे.

(२)

मार्क्सचे अर्थशास्त्र अभिजात अर्थशास्त्रातूनच उपजले असले तरी त्या दोन्हीमध्ये मूलभूत स्वरूपाचे फरक आहेत. अर्थशास्त्राच्या उद्दिष्टाविषयीच बोलायचे झाले तर अभिजात अर्थशास्त्राचा अध्वर्यू ॲडम स्मिथ याच्या

अर्थशास्त्राचा हेतू 'राष्ट्रांच्या संपत्तीची कारणे आणि स्वरूप' विषद करण्याचा होता. अर्थशास्त्रातील मार्क्सचे स्फूर्तिस्थान असणाऱ्या डेव्हिड रिकार्डो याच्या अर्थशास्त्राचा हेतू 'उत्पन्नाची वाटणी ठरविणारे नियम' स्पष्ट करण्याचा होता. मार्क्सच्या अर्थशास्त्राचा हेतू 'आधुनिक समाजाच्या गतिनियमांचा उलगडा' करण्याचा होता. प्रचलित समाजव्यवस्था मानव इतिहासाच्या प्रवाहातील एक अवस्था आहे, ती अपरिवर्तनीय, निसर्गदत्त नसून बदलणारी आहे. प्रत्येक अवस्थेला उद्गम, विकास आणि अंत आहे हे तर मार्क्सवादांतील गृहीत आहे. भांडवलशाही व्यवस्था चिरंतन नसून ती तिच्या विशिष्ट कार्यपद्धतीतूनच नव्या आणि अधिक प्रगत अवस्थेला अपरिहार्यपणे जन्म देणार आहे हे दाखवून देण्यासाठी मार्क्सने आपल्या अर्थशास्त्राची मांडणी केली आहे. अभिजात अर्थशास्त्रापुढे अस्तित्वातील व्यवस्था समजून घेण्याचा उद्देश होता. ती व्यवस्था कशी आली, का आली आणि त्या अवस्थेच्या बदलाची दिशा कोणती असेल याचा विचार त्या शास्त्राने केला नाही. आणि तसा विचार करण्याची मार्क्सची तर प्रतिज्ञा होती. रिकार्डोच्या अर्थशास्त्रात आर्थिक वाढीच्या प्रक्रियेत नफ्याचा दर घसरत जाण्याची प्रवृत्ती स्पष्ट करून त्यामुळे भांडवलदारांना भांडवल गुंतवणुकीसाठी पुरेसे प्रलोभन राहणार नाही व शेवटी अर्थव्यवस्था 'स्थिर अवस्थेत' (स्टेशनरी स्टेट) परिणत होईल असे मांडले आहे. या 'स्थिर अवस्थे'त कामगारांचे वेतन जेमतेम जगण्यासाठी पुरेल इतक्या पातळीवर असेल, नवी गुंतवणूक शून्य असेल, लोकसंख्या वाढीचा दर शून्याबरोबर असेल अशा तऱ्हेचे समाजाच्या विकासातील अंतिम टप्प्यावरील अत्यंत निराशाजनक, काळेकुट्ट चित्र रंगवलेले आहे.

अभिजात अर्थशास्त्र सिद्ध करणाऱ्या स्मिथ, रिकार्डो, मिल प्रभृत्तींच्या अर्थशास्त्रात आर्थिक वाढीच्या प्रक्रियेचा शेवट समाजाच्या 'स्थिर अवस्थे'त होईल असे मांडले आहे. मात्र सर्वच अभिजात अर्थशास्त्रज्ञांची 'स्थिर अवस्थे'ची कल्पना सारखी नाही हे खरे. रिकार्डोच्या विश्लेषणानुसार ती अवस्था निराशाजनक, दैन्यगर्भ आहे तर मिलच्या विश्लेषणानुसार ती एक चांगली, प्रगतीदर्शक अवस्था आहे. अभिजात अर्थशास्त्रात समाजातील वर्गांचे अस्तित्व मानलेले आहे. पण त्यामध्ये आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून होणाऱ्या बदलामुळे त्या त्या वर्गाची प्रतिक्रिया उदासीनतेची, नियतीचा न्याय मुकाटपणे स्वीकारण्याची दिसते. 'स्थिर अवस्था' अटळपणे येणार असते आणि तिला शरण जाणे क्रमप्राप्त असते.

समाजाच्या विकासाचे अभिजात अर्थशास्त्राचे वरील विश्लेषण मार्क्सला मान्य नाही. त्याच्या मते आर्थिक वाढीच्या प्रक्रियेत उत्पादन शक्तींचा, उत्पादन साधनांचा विकास प्रचंड वेगाने होत जातो पण तोच वेग पुढे उत्पादन साधनांच्या खाजगी मालकीवर आधारलेल्या प्रस्थापित उत्पादन संबंधांमुळे धोक्यात येतो. भांडवलशाहीत आर्थिक विकास होत असताना सामाजिक उत्पादन आणि खाजगी मालकी या दोन्हींमध्ये अंतर्विरोध अटळ असतो. त्यातून उद्‌भवणाऱ्या संघर्षातून असा नवा समाज जन्मतो की ज्यात उत्पादनसंबंध हे उत्पादनशक्तीच्या विकासाला मदतकारक ठरतात आणि समाजाच्या अव्याहतपणे चालत आलेल्या प्रगतीचा कुंठित झालेला मार्ग मोकळा होतो. इतिहासाची दिशा प्रगतीकडे नेणारी असते. समाजाच्या प्रगतीची दिशा अभिजात अर्थशास्त्र मांडते त्याप्रमाणे 'स्थिर अवस्थे'प्रत नेणारी नसून एका नव्या प्रगत अवस्थेला अटळपणे जन्म देणारी आहे असे मार्क्सचे विश्लेषण सिद्ध करते. म्हणजे अर्थशास्त्राचा हेतू आणि विकासाचे अंतिम फलित यासंबंधी मार्क्सचे अर्थशास्त्र आणि अभिजात अर्थशास्त्र यांमध्ये मूलभूत फरक आहे.

अर्थशास्त्राचा हेतू, प्रचलित अर्थव्यवस्थेचे इतिहासातील स्थान, नफ्याचा उगम व नफ्याच्या घटत्या दराच्या प्रवृत्तीची कारणे, बेकारीचा प्रश्न, वेतनवाढीतील अडसर, आर्थिक अरिष्टे आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अंतिम स्वरूप इत्यादि अनेक बाबतीत मार्क्सची मांडणी अभिजात अर्थशास्त्रज्ञांच्या मांडणीपेक्षा वेगळी आहे. याचे कारण मार्क्सच्या अर्थशास्त्राचे प्रयोजन व पद्धती मूलत: वेगळी आहेत. भांडवलशाही समाजाच्या गतिगर्भ विकासप्रक्रियेचा त्यात साकल्याने विचार केलेला आहे.

(३)

प्रस्तुत ग्रंथात 'कॅपिटल' मधील पहिल्या खंडातील सर्व विषयांची सांगोपांग व सोदाहरण चर्चा श्री. परांजपे यांनी केलेली आहे. कठीण विषय सोपा करण्यासाठी त्यांनी व्यवहारातील चपखल बसणारी उदाहरणे दिली आहेत. उदा. 'मूर्त' आणि 'अमूर्त' मानवी श्रम या मार्क्सच्या अर्थशास्त्रातील संकल्पना श्री. परांजपे यांनी अतिशय सुगम रीतीने मांडलेल्या आहेत. 'कॅपिटल' मधील पहिली काही प्रकरणे अनेक अभ्यासकांच्या मते समजण्यास अतिशय अवघड आहेत. पण श्री. परांजपे यांनी मराठी वाचकासाठी ती सुगम केलेली आहेत व पुढील प्रकरणे अभ्यासण्याविषयी त्याची उत्सुकता आणि तयारी वाढती राहील

अशा प्रकारे विषयाची मांडणी केली आहे. 'पैसा : मूल्याचा साक्षात अवतार' हे प्रकरण म्हणजे अर्थशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या पण वरवर साध्या वाटणाऱ्या संकल्पना सामान्यांना सुलभ वाटतील अशा रीतीने विषद केलेल्या आहेत. पैशाचे रहस्य अतिशय सुगमपणे उकलून दाखविलेले आहे. इतर ग्रंथांतून अशी मांडणी क्वचितच सापडेल.

'कॅपिटल' मधील पहिला भाग 'क्रयवस्तू आणि पैसा' याविषयी आहे. श्री. परांजपे यांनी तो भाग आपल्या ग्रंथाच्या पहिल्या दोन प्रकरणात मांडलेला आहे. 'कॅपिटल' मधील पहिल्या भागाबद्दल मार्क्स स्वत: असे म्हणतो की, 'प्रारंभ नेहमी अवघड असतो हे म्हणणे सर्वच शास्त्रांच्या बाबतीत खरे आहे. म्हणून या ग्रंथातील पहिले प्रकरण, विशेषत: त्यातील क्रयवस्तूचे विवेचन, समजण्यास अवघड वाटेल. त्यातल्या त्यात मूल्याचा आशय आणि मूल्याचे परिमाण यांच्या विवेचनाचा भाग शक्य तितका सोपा करण्याचा मी प्रयत्न केला आहे.'[४] श्री. परांजपे यांनी केलेले पहिल्या भागातील विवेचन, मुळातील आशयाला धक्का न लावता फारच चांगले साधले आहे.

'उत्पादन शक्तीचे भांडवली रूप' आणि 'भांडवल संचयाचे परिणाम' ही अनुक्रमे १४ व १५ वी प्रकरणे अतिशय तपशिलात शिरून मांडलेली आहेत. भांडवलशाहीमध्ये भांडवलाचे आंगिक प्रमाण (ऑरगॅनिक कॉम्पोझिशन ऑफ कॅपिटल) वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते. भांडवलशाही विषयीच्या मार्क्सच्या सर्व निष्कर्षाचा हा तर एक परीने पायाच आहे. मार्क्सची अर्थशास्त्रातील ही मांडणी आणि त्यावर आधारित निष्कर्ष अमार्क्सीय अर्थशास्त्रज्ञांना अमान्य आहेत. श्री. परांजपे यांनी मार्क्सच्या विवेचनाची बारकाईने छाननी करून मार्क्सच्या विधानांची तर्कशुद्ध मांडणी सिद्ध केलेली आहे. वरील दोन प्रकरणांतील मांडणी श्री. परांजपे यांच्या मूलग्राही व्यासंगाची साक्ष देणारी आहे.

प्रस्तुत ग्रंथातील दुसऱ्या विभागातील काही विषय समजून घेताना—त्यातील विषयच अवघड असल्याने—वाचकाला बौद्धिक श्रम घेण्याची तयारी ठेवायला हवी. येथील मांडणीत गणिती पद्धतीचा वापर केलेला आहे. तो अपरिहार्यच आहे. पण ते गणित फार अवघड नाही. लेखकाने प्रमेयातील आणि सिद्धतेतील प्रत्येक पायरी स्पष्टपणे दाखविलेली आहे. पण गणिती सोपान नाही म्हटले तरी, चढण्यासाठी श्रम करणे चुकवता येत नाही. एक गोष्ट निश्चित की

वाचकाचे श्रम वाया जाणार नाहीत. मार्क्सने एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे ‘शास्त्राप्रत जाण्यासाठी राजमार्ग नाही आणि उंच चढाचा मार्ग आक्रमण करीत असताना होणाऱ्या दमछाकीमुळे जो घाबरून जाणार नाही त्यालाच त्याच्या प्रकाशमय शिखरावर पोचता येईल.’[५]

सतराव्या प्रकरणातील मूल्य-किंमत रूपांतरणासंबंधी श्री. परांजपे यांनी केलेले विवेचन आणि विश्लेषण अत्यंत महत्त्वाचे आहे. मार्क्सच्या विचाराच्या गाभ्यावरील त्यांची पकड पक्की असल्यानेच मार्क्सच्या मूल्य-किंमत रूपांतरणाच्या मांडणीवर अमार्क्सीय विद्वानांनी घेतलेले आक्षेप यथार्थ नाहीत हे श्री. परांजपे यांनी स्पष्टपणे दाखविले आहे, या संबंधातील परिशिष्ट ३ मधील मांडणी त्यांच्या मार्क्स विचाराच्या खोल अभ्यासाची प्रचीती आणून देते.

वरील प्रकरणांच्या अभ्यासाने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अंतरंग यथार्थपणे आकलन झाल्याचा वाचकाला आनंद मिळेल. ज्या अर्थव्यवस्थेचे आपण घटक आहोत, खरे तर ज्या व्यवस्थेने आपले सारे माणूसपण छिनावून घेतले आहे, तिचे दर्शन आपल्याला स्पष्टपणे होणे जरूरीचे आहे. ‘पिळवणूक’, ‘परात्मभाव’, ‘दारिद्र्य’, ‘बेकारी’, ‘विषमता’ या सर्वांची गंगोत्री भांडवलशाही व्यवस्थेच्या पोटात आहे याची स्पष्ट जाणीव होते.

प्रस्तुत पुस्तकातील चौथे परिशिष्ट ‘घरकाम, स्त्रियांचा प्रश्न आणि मार्क्सचा मूल्यसिद्धांत’ अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामध्ये स्त्रीमुक्तीच्या दृष्टिकोनातून मार्क्सच्या मूल्यसिद्धांताशी सुसंगत अशी चर्चा केलेली आहे. मार्क्सीय दृष्टिकोन आजच्या जगातील समस्यांवर किती अर्थपूर्ण प्रकाश टाकू शकतो याची साक्ष प्रस्तुत परिशिष्टात मिळते. श्री. परांजपे यांच्या ग्रंथाचे हे ठळक यश आहे असे मला वाटते.

पुन्हा सांगावेसे वाटते की श्री. परांजपे यांचा सर्व ग्रंथ अतिशय सुबोध, मार्क्सच्या विचाराशी प्रामाणिक, प्रचलित प्रश्नांकडे कसे पहावे यांसंबंधी दिशा देणारा असा उतरला आहे. मार्क्सच्या अर्थशास्त्राचा नव्याने अभ्यास करणारांना ती एक सहज प्राप्त पर्वणी वाटेल. कामगारक्रांतीसाठी काम करणाऱ्यांना आपल्या कार्याच्या शास्त्रीय पायाविषयी पुन्हा एकदा बळकट आश्वासन मिळेल. अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करणाऱ्यांनाही हे पुस्तक खूप उपयोगी पडू शकेल. मराठी भाषेतील अर्थशास्त्रावरील लिखाणात या पुस्तकाने महत्त्वाची भर घातली आहे.

मार्क्सवादात विचार आणि कृती यामध्ये एक अतूट संबंध असतो. विचाराची सत्यता कृतीत सिद्ध झाली पाहिजे आणि कृतीला विचाराचा आधार पाहिजे असे ते नाते आहे. म्हणून मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे विचारांनी माणसाच्या मनात घर केले की त्या विचारांनाच भौतिक बळ प्राप्त होते. म्हणूनच मार्क्सने क्रांतिकारी कार्यक्रमाला शास्त्रीय विचारांची भक्कम बैठक देण्यासाठी भांडवलशाही समाजाचे गतिनियम शोधून काढण्यात आपली सारी हयात वेचली.

श्री. परांजपे यांनी 'कॅपिटल'चे मराठीमध्ये सुबोधसुंदर विवरण केले आहे त्याबद्दल ते अभिनंदनास प्राप्त आहेत.

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४ भ. ग. बापट

---

[१] कार्ल मार्क्स, 'ए काँट्रिब्यूशन टू ए क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी', प्रोग्रेस पब्लिशर्स, १९७७, पृ. १९-२०

[२] कार्ल मार्क्स, ऑन द ज्युइश क्वेश्चन, मार्क्स-एंगेल्स कलेक्टेड वर्क्स, खंड ३

[३] कार्ल मार्क्स, 'ए काँट्रिब्यूशन टू ए क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी', प्रोग्रेस पब्लिशर्स, १९७७, पृ. १९

[४] कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १, पृ. ५ (वसंत तुळपुळे कृत भाषांतर)

[५] उपरोक्त, पृ. १७

विभाग १

१. क्रयवस्तूंच्या भ्रामक जगात

तुम्ही सकाळी डोळे उघडता तेव्हा एक क्रयवस्तू पांघरून—खरेदी-विक्रीमधून हातात आलेली वस्तू पांघरून—एका क्रयवस्तूवर झोपलेले असता. क्रयवस्तूने तुम्ही तोंड धुता, क्रयवस्तूमध्ये क्रयवस्तू घालून उकळलेले रसायन पिऊन तुम्ही झोप घालवता, तरतरीत होता. क्रयवस्तूने अंग स्वच्छ करता आणि अंगावर परत क्रयवस्तू चढवता. क्रयवस्तूने तुम्ही कामावर पोचता. तेथे क्रयवस्तूने क्रयवस्तूवर काम करता. विरंगुळ्यासाठी क्रयवस्तूमध्ये बसून अमिताभने पडद्यावर सादर केलेली क्रयवस्तू पाहता. अंथरूणे, पांघरूणे, निवाऱ्याची जागा, दंतमंजने, टूथपेस्ट, साबण, चहा, दूध, कपडे, अन्न, वाहतूक, लेखणी, यंत्रे, पुस्तके, सिनेमा, दारू, शनिमाहात्म्याची पोथी, दागिने—ज्या ज्या म्हणून वस्तूंशी तुम्ही उठता-बसता, हसता-रडता, झोपता-उठता, व्यवहार करीत असता, त्या सर्व परिचित वस्तू क्रयवस्तू असतात. भांडवलशाहीमध्ये क्रयवस्तूंनी तुमचे सर्व जीवन व्यापलेले असते. आणि तुम्ही नोकरदार, कामगार असाल तर तुमच्या आयुष्यामध्येही एक भेग पडलेली असते. तुमच्या दररोजच्या आयुष्याचा ठराविक भाग तुम्ही विकलेला असतो, आणि तुम्ही तो विकता तेव्हाच इतर क्रयवस्तूंच्या साहाय्याने तुम्ही जगता.

खरेदी-विक्रीचा व्यवहार आपल्या इतका अंगवळणी पडलेला असतो की आपण क्रयवस्तूंच्या पसाऱ्यात क्रयवस्तूंच्या साहाय्याने जगत आहोत असे कधी जाणवतही नाही. भांडवलशाहीमध्ये या क्रयवस्तू आर्थिक व्यवहाराच्या

केंद्रस्थानी असलेल्या दिसतात; आणि म्हणूनच कार्ल मार्क्स आपले विश्लेषण क्रयवस्तूंपासून सुरू करतो.

भांडवलशाही समाजामध्ये उत्पादन झालेली प्रत्येक वस्तू कुणाच्या तरी हाती उपयोगासाठी पोचण्याआधी तिला एक अपरिहार्य टप्पा पार करावा लागतो. तिच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार व्हावा लागतो, त्यातूनच ती क्रयवस्तू बनते. भांडवलशाहीमध्ये प्रत्येक वस्तू उपयोगाकडे वाटचाल करते ती क्रयवस्तू बनून. निरनिराळ्या क्रयवस्तूंमध्ये बाकी काहीही फरक असले तरी हे साधर्म्य सर्व क्रयवस्तूंमध्ये असतेच.

१. किंमत मिरवते ती क्रयवस्तू

क्रयवस्तूंमधले हे साधर्म्य त्यांच्या ठायी असणाऱ्या एका समान गुणधर्मामध्ये व्यक्त होते. हा समान गुणधर्म म्हणजे किंमत असणे. त्या सर्व क्रयवस्तू असतात, कारण त्यांना सर्वांना किंमत असते. किंमतीला बाजारपेठेत कळीचे महत्त्व असलेले दिसते. एक चपलांचा जोड, ४० किलो मीठ, विजेचे ४ बल्ब यांचा उपयोग कितीही वेगवेगळा असला तरी त्यांची किंमत सारखी असेल तर त्या सगळ्या सारख्या ठरतात. बाजारात तितके पैसे घेऊन गेले तर ४० किलो मीठ किंवा ४ बल्ब यांच्याशी त्या पैशांची अदलाबदल होऊ शकते. किंवा मीठ विकणारा ४० किलो मीठ विकून ४ बल्ब घेऊ शकतो. म्हणजे तो त्याच पैशांनी ४० किलो मिठाचा ४ बल्बशी विनिमय करू शकतो. याचाच अर्थ, क्रयवस्तूंची किंमत ही, पैशांच्या भाषेत, त्यांचा आपसातील विनिमय कोणत्या प्रमाणात होणार हे दर्शवते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर किंमत म्हणजे पैशांच्या भाषेत त्या क्रयवस्तूचे विनिमय-मूल्य. क्रयवस्तूला केवळ माणसाच्या उपयोगी पडण्याची विविध प्रकारची क्षमता वा उपयोग-मूल्य असते इतकेच नव्हे, तर तिला विनिमय-मूल्य देखील असते.

भांडवली समाज किंमतीत व्यक्त होणाऱ्या या विनिमय-मूल्याभोवतीच फिरत असतो. विनिमय-मूल्याच्या चढ-उतारामधून अनेकांची नशिबे ठरत असतात. कुणाचे दिवाळे वाजत असते तर कुणाची पोळी पिकत असते. भांडवली अर्थशास्त्रामध्ये या विनिमय-मूल्याला साहजिकच मध्यवर्ती महत्त्व आलेले असते. त्यामुळे अर्थशास्त्र एक प्रश्न हमखास विचारतेच—वस्तूंची किंमत, त्यांचे विनिमय-मूल्य, कशावरून ठरते? अर्थशास्त्रातले वेगवेगळे विचारप्रवाह या कळीच्या प्रश्नाचे निरनिराळे उत्तर देतात. मार्क्सदेखील एका अर्थी याच

प्रश्नापासून स्वत:च्या प्रतिपादनाची सुरुवात करतो. पण हा प्रश्न सोडवता सोडवता मार्क्स या प्रश्नाआड दडलेल्या दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तराकडेही हळूहळू सरकत असतो—मुळात वस्तूंना किंमत प्राप्त होते याचाच अर्थ काय? आपणही ह्या अभ्यासाचा प्रवास मार्क्सच्या पद्धतीने करणार आहोत. पण त्याआधी या प्रश्नाची काही चुकीची उत्तरे पाहू.

२. क्रयवस्तूला किंमत कशामुळे प्राप्त होते?

मागणी–पुरवठ्याचे आणि उपयुक्ततेचे फसवे स्पष्टीकरण

प्रथमदर्शनी, किंमत ही बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठा यांच्या संबंधावरून ठरताना दिसते. मालाचा पुरवठा जास्त झाला की किंमत उतरते, कमी झाला तर चढते. केळ्यांसारखा नाशवंत माल अंगावर पडू लागला की पडत्या भावात देऊन गिऱ्हाईकांना बोलावणारा केळीवाला सगळ्यांच्याच परिचयाचा असतो. किंवा शिवरात्री, आषाढी एकादशीसारख्या दिवशी उपासाच्या पदार्थांची मागणी वाढणार हे हेरून दुकानदाराने त्यांचे भाव वाढवून ठेवलेले असतात. तरीही मागणी–पुरवठ्याच्या मेळातून किंमत ठरते हे उत्तर वस्तुत: फसवे आहे. कांद्याची किंमत कधी २० रु. किलो तर अलीकडे अगदी १०० रु. आणि सध्या ६० रु. होताना दिसते. पण ती कधी ३० हजार रुपये तोळा झाल्याचे ऐकिवात नाही. तसेच मागणी–पुरवठ्यातला मेळ कसा आहे त्याप्रमाणे सोन्याचा भाव चढत–उतरत असला तरी ६० रु. किलोच्या जवळपासदेखील तो फिरकताना दिसत नाही. मागणी–पुरवठ्यातल्या मेळावरून किंमत ठरते हे उत्तर एखाद्या वस्तूच्या किंमतीत चढ–उतार का होतो, तो चढ–उतार कमीजास्त का होतो ते सांगू शकते. कांद्याच्या किंमतीतला चढ–उतार २० ते १०० रु. किलोभोवतीच का व्हावा व सोन्याच्या बाबतीत तो ३०,००० रु. तोळ्याभोवती का व्हावा हे सांगू शकत नाही. म्हणजेच मागणी–पुरवठ्याचे उत्तर सरासरी किंमतीभोवती होणाऱ्या चढ–उताराबद्दल सांगू शकते पण खुद्द सरासरी किंमतीबद्दल काही स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

आता, बाजारात विकायला आलेल्या या सर्व वस्तूंना विनिमय–मूल्य असते, याचबरोबर एक दुसराही समान गुणधर्म त्यांच्यात असलेला दिसतो. त्या सर्वांना काही ना काही उपयोग असतो, त्या माणसाची काही ना काही गरज भागवतात. दुसऱ्या शब्दात, त्यांना उपयोग–मूल्य असते. मग क्रयवस्तूंचे विनिमय–मूल्य, म्हणजे किंमत ही त्यांच्या उपयोग–मूल्यावरून ठरत असेल

का? वरवर बघता भासतेही तसेच. एखाद्या वस्तूला उपयोग नसेल तर कोण ती वस्तू विकत घेईल? पण जरा खोलात जाऊन विचार केला तर लक्षात येते की हे खरे नाही. तसे खरे असते तर ज्या वस्तूंनी भागवलेली गरज जास्त निकडीची त्या वस्तूंची किंमत जास्त असायला पाहिजे. पण तसे नसते. माणसे ज्याच्याशिवाय सहज जगू शकतात त्या सोन्याचांदीला प्रचंड किंमत असते. उलट माणसे हवेशिवाय जगू शकत नाहीत तरी पण हवेला किंमतच नसते!

सीमांत उपयुक्तता : नव्या बाटलीत जुनेच समर्थन

क्रयवस्तूंची किंमत ज्यावरून ठरते तो गुणधर्म कसा पाहिजे? किंमत असणे ही अशी एक गोष्ट आहे की जी सर्व क्रयवस्तूंना एका समान गुणात्मक पातळीवर आणत असते व मग त्यांना माप लावत असते. त्यामुळे क्रयवस्तूंची किंमत ज्यावरून ठरते तो गुणधर्मदेखील असा असला पाहिजे की जो सर्व क्रयवस्तूंना एका समान गुणात्मक पातळीवर आणू शकेल व त्यांना एक संख्यात्मक माप लावणे देखील शक्य करील. उपयोग-मूल्य हे कार्य पार पाडू शकते का?

माणसांच्या विविध गरजा गुणात्मकरीत्या भिन्न असतात. मीठ अन्नाला चव आणून देते, शरीरपोषणात भाग घेते, हे मिठाचे उपयोग-मूल्य आहे. चप्पल आपल्या पायाचे दुखापतीपासून, धुळीपासून, उन्हापासून संरक्षण करते. आता या दोन्ही गरजा एकाच मापात कशा मोजायच्या? आणि त्यांच्यात कमी जास्त कसे ठरवायचे? बाजारात ४० किलो मीठ आणि एक चप्पलजोड यांची किंमत सारखी आहे असे धरू या. समजा हे ४० किलो मीठ ४ हजार किलो अन्नाला चव देते. उपयोग-मूल्यावरून किंमत ठरत असेल तर

४ हजार किलो अन्नाला चव येणे

= एका माणसाच्या पायाचे दुखापतीपासून पाचसहा महिने संरक्षण होणे

असे समीकरण मांडावे लागेल. पण हा प्रयत्नच मुळात हास्यास्पद आहे. कारण या दोन्ही गरजा इतक्या भिन्न प्रकारच्या आहेत की, त्यांना स्वाभाविकपणे कुठलेही समान माप लागू शकत नाही. एखाद्या वस्तूची लांबी आणि तिचे वस्तुमान या दोन गोष्टी जशा गुणात्मकरीत्या वेगळ्या असतात तशाच या गरजाही वेगळ्या असतात. लांबी मीटरमध्ये मोजता येते पण किलोचे माप तिला लागत नाही, तर वस्तुमान किलोत मोजता येते पण त्याला मीटरचे माप लागत नाही.

तरीही विज्ञानाच्या नावाखाली किंमत कशावरून ठरते याबद्दल विद्यार्थ्यांना शिकवला जाणारा सीमांत उपयुक्ततेचा सिद्धांत (मार्जिनल युटिलिटी) हेच करीत असतो. उदाहरणार्थ, समजा मिठाची खरेदी-विक्री चाललेली आहे. हा सिद्धांत मग असे गृहीत धरतो की गिऱ्हाईक जेव्हा पहिल्यांदा एकच किलो मीठ घेते तेव्हा त्याला मिठाचा उपयोग २५ रु. होतो. आता त्याची गरज तेवढी निकडीची राहिलेली नाही, त्यामुळे त्याच्या पुढच्या किलोचा उपयोग त्याला पूर्वीपेक्षा कमी असतो, समजा २० रु. त्याच्या पुढच्या तिसऱ्या किलोचा उपयोग त्यापेक्षा कमी म्हणजे १५ रु., चौथ्या किलोचा १० रु. इत्यादी. बाजारात विक्रेत्याने मिठाचा भाव १५ रु. किलो लावला असेल तर गिऱ्हाईक पहिला किलो विकत घेते कारण द्याव्या लागणाऱ्या १५ रु. पेक्षा त्याला होणारा उपयोग जास्त असतो. दुसरा किलोही गिऱ्हाईक विकत घेते आणि तिसरा किलोही. चौथा किलो मात्र गिऱ्हाईक विकत घेत नाही; कारण आता त्याने दिलेल्या १५ रु. पेक्षा या किलोचा उपयोग कमी असतो. आता माल पडून रहायचा नसेल तर विक्रेत्याने किंमत १० रु. वर आणल्याशिवाय पुढचा किलो मीठ खपणार नाही, किंवा किंमत उतरवायची नसेल तर बाजारात पुरवठाच तीन किलोपेक्षा जास्त असता कामा नये. थोडक्यात, गिऱ्हाइकाने विकत घेतलेल्या शेवटच्या किलोचा उपयोग व विक्रेत्याने लावलेली किंमत ज्या ठिकाणी सारख्या होतात त्या ठिकाणी किंमत स्थिरावते व मागणी-पुरवठ्याचा मेळ घातला जातो.

सीमांत उपयुक्ततेच्या या सिद्धांताप्रमाणे प्रत्येक वस्तूच्या उपयोगाचे वर्णन करणारा एक तक्ता तयार करता येतो. पहिल्या चप्पलजोडाचा उपयोग क्ष रुपये, दुसऱ्या जोडाचा क्षपेक्षा कमी रुपये, तिसऱ्याचा त्यापेक्षा कमी रुपये इत्यादी. आणि तसेच बल्बचा, गव्हाचा, पुस्तकांचा अशा सर्व वस्तूंचा एकेक तक्ता तयार होतो. या तक्त्यांच्या आधारावर मागणी-पुरवठ्याचा मेळ घातला जाऊन बाजारपेठेतील किंमत ठरते.

पण हे सगळे व्हायचे असेल तर वस्तूंचा उपयोग रुपयात मोजता यायला पाहिजे. हेच गौडबंगाल मुळात पटू शकत नाही. एक किलो मीठ सुमारे १०० किलो अन्नाला चव आणते हे कळते, दोन किलो मीठ २०० किलो अन्नाला चव आणते हेही कळते. किंवा एका बल्बमुळे दहा बाय दहाच्या एका खोलीपुरता उजेड मिळू शकतो हेही कळते. पण एक किलो मिठाचा अमुक

रुपये उपयोग? किंवा एका बल्बचा 'क्ष' रुपये उपयोग, एका चप्पल जोडाचा 'व' रुपये उपयोग! हे सगळे उपयोग रुपयाच्या मापात कसे बसवायचे?

अर्थात वस्तूंचा उपयोग रुपयात मोजण्यातली निरर्थकता इतक्या उघडपणे कधीच समोर येत नाही. कारण व्यवहारात भांडवलशाहीने आपल्यावर अशी काही जीवनपद्धती लादलेली असते की आपण असाच विचार करायला शिकलेलो असतो. समजा एखाद्या कुटुंबामध्ये दरडोई सातशे रुपये मासिक उत्पन्न पडते. या कुटुंबातील व्यक्तींना प्रथिने कमी पडत असतात. सटीसहामासी मटण खाण्याऐवजी आठवड्याला दरडोई एक किलो मटण ही माणसे खाऊ लागली तर या जास्ती मटणाचा 'उपयोग' कमी झालेला नसतो. पण तसे करायचे तर निवाऱ्यासाठी, कपड्यांसाठी, इतर गरजांसाठी लागणारे पैसे कमी होत असतात. जास्त मटणाचा 'उपयोग' कमी होत नसून देखील जास्त मटण विकत घ्यायला हे कुटुंब 'राजी' नसते. मटणाचा भाव पुरेसा उतरला तर मात्र हे कुटुंब जास्त मटणदेखील विकत घ्यायला राजी होते. सीमांत उपयुक्ततेचा सिद्धांत या ओढगस्तीच्या हिशेबाचा अर्थ असा लावतो की पुढच्या किलो मटणाचा या कुटुंबाला 'उपयोग' कमी असल्याने जास्त मटणाला सध्याच्या मटणाइतके पैसे द्यायला हे कुटुंब तयार होत नाही!

कोणी एका बैठकीला मटण खायला बसले तर पाव किलो मटण खाल्यावर भूक बरीच शमते. यापुढे जसजसे मटण खाल्ले जाते तसतसे पुढचा मटणाचा घास घेण्याची इच्छा कमी होत जाते, 'उपयोग' कमी होत जातो. सीमांत उपयुक्ततेच्या सिद्धांताच्या समर्थनासाठी दिलेली उदाहरणे अशा प्रकारची असल्यामुळे प्रत्यक्षात या कुटुंबाला रुपयांत मोजता न येणाऱ्या गरजा रुपयात कोंबायला भाग पडत आहे ही गोष्ट लपते. हे कुटुंब जणू काही दरडोई सातशे रुपये उत्पन्नावर इतके मटण खात आहे की जास्त मटणाचा 'उपयोग' कमी होत चालला आहे म्हणून ते जास्ती मटण खरेदी करायला नाराज आहेत, अशा तऱ्हेने हा सिद्धांत या कुटुंबाकडे पाहत असतो! या सिद्धांताने उपयोग मूल्यावरून किंमत कशी ठरते याबद्दल काहीच सांगितलेले नसते. खरे तर येथे मागणी-पुरवठ्याचे जुनेच समर्थन केवळ नव्या रूपात केलेले असते.

दुर्लभतेमागे लपलेले मानवी श्रम

वस्तूंना किंमत का व किती असते याची भांडवली अर्थशास्त्राने दिलेली वर पाहिलेली स्पष्टीकरणे पुरेशा ठोस पायावर उभी नसतात. गुणात्मक फरकांमुळे

स्वाभाविकपणे वेगवेगळ्या असणाऱ्या गरजांना एकाच मापात कोंबायचा प्रयत्न त्यांच्यात केलेला असतो. पण भांडवली अर्थशास्त्र किंमतीबद्दल जे विवेचन करते त्यातील एक मुद्दा मात्र असा आहे की त्याचा मागोवा घेत गेले तर ह्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचा वेगळाच मार्ग आपल्या समोर खुला होतो. वस्तूंना किंमत केव्हा प्राप्त होत नाही, याबद्दलदेखील भांडवली अर्थशास्त्राचे एक म्हणणे असते आणि तेच आपल्याला या वेगळ्या वाटेला घेऊन जाते.

भांडवली अर्थशास्त्रानुसार वस्तूंना किंमत येण्यासाठी प्रथम त्या दुर्लभ (स्केअर्स) असणे आवश्यक असते. वस्तूंचा तुटवडा असणे, ती विनासायास प्राप्त न होणे, ती दुर्लभ असणे ही तिला किंमत प्राप्त होण्याची एक आवश्यक (पण पुरेशी नव्हे) अट असते. एखादी वस्तू दुर्लभ नसेल तेव्हा तिला किंमत येऊ शकत नाही. पण एखादी वस्तू दुर्लभ नसते म्हणजे काय? ती विनासायास उपलब्ध होते, ती मिळवण्यासाठी माणसांना काहीही कष्ट घेणे, श्रम करणे आवश्यक नसते. श्वासोच्छ्वासासाठी उपलब्ध असलेली हवा, सूर्यप्रकाश, पाऊस या गोष्टींना किंमत नसते कारण त्या उपलब्ध होण्यासाठी श्रम करणे आवश्यक नसते.

म्हणजे, वस्तूला किंमत येण्यासाठी ती दुर्लभ असणे आवश्यक आहे ही जी अट भांडवली अर्थशास्त्र सांगते तिच्यामागे सामाजिक श्रम लपलेले असतात. दुर्लभता हा क्रयवस्तूंचा आवश्यक गुणधर्म मानणे याचाच अर्थ क्रयवस्तूंमध्ये काहीएक मानवी श्रम, सामाजिक श्रम ओतले गेलेले असतात, याला संमती देणे हा होतो. ती क्रयवस्तूला किंमत प्राप्त होण्याची एक आवश्यक अट असते. श्वासोच्छ्वासासाठी लागणारा हवेतला प्राणवायू अजिबात दुर्लभ नसतो कारण तो मुद्दाम उपलब्ध करावा लागत नाही. तो उपलब्ध होण्यासाठी सामाजिक श्रम घालावे लागत नाहीत. परंतु तोच प्राणवायू तुम्हाला द्रवरूप करून सिलिंडरमधून वेल्डिंगकामासाठी वापरायला पाहिजे असेल तर मात्र प्राणवायू एकदम दुर्लभ बनतो. थोडक्यात, या दुर्लभतेमागे हे वास्तव असते की आता तो प्राणवायू द्रवरूप करून सिलिंडरमध्ये बंदिस्त करण्यासाठी सामाजिक श्रम ओतणे आवश्यक असते. अन त्यामुळे आपण एका नव्या स्पष्टीकरणाच्या शक्यतेपाशी येऊन पोचतो. क्रयवस्तूंमध्ये जाणारे मानवी श्रम हेच त्यांच्या किंमतीचा आधार असतील का? 'क्रयवस्तूंमध्ये मानवी श्रम गेलेले असतात' हा गुणधर्म किंमत ठरवण्यासाठी जे सैद्धांतिक निकष पार पाडायचे ते पार पाडू शकेल का?

सगळ्या क्रयवस्तूंना किंमत असते त्याअर्थी किंमत ही त्या सर्व क्रयवस्तूंमध्ये असणाऱ्या कोणत्या तरी समान गुणधर्मावरून ठरत असली पाहिजे. त्याबरोबरच ही किंमत त्यांचे आपापसातले विनिमयाचे एक निश्चित प्रमाणदेखील ठरवत असते. त्याच किंमतीत २० किलो तांदूळ आणि दोन चप्पलजोड येत असतील तर त्यांच्या परस्पर विनिमयाचे प्रमाण निश्चित होते. २० किलो तांदळाच्या किंमतीत एक चप्पलजोड येत नाही किंवा तो २ किलो तांदळाच्या किंमतीत घेऊ म्हटले तर घेता येत नाही. त्यामुळे तो समान गुणधर्म क्रयवस्तूंमध्ये किती प्रमाणात आहे यावरून त्यांच्या विनिमयाचे प्रमाण ठरले पाहिजे. म्हणजे तो गुणधर्म सर्व क्रयवस्तूंना सामाईकही पाहिजे आणि त्यात एक संख्यात्मक प्रमाण देखील अंतर्भूत पाहिजे. हा गुणधर्म कोणता या प्रश्नाची काही भांडवली उत्तरे आपण पाहिली. उपयोग-मूल्य किंवा सीमांत उपयुक्तता हे दोन्ही गुणधर्म या कसोट्या पार पाडू शकत नाहीत हे आपण पाहिले. त्याप्रमाणेच क्रयवस्तूंचे वजन, रंग, रासायनिक गुणधर्म इत्यादी भौतिक गुणधर्मांवरूनही तिची किंमत ठरत नाही हे उघड आहे. या भौतिक गुणांवरून तिचा उपयोग ठरेल, पण तिची किंमत ठरत नाही, हे जरा विचार केला तर कळून येईल. ही सर्व उत्तरे बाद करून आपण 'मानवी श्रम' या गोष्टीपाशी पोचतो. 'मानवी श्रम' ही गोष्ट या दोन्ही कसोट्या पार पाडू शकते का? पण नुसता 'मानवी श्रम' असा शब्द वापरून आपल्याला फारसा बोध होणार नाही. कारण मानवी श्रम ही एक गुंतागुंतीची गोष्ट आहे.

३. मार्क्सचे उत्तर : अमूर्त मानवी श्रम

क्रयवस्तूंमधील श्रमांचे दुहेरी स्वरूप

क्रयवस्तूंमध्ये जाणाऱ्या मानवी श्रमांचे स्वरूप दुहेरी असते. मूर्त आणि अमूर्त असे दोन प्रकारचे श्रम क्रयवस्तूंमध्ये घातले जात असतात. माणसे जेव्हा श्रमांतून वस्तू निर्माण करीत असतात तेव्हा ती मूर्त स्वरूपात श्रम करीत असतात. ती लाकडाला आकार देत असतात, लोखंड घडवीत असतात, नांगरट करीत असतात. हे मूर्त श्रम वेगवेगळे असतात; सुतारकाम, लोहारकाम, शेतीकाम हे वेगवेगळ्या प्रकारचे श्रम असतात. यांपैकी प्रत्येक प्रकारचे श्रम जी वस्तू बनवायची आहे तिच्या मूर्त स्वरूपाशी, ती ज्यापासून बनवायची त्या कच्च्या मालाशी, अवजारांशी आणि आवश्यक त्या विशिष्ट कसबाशी जैवपणे निगडित असतात. लोहारकामाची जागा सुतारकाम घेऊ

शकत नाही, शेतीकामाची जागा लोहारकाम घेऊ शकत नाही. प्रत्येक प्रकारचे मूर्त श्रम हे गुणात्मकरित्या विशिष्ट असतात. मूर्त श्रम टप्प्याटप्प्याने, श्रमसाधनांच्या (हत्यारांच्या) साहाय्याने निसर्गाला (कच्च्या मालाला) विशिष्ट आकार देत माणसांची गरज भागवण्याची वेगवेगळी वैशिष्ट्यपूर्ण क्षमता वस्तूंमध्ये निर्माण करत असतात. थोडक्यात म्हणजे मूर्त श्रम वस्तूंमध्ये उपयोग-मूल्य निर्माण करीत असतात. उपयोग-मूल्यांच्या वैशिष्ट्यपूर्णतेचा, गुणात्मक भिन्नतेचा आधार असतात ते मूर्त श्रम.

पण क्रयवस्तूंमधील श्रमांना एक अमूर्त पैलूदेखील असतो. उदा. 'पाच' हा आकडा घ्या. ती एक अमूर्त संकल्पना आहे. प्रत्यक्षात तुम्हाला 'पाच' कधीच सापडणार नाहीत. सापडतील त्या कोणत्याही पाच वस्तू—पाच आंबे, पाच किलो गहू, पाच हॉर्सपॉवरचे इंजिन इत्यादी. या सर्वांना समान असा गणिती गुणधर्म प्रतिबिंबित करण्याची क्षमता असलेली 'पाच' ही एक अमूर्त संकल्पना आहे. पाच वस्तूंच्या गठ्ठ्यांमधल्या वस्तूंची वैशिष्ट्ये नजरेआड केली, त्यांचे मूर्त स्वरूप जर नजरेआड केले, तर या गठ्ठ्यांमध्ये जे समान उरते ते म्हणजेच 'पाच' ही संकल्पना, पाच हा आकडा, असे आपण समजू शकतो. त्याच तऱ्हेने आपण विविध क्रयवस्तूंमध्ये गेलेल्या विविध प्रकारच्या मानवी श्रमांमधील मूर्त वैशिष्ट्ये नजरेआड केली तर या सर्व मानवी श्रमांमध्ये जे समान उरते ते 'अमूर्त श्रम' या संकल्पनेतून व्यक्त होते.

आपल्यासमोर जे निरनिराळ्या प्रकारचे मूर्त श्रम आहेत त्यांच्याशी निगडित मूर्त वैशिष्ट्ये बाजारपेठेत किंमतीसाठी नजरेआड केली जातात. ते सुतारकाम आहे, का लोहारकाम आहे, का सूतकताई आहे, का जरीकाम आहे, ते सर्व बाजूला ठेवले जाते. हे श्रम त्या वस्तूच्या प्रत्यक्ष उत्पादकांनी स्वत:साठी केले, जबरीने केले का स्वेच्छेने केले, हेही सर्व बाजूला ठेवले जाते. त्यांना ते श्रम करताना दु:ख झाले का आनंद झाला, त्यांचे हेतू सफल झाले का फोल ठरले हेही बाजूला ठेवले जाते. हे सगळे बाजूला ठेवूनदेखील जे उरते ते अमूर्त श्रम. उरते काय? तर निखळ मानवी श्रम आणि असे श्रम करण्यात माणसांनी खर्च केलेला काळ. आणि माणसे शेवटी समाजात राहून श्रम करत असतात. काही एका जडणघडणीच्या सामाजिक रचनेचा घटक म्हणून, तिच्या मार्फतच श्रम करीत असतात. त्यांनी श्रम करण्यात खर्च केलेला काळ समाजाकडील श्रमकाळाच्या साठ्याचा खर्च दर्शवित असतो, सामाजिक श्रमकाळ दर्शवीत

असतो. हाच सामाजिक श्रमकाळ विनिमय-मूल्याचा किंवा किंमतीचा आधार असतो.

क्रयवस्तूंमध्ये घातला जाणारा हा श्रमकाळ आणखीही एका दृष्टीने अमूर्त असतो. अमूर्त श्रम हे श्रमकाळाच्या प्रत्येक तुकड्याचे सरासरीच्या न्यायाने आवश्यक श्रमकाळात रूपांतर करीत असतात.

उदाहरणादाखल असे समजा की सामाजिक पातळीवर १ लाख चप्पलजोड ३ लाख श्रमतासांच्या साहाय्याने निर्माण होतात. आता याचेच एक अमूर्त माप बनले तर दर चप्पलजोडामागे ३ श्रमतास हे सरासरीच्या न्यायाने कोणत्याही वैशिष्ट्यांचा विचार न करता लागतात; आणि प्रत्येक सामाजिक श्रमकाळाच्या तुकड्याचे अमूर्त श्रमांत रूपांतर झालेले असते. एखादा कामगार काही शारीरिक वैगुण्यामुळे एक चप्पलजोड ६ श्रमतास घालून करीत असेल तर एखादा धट्टाकट्टा अनुभवी कामगार तोच जोड २ श्रमतास घालून करीत असेल. पण क्रयवस्तूंच्या विनिमयाच्या दृष्टीने या पडद्याआडच्या फरकांना काहीच महत्त्व नसते. दोन्ही कामगारांनी तयार केलेले चप्पलजोड जेव्हा बाजारात येतात तेव्हा तेथे त्यांची काही निशाणी नसते. तेथे सगळ्या १ लाख चप्पलजोडांवर हा ३ लाख श्रमतासाचा श्रमकाळ सरासरीच्या न्यायाने समानपणे पसरतो. दर चप्पलजोडामागे ३ श्रमतास याप्रमाणे माप लावण्याद्वारा तो असा समानपणे पसरला गेलेला असतो. बाजारपेठेत त्या क्रयवस्तूंच्या निर्मितीत हे श्रम कसे, का घडले याला काडीचेही महत्त्व नसते. शारीरिक वैगुण्यामुळे असेल, आळशीपणातून असेल, वा भांडवलदारांविरुद्ध चाललेल्या मंदकाम आंदोलनामुळे असेल, ज्या कामगारांनी चप्पलजोडामध्ये ६ श्रमतास घातलेले असतात त्यांच्या ६ श्रमतासांचे बाजारपेठेमार्फत ३ श्रमतास आवश्यक श्रम काळामध्ये रूपांतर झालेले असते. याउलट दुसऱ्या कामगाराच्या २ श्रमतासांचेही त्याच न्यायाने ३ श्रमतासांत रूपांतर झालेले असते. चप्पलजोडांमध्ये गेलेले सर्वसाधारण मानवी श्रम हे क्रयवस्तूंच्या माध्यमातून एक अमूर्त माप बनलेले असतात व प्रत्येक श्रमकाळाच्या तुकड्याच्या उरावर बसून त्याचे सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळात रूपांतर करत असतात.

दुसरे एक उदाहरण घेऊ. नेहमीच्या काळात ३ लाख श्रमतासांच्या साहाय्याने ३ लाख क्विंटल गहू तयार होतो असे धरून चालू. या वर्षीदेखील गहू पेरलेल्या जमिनीत ३ लाख श्रमतास ओतले गेले. पण अवर्षणामुळे यांतील २ लाख श्रमतास वाया गेले. जिथे पीक आले तेवढ्या जमिनीवर १ लाख श्रमतासांच्या साहाय्याने १ लाख क्विंटल धान्य तयार झाले. वैयक्तिक पातळीवर या गव्हामध्ये पूर्वीप्रमाणेच दर क्विंटलमागे एक श्रमतास गेलेला आहे असे वाटू शकेल. पण तसे

> वाटणे चुकीचे असते. बाजारपेठेमध्ये एकूण उत्पादन व त्यात गेलेला एकूण श्रमकाळ यांच्यातील एकंदर संबंधाला महत्त्व असते. गव्हाच्या उत्पादनात एकूण गेलेले आहेत ३ लाख श्रमतास. यातले २ लाख श्रमतास वाया गेलेले आहेत याचे विनिमय-व्यवहाराशी काडीचे देणेघेणे नाही. क्रयवस्तूंमधील अमूर्त श्रम असल्या गोष्टींना पारखे असतात. सरासरीच्या न्यायाने ते सरळ आता उपलब्ध झालेल्या गव्हाच्या १ लाख क्विंटलवर पसरतात. यानुसार गव्हामध्ये आता दर क्विंटलमागे ३ श्रमतास अमूर्त श्रम असतात. किंवा दर क्विंटल गव्हामध्ये ३ श्रमतासांइतका सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ साठलेला असतो.

प्रत्येक क्रयवस्तू बनवताना प्रत्यक्षपणे त्यांचे उत्पादन करणारी माणसे जो श्रमकाळ घालतात तो तर त्यांच्यात साठलेला असतोच पण त्याशिवाय तिच्या उत्पादनात कामी येणाऱ्या, खर्च होणाऱ्या इतर क्रयवस्तूंमार्फत त्यांच्यात पूर्वी साठवलेला अमूर्त श्रमकाळही त्या नव्याने बनवलेल्या वस्तूत साठत असतो.

> उदाहरणार्थ, खिळे बनवण्याचे उदाहरण घ्या. समजा की एक कामगार लोखंडी तारेपासून तासाला २०० खिळे बनवतो. त्यामुळे या २०० खिळ्यांमध्ये आता १ श्रमतास इतका श्रमकाळ साठलेला असतो. पण त्याबरोबर खिळ्यांसाठी कच्चामाल म्हणून लोखंडाची तारही खर्च होत असते. समजा की २०० खिळे बनवण्यामध्ये २ किलो लोखंडाची तार खर्च होते. या दोन किलो तारेत आधीच साठलेला श्रमकाळ जर २ श्रमतास धरला तर तोही आता या २०० खिळ्यांमध्ये साठतो. खिळा बनवण्याचा साचा, ऐरण, हातोडा इत्यादी श्रमसाधनांचेही आयुष्य ठरलेले असते. ही श्रमसाधने झीज होत होत निकामी होईपर्यंत १ लाख खिळे बनवण्यामध्ये कामी येतात असे धरू. त्यांच्यात साठलेला एकंदर श्रमकाळ जर ५०० श्रमतास असेल तर दर खिळ्यामागे ०.००५ श्रमतास इतका त्यांच्यातील श्रमकाळाचा हिस्सा आता खर्च होतो व तो खिळ्यांमध्ये येऊन साठतो. त्यामुळे या २०० खिळ्यांमागे खर्ची पडलेल्या श्रमसाधनांमधला २०० X ०.००५ = १ श्रमतास इतका श्रमकाळ आता खिळ्यांमध्ये साठलेला असतो. थोडक्यात २०० खिळ्यांमध्ये साठलेला एकंदर श्रमकाळ हा कामगाराने ओतलेला श्रमकाळ + कच्च्या मालातील श्रमकाळ + श्रमसाधनांच्या झिजेच्या रूपाने खर्ची पडलेला श्रमकाळ इतका, म्हणजे १+२+१=४ श्रमतास असतो. हा श्रमकाळच त्या खिळ्यांचे विनिमय-मूल्य किंवा किंमत निर्धारित करीत असतो.

किंमत किंवा विनिमय-मूल्य यांच्याद्वारे क्रयवस्तूंचा जो समान गुणधर्म व्यक्त होतो त्याला मार्क्स मूल्य म्हणतो. मूल्य म्हणजे अशा तऱ्हेने, अमूर्त बनलेला, त्या क्रयवस्तूच्या निर्मितीमध्ये गेलेला एकंदर आवश्यक सामाजिक श्रमकाळ असतो. थोडक्यात म्हणजे क्रयवस्तूंच्या किंमतीमागे आपल्याला मानवी श्रम

दडलेले सापडतात. मूर्त आणि अमूर्त श्रम या क्रयवस्तूंमध्ये जाणाऱ्या मानवी श्रमांच्या एकसंध प्रक्रियेच्याच दोन अविभाज्य बाजू असतात. या श्रमांमधून निर्माण झालेली वस्तू क्रयवस्तू बनून बाजारात येते तेव्हा ही क्रयवस्तूंमधील श्रमांची दोन अंगे विभक्त होतात. मूर्त श्रम क्रयवस्तूंमध्ये माणसांच्या गरजा भागवण्याची वेगवेगळी, वैशिष्ट्यपूर्ण, गुणात्मकदृष्ट्या भिन्न क्षमता निर्माण करतात, उपयोग-मूल्य निर्माण करतात. त्याचबरोबर त्या श्रमांचे अमूर्तीकरणही झालेले असते. आणि सर्व क्रयवस्तूंमध्ये असे अमूर्त श्रमही साठलेले असतात. हे त्यांचे साधर्म्य व्यक्त होते ते वस्तूंना मूल्य प्राप्त होऊन. एखाद्या क्रयवस्तूमध्ये साठलेला असा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ म्हणजेच त्या क्रयवस्तूचे मूल्य. परंतु मूल्य हे श्रमकाळ म्हणून सरळ व्यक्त होत नाही. ते व्यक्त होते ते विनिमयामध्ये, वस्तूंचे आपापसातील अदलाबदलीचे प्रमाण म्हणून किंवा विनिमय-मूल्य याच रूपात; आणि पैशाच्या भाषेत हे विनिमयमूल्य सांगायचे तर ते किंमतीच्या रूपात व्यक्त होते.

मार्क्सच्या श्रममूल्य सिद्धांताचे वेगळेपण

इथे एक धोका निर्माण होतो. या सर्वानंतर आपण म्हणू शकतो की हात्तिच्या! म्हणजे काय, किंमत ही त्या वस्तूच्या उत्पादनात गेलेल्या श्रमकाळावरून ठरते इतकेच ना? बऱ्याच भांडवली विचारवंतांच्या मार्क्सवरील लिखाणामध्ये अशीच भावना दिसून येते. जर मार्क्सने इतकेच म्हटले आहे असे मानले तर त्यांना ते मानवण्यासारखेच असते. उदाहरणार्थ, अभिजात भांडवली अर्थशास्त्राचा ज्याने पाया घातला त्या ॲडम स्मिथने (स्कॉटलंड : १७२३-१७९०) आपल्या लिखाणामध्ये हीच कल्पना अठराव्या शतकाच्या शेवटी मांडलेली होती. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला डेव्हिड रिकॉर्डोने (इंग्लंड : १७७२-१८२३) तर ही कल्पना आपल्या विचारांमध्ये पायाभूत मानली होती. त्यामुळे मार्क्सने इतकेच म्हटले असेल तर मार्क्सच्या विरोधकांना मानवण्यासारखे असते; कारण मग मार्क्सने या भांडवली विचारवंतांचाच अर्थशास्त्रीय विचार फक्त घासूनपुसून स्पष्ट करून मांडला, पण मूलभूत पातळीवर काही वेगळे मांडले नाही असा त्याचा अर्थ होतो.

पण मार्क्स हा सुधारित रिकार्डो नाही. 'वस्तूंची किंमत त्यांच्यात गेलेल्या श्रमकाळावरून ठरते' याच्यापलीकडे जाऊन मार्क्सने जे म्हटले आहे त्यातच मार्क्सचे सारे वैशिष्ट्य अंतर्भूत आहे. हे वैशिष्ट्य समजावून घ्यायचे तर मगाशी आपण जाता जाता जो मूलभूत प्रश्न उपस्थित केला होता, तिथून

सुरुवात करावी लागेल. मुळात वस्तूंना किंमत येते याचाच अर्थ काय? जर असे धरले की ‘वस्तूमध्ये जाणारा श्रमकाळ’ म्हणजे त्या वस्तूचे मूल्य, तर हे सर्व विश्लेषण जसेच्या तसे क्रयवस्तू नसलेल्या वस्तूंनाही लागू होते. त्यांच्याही निर्मितीमध्ये श्रमकाळ जात असतो, त्यांनाही उपयोग असतो, पण तरीही त्या वस्तूंना किंमतीचे लेबल चिकटलेले नसते.

गणसमाज, गावकीमधील जातिप्रधान बलुतेदार व्यवस्था, अभिजात सरंजामशाही इत्यादी अनेक प्रकारच्या समाजव्यवस्थांमध्ये देखील माणसे उत्पादन करता करता आपापसांत संबंध बांधत होती. उत्पादनात ती माणसे श्रम घालत होती आणि त्यानुसार सामाजिक उत्पादनातील वाट्यावर निरनिराळे अधिकार मिळवत होतीच. त्या समाजांमध्येही शोषणाचे संबंध होते, माणसांना एकमेकांशी जोडणारी बंधने त्यातल्या काहींना जाचक होती, उत्पादनातील वाट्यावरच्या अधिकारांची श्रेणीबद्ध उतरंड होती. पण ते समाज व क्रयवस्तूंवर आधारलेला समाज यांच्यामध्ये एक महत्त्वाचा फरक होता. त्या समाजातील वस्तूंना हे संबंध चिकटून खुद्द या वस्तूंनाच, सामाजिक उत्पादनाच्या एखाद्या वाट्यावर अधिकार प्राप्त होत नव्हते. ते अधिकार साक्षातपणे माणसांचेच होते, किंवा जातिसमूहांचे, वर्गसमूहांचे होते. शोषणाच्या किंवा विषमतेच्या संबंधांबाबतही हे दिसते. गणसमाजात माणसे जी शिकार करीत तिचे वाटप होताना गणप्रमुखाला सर्वोत्तम भाग मिळे, पण तो गणप्रमुखाचा विशेष अधिकार म्हणून. खुद्द त्या मांसाच्या तुकड्याला, त्याला किंमत आहे व तिचा मोबदला मिळायला हवा या नावाने सामाजिक उत्पादनावर अधिकार नव्हते. किंवा गावकीसाठी चांभार श्रम करतो व वस्तू निर्माण करतो, यामुळे त्याला विशिष्ट बलुत्याचा अधिकार होता, पण त्याने निर्माण केलेल्या चपलांना तो नव्हता. उत्पादनातील संबंध, अगदी शोषणाचे संबंधदेखील, या समाजामध्ये व्यक्त होत होते ते माणसांमधील संबंधांच्या सरळ, उघड रूपात, निरनिराळ्या समूहांना असणाऱ्या निरनिराळ्या अधिकारांच्या रूपात.

४. क्रयवस्तूंचे विभूतिकरण

पण हे उत्पादनसंबंधांचे स्वरूपच न्यारे असेल तर? समजा एखादी समाजव्यवस्था कोणी कुणाला बांधील नाही या पायावर उभी आहे. माणसांकडे असलेल्या वस्तू, त्यांनी त्या वस्तूंशी केलेला व्यवहार ही प्रत्येकाच्या खाजगी अखत्यारीतील बाब आहे, त्यांच्या खाजगी मालकीच्या

अधिकाराची बाब आहे. कोणीच कुणाला बांधील नसल्याने कुणाकडून वस्तू मिळवायची तर दुसरी वस्तू देऊनच मिळत आहे. उत्पादन आणि उपभोग यांच्यामध्ये, खाजगी मालकीच्या वस्तूंची बाजारपेठेतील देवाणघेवाण होणे आवश्यक आहे ही अपरिहार्य मेख मारलेली आहे. तर मग माणसांनी केलेले उत्पादन हे एकमेकांसाठी आहे, सामाजिक आहे, ही गोष्ट कशी व्यक्त होईल? उत्पादित वस्तू त्यांचा जेथे उपयोग आहे त्या योग्य ठिकाणी पोचून, पुन्हा नवे उत्पादन होऊन, या समाजाचे रहाटगाडगे कसे फिरत राहील? थोडक्यात, संपूर्णपणे खाजगी मालकीवर आधारलेली बाजारपेठ हाच ज्या व्यवस्थेचा आधार आहे तिथे उत्पादनसंबंध कसे व्यक्त होतील?

क्रयवस्तू सामाजिक संबंध शोषून घेतात

अशा आगळ्याच परिस्थितीत वस्तूंना किंमत प्राप्त होऊन उत्पादकांचे सामाजिक संबंध व्यक्त होतात! एखादा सुतार एक कपाट बनवतो, ते शंभर रुपयांना विकतो व त्या शंभर रुपयांचे गहू, तेल, कापड वगैरे गोष्टी खरेदी करतो. कपाटाची किंमत कपाटाला मिळणे आणि गहू, तेल, कापड यांना त्यांची आपापली किंमत मिळणे, यातून सुतार, कपाटाचा उपयोग करणारा आणि गहू, तेल, कापड यांचे उत्पादन करणारे या सगळ्या माणसांमध्ये संबंध बांधले जात असतात. कपाटाची जागा विनिमयातून गहू, तेल, कापड यांनी घेतलेली असते. पण कपाट काही गहू, तेल, कापड या गोष्टी वापरत नसते, सुतार व त्याचे कुटुंबीय वापरत असतात.

वस्तुस्थिती अशी असते की सुताराने उपयोगी वस्तूंच्या निर्मितीत जाणाऱ्या एकूण सामाजिक श्रमांमध्ये काही एक योगदान केलेले असते व प्रश्न असतो की त्या बदल्यात सामाजिक श्रमांतून निर्माण होणाऱ्या उत्पादनावर किती व काय अधिकार मिळावा. त्याऐवजी प्रश्न आता वेगळ्या स्वरूपात पुढे येतो. सुताराच्या श्रमातून निर्माण झालेल्या खुद्द कपाटालाच मूल्य नावाचा एक गुणधर्म चिकटलेला असतो. सुताराने घातलेल्या अमूर्त श्रमांनुसार समाजाच्या एकूण अमूर्त श्रमांपैकी किती अमूर्त श्रमांवर त्याचा अधिकार आहे याचा निर्णय कपाटाचा तो गुणधर्म करत असतो. समाजाच्या अमूर्त श्रमांमधला वाटा मागण्याचा हक्क, सामर्थ्य आता *कपाटामध्ये* नांदत असते. माणसांमाणसांमध्ये व्यवहार होत आहे, संबंध बांधले जात आहेत हे झाकले जाते. जणू क्रयवस्तूंमध्येच आपसात व्यवहार होऊन संबंध बांधले जात असतात. सुताराला जर श्रमांतल्या वाट्यावरचा अधिकार मिळवायचा असेल तर तो

कपाटाचा मालक असेल तरच मिळतो. उद्या ते कपाट येनकेन प्रकारेण सुताराच्या एखाद्या मित्राच्या, सावकाराच्या किंवा सुताराला कामाला लावणाऱ्या भांडवलदाराच्या मालकीचे बनले तर तो अधिकार कपाटावाटे त्यांना मिळतो. माणसांनी एकमेकांसाठी श्रम करण्यामधून बांधले गेलेले संबंध, त्यांचा सामाजिक उत्पादनावरील अधिकार, या माणसामाणसांमधील संबंधांचे वस्तूंमधल्या संबंधात रूपांतर झालेले असते.

भांडवली अर्थशास्त्राच्या मर्यादा

थोडक्यात, क्रयवस्तूच्या मूल्यापासून सुरुवात करून आपण त्यामागील उत्पादनाच्या सामाजिक संबंधांच्या विचारापर्यंत पोचतो. कारण मार्क्सने तपासायला घेतलेला प्रश्न रिकार्डोसारख्यांच्या प्रश्नापेक्षा मुळातच वेगळा आहे. भांडवली अर्थशास्त्र तपासायला घेते तो प्रश्न म्हणजे वस्तूंची किंमत कशावरून ठरते इतकाच. त्यापुढे जाऊन त्यामागे दडलेल्या सामाजिक संबंधांच्या विश्लेषणात त्याला खास रस नसतो. त्याच्या लेखी वस्तूंनाच मूल्य असते. रिकार्डोच्या श्रममूल्याच्या सिद्धांताच्या लेखीदेखील वस्तूंनाच मूल्य आहे. यालाच मार्क्स क्रयवस्तूचे विभूतिकरण होणे म्हणतो. आणि हा अगदी नेमका शब्दप्रयोग आहे.

विभूतिकरण ही एक आदिम काळापासूनची गोष्ट आहे. विजा, वादळे, वारा, वाहते पाणी, भूकंप, उजाडणारा आणि मावळणारा सूर्य या आदिमानवाला थक्क करून सोडणाऱ्या गोष्टी होत्या. या सर्वांचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नात त्याने विभूती जन्माला घातल्या. त्याच्या लेखी या सर्व नैसर्गिक घटना, निर्जीव गोष्टी स्वत:चा असा प्राण आणि स्वत:ची शक्ती असलेल्या विभूती बनल्या. निर्जीव गोष्टींमध्ये त्याने प्राण फुंकला. त्यांचे विभूतिकरण केले. भांडवली अर्थशास्त्र हे क्रयवस्तूंच्या बाबतीत आदिमानवासारखेच वागते. त्यांनी क्रयवस्तूंचेच विभूतिकरण केलेले असते. क्रयवस्तूंना मूल्य असते. क्रयवस्तूंची आपापसांत अदलाबदल होते, क्रयवस्तूंना योग्य किंवा अयोग्य किंमत मिळते, क्रयवस्तू दुर्मिळ असते.

शिवाय भांडवलशाहीत 'श्रम' विकत घेता येतात. त्यामुळे श्रम ही देखील क्रयवस्तूच असते. क्रयवस्तूंमध्येच संबंध बांधले जातात. आणि माणसे? माणसांमधील संबंध? ते क्षेत्र वेगळे असते. ते राजकारणात असते, समाजकारणात असते, आणखी इतरत्र असते. पण अर्थकारणात, विशेषत:

अर्थशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांत, महत्त्वाचे असते ते क्रयवस्तूंचे जग, त्यांच्यात आपापसात बांधले जाणारे संबंध. एखाद्या राष्ट्रात निर्माण झालेल्या सर्व क्रयवस्तूंचे एकत्रित मूल्य किंवा राष्ट्रीय उत्पन्न, त्याची वधघट. अर्थात त्यातही माणसे येतात. उदाहरणार्थ, या क्रयवस्तूंच्या राष्ट्रीय गठ्ठ्याचे वाटप करायच्या वेळी. पण इथेदेखील ती माणसे महत्त्वाची असतात ती क्रयवस्तूंचे मालक म्हणून! आणि हे वाटप बदलायच्या सगळ्या खटपटी लटपटी चालतात त्याही क्रयवस्तूंवर परिणाम करून—त्यांचे वाटे करून, त्यांच्यावर कर लादून इत्यादी.

भांडवली अर्थशास्त्राचे नायकत्व क्रयवस्तूंकडे असते, त्यांच्या अभ्यासाचा विषय क्रयवस्तू असतो. त्यात माणसे येतात ती गौण पात्रे म्हणून, पुरवठ्याच्या बाजूला क्रयवस्तूंना कोणीतरी मालक हवा म्हणून आणि मागणीच्या बाजूला क्रयवस्तू विकून हातात आलेल्या पैशाचे प्रतिनिधी म्हणून. क्रयवस्तूंचा व्यवहार, त्यांच्या किंमती, त्यांचे निकष हे महत्त्वाचे; त्यासाठी लागेल त्याप्रमाणे केवळ त्याच संदर्भात माणसांच्या व्यवहाराची दखल भांडवली अर्थशास्त्र घेते. थोडक्यात क्रयवस्तूंचे विभूतिकरण हे भांडवली अर्थशास्त्राला पायाभूत असते. ते भांडवलदारांची तळी उचलून धरते, किंवा कामगारवर्गाचे शोषण मान्य करीत नाही, यामुळेच केवळ ते भांडवली ठरत नाही. तर त्याच्या संकल्पनांच्या अगदी मुळाशी क्रयवस्तूंचे विभूतिकरण इतक्या दृढपणे असते की क्रयवस्तूंच्या संबंधांमधील उफराटेपणच त्याच्या लक्षात येऊ शकत नाही. त्याच्या संकल्पनाच अशा असतात की भांडवलशाही व्यवस्थेची टीका त्यांच्याद्वारे होऊ शकत नाही.

वस्तुत: एखाद्या वस्तूच्या उत्पादनात किती श्रम खर्च झाले इतकेच क्रयवस्तूंमधील अमूर्त श्रम सांगत नाहीत. त्या क्रयवस्तूला पुढे किती अमूर्त श्रमांवर अधिकार मिळणार आहे हेही अमूर्त श्रम ठरवतात. अमूर्त श्रम हे केवळ क्रयवस्तूंच्या इतिहासात खर्च झालेले श्रम नसतात, ते त्यांचे भविष्यही ठरवत असतात. त्यामुळे भांडवली समाजात एखाद्याला जर जास्तीत जास्त सामाजिक श्रमांवर अधिकार मिळवायचा असला तर त्याला जास्तीत जास्त मूल्यावर, म्हणजेच क्रयवस्तूंवर, कोणत्याही तऱ्हेने मालकी मिळवावी लागते. त्याला सामाजिक श्रमांमध्ये जास्तीत जास्त योगदान त्यासाठी करावे लागतेच असे नाही. आणि ‘क्रयवस्तूंचे’ हे अधिकार जपले जातील हे पाहणाऱ्या यंत्रणादेखील भांडवली समाजामध्ये असतात. काही वस्तूंना ‘वाजवी’ किंमत येईनाशी झाली तर भांडवलदार कारखाने बंद करतात, दुसऱ्या वस्तूंचे उत्पादन

सुरू करतात. एखादी वस्तू पुढे तशीच उत्पादन होत राहील की नाही, तिचे उत्पादन एकदम कमी होईल की एकदम वाढेल, हे सर्व ठरत असते ते किंमतींच्या माध्यमातून. जिवंत माणसांमधील संबंध निर्जीव क्रयवस्तूंच्या मूल्य नावाच्या गुणधर्माच्या स्वरूपात आकार घेऊ लागतात. माणसांनी केलेले श्रम व त्यांच्याशी निगडित त्यांचे अधिकार माणसांपासून तुटतात, ते वस्तूंमध्ये गोठवले जातात व एक परकी शक्ती बनून माणसांच्या व्यवहारांचे नियंत्रण करू लागतात. 'अमूर्त श्रम' या मार्क्सच्या संकल्पनेचे मर्म यात आहे.

याउलट मानवी श्रम या सर्वसाधारण संकल्पनेमध्ये ही शक्ती नसते. सर्वसाधारण मानवी श्रम एखाद्या वस्तूमध्ये किती श्रम गेले आहेत इतकेच सांगतात. माणसांमधील व्यवहाराचे भविष्य ते नियंत्रित करत नाहीत. आणि त्यांचे महत्त्व उत्पादनासाठी लागणाऱ्या इतर घटकांपेक्षा फार वेगळे नसते. आपण त्या त्या वस्तू निर्माण करण्यामध्ये ऊर्जेचा किती सामाजिक साठा खर्च झाला याचाही आकडा वस्तूंना चिकटवू शकतो, किंवा त्या निर्माण करण्यामध्ये किती स्क्वेअर फूट जागा वापरावी लागली याचाही आकडा चिकटवू शकतो, वस्तूंच्या निर्मितीमध्ये किती प्रकारची समाजाकडील सामुग्री खर्च होते आहे हे दाखवणाऱ्या अनेक आकड्यांपैकी श्रमांचा खर्च सांगणारा एक आकडा एवढेच महत्त्व या आकड्याला असेल.

असा श्रमखर्च मोजला जायलाच हवा, तो सांगणाऱ्या आकड्यांचे भांडवलशाहीसकट सर्व समाजव्यवस्थांमध्ये (अगदी समाजवाद धरून) महत्त्व असेलच. पण फक्त भांडवलशाही व्यवस्थेमध्ये त्या आकड्यांचे एका अमूर्त शक्तीत रूपांतर होऊन त्या वस्तूंच्या मालकाला त्यानुसार सामाजिक संपत्तीवर हक्क प्राप्त होतो. हे फक्त क्रयवस्तूंच्या व्यवहारात घडते. एखादा माणूस सहा तासांत एक चप्पलजोड करू शकतो, पण सामाजिक पातळीवर एक चप्पलजोडाचे मूल्य तीन श्रमतास आहे, अशा वेळी क्रयवस्तूंमधील अमूर्त श्रम ही सामाजिक शक्ती असे सांगते की, त्याने इतरांइतकेच काम आपल्या कुवतीप्रमाणे केले असले तरीही त्या बदल्यात, त्या चप्पलजोडांच्या माध्यमातून इतरांपेक्षा अर्ध्याच मूल्यावर त्याचा अधिकार राहील. ही असली अमूर्तता श्रमखर्चाच्या आकड्यात नसते. केवळ वैचारिक सोयीसाठी वापरल्या जाणाऱ्या खर्च झालेल्या श्रमांच्या मापात असली नियंत्रक, परकी शक्ती नसते. थोडक्यात, क्रयवस्तूंमध्ये गेलेले अमूर्त श्रम ही केवळ खर्च झालेले श्रम मोजणारी अमूर्त वैचारिक संकल्पना नसते. तर माणसांचे श्रम व त्यांच्याशी

निगडित त्यांचे अधिकार खुद्द क्रयवस्तूंमध्ये शोषून घेणारे एक नियंत्रक असे प्रत्यक्ष सामाजिक वास्तव असते.[१]

५. अमूर्त श्रमांच्या वर्चस्वाचे परिणाम

गरजा विरुद्ध मूल्य

अमूर्त श्रम व त्यांच्याशी निगडित मूल्य, आणि मूर्त श्रम व त्यांच्याशी निगडित उपयोग-मूल्य या दोन जोडगोळ्या काटेकोरपणे एकमेकांपासून वेगळ्या करणे (व पुढे वेगळ्या ठेवणे!) आणि त्यांच्यातील द्वंद्वात्मक संबंध तपासणे हे मार्क्सचे वैशिष्ट्य आहे. हे स्मिथ-रिकार्डोत किंवा कुठल्याही भांडवली अर्थशास्त्रज्ञामध्ये सापडणार नाही. कारण या जोडगोळ्यांबद्दल मार्क्स जे मांडतो त्यामध्ये बीजरूपाने संपूर्ण भांडवली व्यवस्थेबद्दलची मूलगामी टीका अंतर्भूत आहे. हे क्रांतिकारी टीकेचे बीज इतके साधे वाटते की त्यात अभिप्रेत असलेला मूलगामी अर्थ लवकर लक्षात येत नाही. जेव्हा अमूर्त श्रम व मूल्य हे सामाजिक उत्पादन व्यवहार नियंत्रित करतात असे मार्क्स म्हणतो तेव्हा त्यामध्ये हेही अभिप्रेत असते की मूल्य हे उपयोग-मूल्यावर कुरघोडी करते व अमूर्त श्रम हे मूर्त श्रमांवर कुरघोडी करतात. बस, इतकेच; पण यात गर्भित असलेला अर्थ फार दूरवर जाऊन पोचतो.

वरवर पाहता भांडवलशाहीत क्रयवस्तूचे उत्पादन होते तेव्हा उपयोगी वस्तूच निर्माण होत असतात, उपयोगमूल्याचे उत्पादन होत असते. पण उत्पादनाचा उद्देश उपयोग-मूल्य नसतो. उद्देश असतो त्या वस्तू विकून विनिमय-मूल्य, पैसा मिळवणे. उपयोग-मूल्य वस्तूंमध्ये असावेच लागते, कारण नाहीतर त्या विकत कोण घेईल? परंतु उपयोग-मूल्य महत्त्वाचे असते ते मूल्य मिळवण्याचे साधन म्हणून, मूल्याचे वाहक म्हणून. आणि तितपतच. हे प्रतिपादन हीच मुळात एक समीक्षा आहे. हा भांडवली समाज मुळात मानवी गरजा भागवण्याचा उद्देश ठेवत नाही. मूल्यनिर्मितीसाठी जितपत आवश्यक आहेत तितपतच मानवी गरजा हा समाज भागवेल. मूल्य हे मानवी गरजा भागवण्यावरील बंधन आहे. लोकांच्या गरजा काटून छाटून स्वत:च्या गरजांप्रमाणे बेतण्याची भांडवलशाहीला शक्ती निर्माण होऊ शकते कारण तिचा मूलाधारच मुळात मानवी गरजा मूल्यसंबंधांमध्ये जखडून टाकणारा आहे. उपयोग-मूल्य आणि मूल्य या परस्परविरोधी शक्तींना एकाच मोटल्यात बांधणाऱ्या उत्पादनसंबंधांमुळे मूल्यसंबंध हे उपयोग-मूल्यांच्या निर्मितीवरील

नियंत्रक बंधन ठरतात. आणि म्हणूनच मानवी गरजांवर आधारलेला समाज उभा करायचा तर हे बंधनच मुळापासून उखडायला हवे, मूल्यसंबंधांचेच उच्चाटन व्हायला हवे. हा क्रांतिकारक निष्कर्षदेखील या विश्लेषणामध्ये बीजरूपाने अंतर्भूत आहे.

उपयोगी वस्तू एकमेकांसाठी सामूहिकपणे निर्माण करणे—म्हणजेच मूर्त श्रम—हा माणसांच्या सामाजिकतेचा गाभा आहे. माणसे निसर्गाची बंधने मुकाट सहन करीत नाहीत. निसर्गाचा एक भाग असूनही हा द्विपाद प्राणी निसर्गाची बंधने सतत ओलांडत निसर्गाला आकार देत असतो. झाडे वाढताना पाहून माणसे स्वस्थ बसत नाहीत. ती स्वत: बी पेरतात, रोपांची मशागत करतात व स्वत:साठी अन्न निर्माण करतात. झाडे तोडून त्या लाकडांपासून तुळया, खांब, खुर्च्या, टेबले बनवतात. कुठल्याशा मातीवर प्रक्रिया करून त्यातून लोखंड काढतात. श्रमांच्या मूर्त स्वरूपातून माणसांचे निसर्गाबद्दलचे व स्वत:बद्दलचे ज्ञान व विश्वास वाढत असतो. विज्ञानाची बैठक घडवली जात असते. मूर्त श्रम हे सर्व समाजव्यवस्थांमध्ये माणसांच्या सर्जक, स्वातंत्र्यमूलक क्षमतांची बैठक असतात व या क्षमतांचा आविष्कारदेखील असतात.

दुरावलेले, आनंदहीन श्रम

अमूर्त श्रमांचे या मूर्त श्रमांवर प्रभुत्व निर्माण झाले की काय होते त्याचा प्रत्यय आपल्याला भांडवलशाही उत्पादनामध्ये सर्वत्र येतो. श्रम म्हणजे थकवा आणणारी, उपजीविकेसाठी करावी लागणारी, दुसऱ्यांच्या इच्छेने लादलेली एक आनंदहीन गोष्ट बनते. कारखान्यांमध्ये महत्त्व असते ते अमूर्त श्रमांना. मूल्यनिर्मितीसाठी आवश्यक तितकेच उपयोग-मूल्य लागते, आणि तितपत मूर्त श्रमही लागतात. पण तितपतच. कुशलतेचा आणि कसबाचा अर्थही बदलतो. एखादी वस्तू चांगली बनवणे, ती परिपूर्ण करणे याला महत्त्व नसते. किमान कसबाने, घालून दिलेल्या कुशलतेच्या निकषांमध्ये, जास्तीत जास्त वेगाने काम करणे याला महत्त्व येते. एखादा कामगार आवश्यक त्यापेक्षा चांगले काम करण्यात 'वेळ घालवू' लागला तर ते कोणता कारखानदार चालवून घेईल? कसब, कुशलता ही एका किमान पातळीपर्यंतच महत्त्वाची असतात. त्यापुढे महत्त्वाचे असते इतकेच की मिनिटन् मिनिट जास्तीत जास्त वेगाने काम करण्यात खर्च झाले पाहिजे. महत्त्वाचे असतात ते अमूर्त श्रम. अमूर्त श्रमांचे प्रभुत्व मूर्त श्रमांना, माणसांच्या सर्जक शक्तीच्या आविष्काराला एक परकी, आनंदहीन, लादलेली गोष्ट बनवते.[२]

आनंददायक श्रमांना भांडवलशाहीने कारखान्यातील उत्पादनातून हद्दपार केले तरी ते बाहेर (आणि कधी कधी अमूर्त श्रमांच्या प्रभुत्वाला तोंड देऊन आतदेखील) नांदत असतात—छंद म्हणून. छंद म्हणून एखादा माणूस लाकडाला आकार देऊन आपल्याला पाहिजे ती वस्तू तयार करत असतो तेव्हा काय होते? छिन्नीचा प्रत्येक घाव, रंध्याने उचकटलेले प्रत्येक सालपट त्याच्या उद्देशांचा आविष्कार करत जात असते. लाकडासंबंधीचे स्वत:चे ज्ञान, समोरचे लाकूड व हातातील हत्यारे एकाग्रपणे वापरून तो उपयोगी वस्तू तर बनवत असतोच; पण त्याबरोबरच स्वत:चे माणूसपणही मूर्त करत अनुभवत असतो, स्वत:च्या अंतर्यामी असलेल्या सृजनक्षमतेचा अनुभव घेत असतो. मूर्त श्रम हे इथे अमूर्त श्रमांचे एक साधन, जुजबी वाहक नसतात. मूर्त श्रमांना स्वत:चे असे महत्त्व असते. ते उपयोगी वस्तू बनवण्याचे साधन असतात पण त्याबरोबरच ते एक साध्यदेखील असतात. अशी साध्य-साधनांची एकात्मता भांडवली उत्पादन उध्वस्त करते व हद्दपार करते. किंबहुना शोषकांनी श्रमणाऱ्यांवर लादलेल्या कुठल्याही शोषक उत्पादन व्यवस्थेमधून ही एकात्मता या ना त्या प्रमाणात नष्ट होत असते. पण भांडवलीपूर्व समाजामध्ये त्या सगळ्या अवगुंठनामधूनदेखील खुद्द उत्पादनाच्या क्षेत्रात ती वळचणीला का होईना पण शाबूत राहते. याउलट भांडवलशाहीचे पायाभूत मूल्य संबंध मुळी उभे राहतात ते ही एकात्मता नष्ट करून.

हा काही अपघात नव्हे. श्रमणाऱ्यांच्या श्रमांतून निर्माण झालेल्या क्रयवस्तू माणसांमाणसांमधले संबंध स्वत:मध्ये शोषून घेत असतात, आणि त्याच माणसांवर सत्ता गाजवत असतात. सामाजिक श्रम शोषून घेतलेल्या या क्रयवस्तू ज्यांच्या मालकीच्या होतात त्यांच्या हाती ती शक्ती येते आणि ते त्या शक्तीचे प्रतिनिधी बनून इतर माणसांवर सत्ता गाजवतात यात मग नवल कसले? अशा समाजामध्ये स्वत: निर्माण केलेल्या जगाला, त्यातील संबंधांना माणसे सामोरी जातात तेव्हा ते जग एक परकी, दडपणारी शक्ती म्हणून जाणवते. हे उफराटे दुरावलेपण मूल्यसंबंधांच्या गाभ्याशी असते, भांडवलशाही समाजातील उत्पादनसंबंधांची वीण बनलेले असते. त्याचे विश्लेषण करायचे तर उफराटेपणाची जाण असल्याशिवाय, वा संपूर्ण व्यवस्थेचे तुम्ही टीकाकार असल्याशिवाय ते करता येणे शक्य नसते. म्हणूनच हे लक्षात घेणे आवश्यक आहे की मार्क्स केवळ वस्तूंची किंमत श्रमकाळावरून ठरते इतकेच सुधारित रूपात सांगत नाही. वस्तूंना विनिमय-मूल्य येते व ते त्यांच्यात गेलेल्या अमूर्त

श्रमकाळावरून नियंत्रित होते या घटनेमधून सर्व समाजव्यवस्थांमध्ये वस्तूंना लागू पडणारे नियम व्यक्त होत नसतात, तर फक्त भांडवलशाहीतील उत्पादनसंबंध व्यक्त होत असतात. हा भेद ओळखण्याच्या बाबतीत क्रयवस्तूंचे विभूतिकरण हा भांडवली अर्थशास्त्राच्या मार्गातील अडथळा ठरतो.

६. श्रममूल्य सिद्धांत : भांडवलशाहीने टाकून दिलेला वारसा

भांडवली अर्थशास्त्रामागील बदलत्या प्रेरणा

क्रयवस्तूंच्या विभूतिकरणामुळे भांडवलशाहीच्या दैनंदिन व्यवहाराला फारसा 'अडथळा' होत नाही. किंबहुना या व्यवहाराची अभावित वैचारिक बैठकच मुळी क्रयवस्तूंच्या विभूतिकरणावर आधारलेली असते. परंतु भांडवली अर्थशास्त्राच्या शास्त्रीय प्रेरणांच्या विकासामध्ये मात्र विभूतिकरण एक अडथळा ठरते. बऱ्याचशा भांडवली अर्थशास्त्रीय विचारांमागील मूलभूत संकल्पना बाजारपेठेतून अभावितपणे उगवणाऱ्या या संकल्पनांच्या पलीकडे जात नाहीत. त्यामुळे ते अत्याधुनिक वैचारिक साधने वापरते, अत्याधुनिक गणित वापरते पण शेवटी बाजारपेठेत घडणाऱ्या घडामोडींच्या वर्णनाच्या पलीकडे जात नाही. प्रचलित अर्थशास्त्रीय विचारांचा बहुतेक भाग हा या प्रकारचा असतो. मार्क्स अशा अर्थशास्त्रीय प्रवाहांची उथळ अर्थशास्त्र (व्हल्गर इकॉनॉमी) म्हणून संभावना करतो. त्यांना बाजारपेठेच्या देखाव्यामागे लपलेल्या उत्पादनसंबंधांपर्यंत पोचायची प्रेरणाच नसते. त्यांना रस असतो तो दैनंदिन व्यवहारातल्या लहानसहान समस्यांमध्ये, त्यामध्ये भांडवलदारांना उपयोगी पडतील अशी तंत्रे शोधण्यामध्ये. हे अर्थशास्त्र उपयोग-मूल्य रुपयांत मोजते, किंवा किंमत-दुर्मिळता-किंमत हा खोखोचा खेळ मूलभूत संकल्पनेचा आव आणून खेळते. मग ही रुपयांत मोजलेली उपयोगिता काढण्यासाठी ते निरनिराळे गुंतागुंतीचे गणिती तंत्र वापरते, आधुनिक गणितातील पुढारलेले सिद्धांत वापरते. पण त्याचा पायाच मुळात ठिसूळ असतो.

तरीही मार्क्स सर्व भांडवली अर्थशास्त्र सरळसोट निकालात काढीत नाही. आज अभिजात अर्थशास्त्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रवाहाबद्दल मार्क्सला एक वेगळ्या प्रकारचा आदर होता. या प्रवाहानेच प्रथम श्रममूल्याचा सिद्धांत त्याच्या भांडवली रूपात मांडला. बाजारपेठेतील दृश्य स्वरूपांच्या मागे जाऊन, त्यांच्याआड लपलेले वास्तव शोधण्याची वैज्ञानिक प्रेरणा या प्रवाहात अंतर्भूत होती. पण या वैज्ञानिक प्रेरणांनादेखील क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाच्या मर्यादा

पडल्या होत्या. ही कात या प्रवाहाने कधीच टाकली नाही. त्याच्या लेखी वस्तूंनाच किंमत होती, इतकेच नव्हे तर श्रममूल्याच्या आधारावरील किंमत हीच वस्तूची 'योग्य' किंमतदेखील होती. आणि वस्तू योग्य किंमतीला केवळ खुल्या बाजारपेठेत, मुक्त स्पर्धेमुळे विकल्या जातात असेही त्यांचे म्हणणे होते. याचा अर्थ हाही होतो की वस्तूंचा विनिमय 'योग्य' मोबदल्याने होईल असा समाज म्हणजे मुक्त स्पर्धेवर आधारलेला भांडवली समाज. ही वैज्ञानिक प्रेरणा वाढत होती ती भांडवली विचारव्यूहांच्या चौकटीत. क्रयवस्तूंचे विभूतिकरण व भांडवली जीवनमूल्ये, राजकारण, समाजकारण यांची एक समग्र वीण या अभिजात अर्थशास्त्राला आधारभूत होती. आपण त्याला अभिजात अर्थशास्त्र म्हणतो, पण ते स्वत:ला स्पष्टपणे म्हणून घेत असे राजकीय अर्थशास्त्र (पोलिटिकल इकॉनॉमी).

ज्यांनी भांडवली अर्थशास्त्राचा पाया घातला त्यांनी स्वत:च्या निर्मितीला राजकीय अर्थशास्त्र म्हणावे व आज त्यांचाच वारसा सांगणाऱ्या आधुनिक शास्त्राने मात्र राजकीय हे विशेषण झुरळासारखे झटकून द्यावे हा काही अपघात नव्हे. याला अत्यंत खोल कारणे आहेत. भांडवलदारवर्गाचे इतिहासातील स्थानच दरम्यानच्या काळात बदललेले आहे. ॲडम स्मिथच्या ज्या 'दि वेल्थ ऑफ नेशन्स' या पुस्तकापासून खऱ्या अर्थाने भांडवली अर्थशास्त्र सुसंघटितपणे उभे राहिले त्याच्या प्रकाशनाचे वर्ष होते अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या यशस्वी समाप्तीचे. पॉल सॅम्युलसनसारख्या (अमेरिका : १९१५-२००९) संकलकाची पुस्तके प्रसिद्ध होत होती कामगारवर्गीय क्रांतीचे ध्येय घेऊन व्हिएतनामी जनतेने बलाढ्य अमेरिकन साम्राज्यवादाचा पराभव केलेल्या वर्षात. हा दोन युगांमधला फरक आहे. ज्या काळात ॲडम स्मिथ लिहीत होता त्या काळात भांडवलशाही अर्थव्यवस्था युरोपातल्या अनेक देशांमध्ये स्थिर होऊन जगात इतरत्रही प्रभुत्व गाजवण्याकडे वाटचाल करू लागली होती. तिच्या सर्वात प्रगत रूपात ती तिच्या जन्मस्थानी म्हणजे इंग्लंडमध्ये यंत्राधिष्ठित उत्पादनाच्या उंबरठ्यावर उभी होती आणि तरीही राजकीय सत्ता मात्र बहुतेक ठिकाणी सरंजामी भूतकाळ असलेल्या वर्गाच्या हाती होती. सरंजामी राजसत्तेविरुद्ध चाललेल्या राजकीय लढ्यांमध्ये भांडवलदारवर्ग एक आघाडीची फळी बांधीत होता. या राजसत्तेची बंधने बाजारपेठेतील खुल्या स्पर्धेतून वस्तूंना योग्य किंमत मिळू देत नव्हती व त्यामुळेच राष्ट्राची संपत्तीही कमी होत चालली होती असा भांडवलदारांचा दावा होता. राजसत्तेने राष्ट्रातील संपत्ती वाढवण्यासाठी कोणती

आर्थिक धोरणे घेतली पाहिजेत याचा अभ्यास करण्यासाठी हिरीरीने या लढ्यात उतरलेले हे अर्थशास्त्रज्ञ होते. ऐतिहासिकदृष्ट्या लयाला चाललेल्या एका वर्गाविरुद्धच्या क्रांतिकारक लढ्याचा भाग म्हणून हे हत्यार भांडवली विचारवंतांनी घडवले होते. म्हणूनच या अर्थशास्त्रीय प्रवाहांना 'राजकीय' या लेबलाची लाजही नव्हती व भीतीही नव्हती. भांडवली अर्थशास्त्रातील वैज्ञानिक प्रेरणा फोफावण्यासाठी, त्यांचा विकास होण्यासाठी अनुकूल अशी ही परिस्थिती होती.

नंतर मात्र सारे चित्रच पालटले. आपल्या जन्मस्थानी, इंग्लंडमध्ये, भांडवलदारवर्गाने राजसत्तेच्या धोरणांवर आपली निर्णायक पकड बसवली ती रिकार्डोच्या मृत्यूनंतर. तोच रिकार्डो की ज्याने भांडवली श्रममूल्याचा सिद्धांत त्याची भांडवली कात न टाकता जितका म्हणून काटेकोरपणे पुढे नेता येईल तितका नेला. तिथपासून भांडवलदारवर्गाचे स्थानही बदलले. भांडवलदारवर्गाने आपले निर्णायक राजकीय प्रभुत्व संपूर्ण आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ग्रासणाऱ्या एका प्रचंड साम्राज्यावर बसवले. राजसत्तेविरुद्ध लढणाऱ्या वर्गाऐवजी तो आता स्वत:च सत्ताधारी वर्ग बनला. तो जेव्हा राजसत्तेसाठी लढत होता तेव्हा त्याची वैचारिक लढाई चालली होती ती अर्थकारणाबद्दल मूलभूतपणे वेगळ्या कल्पना असणाऱ्या जुनाट सरंजामी विचारांशी. त्यावेळी त्याला उभे करावे लागत होते ते मूलभूतपणे वेगळ्या तत्त्वांच्या पायावरील नव्या समाजाचे चित्र. आता लढाई जिंकलेली होती. स्वप्न प्रत्यक्षात येत होते. आता पुढे काय? आता ध्येय होते याच समाजाचे जास्त जास्त सुधारलेले प्रगत स्वरूप, मूलभूतदृष्ट्या वेगळा समाज नव्हे. आता मूलभूत प्रश्न त्याच्या दृष्टीने मागे पडले होते, आता रस उरला होता तो बारकाव्यांमध्ये, तपशिलांमध्ये. पण मूळ बैठकीत नाही. किंबहुना ही मूळ बैठक इतकी सवयीची बनली होती, त्यात अंतर्भूत राजकारणदेखील इतके सवयीचे झाले होते की या गोष्टी अभावितपणे विचारक्षेत्रात वावरू लागल्या होत्या. अभावित, स्पष्ट न कराव्या लागणाऱ्या गृहीतांमध्ये राजकारण सामावले जाऊन अदृश्य होऊ लागले होते आणि हळूहळू राजकीय अर्थशास्त्राचे ते फक्त अर्थशास्त्र बनले![३]

मार्क्सचा भांडवलशाही पलीकडे झेपावणारा वैज्ञानिक दृष्टिकोन

भांडवलदारवर्गाला जरी मूलभूत प्रश्नांची उकल करण्याची गरज भासेनाशी झाली होती तरी सरंजामी राजसत्तेविरुद्धच्या लढ्यामध्ये त्याच्या साथीला असलेले निम्नमध्यमवर्ग, स्वतंत्र कारागीर, शेतकरी, यांची स्वप्ने क्रांतीमुळे साकार

होण्याऐवजी उध्वस्त होत होती. स्वतंत्र, कुणालाही बांधील नसलेली माणसे भांडवली विचारांच्या आणि अर्थशास्त्राच्या केंद्रस्थानी होती. या स्वातंत्र्याची देवीही हात वर उंचावून न्यूयॉर्कसमोर उभी राहिली. पण पॅरिसमध्ये बॅरिकेड बांधून कामगार विचारीत होते, कुठे आहे तुमचे ते स्वातंत्र्य? खुल्या बाजापेठेतील मुक्त स्पर्धा ही संपन्न राष्ट्राची गुरुकिल्ली आहे हे भांडवली अर्थशास्त्र म्हणत होते. आणि नुकत्याच आलेल्या यंत्रांमुळे बेरोजगार होऊन विपन्नावस्थेतील कामगार यंत्रे उध्वस्त करत विचारीत होते—कुठे आहे ती संपन्नता? श्रममूल्याचा सिद्धांत सांगत होता की श्रम हेच संपत्तीचे रहस्य आहे आणि श्रमणाऱ्यांच्या चळवळीचे स्फोट विचारीत होते—कुठे आहे आमच्या श्रमांतून निर्माण झालेली संपत्ती? सरंजामी राजसत्तेविरुद्ध जी भांडवलशाहीची क्रांतीकारक बाजू आविष्कृत झाली होती ती आत्मसात करून मांडल्या गेलेल्या भांडवली संकल्पनांना, भांडवलशाहीच्या उफराटेपणात भरडून निघणारे विचारीत होते की इतकीच का तुमची वैज्ञानिकता, तुमची वास्तवाची वस्तुनिष्ठ पकड?

या प्रत्यक्ष जीवनातून उसळून वर येणाऱ्या प्रश्नांसमोर पहिला बळी गेला तो भांडवली श्रममूल्याच्या सिद्धांताचा—अभिजात भांडवली अर्थशास्त्रातील मूलभूत वैज्ञानिक प्रेरणांचा. हेही भांडवलदारवर्गाच्या या बदललेल्या स्थानाला साजेसेच होते. हा सिद्धांत आणि भांडवलदारवर्गाने राजसत्तेसाठी सरंजामदारांशी लढताना बांधलेली सामाजिक फळी यांचा खोल परस्परसंबंध होता. सरंजामी वर्ग केवळ बसून खाणारे वर्ग होते. याउलट त्यांच्या विरोधातील सर्व जनविभागांना एकत्र बांधत होते ते उत्पादक श्रम. निम्नमध्यमवर्ग श्रम करीत होता, स्वतंत्र कारागीर श्रमांतून उत्पादन करीत होते, शेतकरी श्रमांतून धान्य पिकवीत होते, कारागीर कारखान्यांतून श्रम करीत होते. आणि भांडवलदार? सरंजामदारांसारखे ते आपले भांडवल खाऊन टाकून समाजाच्या संपत्तीचा नाश करीत नव्हते तर ते पुन्हा गुंतवून त्यातून नफा काढत राहून राष्ट्राची संपत्ती वाढवीत होते, अमूर्त श्रमांच्या साठ्यात सतत वाढ करीत होते!

पण भांडवली स्वरूपातला श्रममूल्याचा सिद्धांत हे सुद्धा एक दुधारी शस्त्र ठरू लागले होते. भांडवलदारवर्ग सत्तास्थानी आल्यावर, सरंजामदारांविरुद्ध वापरायची या शस्त्राची धार वापरण्याची गरज नाहीशी झाली तेव्हा त्याच्या दुसऱ्या धारेला महत्त्व आले. भांडवलदारांना मुळात नफा होतोच कसा? श्रममूल्यांच्या सिद्धांताप्रमाणेच कामगारांना श्रमाचा मोबदला दिला तर नफा

होईल का? नफा म्हणजे कामगारांना क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून दिलेला मोबदला—चोरी—अशी टीकाही वर येऊ लागली होती. ठिकठिकाणी कामगार चळवळ ही टीका उचलून घेऊ लागली व भांडवलशाहीने हळूहळू हे दुधारी शस्त्र टाकून दिले व उपयोग-मूल्य रुपयांत मोजायला सुरुवात केली. श्रममूल्याचा सिद्धांत 'अभिजात अर्थशास्त्रा'त मोडू लागला व आधुनिक (किंवा नव-अभिजात) अर्थशास्त्राचा प्रवाह स्थिरावू लागला, वर्चस्व गाजवू लागला.

भांडवली विचारांची कात न टाकता श्रममूल्याच्या सिद्धांतामागची वैज्ञानिक प्रेरणा पूर्णपणे विकसित होणे शक्य नव्हते. हे अपुरेपण दोन गोष्टींना भिडताच अगदी उघडे पडते. त्या गोष्टी म्हणजे पैसा आणि श्रम या क्रयवस्तू, विशेषत: श्रम ही क्रयवस्तू. पुढील काही प्रकरणे आपण याच दोन क्रयवस्तूंवर, त्यांच्या आड दडलेल्या संबंधांवरच खर्च करणार आहोत. तिथे आपण त्याची सविस्तर चर्चा करूच. पण इथे या अपुरेपणाबद्दल एक उपमा देऊन आपण पुढे जाऊ या. गणितातले उदाहरण घ्यायचे तर वर्गमूळ ही संकल्पना घ्या. जोपर्यंत आपण साध्या आकड्यांबद्दल बोलत असतो तोपर्यंत वर्गमूळ ही अगदी साधी गोष्ट असते, पण उणे चार या संख्येचे वर्गमूळ काढायचा प्रश्न आला की वर्गमुळाच्या व्यावहारिक संकल्पनेतील अपुरेपणा उघडा पडतो. त्यासाठी पूर्वीचे गणित सामावून घेऊन पुढे जाणारा, नवे मूलभूतदृष्ट्या वेगळे गणित पाहू शकणारा विचार आवश्यक ठरतो. पैसा आणि श्रम या भांडवलशाहीतील अशाच गोष्टी आहेत. त्यांच्या विश्लेषणासाठी ज्या संकल्पना भांडवलशाही चौकटीच्या पलीकडे पाहत नाहीत त्या अपुऱ्या पडतात. आणि भांडवलशाही चौकटीच्या पलीकडे पहायचे तर भांडवलशाहीच्याच मूलभूत अपुरेपणाची, उफराटेपणाची जाण आत्मसात करणाऱ्या नव्या संकल्पनांची गरज असते. भांडवली श्रममूल्याच्या सिद्धांतामध्ये ही शक्ती नाही. मार्क्समध्ये ती आहे, कारण मार्क्सच्या सर्वात पायाभूत, सर्वात साध्या संकल्पनांमध्ये देखील भांडवलशाहीच्या पलीकडे झेपावणारी त्याची क्रांतिकारक दृष्टी अंतर्भूत आहे.

---

[१] एखाद्या वस्तूच्या निर्मितीमध्ये खर्च होणाऱ्या एकूण सर्वसाधारण मानवी श्रमांच्या आकड्याला आपण श्रमखर्च (लेबर कॉस्ट) म्हणू शकतो. श्रमखर्चाला देखील एक किमान नियंत्रक स्थान असते. पण ते मूल्याच्या स्थानापेक्षा वेगळे असते.

श्रमखर्चाचे नियंत्रण हे समाजवादी किंवा कम्युनिस्ट समाजासकट सर्व मानवी उत्पादन–व्यवहाराला लागू होते. एखादा मानवी समूह त्यांच्याकडे उपलब्ध असलेली श्रमसामुग्री व श्रम करण्याची कुवत वापरून कोण–कोणत्या वस्तूंचे कोणकोणत्या प्रमाणात उत्पादन करू शकतो त्या जुळणीची व्याप्ती (रेंज) त्या वस्तूंच्या श्रमखर्चाने निश्चित होते. त्या समूहाचे उत्पादन या व्याप्तीच्या अतंर्गत मोडले पाहिजे. यापलीकडे श्रमखर्चाचे कोणतेही नियंत्रण लागू होत नाही. मूल्याचे नियंत्रण यापुढे जाऊन त्या त्या वस्तूच्या मालकाला काय मिळायला पाहिजे तेही निश्चित करते व त्यामुळे उत्पादन व वितरण यांचीही निश्चिती करते.

श्रमखर्च व मूल्य यातील हा फरक सर्वसाधारण मानवी श्रम आणि अमूर्त श्रम यांच्यातील फरकावर आधारलेला असतो. वरवर पाहता सर्वसाधारण मानवी श्रम आणि अमूर्त श्रम या इतक्या सारख्या गोष्टी असतात की त्यांची गल्लत सहज होऊ शकते. अशी गल्लत करण्याचे परिणाम भांडवलशाही नंतरच्या समाजवादी संक्रमणकाळातही महत्त्वाचे ठरतात. हा फरक प्रशिक्षित श्रमांच्या मूल्यनिर्मितीमधील स्थानाच्या प्रश्नाशीदेखील अत्यंत जैवपणे गुंतलेले आहे. मार्क्सवर टीका करणारे विरोधक हे बऱ्याचदा अशा प्रकारच्या श्रमांचे अमूर्त श्रमकाळात रूपांतर होण्याला मार्क्समध्ये पुरेसा सैद्धांतिक आधार नाही असे मांडत असतात त्या संदर्भात हे महत्त्वाचे ठरते.त्यामुळे आपण त्या संदर्भात या फरकाच्या जरा जास्त तपशीलामध्ये जाणे आवश्यक आहे.

यासाठी प्रथम आपल्याला प्रशिक्षित (ट्रेन्ड) व कुशल (स्किल्ड) श्रमांमध्ये फरक केला पाहिजे कारण त्यांच्यात नेहमी गल्लत होते. कौशल्य या संकल्पनेमार्फत आपल्याला एकाच प्रकारचे काम करण्याच्या कसबातील फरक अभिप्रेत आहे. उदाहरणार्थ एखादा कारागीर ४ तासात एक टेबल बनवतो तर दुसरा ते आठ तासात बनवतो. यामध्ये पहिल्या कारागिराचे जास्त कौशल्य अभिप्रेत आहे. निरनिराळ्या कुशलतेच्या श्रमांचा मूल्यनिर्मितीशी व श्रमांच्या अमूर्तीकरणाशी काय संबंध आहे याची चर्चा आपण अगोदरच केली आहे. सामाजिक सरासरीने प्रत्येक श्रमकाळाच्या तुकड्याचे रूपांतर अमूर्त श्रमात होते व त्यातून निरनिराळ्या कुशलतेच्या श्रमांचे रूपांतरही निश्चित होते. जर समाजातील एकूण टेबल बनवणारे कारागीर मिळून सरासरीने एक टेबल सहा तासात बनवीत असतील तर कुशल कारागिराच्या चार तास सर्वसाधारण श्रमांचे रूपांतर सहा तासाच्या अमूर्त श्रमांमध्ये झालेले असते.

प्रशिक्षित श्रमांचा प्रश्न हा जास्त गुंतागुंतीचा आहे व तो आपण मूळ मजकुरात हाताळलेला नाही. दोन वेगवेगळ्या प्रकारच्या कामामधील कसबाचा फरक प्रशिक्षणातील फरक म्हणून आपल्याला अभिप्रेत आहे. उदाहरणार्थ, समोरील पट्ट्यावर बाटली भरणाऱ्या यंत्राला भरण्यासाठी बाटल्या पुरवण्याचे आठ तासाचे काम घ्या, आणि त्याबरोबरच दिलेल्या रेखाचित्राच्या आधारे लेथवर लोखंडाला

विवक्षित आकार देण्याचे आठ तासाचे काम घ्या. या दोन कामामधील फरक हा प्रशिक्षणाचा फरक आहे. आणि त्याच्याशी निगडित प्रश्न हा आहे की बाटल्या सरकवण्याच्या आठ तासाच्या श्रमांचे किती अमूर्त श्रमांत रूपांतर होते व लेथवरील आठ तासांचे किती? निरनिराळ्या कुशलतेच्या श्रमांबद्दल ज्या पद्धतीने उत्तर दिले जाते त्या पद्धतीने या प्रश्नाला उत्तर देता येत नाही. कारण त्यातून निर्माण होणाऱ्या उत्पादनाला सरळपणे अमूर्त श्रमांची सामाजिक सरासरी लावता येत नाही.

प्रशिक्षणामध्ये सामाजिक श्रम खर्च होत असतात. उमेदवारीत खर्च करावा लागणारा काळ, प्रशिक्षकांनी खर्च केलेला काळ, प्रशिक्षणामध्ये खर्च झालेली श्रमसामुग्री हे सर्व प्रशिक्षित श्रमांसाठी आवश्यक श्रम असतात. समाजाच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये ज्यावेळेस प्रशिक्षित श्रम खर्च होत असतात तेव्हा त्या कामगारांमध्ये ते प्रशिक्षित श्रम करण्याची कुवत निर्माण करणारे श्रमदेखील खर्च होत असतात. या सैद्धांतिक आधारावर, कदाचित बाटल्या सरकवण्याच्या आठ तासाच्या श्रमांचे रूपांतर हे ८.०५ श्रम तासाइतक्या अमूर्त श्रमांमध्ये होत असेल, तर लेथवरील कामगाराच्या आठ तास श्रमांचे रूपांतर बारा श्रमतासांइतक्या अमूर्त श्रमांमध्ये होत असेल. थोडक्यात, निरनिराळ्या प्रकारच्या प्रशिक्षित व कुशल श्रमांचे निरनिराळ्या प्रकारे अमूर्त श्रमात रूपांतर होण्याचा एक ठाम सैद्धांतिक आधार यातून तयार होतो.

परंतु त्याचवेळी वरील प्रक्रियेमधील सर्वसाधारण मानवी श्रम आणि अमूर्त श्रम या दोन्ही गोष्टींची गल्लत न होणे हे महत्त्वाचे असते. विशेषतः समाजवादी संक्रमणकाळामध्ये याला जास्त महत्त्व येऊ शकते. मार्क्सच्या बहुतेक समर्थकांच्या दृष्टीने मार्क्सला अभिप्रेत असलेल्या कम्युनिस्ट समाजाचे तत्त्व 'प्रत्येकाकडून कुवतीप्रमाणे काम व गरजेप्रमाणे मोबदला' हे अंतिम उद्दिष्ट असते व मध्यंतरीच्या समाजवादी संक्रमणकाळात 'प्रत्येकाकडून कुवतीप्रमाणे काम व कामाप्रमाणे मोबदला' हे तत्त्व असते. अर्थात इथे मोबदला याला संदर्भ हा सामाजिक उत्पादनावरील अधिकाराचा आहे पैशाचा नव्हे. यामध्ये वरील गल्लतीचा परिणाम हा संक्रमणकाळातील 'कामाप्रमाणे मोबदला' या भागावर होऊ शकतो. कारण इथे प्रश्न निर्माण होतो की कामाप्रमाणे म्हणजे काय?

एक प्रकारचे उत्तर हे कुशल आणि प्रशिक्षित कामगारांच्या तितक्याच श्रमांचे रूपांतर कमी कुशल व कमी प्रशिक्षित कामगारांच्या तितक्याच श्रमांच्या मोबदल्यापेक्षा जास्त मोबदल्यात झाले पाहिजे हे प्रथम निकष म्हणून मान्य करून मग पुढील नियोजनाची रचना करते. त्यामध्ये मग ते कुशल व अकुशल कामगारांच्यामधील मोबदल्याची तफावत कमी रहावी यासाठी प्रयत्न करते, समाजाला त्या महत्त्वाच्या कामाच्या श्रेणी वाटतात त्यामध्ये जास्त कामगारांनी शिरावे म्हणून त्या श्रेणींचा मोबदला वाढवू शकतात, किंवा काही श्रेणींमध्ये कामाची परिस्थिती जास्त वाईट असते म्हणून त्या श्रेणींचा मोबदला वाढवू शकतात इत्यादी. थोडक्यात सामाजिक

गरजांप्रमाणे श्रेणी व मोबदला यांचा संबंध कामगार वर्गाच्या हितसंबंधी धोरणाप्रमाणे करता करता आधारभूत निकष मात्र कुशल व प्रशिक्षित श्रमांचे जास्त मोबदल्यात रूपांतर हा असतो. आणि आमच्या मते नेमकी इथेच ही गल्लत महत्त्वाची असते.

'कामाप्रमाणे मोबदला' याचे स्वाभाविकपणे कुशल व प्रशिक्षित श्रमांचा जास्त मोबदला या तत्त्वात रूपांतर होते तेव्हा तो अमूर्त श्रम आणि सर्वसाधारण श्रम यांच्यातील गल्लतीचा परिणाम असतो. मगाचच्या टेबल बनविणाऱ्या कुशल कारागिराच्या चार तास सर्वसाधारण श्रमांचे अमूर्तीकरणामुळे त्यापेक्षा जास्त किंवा सहा तासांच्या अमूर्त श्रमांत रूपांतर झालेले होते. हा कौशल्यातील फरक कुवतीमुळे आला आहे, का बेजबाबदारपणातून आला आहे, का अपंगत्वातून आला आहे, या सर्व गोष्टी नजरेआड करून आंधळेपणाने कुशल श्रमांच्या तितक्याच श्रमखर्चाचे जास्त अमूर्त श्रमात रूपांतर होते. क्रयवस्तूंच्या व्यवहारातील विभूतिकरणातून येणारा आंधळेपणा या तत्त्वामध्ये सामावलेला आहे. विभूतिकरणातून प्रत्यक्ष प्रक्रिया लपते व प्रत्यक्ष खर्च झालेल्या श्रमांपेक्षा जास्त श्रमांचे प्रतिनिधित्व करणे हा त्या व्यक्तिगत कुशल (किंवा प्रशिक्षित) श्रमांचा अंगभूत गुणधर्म बनतो. नियोजनाला हे तत्त्व आधारभूत मानून चालण्यामध्ये आधारभूत निकषांमध्येच हे आंधळेपण अंतर्भूत होते. मोबदल्यातील बदल हा आंधळेपणा कमी-जास्त करू शकतात. परंतु नाहीसा करू शकत नाहीत. जी गोष्ट कुशल श्रमांची तीच थोड्या वेगळ्या आणि जास्त गंभीर रूपाने प्रशिक्षित श्रमांबद्दल खरी असते. अप्रशिक्षित असल्याने सर्वसाधारण कुशलतेच्या झाडूवाल्याच्या आठ तास श्रमांचे अमूर्तीकरणातून सरळ तितक्यात अमूर्त श्रमांत रूपांतर होते तर प्रशिक्षित सर्वसाधारण कुशलतेच्या एखाद्या तांत्रिक कामगाराच्या आठ तासांचे अमूर्तीकरणातून सोळा तासांच्या अमूर्त श्रमामध्येही रूपांतर होऊ शकते. या अमूर्तीकरणाला कुशल श्रमांच्या अमूर्तीकरणापेक्षाही एक वेगळा आधार असतो. या प्रशिक्षणाची सेवा क्रयवस्तूच्या स्वरूपातच उपलब्ध होऊ शकते व त्यामुळे ती विकत घेण्यामध्ये तितके मूल्य खर्च करणे हे प्रशिक्षित कामगाराला आवश्यक असते. त्यामुळे मिळालेल्या मोबदल्यामार्फतच हा श्रमखर्च सामाजिक श्रमखर्चाचा भाग बनणे क्रयवस्तूंच्या समाजात आवश्यक असते. समाजवादी नियोजनामध्ये प्रशिक्षणाच्या सेवा या बहुतेकदा विनामोबदला किंवा अत्यल्प मोबदल्यामध्ये उपलब्ध होतात. त्यामुळे प्रशिक्षित श्रमांचे अमूर्तीकरणाच्या मार्फतदेखील जास्त श्रमात रूपांतर होण्याचा मुख्य आधार नाहीसा झालेला असतो.

कुशल आणि अकुशल कामगारांना जास्त मोबदला निकष म्हणून मान्य करणारे हे पहिले उत्तर सर्वसाधारण श्रम आणि अमूर्त श्रम यांची गल्लत करण्यावर आधारलेले आहे. समाजवादी संक्रमणकाळ हा क्रयवस्तूंच्या निकषापासून फारकत घेऊन कम्युनिस्ट समाजाकडे वाटचाल करण्याचा एक कालखंड असतो. आपण चर्चा

करीत असलेल्या आधारावर ते दोन प्रक्रियांमार्फत होते. एका बाजूला गरजेप्रमाणे सर्वांना उपलब्ध होणाऱ्या वस्तूंचे क्षेत्र वाढत असते. दुसऱ्या बाजूला ज्या वस्तू गरजेप्रमाणे सर्वांना उपलब्ध होत नाहीत त्यांचे वाटप सरळपणे 'कामाप्रमाणे मोबदला' या सूत्रानुसार होत असते. म्हणूनच संक्रमणकाळाची किमान जबाबदारी इतकी तरी निश्चित असते की या सूत्रातील 'कामाप्रमाणे'साठी कामाचे माप लावताना श्रमांच्या अमूर्तीकरणापासून मुक्त असे माप लावले जावे. सर्वसाधारण श्रमांचा निकष लावण्याचा अर्थ इतकाच होतो की गरजेप्रमाणे उपलब्ध न होणाऱ्या वस्तूंच्या रूपात मिळायचा मोबदला ठरवताना प्रथम ८ तास श्रम करणाऱ्या कुशल, अकुशल, अर्धकुशल, प्रशिक्षित, अप्रशिक्षित कोणत्याही कामगाराला समान मोबदला मिळायला पाहिजे असे गृहित धरून सुरुवात केली पाहिजे. त्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीमधील ज्या श्रमांच्या जुळणीच्या गरजा ताबडतोबीच्या प्रचारामधून व सामाजिक प्रेरणेमधून पूर्ण होणे शक्य वाटत नसेल त्या पूर्ण करण्यासाठी मोबदल्यात या आधारावर फरक त्यानंतर करता येईल. मुख्य प्रश्न सुरुवात कोणत्या निकषावर होते याचा आहे.

अमूर्त श्रमांचे निकष सामाजिक नियोजनात शिल्लक रहाण्याचा (तथाकथित आर्थिक प्रोत्साहन फक्त शिल्लक राहण्याचा नव्हे) परिणाम हा संक्रमण काळातील संक्रमणालाच खीळ घालण्यात होऊ शकतो. एका बाजूला कामकरी वर्गामधील निरनिराळ्या प्रकारची विभागणी स्थिर होऊ शकते, व दुसऱ्या बाजूला गरजेप्रमाणे सर्वांना उपलब्ध होणाऱ्या वस्तूंचे क्षेत्र वाढण्याला किंवा वाढण्याच्या वेगाला खीळ बसू शकते. अर्थात हे परिणाम ही एक वेगळी अभ्यासाची गोष्ट आहे. परंतु त्याच्या मुळांशी सर्वसाधारण श्रमांची आणि अमूर्त श्रमांची गल्लत मात्र असते ही एक मार्क्सच्या मूळ सिद्धांताच्या संदर्भातली महत्त्वाची गोष्ट ठरते.

२ कामगारांचे स्वत:च्याच श्रमांशी परकेपणाचे आनंदहीन नाते असावे ही परिस्थिती त्यांच्यावर लादली जाते हे महत्त्वाचे आहे. कारण लादली जाते याचाच अर्थ तिला त्यांचा एक विरोधही होत असतो. श्रमांमध्ये स्वत्व व आनंद शोधणे या मूलत: मानवी प्रेरणा कामगारांमधून नाहीशा होत नाहीत. भांडवली कारखान्यातल्या श्रमांतूनही कामगार स्वत्व व आनंद मिळवतच नाहीत असे एकमार्गी गृहित यामध्ये नाही. तसा ते मिळवतातही. पण त्याकडे बोट दाखवून हे लादले जाणे खोडले जात नाही.

३ तथाकथित 'शुद्ध' अर्थशास्त्र बनल्याने अभिजात भांडवली अर्थशास्त्रामधल्या वैज्ञानिक प्रेरणा पूर्णपणे नाहीशा झाल्या व मार्क्सनंतरच्या भांडवली अर्थशास्त्रामध्ये काहीएक अर्थ राहिला नाही असे मात्र येथे अभिप्रेत नाही. उदाहरणार्थ केन्ससारख्या (इंग्लंड : १८८३-१९४६) अर्थशास्त्रज्ञाने निव्वळ अर्थशास्त्राच्या चौकटीत राहूनदेखील मांडलेल्या संकल्पना या स्मिथ, रिकार्डो यांच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या

किंवा दर्जाच्या ठरत नाहीत. पिअरो स्राफाबरोबर (इंग्लंड : १८९८–१९८३) उदयाला आलेल्या नवरिकार्डोवादी प्रवाहाचेही महत्त्व तितकेच आहे. किंवा राऊल प्रिविशसारख्यांचा (अर्जेंटिना : १९०१–१९८६) उदारमतवादी पण स्पष्टपणे राजकीय भूमिका ओळखून काम करणारा व राजकीय अर्थशास्त्राचा पुरस्कार करणारा प्रवाहदेखील महत्त्वाचा आहे. १९६० नंतर तर या शेवटच्या दोन प्रवाहांनी अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे. पण मुद्दा आहे तो अर्थशास्त्रज्ञांमध्ये सर्वसाधारणपणे प्रचलित व प्रस्थापित असलेल्या दृष्टिकोनाचा. तो मात्र तथाकथित बिनराजकीय 'शुद्ध' अर्थशास्त्राची सूत्रे मांडणाराच राहिला आहे. १९६० नंतर या सूत्रांना विरोध करणाऱ्या विचार प्रवाहांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तींच्या अर्थशास्त्रज्ञांचा समावेश असला तरी आजपर्यंत एकंदर अर्थशास्त्रीय विचारांवरचा त्यांचा प्रभाव क्षीणच राहिलेला आहे. नाही तर स्राफाच्या पुस्तकानंतर किंमती स्वतंत्रपणे निश्चित करून त्या आधारावर नफा व वेतन ठरवणारे सिद्धांत केव्हाच नाहीसे व्हायला हवे होते. पण त्यांचे प्रभुत्व आजही कायम आहे.

२. पैसा : मूल्याचा साक्षात अवतार

१. पैसा : क्रयवस्तूंचा अनिवार्य साथीदार

अशी कल्पना करा की तुमच्या भोवताली चाललेल्या क्रयवस्तूंच्या व्यवहारात पैसा कुठेच नाही. म्हणजे फक्त तुमच्याजवळ पैसे नाहीत असं नव्हे, तर पैसा ही चीजच अस्तित्वात नाही. तुम्ही गहू पिकवला आहे. तो विकायला नेता आहात आणि तुम्हाला तुमच्या गरजेच्या काही वस्तू विकत घ्यायच्या आहेत. तेल, कापड, तिखट, मीठ, चपला, एखाद-दोन खेळणी इत्यादी साध्या साध्या गोष्टी विकत घ्यायला तुम्ही बाहेर पडला आहात. अशा वेळी काय होईल? गहजब होईल. पैशाच्या व्यवहाराला सरावलेल्या तुमच्या मनासमोर अडचणींचा डोंगर उभा राहील.

तुम्ही तेल विकणाऱ्याला गाठून त्याला तेलाचा भाव विचारलात तर तो सांगेल एक किलो तेलाला दोन मीटर कापड. तुम्ही विचाराल, पण गव्हामध्ये काय भाव? तर तो म्हणेल, ''गहू पाहिजे आहे कुणाला? आमच्याकडे तांदूळच चालतो. ज्या गावाला जायचे नाही त्या गावच्या चौकशा कुणी केल्यात? गव्हाच्या बदल्यात तेलाचा भाव काय ते मला माहीत नाही.'' बरेच प्रयत्न करून अखेर तुम्ही गहू विकत घेणारा तेलाचा विक्रेता शोधाल. आणि तो गव्हात भावही सांगेल, समजा एक किलो तेलाला चार किलो गहू. पण आता किती तेल घ्यायचे? तेल घेऊन इतर गोष्टी विकत घ्यायला जवळ गहू शिल्लक राहिला पाहिजे. शिवाय कापडाचा भाव गव्हात सांगणारा आणि कापडाच्या बदल्यात गहू घेणारा कोणीतरी सापडला पाहिजे. तेच चपलांचे, तिखटाचे,

मिठाचे आणि इतर सर्व गोष्टींचे. आणि तुम्ही गहूच विकायला बाहेर पडला आहात म्हणून बरे. तुमच्याजवळ पालेभाजीसारखा नाशवंत माल विकायला असता, तर हा सगळा उपद्व्याप आटपेपर्यंत तुमची क्रयवस्तूच नष्ट होईल. किंवा तुम्ही एखादी भरजरी साडी विकत असतात तर? एका साडीत कदाचित तुम्हाला एखादा टन मीठ मिळाले असते. पण वर्षाकाठी तुम्हाला फक्त दहा किलो मीठ लागते, म्हणून तुम्ही मिठाच्या विक्रेत्याला त्या भरजरी साडीचा एक शतांश तुकडा कापून देणार की काय?

पण तुमच्यावर हा अडचणींचा डोंगर कधी कोसळत नाही, कारण पैसा नावाची गोष्ट अस्तित्वात असते. पैसा कमी पडतो, पैशात गरज कोंबणे कठीण होत जाते, पण पैसा असतो. आणि नुसता असतोच असे नाही तर तो प्रत्येक व्यवहारात असतो. जसे भांडवलशाहीत सर्व उपयोगी वस्तू क्रयवस्तू बनलेल्या असतात तसेच येथे होणाऱ्या प्रत्येक देवाणघेवाणीमध्ये पैसा आलेला असतो. तुम्ही क्रयवस्तू विकत घ्यायला जाता ते हातात पैसा घेऊन, पैशाचे मालक म्हणून. आणि क्रयवस्तू विकायला जाता तेव्हाही तुम्हाला भेटतो तो पैसा आणि पैशाचे मालक. भांडवलशाहीत क्रयवस्तूला पैशाची साथ अनिवार्य असते.

मागील प्रकरणामध्ये आपण क्रयवस्तूच्या स्वरूपाचा बराच शोध घेतला. आता प्रत्येक क्रयवस्तूबरोबर पैसा अपरिहार्य साथी म्हणून उभा असतो हा निष्कर्ष आपण काढला, तर पैशाच्या अंतरंगाचाही शोध घेतला पाहिजे. तेव्हा जसे क्रयवस्तूंबाबत आपण केले तसेच इथेही करू; पैशाच्या दृश्य स्वरूपापासून माग काढत आपण त्या रूपामागे दडलेल्या संबंधांपर्यंत जाऊ. पैशाबद्दल सर्व भांडवली विचारवंतांनादेखील मान्य असलेली गोष्ट म्हणजे पैसा बजावत असलेली विविध प्रकारची कामगिरी. भांडवली अर्थशास्त्राच्या पुस्तकातले पैशावरचे प्रकरण या दृश्य कामगिऱ्यांपासूनच सुरू होते आणि तिथूनच आपणही सुरुवात करू.

२. पैशाचे पहिले कार्य : मूल्याचे माप

पैशाचे आपल्याला पहिले काम दिसते ते मूल्याचे माप (मेझर ऑफ व्हॅल्यू) म्हणून. एक किलो गहू तुमच्यासमोर ठेवला तर तुम्हाला त्याचे मूल्य कळत नाही. त्या गव्हाला मूल्य आहे हे विकणाऱ्याला व तुम्हाला दोघांनाही माहीत असते. त्याच्याबद्दल घासाघीस करायचीही तुमची तयारी असते. पण या एक

किलो गव्हाचे मूल्य किती आहे हे एकमेकांना अगोदर समजावे लागते. त्याच्याबद्दल बोलायची एक भाषा तयार व्हावी लागते. ही भाषा विनिमय-मूल्याची असते. वस्तूंमधल्या परस्परप्रमाणांची असते. एक किलो गहू म्हणजे दोन किलो मीठ किंवा २५० ग्रॅम तेल किंवा एक खेळणे अशा समीकरणांनी बनलेली ही अनेक विनिमय-मूल्यांची भाषा असते. अशी अनेक विनिमय-मूल्ये गव्हाला असू शकतात. हेच प्रत्येक क्रयवस्तूबाबत खरे असते. पण प्रत्येक दोन क्रयवस्तूंमधले प्रमाण या स्वरूपातली विविध विनिमयमूल्ये लक्षात घ्यायची तर नुसती आकड्यांची गर्दी होते. त्यापेक्षा सुटसुटीत म्हणजे सगळ्या क्रयवस्तूंचे कोणत्या तरी एकाच क्रयवस्तूशी असलेले प्रमाण लक्षात घेणे; त्या सगळ्यांना एकच सर्वसाधारण माप लावणे. प्रत्येक क्रयवस्तूला अनेक विनिमयमूल्ये असण्याऐवजी एकच विनिमय-मूल्य वा किंमत असणे किती सुटसुटीत होईल! पैसा नेमके हेच करीत असतो. प्रत्येक क्रयवस्तूला पैशाच्या भाषेत एकच किंमत असते. सगळ्या क्रयवस्तूंबद्दल हुज्जत घालायला एक सर्वसाधारण आधार तयार होतो.

सर्व क्रयवस्तूंचे मूल्य निश्चित करण्यासाठी एकच सर्वसाधारण माप पाहिजे हे खरे. पण त्यासाठी पैशाची गरज असते का? आपल्याकडे एक सर्वसाधारण माप आहेच की! अमूर्त सामाजिक श्रमकाळ. हे सगळ्या क्रयवस्तूंच्या मूल्यात अंतर्भूत असलेले सर्वसाधारण माप आहेच. मग या पैशाच्या आणि विनिमय-मूल्याच्या भानगडी पाहिजेतच कशाला? सरळ त्या क्रयवस्तूत गेलेला श्रमकाळ माप म्हणून वापरायचा!

मूल्याच्या मापाचा हा प्रश्न इतक्या सरळपणे सुटू शकत नाही, कारण या प्रश्नाच्या बुडाशी असणारा मूल्य हा संबंधच मुळात इतका सरळ नसतो. मार्क्सच्या दृष्टीने मूल्याच्या आशयाप्रमाणेच (सब्स्टन्स) मूल्याचे रूपही (फॉर्म) महत्त्वाचे असते. श्रमांच्या अमूर्तीकरणामधून क्रयवस्तूंमध्ये गोठलेला अमूर्त, सामाजिक श्रमकाळ हा विनिमय-मूल्याच्या रूपात, क्रयवस्तूंचे आपापसातले प्रमाण या रूपातच व्यक्त व्हावा लागतो. त्यामुळे मूल्याचा सर्वसाधारण मापदंडदेखील विनिमय-मूल्य या रूपामार्फतच व्यक्त व्हावा लागतो. याचा अर्थ असा होतो की सर्व क्रयवस्तूंचे मूल्य हे कोणत्या तरी एकाच क्रयवस्तूच्या प्रमाणात व्यक्त व्हावे लागते. आणि ही विशिष्ट क्रयवस्तू विनिमय-मूल्याचा सर्वसाधारण आधार बनते. पैसा नेमके हेच करताना दिसतो. पैसा म्हणजे क्रयवस्तूंच्या जगात आणि क्रयवस्तूंच्या स्वतःच्या भाषेत व्यक्त झालेला

मूल्याचा एक सार्वत्रिक मापदंड असतो. सर्व क्रयवस्तूंचे पैशाशी प्रमाण सांगून त्यांचे मूल्य मापले जात असते.

मूल्याचा मापदंड या पैसा पार पाडत असलेल्या पहिल्या भूमिकेपुरते पाहिले तर अमुक एकच क्रयवस्तू पैसा असण्याची काही गरज नसते. त्यासाठी कुठलीही क्रयवस्तू चालू शकते. मापदंड म्हणून वापरावयाच्या त्या क्रयवस्तूला मूल्य असले की झाले. एक किलो मीठदेखील मापदंडाचे काम करू शकते. किंवा १० ग्रॅम सोने. इतकेच कशाला, विशिष्ट प्रमाणात काही क्रयवस्तूंचे मिश्रण करून त्याचेही माप आपण वापरू शकतो. कारण हे शेवटी क्रयवस्तूंचेच मिश्रण असते व त्यामुळे त्यामध्ये एक निश्चित मूल्यही असतेच. (एक किलो गहू + एक मीटर कापड + १० ग्रॅम सोने + एक किलो मीठ) मिळून बनलेले क्रयवस्तूंचे मिश्रणदेखील ही भूमिका वठवू शकते.

मूल्याचा मापदंड ही पैशाची भूमिका क्रयवस्तूंचे मूल्य माणसांना साक्षात प्रत्ययाला येईल अशा स्वरूपात आणते, मूल्याचे एका सुटसुटीत आकड्यात केवळ भाषांतर करते. म्हणजे, मूल्याचे माप या नात्याने कार्य करणारा पैसा हा केवळ एक *काल्पनिक किंवा वैचारिक* गोष्ट म्हणून ते कार्य पार पाडत असतो. क्रयवस्तूचे मूल्य विनिमय-मूल्यात मांडताना भागाकारासाठी एक आकडा उपलब्ध करून देणारे हे कार्य आहे. गव्हाच्या पोत्यात '३५.००' हा एका किलोचा रुपयांत भाव सांगणारा चौकोनी पुठ्ठा खुपसला की पैशाचे हे कार्य संपते; गव्हाची किंमत कळते, घासाघीस करण्याचा आधार तयार होतो. एवढ्यासाठी कोणतीही क्रयवस्तू पैसा म्हणून वापरणे शक्य आहे.

प्रत्यक्षात मात्र कोणतीही क्रयवस्तू पैसा म्हणून वापरू म्हटले तर वापरता येत नाही. पैशाच्या या भूमिकेमध्ये पैशाचा सर्व क्रयवस्तूंशी मिळून एक संबंध सांगितलेला असतो. कारण प्रत्येक क्रयवस्तूची किंमत म्हणजे अमुक इतका पैसा म्हणजेच अमुक इतकी दुसरी क्रयवस्तू, किंवा तमुक इतकी तिसरी क्रयवस्तू अशा संबंधांची ती एक एकत्र जंत्री असते. पैशामागे मूल्याचे माप म्हणून वावरणाऱ्या क्रयवस्तूला (किंवा क्रयवस्तूंच्या मिश्रणाला) हा संबंध प्रत्यक्ष सामाजिक व्यवहारामध्ये बांधावा लागतो. पैशाच्या पहिल्या भूमिकेत अभिप्रेत असलेल्या या संबंधाला त्याच्या दुसऱ्या भूमिकेमार्फत सामाजिक व्यवहारामध्ये पाया लाभतो. हे कसे घडते ते पहायचे तर आपल्याला पैशाच्या दुसऱ्या भूमिकेकडे जावे लागेल.

३. पैशाचे दुसरे कार्य : अभिसरणाचे माध्यम

पैशाच्या पायाला लागलेली भिंगरी

पैशाची ही दुसरी भूमिका अभिसरणाचे माध्यम (मीडिअम ऑफ सर्क्युलेशन) म्हणून ओळखली जाते. पण तिचा खराखुरा अर्थ इतक्या सहजासहजी समजण्याजोगा नाही. त्यासाठी आपल्याला जरा पैशाचा माग काढत जावे लागेल. कारण पैशाच्या पायाला भिंगरी लागलेली असते. पैसा सतत फिरत असतो, त्याचे अभिसरण होताना दिसते. गव्हाच्या पोत्यात मगाशी त्याचा भाव सांगणारा चौकोनी पुट्ठा आपण खुपसला, तेव्हाच पैशाने पार पाडावयाच्या दुसऱ्या कामगिरीची तयारी होते. आता एक गिऱ्हाईक येते आणि चार किलो गहू घेते. गहू विकणारा माणूस तो आलेला पैसा घेऊन बाजारात दुसरीकडे जातो व एक किलो तेल विकत घेतो. तो तेल विकणारा यातून त्याच्याकडे आलेला पैसा घेतो आणि भाविकपणे एक भगवद्गीतेची पोथी विकत घेतो. पैसा फिरत असतो, एकेका क्रयवस्तूला स्पर्श करत असतो आणि पैशाचा हा स्पर्श झाला की ती क्रयवस्तू बाजारातून बाहेर पडते. तिचा उपयोग करणाऱ्याच्या हातात येऊन उपभोगाच्या क्षेत्रात शिरत असते.

पहिल्या प्रकरणात आपण क्रयवस्तूंच्या आपापसातल्या देवाणघेवाणीबद्दल पैशाचा संदर्भ न आणता बोलत होतो. तेल आणि गहू, गीतेची पोथी आणि चिपळ्या अशा आपापसांत अदलाबदल होणाऱ्या निरनिराळ्या क्रयवस्तूंच्या जोड्यांबद्दल आपण बोलत होतो. पैसा गृहीत धरल्यावर मात्र सर्व देवाणघेवाणीच्या व्यवहारांना एक सर्वसाधारण रूप प्राप्त होते. पैसा हा सगळया क्रयवस्तूंचा भोज्जा बनतो आणि त्याला ज्या क्रयवस्तू शिवतील त्या बाजारपेठेच्या खेळातून बाद होतात. पैशाशिवाय आपण बोलत होतो, तेव्हा एका बाजूला एक क्रयवस्तू, दुसऱ्या बाजूला दुसरी क्रयवस्तू असे चित्र होते. प्रत्येक व्यवहारामध्ये दोन्ही बाजू बदलत होत्या. आता प्रत्येक व्यवहारात एका बाजूला नेहमी पैसा असतो आणि दुसऱ्या बाजूला फक्त निरनिराळ्या क्रयवस्तू असतात.

पैशामुळे दुभंगलेला क्रयवस्तूंचा विनिमय

एका बाजूला पैसा व दुसऱ्या बाजूला क्रयवस्तू असे एकच रूप जरी सगळीकडे दिसत असले तरी त्या रूपामागे प्रत्येक क्रयवस्तूच्या अदलाबदलीमधले दोन वेगवेगळे टप्पे लपलेले असतात. त्यासाठी व्यवहारात पैसा नसल्याने व

असल्याने काय फरक पडतो ते आपल्याला पहावे लागेल. मगाचच्या गव्हाच्या विक्रेत्याकडे परत जाऊ. त्याने चार किलो गहू विकला व त्याचे पैसे घेतले. त्याने ते पैसे दिले व एक किलो तेल घेतले. हा व्यवहार पैसा येण्यापूर्वी त्याने कसा केला असता? त्याने गहू हवे असणारा तेलाचा विक्रेता गाठला असता व चार किलो गव्हाच्या बदल्यात एक किलो तेल घेतले असते. क्रयवस्तूंच्या या व्यवहाराचा आलेख मांडला तर तो असा दिसतो.

गहू ↔ तेल म्हणजेच क्रयवस्तू १ ↔ क्रयवस्तू २
(गव्हाचा मालक) (तेलाचा मालक)

आता पैसा यात मध्यस्थी करत असतो, तेव्हा काय घडते? प्रथम तो गहू विकतो. तो ज्याला गहू विकतो त्याच्याकडेच तेल विकायला असले पाहिजे हे बंधन त्याच्यावर आता नसते. तो चार किलो गहू विकतो, गिऱ्हाईक त्याला पैसा देते. या व्यवहाराचा आलेख मांडला तर तो असा दिसतो.[१]

गहू ↔ पैसा म्हणजेच क्रयवस्तू १ ↔ पैसा
(गव्हाचा मालक) (गव्हाचे गिऱ्हाईक)

त्याने गहू विकले, पैसा घेतला. संपला गव्हाचा व्यवहार. नेमका इथेच भ्रम तयार होतो. खरे पाहता गव्हाचा व्यवहार संपलेला नाही. त्याच्या हातात आलेल्या पैशाला स्वत:चे मूल्य नसते. ते परप्रकाशित मूल्य असते. पैशाच्या रूपात त्याच्या हातात गव्हाचेच मूल्य आलेले असते. गव्हाची विनिमय प्रक्रियेतील वाटचाल अजून संपलेली नसते. तिच्यामधला एकच टप्पा पार झाला आहे. आता हे गव्हाचे मूल्य उरी वागवणारा पैसा घेऊन तो माणूस गिऱ्हाईक बनून जातो आणि तेल विकत घेऊन येतो. या व्यवहाराचा आलेख असा दिसतो.

पैसा ↔ तेलम्हणजेच पैसा ↔ क्रयवस्तू २
(तेलाचे गिऱ्हाईक)(तेलाचा विक्रेता) (गव्हाचे मूल्य) (गव्हाचा विक्रेता)

आता गव्हाचा विनिमय खरोखरी संपलेला आहे. पैसा नसताना व असताना एखाद्या क्रयवस्तूचा जो विनिमय होतो तो दोन वेगवेगळ्या आलेखांमध्ये मांडता येतो.

प्राथमिक विनिमय

क्रयवस्तू १ ↔ क्रयवस्तू २

पैशाच्या मध्यस्थीने होणारा विनिमय

क्रयवस्तू १ ↔ पैसा ↔ क्रयवस्तू २
(क्रयवस्तू १ चे मूल्य)

पैसा वापरात आल्यानंतर देवाणघेवाणीच्या व्यवहारांमध्ये समीकरणाच्या एका बाजूला पैसा हा खुद्द पैसा म्हणून उभा नसतो. दुसऱ्या एखाद्या क्रयवस्तूच्या मूल्याचे काम करणारा नट किंवा प्रतिनिधी म्हणून उभा असतो. आणि कुठल्याही क्रयवस्तूच्या मूल्याचे काम करणारा हा नटसम्राट एकदा अवतरला की नाटकाचे स्वरूपदेखील बदललेले असते. प्राथमिक विनिमयात दोन क्रयवस्तूंचा आपापसात विनिमय झाला की दोन्हींचा विनिमय संपतो. जेव्हा पैसा येतो तेव्हा एका बाजूने (विक्रेत्याच्या बाजूने) हा व्यवहार क्रयवस्तू u पैसा असा असतो तर दुसऱ्या बाजूने (गिऱ्हाईकाच्या बाजूने) तो पैसा u क्रयवस्तू असा असतो. एक क्रयवस्तू आपला विनिमय सुरू करून पहिला टप्पा ओलांडत असते तर दुसरी क्रयवस्तू दुसरा टप्पा पार करून आपला विनिमय संपवत असते. यातून विनिमयाच्या जोड्या लागण्याऐवजी एक साखळी तयार होत असते. मागे घेतलेल्या उदाहरणात ही साखळी अशी होती . . . गहू–पैसा–तेल–पैसा–भगवद्गीता . . . क्रयवस्तूंच्या जोड्या लागण्याऐवजी क्रयवस्तूंचे अभिसरण, आपापसातील देवघेव सुरू होते. पैशांची येथे भूमिका असते ती अभिसरणाच्या माध्यमाची.

मूल्याच्या मापदंडाला सामाजिक पाया लाभतो

पैसा वापरात असतो तेव्हा क्रयवस्तूंचे अभिसरण हे पैशाच्या अभिसरणाचे रूप घेते. अभिसरण होत असते क्रयवस्तूंचे, पण जाता जाता त्या आपले मूल्य पैशाच्या हाती सोपवून त्याला पुढच्या विनिमयात ढकलून जातात. पैसा फिरतो आहे आणि क्रयवस्तूंचे अभिसरण घडवून आणतो आहे असा भास निर्माण होतो. पैसा असा फिरू लागला की त्याचे क्रयवस्तूंच्या मागे असणाऱ्या सामाजिक श्रमांशी एक नातेही तयार होते. आणि हे नाते त्याच्या पहिल्या मूल्याच्या मापदंडाच्या भूमिकेचा आधार बनते. पैशाच्या वैचारिक कार्याला सामाजिक वास्तवाचा पाया लाभतो.

मगाची साखळीच घ्या. पैसा या साखळीमध्ये चार किलो गहू, एक किलो तेल, आणि एक गीतेची पोथी यांच्या मूल्याच्या भूमिका वठवतो. हा फिरणारा पैसा जर १४० रुपये धरला तर त्याने तीन वेळा फिरून चार किलो गहू, एक किलो तेल आणि एक पोथी यांचे मूल्य प्रत्यक्षात आणलेले असते. या तिन्हीचे मिळून मूल्य ७ श्रमतास आहे असे धरले तर यातून,

(१४० गुणिले ३) = ४२० रुपये = ७ श्रमतास

हे नाते तयार होते व त्यावरून १ रुपया = १/६० श्रमतास असे एक समीकरण तयार होते. मापदंडावरील १ रुपयाला १/६० श्रमतासाच्या मूल्याचे माप लाभते.

इथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की पैशाचे हे श्रमतासांशी, अमूर्त श्रमांशी जुळणारे समीकरण हे एकंदर सामाजिक पातळीवर, सरासरीच्या न्यायाने ठरते. एखाद्या क्षणी, देवघेवीचा व्यवहार वेगळा काढून हे समीकरण निर्माण होत नाही, तर एखाद्या कालावधीत क्रयवस्तूंच्या अभिसरणात पैशाने बजावलेल्या सर्व प्रातिनिधिक भूमिकांची गोळाबेरीज म्हणून हे ठरते.

वरील उदाहरणात दाखवल्याप्रमाणे बाजारात फिरणाऱ्या प्रत्येक नोटेचे रुपयातले दर्शनी मूल्य गुणिले ती नोट एकूण किती वेळा हस्तांतरित होते हे गुणाकार करून येणाऱ्या सर्व आकड्यांची बेरीज एका बाजूला उभी राहते. दुसऱ्या बाजूला हे सर्व रुपयांचे आकडे ज्या सर्व क्रयवस्तूचे अभिसरण घडवून आणतात त्यांचे मूल्य उभे राहते. या समीकरणावरून दोन्ही बाजूंना रुपयांच्या आकड्याने भाग दिला तर एक रुपया हा किती मूल्याचे प्रतिनिधित्व करतो ते ठरते. मूल्याचा मापदंड असणारे मूल्य व किंमतीची मोजपट्टी म्हणून वावरणारा रुपया यांची सांगड घातली जाते. पैसा हा अभिसरणाचे माध्यम म्हणून काम करताना त्याला स्वत:ला ठराविक मूल्य प्राप्त होते व यामुळे पैसा मूल्याच्या मापदंडाचे कार्य पार पाडण्यास समर्थ होतो.

पैशाचे हे जे मूल्य ठरते ते त्या नाण्यांचे किंवा नोटांचे स्वत:चे मूल्य नसते. येथे पैशाचे स्थान आहे ते प्रतिनिधी म्हणून, त्याचे हे असे मूल्य परावर्तित मूल्य आहे. काही खानावळिमध्ये काउंटरवर पैसे दिले की बिल्ला मिळतो. तो बिल्ला घेऊन जेवण्याच्या जागी बसले की बिल्ल्याच्या बदल्यात जेवण मिळते. हा बिल्ला म्हणजे काही प्रत्यक्ष पैसा नव्हे, ती केवळ तुम्ही पैसा दिल्याची खूण आहे. जेव्हा पैसा अभिसरणाचे माध्यम एवढीच भूमिका पार पाडत असतो

तेव्हा त्याचेही स्वरूप एखाद्या बिल्ल्यासारखे असते. तुम्ही अमुक एक रुपयाची एक क्रयवस्तू विकली आहे, याची खूण इतकेच त्याचे महत्त्व असते. याचा एक महत्त्वाचा परिणाम होत असतो. मगाच्याच उदाहरणाप्रमाणे समजा १ रुपया = १/६० श्रमतास असे नाते बांधले गेले आहे. अभिसरणाचे माध्यम ही भूमिका बजावताना रुपयाच्या नोटेचे किंवा नाण्याचे स्वत:चे मूल्य १/६० श्रमतास असण्याचे काहीच कारण नसते. त्यापेक्षा कितीतरी कमी मूल्य असलेली नाणी व नोटा ही भूमिका बजावू शकतात. कारण ही भूमिका बजावताना त्यांचे मूल्य हे स्वत:चे नसते तर ते क्रयवस्तूचेच परावर्तित मूल्य असते.

४. दुसऱ्या कार्यामागे दडलेले सामाजिक संबंध

स्थिरावलेली बाजारपेठ

या दुसऱ्या भूमिकेचा खोलात विचार केला की आपल्याला असे दिसेल की पैसा उपस्थित असतो तेव्हा क्रयवस्तूंच्या व्यवहारात एक फरक पडलेला असतो. प्राथमिक विनिमयातील एक व्यवहार घ्या. त्या व्यवहारामध्ये दोन्ही क्रयवस्तू आपापला विनिमय संपवतात. दोन्ही क्रयवस्तूंच्या मालकांच्या गरजा भागतात. आता ते परत विनिमय करतील किंवा करणारही नाहीत. विनिमय केलाच पाहिजे अशी सक्ती करणारे संबंध या प्राथमिक विनिमयात अंतर्भूत नाहीत. याउलट पैसा आल्यावर घडणारा ग्राहक-विक्रेता हा व्यवहार घ्या. गिऱ्हाईकाच्या हातून पैसा जातो, त्याची गरज भागते व त्याने पूर्वी विकलेल्या वस्तूचा विनिमय पूर्ण होतो. पण विक्रेत्याच्या हातात पैसा येतो तेव्हा त्याच्या क्रयवस्तूचा विनिमय अजून पूर्ण व्हायचा असतो. त्याची गरज अजून भागलेली नसते.

पैशावर आधारलेला प्रत्येक व्यवहार गिऱ्हाईकाची गरज शमवतो, पण विक्रेत्याला मात्र गरजू गिऱ्हाईक म्हणून परत बाजारपेठेत पाठवतो. प्राथमिक विनिमयामुळे विनिमय तात्पुरता संपतो, तर पैशावर आधारलेला व्यवहार संपतो तो पुन्हा बाजारपेठेत जाण्याची आवश्यकता निर्माण करून. पैसा आला की बाजारपेठेतला प्रत्येक व्यवहार बाजारपेठ पुन्हा निर्माण करीत असतो. मार्क्सच्या भाषेत बोलायचे झाले तर प्राथमिक विनिमयामध्ये क्रयवस्तूंमागील सामाजिक संबंध हे तेवढ्यापुरते प्रासंगिक संबंध असतात. तर पैशावर आधारलेल्या विनिमयामध्ये क्रयवस्तूंमागील सामाजिक संबंधांचे पुनरुत्पादन

होत असते, आणि पैसा हे या संबंधांचे पुनरुत्पादन करणारे, हे पुनरुत्पादन घडवून आणणारे माध्यम असते. अमूर्त श्रम ही एक स्थिर सामाजिक शक्ती बनल्याची किंवा क्रयवस्तूंचा व्यवहार हे एक स्थिर सामाजिक वास्तव बनल्याची पैसा ही खूण असते.

खाजगी बनलेले उत्पादन

क्रयवस्तूंमध्ये अंतर्भूत असलेले खाजगी संबंध प्रत्यक्षात समाजात प्रस्थापित होण्याचे पैसा हे एक माध्यम असते. आपला मगाचाच गव्हाचा मालक घ्या. त्याला गहू विकून तेल घ्यायचे होते. पैसा नसता तर ज्याला गहू पाहिजेत असा तेल विकणारा त्याला शोधावा लागला असता. त्याच्या गरजा व तेल विकणाऱ्याच्या गरजा परस्परपूरक असणे आवश्यक होते. त्या वस्तूंमधील मूर्त श्रमदेखील परस्परपूरक असणे ही या विनिमयाची एक अट होती. मूर्त श्रम नजरेआड करून अमूर्त श्रमांची सत्ता अजून या विनिमयावर पूर्णपणे लादली गेली नव्हती.

प्राथमिक विनिमयामध्ये आपल्या मूर्त गरजांमुळे निर्माण होणारे परस्परांवरचे सामाजिक अवलंबित्व या दोन्ही मालकांच्यासमोर स्पष्टपणे असते. हे दोन्ही मालक असे म्हणू शकत नाहीत की 'विकणाऱ्याची काय गरज आहे याच्याशी मला काय करायचेय? त्याच्या हातात माझ्या क्रयवस्तूमधील अमूर्त श्रमांमुळे ठरते तितके मूल्य असले की झाले.' असे ते म्हणू लागले तर त्यांना विनिमयच करता येणार नाही. पण पैसा हजर असला तर ते असे म्हणू शकतात. कारण मग गव्हाचा मालक गहू विकतो तेव्हा गव्हाच्या गिऱ्हाईकाच्या हातात पैसा कुठून आला याच्याशी त्याला काही कर्तव्य नसते. कदाचित गिऱ्हाईकाने दारू विकून तो पैसा घेतलेला असेल. तसे असेल तर गिऱ्हाईकाच्या हातातील नोटा व नाणी या म्हणजे खरे तर दारूच्याच मूल्याचा अवतार असतो. त्या गव्हाच्या मालकाच्या हातात येतात तेव्हा गव्हाच्या मूल्याची भूमिका उचलत असतात. पण नोटा व नाणी तीच असतात. गिऱ्हाईकाच्या हातात असेपर्यंत त्यांच्यावर 'दारू' ही अक्षरे लिहिलेली नसतात किंवा गव्हाच्या विक्रेत्याकडे आल्यावर 'गहू' असेही लिहिले जात नसते. विनिमयाचा आणि परस्परपूरक मूर्त श्रमांचा, परस्परांच्या गरजांचा संबंध तुटलेला असतो. संबंध असतो तो केवळ अमूर्त श्रमांचा. उत्पादन 'खाजगी' बनलेले असते, उत्पादक 'स्वतंत्र' बनलेले असतात. उत्पादनाचा उद्देशही परस्परांसाठी मूर्त श्रम करणे हा राहिलेला नसतो; उत्पादनाचा उद्देश बनलेला असतो मूल्य, अमूर्त श्रम मिळवणे. क्रयवस्तूंच्या

मागे लपलेले खाजगी, स्वतंत्र उत्पादनाचे सामाजिक संबंध केवळ एक संभाव्यता वा कल्पना म्हणून वावरत नसतात तर एक प्रत्यक्ष सामाजिक वास्तव बनलेले असतात.

घट्ट होत जाणारी सामाजिक वीण

पण म्हणून काही माणसांचे एकमेकांवरचे सामाजिक अवलंबित्व कमी झालेले नसते. उलट पैसा येतो तो माणसांना जास्त घट्टपणे एकमेकांशी बांधत येतो. पैसा सामाजिक संबंधांची एक घट्ट वीण घालत फिरत असतो. गव्हाचा विक्रेता एका गिऱ्हाईकाला चार किलो गहू विकतो, दुसऱ्याला दहा किलो, तिसऱ्याला वीस किलो, वगैरे. हे सगळे पैसे त्याच्या गल्ल्यात जमा होतात. आता कोणी हे सांगू शकत नाही की त्यावेळी ही नोट अमक्या गिऱ्हाईकाने आधी विकलेल्या दारूचे मूल्य दाखवते, ही दुसऱ्याने आधी विकलेल्या पुस्तकांचे, ही तिसऱ्याने घातलेल्या दरोड्यातून आलेल्या मालाचे मूल्य दर्शवते. तो गल्ल्यातला काही पैसा घेतो आणि तेल विकत आणतो, थोड्या इतर पैशांचे मीठ आणतो आणि कदाचित आणखी एखाद्या भागाने त्याच पूर्वीच्या गिऱ्हाईकाची दारूदेखील घेतो. त्याने विकलेल्या आणि विकत घेतलेल्या क्रयवस्तू निर्माण करणाऱ्या माणसांचे श्रम एकत्र विणले गेलेले असतात, एकमेकांवर अवलंबून असतात. या विणीत गुंतलेल्या एकाचा निर्णय सर्वांवर परिणाम करत असतो. दारुवाल्याने दारू विकायची थांबवली तर त्या पैशामुळे पुढच्या सगळ्या साखळीवर परिणाम होतो. प्राथमिक विनिमयामध्ये सुट्यासुट्या परस्परसंबंधांच्या फक्त जोड्या असतात. सबंध समाजातल्या सगळ्या उत्पादकांना एकत्र बांधणारी वीण घट्ट नसते. एकाचा निर्णय त्याच्या जोडीदारावर प्रभाव पाडत असतो. पण एका घट्ट विणीतून तो अनेकांवर परिणाम करत नसतो. पैसा आल्यावर मात्र क्रयवस्तूंचा व्यवहार करणारे सर्व जण सामाजिक अवलंबित्वाच्या एकाच घट्ट विणीत बांधले जात असतात.

आणि पैसा क्रयवस्तूंच्या देवघेवीच्या संबंधांचे उफराटे रूपदेखील प्रत्यक्षात आणत असतो. माणसांना वास्तविक जास्त जास्त घट्टपणे एकत्र बांधत जाणारे संबंध रूप घेतात ते मात्र त्यांना एकमेकांपासून जास्त जास्त दूर करण्याचे, वाढत्या खाजगी व्यवहाराचे. वाढते सामाजिक अवलंबित्व व्यक्त होते ते माणसांना एकमेकांपासून तोडून स्वायत्त, स्वतंत्र व्यक्ती म्हणून बाजारपेठेत पाठवण्यामधून. हा अंतर्विरोध पैसा आणि क्रयवस्तू यांच्या नात्यामध्येदेखील सापडतो. उदाहरणार्थ, मधाशी अभिसरणाचे माध्यम या पैशाच्या दुसऱ्या

भूमिकेतून 'पैशाचे मूल्य काय?' या प्रश्नाचे उत्तर आपण पाहिले. पैशाने त्याच्या सर्व भ्रमंतीत जितक्या वस्तूंना स्पर्श करून बाजारपेठेत फिरवले त्यांचे मूल्य पैशाचे मूल्य ठरवत असते. हादेखील या उफराट्या संबंधांचाच आविष्कार आहे. वेगवेगळ्या अनेक विनिमयमूल्यांची गडबडगर्दी आता नसते. त्याऐवजी प्रत्येक क्रयवस्तूला आता एकच एक किंमत असते. इतर क्रयवस्तूंशी तिचा काय संबंध आहे याचे या क्रयवस्तूला कर्तव्य नसल्याचा भास निर्माण होतो. तिचा व्यक्तिश: संबंध असतो फक्त पैशाशी. पैसा आणि एखाद्या क्रयवस्तूचे खाजगी नाते हेच त्या वस्तूच्या किंमतीचे रूप असते! पण त्याच्या मुळाशी मात्र असते 'सामाजिक' अवलंबित्व. कारण तिची किंमत ज्या पैशाशी खाजगी नाते जोडून मिळते, त्या खुद्द पैशाचीच 'किंमत' कशी ठरते? तर पैशाच्या सर्व क्रयवस्तूंशी असलेल्या नात्यामधून! म्हणजे एखादी क्रयवस्तू पैशाशी 'खाजगी' नाते जोडताना दिसते तेव्हा वस्तुत: ती सर्व क्रयवस्तूंशी 'सामाजिक' नाते जोडत असते!

खारटपणा रुपयांत मोजण्याचा वैचारिक आधार

पैशाच्या आधारे चालणाऱ्या क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये सामाजिक संबंध नेमके उलट्या रूपात व्यक्त होत असतात. त्यामुळे या वरवर दिसणाऱ्या रूपांमागच्या सामाजिक वास्तवाचे भान ठेवले नाही तर या फक्त दृश्य घडामोडींवरच आधारलेला एक उफराटा विचारही तयार होत असतो. पैशावर आधारला गेल्याने क्रयवस्तूंचा व्यवहार अशा विचारालाही जन्म देत असतो. उदाहरणार्थ, मागील प्रकरणामध्ये आपण उपयोग-मूल्य पैशात मोजणारा भांडवली सिद्धांत पाहिला होता. पैशावर आधारलेला क्रयवस्तूंचा व्यवहार जे दृश्य स्वरूप घेतो त्यातूनच हा भांडवली सिद्धांत उगवतो. गहू विकण्याचा व्यवहार बघा. एका बाजूला ४ किलो गहू आणि दुसऱ्या बाजूला १४० रुपये. गव्हाचे उपयोग-मूल्य काय हे सांगण्याची गरज नाही. पण त्याचे मूल्य? गव्हाच्या पोत्यातला '३५.०० रुपये' हा पुठ्ठा त्याचे मूल्य सांगत नसतो. तो सांगत असतो की हे गहू विकत घेऊ इच्छिणाऱ्या गिऱ्हाइकाच्या हातात किती मूल्य असायला पाहिजे! गिऱ्हाइकाच्या हातात रुपये असतात. क्रयवस्तू नसते, शुद्ध मूल्य असते. कारण पैसा खाता येत नाही, पिता येत नाही, की पांघरता येत नाही. क्रयवस्तूला असते तसे पैशाला उपयोग-मूल्य नाही! त्यामुळे गिऱ्हाइकाच्या हातात दिसते ते फक्त मूल्य, आणि विक्रेत्याच्या हातात दिसते ते फक्त उपयोगमूल्य. पैसा अस्तित्वातच नसेल तर दोघांच्या हातात क्रयवस्तू दिसतात. त्या दोन्ही

क्रयवस्तूंना मूल्यही असते आणि दोन्हींना उपयोग-मूल्यही असते. त्याऐवजी त्यांच्यामध्ये पैसा मध्यस्थ बनला की हा व्यवहार दिसू लागतो उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्या अदलाबदलीचा! या दृश्य स्वरूपाच्या पलीकडे असलेले वास्तव पाहिले नाही तर मिठाचे उपयोग-मूल्य पैशात मोजले जाताना दिसते. त्याच पैशाने पुढे चप्पलजोड खरेदी झाला तर त्याचेही उपयोग-मूल्यच मोजले जाते आहे असे वाटते व त्यावरून,

चार हजार किलो अन्नाला खारट चव देणे
= पायांचे दुखापतीपासून पाच-सहा महिने रक्षण करणे
= एक तासाच्या चार प्रवचनांमधला भक्तिमार्ग

असली समीकरणे आपण सहज मांडतो.

५. पैशाचे निर्णायक, स्वत:चे असे तिसरे कार्य

पैशाच्या आपण दोन भूमिका तपासल्या. पण त्याची आणखी एक निर्णायक महत्त्वाची भूमिका मात्र अजून बाकी आहे. तिचे मर्म समजायचे तर आपल्याला या पहिल्या दोन भूमिका बजावताना पैशाला प्राप्त होणाऱ्या मूल्याकडे जास्त खोलात जाऊन पहावे लागेल. मापदंडाच्या पहिल्या भूमिकेमध्ये पैशाचे कार्य वैचारिक होते. त्या भूमिकेची वास्तवातील मुळे आपल्याला अभिसरणाचे माध्यम या पैशाच्या दुसऱ्या भूमिकेत सापडली. या दुसऱ्या भूमिकेत पैशाचे मूल्य पूर्णपणे ठरले; रुपया ही किंमतीची मोजपट्टी व सामाजिक श्रमकाळ यांची सांगड घातली गेली असे दिसले. पण हे मूल्य पैशाचे स्वत:चे मूल्य नव्हते, ‘परप्रकाशित’ मूल्य होते हेही दिसले. मग पैशामध्ये दडलेली ‘स्वयंप्रकाशित’ मूल्य असलेली क्रयवस्तू शोधायची की इतक्यावरच समाधान मानायचे?

बहुतेक भांडवली अर्थशास्त्रज्ञ याच्या पलीकडे पहायची गरज नाकारतात. पैसा हे चलन, अभिसरणाचे माध्यम ही भूमिका त्यांना पुरते. जोपर्यंत सर्व काही सुरळीत चाललेले असते तोपर्यंत ती पुरतेदेखील. पण गोष्टी नेहमीच सुरळीतपणे चालत नाहीत. कधीकधी अचानक रुपया घसरू लागतो, डॉलर घसरू लागतो. त्यांचे आज ठरलेले समीकरण उद्या बिघडते. उद्या ठरलेले परवा बिघडते. असे होऊ लागले की या मोजपट्टीचे आणि अभिसरणातल्या ‘टोकनचे’ दारिद्र्य उघडे पडू लागते. चलनी ‘पैशाची किंमत’ नाहीशी होऊ लागते. कारण अशा काळात पैशाच्या तिसऱ्या, आपण आतापर्यंत न तपासलेल्या भूमिकेला महत्त्व येऊ लागलेले असते.

मूल्याचा साठा व मोबदल्याचे साधन

पैशाची ही तिसरी भूमिका आहे मूल्याचा साठा किंवा मोबदल्याचे साधन. जोपर्यंत पैसा या हातातून त्या हातात असा फिरत असतो, तोपर्यंत तो अभिसरणाचे माध्यम असतो. पण मी पैशाच्या गतीला खीळही घालू शकतो. मला पाहिजे तर मी पैसा तिजोरीत बंद करू शकतो. काही काळ साठवू शकतो. तो पैसा परत अभिसरणात उतरवून क्रयवस्तू विकत घेऊ शकतो. माझ्याकडची क्रयवस्तू उधारीवर विकून त्याचा मोबदला म्हणून काही काळाने मी पैसा घेऊ शकतो. क्रयवस्तू विकण्याअगोदर मी आगाऊ रक्कम पैशाच्या रूपाने मोबदला म्हणून घेऊ शकतो. जेथे जेथे म्हणून ती वस्तू गिऱ्हाइकाच्या हवाली करणे आणि गिऱ्हाइकाने विक्रेत्याला तिचे मूल्य देणे यामध्ये काळ गेलेला असतो, तेथे तेथे तितका काळ स्वत:मध्ये मूल्य साठवणारी, हा साठा स्वत:मध्ये टिकवून धरणारी गोष्ट म्हणून पैशाला कार्य पार पाडावे लागते. म्हणजेच मूल्याच्या साठ्याचे किंवा देणी भागवण्याच्या साधनाचे स्थान त्याला प्राप्त होते. येथे गिऱ्हाइकाकडून काही काळानंतर विक्रेता जो पैसा स्वीकारतो तो मोबदल्याचे साधन म्हणून. त्यामुळे क्रयवस्तूंचे अभिसरण होत असते हे खरे, पण अभिसरणाचे माध्यम म्हणून विक्रेता पैसा स्वीकारत नसतो. खरे तर पैसा हा मूल्याचा साठा म्हणून स्वीकारला जातो तेव्हाच तो अभिसरणाचे माध्यम म्हणून पार पाडायचे स्वत:चे कार्य बजावू शकतो. पैशाची ही तिसरी भूमिकाच त्याच्या दुसऱ्या भूमिकेचा आधार असते.

जोपर्यंत या खरेदी-विक्रीमधील दरम्यानच्या काळामध्ये पैशाचे परप्रकाशित मूल्य फारसे घसरत नसते किंवा चढत नसते तोपर्यंत गोष्टी सुरळीत चाललेल्या असतात. अभिसरणाचे माध्यम म्हणून वावरणारे सरकारी चलन तोपर्यंत मूल्याचा साठा म्हणूनही वावरू शकते. पैशाची दुसरी भूमिका ही तोपर्यंत त्याच्या तिसऱ्या भूमिकेच्या आड येत नसते. पण हे सुरळीत चालेनासे झाले की या दुसऱ्या भूमिकेमागे लपलेली तिसऱ्या भूमिकेची निर्णायक शक्ती जागी होते, जाणवू लागते. गिऱ्हाईक फार काळ हातात पैसा ठेवायला नाखूष होतात, विक्रेते पैसा स्वीकारायला नाखूष होतात. सोन्या-चांदीसारखे 'स्वयंप्रकाशित' मूल्याचे साठे जास्त महत्त्वाचे बनतात. पैशाच्या पहिल्या दोन भूमिका उभ्या असतात त्या सोने-चांदी यांच्यासारख्या मूल्याच्या ठोस साठ्यांच्या आधारावर. क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये सोने हे संपत्तीचा साक्षात अवतार बनते आणि त्याची स्वत:ची स्वायत्त शक्ती ही क्रयवस्तूंच्या व्यवहारात

महत्त्वाची नियंत्रक शक्ती बनते. ती व्यक्त होते ती पैशाच्या तिसऱ्या भूमिकेच्या निर्णायक महत्त्वामध्ये. जोपर्यंत पहिल्या दोन भूमिका या भूमिकेच्या आड येत नाहीत तोपर्यंत नोटा आणि नाणी यासारख्या चलनांचे महत्त्व कायम असते. जोपर्यंत स्वार्थ साधत असतो तोपर्यंत कुठलाच विक्रेता या कागदी घोड्यांना मूल्याचे साठे मानण्याच्या परमार्थाला हरकत घेत नाही. स्वार्थ उघडा पडतो अरिष्टांमध्ये; जेव्हा पैशाची दुसरी भूमिका आणि तिसरी भूमिका यांच्यात तेढ निर्माण होते त्यावेळी.[२]

६. पैशाच्या सुटसुटीतपणाची दुसरी बाजू

अरिष्टाची वाढणारी शक्यता

क्रयवस्तूंच्या व्यवहारात येणारी अरिष्टे आणि पैसा यांचा फार जवळचा संबंध आहे. पैसा हा क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये सुटसुटीतपणा आणतो इतकेच भांडवली अर्थशास्त्र प्रामुख्याने पाहते. पण त्याबरोबरच तो अरिष्टांच्या शक्यतादेखील घेऊन येत असतो. प्राथमिक विनिमयाच्या व्यवहारामध्ये भाग घेणाऱ्या दोन्ही बाजूंना परस्परांच्या गरजांची, त्यांच्या व्याप्तीची जाण असते. त्यांचे याबद्दलचे अंदाज परंपरेवरून व परस्परांशी समोरासमोर घडणाऱ्या सामाजिक व्यवहारांतून ठरलेले असतात. प्राथमिक विनिमयाला यामुळे एक स्थिरता आणि संथपणा असतो—जो नेमका पैसा नष्ट करतो.

पैसा मध्ये हजर झाला की विनिमयाच्या दोन्ही बाजूंचे हे परस्परपूरकत्व, परस्परसामंजस्य आणि एकमेकांच्या गरजांची असलेली पारख व माहिती गरजेची राहत नाही. उत्पादन होत असते ते अमूर्त गिऱ्हाइकांसाठी, बाजारपेठेसाठी. गरजा आणि उत्पादन यांच्यात नांदणारा सामाजिक मेळ बिघडण्याची एक निश्चित अशी शक्यता तयार होते. शिवाय आता क्रयवस्तू विकायची तर ती फक्त पैशाच्या मोबदल्यातच विकावी लागते. तेव्हा अशीही शक्यता निर्माण होते की मिठाचे उत्पादन भरपूर झाले आहे, तेलाचेही झाले आहे. मिठाच्या उत्पादकांना तेलाची गरज आहे, तेलाच्या उत्पादकांनाही मिठाची गरज आहे. पण दोघांच्याही हातात त्यांच्या क्रयवस्तू विकल्या न गेल्यामुळे पैसा आलेला नाही. आणि केवळ यामुळे मीठ वाया जाते आणि तेलही वाया जाते, आणि त्यांच्यात गेलेले सामाजिक श्रम, श्रमिकांच्या आयुष्याचा एक भागही फुकट जातो. थोडक्यात, क्रयवस्तूंमागील परस्परावलंबी गरजा एकमेकांच्या संदर्भापासून तोडत पैसा येत असतो.

पण त्याचवेळी पैसा करत असलेले दुसरे कार्य सगळ्या क्रयवस्तूंची एकत्र घट्ट वीणदेखील घालत असते! एखादा विनिमय कोलमडला की त्या साखळीचा भाग असणाऱ्या इतर सर्व व्यवहारांवर त्याचा परिणाम पोचतो. एका ठिकाणचे अरिष्ट लवकरच सर्वदूर पोचून मोठे अरिष्ट बनण्याची शक्यता तयार होते! आणि पैशाची तिसरी भूमिका काळाचीही तफावत निर्माण करत असते. उधारी आणि आगाऊ पैशांची देवघेव यांचा मेळ न बसल्यामुळेही अरिष्टाची शक्यता तयार होते. आणि एकदा अरिष्ट येऊ घातले की उरलेल्या उधारीची अचानक जोरदार वसुली सुरू होते. उरलासुरला मेळही संपुष्टात येऊन अरिष्ट तीव्र बनण्याची शक्यता तयार होते. थोडक्यात, आपल्या ज्या तीन भूमिकांमधून पैसा सुटसुटीतपणा आणत असतो, त्याच भूमिकांमुळे पैसा अरिष्टाच्या शक्यतादेखील घेऊन येत असतो.

बेगडी क्रयवस्तूंचा आधार

मोबदल्याचे साधन या पैशाच्या तिसऱ्या भूमिकेमधून एक नवा बांडगुळी संबंध उगवतो. ज्या गोष्टींमध्ये सामाजिक श्रमकाळ जाण्याचा प्रश्नच नसतो अशा अनेक गोष्टीदेखील क्रयवस्तू म्हणून मिरवू लागतात. या गोष्टी क्रयवस्तू नसूनही क्रयवस्तू म्हणून मिरवू शकतात याचे कारण क्रयवस्तूंचे स्वरूपच मुळी पैशाने उलटे करून सर्वांसमोर मांडलेले असते. दृश्य स्वरूपात क्रयवस्तूंचा समान गुणधर्म एकच दिसतो—जिच्या बदल्यात मोबदला म्हणून पैसा मिळतो अशी गोष्ट. तिच्यात श्रम गेलेले असोत की नसोत, तिला भौतिक वास्तवात पाया असो की नसो, ज्या गोष्टींबद्दल पैसा मिळतो त्या सर्व क्रयवस्तू नसल्या तरी क्रयवस्तू म्हणून मिरवू शकतात.

प्रामाणिकपणाचेच उदाहरण घ्या. वास्तविक, प्रामाणिकपणा हा माणसांच्या अंगचा स्वभावगुण असतो. तुम्ही प्रामाणिक असता किंवा नसता, तो तुमच्या विचारांच्या आंतरिक सुसंगतीचा प्रश्न असतो. तुम्ही त्यानुसार जगता. पण कोणी हा प्रामाणिकपणा बाहेर काढून दुसऱ्याला देऊ शकत नाही किंवा तो कमावण्यासाठी तुम्ही वेगळे सामाजिक श्रम घालत नाही. तो तुमच्या माणूस म्हणून जगण्याचा भाग असतो. तुम्ही जन्मल्यापासून ४ हजार श्रमतास प्रामाणिकपणा निर्माण करण्यात घातले असे म्हणण्याला काही अर्थ नसतो! प्रामाणिकपणा सामाजिक श्रमातून निर्माण झालेली वस्तू नसते व म्हणून क्रयवस्तूही नसते. प्राथमिक विनिमयामध्ये मीठ घेऊन तुम्ही तेल आणू शकता, पण प्रामाणिकपण घेऊन जाऊन त्याच्या बदल्यात तेल आणू शकत नाही! मात्र

हे पैसा आल्यावर बदलते. पैशाने प्रामाणिकपणा विकत घेता येऊ लागतो. अशा वेळी प्रामाणिकपणाचा अर्थही बदलतो. माणसांच्या वागण्याचा तो एक स्वाभाविक गुण न राहता पैशाला तो चिकटतो, बक्षिसीप्रमाणे तो कमीजास्त होतो. आणि जे प्रामाणिकपणाचे तेच फंदफितुरीचेही होते; सदसद्विवेकबुद्धीचे, उद्योजकतेचे, दयाबुद्धीचे, भक्तिमार्गाचे आणि इतर अनेक गोष्टींचे. सामाजिक श्रमांतून निर्मिती होण्याशी काही संबंध नसलेल्या या गोष्टी क्रयवस्तू म्हणून मिरवू लागतात, कारण त्यांच्या बदल्यात पैसा मिळतो!

या प्रकारच्या गोष्टींना क्रयवस्तूंचे केवळ रूप लाभते, त्यांचा आशय लाभलेला नसतो. खरे म्हणजे दोन क्रयवस्तूंचा विनिमय होतो तेव्हा दोन्ही बाजूंना सामाजिक श्रमकाळाचे साठे असतात. हा आशय या बेगडी, खोट्या क्रयवस्तूंच्या ठायी नसतो. केवळ पैसा आणि क्रयवस्तू यांच्या अदलाबदलीचे रूप त्यांच्या खरेदीविक्रीला असते. पण त्यापुढे गेले तर असे लक्षात येईल की एकाच बाजूला सामाजिक श्रमकाळाचा साठा असतो. या खोट्या क्रयवस्तू निर्माण होणे याचा अर्थ असतो श्रम न करता, अमूर्त श्रमकाळाचा प्रत्यक्ष साठा उलब्ध न करता, सामाजिक श्रमांतून निर्माण झालेल्या उत्पादनाचा काहीएक हिस्सा मिळवण्याच्या पद्धतीही तयार होणे. या बेगडी क्रयवस्तूंमार्फत केवळ समाजाची संपत्ती खर्च होत असते. या खोट्या क्रयवस्तू म्हणजे उत्पादक श्रमांचा स्त्रोत शोषून जगणारी बांडगुळे असतात. पण बांडगुळांप्रमाणेच त्यांना अगोदर जिथे क्रयवस्तूंचा व्यवहार पैशाच्या व्यवहारापर्यंत फुललेला आहे अशा अर्थव्यवस्थेच्या झाडाचा आधार लागतो. पैसा अशी बांडगुळेही पेरत असतो.[३]

७. पैशाचे मर्म कशात आहे?

पैशाच्या तिन्ही भूमिका आपण पाहिल्या. त्या भूमिकांचा आपसांमधला संबंधदेखील आपण पाहिला. या तिन्ही भूमिकांमागे क्रयवस्तूंचे स्पष्ट आकार घेत जाणारे, स्थिर होत चाललेले सामाजिक संबंधदेखील आपण पाहिले. साहजिकच पैसा म्हणजे या तीन भूमिका वठवणारी क्रयवस्तू असली पाहिजे असे वाटते. आणि पैशाशिवाय होणारा प्राथमिक विनिमय हा प्राथमिक समजायचे कारणदेखील स्वाभाविकपणे हेच वाटते की त्या विनिमयामध्ये या तीन भूमिका पार पाडणारी क्रयवस्तू नव्हती. पण हे स्वाभाविक वाटत असले तरी खरे नसते. किंवा जास्त काटेकोरपणे बोलायचे तर ते अर्धसत्य असते. कारण यात आपण असे गृहीत धरत आहोत की प्राथमिक विनिमयामध्ये

पैशाच्या तीन भूमिका पार पाडणारी क्रयवस्तूच नव्हती. आणि नेमके हेच गृहीत चुकीचे असते! हा मुद्दा जास्त खोलात जाऊन समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

यासाठी परत एकदा आपल्याला प्राथमिक विनिमयामध्ये शिरावे लागेल. आपला गव्हाचा मालक चार किलो गहू घेऊन एक किलो तेल घेऊन येणाऱ्या तेलाच्या मालकाशी विनिमय करत आहे. आता आपण या गव्हाच्या मालकाला थांबवून काही प्रश्न विचारू या. काय रे, तुझ्या गव्हाचे मूल्य मोजायला तू कोणती मोजपट्टी वापरलीस? तुझ्या गव्हामध्ये गेलेले श्रम तू अनुभवण्याजोग्या, समजण्याजोग्या रूपात कसे आणलेस? अर्थातच तेलाचा मापदंड वापरून. कारण चार किलो गव्हाचे विनिमय-मूल्य एक किलो तेलात व्यक्त झाले. या विनिमयामध्ये हुज्जत घालायला आधार होता गव्हाचे तेलात मोजलेले मूल्य. बरे, तुझ्या हातातले गहू तू दिलेस तेव्हा त्याच्या मूल्याचे प्रतिनिधित्व करणारे काही तरी तुझ्या हातात यायला पाहिजे, ते काय आले? पुन्हा उत्तर तेच, तीच क्रयवस्तू—तेल. आणि या हातात आलेल्या क्रयवस्तूचा तू मूल्याचा साठा म्हणून उपयोग करू शकशील काय? तो म्हणेल, अर्थातच. मी ते तेल ठेवून देईन आणि एक महिन्याने मीठ खरेदी करण्यासाठी किंवा सणासुदीला साखर किंवा इतरही काही आणायला वापरू शकेन.[४]

या उलटतपासणीवरून एक गोष्ट स्पष्ट होते की या प्राथमिक विनिमयामध्ये गव्हाच्या संदर्भात तेलाने पैशाच्या तिन्ही भूमिका पार पाडल्या आहेत. आपण तेलाच्या मालकाची उलटतपासणी घेतली असती तर तेलाच्या संदर्भात गव्हाने पैशाच्या तिन्ही भूमिका वठवल्याचे आपल्याला आढळले असते. प्राथमिक विनिमयामध्ये सर्व क्रयवस्तू आपल्यासमोरील क्रयवस्तूच्या संदर्भात पैशाच्या तिन्ही भूमिका पार पाडत असतात. मग प्राथमिक विनिमय आणि पैशावर आधारलेला विनिमय यांच्यात फरक कोणता? प्राथमिक विनिमयामध्ये पैशाची भूमिका बजावण्याचा अधिकार सर्व क्रयवस्तूंना असतो. इतर सर्व क्रयवस्तूंकडून पैशाच्या तिन्ही भूमिका करण्याचे अधिकार काढून घेतले जाणे व ते फक्त एकाच क्रयवस्तूची मक्तेदारी बनणे यात पैशाचे मर्म असते. केवळ त्याच्या तीन भूमिकांमध्ये नसते. आणि या क्रयवस्तूलाच आपण म्हणतो पैसा! थोडक्यात, भांडवली विचारानुसार प्राथमिक विनिमयात पैशाची भूमिका बजावणारी क्रयवस्तूच नसते, ती नंतर तयार होते. या उलट मार्क्सच्या दृष्टीने मात्र प्राथमिक विनिमयात सर्व क्रयवस्तू विनिमयातल्या त्यांच्या जोडीदारासाठी

पैशाची भूमिका बजावत असतात. इतर सर्व वस्तूंचे अधिकार काढून घेऊन ते स्वत:त सामावून घेऊन पैसा तयार होतो.

भांडवली विचारवंत आणि मार्क्समधील ही दरी, पैसा का निर्माण होते या प्रश्नाच्या त्यांच्या उत्तरातही दिसते. पैसा नसतो तेव्हा व्यवहार सुटसुटीत नसतो आणि तो आला की सुटसुटीत होतो तेव्हा भांडवली अर्थशास्त्राचे उत्तर असते की व्यवहारात सुटसुटीतपणा येण्यासाठी पैसा निर्माण होतो. पण हे नेमके उफराटे उत्तर असते. सुटसुटीतपणा हा पैशाचा परिणाम असतो, कारण नव्हे. पैसा का निर्माण झाला हा प्रश्न विचारणे म्हणजे खरे तर हा प्रश्न विचारणे आहे की, इतर सर्व क्रयवस्तूंकडून पैशाच्या भूमिका वठवण्याचे अधिकार काढून घेतले जाऊन ते एकाच क्रयवस्तूंकडे सुपूर्द का होतात? भांडवली विचारवंत या मूळ प्रश्नापर्यंतच पोचत नाहीत, तेव्हा त्यांच्याजवळ त्याचे उत्तर काय असणार!

मार्क्सजवळ या प्रश्नाचे उत्तर आहे. क्रयवस्तूंचे विभूतिकरण या संकल्पनेत ते सापडते. अमूर्त श्रम हा सर्व क्रयवस्तूंमध्ये आढळणारा समान गुणधर्म आहे खरा. पण तो व्यक्त व्हायचा असेल तर तो सरळपणे व्यक्त होऊ शकत नाही. कोणत्या तरी एखाद्या क्रयवस्तूचा तो गुणधर्म बनतो. ही क्रयवस्तू निखळ अमूर्त श्रमांचा अवतार बनते. अमूर्त श्रमांच्या समानतेशी संबंधित सर्व कामे साहजिकच या क्रयवस्तूची, या खास अवताराची कामे बनतात. इतर क्रयवस्तू 'केवळ' अमूर्त श्रम व्यक्त करत असतात, तर ही खास क्रयवस्तू या अमूर्त श्रमांची 'समानता' व्यक्त करत असते. क्रयवस्तूंमधील समानता व्यक्त करणे, म्हणजेच मूल्य हा गुणधर्म व्यक्त करणे हे कोणत्या तरी एका क्रयवस्तूच्या विभूतिकरणातूनच होऊ शकते. त्यामुळे पैसा निर्माण होतो व त्याचा परिणाम म्हणून विनिमय व्यवहारांमध्ये सुटसुटीतपणा येत असतो.

८. पैशाची जन्मकथा : मूल्याची बदलती रूपे

सुटसुटीतपणासाठी पैशाचा जन्म झाल्याच्या सोप्या उत्तरामुळे भांडवली अर्थशास्त्र पैशाच्या जन्मकथेची दंतकथा बनवते. जणू काही कोणे एके काळी काही बुद्धिमान मंडळी एकत्र जमतात आणि ठरवतात की आपण ही तीन कामे करायला एखादी वस्तू राखून ठेवली तर गोष्टी किती सुटसुटीत होतील, आणि मग पैशाचा जन्म होतो! पैशाच्या खऱ्या जन्मकथेमध्ये मात्र सुटसुटीतपणाबद्दल माणसांनी जाणीव पूर्वक केलेल्या अशा विचाराला फारसे स्थान नसते. तसे असते तर कधी गायी, कधी गुलाम, कधी मीठ इतक्या विविध वस्तूंना

निरनिराळ्या ठिकाणी पैशाचे स्थान आले नसते. ही काय पैशाची सुटसुटीत रूपे आहेत? पैसा खरा चोरपावलांनी जन्म घेतो. क्रयवस्तूंचा व्यवहार वाढत वाढत स्थिर होऊ लागला की पैसा आपोआप उदयाला येतो आणि हे आपोआप कसे होऊ शकते ते आपण मार्क्सने केलेल्या संकल्पनांच्या मांडणीच्या आधारे तपासू शकतो.

प्राथमिक रूप

विनिमयाचा व्यवहार सुरू होतो तो अगदी प्राचीन काळी, छोट्या छोट्या आणि सुट्या उत्पादनव्यवस्थांच्या सीमांवर व त्या अलग उत्पादनव्यवस्थांना एकत्र बांधत. उदाहरणार्थ, एखादी टोळी राहत असते त्या ठिकाणी तांब्याची खनिजे उपलब्ध असतात पण मीठ नसते. दुसऱ्या एखाद्या टोळीचा परिसर नेमका उलटा असतो. मीठ असते पण तांब्याची खनिजे नसतात. या टोळ्यांच्या अर्थव्यवहाराच्या सीमांवर तांबे व मीठ यांचा विनिमय सुरू होतो.

अमुक मीठ ↔ अमुक तांबे
(क्ष) (य)

मीठ व तांब्याचे असे एक निश्चित प्रमाण रूढ होते. पण हे सर्वसाधारणपणे होणाऱ्या विनिमयातून निर्माण झालेल्या अनेक प्रमाणांतले एक प्रमाण असे नसते. अमुक मीठ = किती गहू, हा प्रश्नच इथे गैरलागू असतो; कारण गहू ही अजून मुळी विनिमयाची गोष्टच बनलेली नसते. विनिमय हा आकस्मिक, अपवादात्मक व्यवहार असतो. अमुक मीठ = अमुक तांबे हे एकांडे प्रमाणच फक्त त्यावेळी तिथे वैध असते, त्यालाच सामाजिक वास्तव असते. मूल्याच्या या रूपाला आपण प्राथमिक रूप म्हणू शकतो.

विस्तारित रूप

या टोळ्यांचे आपसांतले संबंध वाढले, जास्त टोळ्यांशी हा व्यवहार होऊ लागला की एकाच गोष्टीचा विनिमय अनेक गोष्टींशी होऊ लागतो. उदाहरणार्थ, मधाची टोळी तांबे देऊन एका टोळीकडून मीठ घेते. तसेच दुसऱ्या टोळीकडून तिखट, कदाचित तिसरीकडून हस्तिदंत वगैरे घेऊ लागेल. कधी कधी हे व्यवहार वाढले तर टोळीच्या अंतर्गतही काही गोष्टींचा विनिमय सुरू होतो. तांबे आणि कापड, तिखट आणि हस्तिदंत अशाही जोड्या लागतात. क्रयवस्तूंच्या विनिमयातल्या प्रमाणांची एक साखळी तयार होते. उदाहरणार्थ,

क्ष तांबे ↔ य मीठ, किंवा झ तिखट, किंवा अ हस्तिदंत,
किंवा व कापड वगैरे.

यावरून केवळ गणिती विचाराने कदाचित आपण य मीठ = झ तिखट असे प्रमाण मांडू. पण ते त्या वेळी तिथे वैध ठरेल की नाही हे त्या समाजातल्या रूढ संबंधांवर अवलंबून राहील. उदाहरणार्थ, क्ष तांबे = य मीठ, क्ष तांबे = ब कापड हे वैध असेल आणि तरीही या मीठ = व कापड हे वैध नसेल. कारण मिठाच्या बदल्यात कापडाचा विनिमयच होत नसेल. याचाच अर्थ त्या समीकरणाला सामाजिक वास्तवात जागा नसेल. विनिमय–मूल्यांच्या या साखळीला आपण मूल्याचे विस्तारित रूप म्हणू शकतो.

सर्वसाधारण रूप

विस्तारित रूप तयार होऊन विकसित होऊ लागले की साहजिकच बहुतेक विनिमयामध्ये भाग घेणाऱ्या एखाद्या वस्तूची ही वैध साखळी आपोआपच सर्वात लांब असेल. नवे विनिमयाचे व्यवहार घडवताना, क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या विकासामध्ये तिला निर्णायक महत्त्व येत जाईल. उदाहरणार्थ, मीठ आणि कापड यांचा विनिमय सध्या अवैध आहे. पण गरजेपोटी, आपद्धर्म म्हणून तो कुणाला तरी करणे भाग पडते आहे. ते प्रमाण कसे ठरवणार? या दोन्हींचा तांब्याशी विनिमय हा त्याचा आधार ठरेल. आणि त्यावरून य मीठ = ब कापड हे प्रमाण तयार होईल. हळूहळू सर्व वस्तूंच्या मूल्याला त्या समाजापुरते एक सर्वसाधारण रूप येऊ लागेल व आता खालील समीकरणे बनतील व ती विनिमय–संबंधांना आधारभूत बनतील.

एक मीठ ↔ क्ष/य तांबे
एक तिखट ↔ क्ष/झ तांबे
एक हस्तिदंत ↔ क्ष/अ तांबे
एक कापड ↔ क्ष/ब तांबे

मूल्याच्या या रूपामुळे या समाजपुरते तांबे हे मोबदल्याचे साधन व त्यामुळे अभिसरणाचे माध्यम बनू लागेल. म्हणजे त्या समाजापुरता पैशाचा जन्म झालेला आहे. पण लक्षात घ्या. घटनेचा तांब्याच्या सुटसुटीतपणाशी काही एक संबंध नाही. तांबे ही जागा घेईल याचे कारण इतकेच की त्याचा विनिमय सर्वात जास्त होत होता. त्या त्या परिसराप्रमाणे व समाजव्यवस्थेप्रमाणे कुठे हे

काम तांबे करेल, कुठे गायी, कुठे मीठ, कुठे गुलाम. पैशाची सर्व बीजे असणाऱ्या या मूल्याच्या रूपाला आपण मूल्याचे सर्वसाधारण रूप म्हणू शकू.

सार्वत्रिक रूप

निरनिराळ्या समाजांमध्ये रूढ झालेल्या या सर्वसाधारण रूपांमधून सोने ही क्रयवस्तू मूल्याचे सार्वत्रिक (युनिव्हर्सल) रूप म्हणून उदय पावते. मूल्याचे सर्वसाधारण (जनरल) रूप म्हणून वावरणाऱ्या क्रयवस्तूंना केवळ त्या त्या समाजातच अमूर्त श्रमांच्या अवताराचे स्थान असते. सार्वत्रिक पातळीवर हे काम करू शकण्याची क्षमता असणारी क्रयवस्तू मग सार्वत्रिक पैशाच्या स्थानावर स्थापन होऊ लागते. यासाठी लागणारे गुण व क्षमता सोने या पदार्थात असते. छोट्या आकारमानात भरपूर मूल्य साठवणारी, टिकाऊ, सहज विभागता येण्यासारखी, कुठल्याही समाजातल्या दैनंदिन उपयोग-मूल्यांच्या उत्पादनाचा महत्त्वाचा भाग नसलेली, अशी ही क्रयवस्तू सर्वार्थाने मूल्याचे सार्वत्रिक रूप बनण्यास लायक ठरते. सार्वत्रिक पातळीवर एका क्रयवस्तूकडे पैशाचे अधिकार पोचतात आणि पैशाची जन्मकथा पूर्ण होते.

पैशाची ही जन्मकथा समजून घ्यायची तर त्यासाठी क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाची पारख असावी लागते. आणि नेमके हेच भांडवली अर्थशास्त्रज्ञांच्या वर्गजाणिवेपलीकडचे असते. आणि पैसा जन्माला आल्यावर तर या विभूतिकरणाचा गुणाकार झालेला असतो. सामाजिक संबंध क्रयवस्तूंच्या आड लपलेले असतात, तर क्रयवस्तूंचे संबंध आता पैशाच्या आड लपलेले असतात! बाजारपेठेतील व्यवहाराचे दृश्य स्वरूप व त्यामागे दडलेले सामाजिक संबंध यामध्ये आणखी एक पडदा तयार झालेला असतो. क्रयवस्तूंमागील सामाजिक वास्तव गवसणे आणखी कठीण बनलेले असते. भिंतीमागे भिंती असलेल्या या तुरूंगाने माणसांना त्यांच्या सामाजिक उत्पादन-व्यवहारापासून तोडून त्या भिंतीमधून त्या व्यवहाराचे एक उफराटे दर्शन घडवलेले असते. पैसा म्हणजे क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाचा गुणाकार असतो. आणि विभूतिकरण ही संकल्पना इथे अगदी चपखल बसते. कारण नैसर्गिक शक्तींमध्ये प्राण फुंकून त्यांचे विभूतिकरण माणसे करतात खरी, पण त्या विभूतींशी नाते जोडायला मात्र त्यांना पुरोहित किंवा मांत्रिकाचीही त्यामुळे तितकीच गरज असते. पुरोहिताच्या किंवा मांत्रिकाच्या अंगी असलेली दैवी शक्ती ही या आदिम विभूतीकरणाचीच दुसरी बाजू असते. क्रयवस्तूंचे

विभूतिकरणदेखील त्यासारखेच व्यक्त होते ते पैशाच्या खास विभूतिकरणामधूनच!

त्यामुळेच पैशाचे हे दुप्पट उफराटे रूप क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये सुटसुटीतपणा आणते. क्रयवस्तूंचा व्यवहार, त्यांचे विभूतिकरण स्थिर झाल्याचे लक्षण म्हणून पैसा अस्तित्वात येतो. पण एकदा तो अस्तित्वात आला की क्रयवस्तूंमागील संबंधांच्या आशयाला अनुरूप असे रूपही मिळते. क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या वाढीचेही पैसा हे एक साधन बनते. केवळ, वाढीचे नव्हे तर विकासाचे, गुणात्मक बदलाचेही पैसा हे एक साधन बनते. क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये नव्या शक्यता, नव्या प्रेरणा, नव्या सामाजिक थरांचीही वाढ होते. आपल्या विश्लेषणाचा पुढचा टप्पा आपल्याला या नव्या शक्यतांमार्फत स्पष्टपणे भांडवलाच्या प्रश्नाकडे घेऊन जाताना दिसेल.

---

१ एक बारकाव्याची पण महत्त्वाची गोष्ट इथे नमूद केली पाहिजे. कॅपिटलमध्ये मार्क्स गणितातले नेहमीचे '=' हे चिन्ह वापरतो. त्याऐवजी इथे '$\leftrightarrow$' हे चिन्ह वापरलेले आहे. याचे कारण लक्षात घेतले पाहिजे. क्रयवस्तू अ आणि ब यांच्यात होणाऱ्या विनिमयाचे एकंदर स्वरूप दिसते ते क्ष क्रयवस्तू अ = य क्रयवस्तू ब. परंतु यात दोन संबंध अभिप्रेत आहेत व ते मिळून हा वरील संबंध घडतो. क्रयवस्तू अ च्या (मालकाच्या) दृष्टीने हा विनिमय क्ष क्रयवस्तू अ $\rightarrow$ य क्रयवस्तू ब असा आहे तर क्रयवस्तू ब च्या (मालकाच्या) दृष्टीने तो क्ष क्रयवस्तू अ $\rightarrow$ य क्रयवस्तू ब असा आहे. ते दोन्ही मिळून वरील '$\leftrightarrow$' अशा चिन्हाने दर्शविलेला एकंदर संबंध मांडता येतो. बाणाच्या टोकाकडचे स्थान व शेपटीकडील स्थान वेगवेगळे असते. या दोन्ही स्थानांना मार्क्स वेगवेगळी नावेही देतो. शेपटीकडील क्रयवस्तूचा विनिमय होत असतो व तिचे मूल्य सापेक्ष रूपात (रेलेटिव्ह फॉर्म) असते. तर टोकाकडील क्रयवस्तूशी विनिमय होत असतो, व तिचे मूल्य समानता दर्शक रूपात (इक्विव्हॅलंट फॉर्म) असते. मूल्याच्या या समानतादर्शक रूपातच पैशाची बीजे असतात. हा एकदिश संबंध पूर्णपणे स्पष्ट व्हावा म्हणून आम्ही तो चिन्हात अंतर्भूत केला आहे.

२ मार्क्स आपल्या विश्लेषणामध्ये पैशाच्या तिसऱ्या भूमिकेमध्ये सोने ही क्रयवस्तूच पैसा म्हणून वावरते आहे असे धरून चालतो. आज असे धरून चालता येत नाही. अर्थात, अजूनदेखील आंतरराष्ट्रीय चलनव्यवहार सोन्यापासून पूर्णपणे तोडायचे प्रयत्न यशस्वी झालेले दिसत नाहीत. त्यामुळे या फरकाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. पण मार्क्सच्या विचारांची बैठक समजून घेण्यासाठी ते महत्त्वाचे नाही आणि म्हणूनच त्यासंबंधीच्या चर्चेचा पुस्तकात समावेश केलेला नाही.

तरीही काही गोष्टींची निदान नोंद घेणे आवश्यक आहे. मार्क्स हा त्याच्या पैशाच्या प्रकरणापर्यंत पैशाच्या भांडवल या नंतर येणाऱ्या स्थानाची तपासणी करत नाही, कारण भांडवल या प्रकारालाच अजून सैद्धांतिक आधार तयार झालेला नाही. अर्थात भांडवली उत्पादनाची तपासणी पूर्ण केल्यानंतर पैशाला भांडवल म्हणून वापरले जाणारे चौथे कार्यही लाभते आणि भांडवलशाहीमध्ये ते या तिन्ही कार्यांवर नियंत्रक कार्य ठरते. तिसऱ्या भूमिकेत साक्षातपणे सोन्याशी संबंध असणे हे या चौथ्या कार्याच्या नियंत्रणामुळे गौण बनते.

त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवर भांडवली शासनामार्फत या चौथ्या कार्याचे नियंत्रण होण्याचा काळ मक्तेदारी अवस्थेबरोबर उगवणाऱ्या वित्त भांडवलाच्या प्रभुत्वामुळे सुरू होतो. नवस्वतंत्र देशांसकट सर्व भांडवली राष्ट्रांमध्ये भांडवली शासनाची व वित्त व्यवहाराची ठोस सांगड घातली जाते व त्यामार्फत वित्त-भांडवल पैशाच्या तिसऱ्या कार्याचे नियंत्रण करते. भांडवली शासनाचे सशस्त्र बळ जर चलनी नाण्याचा सामाजिक उत्पादनावरील, मूल्याच्या साठ्यावरील अधिकार प्रस्थापित करू शकत असेल तर पैशाची तिसरी भूमिका पार पाडायला प्रत्यक्ष सोने ही क्रयवस्तू असण्याची गरज रहात नाही.

पैशाच्या यापूर्वीच्या स्थानाचे प्रतिबिंब आपल्याला त्या काळातील चलनाच्या बाबतीत दिसते. मार्क्सच्या काळात शासन हे चलनाच्या दर्शनी मूल्याच्या बदल्यात विवक्षित दराने सोने किंवा चांदी देण्यास बांधील असे. मक्तेदारी अवस्थेमधील वित्त-भांडवलाच्या प्रभुत्वानंतर अशी बांधिलकी ही एक बंधनदेखील ठरू शकते. उदाहरणार्थ, विवक्षित दराने चलनफुगवटा होणे (दर्शनी मूल्य व सोने यांचा संबंध बदलता असणे) यातून पैशाच्या रूपात लागणाऱ्या भांडवलाची मागणी वाढू शकते. त्यामुळे वित्त-भांडवलाच्या प्रभुत्वानंतर अशी बांधिलकी आवश्यक रहात नाही. अर्थात त्यामुळे पैशाच्या तिसऱ्या भूमिकेमुळे होणारे नियमन नाहीसे होत नाही, पण त्याचे माध्यम बदलते. आज परिस्थिती अगदी पराकोटीला गेली तरच चलन कोसळते, नाहीतर बहुधा शासन चालवणारे सरकार कोसळते. सरकार आणि सरकारी धोरणे यांच्या नियमनाच्या माध्यमातून हे नियमन व्यक्त होते.

भांडवली शासनाच्या स्वरूपाच्या मर्यादा याला अर्थातच पडतात. भांडवली शासनाची सत्ता शेवटी भांडवली शासनाच्या राष्ट्रीय संघटनांपाशी अडते. देशांतर्गत चलने ही सोन्याच्या जाचातून मुक्त होतात. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहार होतो तेव्हा सोन्याची बांधिलकी पूर्णपणे नाहीशी करण्याचे प्रयत्न मात्र सतत कोलमडून पडताना दिसतात.

शासन आणि पैसा यांची ही अतूट सांगड मार्क्सच्या दृष्टीने अपघात ठरत नाही. त्यांच्यात एक ठोस आंतरिक संबंधही असतो. स्वतंत्र, स्वायत्त क्रयवस्तूंचा

आपापसातला सामाजिक संबंध पैशात गोठत असतो, तर स्वतंत्र, स्वायत्त नागरिकांचा आपापसातला राजकीय संबंध शासनात गोठत असतो! पैसा आणि शासन अनुक्रमे माणसांच्या आर्थिक आणि राजकीय व्यवहारांच्या सामाजिकतेचा खाजगी आविष्कार असतो आणि भांडवलशाहीचा विकास या सामाजिकतेच्या आर्थिक व राजकीय प्रतिबिंबांची पक्की गाठ घालतो!

[३] कॅपिटलच्या पहिल्या खंडातील पैशाच्या प्रकरणामध्ये या बांडगुळी संबंधांचे वर्णन समाविष्ट आहे. परंतु ते इतक्या सहजतेने आले आहे की वाचकाला त्याचे सैद्धांतिक महत्त्व मात्र सहजपणे उमजत नाही. कारण शेवटी नफ्याचा संबंध हा या बांडगुळी संबंधांच्या आधारावरच उभा राहतो. मार्क्सचे नफ्याबद्दलचे जगजाहीर उत्तर आपण लवकरच तपासणार आहोत. त्याच्या मते नफा हा कामगारांकडून विनामोबदला काढलेल्या वरकड-मूल्यातून येतो. पण त्यामुळे एक सैद्धांतिक प्रश्न उभा राहतो. हा विनामोबदला व्यवहार हा क्रयवस्तूंच्या अदलाबदलीच्या व्यवहाराच्या रूपात व्यक्त व्हावा लागतो. तो या बांडगुळी रूपातून उभा राहू शकतो. ज्याप्रमाणे प्रामाणिकपणा, अब्रू, सद्‌सद्‌विवेकबुद्धी यांना क्रयवस्तूंचे केवळ रूप येते, त्याप्रमाणे नफ्यामागे भांडवली अर्थशास्त्र अशा क्रयवस्तू उभ्या करते. भांडवलदारांच्या 'उद्योजकतेच्या' किंवा पैसा खर्च न करता गुंतवण्याच्या 'त्यागाच्या' किंवा तत्सम बेगडी क्रयवस्तूंना एका बाजूला उभे करून नफा हा त्यांचा मोबदला म्हणून चिकटविणे त्यांना भाग पडते. हीच गोष्ट व्याज, भाडे इत्यादी विनामोबदला व्यवहारालाही लागू पडते. त्याचबरोबर ही व्याख्या उलट्याही दिशेने काम करते. ज्या वस्तूच्या बदल्यात पैसा दिला जाऊ शकत नाही, किंवा जात नाही त्या गोष्टी आणि त्यात गेलेले श्रम हे आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्राबाहेरचे, अनुत्पादक आणि बिनमहत्त्वाचे ठरतात. याचा गंभीर परिणाम स्त्रियांच्या प्रश्नाशी निगडित आहे व त्याचा थोडाफार समाचार आपण स्त्रियांच्या घरकामासंबंधीच्या परिशिष्ट ४ मध्ये घेणार आहोत.

[४] यात इतकेच अभिप्रेत आहे की पैशाच्याच मोबदल्यात क्रयवस्तू विकल्या जातात ही पैशाबरोबर येणारी सक्ती क्रयवस्तूंवर नाही. प्रत्यक्षात तेलाच्या बदल्यात साखर, मीठ इत्यादी मिळतीलच की नाही हे पैशाच्या जन्मकथेत पुढे वर्णन केलेल्या टप्प्यावर अवलंबून राहील. थोडक्यात, पैशाने आपले तंगडे अपरिहार्यपणे प्रत्येक विनिमयात घुसवलेले नाही ह्यापलिकडे काहीही अभिप्रेत धरलेले नाही.

३. मूल्यातून उगवणारे वरकड–मूल्य

तुम्ही कधी लहान मुले खेळतात तो एक खेळ पाहिलायत का? दोन–तीन मुले मिळून, त्यांना मिळालेल्या नव्या माहितीत सामील नसलेल्या एखाद्या मुलाला पकडतात आणि त्याला 'राम–राम–राम...' म्हणायला सांगतात. मग तो बिचारा म्हणत असतो आणि ही मुले हसत असतात. कारण तो 'राम–राम–राम...' म्हणता म्हणता 'मरा–मरा–मरा...' असेही म्हणत असतो हे त्या मुलांना उगमलेले असते. रामासारखी देवता आणि मरणासारखी अभद्र गोष्ट या परस्परविरोधी गोष्टी एकमेकांच्या पुनरावृत्तीचा भाग असाव्यात याचे त्यांना नवल वाटत असते. केवळ पुनरावृत्तीतून येणारी ही विसंगत कलाटणी त्यांच्या खेळाचा व त्यातील गंमतीचा आधार असते.

१. अभिसरणाला मिळणारी कलाटणी

एकाच साखळीमागे दडलेले दोन आलेख

क्रयवस्तू आणि पैसा यांच्या बाजारपेठेतील खेळातून तयार होणाऱ्या साखळीतदेखील अशीच एक कलाटणी लपलेली असते. ही साखळी क्रयवस्तू आणि पैसा यांच्या आलटून पालटून येणाऱ्या दुव्यांनी बनलेली दिसते. म्हणजे,

. . . क्रयवस्तू–पैसा–क्रयवस्तू–पैसा–क्रयवस्तू–पैसा . . .

आपण क्रयवस्तूंच्या अभिसरणाच्या दृष्टीने या साखळीची फोड करून ती समजून घेताना तीन दुव्यांनी बनलेली एक साखळी आधीच्या प्रकरणात तपासली होती. तेव्हा क्रयवस्तूंच्या अभिसरणातून आपल्याला दिसलेला हा पहिला आलेख होता:

क्रयवस्तू → पैसा → क्रयवस्तू (पहिला आलेख)

पण याच साखळीकडे पाहून क्रयवस्तूंच्या अभिसरणाचा दुसराही एक आलेख आपण काढू शकतो, तो असा,

पैसा → क्रयवस्तू → पैसा (दुसरा आलेख)

हे दोन आलेख म्हणजे क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या एकाच साखळीमध्ये दडलेल्या दोन वेगळ्या सामाजिक प्रेरणांची, दोन वेगळ्या शक्तींची व पैशाच्या दोन वेगवेगळ्या स्थानांचीच चित्रे असतात.

तुमचा–आमचा व त्यांचा आलेख

यापैकी पहिला आलेख (क्रयवस्तू → पैसा → क्रयवस्तू) हा तुमच्या-आमच्यासारख्या बहुसंख्य सामान्य माणसांच्या आयुष्यात पैशाला जे स्थान असते त्याचे वर्णन करतो. त्यांना महत्त्वाच्या वाटत असतात त्या त्यांच्या गरजा भागवणाऱ्या क्रयवस्तू. भांडवली समाजात त्या विकत घ्यायच्या तर पैसा मिळवल्याशिवाय गत्यंतर नसते. कारण सगळ्याच गरजेच्या वस्तू क्रयवस्तू बनलेल्या असतात, आणि त्या ताब्यात यायच्या तर त्यांचा जोडीदार असणारा पैसा हातात असणे आवश्यक असते. पैसा हे त्यांचे ताबडतोबीचे साध्य असले तरी त्यांच्या जीवनात त्याचे खरे स्थान असते दुसऱ्या क्रयवस्तू विकत घेण्याचे साधन म्हणून. पैशाला त्यांच्या जीवनात स्थान असते ते अभिसरणाच्या माध्यमाचे आणि यासाठी पैशाचे मूल्याचा साठा हे रूप त्यांचे साधन असते.

दुसरा आलेख (पैसा → क्रयवस्तू → पैसा) मात्र ज्या पैशाच्या स्थानाचे वर्णन करतो ते नेमके याच्या उलटे असते. ज्यांच्या आयुष्यात पैशाला हे दुसरे स्थान असते त्यांच्या दृष्टीने या पूर्ण साखळीचे साध्यच असते पैसा. क्रयवस्तूंचे अभिसरण, देवघेवीचा व्यवहार हे यासाठी त्यांचे साधन असते. त्यांचा मूळ उद्देश असतो पैसा करणे.

पहिल्या आलेखाप्रमाणे व्यवहार करणारी सर्वसामान्य माणसे आलेखाची सुरुवात करतात क्रयवस्तूपासून, आणि त्या आलेखाचा शेवट होतो तोही

क्रयवस्तूपाशी—पण एका वेगळ्या क्रयवस्तूपाशी. जास्त काटेकोरपणे हा आलेख मांडायचा झाला तर तो खालीलप्रमाणे मांडावा लागेल:

क्रयवस्तू१ $\rightarrow$ पैसा $\rightarrow$ क्रयवस्तू२

सुरुवातीची आणि शेवटची क्रयवस्तू या दोन गुणात्मकरीत्या वेगळ्या वस्तू असतात. विकायला काढलेली क्रयवस्तू त्यांच्या आजच्या गरजा भागवू शकत नसते. त्याऐवजी या आलेखाच्या शेवटी येणारी वेगळी क्रयवस्तू ही त्यांच्या गरजा भागवू शकते. सुरुवातीच्या व शेवटच्या क्रयवस्तूंचे गरजांशी असणारे वेगवेगळे नाते त्यांना खेचत असते व हा आलेख पार पाडण्यास भाग पाडत असते.

पण जी मंडळी या दुसऱ्या आलेखाप्रमाणे व्यवहार करत आहेत त्यांचे काय? सुरुवातीचा पैसा आणि शेवटचा पैसा यांच्यात गुणात्मक फरक तो काय असणार? हा पैसा अमुक गरज भागवू शकतो पण तमुक गरज भागवू शकत नाही, आणि तो तमुक गरज भागवतो पण अमुक गरज भागवू शकत नाही असे काही नाही. मग हा आलेख पूर्ण करण्याची प्रेरणा त्यांच्यामध्ये कुठून येते? सुरुवातीचा पैसा आणि शेवटचा पैसा यांच्यात ही प्रेरणा निर्माण करणारा एकच फरक शक्य असतो. आणि हा फरक गुणात्मक असत नाही तर संख्यात्मक असतो. शेवटचा पैसा हा सुरुवातीच्या पैशापेक्षा जास्त असावा लागतो. तसे नसेल तर जागच्या जागी उभे राहून पळण्याचा उपद्व्याप उगीच कोण करील? त्यामुळे काटेकोरपणे मांडायचा झाला तर हा दुसरा आलेख असा मांडावा लागेल :

पैसा $\rightarrow$ क्रयवस्तू $\rightarrow$ जास्त पैसा किंवा (पैसा + नफा)

पैसा खर्च करून पैसा वाढवणे!

यावर आता कुणी असे म्हणू शकेल की काय डोंगर पोखरून उंदीर काढला आहे? जास्त पैशाची हाव पैशाबरोबर येतेच. अगदी मिडास राजापासून ते दोरीला टांगून सुपारी चोखणाऱ्या कंजूष सावकारापर्यंत अनेक दंतकथा जे सांगतात तेवढेच सांगण्यासाठी इतका उपद्व्याप? पण ही नफ्याची हाव आहे; कंजूष माणसाची केवळ पैसा साठवायची, आणि साठवून साठवून तो वाढवण्याची हाव नव्हे, आणि या दोन्हींत मोठा फरक आहे.

कंजूष माणूस एक प्रकारच्या कात्रीत सापडलेला असतो. पैसा साठवायचा तर तो साठवता येतो; पण मग तो खर्च करता येत नाही; जीवनाचा उपभोग

घेण्याची पैशामध्ये साठवलेली शक्ती कामी येत नाही. आणि पैसा खर्च करून त्याची ही शक्ती कामी लावता येते; पण मग तो नाहीसा होतो, साठवता येत नाही. इंग्रजीत म्हण आहे : केक खाऊन कोणी तो राखू शकत नाही, किंवा राखून ठेवायचा तर खाऊ शकत नाही. या कात्रीवर मात करणारा हा दुसरा आलेख असतो. या आलेखात पैसा खर्चही होत असतो आणि साठतही असतो!

कंजूष माणसापुढच्या समस्येवर मात करणारे, दुसऱ्या आलेखातून हाती लागणारे हे उत्तर म्हणजेच भांडवल. बाजारपेठेत उभे राहिले आणि बाजारपेठेबाहेरच्या सर्व 'खाजगी' घडामोडी नजरेआड केल्या तर आपल्याला भांडवलदाराच्या हातात खेळणारा पैसा जी वाटचाल करताना दिसतो त्याचेच चित्र हा दुसरा आलेख काढत असतो. हा आलेख म्हणजे भांडवलाचे बाजारपेठेत व्यक्त होणारे रूप. या रूपाचा आधार पैसा स्वत:च जन्माला घालत असतो. एक तर, पैशानेच क्रयवस्तूंच्या विनिमयाच्या जोड्या फोडून क्रयवस्तू आणि पैसा यांचे आलटून पालटून दुवे असलेली एक अखंड साखळी निर्माण केलेली असते. या साखळीमुळे विनिमयात पहिल्या आलेखापेक्षा वेगळ्या रीतीने, वेगळ्या प्रेरणेने शिरकाव करून घेण्याची संधी, तशी मोकळीक निर्माण झालेली असते.

पैशाबरोबर आणखीही एक स्वातंत्र्य निर्माण होते, ते आपण मघाशीच पाहिले. विक्रेता गिऱ्हाइकाला क्रयवस्तू विकतो, पण गिऱ्हाइकाने पूर्वी विकलेली क्रयवस्तू व त्याची गरज यांचा अर्थाअर्थी संबंध असण्याचे काही एक बंधन त्यांच्यावर नसते. त्याबद्दल ते पूर्ण स्वतंत्र असतात. पण तरीही गिऱ्हाइकाला त्या विक्रेत्याकडच्या वस्तूचा उपयोग करायचा होता असे कुठे तरी त्या व्यवहारामध्ये बाकी होते. पण हे देखील गृहीत धरायची काय आवश्यकता आहे? गिऱ्हाइकाने पैसे दिल्याशी कारण! नंतर तो त्या वस्तूचे काय करतो हा त्याचा 'खाजगी' प्रश्न असतो. विक्रत्याजवळचे आंबे गिऱ्हाईक विकत घेऊन गेले की झाले. मग तो हे आंबे खाईल, वाटून टाकील, दुसऱ्याला परत विकेल किंवा तो त्याची आंबापोळी करून निर्यात करेल. तो या बाबतीत पूर्ण स्वतंत्र असतो. आंबे खाण्याऐवजी दुसऱ्या कुठल्याही हेतूसाठी विकत घेण्याचे स्वातंत्र्य पैशाने निर्माण केलेले असते, कारण उपयोग आणि उत्पादन 'खाजगी' असतात.

तेव्हा पैसा असतो म्हणून पैसा साठवायची हाव असणारी कंजूष माणसे असतात. पैसा साठवायचा की खर्च करायचा ही त्यांची कात्री असते. आणि या कात्रीतून बाहेर पडता येईल असा मार्ग दाखवणारे दुसऱ्या आलेखाचे बहारदार स्वप्नदेखील असते. भांडवलशाहीमध्ये सर्व भांडवलदार हे बहारदार स्वप्न प्रत्यक्षात आणत असतात. प्रत्येक भांडवलदाराच्या हातात असणारा पैसा हा आलेख गिरवत असतो. आणि भांडवलशाहीमध्ये सर्व उत्पादन हे भांडवलदारच विकायला आणत असतात. त्यामुळे समाजातील सर्व क्रयवस्तूंचे अभिसरणदेखील हा दुसरा आलेख गिरवत असते.

२. वरकड–मूल्याच्या रहस्यभेदाची वाट

वरकड–मूल्याचे स्वप्न साकार कसे होणार

यातून एक नवीनच प्रश्न निर्माण होतो. पहिला आलेख कसा साधा सरळ दिसतो. क्रयवस्तू–पैसा–क्रयवस्तू या टप्प्यांमध्ये मूल्याच्या समानतेचा एक धागा स्पष्ट असतो. समजा सुरुवात ६० श्रमतासांच्या क्रयवस्तूंपासून होते. त्यांची जागा ६० श्रमतास मूल्याचा अवतार म्हणजे पैसा घेतो, व त्याची जागा वेगळ्या उपयोग असणाऱ्या ६० श्रमतास मूल्य असलेल्या क्रयवस्तू घेतात. पण हा दुसरा आलेख बघा. हा सुरू होतो तो समजा ६० श्रमतास मूल्याचा प्रतिनिधी असलेल्या पैशापासून, आणि मग काय गौडबंगाल होते कुणास ठाऊक? मधे परत क्रयवस्तू येतात आणि शेवटी ६० पेक्षा जास्त समजा ७५ श्रमतास मूल्य निर्माण झालेले असते. हे जादा मूल्य अथवा वरकड–मूल्य कुठून येते?

हा एखाद्याच भांडवलदाराचा वैयक्तिक प्रश्न असता, तर आपण असे म्हटले असते की त्याने पडत्या भावात वस्तू घेतली व ती चढ्या भावाने विकली, म्हणून त्याला जे जादा मूल्य मिळाले. उदाहरणार्थ, फक्त ६० श्रमतास मूल्य देऊन ७५ श्रमतासांची क्रयवस्तू घेतली, आणि ती विकली ७५ श्रमतासांना; पण सर्व क्रयवस्तूंना मिळून अशाच प्रकारचा आलेख पार करायचा आहे, हे लक्षात घेतले की हेही उत्तर टिकत नाही. कारण सगळ्या भांडवलदारांनी हा आलेख पार करायचा म्हटले तर सगळ्या क्रयवस्तूंच्या व्यवहारातील पैशाच्या रूपामागे जाऊन त्यांच्या क्रयवस्तूंचा विनिमय पहावा लागेल. उदाहरणार्थ, मघाशी या व्यवहारातल्या दोन्ही क्रयवस्तूंचे मिळून एकूण मूल्य होते, एका बाजूला ६० व दुसऱ्या बाजूला ७५ असे एकूण १३५ श्रमतास. या दोन्ही

क्रयवस्तूंचा ओलख घेतला तर एका ठिकाणी ७५ ऐवजी ६० श्रमतास आले, दुसऱ्या ठिकाणी ६० ऐवजी ७५ श्रमतास आले. पण एकत्र ताळेबंद घेतला तर १३५ श्रमतासांच्या जागी १३५ श्रमतास आले. पण भांडवलशाहीमध्ये सर्व उत्पादनाचा हा ताळेबंद पैसा-क्रयवस्तू-जास्त पैसा या ताळेबंदातून जायला पाहिजे. पडत्या भावात घ्यायचे आणि चढ्या भावात विकायचे असे सर्वांनी केले तर यामुळे एकाच्या ताळेबंदात जे मूल्य वाढेल तितकेच दुसऱ्याच्या ताळेबंदात कमी होईल. सर्व वस्तूंचा ताळेबंद घेताना ही वाढ-घट एकमेकांना छेदून जाईल, आणि आपण पुन्हा मूळपदावर असू. आपला पूर्ण ताळेबंद असेल : पैसा-क्रयवस्तू-तितकाच पैसा. पण भांडवलशाहीमध्ये हा पूर्ण ताळेबंदच पैसा-क्रयवस्तू-जास्त पैसा या स्वरूपाचा असला पाहिजे, आणि असतोही!

बाजारपेठेबाहेरच्या जगातील टिंबे

गोम अशी आहे, की आपण बाजारपेठेत उभे आहोत आणि बाजारपेठेबाहेरचे सर्व 'खाजगी' जग नजरेआड केले आहे. आणि जोपर्यंत आपण हे क्षेत्र असे नजरेआड करून उभे राहू तोपर्यंत आपण या समान मूल्याच्या रिंगणातून बाहेर पडणार नाही. एक मार्ग जरूर आहे तो म्हणजे श्रममूल्याचा सिद्धांतच टाकून द्यायचा! आणि मिठाचे उपयोग-मूल्य रुपयांत मोजायचे किंवा पैशाबरोबर प्रामाणिकपणा, सदसद्विवेकबुद्धी वगैरेंना जशी बांडगुळी मूल्ये चिकटतात तसे भांडवलदाराच्या उद्योजकतेला मूल्य चिकटवायचे, किंवा भांडवलदार जो धोका पत्करतात त्यालाही मूल्य चिकटवायचे वगैरे; पण या सर्व मार्गांचा अर्थ इतकाच होतो की काही झाले तरी 'खाजगी' क्षेत्राच्या 'खाजगीपणा' बद्दलची समज तशीच ठेवायची.

क्रयवस्तू आणि पैसा यांची बाजारपेठेतली जी साखळी आपण पाहत होतो तिचे जे अखंड, कुठेही न तुटलेले रूप दिसत होते ते तसे दिसत होते, कारण आपण हे खाजगी क्षेत्र नजरेआड केलेले होते. प्रत्यक्षात ही साखळी अशी दिसते :

... क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू ... क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू ... क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू ...

या साखळीमधली ही मधली टिंबे म्हणजे क्रयवस्तूंच्या उपयोगाचे किंवा उत्पादनाचे 'खाजगी' क्षेत्र. या टिंबाटिंबांमध्ये आपण डोकावून पाहत नव्हतो. इतकेच गृहीत धरून चाललो होतो, की या टिंबाटिंबांमध्ये उत्पादन होते तेव्हा

क्रयवस्तूंमध्ये सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त श्रमकाळ जातो आणि मूर्त श्रम त्याच्या उपयोग-मूल्याचा आधार असतात. बस, इतकेच. या पलीकडे या 'खाजगी' क्षेत्रात आपण डोकावून पाहिले नाही. श्रम कोण घालतो? श्रम घालणारे आणि उत्पादनाचे मालक एकच असतात का? हे उत्पादन कसे होते? उपभोग कोण घेतो? या प्रश्नांचा आपण आपल्या विवेचनात पूर्वी थोडा तरी उल्लेख केला आहे; पण मार्क्स तर या टप्प्यापर्यंत या गोष्टींबद्दल ब्र देखील काढत नाही. कारण तो एका जिद्दीने या विश्लेषणात उतरलेला आहे. विश्लेषणाची गरज असेल त्याप्रमाणे तो प्रश्न उचलत चाललेला आहे. क्रयवस्तूंमधून पैसा हा प्रश्न म्हणून उभा राहतो. पैशातून हा दुसरा आलेख. आणि त्यातून निर्माण होणारा वरकड-मूल्याचा. प्रश्न इथपर्यंत पोचेपर्यंत ज्या दोन गोष्टी या खाजगी क्षेत्राबद्दल गृहीत धरल्या होत्या त्या पलीकडे या खाजगी क्षेत्रात डोकवायची गरज नव्हती. पण आता मात्र ती वेळ आलेली आहे. कारण ही खाजगी क्षेत्राची जी टिंबेटिंबे आहेत ती नजरेआड करून करून क्रयवस्तूपाशी क्रयवस्तू चिकटवली तर क्रयवस्तूंच्या व्यवहाराची जी साखळी तयार होते ती अशी,

...-पैसा-क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू-पैसा-क्रयवस्तू-पैसा-...

भांडवलशाहीमध्ये सर्व भांडवलदारांना मिळून वरकड-मूल्य कसे मिळते, भांडवलदारवर्ग पैसा-क्रयवस्तू-जास्त पैसा हा आलेख कसा गिरवतो याचे उत्तर ही साखळी देऊ शकत नाही. याचे उत्तर या नजरेआड केलेल्या टिंबाटिंबांमध्ये शोधावे लागेल. भांडवलशाहीत मूल्य जिथे निर्माण होते त्या कारखान्यांच्या भिंतींच्या आत काय घडते ते तपासावे लागेल.

प्रश्न आहे तो औद्योगिक भांडवलदारांचा

तसे याचे कारण फार सोपे आहे. बाजारपेठेत बदलते ते फक्त मूल्याचे रूप; बाजारपेठेतल्या व्यवहारात मूल्य निर्माण होऊ शकत नाही. ते बाजारात निर्माण होऊ शकते हा आभास व्यापाऱ्यांच्या हातातल्या भांडवलामुळे निर्माण होतो. कारण कुठेही उत्पादनात न शिरता तो नफ्यामार्फत वरकड-मूल्य कमवत असतो असे दिसते. फक्त वस्तू पडत्या भावात विकत घ्यायच्या आणि चढ्या भावात विकायच्या! पण उत्पादनच भांडवली झालेले असेल, म्हणजेच समाज भांडवली पायावर उभा असेल, तर हा व्यापारी वस्तू विकत कुणाकडून घेणार? अर्थात त्या निर्माण करणाऱ्या औद्योगिक भांडवलदारांकडून. जर पडत्या भावात वस्तू विकत घेण्यातूनच वरकड-मूल्य आले असते तर व्यापाऱ्यांचा नफा हा

औद्यागिक भांडवलदारांचा तोटा ठरला असता. पण प्रत्यक्षात असे झालेले दिसत नाही. त्यामुळे समाजातले सर्व भांडवल हा दुसरा आलेख कसा गिरवते हे फक्त बाजारपेठेत राहून आपल्याला कळू शकत नाही. ते कळण्यासाठी आपल्याला अगोदर औद्योगिक भांडवलदारांना हे वरकड-मूल्य कसे मिळते हे पाहिले पाहिजे.

औद्योगिक भांडवलदाराचा आलेख हा नुसताच पैसा-क्रयवस्तू- जास्त पैसा असा नसतो. तर त्याचे स्वरूप असते,

पैसा $\rightarrow$ क्रयवस्तू १. . . क्रयवस्तू २ $\rightarrow$ जास्त पैसा

याचा अर्थ भांडवलदार पैसा घेऊन बाजारात जातो, क्रयवस्तू विकत घेतो आणि कारखान्यात आणतो. कारखान्यात काय घडते? टिंबे...टिंबे...टिंबे... तेथे काहीही घडत असो, त्यामधून निर्माण झालेल्या क्रयवस्तू तो मग बाजारात घेऊन येतो आणि त्या विकून पूर्वीच्या पैशापेक्षा जास्त मूल्य, किंवा पूर्वीचे मूल्य अधिक वरकड-मूल्य, पैशाच्या रूपात त्याच्या हाती येते. म्हणजेच ही टिंबे त्याच्या भांडवलाच्या आलेखाचा जैव भाग असतात.

आणि त्याने विकत घेतलेल्या वेगळ्या क्रयवस्तूचा

औद्योगिक भांडवलदारांच्या व्यवहाराचे दुसरेही एक वैशिष्ट्य असते. ते अशाही एका क्रयवस्तूचा व्यवहार करत असतात की ज्या क्रयवस्तूचा व्यवहार व्यापारी भांडवलदार करत नाहीत. ही कुठली क्रयवस्तू? उत्पादनात घातले जाणारे 'श्रम' विकत घेणे या नावाखाली या क्रयवस्तूची खरेदी होत असते.

श्रम विकत घेण्याच्या नावाखाली ही क्रयवस्तू विकत घेतली जात असते? होय, सध्या तरी आपण असेच धरून चालू या की श्रम विकणे-विकत घेणे यामधून कुठली तरी क्रयवस्तू विकली, विकत घेतली जात असते. क्रयवस्तूंच्या उफराट्या रूपामागे दडलेल्या खऱ्या आशयाचा आपला आत्तापर्यंतचा अनुभव असा आहे की घडत असते एक आणि दिसते दुसरेच; आणि ते असे उफराटे दिसते हा मुळी क्रयवस्तूंच्या व्यवहारातील उफराट्या संबंधांचा परिणाम असतो. वाढती सामाजिकता रूप घेत असते ती वाढत्या खाजगी संबंधांचे. एकमेकांसाठी माणसांनी श्रम केले आहेत ही गोष्ट रूप घेत असते वस्तूंना मूल्य नावाचा गुणधर्म प्राप्त होण्याचे. किंवा सर्व माणसे माणसे म्हणून, एक सामाजिक प्राणी म्हणून सारखी आहेत, त्यांचे श्रम हे मूल्याचा

आधार आहेत ही गोष्ट रूप घेत असते ते पैसा नामक एक क्रयवस्तू या शक्तीचा अवतार बनून!

दुधाने पोळले तर ताकदेखील फुंकून प्यावे. तेव्हा उत्पादक श्रम विकत घेण्याच्या नावाखाली कोणती तरी क्ष क्रयवस्तू ही कामगारांकडून विकत घेतली जाते एवढेच आपण सध्या धरून चालू या. कोणी सांगावे, या सगळ्या उफराट्या संबंधांच्या गचडीत हाच एक संबंध सुलटा असेल; पण तसे असेल तर ते आपल्याला लवकरच कळेल. आता फक्त इतकेच स्पष्ट आहे की कुठल्याही व्यापाऱ्याच्या गुदामामध्ये जी साठवली जात नाही, कुठलाही व्यापारी जी विकत घेत नाही अशी एक क्रयवस्तू, उत्पादनात घालायचे श्रम या नावाखाली औद्योगिक भांडवलदार विकत घेतो. या क्रयवस्तूसकट, खरेदी केलेल्या त्याच्या सगळ्या क्रयवस्तू त्याच्या कारखान्याच्या खाजगी भिंतींआड बंद होतात. टिंबे...टिंबे....टिंबे... आणि परत हा गृहस्थ कारखान्यातून क्रयवस्तू घेऊन बाहेर येतो, त्या क्रयवस्तू विकतो, आणि त्याच्या हातात (पैशाच्या रूपात) वरकड-मूल्य आलेले असते. या टिंबाटिंबांमागे काय घडते आहे, त्यामध्ये या 'विकत घेतलेल्या श्रमां'चे काय होते आहे ते कळल्याशिवाय हे सर्व गौडबंगाल स्पष्ट होणार नाही.

४. कारखान्यांच्या भिंतींआड दडलेले कामगारांचे शोषण

टिंबे... टिंबे... टिंबे...

या टिंबांच्याआड भांडवलदारांच्या उत्पादनाच्या खाजगी क्षेत्रात डोकवायला आपण निघालो आहोत. कारण वरकड-मूल्याचे उगमस्थान हे फक्त बाजारपेठेत राहून काही आपल्याला सापडणे शक्य नव्हते. या टिंबांच्या आड आता आपल्याला कामगार भेटणार आहेत, आणि इथेच आपल्याला वरकड-मूल्याचे उगमस्थान सापडणार आहे!

१. श्रमप्रक्रिया

आज मार्क्सच्या मृत्यूला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, तुम्हालाही या उत्तराची कल्पना असेल. वरकड-मूल्य कोठून निर्माण होते या प्रश्नाचे मार्क्सने दिलेले हे उत्तर आज जगजाहीर आहे. मार्क्सच्या समर्थकांना आणि विरोधकांनाही माहीत आहे की वरकड-मूल्याची न आटणारी गंगा कामगारवर्गाच्या शोषणातून उगवते, हे मार्क्सचे उत्तर आहे. पण मार्क्सचे महत्त्व केवळ या निष्कर्षात नाही, तो या निष्कर्षापर्यंत का व कसा पोचतो याच्यात आहे. मार्क्सने घडवलेल्या मूल्य, उपयोगमूल्य, मूर्त श्रम, अमूर्त श्रम यांच्यासारख्या मूलभूत संकल्पनांवर तो निष्कर्ष जैवपणे कसा आधारलेला आहे यामध्ये मार्क्सचे सारे वैशिष्ट्य

सामावलेले आहे. पण या वैशिष्ट्यांची चर्चा करायची तर मार्क्सच्या उत्तराची पुरेशी ठळक रूपरेषा आपल्यासमोर असणे आवश्यक आहे. म्हणून या प्रकरणामध्ये आपण ही रूपरेषा मांडू आणि पुढच्या प्रकरणात या रूपरेषेच्या आधारे मार्क्सच्या उत्तराची वैशिष्ट्यांची आणि त्यांच्या महत्त्वाची चर्चा करू.

श्रमप्रक्रियेचे तीन घटक

आपण उत्पादनाच्या क्षेत्रात शिरत असलो तरी क्रयवस्तूंचे दुहेरी स्वरूप आपला पिच्छा सोडणार नाही. क्रयवस्तूंना जशा उपयोग-मूल्य आणि मूल्य या दोन बाजू असतात तशाच भांडवली उत्पादनालाही दुहेरी स्वरूप असणे अपरिहार्य आहे. कारण शेवटी भांडवली उत्पादनाच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपातूनच क्रयवस्तूंना त्यांचे उपयोग-मूल्य आणि मूल्य हे दुहेरी रूप प्राप्त होत असते. भांडवली उत्पादनातील मूल्याची बाजू नजरेआड करून जे भांडवली उत्पादनाचे स्वरूप दिसते तिला मार्क्स नाव देतो श्रमप्रक्रिया (लेबर प्रोसेस). श्रमप्रक्रिया म्हणजे उपयोगी वस्तूंमधून, मूर्त श्रमांच्या साहाय्याने, इतर उपयोगी वस्तू निर्माण करण्याची प्रक्रिया. श्रमप्रक्रिया ही सर्व समाजव्यवस्थांमध्ये सामाजिक उत्पादनाचा आधार असते. ती पार पाडण्यासाठी आवश्यक त्या किमान अटी व निकष प्रत्येक उत्पादनव्यवस्थेला पार पाडावेच लागतात. त्यामुळे भांडवली उत्पादनालाही साहजिकच या अटी पार पाडाव्या लागतात. अर्थात, भांडवली उत्पादनाची मूल्यसंबंधांशी निगडित अशी दुसरीही बाजू असते. श्रमप्रक्रियेची बाजू नजरेआड करून भांडवली उत्पादनाकडे पाहिले तर ती सुरुवातीच्या भांडवलाच्या मूल्यातून त्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करण्याची प्रक्रिया असते, वरकड-मूल्याच्या निर्मितीची प्रक्रिया असते. आणि या दोन्ही बाजू भांडवली उत्पादनाच्या एकाच प्रक्रियेची दोन अविभाज्य अंगे असतात. त्यांचा अंतर्संबंध तपासूनच आपण आपल्या उत्तराकडे जाणार आहोत. त्यासाठी आपण सर्व उत्पादनव्यवस्थांना आधारभूत असणाऱ्या श्रमप्रक्रियेच्या तपासणीपासून सुरुवात करू.

श्रमविषय किंवा कच्चा माल

श्रमप्रक्रिया घडायची, उपयोगी वस्तूंचे उत्पादन व्हायचे तर श्रमप्रक्रियेचे निरनिराळे घटक एकत्र यावे लागतात. आपल्या विश्लेषणासाठी (आताच्या व यापुढील सर्व विश्लेषणासाठी) या घटकांचे तीन प्रकार पाडता येतात. यांपैकी पहिला घटक म्हणजे श्रमविषय (सब्जेक्ट ऑफ लेबर) किंवा कच्चा माल. ज्या

गोष्टींवर काम करून त्यांना उपयोगी वस्तूंचे स्वरूप दिले जाणार आहे त्या सगळ्या श्रमविषयात मोडतात. उदाहरणार्थ, एखादे टेबल बनवताना लागणारे लाकूड, खिळे, सरस, पॉलिश, रंग या सर्व गोष्टी शेवटी संपूर्णपणे टेबलाचा भाग बनतात. एखाद्या विशिष्ट श्रमप्रक्रियेचा विचार केला तर श्रमविषय हा कधी इतर श्रमप्रक्रियांमधून आलेला असतो, तर कधी तो निसर्गाने आयता उपलब्ध करून दिलेला असतो. उदाहरणार्थ, पोलाद बनवताना लागणारे लोखंडाचे खनिज हे आयते निसर्गात उपलब्ध असते तर त्यासाठी लागणारी अनेक रसायने ही इतर श्रमप्रक्रियांमधून आलेली असतात. अर्थात समाजाच्या एकत्रित श्रमप्रक्रियेच्या एकंदर प्रवाहाचा विचार केला तर मात्र संपूर्ण निसर्ग हाच श्रम विषय असतो.

श्रमसाधने

श्रमप्रक्रियेचा दुसरा घटक म्हणजे श्रमसाधने (इन्स्ट्रूमेंटस् ऑफ लेबर). श्रमविषयाला विवक्षित उपयोगी आकार द्यायचा तर त्यासाठी अनुरूप अशी साधने आवश्यक असतात. उदाहरणार्थ, लाकूड, खिळे, रंग, पॉलिश यांमधून टेबल बनवायचे झाले तर रंधा, पटाशी, हातोडा, करवत, पॉलिश लावण्यासाठी फडके, सँडपेपर, रंग देण्याचा ब्रश इत्यादी अनेक साधने वापरावी लागतात. पोलाद बनवताना लागणाऱ्या झोतभट्ट्या किंवा वीज तयार करताना लागणारी धरणे किंवा अणुभट्ट्या, जनित्रे इत्यादी साधने देखील यामध्येच मोडतात. अर्थात, आतापर्यंत दिलेली सर्व उदाहरणे ही श्रमसाधनांच्या एका उपप्रकारची, प्रत्यक्ष (डायरेक्ट) श्रमसाधनांची उदाहरणे आहेत. वरील प्रत्येक साधनाचा आणि त्या श्रमविषयाला उपयोगी वस्तूचा आकार देण्याच्या प्रक्रियेमधल्या एखाद्या भागाचा सरळसरळ आणि प्रत्यक्ष संबंध आहे. पण असा प्रत्यक्ष संबंध नसणारी श्रमसाधनेदेखील आवश्यक असतातच. उदाहरणार्थ, झोतभट्टी उभी करायची तर त्यासाठी जमिनीचा चतकोर तुकडा लागतो, काम करणाऱ्यांना इजा व्हायची नसेल तर त्यांना संरक्षक उपकरणे लागतात, पावसापाण्यात, उन्हात काम चालायचे तर निवाऱ्याचे छप्पर लागते. या साधनांचा वस्तूला आकार देण्याशी सरळ संबंध नसला तरी श्रमप्रक्रिया ही शेवटी माणसांनी केलेली प्रक्रिया असल्याने अशी काही ना काही श्रमसाधने आवश्यक ठरतातच. ही सर्व साधने अप्रत्यक्ष (इन्डायरेक्ट) श्रमसाधनांमध्ये मोडतात.

श्रमविषय व श्रमसाधने मिळून ज्या गोष्टी आहेत त्यांना आपण श्रमसामुग्री (मीन्स ऑफ लेबर) म्हणू. श्रमसामुग्री म्हणजे श्रमप्रक्रियेमधील निर्जीव

घटकांची गोळाबेरीज. श्रमसामुग्रीला श्रमप्रक्रियेमध्ये कर्त्याकरवित्या घटकाचे स्थान नसते. तर उलट त्यांच्यावर काम केले जाते किंवा त्याच्यामार्फत काम करवून घेतले जाते. श्रमप्रक्रियेचा कर्ता–करविता घटक वेगळाच असतो.

कर्ताकरविता घटक:श्रमशक्ती

श्रमप्रक्रियेचा तिसरा आणि कर्ताकरविता घटक असतो तो म्हणजे माणसांची श्रमशक्ती (लेबर पॉवर). हा घटक श्रमप्रक्रियेच्या इतर घटकांपेक्षा वेगळा असतो. तो सजीव असतो. श्रमसाधनांच्या साहाय्याने किंवा त्यांच्यामार्फत श्रमविषयाला अगोदर योजलेल्या कोणत्या तरी उपयोगी वस्तूचा आकार देण्याची, जिवंत माणसाच्या अंगची शारीरिक व मानसिक कुवत म्हणजे श्रमशक्ती. मुख्य म्हणजे, माणसे इतर गोष्टींप्रमाणे स्वत:ची श्रमशक्ती दुसऱ्याला काढून देऊ शकत नाहीत. श्रमशक्ती उपलब्ध असणे म्हणजेच श्रमशक्ती अंगी असणारी माणसे काम करण्यासाठी हजर असणे, आणि श्रमशक्तीचा वापर होणे म्हणजेच विवक्षित श्रमविषयावर विवक्षित श्रमसाधनांनी श्रम करून विवक्षित योजलेली उपयोगी वस्तू माणसांनी बनवणे. थोडक्यात, श्रमशक्तीचा वापर म्हणजेच मूर्त श्रम.

श्रमप्रक्रियेचे हे तिन्ही घटक जेव्हा एकत्र येतात, त्यांचा मेळ होतो तेव्हाच श्रमप्रक्रिया सुरू होते, अस्तित्वात येते. कर्ताकरविता श्रमशक्तीचा घटक हा श्रमसामुग्रीच्या घटकांमधून मूर्त श्रमांद्वारे उपयोगी वस्तू तयार करू लागतो. उत्पादन ही या तीन घटकांच्या मेळातून घडणारी प्रक्रिया आहे.

२. वरकड–मूल्याची निर्मिती

श्रमविषयांचे राखले जाणारे मूल्य

भांडवली उत्पादनाच्या नाण्याची दुसरी बाजू आता आपण तपासू. कारखान्यातून उत्पादन व्हायचे तर भांडवलदारांकडे श्रमप्रक्रियेचे तिन्ही घटक उपलब्ध असावे लागतात. आणि क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या बाबतीत उपलब्ध असणे याचा अर्थ ते विक्रीसाठी बाजारात असणे व खरेदीद्वारा उपलब्ध होणे. श्रमप्रक्रियेचे घटक त्यांच्या मालकांकडून भांडवलदार विकत घेतात. श्रमविषय आणि श्रमसाधने त्यांच्या मालकांकडून विकत घेऊन मालकांना तिथेच सोडून, भांडवलदार आपल्या कारखान्यात श्रमसामुग्री आणून ठेवतात. श्रमशक्तीचे मात्र जरा वेगळे असते. कामगार श्रमशक्तीचे मालक असतात. त्यांच्याकडून

भांडवलदार त्यांची श्रमशक्ती विकत घेतात, पण त्यांना तिथेच न सोडता त्यांनाही कारखान्याच्या गेटच्या आत आणून ठेवतात! साहजिकच आहे; कारण त्यांना तिथेच बाहेर सोडले तर त्यांची श्रमशक्तीही त्यांच्याबरोबर बाहेर राहते!!

याबाबत तुमच्या मनात एक शंका निर्माण झाली असेल, आणि असेल तर ती रास्तच आहे. कामगार श्रमशक्ती विकतात की श्रम? या शंकेचा आणि अशा इतरही शंकांचा परामर्ष आपण पुढच्या प्रकरणात घेऊ. मागच्याच प्रकरणात आपण असे म्हटले होते की श्रम या नावाखाली कामगारांकडून काही तरी क्ष गोष्ट विकत घेतली जाते. आता आपल्या विश्लेषणातून एवढेच दिसते की श्रमप्रक्रिया सुरू करायची तर भांडवलदारांनी तिचे घटक त्यांच्या त्यांच्या मालकांकडून विकत घेणे आवश्यक आहे. श्रमशक्ती श्रमप्रक्रियेचा घटक असल्यामुळे विश्लेषणाच्या काटेकोर प्रवासानुसार कामगारांकडून भांडवलदारांनी श्रमशक्ती विकत घेतली हेच म्हणणे रास्त ठरते आहे. तेच रास्त धरून पुढे जाऊ आणि पुढच्या प्रकरणात या शंकेकडे वळू.

तर आता भांडवलदारांनी श्रमप्रक्रियेचे घटक विकत घेतले आहेत. त्यासाठी त्यांना काही एक मूल्य लागले आहे. श्रमसामुग्री व श्रमशक्ती यांचे मिळून मूल्य म्हणजे भांडवलदाराचे भांडवल ठरते.

पैसा → क्रयवस्तू१ . . . क्रयवस्तू२ → पैसा ह्या टिंबांसकट काढलेल्या आलेखाचा पहिला टप्पा पार पडला आहे. पैशाचा सारा व्यवहार आकड्यात चालतो. ते आकडे सोपे व्हावेत म्हणून आपण टेबले तयार करण्याचा कारखाना चालवणाऱ्या भांडवलदाराचे एक साधे उदाहरण घेऊ या.

असे समजा की दर टेबलामागे लागणाऱ्या लाकूड, खिळे, सरस इत्यादी श्रमविषयांचे मूल्य ६ श्रमतास आहे. एका कामगाराला टेबल बनवण्यासाठी लागणाऱ्या पटाशी, करवती, रंधे इत्यादी प्रत्यक्ष श्रमसाधनांचे मूल्य ५००० श्रमतास व त्याला लागणाऱ्या अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे मूल्य १०,००० श्रमतास धरू या. आणि त्याच्या एका दिवसाच्या कामासाठी लागणाऱ्या श्रमशक्तीचे मूल्य धरू या ४ श्रमतास. श्रमप्रक्रियेचे सर्व घटक एकत्र आले आहेत. पैसा–क्रयवस्तू हा टप्पा संपला आहे आणि आता आपण टिंबांमध्ये प्रवेश केला आहे. श्रमप्रक्रिया सुरू झाली आहे. आता दिवस संपेल तेव्हा वरकड–मूल्य हातात पाहिजे. तेव्हा दिवसभराच्या प्रक्रियेत काय होते त्याच्या तपशिलात

आपल्याला आता शिरावे लागेल. श्रमप्रक्रियेच्या घटकांचा मूल्यसंबंधांशी काय व कसा मेळ घातला जातो ते पहावे लागेल.

कामगारांनी घातलेल्या मूर्त श्रमांमुळे श्रमविषयाला टेबलाचा आकार येतो. लाकूड, खिळे, सरस यांचे उपयोग-मूल्य नाहीसे होते. टेबलाला ठोकलेले खिळे काही इतर ठिकाणी जोडणीसाठी वापरता येणार नाहीत! थोडक्यात श्रमविषयांचे उपयोग-मूल्य नाहीसे होते. त्याऐवजी आता उत्पादित वस्तूमध्ये नवे उपयोग-मूल्य निर्माण होते. पण श्रमविषयाच्या मूल्याचे काय? समजा त्या लाकडाच्या तुकड्यावर मूर्त श्रम झालेच नसते तर काय होईल? त्या लाकडाला वाळवी लागेल किंवा ते कुजेल आणि त्याचे उपयोग-मूल्य नाहीसे होईल. पण लाकूड कुजणे आणि त्याचे टेबल बनणे यामध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. जेव्हा लाकडाचे टेबल बनते तेव्हा त्या लाकडात पूर्वी गेलेले श्रम वाया जात नाहीत. त्यात पूर्वी घातले गेलेले श्रम अजूनही माणसांच्या गरजा भागवण्याच्या उपयोगी कामामध्येच, पण टेबलामार्फत, कामी येत आहेत. त्यांची अर्थपूर्णता राखली गेली आहे. याउलट जेव्हा लाकूड कुजते, वाळवी लागून त्याचे उपयोग-मूल्य नष्ट होते तेव्हा त्या लाकडात पूर्वी गेलेले व साठलेले श्रम वाया जातात. त्यांची अर्थपूर्णता संपते. क्रयवस्तूंच्या व्यवहारात या गोष्टी व्यक्त होतात मूल्याच्या स्वरूपात. लाकडाचे टेबल बनते तेव्हा लाकडाचे मूल्य हे राखले जाते व टेबलाच्या मूल्याचा भाग बनून साठते. याउलट लाकूड कुजते तेव्हा त्याचे मूल्य नाहीसे होते.

थोडक्यात, कामगारांच्या मूर्त स्वरूपातील श्रमांमुळे श्रमविषयांचे उपयोगमूल्य नष्ट होऊन त्याची जागा एक गुणात्मकदृष्ट्या वेगळे असणारे उपयोग-मूल्य घेते. आणि त्याच मूर्त-श्रमांमुळे श्रमविषयांचे मूल्य राखले जाऊन ते टेबलाच्या मूल्याचा भाग बनून साठते. आपल्या उदाहरणात दर दोन तासांना एक याप्रमाणे एक कामगार दिवसभराच्या ८ तासांमध्ये ४ टेबले जर बनवत असेल तर दिवस अखेर त्याने बनवलेल्या ४ टेबलांसाठी लागणारे श्रमविषयांचे मूल्य म्हणजे ६ गुणिले ४ = २४ श्रमतास मूल्य हे या टेबलांच्या एकूण मूल्याचा भाग बनते.

आपल्या वरकड-मूल्याच्या कोड्याच्या दृष्टीने आणखीही एक प्रश्न इथे महत्त्वाचा बनतो. श्रमविषयांच्या वापरातून होणाऱ्या मूर्त-श्रमांमुळे नव्या वस्तूंमध्ये साठणारे त्यांचे मूल्य हे त्यांच्या पूर्वीच्या मूल्यापेक्षा जास्त असू शकते का? श्रमविषय जेव्हा कारखान्याच्या गेटपाशी येतात तेव्हाच त्यांच्यात किती श्रम गेलेले आहेत ते निश्चित झालेले असते. गेटपाशी जेव्हा एखादा

श्रमविषय येतो त्यापूर्वीच त्याच्यात गेलेले श्रम घडून गेलेले असतात. आता कारखान्यात त्याचे काहीही केले तरी त्या श्रमांमध्ये कसा बदल होणार? होऊ शकते ते इतकेच की त्या खर्च झालेल्या श्रमांची अर्थपूर्णता, त्यांचे मोल राखले जाऊ शकते; श्रमविषयांचे मूल्य कमी न होता, जसेच्या तसे उत्पादित मालामध्ये साठू शकते. वरकड-मूल्य श्रमविषयांमधून निर्माण होऊ शकत नाही.

तुकड्या तुकड्यांनी साठणारे श्रमसाधनांचे मूल्य

जे श्रमविषयांबद्दल होते तेच श्रमसाधनांबद्दल होते, पण जरा वेगळ्या पद्धतीने. एखाद्या वस्तूसाठी लागणाऱ्या कच्च्या मालासारख्या श्रमविषयाचे मूल्य त्या एका वस्तूत संपूर्णपणे साठते. क्रयवस्तूंच्या जगात श्रमसाधनांचे हे नाते जास्त सामाजिक असते. लेथ आदी यंत्रांसारख्या श्रमसाधनांचेही मूल्य मूर्त श्रमांमुळे त्याच पद्धतीने उत्पादित मालामध्ये साठते; पण त्यांच्या एकंदर आयुष्यात (त्यांचे उपयोग-मूल्य पूर्णपणे नष्ट होईपर्यंत) मिळून त्यांच्या साहाय्याने निर्माण होणाऱ्या सर्व क्रयवस्तूंमध्ये मिळून ते साठते. तेव्हा एकाच क्रयवस्तूवर नजर ठेवली तर त्या वस्तूत श्रमसाधनांच्या मूल्याचा त्या प्रमाणातला तुकडा साठतो.

> भांडवलदाराला लागणाऱ्या पटाशी, करवती, रंधे इत्यादी प्रत्यक्ष श्रमसाधनांचे आयुष्य जर ५,००० टेबले बनवण्याइतके व अप्रत्यक्ष साधनांचे आयुष्य १०,००० टेबले बनविण्याचे धरले तर त्यांचे ५,००० श्रमतास व १०,००० श्रमतास मूल्य हे अनुक्रमे ५,००० व १०,००० टेबलांवर विखुरले जाईल. त्यामुळे दर टेबलामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमसाधनांमधील मूल्यापैकी एकेक श्रमतासाचे मूल्य साठेल. अशी सर्व टेबले तयार होतील तेव्हा या दोन्ही प्रकारच्या श्रमसाधनांमध्ये गेलेल्या एकंदर श्रमांची अर्थपूर्णत राखली जाईल. किंवा दुसऱ्या अर्थाने असे म्हणता येईल की दर टेबलामागे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे खर्ची पडणारे एकेक श्रमतास मूल्य जसेच्या तसे टेबलामध्ये साठेल. थोडक्यात, दर टेबलामागे २ श्रमतास इतके श्रमसाधनांचे मूल्य राखले जाऊन साठेल.
>
> श्रमसाधनांचे आधी होते त्यापेक्षा जास्त मूल्य या प्रक्रियेत वस्तूमध्ये जाऊन साठू शकेल का? 'यंत्रांच्या उत्पादकते' मुळे बऱ्याचदा एक वेगळा आभास निर्माण होतो. ४ च्या जागी ८ किंवा १६ टेबले तयार होऊ लागताना दिसतात. पण त्यामुळे या मूलभूत सैद्धांतिक बैठकीत काहीही फरक पडत नाही. उदाहरणार्थ, मधाच्या ५,००० श्रमतासांइतकेच मूल्य असणारी पण दिवसाला ४ ऐवजी ८ टेबले कामगारांना तयार करता येतील अशी नवी सुधारित यंत्रे आली असे समजून चालूया. आणि त्यांचे आयुष्य वाढून समजा १० हजार टेबले बनवण्याचे

झाले, तर दर टेबलामागे त्यांचे अर्धाच श्रमतास मूल्य साठेल. परंतु त्यांच्या संपूर्ण आयुष्यात त्यांचे संपूर्ण मूल्य जसेच्या तसे, त्यांच्या साहाय्याने कामगारांनी तयार केलेल्या सर्व क्रयवस्तूंमध्ये साठेल. यामध्ये काही बदल होऊ शकत नाही. कारण श्रमसाधने गेटच्या आत आली तेव्हाच त्यांच्यात गेलेले श्रम निश्चित झाले आहेत. हे श्रम किती क्रयवस्तूंमार्फत साठणार यात बदल होऊ शकतो. पण त्यांचे खर्ची पडलेले मूल्य हे शेवटी क्रयवस्तूंमध्ये जसेच्यातसे साठणारच. थोडक्यात, यंत्रे कितीही 'उत्पादक' असली तरी यंत्रांमधून वरकडमूल्य निर्माण होत नाही.

स्वत:च्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य देणारी श्रमशक्ती

आता राहता राहिला तिसरा कर्ताकरविता घटक—श्रमशक्ती. पण या घटकाचे त्याच्या मालकाशी जसे वेगळे नाते आहे तसेच त्याचे श्रमप्रक्रियेशीही वेगळे नाते आहे. कामगार गेटच्या आत असतात तेव्हा त्यांची श्रमशक्ती भांडवलदाराने विकत घेतलेली असते. विकत घेतलेले लोखंड वापरायचा त्याला जसा पूर्ण अधिकार असतो तसाच श्रमशक्ती वापरण्याचा असतो. त्यामुळे लोखंड वापरून जे तयार होते त्याच्यावर त्याचा जसा अधिकार असतो, तसाच श्रमशक्तीच्या वापरामधून जे मिळेल त्यावरही असतो.

श्रमशक्तीचा वापर होतो तेव्हा त्यातून मूर्त श्रम मिळतात. पण क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये श्रमांना मूर्त श्रमांखेरीज दुसरीही बाजू असते; ते अमूर्त श्रमही असतात. हे जे अमूर्त श्रम मिळतात त्यांच्यावरही भांडवलदाराचाच अधिकार असतो. तेव्हा आता श्रमशक्ती ही क्रयवस्तू वापरताना किती अमूर्त श्रम भांडवलदारांना मिळतात ते पाहू या.

कामगार दिवसभराच्या ८ तासांमध्ये मूर्त श्रम करून, श्रमविषयांतून श्रमसाधनांच्या साहाय्याने ४ टेबले तयार करतो. हे श्रम त्याचवेळी अमूर्त श्रम असल्यामुळे ८ श्रमतास एवढे मूल्य ४ टेबलांमध्ये साठेल. किंवा दर टेबलामध्ये २ श्रमतास मूल्य साठेल. अर्थात टेबलामध्ये श्रमसामुग्रीमार्फत जाऊन साठणाऱ्या मूल्यामध्ये व श्रमशक्तीच्या वापरातून मिळालेल्या या मूल्यामध्ये फरकही आहे. श्रमसामुग्रीचे राखले गेलेले श्रमतास हे या कारखान्याबाहेर पूर्वी घातले गेलेले, घडून गेलेले श्रम आहेत. ते मृत किंवा संचित श्रम (डेड् लेबर) आहेत. याउलट श्रमशक्तीमार्फत भांडवलदारांना मिळालेले श्रम हे आत्ता, या कारखान्यात नव्याने घातले गेलेले श्रम आहेत. ते जिवंत श्रम (लिव्हिंग लेबर) आहेत.[१]

म्हणजे आता श्रमशक्तीच्या बाबतीत आपल्याला काय दिसते? श्रमशक्तीचे मूल्य, म्हणजे अर्थातच क्रयवस्तूंच्या नियमाबरहुकूम ठरणारे मूल्य, आपण धरले होते ४ श्रमतास. पण श्रमशक्तीच्या वापरातून टेबलामध्ये साठून भांडवलदाराच्या हातात मूल्य आले ते मात्र आहे ८ श्रमतास. म्हणजे श्रमशक्ती या क्रयवस्तूचे ४ श्रमतास ऐवढे रास्त किंवा वैध मूल्य देऊन ती खरेदी करणाऱ्या भांडवलदाराने तिच्यामधून जादा किंवा वरकड-मूल्य काढलेले आहे; ४ श्रमतास मूल्य देऊन ८ श्रमतास मिळवलेत किंवा ४ श्रमतास वरकड-मूल्य काढले आहे.

भांडवलदाराच्या दृष्टीने एका कामगाराचा दिवसभराचा ताळेबंद खालीलप्रमाणे दिसेल:

दिवसाचे उत्पादन: ४ टेबले

श्रमप्रक्रियेचा घटक	त्या घटकासाठी खर्ची पडणारे मूल्य	त्या घटकामार्फत उत्पादनात साठणारे मूल्य
श्रमविषय	२४ श्रमतास	२४ श्रमतास
श्रमसाधने	८ श्रमतास	८ श्रमतास
श्रमशक्ती	४ श्रमतास	८ श्रमतास
एकंदर	३६ श्रमतास	४० श्रमतास
लाभ (वरकड-मूल्य)	४ श्रमतास	
	४० श्रमतास	

आपल्या साखळीमधल्या टिंबांमधून भांडवलदार आता दुसरीकडे बाहेर आलेला आहे आणि पुढचा क्रयवस्तू-पैसा हा टप्पा पार पाडायला टेबले घेऊन बाजारपेठेत उतरला आहे. पण दरम्यान त्या टेबलात ४ तास वरकड-मूल्य जमा झाले आहे. ३६ श्रमतास खर्ची पडलेल्या भांडवलातून, क्रयवस्तूंच्या नियमांचे व्यवस्थित पालन करूनच त्याने त्यापेक्षा जास्त म्हणजे ४० श्रमतास मूल्य मिळवले आहे. पैसा-क्रयवस्तू हा टप्पा पार पाडून टिंबांमध्ये शिरताना त्याच्याजवळ जितके मूल्य होते त्यापेक्षा जास्त मूल्य घेऊन तो टिंबाबाहेर आला आहे. कोडे सुटले आहे. पण त्याचा दुसराही अर्थ स्पष्ट झाला आहे. वरकड-मूल्याची निर्मिती म्हणजे क्रयवस्तूच्या नियमांना धरूनच परंतु कामगारांच्या हातात ४ श्रमतास मूल्य ठेवून त्यांच्याकडून ८ तासांचे श्रम काढण्याचा व्यवहार. कामगारांच्या श्रमातील एक भाग मूल्याच्या रूपात

हस्तगत करण्याचा व्यवहार. थोडक्यात, वरकड-मूल्याची निर्मिती म्हणजेच कामगारांचे शोषण किंवा पिळवणूक.

कायम भांडवल आणि बदलते भांडवल

कामगारांची ही पिळवणूक सिद्ध होण्यामध्ये दोन सैद्धांतिक मुद्दे अंतर्भूत आहेत. एक, श्रमशक्ती व श्रमसामुग्री या श्रमप्रक्रियेच्या घटकांचे मूल्यनिर्मितीशी असलेले नाते वेगवेगळे आहे. या घटकांमधील फरकाच्या आधारे मार्क्स भांडवलाची दोन भागात विभागणी करतो. खर्ची पडलेल्या श्रमसामुग्रीच्या मूल्याला मार्क्स कायम भांडवल (कॉन्स्टंट कॅपिटल) हे नाव देतो. दोन अर्थांनी ते 'कायम' असते. एक तर या भांडवलातले जुने मूल्यच कायम राखले जात असते, आणि दुसरे म्हणजे श्रमसामुग्रीचे जेवढ्यास तेवढेच उत्पादित क्रयवस्तूमध्ये साठत असते. ते संख्यात्मक दृष्टीनेही कायम राखले जात असते. याउलट मार्क्स श्रमशक्तीच्या मूल्यासाठी खर्ची पडलेल्या मूल्याला नाव देतो बदलते भांडवल (व्हेरिएबल कॅपिटल). तेही दोन अर्थांनी बदलते असते. एक तर जुने मूल्य जाऊन त्याची जागा नवे मूल्य घेत असते. त्याबरोबरच त्याच्या जुन्या मूल्यापेक्षा ते जास्त असते. भांडवलदाराच्या हातातील भांडवलाचे जुने मूल्य व श्रमप्रक्रियेतून हाती येणारे मूल्य यांमधील बदलाला फक्त श्रमशक्तीत गुंतलेले त्याचे भांडवलच जबाबदार असते.

> उदाहरणार्थ, श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास धरले आहे. श्रमशक्तीच्या या (श्रमतासांतील) मूल्याला मार्क्स आवश्यक श्रम (नेसेसरी लेबर) म्हणतो. कामगार दिवसभराच्या कामापैकी चार तास स्वत:च्या श्रमशक्तीच्या मूल्याच्या जागी नवीन मूल्य निर्माण करण्यात घालतात. त्यापुढील सर्व श्रम हे वरकड श्रम (सरप्लस लेबर) असतात. पण श्रमशक्तीचे मूल्य निश्चित झाल्यामुळे हे वरकड श्रम किती असणार आहेत हे काही निश्चित होत नाही. कामाच्या तासाप्रमाणे ते बदलतात. आपल्या उदाहरणामध्ये कामाचे तास ८ होते त्यामुळे ४ तास वरकड श्रम मिळत होते. परंतु श्रमशक्तीचे मूल्य तितकेच (४ श्रमतास) राहूनसुद्धा कामाचे तास ९ ही असू शकतात किंवा १० किंवा ७. आणि त्याप्रमाणे त्यातून मिळणारे वरकड श्रम बदलत असतात. म्हणून जुन्या मूल्याच्या बदल्यात त्यापेक्षा जास्त नवीन मूल्य तयार होते यामुळे व तसेच हे वरकड-मूल्य बदलत्या राशीमध्ये तयार होते यामुळे अशा दोन्ही दृष्टींनी ते बदलते भांडवल ठरते.

श्रमशक्तीचे मूल्य : वाढलेल्या उत्पादकतेचे उफराटे रूप

कायम भांडवल आणि बदलते भांडवल यांच्यातील वरील फरकाबरोबरच दुसरेही एक गृहीत वरील वरकड-मूल्याच्या विश्लेषणामागे होते. श्रमशक्तीचे मूल्य (४ श्रमतास) हे दिवसातील कामाच्या तासांपेक्षा (८ श्रमतास) कमी आहे असे आपण धरले होते. पण असे गृहीत धरण्यासाठी काही सैद्धांतिक कारण आपण दिलेले नव्हते. भांडवलदारवर्गाला नफा होत असतो हे तर याचे एक साधे सोपे कारण झालेच, पण दुसऱ्या एका दृष्टीनेही श्रमशक्तीचे मूल्य आणि कामाचे तास यांच्यामधील या तफावतीला ठोस सैद्धांतिक आधार असतो.

कामगारांच्या श्रमांमधून निर्माण होणाऱ्या उत्पादनातूनच कामगार व भांडवलदार दोघेही पोसले जात असतात. दुसऱ्या पद्धतीने सांगायचे तर, कामगारांना स्वत:ला पोसण्यासाठी लागणारे आवश्यक श्रम, ते दिवसभरात जेवढे श्रम करतात त्या श्रमांपेक्षा कमी असतात. वर्गसमाजामध्ये, शोषणावर आधारलेल्या प्रत्येक समाजामध्ये हे खरे असते की कष्टकऱ्यांच्याच श्रमातूनच बिगर कष्टकरी स्वत:ला पोसत असतात. कष्टकऱ्यांच्या श्रमाची उत्पादकता वाढलेली असते म्हणून अर्थात हे शक्य होते.

भांडवलशाहीत ही वस्तुस्थिती उफराट्या रूपात व्यक्त होते. क्रयवस्तूंच्या भाषेत तिचा अर्थ होतो तो असा—की दिवसभर काम करण्याच्या श्रमशक्तीचे मूल्य हे दिवसभरांच्या श्रमांपेक्षा कमी असते. आणि तेही अगदी क्रयवस्तूंच्या नियमांचे मुळीच उल्लंघन न करता. म्हणजे श्रमशक्ती कामाला लावून भांडवलदाराला मिळणारे श्रम हे त्या श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा जास्त असतील याची खात्री क्रयवस्तूंचे नियमच करत असतात. क्रयवस्तूंचे नियमच ४ श्रमतासांच्या बदल्यात ८ श्रमतास मूल्य मिळवण्याचा अधिकार, शोषणाचा अधिकार, भांडवलदारांच्या हातात ठेवत असतात.

३. वरकड-मूल्य, भांडवलदार व कामगार

वरकड-मूल्याचे भांडवलदारांमध्ये आपसात होणारे वाटप

उत्पादनप्रक्रियेत तयार होणारे वरकड-मूल्य नफ्याच्या रूपाने सगळ्या भांडवलदारांच्या मिळून हातात पडत असते. टेबलाचे ४० श्रमतास हे मूल्य ते विकत घेऊन त्याचा उपयोग करणाऱ्या गिऱ्हाइकाने द्यावयाचे मूल्य आहे.

त्याच्या हातात हे टेबल जाऊन पोचेपर्यंत दरम्यान जे सर्व भांडवलदार नफा कमावतात ते सर्व—व्यापारी भांडवलदार, कर्ज देणारे वित्त भांडवलदार, किंवा औद्योगिक भांडवलदार—ते या वरकड-मूल्याचा आपापला हिस्सा वेगवेगळ्या पद्धतीने उचलतात. उदाहरणार्थ, वरील टेबलाचे उत्पादन करणाऱ्या भांडवलदाराने आपल्या भांडवलाचा काही भाग कर्जाऊ घेतला असल्याने त्यावरील दिवसाचे व्याज म्हणून त्याला या ४ श्रमतास वरकड-मूल्यापैकी १/२ श्रमतास हे कर्ज पुरवणाऱ्या वित्त भांडवलदारांना द्यावे लागेल. किंवा किरकोळीने सरळ गिऱ्हाइकाला टेबल विकण्याऐवजी तो घाऊक व्यापाऱ्याला घाऊक भावाने—समजा एका टेबलाला ३९ श्रमतास मूल्य याप्रमाणे विकेल. म्हणजे त्याला स्वत:ला मिळणारे वरकड-मूल्य एक श्रमतासाने आणखी कमी होईल. किरकोळ भावाने गिऱ्हाइकाला ४० श्रमतासांप्रमाणे टेबल विकून एक श्रमतास वरकड-मूल्य व्यापारी भांडवलदार हस्तगत करतील. उत्पादन प्रक्रियेत काढले गेलेले वरकड-मूल्य यातून भांडवलदारवर्गात वाटले जात असते. भांडवलदारवर्गाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये हे वाटप कसे होते हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. आताच्या भागात आपण हा तपशील नजरेआड करून केवळ एकंदर भांडवलदारवर्ग व कामगारवर्ग यांच्यातले संबंध तपासणार आहोत. याचाच दुसरा अर्थ असाही होऊ शकतो की आपण सध्या औद्योगिक भांडवलदारवर्गालाच संपूर्ण भांडवलदारवर्गाचा प्रतिनिधी मानून चालणार आहोत.

पिळवणुकीचे माप : वरकड-मूल्याचा दर

श्रमशक्तीच्या वापरातून निर्माण होणाऱ्या वरकड-मूल्यावरून मार्क्स वरकड-मूल्याचा दर निश्चित करतो,

वरकड-मूल्याचा दर = वरकड-मूल्य/श्रमशक्तीचे मूल्य

वरील उदाहरणात तो १०० टक्के येतो. वरकड-मूल्याच्या दराला मार्क्सच्या विचारात एक वेगळे स्थान आहे. कामगार भांडवलदारांसाठी किती श्रम घालतात आणि स्वत:साठी किती श्रम घालतात यांचे ते प्रमाण असते. प्रत्यक्षात हा वरकड-मूल्याचा दर व्यक्त होत असतो तो मात्र नफ्याच्या दराच्या रूपात. आणि नफा मोजण्याचे भांडवलदारांचे निकष जसे बदलतील त्याप्रमाणे नफ्याचा दर बदलू शकतो. उदाहरणार्थ, नफा हा खर्ची पडलेल्या एकूण भांडवलाच्या प्रमाणात मोजला तर आपल्या उदाहरणात हा दर ४/३६ किंवा

११.१ टक्के पडतो. किंवा तो वर्षभराच्या नफ्याच्या वर्षभराच्या उत्पादनासाठी गुंतवाव्या लागणाऱ्या भांडवलाच्या प्रमाणात मोजता येतो. किंवा गुंतवलेल्या भांडवलामधून कर्जाऊ भांडवल वजा करून फक्त स्वतःच्या भांडवलाच्या प्रमाणात मोजता येतो. नफ्याच्या दराचे माप खुद्द भांडवली अर्थशास्त्रातच खूप धूसर बनले आहे. कोणत्याही प्रकारे नफ्याचा दर मोजला गेला तरी नफ्याच्या दरातून व्यक्त होत असतो तो वरकड-मूल्याचा दर आणि त्यामध्ये सामावलेला या दोन वर्गांतील शोषणाचा संबंध.

नियमावरहुकूम शोषण?

शोषणाचा संबंध, त्याची वैधता, म्हणजेच क्रयवस्तूच्या नियमाची वैधता हीच मुळी शेवटी भांडवली निकष मान्य करण्यावर आधारलेली आहे. इतर कुठल्याही शोषणावर आधारलेल्या व्यवस्थांप्रमाणेच भांडवलशाहीचे निकष हे ती विशिष्ट प्रकारे करत असलेले शोषण, हे भांडवलदारांचा वैध, रास्त अधिकार म्हणून खपवत असतात इतकेच. नाहीतरी सरंजामी निकषांप्रमाणे वेठ-बिगार आणि खंड हे वैधच होते. किंवा प्राचीन ग्रीक समाजाच्या कायद्याप्रमाणे द्विपाद प्राण्यांतच मोडणाऱ्या गुलामांकडून स्वतःच्या मालकीच्या गायीबैलांसारखे श्रम करून घेणे व त्याची फळे हिरावून घेणेदेखील वैध होतेच. कामगारांचे शोषण क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे घडते यातून इतकेच सिद्ध होते की कष्टकऱ्यांच्या श्रमांमधला काही भाग विनासायास, विनामोबदला हिरावून घेणारा एक नवा वर्ग या नव्या समाजव्यवस्थेच्या निकषांनुसार शोषणाचे, पिळवणुकीचे अधिकार प्राप्त करून घेत आहे. खुद्द क्रयवस्तूंचे नियम हेच भांडवलदारांच्या शोषणाचे साधन आहेत, कामगारांच्या हातात ४ श्रमतास मूल्य ठेवून त्यांच्याकडून ८ श्रमतास मूल्य उपटण्याचे साधन आहेत इतकेच यातून सिद्ध होते. आणि म्हणूनच मार्क्स वरकड-मूल्याच्या दराला पिळवणुकीचा दर असेही म्हणतो.

अर्थात, हे सर्व तेव्हाच मान्य करता येईल जेव्हा कामगारांनी भांडवलदाराला आपली श्रमशक्ती विकली, श्रम नव्हेत हे तुम्ही मान्य कराल. पण कामगार खरोखरच श्रमशक्ती विकतात की श्रम? या प्रश्नाला सामोरे जाण्याची वेळ आता झाली आहे. कारण त्या चर्चेसाठी पुरेसा स्पष्ट असा श्रमप्रक्रियेच्या विश्लेषणाचा आराखडा आता आपल्यासमोर आहे.

---

[१] ज्याप्रमाणे श्रमसामुग्रीचे जुने मूल्य राखले जाते असे मार्क्स धरतो त्याप्रमाणे श्रमशक्तीचे जुने मूल्य राखले जाते असे मार्क्स धरत नाही तर त्याच्याजागी नवे मूल्य येते असे धरतो. हा फरक महत्त्वाचा आहे. इथे श्रमशक्तीचे मूल्य ज्या प्रकारच्या क्रयवस्तूंच्या मूल्याची बेरीज आहे त्या क्रयवस्तूंची दखल घेणे आवश्यक आहे. तरच या गृहितामागचा दृष्टीकोन पूर्णपणे स्पष्ट होऊ शकतो.

लाकडापासून टेबल बनते तेव्हा लाकडातले श्रम क्रयवस्तूंमार्फत उत्पादनक्षेत्राबाहेरील उपयोगाच्या क्षेत्रापर्यंत पोचायचे असतात. आणि उत्पादन श्रमविषयांचे असो की श्रमसाधनांचे असो, त्यांच्यात साठवलेले मूल्य कालांतराने कुठल्या ना कुठल्यातरी क्रयवस्तूंमार्फत उत्पादनाबाहेरील उपयोगाच्या क्षेत्रात—सध्या आपण याला उपभोगाचे क्षेत्र म्हणूया—पोचणे भाग असते. तेथपर्यंत ते निरनिराळ्या क्रयवस्तूंमार्फत राखले जात आपला प्रवास करत असते. या उपभोगाच्या क्षेत्रात या वस्तू शिरल्या की मात्र हे मूल्य लयाला जाते. म्हणजे त्या वस्तूंचे उपयोग-मूल्य श्रमप्रक्रियेबाहेर संपते व त्याबरोबर तिचे मूल्यही नाहीसे होते. या पार्श्वभूमीवर आपण श्रमशक्ती पुन: निर्माण होण्याच्या प्रक्रियेकडे पाहू या. लाकडापासून टेबल ज्या पद्धतीने कारखान्यात उत्पादनाच्या क्षेत्रात तयार होते त्याप्रमाणे श्रमशक्ती निर्माण होत नाही. ती निर्माण होते ती उपभोगाच्या क्षेत्रात; अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींचे कोठेतरी उत्पादन होते व बाजारपेठेमार्फत त्या उपभोगाच्या क्षेत्रात शिरून कामगारांच्या वाट्याला येतात आणि त्यांच्या उपभोगाद्वारे श्रमशक्तीचे पुनरुत्पादन होते. (कामगार जगतो; काम करायला समर्थ होतो.) पण यातून अन्न, वस्त्र, निवारा यांच्यात साठवलेले संचित श्रम लयाला गेलेले असतात. कामगारांच्या उपभोगाचा भाग बनता बनता अन्न, वस्त्र, निवारा यांचे जुने मूल्य नाहीसे झालेले असते. जुने मूल्य राखले जाण्याचा येथे प्रश्न नसतो, तो नष्ट होऊन जाते. आता प्रश्न नवे श्रम करण्याचा असतो.

५. . . . पण कामगार विकतात काय?

१. श्रमशक्ती की श्रम?

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की श्रमशक्ती आणि श्रम यांच्यातला भेद हा 'कॅपिटल' ग्रंथामध्ये मार्क्स स्पष्टपणे, काटेकोरपणे व सातत्याने पाळतो. जिथे जिथे म्हणून कामगारांनी विकलेल्या क्रयवस्तूचा संबंध असतो तिथे तिथे तो स्पष्टपणे श्रमशक्ती हाच शब्द वापरतो, श्रम नव्हे. बहुतेक भांडवली टीकाकारांच्या नजरेतून तर ही गोष्ट निसटतेच पण 'कॅपिटल' वाचल्यावर मार्क्सच्या अनेक समर्थकांच्या नजरेतूनही ही गोष्ट निसटते![१] आणि याला एक महत्त्वाचे कारण आहे. औद्योगिक क्रांतीबरोबर भांडवलशाहीला वयात येऊन दोन शतके होत आहेत आणि 'राजकीय अर्थशास्त्रा' चे निव्वळ 'अर्थशास्त्र' बनले आहे. भांडवली अर्थशास्त्राची गृहिते आपल्या जाणिवेच्या पलीकडे, नेणिवेत जाऊन रुजलेली असतात. कामगार श्रम विकतात हे गृहीतही त्यातच मोडते. ती गृहिते तेथून काढून टाकण्यासाठी आज विशेष प्रयत्न करावा लागतो.

दुसरी याबद्दल लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे खुद्द मार्क्सने देखील श्रमशक्ती व श्रम यांच्यात काटेकोर भेद बऱ्याच उशीरा केला. हा भेद त्याने प्रथम केलेला आपल्याला दिसतो तो १८५८-५९ सालच्या त्याच्या लिखाणात. आज 'ग्रुंड्रिस' या नावाने इंग्रजीत उपलब्ध असलेले हे लिखाण म्हणजे कॅपिटल

या ग्रंथाची आखणी केल्यावर त्यासाठी पूर्वतयारी म्हणून वह्यांमध्ये लिहिलेला सुमारे हजारभर (छापील) पानांचा मजकूर आहे. यात मार्क्स आपल्या संकल्पनांना स्पष्टता आणण्यासाठी झगडताना दिसतो. या धडपडीच्याच एका टप्प्यावर तो श्रमशक्ती आणि श्रम या भेदापाशी पोचतो व त्यानंतर हा भेद अगदी काटेकोरपणे सतत पाळण्याइतका महत्त्वाचा मानतो.

हा भेद मूलभूत महत्त्वाचा आहे हे दाखवणारी तिसरीही गोष्ट आहे. मार्क्सने १८५८ च्या अगोदर, म्हणजे श्रमशक्ती व श्रम यांच्यातील भेद करण्याअगोदर, 'मोलमजुरी आणि भांडवल' ही पुस्तिका प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेची आज आपल्याला उपलब्ध असलेली प्रत फ्रेडरिक एंगल्सने (इंग्लंड : १८२०–१८९५) मार्क्सच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केलेली सुधारित आवृत्ती आहे. तिला लिहिलेल्या खास प्रस्तावनेत एंगल्स पूर्वीच्या आवृत्तीमध्ये श्रमशक्ती व श्रम हा भेद मार्क्सने त्या काळात न केल्यामुळे राहून गेलेली त्रुटी मान्य करतो, व प्रस्तुत सुधारित आवृत्तीत योग्य त्या जागी श्रम ऐवजी श्रमशक्ती हा बदल केलेला आहे हे नमूद करतो व तो भेद करण्याचे मध्यवर्ती कारण मांडतो. मार्क्सच्या लिखाणातील एक शब्दही शक्यतो न बदलता वाचकांपर्यंत पोचवण्याबाबत दक्ष असणारा एंगल्स या सबंध पुस्तिकेमध्ये योग्य ठिकाणी श्रम ऐवजी श्रमशक्ती हा बदल करतो यावरूनही त्याचे महत्त्व स्पष्ट होते.

इतका शब्दच्छल कशाला? असे वाटू शकते की कामगारांचे शोषण होते ही गोष्ट सिद्ध होणे एवढ्याच गोष्टीचा विचार केला तर श्रम म्हटल्याने बिघडते कुठे? आपल्या मागच्या उदाहरणात कामगारांनी विकलेल्या श्रमांचे मूल्य म्हणून त्यांच्या हातात ४ श्रमतास येतात असे धरू या. त्यांच्याकडून कारखान्यात ८ तास श्रम करून घेतले जातात. ४ श्रमतासांच्या बदल्यात ८ श्रमतास घेतले जातात हेच शोषण नाही का? श्रम विकले असे म्हणण्यातूनही हे सिद्ध होते. मग इतका शब्दच्छल कशाला? मार्क्स आणि एंगल्स यांना हा भेद इतका महत्त्वाचा का वाटावा हे शोषण सिद्ध होते का नाही एवढेच केवळ पाहून कळत नाही. त्यासाठी शोषणाच्या सिद्धांताचा आधार कोणता त्याकडे जावे लागेल. श्रमशक्ती ऐवजी श्रम हा 'शब्द' बदलून घालण्याचा अर्थ श्रममूल्याच्या सिद्धांताच्या व त्यामागच्या दृष्टिकोनाच्या संदर्भात काय होतो ते पहावे लागेल; त्यामुळे कोणत्या सैद्धांतिक अडचणींमध्ये श्रममूल्याचा सिद्धांत सापडतो तिथून सुरुवात करावी लागेल.

असे समजून चाला की कामगार श्रमच विकतात. मग कागमारांनी विकलेल्या श्रमांचे मूल्य काय? इथून दोन वाटा फुटतात. एक ॲडम स्मिथपासून रिकार्डोपर्यंत विकसित होत आलेली 'श्रममूल्याच्या सिद्धांता' ची परंपरा. ते म्हणतात की कामगारांनी विकलेल्या श्रमांचे मूल्य निश्चित करण्यासाठी कामगारांना दिवसभर श्रम करण्यासाठी काय काय लागते ते विचारात घ्यावे लागेल. त्यांना लागणाऱ्या उपजीविकेच्या साधनांच्या मूल्यांची बेरीज करावी लागेल व ही बेरीज जी येईल ते या श्रमांचे मूल्य. उदाहरणार्थ, आपल्या मघाच्या उदाहरणात ४ श्रमतास. तेव्हा ८ तास श्रमांचे मूल्य हे क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे ४ श्रमतास ठरते या निष्कर्षाशी ते पोचतात.

पण यातून श्रममूल्याच्या सिद्धांतालाच एक मोठे सैद्धांतिक खिंडार पडते. उदाहरणार्थ, गव्हाचे मूल्य समजा दर किलोमागे १ श्रमतास आहे असे त्यात गेलेल्या श्रमांची बेरीज करून काढले. पण या १ तास श्रमांचे मूल्य हे आता वरील निष्कर्षावरून १/२ श्रमतास ठरते! मग गव्हाचे मूल्य १ श्रमतास की १/२ श्रम तास? खरे तर वस्तुस्थिती अशी असते की मूल्य मापण्याची श्रमतासांची मोजपट्टीच कोलमडलेली असते. उदाहरणार्थ, सर्व लांबी फुटात मोजायची तुम्ही ठरवले आहे, आणि नंतर निष्कर्ष काढलात की एक फुटाची लांबी म्हणजे १/२ फूट तर लांबी फुटात मोजण्याला अर्थच उरत नाही! भांडवली श्रममूल्याचा सिद्धांत हेच करत असतो—श्रमतासात सर्व मूल्य मोजायचे आणि मग एका श्रमतासाचे मूल्य १/२ श्रमतास असे म्हणायचे!

यातून निघणारी दुसरी वाट ही एका भांडवलशाहीच्या वेगळ्या टीकेकडे घेऊन जाते. रिकार्डोनंतर ही वाट अर्थशास्त्रातला एक सैद्धांतिक प्रवाह म्हणून स्पष्टपणे घेतली गेली व त्यातून मार्क्सपूर्वी अस्तित्वात असलेल्या रिकार्डोवादी समाजवाद्यांचा पंथ निर्माण झाला. या प्रवाहाच्या म्हणण्याप्रमाणे कामगारांनी विकलेल्या श्रमांचे मूल्य त्यांच्या उपजीविकेच्या साधनांच्या मूल्यांवरून ठरवण्याची कसरत ही सैद्धांतिकदृष्ट्या चुकीची होती. कामगारांनी किती श्रम भांडवलदारांना दिले—८ तास. बस्, मामला सरळ आहे. क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे कामगारांना ८ श्रमतास मूल्य मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे भांडवलदार जो नफा कमवतात तो क्रयवस्तूंच्या नियमाचा भंग करून, शुद्ध लांडी लबाडी, चोरी करून.

रिकार्डोवादी समाजवाद्यांची भांडवलशाहीवरील टीका क्रयवस्तूंच्या नियमांच्या आधारेच होते. क्रयवस्तूंचे नियम हे योग्य नियम आहेत व भांडवलदार त्या

योग्य नियमांना अनुसरून कामगारांच्या श्रमांचा मोबदला देत नाहीत ही त्यांची टीका होती. आणि साहजिकच त्यांच्या या विवेचनावरून त्यांच्यासमोरील योग्य किंवा आदर्श समाजाचे चित्रही स्पष्ट होते. भांडवलदार अस्तित्वात नसलेला पण क्रयवस्तूंच्या व्यवहारावर आधारलेला समाज. आणि यामधून तो समाज प्रत्यक्षात आणण्याचा त्यांचा मार्गही स्पष्ट होत होता. क्रयवस्तूंच्या नियमांप्रमाणे सर्व व्यवहार चालेल असे पाहणे; क्रयवस्तूंचे नियम जास्तीत जास्त काटेकोरपणे पाळले जातील अशा प्रकारे, अगोदरच अस्तित्वात असलेल्या क्रयवस्तूंच्या व्यवहारात सुधारणा करणे. खुद्द क्रयवस्तूंचा व्यवहारच नष्ट करणे हे त्यांना अभिप्रेत नव्हते. रिकार्डोवादी समाजवाद्यांची सैद्धांतिक बैठक शेवटी एक सुधारणावादी बैठक होती, ती क्रांतिकारक बैठक होऊ शकत नव्हती आणि झाली नाही!

मार्क्सच्या दृष्टीने ही दोन्ही अर्धसत्ये होती. रिकार्डोवादी समाजवाद्यांप्रमाणे त्यालाही कामगारांचे शोषण होते हे मान्य होते. पण ते क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून नव्हे, तर त्या नियमांना धरूनच होते याची त्याला खात्री होती. क्रयवस्तूंचे नियम हे या व्यवस्थेचेच नियम होते; आणि कुठल्याही शोषणावर आधारित व्यवस्थेतील शोषण हे त्या नियमांना धरूनच होत असते. ते शोषण तिच्या नियमांप्रमाणे वैध ठरणे हाच त्या शोषक-व्यवस्थेचा आधार असतो. आणि त्या बरोबरच रिकार्डो इत्यादींप्रमाणे कामगारांना त्यांच्या उपजीविकेच्या साधनांचे मूल्य देणे हे क्रयवस्तूंच्या नियमांप्रमाणे वैध होते हे मार्क्सला ठाऊक होते. परंतु असे केल्यामुळे कामगारांचे शोषण होत नाही हे त्याला मान्य नव्हते. त्याला क्रयवस्तूंच्या नियमांनुसार घडणारे कामगारांचे शोषण अभिप्रेत होते; आणि सैद्धांतिक काटेकोरपणा न सोडता अशा शोषणाचा तो शोध घेत होता.

मूलभूत संकल्पनांचा आधार

आणि येथे त्याने श्रमशक्ती की श्रम या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या अगोदर घडवलेल्या मूलभूत संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. लक्षात घ्या, आतापर्यंत या प्रकरणात श्रम की श्रमशक्ती याबद्दल जी चर्चा केली त्यामध्ये मूल्य आणि उपयोग-मूल्य, मूर्त श्रम आणि अमूर्त श्रम यांच्यातील मूलभूत भेद या मार्क्सच्या संकल्पनांचा कुठेच प्रश्न आला नाही! साहजिक आहे. कारण ज्या सिद्धांतांची आपण चर्चा करत होतो त्यांच्यामध्ये या मूलभूत भेदांची जाण कुठेच नव्हती! आपण आता मूलभूत संकल्पना कामी लावून या प्रश्नाची चर्चा

करू या. कामगार आणि भांडवलदारांमध्ये ‘क्ष’ या क्रयवस्तूचा व्यवहार होतो आणि तो क्रयवस्तूंच्या नियमांप्रमाणे होतो असे धरून, यापूर्वी स्पष्ट केलेल्या मूलभूत संकल्पना राबवून आपण ‘क्ष’ ही क्रयवस्तू कोणती असावी ते ओळखण्याचा प्रयत्न करूया.

भांडवलदार कामगारांकडे जातो तेव्हा कामगारांकडे ‘क्ष’ ही गोष्ट अगोदरच असली पाहिजे. तिचे मूल्य म्हणून कामगारांच्या हातात त्यांच्या उपजीविकेच्या साधनांचे मूल्य ठेवतो; तेव्हा ती उपजीविकेच्या साधनांमधून निर्माण होत असली पाहिजे. कामगारांकडून ती विकत घेतल्यावर त्या वस्तूच्या उपयोगासाठी तो कामगारांनाच कारखान्याच्या गेटच्या आत घेऊन येतो; म्हणजे ती कामगारांपासून वेगळी काढता येणारी गोष्ट नाही. भांडवलदार बाजारपेठेतून ती वस्तू उत्पादनाच्या खाजगी क्षेत्रात येऊन आला की मग तिचा वापर सुरू होतो, आणि तिचा उपयोग सुरू झाला की तिच्यातून श्रम मिळतात. तेव्हा श्रम मिळणे हेच तिचे उपयोग-मूल्यही असले पाहिजे.

वरील कसोट्या श्रम ही गोष्ट पार पाडू शकत नाही. भांडवलदार कामगारांकडे जातात तेव्हा त्यांच्याकडे त्यांनी केलेले श्रम कुठे असतात? असते फक्त श्रम करण्याची कुवत. तसेच उपजीविकेच्या साधनांमधून श्रम निर्माण होत नाहीत, निर्माण होते फक्त श्रम करण्याची कुवत. कामगारांना गेटच्या आत ते घेऊन येतात तेव्हा भांडवलदारांच्या ताब्यात श्रम आलेले नसतातच. कामगार काम सुरू करतात त्यानंतर श्रम घडतात. तोपर्यंत भांडवलदारांच्या ताब्यात असते श्रमशक्ती, श्रम नाही.

वरील सर्व कसोट्या फक्त ‘श्रमशक्ती’ ही संकल्पनाच पार पाडू शकते. कामगारांकडे भांडवलदार येतो तेव्हा श्रमशक्ती त्यांच्या ताब्यात असते. श्रमशक्ती उपजीविकेच्या साधनांमधून निर्माण होते. ती कामगारांपासून वेगळी काढता येत नाही; म्हणूनच तिच्यासोबत कामगारांनाही गेटच्या आत येणे भाग पडते! आणि श्रमशक्तीचा वापर केला की त्यातून श्रम मिळतात; म्हणून श्रम मिळणे हे तिचे उपयोग-मूल्य असते.

सैद्धांतिक संगती

इथे रिकार्डोचा भांडवली श्रममूल्याचा सिद्धांत आणि मार्क्सचा सिद्धांत यातला फरक महत्त्वाचा बनतो. रिकार्डोदेखील मार्क्सप्रमाणेच कामगार भांडवलदारांचा व्यवहार हा क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे चालणारा वैध व्यवहार धरून चालत

असतो. पण मघाशी पाहिल्याप्रमाणे श्रम या संकल्पनेमुळे तो 'कामगारांच्या ८ तासांच्या श्रमांचे मूल्य हे ४ श्रमतास' ठरवतो आणि त्याच्या श्रममूल्याच्या सिद्धांताचे मध्यवर्ती मापच निरर्थक बनते! याउलट मार्क्सच्या विश्लेषणात हे मध्यवर्ती माप निकामी बनत नाही. त्याचा निष्कर्ष इतकाच असतो की कामगारांच्या ८ तास काम करण्याच्या श्रमशक्तीचे मूल्य हे ४ श्रमतास असते. यातून मार्क्सच्या अमूर्त श्रमांच्या मध्यवर्ती सैद्धांतिक पायाला कोणताच धक्का पोचत नसतो. भांडवलशाहीतील सर्व व्यवहारांचे सुसंगत विश्लेषण करणारा आणि शोषण सिद्ध करणारा श्रममूल्याचा सिद्धांत मार्क्स उभा करतो.

आणि हे वैज्ञानिक पाऊल पुढे टाकता टाकता टाकताच मार्क्सने एक क्रांतिकारक पाऊल टाकलेले असते. कारण आता त्याच्या मते कामगारांच्या शोषणाला खुद्द क्रयवस्तूंचे नियमच जबाबदार असतात. कामगारांच्या श्रमातून विनाश्रम मोबदला उचलण्याचा अधिकार भांडवलदारांना तेच बहाल करत असतात. या सुसंगत दृष्टिकोनातून कामगारांचे शोषण नाहीसे करण्याचा मार्ग म्हणजे क्रयवस्तूंच्या व्यवहाराचेच उच्चाटन करणे हा असतो, तो व्यवहार सुधारणे नव्हे. श्रमशक्ती ही मार्क्सची संकल्पना मार्क्समध्ये अविभाज्यपणे नांदणाऱ्या वैज्ञानिक आणि क्रांतिकारक प्रेरणांचे फळ ठरते.

पैशाचे तिपदरी उपयोग–मूल्य

पहिल्या प्रकरणात आपण असे म्हटले होते की पैसा आणि श्रमशक्ती या दोन क्रयवस्तूंपाशी भांडवली मूल्यसिद्धांत कसाला लागतात. गणिताची साधी समज जशी 'उणे चार' (–४) या संख्येचे वर्गमूळ काढण्यापाशी कोलमडते तसे कोलमडतात. कारण क्रयवस्तूंच्या जगात पैसा आणि श्रमशक्ती या क्रयवस्तू इतर क्रयवस्तूंप्रमाणे सरळसोट प्रकारे, सोपेपणाने समजून घेता येत नाहीत. अर्थव्यवहारात पार पाडायच्या निरनिराळ्या प्रकारच्या भूमिका त्यांना चिकटलेल्या असतात आणि त्यातून निरनिराळ्या प्रकारचे परस्परविरोधी, परस्परांना काटशह देणारे संबंध एकाच गोष्टीत एकत्र गोठत असतात.

पैशाचे उदाहरण घ्या. पैसा म्हणून नव्हे तर खुद्द सोने हा धातू म्हणून विचार केला तर सोन्याच्या नैसर्गिक गुणधर्मावर सरळसरळ आधारलेले असे एक मूलभूत उपयोग–मूल्य त्याला असते. त्याची पिवळीधमक चमक, त्याचे पातळात पातळ पापुद्रे वा तार बनवता येण्याचा गुणधर्म, त्याचा टिकाऊपणा हा त्याच्या दागिने बनवण्यासाठी असलेल्या उपयोगाचा, त्याच्या उपयोग–मूल्याचा

आधार असतो. हेच सोने पैसा म्हणून वावरू लागले की त्याचे निर्णायक उपयोग-मूल्य काय असते? तर त्याच्यातील मूल्याचा साठा. त्याच्या नैसर्गिक उपयोग-मूल्यावर क्रयवस्तूंचा व्यवहार आणखी एका 'उपयोग-मूल्या'चा पदर चढवतो. इथे त्याच्या मालकाला त्याचे उपयोग-मूल्य असते ते त्याचे मूल्य! मूल्य आणि उपयोग-मूल्य या मूलतः परस्परविरोधी गोष्टी जणू एकच बनतात. याही पुढे हाच पैसा एखाद्या भांडवलदाराच्या हातात भांडवल बनून पैशाचा दुसरा आलेख गिरवू लागला की त्याच्या या दोन उपयोग-मूल्यांवर एक तिसरा 'उपयोग-मूल्या'चा पदर चढतो. या भांडवल बनलेल्या पैशाच्या मालकाला पैसा फक्त मूल्याचा साठा असून उपयोग नसतो, त्याच्या दृष्टीने त्या पैशाचे उपयोग-मूल्य असते ते त्या मूल्याच्या साठ्यात होणारी वाढ किंवा वरकड-मूल्य उर्फ नफा! पैशाच्या 'उपयोग-मूल्या'मध्ये हे निरनिराळ्या वर्गांचे अंतर्विरोधी हेतू व संबंध एकत्र होऊन गोठलेले असतात. पैशाच्या मागे जाऊन त्याच्या ठायी गोठलेल्या या संबंधांची समज करून घेणे आवश्यक असते. क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाचा भेद करून जाणे आवश्यक असते. तरच या सर्व गोंधळाची उकल होऊन पूर्ण संगती लागणे शक्य असते. आणि भांडवली विचार नेमका इथेच अपयशी ठरतो.

पैसा आणि श्रमशक्ती यांपैकी पैशाशी भांडवलदारांचे आणि भांडवली विचारांचे फार जवळचे नाते असते. त्या पैशाभोवतीच सर्व क्रयवस्तू फिरत असतात (आणि या क्रयवस्तूंपैकी एक श्रमशक्ती ही असते!). त्यामुळे पैशाची तीन कार्ये वगैरे बद्दल काही ना काही गोष्टी भांडवली अर्थशास्त्र तपासते, विश्लेषणाची काही एक मजल ते त्यात गाठते. त्या मानाने श्रमशक्ती ही मात्र त्यांच्या दृष्टीने अधिक परकी गोष्ट असते आणि तिचे पैशाइतक्या खोलात जाऊन विश्लेषण करायची त्यांना गरजही भासत नाही. दैनंदिन व्यवहाराच्या पातळीवर कदाचित भासली तरी मूलतत्त्वांच्या पातळीवर तर नाहीच नाही! अन् तरीही श्रमशक्ती ही पैशाइतकीच संमिश्र, अंतर्विरोधपूर्ण अशी चीज असते.

. . . अन् श्रमशक्तीचेही

श्रमशक्तीच्या उपयोग-मूल्यालाही तीन पदर असतात. जेव्हा मी स्वतः चहा करतो व पितो तेव्हा मी माझ्या श्रमशक्तीचा वापर करत असतो. श्रमशक्तीमधून मी चहा बनवण्याचे मूर्त श्रम काढलेले असतात. श्रमशक्तीचे मूलभूत उपयोग-मूल्य असते मूर्त श्रम करण्याची कुवत. तेच समजा मी एखादे ठिकाणी एक लहानसे चहाचे दुकान टाकले व स्वतः चहा बनवून गिऱ्हाइकांना विकू

लागलो. आता देखील माझ्या श्रमशक्तीचे चहा बनवण्याचे मूर्त श्रम उपलब्ध करून देण्याचे उपयोग-मूल्य कायम आहे. पण माझ्या दृष्टीने आता ते मूर्त श्रम महत्त्वाचे नाहीत. कारण मी थोडाच तो सगळा चहा पिणार आहे? माझ्या दृष्टीने त्या श्रमांच्या मूर्त स्वरूपाला उपयोग नाही. मला त्या श्रमशक्तीचा उपयोग चहामध्ये अमूर्त श्रम साठवून, तो चहा विकून माझ्या उपयोगाच्या वस्तू मिळवण्यात आहे. श्रमशक्तीच्या उपयोग-मूल्याला इथे आणखी एक पदर मिळतो. या ठिकाणी श्रमशक्तीचे उपयोग-मूल्य आहे ते संभाव्य अमूर्त श्रमाचा साठा म्हणून. आता असे समजा की मी एक मोठे चहाचे हॉटेल टाकले व चार शेगड्यांवर चार माणसांना चहा बनवून गिऱ्हाइकांना देण्याच्या कामावर लावले. आता मूर्त श्रम श्रमशक्तीतून मिळत आहेतच, आणि ते त्याचवेळी अमूर्त श्रम म्हणून चहामध्ये मूल्याच्या रूपाने साठतही आहेत. पण केवळ इतक्याने आता मला समाधान होत नाही. आता त्यातून मिळणारे अमूर्त श्रम हे त्या श्रम शक्तीच्या मूल्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. नाही तर हॉटेल टाकण्यात फायदा काय? श्रमशक्तीच्या उपयोग-मूल्याला इथे तिसरा एक पदर लाभतो. इथे श्रमशक्तीचे उपयोग-मूल्य असते वरकड-श्रमांचा साठा म्हणून! निरनिराळ्या वर्गीय स्थानावरून बघता, श्रमशक्तीशी त्यांच्या असणाऱ्या वेगवेगळ्या नात्यांतून तयार होणाऱ्या अंतर्विरोधपूर्ण-परस्परविरोधी उपयोग-मूल्याचे पदर तिच्या मूलभूत उपयोग-मूल्यावर चढतात. या पदरांची गल्लत होऊ शकते. श्रमशक्तीऐवजी कामगार श्रम विकतात असे म्हणताना या तिसऱ्या पदराची व दुसऱ्या पदराची गल्लत होत असते. बिगरभांडवली क्रयवस्तू उत्पादनामध्ये श्रमशक्तीला जे स्थान व उपयोग मूल्य असते त्याची भांडवली उत्पादनामध्ये श्रमशक्तीच्या असलेल्या स्थानाशी व उपयोग-मूल्याशी गल्लत होत असते.

२. श्रमशक्तीच्या विक्रीचा अर्थ काय?

बिगरभांडवली श्रमांची विक्री

श्रमांची विक्री व श्रमशक्तीची विक्री यांमध्ये नेमका फरक येथेच आहे. श्रमशक्ती क्रयवस्तू बनणे आणि मोलाने मजूर भेटणे या दोन्ही गोष्टी एक नाहीत. बिगरभांडवली संबंधांमध्येदेखील मोलाने मजूर मिळू शकतात व अशा वेळी ते खरोखरच श्रम विकत असतात. टेबलाचे उदाहरणच घ्या. समजा की तुम्हाला एका सुताराकडून टेबल बनवून घ्यायचे आहे. लाकूड वगैरे सामान तुमच्याकडे

आहे. तुम्ही सुताराला बोलावता. कसे, कोणत्या मापाचे टेबल बनवायचे ते सांगता. भाव ठरवता. सुतार अवजारे घेतो आणि टेबल बनवतो. पैसे घेतो. आणि व्यवहार संपतो. इथे खरोखरीच सुताराने श्रम विकले होते. आता कल्पना करा की तुम्ही टेबले बनवण्याचा कारखाना टाकला आहे आणि तो सुतार त्या कारखान्यात कामगार बनला आहे. तुम्ही त्याला टेबल बनवायला सांगता; कसे, कोणत्या प्रकारचे, मापांचे ते सांगता. तो अवजारे घेतो, टेबले बनवतो व दिवसअखेर (किंवा महिनाअखेर) पगाराचे पैसे घेऊन जातो. दोन्ही व्यवहार वरवर सारखेच दिसतात आणि आताही सुताराने श्रमच विकले आहेत असा भास निर्माण होतो.[२]

पण या दोन्ही व्यवहारांमध्ये महत्त्वाचे फरक असतात. पहिल्या व्यवहारात तुम्ही सुताराला तुझी पटाशी अशीच धर, करवत तशी धरू नकोस, बिडी किती वेळ फुंकतोस, इत्यादी काही सांगण्याचा किंवा त्याबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार तुम्हाला पोचत नाही. तुम्ही श्रमशक्तीचा श्रमप्रक्रियेमध्ये कसा वापर व्हावा यावर या व्यवहारातून ताबा मिळवलेला नसतो. यालउट दुसऱ्या व्यवहारामध्ये कामगाराने पटाशी कशी धरावी, करवत कशी धरू नये, बिडी किती वेळ फुंकावी हे सांगण्याचा तुम्हाला अधिकार असतो. कारण तुम्ही त्याची श्रमशक्तीच विकत घेऊन ताब्यात घेतलेली असते. आणि श्रमशक्ती म्हणजेच खुद्द कामगार असल्यामुळे, श्रमशक्तीचे मूल्य देऊन त्या एका माणसाला तुमच्या इच्छेप्रमाणे काम करायला लावण्याचा अधिकार तुम्ही कमावलेला असतो. श्रम विकत घेण्यापेक्षा हे वेगळे आहे.

श्रमासाठी लागणारी श्रमसाधने

वरील दोन्ही व्यवहारांमध्ये वरकड श्रम निर्माण करणे या श्रमशक्तीच्या तिसऱ्या उपयोग-मूल्याला आधारभूत असा एक दुसरा फरकदेखील असतो. पहिल्या व्यवहारात सुतार स्वतःच्या मालकीची अवजारे वा श्रमसाधने घेऊन आलेला असतो. यालउट दुसऱ्या व्यवहारात अवजारे तुमच्या मालकीची, तुमच्या कारखान्यात असतात. श्रमशक्तीच्या रूपात तुमच्या ताब्यात असलेल्या कामगाराच्या हातात तुम्ही ती देता; पण तुमच्या निर्देशनाखालीच वापरण्यासाठी. कामगारांना एक दिवसाचे श्रम करण्यासाठी उपजीविकेची साधने आवश्यक नसतात. उपजीविकेच्या साधनांनी कसले श्रम करणार? ती त्यांच्या श्रमशक्तीसाठी आवश्यक असतात. एक दिवसाच्या श्रमांसाठी आवश्यक

असतात ती श्रमसाधने, उपजीविकेची साधने नव्हेत. आणि तीच त्यांच्याकडे नसतात.

मार्क्सने मांडलेल्या एकेका संकल्पनेमागे एक एक संपूर्ण ऐतिहासिक कालखंड सामावलेला असतो. भांडवली उत्पादनात श्रमशक्ती ही क्रयवस्तू म्हणून उपलब्ध असते, या गृहीतामागे एक प्रचंड ऐतिहासिक उलथापालथ दडलेली असते. वरील उदाहरणावरून हे दिसते की क्रयवस्तूंच्या व्यवहारात मोलाने श्रमशक्ती उपलब्ध व्हायची असेल तर श्रमणाऱ्यांचे श्रमसाधनांशी एक वेगळे नातेदेखील तयार व्हावे लागते. क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये उभे असूनदेखील श्रमणाऱ्यांच्या हातात श्रमसाधने नसणे आवश्यक असते. त्यांच्याजवळ हा श्रमसाधनांचा अभाव निर्माण झाला की हे श्रमसाधनांपासून 'स्वतंत्र' झालेले, अलग केले गेलेले कामगार श्रमशक्ती ही आपल्या जवळची एकमेव क्रयवस्तू घेऊन बाजारात येतात. फक्त मोलाने श्रम विकले जायचे असतील तर हा वास्तवातील आधार आवश्यक नसतो. पण श्रमशक्ती विकण्यासाठी तो आवश्यक असतो, आणि म्हणूनच श्रमशक्ती ही क्रयवस्तू बनणे हे स्वत:च्या पायावर उभ्या असणाऱ्या भांडवलशाहीचे व्यवच्छेदक लक्षण असते.

श्रमशक्ती क्रयवस्तू केव्हा बनते? भांडवली अर्थशास्त्रीय विचार श्रमशक्ती या कल्पनेपर्यंत जाऊन पोचू शकत नाही. यामागे त्याच्या स्वातंत्र्याविषयीच्या कल्पना देखील गुंतलेल्या असतात. अशा भांडवली स्वातंत्र्याला दुहेरी धार असते. एका बाजूला भांडवलशाही क्रांतिकारक पद्धतीने श्रमिकवर्गांची भांडवलीपूर्व बंधने मोडून काढत, ती मोडून काढण्याचा पुरस्कार करत येते. वेठ, खंड, धार्मिक अधिष्ठान असलेल्या खंडण्या, गुलामी अशा भांडवलीपूर्व बंधनांचा ती उच्छेद करते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांचे निशाण रोवणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये दिसणारे हे तिचे क्रांतिकारक रूप आहे. पण त्याचवेळी हे स्वातंत्र्य क्रयवस्तूंच्या व्यवहाराचे स्वातंत्र्य असते, खाजगी मालकीचे स्वातंत्र्य असते आणि ते क्रयवस्तूंच्या व्यवहाराचे नियंत्रण, खाजगी मालकीचे प्रभुत्वही प्रस्थापित करत असते. आता प्रत्येक गोष्टीसाठी दाम मोजावा लागतो. काही तरी विकण्याचे बंधनही त्याचवेळी निर्माण होते.

भांडवलीपूर्व व्यवस्थेच्या पोटातच त्या वेळपर्यंत दुसरीही एक प्रक्रिया पुढे गेलेली असते. श्रमणारे श्रमसाधनांपासून तोडले गेलेले असतात. हे कसे होते याचा इतिहास आपण नंतर पाहणार आहोत. सध्या हे घडते याची नोंद घेणे इतकेच आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. श्रमांतून क्रयवस्तू निर्माण करून त्या

विकाव्यात म्हटले तर श्रमसाधने नसतात, आणि काही तरी विकल्याशिवाय उपजीविकेची साधने मिळणार नसतात. अशा वेळी श्रमणाऱ्यांना त्यांच्याजवळ उरलेली एकमेव गोष्ट—श्रमशक्ती—बाजारात आणणे भाग पडते. क्रयवस्तूंच्या व्यवहाराचे प्रभुत्व, श्रमसाधनांपासून झालेली फारकत, आणि 'मुक्त' बाजारपेठेमुळे श्रमशक्तीच्या वापरावरील नष्ट झालेली भांडवलीपूर्व बंधने हे सर्व मिळून कामगारवर्गाला आपली श्रमशक्ती विकायला भाग पाडत असतात. हा प्रचंड ऐतिहासिक बदल श्रमांऐवजी श्रमशक्ती विकली जाण्याच्या संकल्पनेत सामावलेला असतो.

आशयाचे नेमके उलटे रूप

श्रमशक्ती ही क्रयवस्तू बनून उपलब्ध होणे हा भांडवली स्वातंत्र्याचाच आविष्कार आहे. श्रमशक्तीची ही खरेदी-विक्री कामगारांच्या दररोजच्या आयुष्याचा एक भाग भांडवलदारांच्या ताब्यात देत असते; त्यांचे शोषण करत असते. पण शोषण व्यक्त होते ते मात्र एक नवे स्वातंत्र्य मिळाल्याच्या रूपात. पूर्वी श्रमिकांना आपली श्रमशक्ती विकायला कुठे स्वातंत्र्य होते? हे नवे स्वातंत्र्य एका प्रकारे शोषणाच्या आशयाचे रूप बनलेले असते.

हा आशय व रूप यांचा उफराटा संबंध वरकड-मूल्यालाही लागू होतो. वरकड-मूल्य हे नफ्याच्या रूपात व्यक्त होते. वरवर पाहता नफा म्हणजे भांडवलाचा योग्य मोबदला असतो! या रूपाच्या संदर्भात कायम भांडवल, बदलते भांडवल हे भेदही गौण असतात; कारण श्रमसामुग्रीच्या रूपातले कायम भांडवल हेही भांडवलदारांचे असते आणि काम करणाऱ्या श्रमशक्तीच्या रूपातले बदलते भांडवलही त्यांचेच असते. त्यांच्या दृष्टीने त्यांचे एकूण भांडवलच एकत्रितपणे काम करत असते आणि शेवटी वरकड-मूल्य त्यामधून निघते. त्यामुळे ही वरकड-मूल्य काढण्याची शक्ती त्यांच्या लेखी त्यांच्या भांडवलाचीच असते. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या मूळ भांडवलाचे मूल्य राखले जाणे व वरकड-मूल्य निघणे ही दोन्ही कार्ये कामगारांच्या श्रमांच्या मूर्त आणि अमूर्त स्वरूपांमधून पार पाडली जात असतात. कामगारांच्या श्रमांची ही शक्ती व्यक्त मात्र होत असते ती नफा या रूपात भांडवलाची शक्ती म्हणून, भांडवलदारांच्या हातात असलेल्या दुसरा आलेख गिरवणाऱ्या पैशाची शक्ती म्हणून!

क्रयवस्तू विरुद्ध माणूस

शेवटी श्रमशक्ती या क्रयवस्तूमार्फत माणसेच एका साच्यात कोंबली जात असतात. भांडवलदारांसाठी उपलब्ध असलेली श्रमशक्ती म्हणून माणसेच दुसऱ्याच्या ताब्यात दररोज दिली जात असतात. हे वैशिष्ट्य श्रमशक्ती या एकमेव क्रयवस्तूचे असते, आणि या क्रयवस्तूचे गिऱ्हाईकही एकमेव असते. भांडवलदारवर्गाखेरीज श्रमशक्ती या क्रयवस्तूला इतर गिऱ्हाईकच नसते! इतर वस्तूंप्रमाणेच माणसांचेही भांडवलशाही क्रयवस्तूत रूपांतर करत असते. क्रयवस्तू म्हणून इतर क्रयवस्तूंच्या पातळीवर आणत असते. पण या 'वस्तू' मधला मानवी आशय नेहमी हे बंधन फोडून बाहेर पडायचा प्रयत्न करत असतो; हा प्रयत्न या क्रयवस्तूच्या बाबतीत भांडवलदारांना येणाऱ्या अडचणींतून व्यक्त होतो.

श्रमशक्ती विकली म्हणून काही श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीतल्या अडचणी संपत नाहीत. कांद्यांचा किंवा बटाट्यांचा विक्रेता कांदे विकतो, ते गिऱ्हाईकाच्या हवाली करतो आणि घरी जातो. त्याचा आणि त्यांनी विकलेल्या क्रयवस्तूचा संबंध संपलेला असतो. कामगार श्रमशक्ती भांडवलदाराच्या हवाली करून कुठे जाणार? त्याची श्रमशक्ती म्हणजे त्याचे शरीर—तो स्वत:! श्रमशक्ती भांडवलदाराच्या हवाली करायची तर त्याला स्वत:ला अख्खेच्या अख्खेच भांडवलदाराच्या हवाली करावे लागते. कारखान्याच्या आत प्रवेश करते ते कामगाराचे एक अंतर्विरोधपूर्ण गाठोडे. ते क्रयवस्तू बनलेले श्रमशक्तीचे गाठोडेही असते व माणूसही. अडचण अशी तयार होते की श्रमशक्ती या क्रयवस्तूचे अधिकार कुठे संपतात आणि या माणसाचे अधिकार कुठे सुरू होतात हे कुठेच स्पष्ट नसते.

कामगाराने दिवसात किती काम करायचे, आठ तास ही दहा की बारा? यंत्राच्या फिरणाऱ्या पात्यांमुळे त्याला इजा होऊ नये म्हणून यंत्राला संरक्षक बसवून जास्त भांडवल गुंतवणे आवश्यक धरायचे की नाही? एकाच खोलीत वीस माणसे डांबल्यामुळे हवा कोंदट व रोगट झाली तर जास्तीची खोली भाड्याने घ्यायची का? त्याने पाळीवर आल्यावर यंत्रे साफ करायची का पाळी अगोदर अर्धा तास हजर होऊन पाळीच्या वेळी मशीन 'रेडी' ठेवायचे? काम करताना दम खायला, तरतरी आणायला बिडी ओढण्यात वेळ 'वाया' घालवायचा का? त्याला बनवायला सांगितलेला जॉइंट बेकार आहे हे माहीत असेल तर तो जॉइंट चांगला व्हावा म्हणून जास्त वेळ आणि सामुग्री त्याने

घालायची का? तो निर्माण करत असलेले उत्पादन निरुपयोगी आहे इतकेच नव्हे तर अपायकारक आहे हे माहीत असेल तर हे असले उत्पादन करणे त्याने थांबवायचे का नाही? एक ना दोन, अनेक 'अडचणी' सतत डोके वर काढू लागतात. कशाच्या आधारे ठरवायचे हे सगळे? क्रयवस्तूंच्या नियमांच्या आधारे की माणूस म्हणून, की या समाजाचा एक घटक म्हणून, एक नागरिक म्हणून?

हे प्रश्न उभे रहायला एकदा सुरुवात झाली की भांडवलशाहीचा एक वेगळाच पैलू विशेष करून पुढे येतो. हा पैलू प्रकर्षाने प्रथम पुढे येतो तो या यादीतल्या पहिल्या प्रश्नावरून. कामाच्या दिवसातले कामाचे तास किती? चार तास, सहा तास, आठ तास, बारा तास की आणखी काही? आणि कां? या प्रश्नाला उत्तर कसे व कोणते मिळते हे पुढच्या प्रकरणात पाहू.

---

[१] इथे हेही नमूद करणे आवश्यक आहे की प्रस्तुत लेखकाच्या नजरेतूनही ही गोष्ट पहिल्या वाचनात निसटलेली होती, या व अनेक इतर 'नजरचुकांबद्दल' प्रस्तुत लेखक स्वानुभवातून बोलतो आहे.

[२] श्रमशक्तीऐवजी श्रम विकले जातात असा विचार तयार व्हायला आणखी एक महत्त्वाचा आधारदेखील असतो. हा आधार श्रमशक्तीच्या खरेदीविक्रीच्या खास पद्धतीत तयार होतो. श्रमशक्ती कामगार नेहमीच उधारीवर विकतात. कामगार अगोदर स्वतःची श्रमशक्ती विशिष्ट काळासाठी (एक दिवस, एक आठवडा किंवा एक महिना इ.) भांडवलदारांच्या ताब्यात देतो, त्याला ती वापरू देतो व नंतर तिचे मूल्य त्याला मिळते. नोव्हेंबरचे वेतन डिसेंबरमध्ये दिले जाते. श्रमशक्ती ही एकमेव क्रयवस्तू आहे की जिची विक्री ही अपरिहार्यपणे उधारीवरच होते! त्यामुळे जेव्हा कामगाराच्या हातात वेतन पडते तेव्हा त्याआधीच श्रम काढले गेलेले असतात. साहजिकच अगोदरच्या ताब्यापेक्षा (भांडवलदारांच्या व कामगारांच्याही मनावर) ठसते ते हेच की त्याने श्रम दिले, पैसे घेतले! या उधारीचा ताबडतोबीचा फायदा म्हणजे तिच्यामुळे मालकाच्या चक्क वाचणाऱ्या पैशाच्या रूपातला फायदा. हा देखील काही नगण्य नसतो. एखाद्या भांडवलदाराच्या कारखान्यात ५०० रु. दरमहा पगारावर २०० कामगार राबत असतील तर रोखीचा व्यवहार करण्यासाठी त्याला जे

भांडवल हातावर ठेवावे लागणार असते त्यावरील वाचलेल्या भांडवलावर १८% दराने व्याजाच्या रूपात सरळ तीन कामगारांचे वेतन सुटते!

६. निव्वळ वरकड मूल्य: दिवसातले कामाचे तास किती?

आज या प्रश्नाचे उत्तर 'स्वाभाविकपणे'च दिले जाते—अर्थातच आठ तास.

प्रत्यक्षात कुठे १० तर कुठे १२ तासही काम घेतले जात असेल. पण कामाचे तास किती असावेत, म्हटले की आज आपल्याकडे आपसूक तोंडी येणारे उत्तर म्हणजे ८ तास. आणि याला कारण फॅक्टरी अॅक्ट. आता हा कायदा बहुसंख्य कामगारांना भारतात मुळात लागूच होत नाही ती गोष्ट सोडा. किंवा जिथे तो लागू होतो तिथेही ओव्हरटाईम, स्प्रेडओव्हर आणि अपवादात्मक कलमांचा वापर होऊन तो धाब्यावर बसवला जाऊ शकतो व जातो हेही सोडा. किंवा कित्येकांच्या मनामध्ये, लहान उद्योगधंद्यांमध्ये व शेतीमध्ये असा कायदा राबवला तर परवडेल का आणि परवडत नसेल तरी तो राबवायचा का, या शंकेचा मधून मधून उठणारा शूळही बाजूला ठेवू या. एक मात्र खरे, की कामाचे तास म्हणजे ८ तास अशी, निदान ते आठच असावेत अशी साहजिक समज आज सर्वत्र तयार झाली आहे.

पण हा '८ तास' हा जादूचा आकडा आला कुठून? 'फॅक्टरी अॅक्टमधून' हे या प्रश्नाचे उत्तर, निदान वरवर पाहता तरी, क्रयस्तूंच्या नियमावर आधारलेले नाही. मगाचच्या उदाहरणातल्या टेबलाचे मूल्य म्हणजे १४ श्रमतास हे काही कुठल्याही सरकारी कायद्याच्या कलमाप्रमाणे ठरलेले नव्हते. ते ठरले होते ते

आर्थिक बाबींवरून—अमुक इतक्या सामाजिक श्रमांनी त्या क्रयवस्तूंचे रूप घेतल्यामुळे. तेव्हा कामाचे तास किती याचा फॅक्टरी ॲक्टची कलमे नजरेआड करून काय अर्थ निघतो, कामाचे दिवस किती ठरतात, हे आपल्याला पहायला पाहिजे.

दुसऱ्या एका पद्धतीने आपण हा प्रश्न मांडायचा प्रयत्न करू. दिवसाच्या कामाच्या तासांचे चित्र आपण एका सरळ रेषेने दाखवूया आणि तिची लांबी ही श्रमतास दाखवते असे धरूया. तसे केले तर आपल्याला खालील चित्र दिसेल.

अ ब क

अक = दिवसातले एकूण कामाचे तास = ?

अब = आवश्यक श्रमकाळ = श्रमशक्तीचे मूल्य

बक = वरकड मूल्य = ?

चित्रातल्या या रेषेबद्दल एक गोष्ट स्पष्ट आहे. 'क' हा बिंदू 'अ' आणि 'ब' च्या मध्ये असू शकत नाही. कारण तसे झाले तर वरकड-मूल्य कुठले? श्रमशक्तीचे मूल्य निश्चित झालेले आहे असे धरले म्हणजे 'अब' ही लांबी निश्चित झाली. 'अब'च्या पलीकडे देखील कामाचे तास वाढवण्याचा अधिकार भांडवलदाराला आहे. या अधिकारामुळेच तर त्याला 'बक' इतके वरकड-मूल्य मिळू शकते. पण ते जास्तीतजास्त किती असू शकते? श्रमशक्तीच्या उपयोगाला काय मर्यादा आहेत?

क्रयवस्तूंचा अधिकार : श्रमशक्तीचा 'मुक्त उपयोग

फॅक्टरी ॲक्टसारखे कायदे बाजूला ठेवले तर उरणाऱ्या मुक्त स्पर्धेमध्ये क्रयवस्तूंच्या नियमांना अनुसरून मिळणारे या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट असते—शक्य तितका उपयोग. भांडवलदाराने लोखंड विकत घेतलेले असते. क्रयवस्तूंच्या नियमांनुसार त्याच्या तुकड्या अन् तुकड्याचा उपयोग पूर्णपणे श्रमप्रक्रियेत करण्याचा त्याला अधिकार असतो. अगदी त्याप्रमाणेच एक दिवसाच्या श्रमशक्तीचा उपयोग करण्याचा त्याला अधिकार पोचतो. मार्क्सच्या 'कॅपिटल' या ग्रंथामध्ये कामाच्या तासांवर साठ पानी प्रकरण आहे. इंग्लंडमधील सरकारी पाहण्यांच्या दस्तऐवजांवरून श्रमशक्तीच्या मुक्त उपयोगातून काय निघते याची १९व्या शतकातील बाल मजुरांची अनेक उदाहरणे त्या प्रकरणामध्ये मार्क्स देतो. त्यातील केवळ काही मासलेवाईक उदाहरणे आपण या ठिकाणी पाहूया.

नऊ वर्षे वयाच्या विल्यम वुडने तो ७ वर्षे १० महिने वयाचा असताना कामाला सुरुवात केली. तो सकाळी ६ वाजता कामवर रुजू होई व रात्री ९ वाजेपर्यंत आठवड्यातले सहा दिवस काम करी.

बारा वर्षे वयाचा मरे सांगतो, 'मी सकाळी सहा वाजता रुजू होतो. कधीकधी पहाटे चार वाजता. मी गेली रात्रभर सकाळी सहा वाजेपर्यंत काम केले. त्याच्या आदल्या रात्रीपासून मी झोपलेलो नाही ... रात्री काम करण्याबद्दल जास्ती पैसे मिळत नाहीत. मी गेल्या आठवड्यात दोन रात्री काम केले.'

लाइटबोर्न सांगतो, 'मी १३ वर्षांचा आहे. गेल्या हिवाळ्यात आम्ही रात्री नऊपर्यंत काम करत असू, त्या अगोदरच्या हिवाळ्यात रात्री दहापर्यंत. गेल्या हिवाळ्यात पायावरच्या सुजेमुळे मी रोज रात्री रडत असे.'

जी. ॲप्सडेन म्हणतो, 'हा माझा मुलगा ... जेव्हा हा ७ वर्षांचा होता तेव्हा मी त्याला पाठीवर घालून बर्फातून कामावर नेई आणि ... अनेकदा तो मशीनपाशी उभा असतानाच मी वाकून त्याला भरवत असे, कारण तो मशीन सोडूही शकत नसे किंवा थांबवूही शकत नसे.'

लीच सांगतो, 'गेल्या हिवाळ्यात १९ पैकी ६ मुली अतिश्रमांमुळे आजारी पडून कामावर येऊ शकल्या नाहीत. त्यांना जागे ठेवण्यासाठी मला त्यांच्यावर सतत ओरडावे लागे.'

कामगारांच्या आयुष्याची 'मुक्त' उधळपट्टी

लोखंडाच्या उपयोगाला त्याच्या नैसर्गिक गुणधर्माची घालून दिलेली स्पष्ट मर्यादा असते. व तिच्यात बदल होऊ शकत नाही. एक टन लोखंडातून किती वस्तू तयार होतील ते अगदी स्पष्ट व ठरलेले असते. याउलट माणूस हा निसर्गत: एक अतिशय चिवट प्राणी आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देऊन, लवचिकपणे, आपल्या शारीरिक शक्तीचा कमीजास्त वापर करीत निकराने लढून परिस्थितीवर मात करण्याची त्याची क्षमता आश्चर्यकारक असते. अनेक नैसर्गिक आणि शारीरिक आपत्तींमधून जिवंत परत आलेल्या माणसांच्या चित्तथरारक सत्यकथा या काल्पनिक कथांपेक्षाही अद्भुत असतात. माणसांच्या या चिवटपणाला भांडवलशाहीमध्ये एक उफराटा अर्थ येतो. श्रमशक्ती या क्रयवस्तूचा शक्य तितका उपयोग भांडवलदाराने करून घेणे म्हणजे कामगारांच्या या चिवटपणाची अंत पाहणारी एक आपत्तीच बनते! या मुक्त उपयोगाचे दूरगामी परिणामही मार्क्स दस्तऐवजांवरून उद्धृत करतो.

१८६३ साली चिनीमातीची भांडी बनवणाऱ्या कारखान्यांमधील कामगारांबद्दल डॉ. आर्लेज म्हणतात, 'ते उंचीने खुरटलेले असतात. त्यांचे शरीर बेडौल असते आणि छाती खपाटी गेलेली असते. ते अकाली म्हातारे होतात आणि त्यांची आयुर्मर्यादा निश्चितच कमी असते. ते दम्याने पछाडलेले असतात आणि त्यांच्या शरीरात रक्त कमी असते ... वेळोवेळी अपचनाच्या, मूत्रपिंडाच्या, यकृताच्या विकारांचा त्यांच्यावर सातत्याने व तीव्रतेने हल्ला होतो. ... परंतु सर्व रोगांमध्ये न्युमोनिया, क्षय, ब्राँकायटिस व दमा इत्यादी छातीच्या विकारांनी ते जास्त लवकर पछाडले जातात. एक जो रोग त्यांच्यात विशेष आढळून येतो तो म्हणजे ज्याला 'भांडीवाल्यांचा दमा' किंवा 'भांडीवाल्यांचा क्षय' असेच म्हणतात. चिनीमातीची भांडी बनवणाऱ्यांपैकी दोन तृतीयांश लोकांना मणके, हाडे किंवा शरीराचे इतर भाग यांच्या क्षयाची भावना होते.' इत्यादी.

आणि त्याच वर्षी फेरांड हा लोकप्रतिनिधी इंग्लिश लोकसभेत म्हणतो, 'कापडगिरण्यांचा धंदा (इंग्लंडमध्ये) तीन पिढ्या जुना आहे आणि मला वाटते की आपण नि:शंकपणे असे म्हणू शकतो की या काळात (या धंद्याने) फॅक्टरीकामगारांच्या नऊ पिढ्या खतम् केल्या आहेत.'

मार्क्सच्या कामाच्या तासावरील प्रकरणातल्या उदाहरणांचा हा केवळ मासला झाला. ही सर्व उदाहरणे १९व्या शतकाच्या मध्यावरील इंग्लंडमधील उदाहरणे आहेत व अनेक उदाहरणे बाल-कामगारांची आहेत. अशी अक्षरश: शेकडो उदाहरणे या प्रकरणामध्ये सापडतात. आणि त्यातून कामाशी संबंधित जवळजवळ एकही पैलू सुटत नाही. अशा या परिस्थितीतही येथे सक्तीने धर्मप्रवचन ऐकायला लावणारे आहेत, थोडे उशीरा कामावर आले तर चढत्या भाजणीने पगार कापणारे आहेत. घरापासून कामावर येण्याचा वेळ धरून कामगाराचा एकूण वेळ किती जातो ते दाखवणारी उदाहरणे आहेत. सुटीच्या दिवसाचे काय होते, झोपेचे काय होते हे दाखवणाऱ्या बोलक्या मुलाखती आहेत. आणि ज्यांचे वाढण्याचे वय अविश्रांत कामाच्या चरकात उद्ध्वस्त होते त्यांच्या मानसिकतेवर, बुद्धीच्या कुवतीवर काय परिणाम होतो हे दाखवणारी प्रश्नोत्तरेदेखील आहेत. ही सर्व उदाहरणे खुद्द इंग्लिश फॅक्टरी इन्स्पेक्टरांच्या आणि सरकारी अहवालांच्या दस्तऐवजातून घेतलेली आहेत. आणि शेवटी ही सर्व परिस्थिती कष्टकऱ्यांच्या हिताची, योग्य परिस्थिती कशी

आहे हे सांगणाऱ्या त्या काळच्या भांडवली समर्थनांचेही मासले त्याबरोबरच आहेत.

इतिहास : कामगारांच्या व भांडवली अर्थशास्त्राच्या दृष्टीतून

हे प्रकरण वाचताना अगदी निगरगट्ट मनदेखील सुन्न होते. पण अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांची चर्चा करणाऱ्या प्रस्थापित लेखकांच्या प्रचलित पुस्तकांमध्ये हा मजकूर बसत नाही. कारण? एकतर हा जुना इतिहास झाला; आता भांडवलशाही किती तरी सुधारली आहे! असा या लेखकांचा समज असतो. आणि दुसरे म्हणजे या सगळ्या परिस्थितीशी अर्थशास्त्रातील मूलतत्त्वांचा काही संबंध आहे असे त्यांना वाटत नसते. हे दोन्ही समज अत्यंत गैर आहेत.

कामांच्या तासांबाबत मार्क्सने वर्णन केलेली ही परिस्थिती अजून इतिहासजमा झालेली नाही. भारताच्या बाबतीत तर नाहीच नाही. शिवकाशीमधले शोभेच्या दारूचे कारखाने, मध्ये प्रदेशामधल्या खाणी, निपाणीच्या तंबाखू कामगारांची 'अंधेरनगरी', पाटीवरच्या पेन्सिली जिथून येतात ते स्लेटचे कारखाने, चामड्याच्या वस्तू बनवणारे कारखाने ही बालमजुरांबद्दलची फक्त काही ठळक, प्रसिद्धी मिळालेली उदाहरणे झाली. पण बांधकाम कामगारांच्या टोळ्या, हंगामी कारखाने, लघुउद्योग, गृहउद्योग आणि शेती यांसारख्या क्षेत्रांमध्ये कामाच्या तासांबद्दलची एकंदर परिस्थिती १९व्या शतकातल्या इंग्लिश कामगारांच्या परिस्थितीपेक्षा आजही गुणात्मकरीत्या फारशी वेगळी नाही. आणि मोठ्या कारखान्यांमध्ये देखील मुख्य उत्पादनाच्या कामाच्या वळचणीला, अवतीभोवती ही परिस्थिती हमखास सापडते. (याचे साधे व पटकन लक्षात येऊ शकणारे उदाहरण म्हणजे अशा बहुतेक कारखान्यांच्या कँटीनमधले कामगार.) केवळ इतिहास म्हणून हे प्रकरण निकालात काढता येत नाही.

दुसरे म्हणजे भांडवली व्यवस्थेबद्दलचे एक मूलभूत सूत्र या कामाच्या तासांच्या प्रकरणामध्ये अंतर्भूत आहे. त्या काळातल्या कामगारांच्या अमानुष दडपणुकीचे मार्क्स आपल्या विवेचनामध्ये वर्णन करत आहेच, पण केवळ तेवढेच तो करतो आहे असे नाही. तो हे देखील म्हणत आहे की जोपर्यंत इतर क्रयवस्तूंच्या ग्राहकविक्रेत्याप्रमाणेच भांडवलदार आणि कामगार हे केवळ वैयक्तिक स्वातंत्र्याच्या जोरावर, व्यक्ती म्हणून, 'मुक्त' स्पर्धेत एकमेकांसमोर उभे राहतात तेव्हा अटळपणे ही अमानुष परिस्थिती निर्माण होते; श्रमशक्तीचा

हा निरंकुश, मनमानी वापर किंवा दुसऱ्या शब्दांत म्हणजे कामगारांच्या आयुष्याची हवी तशी नासाडी, ‘मुक्त’ उधळपट्टी निर्माण होते. आणि मार्क्स हेसुद्धा म्हणत आहे की श्रमशक्तीचा हा मनमानी वापर जसा क्रयवस्तूंच्या नियमांचा आधार घेऊन होत असतो तसेच तो क्रयवस्तूंच्या नियमांचा कसा भंग करतो हेदेखील क्रयवस्तूंच्या नियमांचा आधार घेऊनच दाखवता येते; फक्त इतकेच की हे भांडवलदारांकडून केले जात नाही तर कामगारांकडून केले जाते.

कामगारांच्या क्रयवस्तूची कैफियत

कारखान्यातल्या यंत्राच्या घरघराटीच्या वर आवाज चढवून जणू कामगार भांडवलदाराला म्हणू लागतात की बाबारे, तुला माणसांची, त्यांच्या अधिकाराची भाषा कळत नाही. आम्हांला झोप मिळत नाही, विश्रांती मिळत नाही, आमची विचारशक्ती मारली जाते आहे; निरनिराळे रोग आम्हांला पछाडत आहेत. या सर्वांमुळे तुझ्या दगडी चेहऱ्यावरची एक रेघदेखील हललेली नाही. उलट तू त्याचे समर्थनच करतोस. ठीक आहे तर, तुला इतर कुठलेही नियम कळत नाहीत, तेव्हा आपण क्रयवस्तूंच्या नियमाच्या आधारेच बोलू.

आणि कामगार पुढे म्हणतात,

आम्ही तुला आमची एक दिवसाची श्रमशक्ती विकली. याचा अर्थ काय? असे धरू की आमचे उत्पादक श्रमांचे आयुष्य किमान ३० वर्षे आहे. तसे धरले तर मी तुला एक कामाचा दिवस विकून माझ्या आयुष्याचा १/(३० × ३६५) इतका किंवा सुमारे अकरा हजारावा हिस्सा विकला आहे. पण तू जी मनमानी चालवली आहेस त्यामध्ये तू फक्त तेवढाच हिस्सा वापरतो आहेस का? खरे तर आम्हांला झोप, विश्रांती नाकारून तू आमचे आयुष्य जास्त वेगाने खलास करतोयस. इंग्लिश पार्लमेंटमध्ये तो फेरांड म्हणाला त्याप्रमाणे तू तीन पिढ्यांच्या काळातच आमच्या नऊ पिढ्या खलास केल्यास. म्हणजे आमच्या आयुष्याला तू कात्री लावलीस व ते आता दहा वर्षांवर आले; म्हणजेच तू माझ्या आयुष्याचा १/(१० × ३६५) इतका किंवा सुमारे तीन हजार सातशेवा भाग वापरलास. पण हे क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणेच गैर आहे. कोणता लोखंडाचा व्यापारी तुला एक किलो लोखंडाच्या नावाखाली तीन किलो लोखंड वापरू देईल? कामाचे तास तुला असेच ठेवले पाहिजेत की तू

जितक्या श्रमशक्तीचा करार केलायस तितकीच तू वापरशील. माझे तीस वर्षांचे उत्पादक आयुष्य कमी होता कामा नये.

आणि हक्काला हक्क भिडतात

पण कामगारांची ही बाजू क्रयवस्तूंच्या नियमाला धरून असली म्हणून काय झाले? भांडवलदारांच्या बाजूनेही क्रयवस्तूंचेच नियम उभे असतात! ते म्हणू शकतात की हे आयुष्य वगैरे थोतांड आहे. तुम्ही तुमची श्रमशक्ती एक दिवसासाठी माझ्या ताब्यात दिली आहेत. एका दिवसामध्ये ती शक्य तितकी वापरण्याचा क्रयवस्तूंच्याच नियमाप्रमाणे मला अधिकार आहे. दोन्ही बाजू आपापले हक्क मांडत असतात व दोन्ही बाजू क्रयवस्तूंच्याच नियमांचा आधार घेत असतात!

जेव्हा हक्काला हक्क भिडतात तेव्हा त्या झगड्याचा निकाल फक्त शक्तीच्या जोरावर होऊ शकतो. एक संघर्ष सुरू होतो. एका बाजूला भांडवलदार वर्ग आणि दुसऱ्या बाजूला कामगार वर्ग. या वर्गसंघर्षातून शेवटी कामाचे तास ठरतात. आणि कामगारांना ही कमाई करणे वैयक्तिक भांडणातून शक्य नसते. ते आपले सामूहिक बळ त्यामागे लावतात. दोन्ही बाजूंनी सामूहिक बळ उभे केलेले असते. त्यातून कामाचे तास किती असावेत याबद्दलचे कायदे कामगार जिंकून घेतात, त्याबद्दल जनमत तयार करतात. प्रत्यक्षात कामाचे तास एखाद्या ठिकाणी किती असतील हे मात्र शेवटी या शक्तींच्या त्या ठिकाणच्या संतुलनावरच ठरते. जिथे कामगार असंघटित असतात किंवा त्यांचे बळ कमी पडते तिथे कामाचे तासही वाढतात.

इतर क्रयवस्तूंच्या ग्राहक–विक्रेत्यांमध्ये होते तशी केवळ 'स्पर्धा' श्रमशक्तीचे ग्राहक असणारे भांडवलदार व तिचे विक्रेते कामगार यांच्यामध्ये होत नाही. केवळ बाजारपेठेतल्या स्पर्धेतून या क्रयवस्तूला मूल्याचे नियम लागू होत नाहीत. कामगारांना आपली श्रमशक्ती क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे विकायची झाली तर त्यासाठीच भांडवलदारवर्गाविरुद्ध वर्गसंघर्ष आवश्यक ठरतो. हा वर्गसंघर्ष जरा ढिला झाला की त्याचा अर्थ होतो भांडवलदारांनी कामगारांच्या आयुष्याची केलेली अनिर्बंध, मनमानी उधळपट्टी. थोडक्यात भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये श्रमशक्तीसकट सर्व वस्तूंना क्रयवस्तूंचे नियम लागू व्हायचे असतील तर कामगारांचा भांडवलदाराविरूद्धचा वर्गसंघर्ष हा अपरिहार्य ठरतो. या वर्गसंघर्षाचे दुसरे वैशिष्ट्य हेही असते की हा संघर्ष कामगारांच्या

क्रयवस्तूंच्या अधिकाराचे संरक्षक हत्यार देखील असतो. भांडवलदाराच्या पिळवणुकीचा रेटा रोखण्यासाठी हे शस्त्र निर्माण होते. या संघर्षाचे तिसरे वैशिष्ट्य हे असते की एका बाजूला भांडवलदार त्यांच्या समर्थनातून श्रमशक्तीला कांदे, बटाटे, लोखंड या इतर क्रयवस्तूंच्या जोडीला बसवत असतात. श्रमशक्ती म्हणजे खुद्द जिवंत माणूस हे वास्तव त्यांच्या दृष्टीने गौण असते. तर दुसऱ्या बाजूला श्रमशक्तीच्या रूपात कामगार स्वत:च उभे असल्यामुळे ते श्रमशक्तीचे माणूसपणाचे वैशिष्ट्य जपत असतात. त्यांची मागणी ही त्यामुळे आपोआपच स्वत:च्या आयुष्याचे मानवीपण जतन करण्याची मागणी असते, ते अबाधित राखले जावे अशी मागणी असते. एका बाजूचे समर्थन माणसांना माणूसपणापासून तोडत असते तर दुसरे जोडीत असते!

त्यामुळे श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीवरून होणाऱ्या या 'स्पर्धेचा' फक्त बाजारपेठेत निर्णय लागू शकत नाही. ही स्पर्धा सतत बाजारपेठेच्या कक्षा ओलांडून समाजकारणाच्या-राजकारणाच्या क्षेत्रात ओसंडत राहते. आपापले अधिकार आणि समर्थने घेऊन हे युद्ध खेळले जाते ते लोकांसमोर. त्यातून निर्माण होतात ते फॅक्टरी ॲक्टसारखे कायदे. श्रमशक्तीला क्रयवस्तूंचे अधिकारदेखील लाभतात, मान्य होतात ते राजकारणातून आणि हे मान्य झालेले अधिकार प्रत्यक्षात मिळवण्यासाठीदेखील हा वर्गसंघर्ष आणि हे राजकारण सतत चालू राहते. श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीतून केवळ ग्राहक-विक्रेता हे बिनचेहऱ्याचे संबंध बांधले जात नसतात तर पिळणाऱ्या आणि पिळल्या जाणाऱ्या वर्गांमधले संबंध बांधले जात असतात. आणि त्यामुळे 'श्रमशक्ती'च्या खरेदी-विक्रीभोवतालची स्पर्धा ही इतर कुठल्याही क्रयवस्तूपेक्षा वेगळ्या प्रकारे व्यक्त होते. एका उग्र वर्गसंघर्षाच्या अव्याहत चालणाऱ्या स्पष्ट प्रवाहाच्या रूपात ती व्यक्त होते.

श्रमशक्तीच्या वैशिष्ट्यांबद्दलचे हे मूलभूत मुद्दे भांडवली अर्थशास्त्राच्या गावीदेखील नसतात. विशेषत: कामाच्या तासांवरील मार्क्सच्या साठ पानी प्रकरणात अंतर्भूत असलेले मुद्दे. ते भांडवली अर्थशास्त्राच्या पुस्तकात सापडत नाहीत. कामगारचळवळीच्या किंवा 'कामगार प्रश्नाच्या' अभ्यासाला आणि इतिहासाला वाहिलेले एखादे भांडवली पुस्तक कामाच्या तासांचा त्यांच्या पद्धतीने समाचारही घेते. पण भांडवली अर्थतज्ज्ञांना हे मुद्दे अर्थशास्त्राच्या मूलभूत बैठकीचा कधीच भाग वाटत नाहीत. कारण त्यांच्या दृष्टीने श्रम विकले

काय किंवा कांदे-बटाटे विकले काय कुणीही जोपर्यंत क्रयवस्तू विकत असते तोपर्यंत कशात काहीच फरक पडत नसतो. त्यांच्या दृष्टीने सर्व क्रयवस्तूंना समानपणे तेच नियम लागतात. श्रम या नावाखाली कामगारांनी जी क्रयवस्तू विकली तिच्यात इतर सर्व क्रयवस्तूंपेक्षा तसे वेगळे काहीच नसते. जसे कांदे बटाट्यांपासून वेगळे असतात, लोखंडापासून वेगळे असतात तसेच श्रम या नावाखाली विकली जाणारी ही क्रयवस्तू इतर क्रयवस्तूंपासून वेगळी असते इतकेच! सर्व क्रयवस्तूंमधल्या स्वाभाविक वेगवेगळेपणापलीकडे कामगारांनी विकलेल्या क्रयवस्तूला भांडवली अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टीने काही वेगळे वैशिष्ट्य नसते. किंवा थोडक्यात म्हणजे श्रमशक्ती या जिवंत क्रयवस्तूची संकल्पनाच त्यांच्या आकलनापलीकडची असते.

कामगारांनी दिवसातल्या कामाच्या तासांच्या एका निश्चित आकड्याला मान्यता मिळवली की भांडवली अर्थव्यवस्थेवर त्याचे महत्त्वाचे परिणाम होतात. काही परिणाम गोष्टी कशा दिसतात यामध्ये फरक करणारे, सामाजिक संबंध कोणते रूप घेतात यामध्ये बदल करणारे असतात तर काही त्यापेक्षाही दूरगामी भांडवली अर्थव्यवस्थेच्या वाटचालीच्या दिशेमध्ये, सामाजिक संबंधांच्या आशयामध्ये फरक करणारे असतात.

'वाजवी' पिळवणुकीचे माप!

मघाच्या आपल्या कामाच्या दिवसाच्या रेषाचित्राकडे आपण जरा परतू या. असे धरून चालू की आता कामाचे तास म्हणजे ८ तास हे समीकरण मान्यताप्राप्त झालेले आहे. तेव्हा मघाच्या रेघेच्या संदर्भात आता अक = ८ तास, अब =४ तास, बक = ४ तास, असे संबंध ठरतात.

दिवसात ८ तास काम हे आता वाजवी, किंवा योग्य काम ठरते. भांडवली उदारमतवादी दृष्टिकोनातून यापेक्षा जास्त काम कामगारांकडून करून घेणे हे अन्यायकारक ठरते, पिळवणूक ठरते. पिळवणूकीचे एक भांडवली उदारमतवादी माप तयार होते. या मापाप्रमाणे काम केले तर कामगारांची पिळवणूक नाहीशी होत नसते; कारण बक हे ४ तासांचे वरकड-श्रम त्यात अंतर्भूत असतातच. ठरत असताना दिसत असते वाजवी काम, पण प्रत्यक्षात मात्र ठरत असतो तो पिळवणुकीचा 'वाजवी' दर!

कामाचे तास निश्चित होण्याचा आणखीही एक परिणाम होतो तो संबंधांचे भांडवली स्वरूप जास्त घट्ट होण्यात, त्या रूपाला देखील सामाजिक वास्तवात

आधार तयार होण्यात. जेव्हा कामाचे तास ठरलेले नसतात तेव्हा श्रमशक्तीचा लवचिकपणा स्पष्ट असतो. त्यातून निघणाऱ्या श्रमांचे तासही स्पष्टपणे बदलते असतात. कुठे बारा, कुठे दहा, कुठे आठ. आताही ते बदलतेच असतात; कारण कामाचे निश्चित तास सर्व ठिकाणी प्रत्यक्षात आलेले नसतातच. पण 'वाजवी' कामाचे एक भांडवली मापदेखील आता हा बदल मोजायला तयार झालेले असते. त्यामुळे असे वाटू लागते की, श्रमशक्तीची किंमत देण्याऐवजी भांडवलदार या वाजवी, मान्यताप्राप्त कामाची किंमत चुकवत असतो. थोडक्यात ८ तासांचे श्रम विकत घेत असतो, या कल्पनेला सामाजिक आधार तयार होतो. आता श्रमशक्तीचे मूल्य रूप घेते ते श्रमशक्तीची नव्हे तर या श्रमांची किंमत म्हणून. कांद्याचे मूल्य हा आशय कांद्याचेच विनिमय-मूल्य किंवा किंमत या रूपात व्यक्त होतो. श्रमशक्तीचे मूल्य मात्र ८ तासांच्या श्रमांचे विनिमय-मूल्य किंवा किंमत या रूपात व्यक्त होते. ४ तास श्रममूल्य देऊन ८ तासांचे कुठलेही श्रम करून घेण्याचा अधिकार हा वाजवी अधिकार बनतो. कामगारवर्ग भांडवलशाहीच्या चौकटीत राहून स्वत:चे हितसंबंध जपतो तेव्हा तो भांडवलदारांच्या पिळवणुकीला मर्यादा घालतो खरे, परंतु त्यासाठी त्याला किंमत मोजावी लागते. भांडवली संबंधांच्या उफराट्या रूपांना सामाजिक पाया देखील त्यातून आपसूक मिळतो.

भांडवली चौकटीत कामगारांच्या हितरक्षणाचे महत्त्व

अर्थात केवळ इतकेच घडत नाही. कारण या पिळवणुकीला मर्यादा घालण्याच्या उलाढालींमधून श्रमशक्तीची अंतर्विरोधी बाजूदेखील स्पष्ट झालेली असते. जिवंत माणसे व त्यांच्या जिवंत कुवतींवर लादलेले क्रयवस्तूचे अस्तित्व हा अंतर्विरोध देखील त्यातून उघडा पडलेला असतो. हे लादलेले क्रयवस्तूंचे अस्तित्व पूर्णपणे झुगारून देण्याची उभारी, या उभारीतून येणारा विचार व संघटन हेदेखील त्याचवेळी तयार होत असते. पिळवणुकीला मर्यादा घालण्याचा लढा कामगारांमध्ये क्रांतिप्रवण शक्यतादेखील सतत पुढे आणत असतो. या लढ्याचा परिणाम त्यामुळे नेहमीच दुहेरी राहतो. कामगारचळवळीचे रूप हे नेहमीच या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरलेले असते. भांडवली व्यवस्थेमधील त्याच्या हिताचे संरक्षण करण्याच्या विचारांपासून ते हे हित सामावून घेऊन भांडवलशाहीच्या पलीकडे पाहणाऱ्या विचारांपर्यंत. कामगार श्रम विकतात की श्रमशक्ती विकतात या दोन संकल्पनांमागील विचार हा सुधारणावादी आणि क्रांतीकारी कामगार

चळवळीच्या विचारांमधील फरक असतो. एक विचार कामगाराला एक क्रयवस्तूच्या मालकाच्या पातळीवर आणून बसवतो व या क्रयवस्तूंच्या वाजवी अधिकारांसाठी झगडणे इतकेच कामगार चळवळीचे काम समजतो. दुसरा विचार श्रमशक्तीच्या रूपात कामगारांना क्रयवस्तूचे आलेले स्थानच नाकारण्याचे काम कामगार चळवळीचे काम मानतो.

निव्वळ वरकड–मूल्याची प्रवृत्ती

मार्क्सचा दृष्टिकोन क्रांतिकारक असला तरी भांडवली व्यवस्थेच्या चौकटीतील कामगारांचे हितसंरक्षण ही त्याच्यासाठी एक नगण्य, दुर्लक्षिण्यासारखी बाब नसते. अशा हितसंरक्षणामधून कामगारांचे आयुष्य तर सुसह्य होत असतेच पण भांडवली व्यवस्थेच्या रचनेत, संबंधांमध्येदेखील दूरगामी बदल होत असतात.

हे बदल तपासायचे तर आपल्याला परत आपल्या मघाच्या कामाच्या दिवसाच्या रेषाचित्रापासून सुरुवात करावी लागेल.

अ ब क

अक = दिवसातले एकूण कामाचे तास

अब = आवश्यक श्रमकाळ = श्रमशक्तीचे मूल्य

बक = वरकड मूल्य

आवश्यक श्रम जिथे संपतात त्या 'ब' या बिंदूच्या पुढे कामाचे तास वाढवून म्हणजे 'क' हा बिंदू पुढे ढकलून मिळणाऱ्या वरकड–मूल्याला मार्क्स नाव देतो निव्वळ वरकड–मूल्य (ॲब्सल्यूट सरप्लस व्हॅल्यू) व अशा पद्धतीला तो म्हणतो निव्वळ वरकड–मूल्याची पद्धती. निव्वळ वरकड–मूल्याचे एक वैशिष्ट्य हे असते की त्यामुळे श्रमप्रक्रियेच्या घटकांमध्ये, त्यांच्या जुळणीमध्ये, त्यांच्या सामाजिकतेमध्ये काहीही बदल होत नाही. ना उत्पादकता वाढते, ना श्रमप्रक्रियेमधील विज्ञानाचा वापर वाढतो. फक्त श्रमप्रक्रियेचा काळ वाढतो. ऐतिहासिकदृष्ट्या या प्रवृत्तीमुळे आहे ती श्रमप्रक्रिया व तंत्र जसेच्या तसे राबवले जाते. कामगारांचे काम वाढते. श्रमप्रक्रियेची व्याप्ती वाढते, पण श्रमप्रक्रियेचा विकास होत नाही.

निव्वळ वरकड–मूल्य हा भांडवली व्यवस्थेमधील सर्व वरकड–मूल्याचा ऐतिहासिक आधार असतो. भांडवलदाराला मुळात वरकड–मूल्य मिळते तेच मुळी आवश्यक श्रमांच्या पलीकडे कामाचे तास वाढवण्याच्या अधिकारातून;

आणि हा अधिकार त्याला लाभतो, कारण त्याअगोदर श्रमप्रक्रियेची जी उत्पादकता असते तिलाच क्रयवस्तूंच्या जगात या अधिकाराचे उफराटे रूप मिळालेले असते.

त्यामुळे निव्वळ वरकड-मूल्य हा भांडवलशाहीचा वरकड-मूल्य मिळवण्याचा सरळसरळ 'शॉर्टकट' असतो. त्यात भांडवलशाहीची बहुचर्चित क्रांतिकारक अंगे, वाढती उत्पादकता, सुधारत जाणारे तंत्र, विज्ञानाचे वाढते स्थान व महत्त्व यांपैकी काहीएक नसते. आणि आपसूकपणे, भांडवलशाहीवर कोणताही अंकुश नसेल, तर भांडवलशाही सतत हा बिनकटकटीचा 'शॉर्टकट' पसंत करते. या शॉर्टकटमधून भरडून निघणारा कामगारवर्ग जितक्या प्रमाणात हा शॉर्टकट अडवून उभा राहतो फक्त तितक्याच प्रमाणात भांडवलशाहीला वरकड-मूल्य मिळवण्याचे व वाढवण्याचे इतर मार्ग शोधावे लागतात. भांडवलशाहीची बहुचर्चित क्रांतिकारक अंगे आपोआप पुढे येत नाहीत. भांडवलशाहीचा क्रांतिकारकपणा हे भांडवलशाहीचे प्रमुख अंगभूत वैशिष्ट्य नसते. कामगारांच्या संघर्षामुळे, इतर वाटांवर त्यांनी तिची नाकेबंदी केल्यामुळे भांडवलशाहीचे क्रांतिकारक अंग प्रमुख बनू शकते. हे कसे होते, कुणाच्या जिवावर होते, आणि त्याचेही शेवटी परिणाम काय असतात हा भांडवलशाहीच्या या विश्लेषणमधील पुढचा भाग आहे.

७. सापेक्ष वरकड–मूल्य : भांडवली उत्पादकतावाढीचे रहस्य

श्रमशक्तीचे मूल्य किती असा प्रश्न आपण विचारला की आपण माणसांच्या सर्वसाधारण अधिकारांच्या प्रश्नापाशी जाऊन धडकतो! हे एका प्रश्नांच्या मालिकेतून होते. श्रमशक्तीचे मूल्य हे ती पुन्हा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या मूल्याइतके असते. आणि 'जीवनावश्यक वस्तू म्हणजे काय?' हा प्रश्न विचारला की प्रश्न उपस्थित होतो—माणसांना जगण्यासाठी काय काय लागते, आणि त्यातले काय आवश्यक मानायचे? माणसांचा कशा प्रकारच्या जीवनावरचा अधिकार आवश्यक मानायचा?

श्रमशक्तीच्या मूल्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नाला साधे, निर्णायक उत्तर नसते; कारण माणसे चिवट असतात. ती अर्धीमुर्धी भाकरी खाऊन, अर्धवट निवाऱ्यानिशी, अर्धवट कपडे पेहरून देखील काम करू शकतात, आणि तसे करणें भाग पडते म्हणून करतातही. 'आवश्यक'चा अर्थ बराच लवचिक असतो आणि तो दोन्ही बाजूंनी ताणला जात असतो. 'आवश्यक'च्या मर्यादा कमीतकमी करून आपल्या यंत्रांच्या, श्रमप्रक्रियेतल्या इतर घटकांच्या पातळीवरून आवश्यक या शब्दाचा अर्थ ठरवण्याचा भांडवलदार प्रयत्न करत असतात. याउलट कामगार मात्र प्रथम कष्टकऱ्यांना माणसात गणले जाण्याचा अधिकार मागत असतात आणि जगण्यासाठी 'आवश्यक' या निकषाला ते

मानवी माप लावत असतात. या भोवतीच कामगारांच्या मागण्यांची मांडणी आपसूक होत असते.

माणसांना विरंगुळ्याचा वेळ असणे आवश्यक मानायचे की नाही? त्या वेळात करमणुकीची, छंदाची साधने उपलब्ध होणे, हे आवश्यक मानायचे का नाही? वेळेवर योग्य ते औषधोपचार उपलब्ध होणे हे आवश्यक मानायचे का नाही? दोनचार वर्षांतून एकदा सहकुटुंब, जगातील सोडा पण निदान देशातील निरनिराळ्या ठिकाणी हिंडता येणे, निरनिराळ्या लोकांशी, त्यांच्या परंपरांशी, संस्कृतीशी ओळख करून घेणे हे आवश्यक मानायचे का नाही? असे नाना प्रश्न या एका प्रश्नापासून सुरू होतात. आणि या सर्वांना 'एक टन सल्फ्युरिक ॲसिडसाठी किती गंधक आवश्यक असते' याला जसे स्पष्ट निर्णायक उत्तर असते तसे नसते. कारण गंधक किती लागेल या प्रश्नामध्ये मानवी अधिकारांबद्दलची जीवनमूल्ये अभिप्रेत नसतात. त्यातून परस्परविरोधी जीवनमूल्ये टक्कर घेत नसतात.

जसे हक्काला हक्क भिडून कामाच्या तासांचा निर्णय होतो तसेच इथेही होते. कामगारवर्ग स्वत:चा माणसांमध्ये समावेश झाला पाहिजे, त्याच्या आयुष्याला मानवी माप लागले पाहिजे असा आग्रह धरून भांडत असतो. कशा प्रकारचे जीवन माणसाला लाभणे हे आवश्यक मानायचे, कोणत्या प्रकारच्या जीवनावर माणसांचा सर्वसाधारण अधिकार आहे असे समजायचे याच्या कक्षा रुंदावण्याच्या बाजूने कामगारवर्ग भांडत असतो. याउलट भांडवलदारवर्ग या अधिकारांच्या कक्षा थोपवून धरायच्या, शक्य तितक्या संकुचित ठेवण्याच्या बाजूने भांडत असतो. श्रमशक्तीच्या मूल्यावरून जे रण माजते त्यातून हाच लढा लढला जात असतो.

वेतनाच्या 'ऐतिहासिक व नैतिक' बाजूचे महत्त्व

आणि म्हणूनच कांदा-बटाट्यांसारख्या, लोखंडासारख्या निर्जीव क्रयवस्तूंचे मूल्य ज्या पद्धतीने ठरते तशी पद्धत श्रमशक्तीच्या मूल्यासाठी लागू होत नाही. मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे श्रमशक्तीचे मूल्य ठरण्याला 'एक ऐतिहासिक व नैतिक' बाजूदेखील असते. इतिहासाच्या एका टप्प्यावर, या वर्गलढ्यातून, माणसांना जगण्यासाठी आवश्यक राहणीमान काय मानायचे या नैतिक प्रश्नाला एका निकषाच्या रूपात एक निश्चित उत्तर भांडवलशाहीमध्ये प्रस्थापित होत असते. या राहणीमानासाठी आवश्यक त्या उपभोग्य क्रयवस्तूंच्या मूल्यांच्या

बेरजेइतके मूल्य हे श्रमशक्तीचे एकंदर मूल्य ठरते व त्यावरून कामावरील तासांच्या प्रस्थापित निकषांमार्फत ते श्रमांची किंमत म्हणून वावरते. त्यामुळे भांडवलदारवर्ग श्रमशक्तीचे मूल्य हे क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे देत आहेत की नाही याचा अर्थ त्या विशिष्ट ऐतिहासिक टप्प्यावर, नैतिक मूल्यांच्या स्वरूपात निश्चित झालेल्या या निकषाप्रमाणे देत आहेत की नाहीत असा होतो.

आपल्या विश्लेषणाच्या मुख्य प्रवाहामध्ये थोडा खंड पाडून इथे आणखी एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. अनेक भांडवली विचारवंत मार्क्सचा 'आधीचा' मानवतावाद आणि मार्क्सचा कामगारवर्गीय दृष्टिकोन (विशेषत: 'कॅपिटल' या ग्रंथामध्ये अंतर्भूत असलेला दृष्टिकोन) यांच्यात एक विरोध पाहतात. मार्क्सने कामगारांच्या हितावर लक्ष दिल्याने, त्याच्या कसोटीवर विचार उभा केल्यामुळे त्याचा मानवतावाद संकुचित होतो असे त्यांचे म्हणणे असते. नेमके इथेच घोडे पेंड खात असते. कामगारवर्गाच्या चळवळीकडे पाहण्याचे दोन प्रकारचे दृष्टिकोन इथे महत्त्वाचे ठरतात. कामगारवर्गाच्या 'आर्थिक' लढ्याकडे हे 'केवळ' आर्थिक लढा म्हणून पाहत असतात, स्वत:साठी जास्तीत जास्त पैसा मिळवण्याचा प्रयत्न म्हणून पाहत असतात. या भांडवली विचारवंतांच्या मते सगळ्या क्रयवस्तूंचे मालक जे करत असतात तेच कामगारवर्ग करत असतो. आर्थिक क्षेत्राबद्दलचा त्यांचा विचार हा क्रयवस्तूंच्या विभूतिकरणात अडकलेला असतो. याउलट मार्क्सच्या दृष्टिकोनानुसार कामगारवर्गाच्या दैनंदिन चळवळीतून सर्वसाधारण मानवी अधिकार प्रस्थापित होण्याचाच लढा चाललेला असतो. स्वत:चे अधिकार कामगारवर्ग प्रस्थापित करत असतो तेच मुळी सर्वसाधारण मानवी अधिकारांच्या स्वरूपात! कामगारवर्गीय अधिष्ठान नसलेला मानवतावाद कामगारवर्गाच्या दैनंदिन हितरक्षणाच्या चळवळीत अंतर्भूत असलेला मानवतावादी लढा ओळखू शकत नाही. संकुचित असतो तो या टीकाकारांचा मानवतावाद!

या दोन प्रकारच्या दृष्टिकोनांचा कामगारचळवळीवरील परिणाम देखील असाच नेमका उलटा असतो. आपल्या दैनंदिन चळवळीतूनदेखील कामगार सर्वसाधारण मानवी हिताचाच लढा पुढे नेत असतात हे मार्क्सच्या दृष्टिकोनात अभिप्रेत असते. मार्क्सच्या विचारांचा कामगारवर्गात प्रसार होण्यामधून कामगारांची या अभिप्रेत अर्थाची जाणीव वाढणार असते. कामगारवर्ग हा खरोखरीच, जाणीवपूर्वक सर्वसाधारण मानवी हिताचे संवर्धन करणारी जाणती शक्ती बनणे हे यातून घडणार असते. कामगारवर्गाच्या क्रांतिकारक कार्याची ती

तयारी असते. याउलट कामगारवर्गाचा लढा हा केवळ पैशासाठी, इतर क्रयवस्तूंच्या मालकाप्रमाणे चालणारा आर्थिक लढा म्हणून निकालात काढणारा भांडवली मानवतावाद मात्र नेमके याच्या उलट करत असतो. कामगारांच्या मानवी अधिकारांसाठी चाललेल्या प्रत्यक्ष लढ्याला हिणकस ठरवून तो कामगारांना त्यांचे हित सामावून न घेऊ शकणाऱ्या अमूर्त मानवतावादामागे उभा करण्याचा प्रयत्न करत असतो.

थोडक्यात भांडवली पायावरील मानवतावाद हा कामगारांच्या दैनंदिन चळवळीतील मानवी अधिकारांचा लढा ओळखू शकत नाही व विश्लेषणात सामावून घेऊ शकत नाही, त्यामुळे वैज्ञानिक असू शकत नाही; अन् त्याचबरोबर तो भांडवलशाहीमधील बहुजनांचा, कामगारांचा लढा सामावून न घेतल्याने क्रांतिकारकही ठरू शकत नाही. याउलट मार्क्सचा विचार हा कामगारवर्गीय विचार असल्याने त्याचा मानवतावाद कामगारांच्या दैनंदिन लढ्यातील मानवी अधिकाराचा लढा हा सहजपणे विश्लेषणात अंतभूर्त करण्याइतका वैज्ञानिक असतो; अन् त्याचबरोबर कामगारवर्गाच्या लढ्याच्या अंतिम विजयात उभे राहणारे क्रांतिकारी ध्येयदेखील तो स्पष्ट करू शकतो. मार्क्सच्या विचारांचा स्पष्ट कामगारवर्गीय आधार हा त्याच्या क्रांतिकारकतेचा आणि वैज्ञानिकतेचाही जैव भाग असतो. आणि म्हणूनच तो कामगारवर्गीय क्रांतिकारकांचा स्वाभाविक विचार ठरतो.

भांडवलदार क्रयवस्तूंचे नियम पाळतात असे का धरायचे?

मार्क्सच्या साध्या विधानांमागे अनेकदा अशा प्रकारचा कामगारवर्गीय क्रांतिकारी दृष्टिकोन उभा असतो. उदाहरणार्थ, आपण या प्रकरणाच्या सुरुवातीला असे म्हटले होते की भांडवलदारांसमोर कामाच्या तासांच्या मर्यादेचे व तसेच राहणीमानाच्या स्वरूपात श्रमशक्तीच्या मूल्याचे प्रस्थापित निकष उभे राहतात. याचा अर्थ कामगारांची मानवी अधिकारांशी नाते जोडणारी चळवळ उभी राहिलेली असते व तिने हे निकष जिंकलेले असतात असा असतो. भांडवलदारांसमोर आता हे मान्यताप्राप्त निकष न मोडता वरकड-मूल्य वाढवण्याचा प्रश्न उभा राहतो. अन् तसेच गृहीत धरून आपण पुढे जाणार आहोत. याही विधानाला आपण वर जे म्हटले आहे ते लागू पडते. कारण प्रत्यक्षात भांडवलदारवर्ग हे निकष मोडूनदेखील वरकड-मूल्य वाढवत असतातच. मग हे निकष भांडवलदार मोडत नाहीत असे गृहीत धरून पुढे कशाला जायचे? त्यामागे महत्त्वाची कारणे आहेत.

पहिले कारण म्हणजे क्रयवस्तूंच्या नियमांना अनुसरूनच या निकषांना सर्वसाधारण मान्यता प्राप्त झालेली असते. जेव्हा कामाच्या तासांवरून व श्रमशक्तीच्या मूल्यावरून भांडवलदार वर्ग आणि कामगारवर्ग यांच्यामध्ये संघर्ष सुरू असतो, तेव्हा या निकषांच्या बाजूने फक्त कामगार भांडत असतात व ते फक्त कामगारांचे निकष असतात. पण त्यानंतर चळवळीतून कामगार जनमत तयार करतात व या निकषांना जसजसे बंधनकारक कायदेशीर रूप मिळत जाते तसतसे ते भांडवली समाजाचे सर्वसाधारण मान्यताप्राप्त निकषदेखील बनतात. फॅक्टरी ॲक्ट, वेतन आयोग इत्यादींमार्फत हे निकष सर्वांना बंधनकारक होतात. बाजारपेठेतील इतर सर्व क्रयवस्तूंचा व्यवहार भांडवलदार क्रयवस्तूंच्या नियमानुसार करत आहेत असे आपण धरून चाललो आहोत. तसेच हे नियम श्रमशक्तीबाबतदेखील ते पाळत आहेत असे आपण धरून चालणार आहोत, इतकेच त्यांना या 'संशयाचा फायदा' देण्याचा अर्थ असतो. प्रत्यक्षात हे नियम भांडवलदार पाळतातच अशी कोणतीही भ्रामक समज यात अभिप्रेत नाही.

दुसरे कारण म्हणजे या निकषाचा भंग करून भांडवलदार जी पिळवणूक करतात त्याची टीका उदारमतवादी भांडवली दृष्टिकोनातूनदेखील करता येते. मार्क्सला केवळ अशा स्वरूपाच्या टीकेत रस नाही. मार्क्सला रस आहे तो संपूर्ण भांडवली व्यवस्थेच्या टीकेत. ठीक आहे, भांडवलशाही अगदी आपल्या स्वत:च्या निकषाप्रमाणे चालली आहे, उदारमतवादी भांडवली टीकेला जागा नाही; तरीदेखील अशी 'शुद्ध' भांडवलशाही आपल्याला कुठे नेऊन पोचवते, तिच्यातल्या शक्यतांचे स्वरूप काय आहे, या सर्व व्यवस्थेचे भवितव्य काय आहे, हे मार्क्ससमोरचे प्रश्न आहेत. मार्क्सच्या विश्लेषणाचा प्रत्येक टप्पा आपल्याला या व्यवस्थेच्या टीकेमध्ये टप्प्याटप्प्याने पुढे घेऊन जात असतो. हे सर्व निकष भांडवलशाही प्रत्यक्षात पाळते याबद्दल कुठलाही भ्रम तो बाळगत नाही. हे निकष मोडणाऱ्या अंगभूत प्रवृत्ती तो स्पष्ट करतो आणि त्याबरोबरच हा प्रत्येक निकष लागू करण्याचा आग्रह धरणाऱ्या शक्तीवरदेखील त्याने नेमके बोट ठेवलेले असते. ही शक्ती असते कामगारवर्गाची स्वत:च्या हितरक्षणासाठी चाललेली चळवळ. त्यामुळे मार्क्स जेव्हा एकेका निकषाबद्दलचा 'संशयाचा फायदा' भांडवलशाहीला देत चाललेला असतो तेव्हा त्याला त्या वाटचालीतून वाढत जाणारी कामगारवर्गाची चळवळदेखील अभिप्रेत असते. मार्क्सच्या भांडवलशाहीच्या एकेका अंगाच्या विश्लेषणामध्ये त्याचवेळी, कामगार

चळवळींची अपरिहार्यता अभिप्रेत असते. भांडवलशाहीचा विकास हा त्याचवेळी कामगारचळवळीचादेखील विकास करत असतो.

उत्पादकता वाढीतून मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य

या पार्श्वभूमीवर आपण भांडवलदारासमोर आता पडलेल्या प्रश्नाकडे बघायचे आहे. आपल्या समाजात कामांच्या तासांची मर्यादा अगोदरच घातली गेली आहे. त्यामुळे श्रमशक्तीचे मूल्य कमी करणे हाच एक आता वरकड-मूल्य वाढवण्याचा मार्ग उरलेला आहे. पण आपल्या या समाजात उपभोग्य क्रयवस्तूंच्या रूपात मान्यताप्राप्त झालेला राहणीमानाचा निकष न मोडता श्रमशक्तीचे मूल्य कमी कसे करायचे?

याला तसे अगदी साधे उत्तर आहे. कामगारांच्या या राहणीमानामध्ये ज्या वस्तू मोडतात त्यांचे मूल्य कमी झाले, या क्रयवस्तूंच्या निर्मितीमध्ये जाणारा एकंदर सामाजिक श्रमकाळ कमी झाला, तर हा निकष न मोडतादेखील श्रमशक्तीचे मूल्य मात्र कमी होऊ शकते. इतकेच नव्हे तर हे राहणीमान वाढत असूनसुद्धा श्रमशक्तीचे मूल्य कमी होऊ शकते.

> उदाहरणार्थ असे समजा की राहणीमानाच्या निकषांवरून ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य २ किलो गहू असे ठरले आहे व गव्हाचे मूल्य किलोमागे २ श्रमतास आहे, तर ८ तास श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास होईल. जर गव्हाचे मूल्य २ श्रमतासांवरून १ श्रमतास झाले तर ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतासांवरून २ श्रमतासांपर्यंत उतरेल. पुढे असेही समजू की एखाद्या वेतन आयोगामुळे, त्रिपक्षीय श्रमआयोगामुळे असे ठरले की जीवनवेतनात कपड्यांचाही समावेश पाहिजे व त्यांनी ८ तासांच्या श्रमशक्तीसाठी २ किलो गहू व १ मीटर कापड असा निकष ठरवला. यामुळे राहणीमान वाढले. परंतु जर १ मीटर कापडाचे मूल्य १ श्रमतास असेल तर श्रमशक्तीचे मूल्य मात्र पूर्वी ४ श्रमतास होते ते आता गव्हाचे नवे मूल्य २ श्रमतास व कापडाचा १ श्रमतास मिळूनदेखील ३ श्रमतासांपर्यंत उतरू शकते.

श्रमशक्तीचे मूल्य अशा तऱ्हेने कमी करून जे वाढीव वरकड-मूल्य भांडवलदाराच्या हातात पडते त्याला मार्क्स सापेक्ष वरकड-मूल्य (रिलेटिव्ह सरप्लस व्हॅल्यू) म्हणतो व अशा तऱ्हेने वाढीव वरकड-मूल्य हस्तगत करण्याच्या पद्धतीला तो सापेक्ष वरकड-मूल्याची पद्धती म्हणतो. परंतु हे सापेक्ष वरकड-मूल्य भांडवलदारवर्गाच्या हातात कसे पडते ही एक वेगळीच गमतीची गोष्ट असते. कारण कोणीच भांडवलदार 'हां, मी कामगारांच्या

राहणीमानामध्ये मोडणाऱ्या वस्तू निर्माण करतोय तेव्हा आपण त्यांची उत्पादकता वाढवून श्रमशक्तीचे मूल्य कमी करूया म्हणजे आपल्याला वाढीव वरकड-मूल्य मिळेल' असा विचार करून हे घडवून आणत नाही. हे घडून येते ते 'कहीं पे निगाहें, कहीं पे निशाना' या पद्धतीने. भांडवलदारांची नजर असते ती आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर. त्यांच्यावर मात करण्यासाठी तो स्वत:च्या कारखान्यातल्या श्रमांची उत्पादकता वाढवतो. पुढे त्याचे प्रतिस्पर्धीदेखील तोच मार्ग वापरतात. आणि यातून शेवटी परिणाम होतो तो सापेक्ष मूल्याचा निशाना साधण्याचा.

हे कसे होते ते आता आपण पाहू या. समजा की १६,००० श्रमतास मूल्याच्या श्रम-सामग्रीमधून १६,००० श्रमतासांच्या साहाय्याने प्रचलित तंत्राच्या आधारे तो १६,००० वस्तू बनवत आहे. या १६,००० वस्तूंचे मूल्य ३२,००० श्रमतास असेल तर प्रत्येक वस्तूचे मूल्य २ श्रमतास झाले. या २ श्रमतासांपैकी १ श्रमतास श्रमसामग्रीचा; पूर्वीचाच पिळवणुकीचा दर गृहीत धरून १/२ श्रमतास श्रमशक्तीच्या मूल्याचा वजा जाता प्रत्येक वस्तूमागे १/२ श्रमतास याप्रमाणे एकूण ८,००० श्रमतास वरकड-मूल्य तो मिळवत आहे. आता असे समजू की श्रमप्रक्रियेची रचना त्याच्या कारखान्यात अशी बदलली गेली की आता कामगार ८,००० श्रमतासांमध्ये १६,००० वस्तू बनवतात. असे झाले तर या १६,००० क्रयवस्तूंच्या उत्पादनाचे वैयक्तिक मूल्य १६,००० श्रमतास श्रमसामग्री + ८,००० श्रमतास = २४,००० श्रमतास होते, म्हणजे एका वस्तूचे मूल्य दीड श्रमतास होते. त्याला एका वस्तूच्या उत्पादनासाठी आता १ श्रमतास श्रमसामग्री आणि फक्त १/४ श्रमतास मूल्याची श्रमशक्ती लागते. जर असे मानले की त्याच्या प्रतिस्पर्धी भांडवलदारांनी मिळून सरासरी प्रत्येकी २ श्रमतास मूल्य सामावणाऱ्या ८४,००० वस्तू बाजारात आणल्या आहेत तर श्रममूल्याच्या सिद्धांताप्रमाणे बाजारात आलेल्या ८४,००० + १६,००० वस्तूंचे मूल्य हे (८४ × २+१६ × १.५) × १००० श्रमतास इतके ठरते किंवा एक लाख वस्तूंमागे १.९२ लाख श्रमतास याप्रमाणे प्रत्येक वस्तूमागे १.९२ श्रमतास ठरते.

पूर्वी सर्व भांडवलदारांना प्रत्येक वस्तूमागे १/२ श्रमतास वरकड-मूल्य मिळत होते. आता एका भांडवलदाराच्या कारखान्यातल्या कामगारांच्या श्रमाची उत्पादकता वाढल्यामुळे त्या वस्तूचे सरासरी मूल्य थोडे कमी होते. त्या भांडवलदाराला पूर्वी दर वस्तूमागे १/२ श्रमतास याप्रमाण १६,००० वस्तूंमधून ८,००० श्रमतास वरकड-मूल्य मिळत होते. आता त्याला दर वस्तूमागे १ तास श्रमसामग्री व १/४ श्रमतास श्रमशक्तीचे मूल्य वजा जाता १.९२—१—०.२५ = ०.६७ श्रमतास वरकड-मूल्य मिळते. याप्रमाणे १६,००० वस्तूंमधून १०,७२०

श्रमतास इतके वरकड–मूल्य मिळते. त्याचे वरकड–मूल्य त्यामुळे २,७२० श्रमतासांनी वाढले आहे, त्याला तितके जादा वरकड–मूल्य मिळाले आहे.

जादा वरकड–मूल्य नाहीसे झाल्यावर उरते ते सापेक्ष वरकड–मूल्य

उत्पादकता वाढवताना प्रत्येक भांडवलदाराची नजर अशा जादा वरकड–मूल्यावर असते. पण एखाद्याच भांडवलदाराच्या कारखान्यात उत्पादकता वाढून मिळालेले हे जादा वरकड–मूल्य म्हणजे मात्र सापेक्ष वरकड–मूल्य नव्हे.

मगाचच्या उदाहरणात पिळवणुकीचा दर बदललेला नाही. पूर्वी १ लाख वस्तू बाजारात येत. त्यात कामगारांची १ लाख तास श्रमशक्ती गेलेली असे. त्यापैकी अर्धे म्हणजे ५०,००० श्रमतास कामगारांच्या हातात पडत आता एका भांडवलदाराच्या कारखान्यात उत्पादकता वाढल्यामुळे त्या एक लाख वस्तूंमध्ये ९२,००० श्रमतास जातात. अजूनही त्यांपैकी अर्धे म्हणजे ४६,००० श्रमतास हे कामगारांच्या हातात पडतात. उरलेले ४६,००० भांडवलदारांच्या हातात पडतात. कामगारांच्या हातात श्रमशक्तीचे मूल्य म्हणून पडणारा श्रमांचा वाटा वाढलेला नाही. जादा वरकड–मूल्य कामगारांची पिळवणूक वाढून येत नाही. ते कुठून येते ते पहायचे तर आपल्याला भांडवलदारांच्या आपापसातल्या संबंधांमध्ये काय होते त्याकडे जावे लागेल.

सदर भांडवलदाराच्या कारखान्यात उत्पादकता वाढण्याअगोदर भांडवलदारांच्या हातात ५०,००० श्रमतास वरकड–मूल्य येत होते. त्यापैकी ८,००० श्रमतास, दर वस्तूमागे १/२ श्रमतास याप्रमाणे त्याला मिळत होते तर ४२,००० प्रतिस्पर्ध्यांना. नंतर मात्र दर वस्तूमागे ०.६७ श्रमतास याप्रमाणे त्याच्या हातात १०,७२० श्रमतास वरकड–मूल्य येते तर त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या हातात मात्र दर वस्तूमागे फक्त ०.४२ श्रमतास याप्रमाणे ३५,२८० श्रमतास वरकड–मूल्य येते. सर्व भांडवलदारांच्या वरकड–मूल्याची बेरीज बरोबर राहते, ती कामगारवर्गाने घातलेल्या श्रमांची अर्धी म्हणजे ४६,००० श्रमतासच राहते.

कामगारवर्ग आणि भांडवलदारवर्ग यांच्यातील सापेक्ष संबंध बदललेला नसतो. फक्त एक भांडवलदार इतर प्रतिस्पर्धी भांडवलदारांच्या तुलनेने वरकड–मूल्याचा जास्त हिस्सा मिळवत असतो. जादा वरकड–मूल्य हे यातून येते. आणि त्यामुळेच जादा वरकड–मूल्य पुसलेही जाते. प्रतिस्पर्धी काही गप्प बसत नाहीत. त्यांच्याही कारखान्यात हे नवे उत्पादन तंत्र आणतात व हे तंत्र सार्वत्रिक झाले की जादा वरकड–मूल्याचा आधार नाहीसा होतो. जादा वरकड–मूल्य नाहीसे होते.

मग उरते काय? एक गोष्ट हे नवे उत्पादनतंत्र सार्वत्रिक झाल्यानंतरदेखील उरते. त्या वस्तूचे मूल्य आता २ श्रमतासांवरून १.५ श्रमतासावर आलेले असते. एखाद्या भांडवलदाराच्या कारखान्यात श्रमांची उत्पादकता वाढल्यामुळे त्याला तात्पुरते जादा वरकड-मूल्य मिळून, ते तंत्र सार्वत्रिक बनून, ते जादा वरकड-मूल्य नाहीसे होणे हे चक्र पूण झाल्यावरदेखील जी गोष्ट उरते ती म्हणजे त्या क्रयवस्तूचे मूल्य कमी झालेले असते. आणि ही क्रयवस्तू जर श्रमशक्तीचे मूल्य ठरवणाऱ्या राहणीमानाच्या निकषात मोडत असेल तर त्या प्रमाणात एकंदर श्रमशक्तीचे मूल्य कमी होते. त्या प्रमाणात कामगार वर्गाच्या श्रमांचा भांडवलदार वर्गाच्या हातात येणारा हिस्सा म्हणजे वरकड-मूल्य वाढते. जादा वरकड-मूल्य पुसले जाऊन नंतर जे वर्गीय पातळीवर वाढवून मिळणारे वरकड-मूल्य असते ते मार्क्सला अभिप्रेत असलेले सापेक्ष वरकड-मूल्य.

> उदाहरणार्थ जर आपण असे धरले की कामगारांच्या श्रमशक्तीच्या ४ श्रमतास मूल्यापैकी २ श्रमतास मूल्य ते मघाची वस्तू घेण्यावर खर्च करतात. मघाचे जादा वरकड-मूल्य नाहीसे झाल्यावर वाढलेल्या सार्वत्रिक उत्पादकतेमुळे त्या वस्तूचे मूल्य १.५ श्रमतासावर येते व त्यामुळे श्रमशक्तीचे मूल्य ३.५ श्रमतासांवर येते. ८ श्रमतासांपैकी ४ श्रमतासांऐवजी आता ४.५ श्रमतास वरकड-मूल्य भांडवलदाराला प्रत्येक कामगाराच्या श्रमातून मिळते. हा वाढलेला अर्धा श्रमतास हे सापेक्ष वरकड-मूल्य आहे.

ही 'कहीं पे निगाहें, कहीं पे निशाना' ची कहाणी महत्त्वाची आहे. प्रत्येक भांडवलदार जादा वरकड-मूल्यावर डोळा ठेवून असतो. पण एकूण भांडवलदार वर्गाच्या दृष्टीने या सर्व लठ्ठालठ्ठीतून साधला जाणारा निशाना असतो, सापेक्ष वरकड-मूल्य! सापेक्ष वरकड-मूल्य हा परिणाम घडवून आणणारे जादा वरकड-मूल्य हे माध्यम असते; किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती प्रत्यक्षात व्यक्त होते ती जादा वरकड-मूल्य काढण्याच्या प्रवृत्तीतून. सर्वच भांडवली विचारवंताना ही प्रतिस्पर्ध्यावर कुरघोडी करून जादा वरकड-मूल्य काढण्याची प्रवृत्ती स्पष्टपणे जाणवत असते. तिच्यामुळे उत्पादकता वाढते हे दिसतेच. पण यातून जादा वरकड-मूल्य नाहीसे झाल्यावरदेखील वरकड-मूल्य का वाढावे याची फारशी स्पष्ट कल्पना त्यांच्या विचारात दिसत नाही. मार्क्स प्रथम याची स्पष्ट व नेटकी सांगड घालतो. नुसती कशीही व कुठेही श्रमांची उत्पादकता वाढून चालत नाही. कामगारांच्या राहणीमानात न मोडणाऱ्या चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनामध्ये

श्रमांची उत्पादकता कितीही वाढली तरी त्याचा परिणाम वरकड–मूल्याच्या दरावर होत नाही. आणि कामगारांच्या राहणीमानात मोडणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीमध्ये जरी श्रमाची उत्पादकता वाढली तरी तिचादेखील त्या उत्पादकतेच्या सरळसरळ प्रमाणात वरकड–मूल्याच्या वाढीवर परिणाम होत नाही. त्या वस्तूचे मूल्य ज्या प्रमाणात श्रमशक्तीच्या मूल्याचा भाग असते तितपतच परिणाम उत्पादकता वाढल्यामुळे होऊ शकतो.

सापेक्ष वरकड–मूल्यभांडवलशाहीची क्रांतिकारक बाजू

श्रमांच्या उत्पादकतेतील वाढीशी संबंधित सापेक्ष वरकड–मूल्याची प्रवृत्ती हे भांडवलशाहीचे एक खास वैशिष्ट्य आहे. ही प्रवृत्ती श्रमप्रक्रियेचा चेहरामोहराच बदलून टाकते. भांडवलशाहीपूर्वी संथ गतीने वाढणारी श्रमांची उत्पादकता भांडवलशाहीबरोबर झपाट्याने वाढू लागते. उत्पादनाच्या प्रचंड क्षमता तयार होतात. आहे त्या जमिनीत, आहे त्या पाण्यावर, आहे त्या साधनसामग्रीच्या साहाय्याने जगाच्या लोकसंख्येपेक्षा अनेकपटीने वाढलेल्या लोकसंख्येलाही दोनवेळचे भरपूर अन्न देण्याची क्षमता एकीकडे तयार होत असते; आणि त्याबरोबरच पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाच्या खुणादेखील अनेकदा बेचिराख करण्याच्या प्रचंड क्षमतादेखील युद्धसामुग्रीमार्फत तयार होत असतात. परंतु त्यातील सापेक्ष वरकड–मूल्य वाढवणाऱ्या क्षमता या पहिल्या प्रकारच्या असतात. दुसऱ्या प्रकारच्या क्षमतांमुळे सापेक्ष वरकड मूल्यात वाढ होत नाही. त्यामुळे जितक्या प्रमाणात सापेक्ष वरकड–मूल्याला आधारभूत ठरणाऱ्या उत्पादनक्षमता वाढत जातात तितक्या प्रमाणात, भांडवलशाही चौकटीत कामगारांचे शोषण वाढते, पण त्याचवेळी माणसांच्या सुखसोयींचा पाया बनू शकणाऱ्या क्षमता फोफावलेल्या असतात.

मार्क्सला अभिप्रेत असलेल्या कामगार–क्रांतीच्या दृष्टीने या उत्पादनक्षमतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या प्रचंड उत्पादनक्षमता मार्क्सच्या नजरेसमोरील, भांडवलशाही ओलांडणाऱ्या कम्युनिस्ट समाजाचा पाया ठरू शकतात. भांडवलशाहीने सापेक्ष वरकड–मूल्याच्या प्रवृत्तीमधून या क्षमता निर्माण करणे हे मार्क्सच्या दृष्टीने भांडवलशाहीचे एक महत्त्वाचे क्रांतिकारी कार्य ठरते. आपल्या उपजीविकेची सामग्री शक्य तितक्या थोडक्या श्रमात मिळवून सर्वांच्या कुवतीचा जास्तीत जास्त भाग हा स्वत:च्या मानवी क्षमतांचा विकास व आविष्कार करण्यामध्ये लावण्याचे स्वप्न पाहणे या क्षमतांमुळे शक्य होते.

पण मार्क्सची या क्षमतांकडे पहायची दृष्टी आंधळी नाही. त्यांचे ऐतिहासिक महत्त्व व त्यांचे तात्कालिक भांडवली रूप, त्यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या ऐतिहासिक शक्यता व त्यांच्या भांडवली स्वरूपात त्याचे होणारे अपरिहार्य परिणाम यांची तो गल्लत होऊ देत नाही. किंवा काही भांडवली विचारवंतांप्रमाणे या क्षमतांमधली वाढ हीच केवळ भांडवलशाहीची स्वाभाविक स्थायी प्रवृत्ती तो मानत नाही. पुन्हा एकदा हे लक्षात ठेवले पाहिजे की निव्वळ वरकड-मूल्याची (या क्षमतांमध्ये काहीही वाढ न करणारी) व सापेक्ष वरकड-मूल्याची (या क्षमतांमध्ये वाढ करणारी) या दोन्ही प्रवृत्ती मार्क्सच्या दृष्टीने भांडवलशाहीतील मूलभूत प्रवृत्ती आहेत.

कोणती प्रवृत्ती कोणत्या काळात, कोणत्या क्षेत्रात कितपत प्रभावी ठरेल हे ऐतिहासिक परिस्थितीमधून निर्माण होणाऱ्या संबंधांची रचना ठरवेल. इतके मात्र म्हणता येते की कामगार स्वत:च्या हिताच्या संरक्षणासाठी जितक्या हिरीरीने व जोमाने संघटित होऊन उभे राहतील तितक्याच वेगाने सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती प्रमुख बनेल व तिला पोषक अशा भांडवलशाहीमधील प्रवृत्ती जोम धरतील. त्यामुळे जेव्हा मार्क्स या क्षमतांचा पाया घालणे हे भांडवलशाहीचे क्रांतिकारक कार्य वेगळे काढत असतो तेव्हा त्याच्या मनात भांडवलदारवर्ग आपसूक, स्वाभाविकपणे हे क्रांतिकारक कार्य हातात घेईल अशी भाबडी कल्पना नसते. याउलट त्यातून व्यक्त होत असतो तो त्याचा कामगारवर्गावरचा विश्वास. हा विश्वास की आपले हित सांभाळण्याच्या कामगारवर्गाच्या जागरूकतेमुळे भांडवलदारवर्गाला ही कार्ये पार पाडणे भाग पडेल.

आणि त्याबरोबरच या उत्पादन क्षमतांच्या विकासाच्या भांडवली रूपाबद्दलही, त्यांच्या भांडवलशाहीतील परिणामांविषयीदेखील मार्क्सचे म्हणणे अगदी स्पष्ट आहे. श्रमप्रक्रियेच्या या भांडवली विकासाचा एकेक टप्पा नवनव्या पद्धतींनी कामगारांवर काय परिणाम करत असतो, वाढत्या क्षमतांबरोबरच त्यांच्या वाढत्या फळापासून कामगार वाढत्या प्रमाणात कसा वंचित होत असतो याचेही तो वर्णन करतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या क्षमतांच्या वाढीचे कारण काय आणि निमित्त काय, क्षमता खरी कुणाची वाढत असते आणि ती व्यक्त होते कुणाच्या वाढत्या क्षमतेत, या सर्व गोष्टी तपासत मार्क्स पुढे जातो. सापेक्ष वरकड-मूल्याचे मार्क्सचे पुढील विश्लेषण म्हणजे प्रचंड उत्पादनक्षमता पोटात

घेऊन येणाऱ्या उत्पादनप्रक्रियेच्या भांडवली विकासाच्या टप्प्यांचेच विश्लेषण बनते.

८. भांडवली प्राथमिक सहकार्य : सापेक्ष वरकड–मूल्याचे साधन

१. सहकार्य : श्रमांची वाढती उत्पादकता

विटा झेलत एकमेकांकडे फेकत गवंड्यापर्यंत पोचवणारी मजुरांची रांग तुम्ही नक्कीच पाहिली असेल. किंवा एखादा अवजड रूळ जागेवर बसण्यासाठी त्या रुळाला फुटाफुटावर मोठमोठे चिमटे लावून तो तालात ओढणारी माणसेदेखील तुम्ही नक्कीच पाहिली असतील. त्या वेळेस तुम्ही श्रमांची उत्पादकता वाढवण्याचा एक साधा व प्राथमिक मार्ग पाहत असता. सर्वजण एकच काम करत असतात, रांगेतला प्रत्येक मजूर मागच्याने फेकलेली वीट झेलून पुढच्याकडे फेकत असतो किंवा एक चिमटा धरून प्रत्येकजण रूळ ओढत असतो. परंतु हे काम फक्त सहकार्याने करत असतात. याला आपण प्राथमिक सहकार्य (सिंपल को–ऑपरेशन) म्हणू शकतो. अगदी एका खोलीत केवळ शेजारी शेजारी बसून विड्या वळणारे विडी कामगारदेखील प्राथमिक सहकार्यच करत असतात. किंवा वर्कशॉपच्या एकाच भागात शेजारीशेजारी लेथवर सारखीच प्रक्रिया करणारे कामगारदेखील प्राथमिक सहकार्य करत असतात.

प्राथमिक सहकार्य हा श्रमांची उत्पादकता वाढवण्याचा अगदी साधा उपाय तर असतोच परंतु ते सहकार्य जर एखाद्या भांडवलदाराच्या कारखान्यातील

कामगारांमध्ये घडत असेल तर तो सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याचा एक मार्गदेखील असतो. तुम्ही पाहत होता तेव्हा बघता बघता बांधकाम मजुरांकडून बिल्डरने व रूळ घालणाऱ्या मजुरांकडून रेल्वे कंत्राटदारांनी सापेक्ष वरकड-मूल्य काढले होते!

भांडवलदारासाठी एकच काम अनेक माणसांनी केवळ शेजारीशेजारी किंवा एकत्र करणे ही खरी किती साधी गोष्ट आहे. पण या अगदी साध्या गोष्टीदेखील श्रमांची उत्पादकता सापेक्ष वरकड-मूल्याचे भांडवली रूप कसे घेते त्याची सर्व मर्मस्थाने आपल्याला सापडू शकतात. आणि मार्क्सच्या अंतर्भेदी नजरेतून ही साधीशी गोष्टदेखील सुटत नाही. तो या साध्या गोष्टीच्या विश्लेषणातून सापेक्ष वरकड-मूल्य मिळवण्याच्या भांडवलशाहीच्या सर्व मार्गांना सामाईक असणारे संबंध आपल्यासमोर ठेवतो.

प्रत्यक्ष श्रमांच्या उत्पादकतेत वाढ

मुळात सर्व माणसे एकच काम करत असतील तर श्रमांची उत्पादकता वाढू कशी शकते? एका मोठ्या कामाचे भाग पाडून ती वेगवेगळी कामे वेगवेगळ्या माणसांनी करणे किंवा काम करण्यासाठी यंत्रे लावणे यामुळे श्रमांची उत्पादकता वाढते हे आपल्याला सहज भावत असते. पण प्राथमिक सहकार्यामधील उत्पादकतावाढीची शक्ती चटकन नजरेत भरत नाही. पण याची अनेक उदाहरणे आपल्या अवतीभवतीदेखील आणि इतिहासातदेखील सापडतात. एक म्हणजे साधे प्राथमिक सहकार्यदेखील एक नवी उत्पादनशक्ती तयार करत असते. जी कामे एकट्यादुकट्या माणसाने होऊ शकली नसती अशी अनेक कामे करणे आता त्यांना एकत्रित काम केल्यामुळे शक्य होते. फार कशाला, मघाचा तो रेल्वेचा रूळ आठवून पहा किंवा एस्. टी. बंद पडल्यावर सर्व प्रवाशांनी एकाच वेळी ढकललेली एस्. टी. ची बस पहा. आणि त्यानेही भागले नाही तर प्राचीन देवळे, पिरॅमिडस् आणि प्राचीन काळी माणसांनी अजस्त्र दगड रचून केलेली इतर प्रचंड शिल्पे पहा. प्राथमिक सहकार्याची उत्पादनशक्ती या सर्व वस्तूंमागे दडलेली तुम्हाला दिसेल.

या व्यतिरिक्त प्राथमिक सहकार्यामुळे उत्पादनशक्ती इतर अनेक ठिकाणी वाढताना दिसते. विटा झेलणारी मजुरांची रांग करण्याऐवजी जर सर्व मजूर प्रत्येकी एकेक वीट पोचवू लागले तर बांधकामाचा वेग अनेक पटींनी मंदावतो. सहकार्यामुळे तेवढ्याच श्रमात अनेकपटींनी बांधकामाचा वेग वाढतो. इतकेच

नव्हे तर केवळ शेजारी तेच काम करणारे माणूस असणे यानेदेखील काम करणाऱ्याला हुरूप येऊन प्रत्येकाचे काम वेगाने होते. कुटुंबातल्या चार माणसांनी बसून शेंगा मोडण्यापासून ते चालीत गाणी म्हणत एकत्रपणे शेताची निंदणी-कोळपणी करण्यापर्यंत सर्व ठिकाणी प्राथमिक सहकार्याच्या या शक्तीचा आपल्याला अनुभव येत असतो. आणि कधीकधी प्राथमिक सहकार्यामुळे चाललेल्या कामाची दिशा जोखणेदेखील सोपे जाते. उदाहरणार्थ, एखाद्या बांधकामाचा आराखडा जमिनीवर आखला जाऊन बांधकाम सुरू होते. चार बाजूंच्या भिंती एकदम बांधल्या जात असतील तर योजल्याप्रमाणे काम होते आहे की नाही हे चटकन समजू शकते. आणि सहकार्यातून अर्थात माणसांना त्या मानाने थकवा कमी येणे, त्यांची हिंमत वाढणे त्यांचे आपसातले संबंध घनिष्ट होणे हेदेखील होतच असते. हे भांडवलशाहीतल्या अमूर्त श्रमांच्या चौकटीत अर्थपूर्ण ठरत नसले तरी अशा इतरही गोष्टी प्राथमिक सहकार्यातून शक्य होतच असतात.

अप्रत्यक्ष श्रमांची बचत

आतापर्यंत आपण चर्चा करत होतो ती प्रत्यक्ष श्रमांच्या उत्पादकतेची; पण प्राथमिक सहकार्यामुळे जर समाजाच्या वापरल्या जाणाऱ्या अप्रत्यक्ष श्रमांची—श्रमसामग्रीकरता खर्च होणाऱ्या श्रमांची—बचत झाली तर तोही एकंदर सामाजिक श्रमांच्या वाढलेल्या उत्पादकतेचाच भाग असतो. अशा प्रकारची श्रमांच्या उत्पादकतेमधील वाढदेखील प्राथमिक सहकार्यामुळे घडून येत असते. जेव्हा माणसे एकच काम करत असतात तेव्हा कच्चा माल इत्यादी श्रमविषय किंवा बहुतेक प्रत्यक्ष श्रमसाधने यांची फारशी बचत होत नाही. शेजारी शेजारी दहा कामगार टेबले बनवत असतील तर त्यामुळे प्रत्येक टेबलासाठी खर्च होणारे लाकूड किंवा अवजारांची झीज यात फारसा बदल होत नाही. आणि हे साहजिकही आहे, कारण येथे श्रमसाधनांचा किंवा लाकडाचा उपयोग सामूहिक नसतो. पण अप्रत्यक्ष श्रमसाधनांचा मात्र सामूहिक वापर शक्य होतो.

उदाहरणार्थ जागा, इमारत. मगाचच्या उदाहरणात दहा ऐवजी एकच कामगार काम करत असता तर त्याच्या कामासाठी, कच्चा माल व तयार टेबले साठविण्यासाठी जेवढी जागा व इमारती बांधकाम लागले असते त्याच्यापेक्षा दसपटीने जागा व बांधकाम काही १० कामगारांसाठी लागत नाही. क्षेत्रफळाच्या भाषेत बोलायचे तर १० कामगारांसाठी लाकडे साठवायला फक्त साडेचारपट व कामासाठी सुमारे तिप्पट बांधकाम लागते. याचा अर्थ अप्रत्यक्ष श्रमसाधनांद्वारे

टेबलामध्ये जाणारे सामाजिक श्रम दर कामगाराच्या टेबलामागे निम्म्यापेक्षा जास्त प्रमाणात कमी होतात. क्रयवस्तूंच्या भाषेत, टेबलाचे मूल्य तेवढे कमी होते.

२. वाढत जाणारे किमान भांडवल

सहकार्यातून वाढणारी प्रत्यक्ष श्रमांची उत्पादकता आणि त्याबरोबरच सहकार्यामुळे श्रमसामग्रीचा होणारा सामूहिक वापर व बचत, यामुळे उत्पादित क्रयवस्तूचे मूल्य कमी होते हे आपण पाहिले. ती क्रयवस्तू जर कामगारांच्या क्रयवस्तुरूप राहणीमानामध्ये मोडत असेल तर त्या प्रमाणात श्रमशक्तीचे मूल्य कमी होते व भांडवलदारवर्गाला सापेक्ष वरकड-मूल्य मिळते. पण भांडवलदाराच्या दृष्टीने हे सहजासहजी होत नाही, त्याच्यासाठी त्याला काही किंमत द्यावी लागते!

भांडवलदाराला जर सहकार्यातून मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य मिळवायचे नसते तर तो एका कामगारालाही कामावर ठेवू शकला असता. असे वरकड-मूल्य मिळवायचे म्हटले की मात्र त्याला जास्त कामगारांना कामावर ठेवावे लागते व जितके जास्ती कामगार तो लावतो तितका सहकार्याचा व श्रमसामग्रीच्या सामूहिक वापराचा जास्त परिणाम होतो, तितके जास्त सापेक्ष वरकड-मूल्य त्याला मिळते. पण जास्त कामगार लावायचे म्हटले की त्याला गुंतवावे लागणारे भांडवल वाढते, त्याच्या कारखान्यात तयार होणारे उत्पादन वाढत जाते, ते खपवायची तयारी त्याला ठेवावी लागते. याचा सरळसरळ परिणाम हा असतो की जर एखाद्या क्षेत्रात सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याची प्रवृत्ती वाढायची असेल, तर त्या क्षेत्रात उतरून, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लागणारे किमान भांडवल वाढत जाते. कोणाही सायकल दुकानदाराने उठावे व उद्योगपती बनावे ही शक्यता कमी होत जाते. भांडवलदारवर्गामध्ये इतरांना प्रवेश देणारे दार जास्त अरुंद बनते.

३. सहकार्याच्या फायद्याविषयीचे सत्य व भ्रम

फायदे : उत्पादनाच्या आकारमानाचे की सहकार्याचे?

भांडवली स्वरूपातील प्राथमिक सहकार्यातून उत्पादकता वाढीबद्दलचा एक भांडवली विचारदेखील प्रसवत असतो. भांडवलदाराला काय दिसते? जितके जास्त भांडवल गुंतवावे, जितके उत्पादनाचे आकारमान (स्केल ऑफ प्रॉडक्शन) वाढवावे तितकी उत्पादकता वाढते. त्याच्या लेखी

उत्पादकतावाढीच्या मुळाशी जास्त भांडवलाची गुंतवणूक व उत्पादनाचे वाढलेले आकारमान ही कारणे असतात. हा कार्य-कारणभाव भांडवली विचारामध्ये अंतर्भूत असतो.

हा विचार म्हणजे 'उत्पादन आकारमानाद्वारे बचत' (इकॉनॉमी ऑफ स्केल) हा सुप्रसिद्ध सिद्धांत. उत्पादनाचे आकारमान जास्त असले की उत्पादनाचा खर्च कमी होतो हे त्याचे अगदी थोडक्यातले सूत्र आहे. आता हे मुळात अर्ध्यसत्य आहे. या बचतीमागे मूलभूत कारण असते श्रमसामग्रीचा वाढता सामूहिक वापर या सामूहिक वापरामुळे एका बाजूला उत्पादनाचे आकारमान वाढत असते आणि श्रमखर्चात बचतही होत असते. हे मूळ कारण बाजूला ठेवून जर नुसते वरवर पाहिले तर उत्पादनाच्या आकारमानातील वाढ व बचत हातात हात घालून जाताना दिसतात. शिवाय भांडवलदारांच्या दृष्टीने उत्पादनाचे आकारमान व त्यामुळे वाढणारी भांडवल गुंतवणूक ही त्याला बोचणारी सर्वात महत्त्वाची गोष्ट असते. श्रमसाधनांचा सामूहिक वापर हा काही त्याच्या लेखी फार मोठा प्रश्न नसतो! अडचण असते ती नेहमी भांडवलाची. त्यामुळे वरवर दिसणाऱ्या संबंधावर आधारलेला हा भांडवली सिद्धांत उभा राहतो.

खरे महत्त्वाचे काय, वाढलेले उत्पादनाचे आकारमान की साधनसामग्रीचा सामूहिक वापर हे पहायचे असेल तर उत्पादनाचे आकारमान तर वाढलेले आहे पण सामूहिक वापर मात्र वाढलेला नाही असे उदाहरण घ्यावे लागेल. मगाचच्या उदाहरणामध्ये जागेचा व बांधकामाचा सामूहिक वापर न करता १० माणसे लावून पहावे लागेल. प्रत्येक कामगाराला पूर्वीप्रमाणे स्वतंत्र जागा व खोली उपलब्ध केली तर उत्पादनाचे आकारमान वाढूनदेखील काडीची बचत होणार नाही!

सहकार्याच्या शक्तीचे भांडवलाच्या शक्तीत रूपांतर

अर्थात् असा मूर्खपणा कोणताही भांडवलदार करणार नाही. सामूहिक वापरातून वाढणारे उत्पादनाचे आकारमान भांडवलदाराला पाहिजे असते. पण या सगळ्यातून स्त्रवणारा भांडवली विचार या बचतीचे श्रेय कामगारांमधील वाढत्या सामूहिक संबंधांना, सहकार्याला देण्याऐवजी तो त्याचे श्रेय वाढलेल्या उत्पादनाच्या आकारमानाला, वाढलेल्या भांडवल गुंतवणुकीला देतो. माणसांमधल्या सहकार्याची उत्पादक, सर्जकशक्ती भांडवलशाहीत रूप घेते ते भांडवलाच्या शक्तीचे; मानवी सहकार्यातल्या स्थायी सर्जक क्षमता या

भांडवलशाहीच्या ऐतिहासिक काळात, माणसांपासून तुटलेल्या एका परक्या शक्तीच्या—भांडवलाच्या क्षमतांच्या उफराट्या रूपात प्रगट होतात.

आणि भांडवलशाही व्यवस्थेत हे रूप अपरिहार्यदेखील असते. जे कामगार भांडवलदाराच्या उत्पादनाच्या जागी प्राथमिक सहकार्य करत असतात त्यांनी भांडवलशाहीत स्वत:च्या इच्छेने थोडेच हे सहकार्य केलेले असते? ते प्रथम एकत्र येतात ते एका भांडवलदाराने कामाला लावलेली माणसे या नात्याने. प्राथमिक सहकार्य करू लागतात ते भांडवलदाराला त्यांच्यात प्राथमिक सहकार्य पाहिजे असते म्हणून. प्राथमिक सहकार्य घडवून आणताना दिसत असतो तो भांडवलदारच! त्यामुळे खोलात जाऊन भांडवली चौकटी पलीकडे न पाहणारा विचार साहजिकच प्राथमिक सहकार्यामुळे होणारी उत्पादकतेतील वाढ व श्रमसामग्रीच्या सामूहिक वापरातून होणारी बचत यांचे कारण भांडवलदारामध्ये किंवा त्याच्या भांडवल गुंतवणुकीतील वाढीमध्ये किंवा वाढलेल्या उत्पादनाच्या आकारमानामध्ये पाहत असतो.

४. सहकार्याचा भांडवलशाहीतील वापर

जेव्हा प्राथमिक सहकार्य भांडवली स्वरूपात श्रमप्रक्रियेमध्ये होत असते तेव्हा कारखान्यामध्ये कामगारांनी काय, किती, केव्हा व कसे निर्माण करावे हे ठरवत असतात भांडवलदार किंवा त्याचे प्रतिनिधी. कारखाना ही उत्पादनासंबंधी व श्रमप्रक्रियेसंबंधी भांडवलदारांचे हेतू, उद्देश व निर्णय 'प्रत्यक्षात आणणारी' जागा असते. कामाचे तास व श्रमशक्तीचे मूल्य यांची आपण वर चर्चा केली तेव्हा जे प्रश्नांचे पेव फुटले होते त्यावरून कामगारांच्या व भांडवलदारांच्या हेतूमधील व उद्देशांमधील विरोध व तफावत स्पष्ट झालेली होती. त्याच पद्धतीने भांडवली प्राथमिक सहकार्य हे माणसा माणसांमधील सहकार्य न राहता भांडवलदाराचे परके व विरोधी हेतू आणि उद्देश सामूहिकपणे कामगारांच्या गळी उतरवणारे एक रूप बनते. आणि हे त्याचे भांडवली रूप कामगारांच्या स्वाभाविक सहकार्यामधील उत्पादन शक्तीवर लगामदेखील घालत असते; उत्पादन शक्ती वाढण्यास एका बाजूला वाव देत असते पण त्याचवेळी दुसऱ्या बाजूला सहकार्याची या संदर्भातील पूर्ण क्षमता प्रत्यक्षात आणू न देणारे बंधनदेखील ठरत असते.

एका उदाहरणावरून हे जास्त स्पष्ट होईल. आपण दोन प्रकारच्या परिस्थितीची तुलना करू. एकीमध्ये प्राथमिक सहकार्य करण्यामधले हेतू व उद्देश हे

सरळपणे सहकार्य करणाऱ्यांचे सामूहिक हेतू आहेत. दुसरीमध्ये मात्र हेतू व उद्देश भांडवलदारांचे असतील व प्राथमिक सहकार्य कामगारांचे असेल. यासाठी आपल्याला शेतीमधले एक सुटसुटीत तुलना शक्य करणारे उदाहरण घेता येते. काही ठिकाणी—विशेषत: गणअवस्थेच्या खुणा अजून शिल्लक आहेत अशा ठिकाणी भूमिहीनांचे प्रमाण अगदीच कमी असते व सर्व कुटुंबांकडे सर्वसाधारणपणे सारखीच जमीन असते. अशा ठिकाणी आपल्याला पहिल्या प्रकारच्या प्राथमिक सहकार्याची काही उदाहरणे अजूनदेखील सापडू शकतात. उदाहरणार्थ कापणीसारख्या लवकर आटपायच्या कामांमध्ये एखाद्या कुटुंबाचे श्रम त्याच्या स्वत:च्या शेताची कापणी करण्यास अपुरे पडतात. अशावेळी सर्व कुटुंबे मिळून एकेका जमिनीच्या तुकड्यावरील कापणी सामूहिकपणे करतात. सर्वांचेच हित उघडपणे कापणी लवकर होण्यामध्ये गुंतलेले असते. कापणीची कामे अत्यंत वेगाने (व तितक्याच आनंदाने) होऊ शकतात. कापणीचे काम लवकर आटपले तर सर्वजण लवकर मोकळे होतात.

याउलट परिस्थिती भांडवलदाराकडे काम करणाऱ्या मजुरांची असते. विडी कारखान्यामध्ये दिवसाचा सरासरी कोटा जर रोजंदार मजुरांनी ८ तासांऐवजी ४ तासांमध्ये पूर्ण केला तर तो घरी जायला मोकळा होत नाही. त्याला आणखी ४ तास गुंतवून ठेवणारे काम दिले जाते! शिवाय मजुरांपैकी दोन-चार मजूर ८ तासांऐवजी ६ तासच कोटा पूर्ण करू लागले तर त्यातून सर्वांच्याच श्रमांच्या तीव्रतेत वाढ होण्याचा धोका असतो. एखाद्याने, एखादे दिवशी जास्त काम केले की सर्वांनी तितके शक्य असलेले काम नेहमी केले पाहिजे असा आग्रह भांडवलदाराकडून होऊ लागतो. पहिल्या प्रकारच्या उदाहरणामध्ये असे नसते. कारण भांडवलदारांसाठी प्राथमिक सहकार्य करण्यातून कामगारांना फुरसतीचा वेळ जास्त मिळणे, एखादे दिवशी जास्त काम करून, मन नसेल तेव्हा कमी काम करून, सरासरी राखणे असे स्वातंत्र्य उपभोगता येत नाही.

यामुळे भांडवलदार-कामगार हे भांडवली संबंध प्रथमपासूनच सहकार्यामधून व श्रमांच्या सामूहिकतेमधून निर्माण होणाऱ्या क्षमता पूर्णपणे प्रत्यक्षात येण्यावर बंधन ठरत असतात. कामगारांवर भांडवलदारांचे उद्देश लादून, त्यांच्यावर शिस्तीचा बडगा उगारतच हे संबंध प्रत्यक्षात येऊ शकतात. आणि प्रत्यक्षात ही रस्सीखेच 'सुष्ट' आणि 'दुष्ट' प्रवृत्तींच्या रस्सीखेचीचे रूप घेत असते. भांडवलदार अर्थातच राष्ट्रीय हिताची, उत्पादनाची, उत्पादकतेची बाजू घेणारे 'सुष्ट' प्रवृत्तीचे प्रतिनिधी असतात. आणि कामचुकार, आडमुठे, राष्ट्रीय हिताची

पर्वा नसलेले म्हणून कामगार ‘दुष्ट’ प्रवृत्तीचे प्रतिनिधी ठरत असतात! मूळ जबाबदार असणारे उत्पादनसंबंधांचे भांडवली स्वरूप नजरेआड राहते व गुन्हेगार ठरवले जातात ते कामगार!

लावावी लागणारी शिस्त!

भांडवली स्वरूपाचे कुठलेही सहकार्य म्हटले की ही रस्सीखेच आलीच. आणि या रस्सीखेचीवरचा भांडवलदारांचा एक नेहमीचा उपायही आलाच. हा उपाय म्हणजे शिस्त, अनुशासन. पण शिस्त अशी काही आपोआप येत नाही. आनंदाने स्वीकारलेल्या कामात शिस्त ही स्वेच्छेचा भाग असते. तिला अंतर्यामातून जाग्या झालेल्या कर्तव्यबुद्धीचे स्वरूप असते. पण आपण बोलत आहोत ते भांडवलदाराचे हेतू, उद्देश व निर्णय पाळण्याच्या कामगारांच्या शिस्तीबद्दल. अशी शिस्त नेहमी लावावी लागते. लादावी लागते. आणि तसे म्हटले की शिस्त लावणारी माणसे आली, त्यासाठीची यंत्रणा आली, या यंत्रणेमधले हुद्दे आले आणि या हुद्द्यांना चिकटलेली अधिकारांची उतरंड आली. म्हणजे कारखान्यामधील ही शिस्त राबवणारी अंतर्गत रचना कामगारविरोधी नोकरशाहीचे रूप अपरिहार्यपणे घेते. आणि जे सामाजिक श्रम उत्पादनात खर्च होतात त्यांपैकी काही श्रम केवळ भांडवलदारांसाठी कामगारांना शिस्त लावण्यात, उत्पादनाच्या भांडवली रूपाच्या रक्षणासाठी आवश्यक, उत्पादनाशी काही एक संबंध नसलेल्या कामांमध्ये वाया जातात!

भांडवलशाहींच्या क्रांतिकारकपणाच्या पोटातील बंधने

मधील सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याची प्रवृत्ती श्रमप्रक्रियेमधले सहकार्य व त्यातून उत्पादकता वाढवत असते. सापेक्ष वरकड-मूल्य ही भांडवलशाहीची क्रांतिकारक बाजू असते. पण ही क्रांतिकारक बाजूदेखील आपल्या पोटात तिच्या विशिष्ट रूपातल्या वर्गसमाजाच्या उफराट्या खुणा अपरिहार्यपणे घेऊन येत असते. त्यामुळे या क्षमता जाग्या होतात खऱ्या, पण त्याबरोबरच भांडवलशाही स्वत:च या जाग्या झालेल्या क्षमता पूर्णपणे प्रत्यक्षात येण्याला अडथळा करत असते. भांडवलशाहीतले खाजगी मालकीचे संबंध हे तिने स्वत:च जाग्या केलेल्या उत्पादनक्षमतांवरील बंधन ठरत असतात.

भांडवलशाहीमध्ये झालेल्या सहकार्याचा विकास इतर समाजव्यवस्थांपेक्षा उत्पादकता भांडवलशाही अनेकपटींनी कशी वाढवते हे पुढच्या दोन प्रकरणांमध्ये येईलच. तिथेही नवनव्या पद्धतीने ही क्षमता उफराट्या पद्धतीने

भांडवलाला चिकटताना दिसते, व उफराट्या अर्धसत्यांना जन्म देते. तिथेही त्या त्या क्षेत्रात प्रवेश करून स्पर्धेत टिकायला लागणारे किमान भांडवल वाढत जाऊन भांडवलदारवर्गात प्रवेश देणारी दारे आणखी अरुंद होत जाताना दिसतात. 'दुष्ट' कामगारांना अनुशासन लागू करणाऱ्या 'सुष्ट' यंत्रणांचा विकास होताना आपल्याला दिसेल. आणि त्या सर्व टप्प्यांमधून आपल्याला वाढते सामाजिक सहकार्य आणि त्या सहकार्याचे भांडवली उफराटे रूप हा भांडवलशाहीतला मूलभूत अंतर्विरोध उलगडत जाताना दिसेल. फरक इतकाच की प्रत्येक टप्प्याची स्वत:ची निर्णायक वैशिष्ट्ये या सर्वसाधारण प्रवृत्तींना निरनिराळा आकार देत असतात.

९. भांडवली श्रमविभागणी : सापेक्ष वरकड–मूल्याचा पुढचा टप्पा

कधी कधी शब्दांचा बदललेला अर्थदेखील इतिहास सांगून जातो. 'मॅन्युफॅक्चर' हा इंग्रजी शब्दच घ्या. यंत्रावर आधारलेल्या प्रचंड उत्पादनाला आज हा शब्द सर्रास वापरला जातो. पण याचा मूळ अर्थ आहे यंत्रे नसलेल्या हातकारखान्यांमध्ये होणारे उत्पादन! या शब्दाचा आजच्या अर्थाने होणारा वापर म्हणजे भांडवलशाहीने अंगावर बाळगलेली एक जन्मखूण आहे. आज हातकारखाने लयाला गेले आहेत. असलेच तर ते भांडवली उत्पादनाच्या मुख्य प्रवाहाच्या वळचणीला कुठे तरी आणि कसेबसे तग धरून आहेत. पण भांडवलशाहीचा एक कालखंड, औद्योगिक क्रांतीपूर्वीचा कालखंड, असा होता की हातकारखानदारी हेच भांडवली उत्पादनाचे मुख्य स्वरूप होते. इतकेच नव्हे तर ही हातकारखानदारी अवस्था व तिची वैशिष्ट्ये तपासल्याशिवाय यंत्राधिष्ठित उत्पादन भांडवलशाहीत का व कसे निर्माण झाले हेच समजणे शक्य नाही. या हातकारखानदारीचा आधार असते हातकसबावर आधारलेली श्रमविभागणी आणि ही श्रमविभागणी सहकार्यामधील प्राथमिक सहकार्याच्या व तसेच सापेक्ष वरकड–मूल्याचीदेखील पुढची पायरी असते.

१. हातकसबावर आधारलेली श्रमविभागणी व सापेक्ष वरकड-मूल्य

उत्पादकता वाढल्याने मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य

प्राथमिक सहकार्याच्या उदाहरणांमध्ये सहकार्य करणारे कामगार हे सर्व एकच काम करीत आहेत असे आपण धरून चाललो होतो. त्यांचे सहकार्य आता रेशभर पुढे जाते; त्या एकत्र कामाचे वेगवेगळे छोटेछोटे तुकडे पडतात व निरनिराळे कामगार यातला एकएकच तुकडा पार पाडून उत्पादन करतात. उदाहरण म्हणून टेबल तयार करणारा कारखाना घेऊ. तो जर प्राथमिक सहकार्यावर उभा असेल तर प्रत्येक कामगार हा लाकडापासून संपूर्ण टेबल बनवण्यामधील सर्व प्रक्रिया स्वत: पार पाडतो. पण हाच कारखाना जेव्हा श्रमविभागणीच्या आधारावर हातकारखाना बनतो तेव्हा या टेबल बनवण्याच्या पूर्वी एकसंध असलेल्या कामाचे बारके बारके तुकडे पडतात. उदाहरणार्थ टेबलसाठी लागणाऱ्या मापाप्रमाणे लाकूड कापणे हा एक स्वतंत्र तुकडा बनतो. ते रंधणे हा आणखी एक, त्यात जोड द्यायच्या जागी योग्य त्या जोडाला अनुरूप आकार देणे, ते सर्व भाग एकत्र बसवून जोड घट्ट करणे आणि शेवटी तयार टेबलाला पॉलिश करणे असे या प्रक्रियेचे अनेक स्वतंत्र तुकडे पडतात. आणि मग श्रमविभागणीमध्ये एखादा कामगार केवळ मापाप्रमाणे लाकूड कापीत असतो, एखादा केवळ रंधतो, एखादा केवळ जोड घडवतो, एखादा केवळ जोडणी करतो व एखादा केवळ पॉलिश करतो. कुठलाच कामगार टेबल बनविण्याची संपूर्ण प्रक्रिया पार पाडत नाही. प्रत्येकजण त्या प्रक्रियेचे वेगवेगळे छोटेछोटे तुकडे पार पाडीत असतो. लक्षात घ्या, इथे अजूनही आपण यंत्राबद्दल काहीच बोलत नाही, हे सर्व हातकसबावर चाललेले आहे. हातकारखाना म्हणजे हातकसबाच्या श्रमविभागणीवर आधारलेली उत्पादनाची जागा असते.

भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने याचा सर्वांत महत्त्वाचा फायदा असतो तो म्हणजे यातून त्याला जास्त सापेक्ष वरकड-मूल्य मिळते. एक म्हणजे यातून श्रमांची उत्पादकता सरळसरळ वाढताना दिसते. संबंध टेबल बनवायचे तर सुताराला वारंवार हत्यारे बदलावी लागतात, कामाचे स्वरूप व गती बदलावी लागते. वस्तू हलवाव्या लागतात, शोधाव्या लागतात आणि या सर्वांमध्ये वेळ जातो. त्याऐवजी प्रत्येक कामगारासमोरील काम आता सोपे, एकाच पद्धतीचे व यांत्रिकपणे करण्याजोगे असते. पुरेशी सवय झाल्यावर माणसे अशी यांत्रिक,

फारसा विचार व बदल न लागणारी कामे अतिशय वेगाने करतात. ती एक माणसांची अंगभूत क्षमताच असते. त्यामुळे तेवढ्याच कामगारांच्या श्रमात पूर्वीपेक्षा जास्त फळ्या कापल्या जातात, कामाचा प्रत्येक छोटा भाग जास्त वेळा गिरवला जाऊ शकतो व एकूण जास्त टेबले तयार होतात. प्रत्येक टेबलात जाणारे कामगारांचे श्रम कमी होतात. तेवढ्याच अप्रत्यक्ष श्रमसाधनांचा वापर जास्त वस्तूंसाठी होतो व प्रत्येक वस्तूत जाणारे अप्रत्यक्ष श्रमही कमी होतात. या दोन्ही गोष्टींमुळे वस्तूचे मूल्य कमी होते. पर्यायाने कामगारांच्या राहणीमानात ती वस्तू ज्या प्रमाणात मोडते त्या प्रमाणात श्रमशक्तीचे मूल्यदेखील कमी होते, व भांडवलदार वर्गाला सापेक्ष वरकड-मूल्य मिळते.

कौशल्य मारून मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य

आता हातकारखान्यातील उत्पादकता वाढीचा हा मुद्दा तुम्हांला सर्व भांडवली अर्थशास्त्राच्या पुस्तकांमध्ये सापडेल. हातकसबाच्या श्रमविभागणीचे मर्म सांगणारे यापुढील मुद्दे मात्र तुम्हांला तिथे अभावानेच सापडतील. या श्रमविभागणीला श्रमशक्तीचे मूल्य कमी करणारी दुसरी बाजूदेखील असते. किती कौशल्याच्या किती श्रमशक्तीची गरज भांडवलदारांना लागते यातही महत्त्वाचे बदल होतात.

उदाहरणार्थ असे समजा की शंभर कामगार एका भांडवलदारासाठी दिवसाला एक याप्रमाणे शंभर टेबले प्राथमिक सहकार्यातून बनवत आहेत. सर्व कामगार टेबल बनवण्याची संपूर्ण प्रक्रिया पार पाडत असल्यामुळे प्रत्येक कामगाराला सुतारकीची सर्वसाधारण माहिती व कौशल्य असणे आवश्यक आहे. निरनिराळ्या प्रकारच्या लाकडाबद्दल, त्या लाकडावर निरनिराळी कामे करण्याबद्दल ज्ञान त्यांना असणे आवश्यक ठरेल. ज्या मापाचे व ज्या पद्धतीचे टेबल असेल त्याप्रमाणे कापलेल्या तुकड्यांचे आकार, वापरावी लागणारी हत्यारे, सांध्यांचे जोडकाम यांचा विचार करण्याची, व त्या विचाराच्या आधारावर निर्णय घेण्याची कुवत त्यांच्या अंगी असावी लागेल. आपण ज्याबद्दल बोलतो आहोत त्या काळात याचा अर्थ असा होतो की होतकरू वा शिकाऊ कामगार म्हणून प्राप्त झालेले, दीर्घ अनुभव पाठीशी असलेल्या कारागिरीचे कसब त्यांच्या अंगी असावे लागेल. साहजिकच त्या काळात गेलेले श्रम हे त्यांच्या श्रमशक्तीच्या मूल्याचा भाग असतील.

आता तेच शंभर कामगार हातकसबाची श्रमविभागणी होऊन टेबले तयार करीत असतील तर सर्वच चित्र बदलेल. दिलेल्या मापात लाकडाचे तुकडे कापता येण्यासाठी कसली आली आहे दीर्घ उमेदवारीची, कारागिरी कौशल्य कमावण्याची गरज? किंवा दिलेला तुकडा रंधायला, किंवा पॉलिश करायला बहुसंख्य कामागारांच्या अंगी कौशल्य असणे फारसे आवश्यकच ठरणार नाही. संबंध टेबलाची जोडणी करणे व गिऱ्हाइकाला पाहिजे असलेल्या टेबलाच्या स्वरूपावरून व आकारावरून इतर कामगारांना त्यांच्या कामाची मापे पुरवणे हे काम करणाऱ्या मूठभर कामगारांना ते कौशल्य असले की पुरे होईल. बहुसंख्य कामगार हे अकुशल कामगार असले तरी चालू शकेल. आणि ते अकुशल असतील याचाच अर्थ उमेदवारीचे, अनुभवाचे किंवा शिक्षणात गेलेले श्रम त्यांच्या श्रमशक्तीच्या मूल्याचा भाग असण्याची गरज राहणार नाही. काही कुशल कामगारांनाच आता सुतारकीची सर्वसाधारण कुवत आवश्यक असल्याने त्यांना पूर्वीइतकेच श्रमशक्तीचे मूल्य भांडवलदाराला द्यावे लागेल. पण बहुसंख्य कामगारांना क्रयवस्तूच्या नियमाप्रमाणे श्रमशक्तीचे द्यावे लागणारे मूल्य एकदम घसरेल. उत्पादकता वाढून मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य तर मिळेलच पण जोडीला उत्पादनामध्ये अकुशल कामगारांचा थर तयार होऊन त्यामुळेही श्रमशक्तीचे मूल्य घसरेल व त्यातूनही घसघशीत सापेक्ष वरकड-मूल्य भांडवलदारवर्गाला मिळेल.

२. कामगारांवरील परिणाम

भांडवलशाहीने जन्माला घातलेले 'अकुशल कामगार'

या घसघशीत वरकड-मूल्यासाठी जी किंमत भरावी लागते ती मात्र भरावी लागते कामगारांना. जेव्हा संपूर्ण सुतारकीची प्रक्रिया ही कारागिरांच्या हाती असते तेव्हा त्याला आपले जे कौशल्य वापरावे लागते, जे निर्णय घ्यावे लागतात, त्यासाठी जे ज्ञान व माहिती जमा करावी लागते ती अनेक प्रकारची असते. समाजात निर्माण होणाऱ्या एकंदर सर्जनाच्या क्षमतांशी व त्यांतून निर्माण झालेल्या ज्ञानाशी त्याच्या श्रमांचा ठोस संबंध असतो. सुतारकी हा खरोखर एक पेशा किंवा व्यवसाय असतो. जेव्हा हात कसबाची भांडवली श्रमविभागणी येते तेव्हा पत्रा दिलेल्या आकारात कापणे, लाकूड रंधणे, खिळे ठोकणे, पॉलिश मारणे या कामांच्या तुकड्यांचाच 'पेशा' किंवा 'व्यवसाय' बनतो. या 'पेशात' कामगार कुठल्या सृजनक्षमतांशी नाते जोडणार आणि

कसले ज्ञान संपादन करणार? याचा परिणाम एकच होतो; बहुसंख्य कामगारांना आपले संपूर्ण उत्पादक आयुष्य, आपला सर्व उमेदीचा काळ हा कधी लाकूड कापण्यात, कधी ते रंधण्यात तर कधी पॉलिश करण्यात घालवावा लागतो. त्यांच्या सृजनक्षमता मारल्या जातात. मार्क्सने उद्धृत केलेले उर्कहार्ट या इंग्लिश विचारवंताचे वाक्य याचे खोचक वर्णन करते : 'एखाद्या माणसाचे तुकडे करणे म्हणजे, तो जर शिक्षेला पात्र असेल तर त्याचा शिरच्छेद करणे होय, (आणि जर तो शिक्षेला पात्र नसेल) तर खून करणे होय... श्रमांची विभागणी हा एका संपूर्ण जनसमूहाचा खूनच आहे.'

पण इथे एक गोष्ट स्पष्टपणे ध्यानात घेतली पाहिजे. मार्क्सचा रोख काही श्रमविभागणीवर नाही तर तिच्या भांडवली स्वरूपावर आहे. श्रमविभागणीचे सूत्र इतकेच सांगते की टेबल बनवण्याच्या कामात एका वेळी कोणीतरी लाकूड रंधले पाहिजे, कोणीतरी कापले पाहिजे, कोणीतरी जोडले पाहिजे, कोणीतरी पॉलिश केले पाहिजे—बस्. यापुढे जाऊन एखाद्या माणसाने आयुष्यभर लाकूड रंधावे, तो त्याचा 'पेशा' किंवा 'व्यवसाय' बनावा हे श्रमविभागणीचे सूत्र सांगत नाही. ही परिस्थिती श्रमविभागणीच्या भांडवली रूपामुळे निर्माण होते. कारण केवळ लाकूड रंधायच्या अकुशल कामासाठी श्रमशक्ती मिळाली तर तिचे मूल्य घसरते व सापेक्ष वरकड-मूल्य मिळते. श्रमविभागणीचे भांडवली रूप हे श्रमांची विभागणी करून थांबत नाही तर श्रमशक्तीचे तुकडे करते, कामगारांच्या श्रम करण्याच्या सृजनक्षमतेचे तुकडे करते. आणि म्हणून ज्यांच्या कौशल्याच्या एका तुकड्याखेरीज सर्व क्षमता मारल्या जातात अशा अकुशल कामगारांचा थर हे भांडवली श्रमविभागणीचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

खिळे ठोकणे हा पेशा बनतो

भांडवलीपूर्व समाजांमधल्या कारागिरांमध्येही सामाजिक श्रमविभागणी होती, पण तिला हे स्वरूप नव्हते. सुतारकाम, लोहारकाम, विणकाम हे व्यवसाय स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकणाऱ्या कामांवर आधारलेले असत. एखाद्या कुशल कारागिराच्या पदरी तरुण उमेदवार असत; व ते अकुशलही असत, पण अकुशल काम हा त्यांचा पेशा नव्हता. कौशल्य संपादन करण्याचा तो केवळ आरंभ असे. या व्यवसायांचेही विभाजन होई—उदाहरणार्थ ढाक्याचे मलमल विणणारे विणकर आणि गावचे भरड कपडे विणणारे विणकर. तरीही या सर्वांचे उत्पादन स्वत:हून समाजामध्ये एक उपयोगी वस्तू म्हणून वापरले जाऊ शकत होते. इतकेच नव्हे तर गिल्ड, श्रेणी किंवा बिरादारी यांसारख्या समाजातल्या

संस्था अकुशल उमेदवाराच्या कौशल्यसंपादनाचा हक्क कायम राहील हे पाहत होत्या. त्या सामाजिक श्रमविभागणीमध्ये श्रमप्रक्रियेचे तुकडे पेशा म्हणून कधी मान्यता मिळवू शकत नव्हते. एका बाजूला हे भांडवलीपूर्व संबंध समाजातील श्रेणीबद्ध, विषम आणि शोषक संबंधांच्या भिंती जपत होते तरी त्यावेळी कारागिरांचे कौशल्य, त्यांच्या सृजनक्षमता यांना वाव मिळावा याचीही जपणूक करीत होते. नेमके हेच भांडवलशाहीने मोडून काढले. भांडवलीपूर्व सामाजिक श्रेणी व शोषण मोडून काढता काढताच तिने कारागिरांची कौशल्य संपादनाची व सृजनक्षमतांची संधी व वावदेखील, बहुसंख्य कामगारांच्या संदर्भात पाहता, मोडून काढला. व्यवसायाच्या अंतर्गत श्रमप्रक्रियेचे तुकडे करून ते माणसांना चिकटवणे हे त्यामुळे भांडवली श्रमविभागणीचे व्यवच्छेदक लक्षण ठरते.

'मी' च्या जागी 'आम्ही'

म्हणूनच श्रमविभागणीच्या या उफराट्या भांडवली रूपाबद्दल चिडीचे रूपांतर एकंदर श्रमविभागणी विरूद्धच्याच चिडीत होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक असते. कारण श्रमविभागणीच्या या उफराट्या रूपातून तिच्यातला एक सुलटा, विधायक आशयही व्यक्त होत असतो—सहकार्य आता केवळ औपचारिक न राहता खरोखर प्रत्यक्षात येऊ लागलेले असते. प्रत्येक माणसाने श्रमप्रक्रियेच्या एका तुकड्याची आयुष्यभर यांत्रिक पुनरावृत्ती करायची हे भांडवली स्वरूप बाजूला ठेवले तर श्रमविभागणीतून काय उरते हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जेव्हा आपण टेबल बनवणाऱ्या कामगारांमध्ये प्राथमिक सहकार्य गृहीत धरले होते तेव्हा ते सहकार्य एका अर्थी औपचारिक होते; वरवरचे होते. जेव्हा त्यांच्या श्रमप्रक्रियेमध्ये श्रमविभागणी होते तेव्हा एक महत्त्वाचा बदल होतो. पूर्वी एखाद्या टेबलावर हात ठेवून एखादा कामगार म्हणू शके की हे टेबल मी बनवले. आता कुठलाही एक कामगार असे म्हणू शकत नाही. ते सर्वजण मिळून म्हणू शकतात की आम्ही हे टेबल बनवले. मी ची जागा आम्हीने घेतलेली असते! सहकार्य हे औपचारिक, वरवरचे न राहता एक अपरिहार्य आंतरिक वास्तव बनते. ही उत्पादनातील श्रमविभागणीमुळे आलेली सामुदायिकताच वाढलेल्या उत्पादकतेचा आधार असते. श्रमविभागणीच्या भांडवली रूपाविरूद्धची टीका ही खुद्द श्रमविभागणीविरूद्ध वळवली तर त्याचा अर्थ होतो ही सामुदायिकता व त्यातून वाढणाऱ्या क्षमता नाकारणे. मार्क्सला या क्षमता मुळीच नाकारायच्या नाहीत. तो या क्षमतांचे भांडवलशाहीतले उफराटे रूप दाखवत आहे. आणि ते कशासाठी? तर कामगारांनी

भांडवलशाहीचे उच्चाटन करून व त्या उफराट्या रूपांचा नाश करून, त्या क्षमता हस्तगत कराव्यात यासाठी.

त्या क्षमता कामगारांनी हस्तगत करायच्या तर सापेक्ष वरकड-मूल्याचे त्यांच्यावरचे जोखड नाहीसे होऊन, माणसांच्या आयुष्याला एका श्रमप्रक्रियेच्या अरूंद साच्यात कोंबणारे 'कार्यक्षमतेचे' किंवा 'गुणवत्तेचे' पोकळ निकष नाहीसे व्हावे लागतात. स्वत: कामगारांनीच सर्व कामकऱ्यांच्या सर्वांगीण हिताचे निकष लावून विशिष्ट प्रकारे रचलेली उत्पादनप्रक्रिया उभी रहावी लागते. अशी पूर्णत्वाला पोचलेली व्यवस्था आज आपल्या डोळ्यासमोर नाही. म्हणून हे अशक्य कोटीतले देखील वाटू शकते. पण वानगीदाखल आपण एक उदाहरण घेऊ. हा पूर्वीचाच टेबल बनवण्याचा कारखाना कामगारांनी त्यांच्या सर्वांगीण हिताचा निकष समोर ठेवून चालवायला घेतला आहे असे धरून चालू. प्रत्येक कामगाराने एक महिन्यानंतर आपल्या कामाची जागा बदलली पाहिजे असा नियम ते करू शकतील. ह्या महिनाभर लाकूड कापणारा कामगार पुढच्या महिन्यात लाकूड रंधत असेल, त्या पुढच्या महिन्यात जोडकाम करीत असेल, पॉलिश करत असेल, तर कधी टेबलाचे आराखडे, लाकूड याबद्दल निर्णय घेत असेल. किंवा मुळात टेबल बनवायचे का नाही हाही निर्णय ते मिळून घेऊ शकतील. 'कार्यक्षमतेला' व श्रमविभागणीला कुठेही धक्का न लावता श्रमविभागणीचे उफराटे रूप मात्र निकालात निघेल. अर्थात अशा प्रकारे उत्पादनाचे संघटन होणे हे आज एक स्वप्न आहे. पण ते आजच्या सर्व उत्पादनक्षमतांच्या निश्चित अशा भौतिक पायावर उभे असलेले स्वप्न आहे. आजच्या भांडवली व्यवस्थेमुळे येणारे समज भेदून पाहिलेले पुढच्या समाजाचे क्रांतिकारी स्वप्न आहे. 'कॅपिटल' मध्ये मार्क्स या स्वप्नालाच भक्कम वैचारिक आधार विश्लेषणातून निर्माण करत असतो.

३. भांडवली हातकारखान्यांमुळे भांडवलशाहीला पडणाऱ्या मर्यादा

हातकारखानदारी आणि श्रममूल्याचा भांडवली सिद्धांत

भांडवलशाहीपुरते बोलायचे तर मात्र हातकारखानदारीची व तिच्या वैशिष्ट्यपूर्ण श्रमविभागणीची ही अवस्था भांडवली उत्पादनामधली प्रमुख पद्धती म्हणून फार काळ राहिली नाही. ती भांडवलीपूर्व कारागिरांच्या उत्पादनातून चोरपावलांनी उगवली, वाढली आणि प्रभुत्वस्थानी पोचली. पण हे स्थान कमावता

कमावताच तिच्यातील अंतर्विरोध वाढत गेले व श्रमविभागणीच्या तिच्या पुढच्या भांडवली अवस्थेची भूमी तयार झाली. पण या मधल्या काळात तिने भांडवली संबंधांचे मूलभूत रूप आणि भांडवली विचार घडवलेला होता.

श्रममूल्याचा सिद्धांत सर्वसाधारण रूपात प्रथम मांडला गेला तो हातकारखानदारीच्याच काळात. भांडवली अर्थशास्त्राचा जनक समजला जाणारा ॲडम स्मिथ हा याच काळातला. त्याच्या संपूर्ण लिखाणामध्ये यंत्रांना गौण स्थान आहे, मुख्य महत्त्व आहे ते हातकसबाच्या श्रमविभागणीला. मानवी श्रम हा उत्पादन प्रक्रियेचा आधार आहे. तोच भांडवलशाहीत वेगाने वाढणाऱ्या उत्पादनक्षमतेचा आधार आहे, हे या कालखंडात सरळ व स्पष्ट होते. कारखान्यात शिरल्यावर दिसत ती माणसे, यांत्रिक हालचाली करणारीच पण माणसेच. त्यामुळे श्रममूल्याचा सिद्धांत भांडवली विचारप्रवाहात रूढ होण्यास साहजिकच पोषक अशी ही भूमी होती. पण हातकारखानदारीचा हा हातकसबाचा आधारच तिला निकालात काढणारे तिचे मर्मस्थान ठरले. कारण जास्तजास्त सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याच्या भांडवलदारांच्या ऊर्मी हातकसबाच्या या मर्यादेपाशी थडकून अडू लागल्या.

भांडवलदारांच्या अडचणी

हातकारखानदारीने भांडवलदारांना ज्या अनेक अडचणीत टाकले त्यातल्या काही प्रमुख अडचणींवर आपण नजर टाकूया. एक म्हणजे भांडवली श्रमविभागणीमुळे निरनिराळ्या प्रकारच्या कामगारांच्या संख्येत एक विशिष्ट प्रमाण असणे सुसूत्र कामासाठी आवश्यक ठरते. मार्क्सने या संदर्भात त्या काळातल्या छपाईचे खिळे बनवणाऱ्या कामगारांचे उदाहरण उद्धृत केले आहे. ओतकाम करणारा एक कामगार त्या काळात तासाला सरासरीने २ हजार खिळे ओतू शकत असे. ते वेगळे करणारा तासाला ४ हजार खिळे वेगळे करी, तर ते स्वच्छ करणारा तासाला ८ हजार खिळे स्वच्छ करून पॉलिश करी. म्हणजे स्वच्छ करणाऱ्या एका कामगाराची श्रमशक्ती पुरेपूर 'कार्यक्षम'तेने वापरायची तर किमान २ खिळे वेगळे करणारे आणि ४ ओतकाम करणारे पाहिजेत. आता उत्पादन वाढवायचे तर? एकदम दुप्पट, अधेमध्ये काही नाही! नाहीतर श्रमविभागणीचे पुरेपूर फायदे घेता येत नाहीत.

दुसरे म्हणजे या श्रमविभागणीने उत्पादनाचा वेग किती वाढेल याला एक कमाल मर्यादा यायची, एक 'सीलिंग' यायचे. शेवटी एक माणूस कितीही

वेगाने यांत्रिक हालचाली करू लागला तरी तो किती खिळे साफ करणार याला मानवी शारीरिक कुवतींचीच मर्यादा पडायची. सापेक्ष वरकड-मूल्याचा घसघशीत ओघ सुरू होतो न होतो तोच थोड्याच काळात या मर्यादेपाशी येऊन पोचायचा.

तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रमप्रक्रियेवरील प्रत्यक्ष ताबेदारीचा प्रश्न. उत्पादन प्रक्रियेवर नुसती मालकी असून भांडवलदाराला उपयोग होत नाही. त्याला त्याच्यावर प्रत्यक्ष ताबाही पाहिजे असतो; पाहिजे तेव्हा, आपल्या हेतूप्रमाणे, उद्दिष्टाप्रमाणे श्रमप्रक्रिया चालली पाहिजे हे त्याला पाहिजे असते. नेमके इथेच घोडे पेंड खात होते. श्रमप्रक्रियेचे यांत्रिक तुकडे वेगळे केल्यानंतरदेखील, कमावलेल्या कसबावर आधारलेले काही तुकडे उरतच होते. ते नाइलाजाने कारागिरी परंपरेतून आलेल्या कुशल कामगारांच्या थराच्या हातात सोपवणे भाग पडत होते. कुशल कामगारांना असलेले ज्ञानही कदाचित मिळेल पण कमावलेले कसब भांडवलदाराला कुठून येणार! या गोष्टीमुळे कुशल कामगारांना या श्रमविभागणीत एक निर्णायक महत्त्वाचे स्थान येत होते.

‘आडमुठे’ कुशल कामगार

कारागिरी परंपरेतून आलेल्या या कामगारांचे कामाबद्दलचे, कामाच्या पद्धतीबद्दलचे, काम करणाऱ्यांमधील संबंधांचे इत्यादी निकष हे उपयोग-मूल्याच्या व कारागिरी परंपरेतले निकष आणि हे निकष अनेकदा टक्कर घेत. शिवाय हे कामगार श्रेणींच्या, गिल्डच्या संघटनांच्या अनुभवातून आलेले होते. भांडवलदारांच्या दृष्टीने ते इतरही कामगारांना चिथावत, बेशिस्त वागायला लावत. श्रमशक्ती या आडमुठ्या क्रयवस्तूचा ‘जाच’ ही त्या काळातली भांडवलदारांची सततची ओरड होती. ही ओरड मार्क्सने उद्धृत केलेल्या एका भांडवली समर्थकाच्या भाषेत अगदी समर्पकपणे उतरते. ‘मानवी स्वभावातील दोषांमुळे असे आढळते की कामगार जितका जास्त कुशल असतो तितकाच तो मनमी आणि आडमुठा असण्याची शक्यता जास्त असते. अर्थातच यामुळे तो एका यांत्रिक रचनेचा भाग बनण्यास तितकाच नालायक ठरतो... (कारण) संपूर्ण रचनेचाच तो विध्वंस करू शकतो!’

शेवटी हातकारखान्यातील विकसित श्रमविभागणी जमेस धरूनही हातकसब भांडवलशाहीची वरकड-मूल्याची भूक भागवू शकत नाही. पण याच हातकारखानदारीचे पुढचे अपत्य ही वरकड-मूल्याची अमर्याद भूक

भागवण्याच्या क्षमता घेऊन पुढे येते. हे अपत्य म्हणजे यंत्र. यंत्रांबरोबर भांडवलशाही वयात येते आणि तिच्या हातकारखानदारीच्या बालपणाच्या खुणा उरतात त्या केवळ भूतकाळाच्या खुणा म्हणून.

१०. यंत्राधिष्ठित भांडवलशाही : सापेक्ष वरकड–मूल्याचा निर्णायक टप्पा

१. यंत्र म्हणजे काय

यंत्र! इतका परिचयाचा शब्द आणि इतकी परिचयाची गोष्ट—पण खरोखरच यंत्र म्हणजे काय? यंत्राधिष्ठित भांडवलशाहीबद्दल बोलायचे तर हा प्रश्न महत्त्वाचा बनतो. भांडवलशाही वयात आली तीच मुळी औद्योगिक क्रांतीमधून, यंत्रांवर स्वार होऊन. यंत्रे आणि आधुनिक भांडवलशाही यांचे समीकरण इतके पक्के झाले आहे की यंत्र संपते कुठे आणि आधुनिक भांडवलशाही कुठे सुरू होते हे भान टीकेत, चर्चेत आहे की नाही हेच कळेनासे व्हावे. त्यामुळे हा प्रश्न तपासायची गरज निर्माण होते. आणि या प्रश्नाची भांडवली उत्तरे म्हणजे आंधळ्यांनी हत्ती चाचपून केलेल्या वर्णनासारखी असतात.

यंत्राबद्दलचे दोन अपुरे समज

औद्योगिक क्रांतीबद्दल आपण पाठ्यपुस्तकांमध्ये जे वाचतो त्यातून शेवटी एक दंतकथाच आपल्या मनावर ठसते. जेम्स वॅट नावाचा एक माणूस किटलीचे झाकण वाफेमुळे थडथडतांना पाहतो व त्याला वाफेच्या शक्तीची कल्पना येते आणि या वाफेच्या शक्तीमधून औद्योगिक क्रांतीचा जन्म होतो. या अद्‌भुतकथेतून यंत्र म्हणजे काय या प्रश्नाचे एक उत्तरही हळूहळू मनामध्ये

रुजवले जात असते. माणसाची शक्ती न वापरता इतर शक्ती वापरणारे हत्यार म्हणजे यंत्र—किती स्वाभाविकपणे आणि सहजपणे हे उत्तर पटते! पण हा निकष खरोखरच काटेकोरपणे लावला तर अनेक विसंगती तयार होतात. बैलगाडी हे उघडपणे यंत्र ठरते पण पायाने चालवायचे शिवणकामाचे यंत्र किंवा छपाईचे ट्रेडल इत्यादी गोष्टी मात्र यंत्र ठरत नाहीत!

यंत्राबद्दलचा याच पद्धतीचा पण जास्त भरीव वाटणार दुसरा एक समज आडपावलाने रुजलेला असतो. यालाही असाच शालेय शिक्षणातून एक आधार तयार झालेला असतो. पदार्थविज्ञानाच्या यंत्रशास्त्र (मेकॅनिक्स) या उपशाखेमध्ये 'तरफ' ह्या यंत्राच्या प्राथमिक प्रकाराबद्दलची शिकवण या समजाला आधार देते. तरफ एका ठिकाणी लावलेल्या शक्तीचे दुसऱ्या ठिकाणी वेगळ्या शक्तीत व वेगळ्या दिशेत रूपांतर करीत असते; म्हणजे एका ठिकाणची शक्ती दुसऱ्या ठिकाणी वेगळ्या प्रकारे उपलब्ध करून देते ते यंत्र. पण या निकषाची गंमत अशी होते की हा काटेकोरपणे लावायला लागले की माणसांनी वापरलेले कुठलेही आणि कसलेही हत्यार किंवा श्रमसाधन हे यंत्र ठरते. आदिम काळात माणसाने हातात घेतलेल्या दगडांपासून ते आजच्या अणुभट्ट्यांपर्यंत सर्व श्रमसाधने यंत्रात मोडतात. कारण आदिमानवाने दगडाच्या मागील बाजूस हाताने लावलेली शक्ती दगड दुसऱ्या ठिकाणी उपलब्ध करून देत असतो. ज्या ठिकाणी घाव घातला आहे किंवा दगड फेकून मारला आहे त्या ठिकाणी! या निकषाप्रमाणे भांडवलशाही यंत्रांबरोबर वयात आली वगैरे विधानांना अर्थच नसतो.

यंत्राचे निरनिराळे घटक

खरे म्हणजे अतिपरिचयामुळेच यंत्र म्हणजे काय या प्रश्नाबद्दल मार्क्सप्रमाणे पुरेसा मूलगामी विचार होत नाही. वरील दोन्ही निकष पूर्णपणे टाकाऊ नाहीत, ती अर्धसत्ये आहेत. त्या त्या संदर्भात त्यांना, विशेषतः दुसऱ्या निकषाला, महत्त्व आहे. पण आपण पाहत आहोत ते औद्योगिक क्रांती मधून यंत्र म्हणून जे काही पुढे आले त्याचे मर्म, त्याचे व्यवच्छेदक लक्षण. आणि हा मर्मभेद करण्याचे सामर्थ्य या दोन्ही निकषांमध्ये नाही.

कुठलेही यंत्र हे तीन घटकांचे बनलेले असते. एक घटक हा एखाद्या ऊर्जेच्या साठ्यामधून शक्ती निर्माण करतो किंवा ती शोषून घेतो किंवा तिचे रूपांतर करतो. ऊर्जेचा हा साठा कोणता आहे याच्याशी या घटकाच्या कामाचा काही

एक संबंध नसतो. कोळसा, गॅस, वीज, वाहते पाणी, बैल, घोडे किंवा माणूसदेखील या यंत्राच्या घटकाला शक्ती पुरवणाऱ्या ऊर्जेच्या साठ्याच्या स्थानी असू शकतो. यंत्राचा दुसरा घटक म्हणजे या शक्तीचे रूपांतर आणि/किंवा स्थानांतर करणारी यंत्रणा. ऊर्जेच्या साठ्यापासून घेतलेली शक्ती ही इतर ठिकाणी पाहिजे त्या प्रमाणात व स्वरूपात ही यंत्रणा उपलब्ध करून देते. यंत्रांबद्दलचे आपण पाहिलेले दोन्ही निकष अनुक्रमे यंत्राच्या या पहिल्या व दुसऱ्या घटकाला यंत्रांचे मर्मस्थान मानतात. पण यंत्राचे खरे मर्म असते ते त्याच्या तिसऱ्या घटकात.

यंत्राचे यंत्रपणत्याची अवजारांची जुळणी

शक्ती निर्माण झाली व दुसरीकडे उपलब्ध झाली खरी, पण तिचे करायचे काय? समोरच्या विवक्षित वस्तूला विवक्षित आकार देणारा, तिच्यावर प्रक्रिया करणारा, यंत्राचा तिसरा घटक असतो. थोडक्यात यंत्राच्या या भागाला यंत्राचे अवजार किंवा हत्यार म्हणता येईल. यंत्र हे देखील श्रमप्रक्रियेतील माणसांनी वापरायचे अवजार किंवा श्रमसाधन असते. पण ते तितकेच नसते. तर निरनिराळी अवजारे वापरून माणसे ज्या श्रमांच्या तुकड्यांची मालिका पार पाडतात ती मालिका पार पाडणारी अवजारांची एक रचना किंवा जुळणी असते. यंत्र म्हणजे अवजारांचा गुणाकार असणारे अवजार असते. शिवणयंत्राचेच उदाहरण घ्या. सुईच्या नेढ्यात दोरा ओवल्यानंतर तो कापडात खुपसून कापडाच्या वर काढायचा, त्यात दोरा गुंतवायचा, पुढच्या भागात खुपसायचा ही श्रमप्रक्रियांची मालिका पार पाडणाऱ्या अवजारांच्या यंत्रणेत शिवणयंत्राचे यंत्रपण आहे; शिवणयंत्र माणूस चालवतो की ते विजेवर चालते याच्यात ते नाही, किंवा माणसाची किंवा विजेची शक्ती ते सुईच्या ठिकाणी उपलब्ध करून देते एवढ्याच गोष्टीत नाही.

यंत्राचे हे मर्म ओळखले, यंत्र म्हणजे एक अवजारांची रचना आहे हे ओळखले की औद्योगिक क्रांतीची संगती लागू शकते. माणसाखेरीज इतर शक्ती वापरण्याचेच उदाहरण घ्या. अगदी इसवीसनापूर्वीपासून वाफेच्या शक्तीची ओळख माणसाला झालेली होती. ग्रीसमध्ये हिरो याने तर वाफेवर चालणारे एक चक्राकार खेळणेदेखील तयार केलेले होते. आर्किमिडीजने शक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या तत्त्वाचा वैज्ञानिक अभ्यास केलेला होता. त्या आधारावर प्रचंड दगड फेकून शत्रुपक्षाच्या बोटी बुडवणारी एक अजस्र गलोलदेखील त्याने तयार केलेली होती. बैलांनी

ओढलेले नांगर, मोट, गाड्या या गोष्टी तर पूर्वीपासून प्रचालित होत्या. वाहत्या पाण्यावर किंवा वाऱ्याच्या शक्तीवर चालणाऱ्या चक्क्याही नवीन नाहीत. तरीही औद्योगिक क्रांती व्हायची होती. कारण यंत्राचे मर्म असलेली श्रमप्रक्रियांची मालिका पार पाडू शकणारी अवजारांची रचना तयार झालेली नव्हती. आणि ती तयारी केली ती भांडवली हातकारखानदारीने. ज्या वेळपर्यंत हातकारखानदारी आपले अंतर्विरोध स्पष्ट करून आपल्या मर्यादा गाठत होती तोपर्यंत तिने स्वत:चे उच्चाटन करणाऱ्या यंत्राधिष्ठित भांडवली उत्पादन व्यवस्थेचा पायाच रचलेला होता. यंत्रांची पूर्वपीठिका रचलेली होती.

२. यंत्राचा जन्म

यंत्रांचा ऐतिहासिक पाया:हातकारखानदारी

हातकारखान्यातल्या श्रमविभागणीने श्रमप्रक्रियेचे तुकडे केले. या तुकड्यांतील बहुसंख्य तुकड्यांचे वैशिष्ट्य हे होते की त्यातल्या हालचाली पूर्णपणे यांत्रिक होत्या. कामगार हे कामाचे तुकडे पार पाडीत होते खरे. पण माणूस म्हणून त्यांच्या कसबाची फारशी गरज यात कुठे होती? ठराविक हालचाली ठराविक पद्धतीने करत रहायचे इतकेच आवश्यक होते. प्रत्येक श्रमप्रक्रियेचे विश्लेषण करून तिच्याकडे अशा ठराविक हालचालींच्या तुकड्यांची एक जोडणी म्हणून पाहणे शक्य होऊ लागले. त्याअगोदर प्रत्येक कारागिराचे ज्ञान हे कसबाचे, व्यक्तिनिष्ठ असे एक काम होते. या कामाचे ज्ञान काही निवडक अशा त्या पेशातल्या लोकांनाच होते व त्याचे गूढ, कठीण स्वरूप भांडवलीपूर्व कामगारांच्या श्रेणी, गिल्ड किंवा बिरादरी यांसारख्या गोष्टी जपत होत्या. त्याऐवजी व्यक्तिनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ पायावर घडणाऱ्या ठराविक हालचालींच्या तुकड्यांची रचना या रूपात अनेक श्रमप्रक्रियांची वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिरपेक्ष पद्धतीने पुनर्रचना करणे माणसांच्या विचारांच्या व कृतीच्या दोन्हींच्या आवाक्यात येऊ लागले.

श्रमविभागणीमुळे तयार झालेल्या या सोप्यासोप्या श्रमतुकड्यांचा श्रमसाधनांवर, अवजारांवरही फार दूरगामी परिणाम होत होता. त्या त्या विशिष्ट श्रमतुकड्याला अनुरूप अशा अवजारांचाही विकास होत गेला. कापणे हा छोटा श्रमतुकडाच घ्या. कोणती, किती व कोणत्या आकाराची गोष्ट कशासाठी कापायची, त्यानुसार सर्वांत कार्यक्षम ठरणारा पात्याचा प्रकार व आकार तयार होतो. गवत कापायचा कोयता, लाकूड कापायची करवत, भाजी कापायला सरळ चाकू,

काकडी चोचवायला विळीचे उलटे पाते, दाढीसाठी व केसांसाठी वस्तरा अशी कापण्याची अनेक अवजारे त्या त्या श्रमतुकड्यांच्या गरजेनुसार तयार होतात. एकट्या शल्यविशारदालाच शल्यक्रियेसाठी कितीतरी वेगवेगळी कापण्याची अवजारे लागतात. पण अशी विविध अवजारे तयार व्हायची तर त्यांची मागणी निर्माण करणारी त्या श्रमतुकड्यांची सतत पुनरावृत्ती गरजेची असते. नेमके हेच हातकारखान्यांनी घडवून आणले, आणि ही विशेष अवजारे तयार करणारा, ती बनवण्यातले कौशल्य संपादन करणारा एक उत्पादनाचा मोठा भागही हातकारखानदारीने जन्माला घातला.

यंत्राबद्दलच्या अपसमजांचा भांडवली आधार

थोडक्यात, एका बाजूला हातकारखानदारी श्रमप्रक्रियेचे यांत्रिक श्रमतुकड्यांमध्ये विघटन व विश्लेषण करत होती तर दुसऱ्या बाजूला हे तुकडे पार पाडणारी त्या अवजारांची रचना तयार करत होती. इथून हे तुकडे सुसूत्रपणे पार पाडणारी त्या अवजारांची रचना तयार करणे हा काही फार लांबचा पल्ला उरत नाही. एकदा श्रमप्रक्रिया पार पाडणारी अवजारांची रचना शक्य झाली—यंत्रांच्या मर्माचा भेद झाला—म्हणजे नंतर यंत्रांच्या इतर गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. शक्ती कोणती वापरायची व ती अवजारांच्या रचनेपाशी पाहिजे त्या पद्धतीने कशी पोचवायची हे महत्त्वाचे प्रश्न बनतात. ही पुढची वाटचालच सर्वसाधारणपणे औद्योगिक क्रांती समजली जाते व त्यामुळे औद्योगिक क्रांतीचे व यंत्रांचे मर्म त्यातून लुप्त व्हावे ही गोष्ट काही तशी नवलाची नाही.

औद्योगिक क्रांतीची पुढची वाटचाल हीच भांडवलदारवर्गाला महत्त्वाची वाटावी हा काही अपघात नाही. तो सरळ त्यांच्या सापेक्ष वरकड-मूल्याच्या हितसंबंधांमधून उगवणारा विचार असतो. हातकारखानदारीमध्ये सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याच्या त्याच्या ऊर्मींमध्ये अडथळा निर्माण झालेला असतो तो श्रमशक्ती या क्रयवस्तूच्या दोन प्रकारच्या मर्यादेचा. हातकसबाला शेवटी माणसांच्या शारीरिक कुवतीची मर्यादा असते. त्यामुळे हातकसबाच्या श्रमविभागणीतून उत्पादकतावाढीला व त्यामुळे सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याला 'सीलिंग' बसलेले असते. दुसऱ्या बाजूला श्रमशक्तीचा विशेषत: कुशल श्रमशक्तीचा 'आडमुठेपणा, बेशिस्त आणि बंडखोरी' त्याला आडवी आलेली असते! यंत्र या दोन्ही मर्यादा नाहीशा करते. एक म्हणजे यंत्रांचा तिसरा घटक, (अवजारांची रचना) तयार झाल्यावर शारीरिक कुवतीने मर्यादित

श्रमशक्तीच्या जागी त्याला ऊर्जेच्या इतर साठ्यांपासून शक्ती वापरणे शक्य होते. शक्ती पुरवणारा शारीरिक ऊर्जेचा साठा या नात्याने श्रमशक्तीची मर्यादा ओलांडणे शक्य होते. आणि दुसरे म्हणजे संघटनेच्या परंपरेतून अंगभूत कसबाच्या आधारावर उत्पादनामध्ये निर्णायक स्थान कमावलेल्या 'आडमुठ्या' कुशल श्रमशक्तीवर अवलंबून रहायची गरज उरत नाही. म्हणजे भांडवलदारांच्या दृष्टीने यंत्राचा तिसरा घटक स्वत:हून महत्त्वाचा नसतो. त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते ते हे की माणसांऐवजी, त्यांच्या अंगभूत कसबाऐवजी इतर शक्तीचा वापर करून तो सापेक्ष वरकड-मूल्य वाढते ठेवू शकतो. त्याच्या लेखी यंत्रांचे मर्म श्रमशक्तीची जागा इतर शक्तींनी घेणे ह्यातच असते!

सापेक्ष वरकड-मूल्याची झेप

प्राथमिक सहकार्य, हातकसबाची श्रमविभागणी, आणि यंत्रावर आधारलेली श्रमप्रक्रिया या टप्प्यांमधून जाता जाता भांडवलदारांना मिळणाऱ्या सापेक्ष वरकड-मूल्याने प्रचंड झेप घेतली. मार्क्सने घेतलेले सुयांच्या उत्पादनाचे उदाहरण हे स्पष्ट करते. जेव्हा सुया बनवणारे कारागीर प्राथमिक सहकार्यावर आधारलेल्या कारखान्यात काम करत तेव्हा १० कामगार मिळून जेमतेम ५ हजार सुया बनवत. ॲडॅम स्मिथच्या काळात हातकारखान्यांमध्ये १० कामगार मिळून सुमारे ५० हजार सुया बनवू शकत. तर यंत्रे आल्यावर मार्क्सच्या काळात १० कामगार दिवसाला १५ लाख सुया बनवू शकत! मूल्याचा विचार करायचा तर हजार सुयांमागे प्राथमिक सहकार्याच्या काळात २ अख्खे श्रम दिवस इतके कामगारांचे श्रम सामावलेले असत, हातकारखान्यांमध्ये दर हजार सुयांमागे केवळ ०.२ श्रमदिवस, तर यंत्राधिष्ठित प्रक्रियेमध्ये दर हजार सुयांमागे अवघा एक सहस्रांश (०.००१) श्रमदिवसदेखील सामावलेला नसे.

३. यंत्रे व विज्ञान भांडवलदाराची शस्त्रे बनतात

'आम्ही' च्या वाढलेल्या कक्षा

सापेक्ष वरकड-मूल्याची ही चढती कमान उभी असते ती सहकार्याच्या चढत्या व जास्त भक्कम होत जाणाऱ्या पायावर. प्राथमिक सहकार्य आणि हातकसबाच्या श्रमविभागणीपर्यंत श्रमप्रक्रियेतील 'मी' ची जागा 'आम्ही'ने कशी घेतली होती ते आपण पाहिलेच होते. या 'आम्ही'च्या कक्षा आता

विस्तारित होतात. कारण यंत्रांमध्ये जाणारे ज्ञान व श्रम हे गुणात्मकरीत्या बदललेले असतात.

यंत्रपूर्व कारागिरांचे ज्ञान हे पारंपरिक माध्यमातून निर्माण झालेले व वारशाने पुढल्या कारागिराला मिळालेले असे. ते त्यांच्या पेशापुरते विशिष्ट असे व त्या पेश्याचा भाग नसणाऱ्यांना ते मेहनत घेऊनसुद्धा सहजपणे उपलब्ध होणे कठीण असे. व्यवसायाच्या व पेशाच्या बाहेर ते ज्ञान जाऊ न देणे हा कारागिरांच्या संघटनेचा एक महत्त्वाचा भाग असे. थोडक्यात म्हणजे हे ज्ञान व्यवसायनिष्ठ असे. याउलट यंत्रांच्या निर्मितीत जाणारे ज्ञान हळूहळू यंत्रांच्या विविध विकासाबरोबर जास्त घट्टपणे व्यवसायनिरपेक्ष अशा निसर्गविज्ञानांच्या आधारावर उभे राहू लागले होते. व्यक्तिनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ अशा ज्ञानाचा पाया यंत्रांना आवश्यक ठरत गेला. तंत्राला विज्ञानाचा स्पष्ट व व्यवसायनिरपेक्ष आधार मिळाल्यावर तंत्रविज्ञान जन्माला येत गेले.[१] थोडक्यात, पूर्वी उत्पादनामध्ये कारागिरांच्या ज्ञानाचा उपयोग व्हायचा तेव्हा प्रत्यक्षपणे व्यवसायनिष्ठ सहकार्य घडत होते, पण आता मात्र तंत्रविज्ञानाचा वापर म्हणजे व्यवसायनिरपेक्ष सर्वसाधारण मानवी सहकार्याचा भाग बनतो. विज्ञान हा सामाजिक उत्पादनाचा आधार बनते याचा अर्थ श्रमसाधनांचा वाढता सामूहिक वापर, वाढते मानवी सहकार्य हाच असतो.

. . . आणि त्यांचे उलटे रूप!

पण हे वाढते सहकार्य भांडवलशाहीमध्ये अपरिहार्यपणे उफराटे रूप घेते. या ज्ञानाच्या सर्वसाधारण स्वरूपामुळे ते भांडवलदारांना उपलब्ध होते आणि भांडवलदारांचे हेतू आणि उद्देश मान्य करणाऱ्या भांडवली तंत्रज्ञानादेखील उपलब्ध होते. यंत्रे येण्यापूर्वी कारागिरी परंपरेवर व कमावलेल्या कसबावर आधारित असलेले तांत्रिक ज्ञान हे असे उपलब्ध होऊ शकत नसे. अर्थात आता कामगारांनाही हे ज्ञान ‘उपलब्ध’ असतेच. पण उपलब्ध असणे आणि ताब्यात येणे यांमध्ये शेवटी प्रचंड अंतर असते. उत्पादनावर, उत्पादनाच्या हेतूंवर आणि उद्दिष्टांवर अधिकार असतो तो भांडवलदारांचा. विज्ञान उपलब्ध असले तरी उत्पादनाचे हत्यार म्हणून, त्यांचे तंत्रविज्ञानात रूपांतर करण्याचा अधिकार भांडवलदारांचा बनतो. कामगारांच्या वाट्याला येते ते नेहमीप्रमाणे श्रमांच्या तुकड्याशी जोडलेले तितपत जुजबी ज्ञान. सर्वसाधारण मानवी सहकार्यामधून निर्माण झालेले विज्ञान हे श्रमसाधन कामगारांऐवजी भांडवलदारांच्याच हातात येते. सहकार्याचा आशय पूर्णपणे व्यक्तिनिरपेक्ष

बनलेला असतो, खऱ्याखुऱ्या अर्थाने तो सामाजिक असतो, पण तो कोंबला जातो भांडवलदारवर्गाच्या खाजगी हत्याराच्या मुशीत. हातकसबाच्या काळात कुशल कामगारांच्या कसबामुळे का होईना तंत्रज्ञानाच्या हत्यारावर कामगारांचा जो काही ताबा असतो तो त्यांच्याकडून काढून घेतला जातो. कामगारवर्गाजवळ हातकसबाच्या काळात इतर श्रमसाधने नसली तरी कसबावर आधालेले तंत्रज्ञान हे श्रमसाधन त्याच्या ताब्यात होते. तेही त्याच्याकडून काढून यंत्र कामगारांना पूर्णपणे सर्वहारा वर्ग बनवते. सर्व माणसांना उपलब्ध होण्याचा विज्ञानाचा गुण, भांडवलशाहीमध्ये कामगारांकडून हे शेवटचे श्रमसाधन हिरावून घेण्याचे भांडवलदारांचे हत्यार ठरतो! हे भांडवलदारवर्गाला किती समाधान देणारे होते याची प्रचीती आपल्याला मार्क्सने उदधृत केलेल्या रेव्हरंड मूर या भांडवली समर्थकाच्या नागड्या शब्दांत सापडते. 'कालांतराने भांडवलदारांनी या असह्य गुलामीतून (म्हणजे कामगारांना डोके असणे, त्यांचा तंत्रावर ताबा असणे, त्यांची अरेरावी, कामचुकारपणा इत्यादी) मुक्त होण्यासाठी विज्ञानाच्या वापराची वाट शोधली, आणि डोक्याचे शरीराच्या कमअस्सल भागांवरील कायदेशीर राज्य वेगाने पुन्हा प्रस्थापित केले'(!)

क्रयवस्तूंच्या मूळ संबंधामध्येच एक अंतर्विरोध आपण पाहिला होता. मूलत: सामाजिक असलेले उत्पादन व त्याने घेतलेले खाजगी रूप. भांडवलशाहीचा विकास या मूलभूत अंतर्विरोधाचाच विकास करत जातो. नवनव्या शक्यता आणि त्यांची नेमकी उलटी, उफराटी रूपे हा नियम विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर आणखीनच तीव्र होत जातो. आणि मार्क्स प्रत्येक टप्प्यावर या अंतर्विरोधाचा प्रत्येक पैलू तपासत जातो.

४. यंत्र : श्रमांची बचत करणारे साधन?

श्रम वाचवणारे की वाढवणारे साधन? यंत्र हे एक श्रम वाचवणारे साधन आहे. ज्या श्रमतुकड्यांचे स्वरूप केवळ यांत्रिक पुनरावृत्तीचे आहे, ज्याच्यामध्ये कुठल्याही मानवी क्षमतांचा विशेष आविष्कार होत नाही, जे करतांना माणसांनाच यंत्र बनणे भाग पडते अशी सर्व कामे यंत्रे ताब्यात घेऊ शकतात व माणसांना जास्त मानवी, सर्जक कामांसाठी मोकळी ठेवू शकतात. पण ही झाली शक्यता—प्रत्यक्षात काय होते?

त्याच्या भांडवली स्वरूपात यंत्र येते ते कामगारांच्या श्रमांची तीव्रता वाढवण्याचे एक साधन म्हणून. हातकसबाचा अगदी साध्यात साधा

श्रमतुकडादेखील अनेक दुव्यांनी बनलेला असतो. पत्रा कापण्याचेच उदाहरण घ्या. कापलेला पत्रा बाजूला ठेवणे, दुसरा पत्रा उचलणे, कात्री पत्र्यावर विवक्षित जागी आणून पत्रा कात्रीत पकडणे, कापणे, वाया गेलेला पत्रा वेगळीकडे ठेवणे या मालिकेची पुनरावृत्ती त्यात असते. या मालिकेतल्या प्रत्येक दुव्याच्या मध्ये एक छोटेसेच पण महत्त्वाच विश्रांतिस्थान असते, खंड असतो. तसेच एक दुवा पार पाडून दुसरा दुवा पार पाडताना छोटासा कामातला बदल असतो. हे बदल व ही विश्रांतिस्थाने कामगार आपल्या गरजेप्रमाणे बदलू शकतो. थकवा आला, कंटाळा आला तर विश्रांतिस्थाने तो लांबवू शकतो. पाठीत उसण भरली असेल व वाकून पत्रे उचलणे व ठेवणे जड जात असेल तर हा दुवा तो हळू पार पाडू शकतो. ते भरून काढण्यासाठी इतर कामेही वेगाने करू शकतो. स्वत:च्या गरजेप्रमाणे श्रमप्रक्रिया वाकवू शकण्याचा हा थोडका आणि साधा लवचिकपणा कामगाराला महत्त्वाचा असतो.

यंत्र येते तेव्हा त्याचा हा लवचिकपणा नाहीसा होतो. कारण यंत्र त्या दृष्टीने कधी योजलेलेच नसते. यंत्र आपल्या गतीने फिरत असते. त्याला कंटाळा नसतो, थकवा नसतो, विश्रांतिस्थानाची गरज नसते किंवा पाठीत उसण भरण्याचाही प्रश्न नसतो. कामगारांची विश्रांतिस्थाने किमान पातळी गाठतात. याचे विदारक चित्रण 'मॉडर्न टाइम्स' या चित्रपटात चार्ली चॅप्लिनने केले आहे. चार्ली एका मोठ्या कारखान्यातल्या फिरत्या पट्ट्यावर काम करीत असतो, वेळ वाचण्यासाठी, कामगारांना जेवण भरवण्यासाठी यंत्र आणले जाणार असते आणि त्यासाठी पहिला प्रयोग चार्लीवर होतो. आणि जेवणातली विश्रांतिस्थाने नाहीशी करून स्वत:च्या गतीने चालणारे ते यंत्र आणि चार्ली यांच्यात अटीतटीचा झगडा सुरू होतो!

विश्रांतिस्थाने नाहीशी करण्याचे महत्त्व असते कारण सबंध दिवसाच्या कामातील निखळ श्रमप्रक्रियेत जाणारा वेळ वाढतो. त्याबरोबरच त्याला अव्याहतपणे यंत्रांची भूक भागवत पत्रा सरकवीत रहावे लागते. कंटाळा आला असो, थकवा आला असो. किंवा पाठीत उसण भरलेली असो. पूर्वीपेक्षा त्याला सतत एकाग्र रहावे लागते, सजग रहावे लागते. कामाचा शारीरिक आणि मानसिक ताणदेखील वाढतो. श्रम वाचवण्याची शक्यता घेऊन आलेले हे श्रमसाधान त्याच्या भांडवली रूपात मात्र श्रम वाढवण्याचे व जास्त तीव्र, खडतर करण्याचे एक साधन बनते!

पण हा हिमनगाचा केवळ दिसणारा भाग झाला. यंत्रांमुळे दर उत्पादित वस्तूमागे साठलेले श्रमसामग्रीचे मूल्य कमी होते, पण भांडवलदाराला त्यासाठी एकूण श्रमसामग्रीमध्ये खूपच जास्त भांडवल गुंतवावे लागलेले असते. यंत्रांपूर्वी रात्रपाळ्या फार महत्त्वाच्या नसतात. समजा रात्रपाळीच्या अभावी श्रमसामग्री पडून राहिली तर भांडवलाच्या थोड्याच भागावरचे व्याज डोक्यावर बसत असे. पण आता कायम भांडवलच भांडवलाचा महत्त्वाचा भाग बनते. रात्रभर ते पाडून ठेवायचे म्हणजे बहुसंख्य भांडवल कुजत ठेवून त्यावर व्याज भरायचे. आणि शिवाय यंत्रे येतात ती एक प्रवाह म्हणून, नवनवी यंत्रे पोटात घेऊन. दुसरे यांच्यापेक्षाही चांगले व श्रमांची उत्पादकता वाढवणारे यंत्र शेजाऱ्याने घेण्याची टांगती तलवार भांडवलदाराच्या डोक्यावर सतत असते. त्यामुळे यंत्रे अहोरात्र घरघरू लागतात. रात्रपाळ्या नुसत्या जन्माला येत नाहीत तर त्या नित्याची बाब बनतात. तेवढेच जास्त सापेक्ष वरकड-मूल्य. चोरपावलाने कामवाढ करण्याचे एक साधन म्हणूनदेखील यंत्र काम करते. जात्याच 'आडमुठे', बंडखोर असलेले कामगार कामवाढीच्या सरळ सरळ प्रस्तावाला विरोध करू शकतात. पण यंत्रामुळे अनेकदा कामवाढ झाल्याचाही त्यांना पत्ता लागू दिला जात नाही.

इथेदेखील नेमका माणसांच्या श्रमशक्तीच्या लवचिकपणाचा फायदा भांडवलदार उठवतो. बाटल्यांना बुचे लावणाऱ्या मशीनचेच उदाहरण घ्या. मशीन इतक्या वेगाने फिरत असते की मशीनचा वेग एखाद्या टक्क्याने वाढला तर ते कामगाराच्या लक्षातदेखील येत नाही. एकदोन दिवसांत हा वाढलेला वेग कामगारांच्या लवचिक श्रमशक्तीला सवयीचा बनून जातो. की पुन्हा एखाद्या टक्क्याने वाढ! शेवटी जेव्हा हा वेग नजरेत भरू लागतो किंवा काम करणे खूपच जड जायला लागते तेव्हा ते लक्षात येते. आणि तेव्हा मॅनेजमेंटचे उत्तरही तयार असते! इतके दिवस याच वेगाने काम करत होतात आणि आता एकदम ओरडा कां?!

थोडक्यात हातकारखान्यांच्या काळात अवजारे कामगाराच्या हातात असतात. त्याच्या कुवतींप्रमाणे ती बेतलेली असतात. पत्रा कापण्याची कात्री त्याच्या हातात असते आणि तिचा कोन, तिचा वेग, तिचे वजन त्याच्या कुवतींप्रमाणे बेतलेले असते. भांडवलशाहीमध्ये यंत्र आल्यावर हा संबंध उलटा होतो. अवजार कामगारांच्या ताब्यात नसते, तो अवजाराच्या ताब्यात असतो![२] यंत्राला खाद्य पुरवणे, त्याच्या भुकेशी जुळवून घेणे हे त्याचे काम ठरते.

त्याच्या ताब्यातून निसटलेले यंत्र भांडवलाच्या रूपाने त्याच्यासमोर येते व ते त्याला 'शिस्त' लावत असते. कामगाराचे श्रम वाचवण्याची, ते सुसूत्र करण्याची क्षमता असलेले यंत्र भांडवलशाहीत त्यालाच ताब्यात घेत असते.

सामाजिक पातळीवर तरी . . . ? एक बेरकी प्रश्न

ठीक आहे, वैयक्तिक कामगाराच्या दृष्टीने भांडवलशाहीत यंत्रे श्रम वाचवत नसतील पण सामाजिक पातळीवर तरी भांडवलशाहीमधले हे यंत्राचे कार्य मान्य करायला पाहिजे की नाही? उत्पादनाच्या एखाद्या क्षेत्रात श्रम वाचवून श्रमांची उत्पादकता वाढली की यंत्रे आणून भांडवलशाही सामाजिक श्रमांची बचत करतेच की नाही? आता हा मोठा गमतीचा प्रश्न आहे. समजा कुणीतरी तुम्हाला विचारले, की तुम्ही तुमच्या शेजाऱ्याशी भांडायचे आता थांबलात का? तुम्ही शेजाऱ्याशी भांडलेलेच नसाल तर प्रश्नाला सरळ होय किंवा नाही उत्तर देऊ शकत नाही. त्याच जातीचा हा प्रश्न आहे. या प्रश्नाला सरळसरळ होय म्हणणे म्हणजे भांडवली समर्थनाच्या एका सापळ्यात अडकण्याचा एक मार्ग आहे.

त्याचे उत्तर जरा खोलात जाऊन शोधाने लागेल. समजा की भांडवलदाराच्या कारखान्यात १२ श्रमतास इतक्या श्रमसामग्रीच्या साहाय्याने ८ तासात कामगार एक वस्तू तयार करत आहे. या वस्तूचे मूल्य त्यामुळे २० श्रमतास ठरते. आता एक नवीन यंत्र येते. हे यंत्र वापरले तर कामगार ८ तासात ३० श्रमतास सामग्रीच्या साहाय्याने दोन वस्तू तयार करू शकतात. दर वस्तूमागचे कामगारांचे श्रम ८ श्रमतासांवरून ४ श्रमतासांवर आले, म्हणजे उत्पादनाची पातळी कायम ठेवून कामगारांचे ४ तास श्रम वाचू शकतात. शिवाय प्रत्येक वस्तूचे मूल्य आता १५+४=१९ श्रमतास झाले. म्हणजे दर वस्तूमागे समाजाच्या दृष्टीने एकंदर एक श्रमतास वाचला. श्रमसामग्रीमार्फत १२ ऐवजी १५ श्रमतास वस्तूमध्ये साठूनदेखील वस्तूमागे एकंदर एक श्रमतास वाचला. आता प्रश्न असा उभा राहतो की हे तंत्र भांडवलदार रूढ करतील काय?

श्रमशक्तीचे मूल्य जर आपण ४ श्रमतास आहे असे धरले तर भांडवलदारवर्ग हे श्रम वाचवणारे तंत्र असूनही रूढ करणार नाहीत. कारण सामाजिक पातळीवर यंत्रांना श्रम वाचवण्याचे स्थान आले की नाही याच्याशी भांडवलदारांचे काहीही देणेघेणे नसते. भांडवलदारांना पैशाच्या रूपात खर्च करावे लागणारे मूल्य वाचते की नाही हा प्रश्न असतो. आपण जरा त्यांच्या पद्धतीने हा हिशेब करून पाहू या. कुठलेही नवीन तंत्र आपल्या कारखान्यात आणताना भांडवलदार विचार करतात तो जादा वरकड्-मूल्याचा. हा विचारच त्या सर्वांना सापेक्ष वरकड-मूल्याकडे

घेऊन जात असतो. त्या दृष्टीने विचार करायचा तर बाजारात वस्तूचे मूल्य ठरलेले आहे २० श्रमतास. त्यासाठी त्याला वस्तूची पडणारी किंमत आहे श्रमसामग्रीचे १२ श्रमतास व श्रमशक्तीचे ४ श्रमतास धरून १६ श्रमतास मूल्य. ते वजा जाता त्याला उरते ४ श्रमतास वरकड-मूल्य. यंत्र आले तर काय होईल? दोन वस्तूंसाठी त्याला श्रमसामग्रीचे ३० श्रमतास व श्रमशक्तीचे ४ श्रमतास मिळून ३४ श्रमतास मूल्य होईल किंवा दर वस्तूमागे १७ श्रमतास मूल्य खर्च करावे लागेल. बाजारपेठेतल्या २० श्रमतासांच्या मूल्यातून हे वजा जात त्याला उरतील ३ श्रमतास इतके वरकड-मूल. वस्तूमागचे त्याचे वरकड-मूल्य ४ श्रमतासांवरून ३ श्रमतासांवर आणणारे तंत्र तो कशाला अंमलात आणील?

सापेक्ष वरकड-मूल्य आणि श्रमांची बचत

थोडक्यात कामगारांचे श्रम व त्याबरोबरच एकंदर सामाजिक श्रमकाळ वाचवण्याची क्षमता असूनसुद्धा भांडवलदार नवे तंत्र प्रत्यक्षात आणतीलच असे नसते. यापुढे जाऊन तंत्र रूढ व्हायचे तर त्या तंत्राला आणखी एक अट पूर्ण करावी लागेल, कारण भांडवलादरांना कामगारांचे श्रम हे श्रमशक्तीच्या मूल्याइतक्या किंमतीला मिळालेले असतात. श्रम वाचवणाऱ्या तंत्रामधील ज्या तंत्रांमुळे भांडवलदारांना जादा वरकड-मूल्याचे आमिष दिसू शकेल अशीच फक्त तंत्रे ते अंमलात आणतील. म्हणजे प्रथम माणसांचे ताबडतोबीचे व एकंदर श्रम कमी करण्याच्या अनेक शक्यता भांडवलशाही वाया घालवते. जेव्हा तंत्र त्यापुढे जाऊन इतके प्रगत होते की त्याला जादा वरकड-मूल्य मिळू शकेल, तेव्हाच ते तंत्र वापरण्यात येते.

थोडक्यात श्रम वाचवण्याचे स्थान जिथे यंत्रांना सामाजिक पातळीवर प्राप्त होते ती उत्पादकता, आणि भांडवलदारांना ती किफायतशीर ठरते ती उत्पादकता यात तफावत असते. ही तफावत अवलंबून असते ती श्रमशक्तीचे मूल्य व कामाचे तास यांच्यामधील तफावतीवर, किंवा पिळवणुकीच्या दरावर. पिळवणुकीचा दर जितका जास्त, भांडवलशाहीचा विकास जितका जास्त, तिची मूळ उत्पादकता जितकी जास्त, तितकी ही तफावत जास्त असते. श्रम वाचवण्याच्या तितक्या जास्त क्षमता भांडवलशाही वाया घालवत असते. म्हणूनच मघाच्या प्रश्नाला साधे 'हो' असे उत्तर देता येत नाही. म्हणावे लागते की हो, पण खूप उशीरा, सामाजिक पातळीवर यंत्रांना श्रम वाचवण्याचे स्थान आल्यानंतर कितीतरी उशीरा.

कामाचे तास कमी करायची तयारी नाही

यंत्र हे भांडवलशाहीत मुळात श्रम वाचवण्याचे साधन नसते याचे वरील सर्व सैद्धांतिक पसाऱ्यात न शिरताही ढळढळीत पुरावे उपलब्ध आहेत. यंत्रे येऊन उत्पादकतावाढ झाली आणि उत्पादन वाढ झाली नाही तरीदेखील कामाचे तास कमी करून रोजगार कायम ठेवला जाऊ शकतो. पण भांडवली संबंधांमुळे ते शक्य होत नाही. उदाहरणार्थ, उत्पादकता वाढीमुळे कामगार ८ तासांचे उत्पादन सर्वत्र ४ तासांत करू लागतात असे धरू या. आता दिवसातले कामाचे तास कमी करून ४ तासांवर आणले तर रोजगारात तूट यायचे कारण नाही. कामगारांच्या हातात समाजव्यवस्थेचे निर्णय असते तर ते ही गोष्ट सहज करू शकते, पण भांडवलशाहीत यंत्र येते तेव्हा वेगळे चित्र दिसते. वरील उदाहरणात असे समजा की या बदलामुळे श्रमशक्तीचे मूल्यदेखील पूर्वीच्या ४ श्रमतासांवरून २ श्रमतासांवर आले. कामगारांसाठी कामाचे तास ६ तासांवर आणूनदेखील भांडवलदारांना पूर्वीइतकेच वरकड-मूल्य दरडोई मिळू शकेल. पण तितकेही त्यांना पुरेसे नसते. कारण त्यांनी यंत्रे आणलेली असतात ती वरकड-मूल्यात वाढ व्हावी म्हणून! त्यांना कामाचे तास पूर्वीसारखेच राहून जे २ तासांचे जास्तीचे सापेक्ष वरकड-मूल्य मिळते त्यात रस असतो. त्यामुळे कामाचे तास तसेच राहतात. भांडवलाशाहीमध्ये यंत्रांना श्रम वाचवणारे असे स्थान नसते, ते असते सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याचे एक साधन म्हणून.

दुसरा ढळढळीत पुरावा म्हणजे यंत्रे आणि संपलढे यांची सांगड. यंत्र हा भांडवलदारांना कामगारांच्या वाढत्या बंडखोरीवर सापडलेला जालीम उपाय आहे याचा इतिहासामध्ये अनेक ठिकाणी दाखला सापडतो. मार्क्सच्या यंत्रांवरील प्रकरणातला एक भाग यालाच वाहिलेला आहे. आणि हे पाहण्यासाठी तशी फार पूर्वीच्या इतिहासात जायचीदेखील गरज नाही. इतिहास शेवटी आपल्या नजरेसमोरच घडत असतो. मुंबईतील कापडगिरणीकामगारांचा १९८२ मधला ऐतिहासिक संप हे याचे स्पष्ट उदाहरण आहे. कामगार निमूटपणे कामावर होते तोपर्यंत गिरणीमालकांना यंत्रयुगाच्या आदिमकाळातली गिरणीतील यंत्रे बदलणे सुचले नाही. संपकाळाचा फायदा घेऊन अनेक गिरण्यांतल्या अनेक भागांमध्ये नवी यंत्रे आली आहेत. संपपूर्व आणि संपानंतरच्या श्रमांच्या तीव्रतेत मोठा फरक पडलेला आहे. याबद्दल आकडेवारी उपलब्ध नसली तरी कामावरील कामगारांशी बोलल्यावर हे स्पष्ट दिसते- अर्थात उत्पादकताही वाढली आणि सामाजिक पातळीवर कामगारकपातीमधून

श्रमांचीही ‘बचत’ झाली! पण तो परिणाम आहे. ते कारण असेल तर इतकी वर्षे कालबाह्य यंत्रे वापरणाऱ्यांना अचूकपणे संपकाळातच श्रमांच्या बचतीची ऊर्मी झाली हे काही उलगडत नाही. यंत्रांबद्दलच्या ठराविक भांडवली साच्यातल्या उत्तरांमधून जे प्रश्न उरतात त्यांची उत्तरे फक्त मार्क्सच्या दृष्टिकोनातूनच समग्रपणे मिळतात.

५. यंत्रांचा भांडवली वापर आणि रोजगार

रोजगार कमी होतो की वाढतो?

यंत्रांच्या बाबतीत ज्याच्यावरून रण माजते तो दुसरा प्रश्न म्हणजे कामगारवर्गाच्या एकूण रोजगाराचा. भांडवलशाहीमध्ये यंत्रे कामगारवर्गाचा रोजगार कमी करतात की वाढवतात? हाही प्रश्न त्याच जातीचा असतो आणि शिवाय जास्त गुंतागुंतीचा असतो. या प्रश्नाच्या उत्तरापर्यंत पोचायलादेखील त्यामुळे आपल्याला टप्प्याटप्प्याने प्रवास करावा लागेल.

कामगारवर्गाचा एकूण रोजगार हा भांडवलदारवर्गाच्या एकूण बदलत्या भांडवलावर अवलंबून असतो. श्रमशक्तीचे मूल्य व त्यामुळे निर्णित होणारे वेतन हे आपण सध्या स्थिर धरून चाललो तर भांडवलदारवर्गाच्या एकूण बदलत्या भांडवलाच्या प्रमाणात रोजगार बदलतो. त्यामुळे यंत्राचा भांडवलशाहीत काय परिणाम होतो हे पहायचे झाले तर भांडवलशाहीमध्ये यंत्रे आल्यामुळे भांडवलदारवर्गाचे एकूण बदलते भांडवल कसे बदलते ते पहावे लागेल.

बदलत्या भांडवलाचे कायम भांडवलात रूपांतर

भांडवलशाहीमध्ये यंत्रांच्या वापरामुळे भांडवलाच्या कायम व बदलते भांडवल या विभागणीवर अपरिहार्य परिणाम होतो. प्रत्येक क्रयवस्तूमागे खर्ची पडणारा श्रमसाधनांचा भाग वाढतो. किंवा प्रत्येक क्रयवस्तूमागे लागणारे बदलते भांडवल कमी होते व कायम भांडवल वाढते.[३]

> उदाहरणार्थ असे समजा की १२ लाख श्रमतास मूल्य असलेल्या श्रमसामग्रीच्या साहाय्याने ८ लाख तासांची श्रमशक्ती खर्च करून एका कारखान्यातील कामगार १ लाख क्रयवस्तू तयार करतात. ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य जर ४ श्रमतास धरून चालले तर एकूण १२ लाख श्रमतास कायम भांडवल व ४ लाख श्रमतास बदलते भांडवल मिळून १६ लाख श्रमतास भांडवल खर्ची पडते.

नवी यंत्रे आल्यावर फक्त ४ लाख श्रमतासांची श्रमशक्ती खर्च करून कामगार १३ लाख श्रमतासांच्या साहाय्याने आता १ लाख क्रयवस्तू तयार करतात असे गृहीत धरू. त्यामुळे आता २ लाख श्रमतास बदलते भांडवल व १३ लाख श्रमतास कायम भांडवल मिळून १५ लाख श्रमतास भांडवल खर्ची पडते.

या प्रक्रियेमध्ये आपल्याला दोन गोष्टी घडताना दिसतात. एकूण भांडवल १६ लाख श्रमतासांवरून १५ लाख श्रमतासांवर येते. आणि भांडवलाची विभागणी पूर्वी १६ लाख श्रमतासांमागे ४ लाख श्रमतास, किंवा १०० श्रमतासांमागे २५ श्रमतास बदलते भांडवल अशी होती, त्याऐवजी आता १५ लाख श्रमतासांमागे २ लाख श्रमतास किंवा १०० श्रमतासांमागे १३.३ श्रमतास बदलते भांडवल अशी बदललेली दिसते. पूर्वी खर्ची पडलेल्या भांडवलाच्या संदर्भात पहायचे तर २ लाख श्रमतासाने बदलते भांडवल कमी होऊन त्याची जागा १ लाख श्रमतास कायम भांडवलाने घेतलेली दिसते. भांडवलशाहीमधील यंत्रांचा अपरिहार्य परिणाम म्हणजे बदलत्या भांडवलाच्या एका भागाचे त्याच्यापेक्षा कमी मूल्य असलेल्या कायम भांडवलात रूपांतर.

रोजगारामध्ये तूट पडण्याची प्रवृत्ती

याचा परिणामही स्पष्ट आहे. वरील उदाहरणामध्ये त्या क्रयवस्तूच्या उत्पादनातील कामगारांच्या ४ लाख तासांच्या रोजगाराची जागा १ लाख श्रमतासांची श्रमसामग्री घेते. त्या क्रयवस्तूच्या उत्पादनातील कामगारांचा रोजगार यामुळे कमी होतो. अर्थात इतक्यावर थांबून चालणार नाही. इतर क्रयवस्तूंच्या उत्पादनावर व तिथल्या रोजगारावर काय परिणाम होतो ते पहावे लागेल.

आपण असे धरून चालूया की इतर क्षेत्रांमधली विभागणी तशीच आहे आणि तिथे आहे त्या तंत्रावरच उत्पादन चालू राहते आहे; मग ते कारागिरांमधले साधे सहकार्य असो, हातकसबावर आधारलेली श्रमविभागणी असो, का यंत्राधिष्ठत उत्पादन असो, आता आपल्या मगाचच्या क्रयवस्तूसाठी लागणाऱ्या १ लाख श्रमतासांच्या जादा श्रमसामग्रीचे उत्पादन त्या क्षेत्रात व्हावे लागेल व त्या आधारे तिथे रोजगार वाढेल. पण किती?

आपल्या मगाचच्या क्रयवस्तूच्या उत्पादनातला रोजगार ४ लाख तासांनी कमी झाला आहे. श्रमसामग्रीच्या क्षेत्रामध्ये १ लाख श्रमतास मूल्याच्या नव्या क्रयवस्तू निर्माण होत आहेत. या मूल्याचा फक्त काही भागच खर्ची पडलेले बदलते भांडवल दर्शवील. उत्पादनाचे तंत्र कोणतेही असो, या मूल्याचा काही

भाग हा वरकड-मूल्य व कायम भांडवल दर्शविणे अपरिहार्य आहे. आपण असे धरूया की या १ लाख श्रमतासांचे विभाजन ०.५ लाख श्रमतासांची श्रमसामग्री, ०.२५ लाख श्रमतासांचे वरकड-मूल्य व ०.२५ लाख बदलते भांडवल असे होते. तेव्हा श्रमसामग्रीच्या क्षेत्रात ०.५ लाख तास रोजगार तयार होईल.

अर्थात, श्रमसामग्रीच्या क्षेत्रातील भांडवलदारांच्या हातात पूर्वीपेक्षा जास्त ०.२५ लाख श्रमतासांचे वरकड-मूल्य हातात आले आहे. त्यातून भांडवलदारांना लागणाऱ्या उपयोगाच्या वस्तूंच्या उत्पादन-क्षेत्रात उत्पादन वाढेल व त्यातून रोजगार निर्माण होईल. त्याबरोबरच श्रमसामग्रीच्या क्षेत्रातील या भांडवलदारांना लागणाऱ्या श्रमसामग्रीमध्येही ०.५ लाख श्रमतासांचे उत्पादन वाढावे लागेल. अशी एक लांबलचक साखळी तयार होईल.

पण इथेदेखील या मूल्याचे वरकड-मूल्य, कायम भांडवल व बदलते भांडवल असे विभाजन व्हावे लागेल. साखळीतल्या प्रत्येक दुव्यावर या विभाजनाचा अपरिहार्य परिणाम होईल. गणिताने हे दाखवता येते की पहिल्या क्रयवस्तूच्या उत्पादनात जितके वाढीव कायम भांडवल आता खर्ची पडते ते जर संपूर्णपणे बदलते भांडवल असते तर जो रोजगार निर्माण झाला असता त्यापेक्षा कमी रोजगार या सर्व साखळीमधून निर्माण होतो.[४]

आपल्या उदाहरणात हे वाढीव कायम भांडवल १ लाख श्रमतास होते. ते जर बदलते भांडवल असते तर २ लाख तासांचा रोजगार निर्माण झाला असता. तेव्हा या सर्व साखळीमधून २ लाख तासांपेक्षा कमी रोजगार निर्माण होतो. थोडक्यात, आपल्या उदाहरणामध्ये ज्या क्रयवस्तूच्या उत्पादनात पुढारलेली यंत्रे आली असे आपण धरले होते तिथे ४ लाख तासांनी रोजगार कमी झाला होता. त्याच्या बदल्यात आता २ लाख तासांपेक्षा कमी रोजगार निर्माण झाला. म्हणजे रोजगार २ लाख तासांपेक्षा जास्त संख्येने कमी होतो. तेव्हा आपण खालील निष्कर्षाला पोचतो; बदलत्या भांडवलाच्या काही भागाचे त्यापेक्षा कमी कायम भांडवलात रूपांतर अपरिहार्यपणे झाल्याचा एकंदर परिणाम कामगारवर्गाचा एकूण रोजगार कमी होण्याचा असतो.

दोन गोष्टींमुळे हा परिणाम आणखीच तीव्रपणे उठून दिसतो. पहिले म्हणजे रोजगारामध्ये येणाऱ्या या तुटीमुळे कामगारांच्या उपजीविकेच्या क्रयवस्तू उत्पादन करणाऱ्या क्षेत्रांवर परिणाम होतो. बदलत्या भांडवलात जी तूट आता पडली आहे त्यातून निर्माण होणाऱ्या साखळीमुळे रोजगारातील तूट आणखी

तीव्र होते, आणि इतर क्षेत्रात पुढारलेली यंत्रे आली तर या परिणामाचा गुणाकार होऊन रोजगारातील तूट आणखी तीव्र होते.

या तुटीचे अगदी साधे कारण असते. बदलते भांडवल हे साक्षातपणे रोजगार दर्शवते तर कायम भांडवल हे अप्रत्यक्षपणे, आणि भागश:च रोजगार दर्शवते त्यामुळे साहजिकच यंत्रांच्या वापराच्या भांडवली स्वरूपामुळे रोजगारामध्ये तूट पडण्याची एक अपरिहार्य प्रवृत्ती असते.

रोजगारवाढीची विरोधी प्रवृत्ती

अर्थात, आपल्याला दुसऱ्याही एका शक्यतेचा विचार करावा लागेल. यंत्रांच्या वापरामुळे उत्पादकता वाढतेच, त्याबरोबर उत्पादनवाढही होऊ शकते. याचा एकंदर परिणाम म्हणून रोजगार वाढण्याचीही एक प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. उदाहरणार्थ, मगाचच्या उदाहरणामध्ये त्या क्रयवस्तूंचे उत्पादन उत्पादकतावाढीबरोबर पूर्वीच्या दीडपट झाले तर रोजगार ८ लाख तासांवरून ४ लाख तासांवर घसरण्याऐवजी ६ लाख तासांवर घसरतो. त्या क्रयवस्तूच्या उत्पादनामध्ये रोजगाराची आता ४ लाख तासांऐवजी २ लाख तासांचीच तूट पडते. त्याशिवाय पूर्वीच्या १२ लाख श्रमतासांच्या श्रमसामग्रीऐवजी आता २२.५ लाख श्रमतासांची श्रमसामग्री खर्च होते. ती व्हायची तर १०.५ लाख श्रमतासांनी श्रमसामग्रीच्या क्षेत्रामधली उत्पादनवाढ होते, त्यामार्फत रोजगार वाढतो व पूर्वीच्याचप्रमाणे रोजगारवाढीच्या साखळीमधून आता कमी असलेली रोजगाराची तूट भरूनही निघू शकते. अन् त्यामुळे आपण फक्त एका संदिग्ध उत्तरापाशी पोचतो असे वरवर पाहता वाटू लागते—रोजगारात तूट निर्माण करणारी प्रवृत्ती व त्याच्या विरोधी रोजगार वाढवणारी प्रवृत्ती या दोन्ही प्रवृत्तीचे संतुलन कसे आहे त्यावर यंत्रांच्या भांडवली वापरामुळे रोजगार वाढतो की कमी होतो ते ठरते. यंत्रांच्या भांडवली वापरामुळे रोजगार वाढूही शकतो किंवा कमीही होऊ शकतो. पण असा नरो वा कुंजरो वा अशा पद्धतीचा निष्कर्ष काढणे म्हणजे काही खऱ्या अर्थाने या प्रश्नाचे उत्तर देणे नाही.

बेरकी प्रश्नाचे उत्तरदोन प्रवृत्तींमधला फरक

इथे आपल्याला या दोन प्रवृत्तींचा यंत्रांच्या वापराच्या भांडवली स्वरूपाशी कसा संबंध आहे ते पहावे लागेल. उत्पादनवाढ ही यंत्रे येण्याअगोदरही होते व नंतरही होते. भांडवलशाहीतल्या सर्व प्रवृत्ती या यंत्रांमुळे जशा तीव्र होतात तशी तीही तीव्र होते. यंत्रांबरोबर ती नजरेमध्ये भरते. पण ती यंत्रांच्या भांडवली

वापराशी अपरिहार्यपणे निगडित नसते. उत्पादनवाढीची कारणे आपल्याला भांडवलसंचयाच्या स्वरूपामध्ये, गरजांमध्ये आणि वेगामध्ये सापडतात. ती आपण भांडवलसंचयाच्या प्रकरणात तपासू. परंतु विशिष्ट परिस्थितीमध्ये उत्पादनवाढीशिवाय उत्पादकतावाढ होते अशी परिस्थिती अनेकदा भांडवलशाहीत असते हे आपल्याला दिसते. उदाहरणार्थ, ज्या वस्तूंची मागणी पुरवठ्यामुळे फारशी बदलत नाही अशा क्षेत्रांमध्ये यंत्रे येऊनदेखील उत्पादनवाढ होत नाही. अनेक क्षेत्रांमध्ये एकदोन कारखान्यांत यंत्रांमुळे झालेली उत्पादनवाढ व खालावलेले मूल्य यामुळे त्याच क्रयवस्तूचे उत्पादन करणारे इतर अनेक कारखाने स्पर्धा न परवडल्यामुळे डबघाईला येऊन बंद पडू शकतात व एकूण उत्पादनवाढ नगण्य होते. मक्तेदारी अवस्थेनंतर ही गोष्ट आणखी तीव्र होते. झालेली उत्पादनवाढ खपून जाण्यासाठी मागणी लवचिक असूनदेखील मक्तेदारी नफ्याच्या राशीमध्ये तूट येऊ नये म्हणून उत्पादनवाढ न करण्याची किंवा यंत्रांच्या शक्यते आणि क्षमतेपेक्षा ती कमी करण्याची प्रवृत्तीदेखील तितकीच बळावते. आणि जेव्हा संप मोडून काढण्याचे हत्यार म्हणून यंत्र येते तेव्हाही अनेक वेळा उत्पादनवाढ हे लक्ष्य मुळातच नसते, लक्ष्य असते उत्पादकतावाढ, त्यातून मिळणारे जादा व अंतिमत: सापेक्ष वरकड-मूल्य. थोडक्यात यंत्रांमुळे रोजगार वाढूही शकतो व कमीही होऊ शकतो, इतकेच म्हणून आपण थांबू शकत नाही. यंत्रे आल्यानंतर एकंदर रोजगार वाढलेला दिसल्यामुळे भांडवलशाहीमध्ये यंत्रांमुळे रोजगार वाढतो अशाही उत्तरापाशी थांबून चालत नाही. असे केले तर आपण बरोबर या बेरकी प्रश्नाच्या सापळ्यात अडकतो.

यंत्रांशी निगडित असणाऱ्या या दोन प्रवृत्तींचे यंत्रांच्या भांडवली वापराशी गुणात्मकरीत्या निरनिराळ्या प्रकारचे नाते आहे. एकूण राजेगारात तूट पडण्याची प्रवृत्ती ही यंत्रांच्या वापराशी अपरिहार्यपणे जोडलेली आहे तर उत्पादनवाढीतून रोजगार वाढण्याची प्रवृत्ती ही अशा अपरिहार्य पद्धतीने जोडलेली नाही. तेव्हा आपल्याला या बेरकी प्रश्नाचे उत्तर खालीलप्रमाणे द्यावे लागते. यंत्रांच्या भांडवली वापरामध्ये रोजगारात तूट पडण्याची अपरिहार्य प्रवृत्ती असते; जेव्हा आणि जोपर्यंत भांडवल संचयामुळे पुरेशा वेगाने उत्पादनवाढ होते तेव्हा आणि तिथपर्यंतच यंत्रांच्या भांडवली वापरामुळे रोजगाराची भरपाई होऊन रोजगार वाढू शकतो! कामगार आणि यंत्र यांचे भांडवलशाहीमध्ये प्रतिस्पर्ध्यांचे नाते आहे.

रोजगाराच्या भरपाईचा अर्थ

पण जेव्हा उत्पादनवाढीमुळे कमी पडणाऱ्या रोजगाराची भरपाई होते तेव्हा तरी या 'भरपाई'चे स्वरूप काय असते ते जरा तपासू. असे समजून चालू की कापड गिरण्यांच्यामधल्या श्रमांची उत्पादकता चौपट झाली, त्यामुळे कापडाचे मूल्य अर्ध्यावर आले व त्याच वेळी उत्पादन दुप्पट झाले. आता हे उत्पादन दुप्पट व्हायचे तर दुप्पट कापूस मिळाला पाहिजे. इतर गोष्टी कायम असतील तर त्यामुळे कापसामधला रोजगार वाढेल. या वाढलेल्या रोजगारामधून कापड गिरण्यांतून बाहेर पडलेल्या कामगारांची भरपाई कशी होते? तर कापड गिरणीत काम करणाऱ्या अर्ध्या कामगारांनी आता कापसाच्या शेतात शेतमजूर म्हणून राबावे किंवा रेडीमेड कपडेवाल्याकडे जाऊन शिवणकाम करावे. बाबीण आणि धोट्याचे कसब असलेल्या या कामगारांच्या रोजगाराची ही 'भरपाई' म्हणायची? या भरपाईचा हा अर्थ कधी फारसा उघड होत नाही. रोजगारावरून कमी होणाऱ्या कामगारांचे कमावलेले कसब मारले जात असते व त्यामुळे आलेले त्यांचे श्रमशक्तीचे मूल्यही मारले जात असते. आपल्या पेशातून कामगार उखडले जात असतात व दुसऱ्या ठिकाणी अकुशल कामगारांच्या ताफ्यात त्यांना सामील व्हावे लागत असते. भांडवलदारांच्या दृष्टीने हे सोन्याहून पिवळे असते एकंदर श्रमशक्तीचे मूल्य घसरते. तेवढेच जास्त सापेक्ष वरकड-मूल्य!

'भरपाई' टिकते किती?

आणि जेव्हा ही भरपाई होते तेव्हा तरी ती किती काळ टिकते? एखाद्या क्षेत्रात यंत्रे आल्यामुळे झालेली उत्पादनवाढ ज्या क्षेत्रामध्ये रोजगार वाढवते तिथे ताबडतोबीने परिस्थिती व तंत्र बदलत नाही. त्यामुळे या उत्पादनवाढीचा ताबडतोबीचा परिणाम हा मोठ्या रोजगारवाढीत होऊन भरपाई झालेली असते. पण ही परिस्थिती टिकते थोडीच? कामगारांचे 'हळू चालणारे हात' या क्षेत्रातही भांडवलदारांना जाचू लागतात. तिथेही सापेक्ष वरकड-मूल्य आपली वाटचाल सुरू करते. श्रमविभागणी होते, पुढे यंत्रे येतात; कधीकधी तर हातकसबाच्या श्रमविभागणीचा टप्पा टाळून एकदम यंत्रे येतात. यांत्रिक बनलेल्या प्रत्येक कामामध्ये कामगारांची जागा यंत्र घेऊ लागते. अकुशल म्हणून शिरलेल्या कामगारांनी काही करून कमवावे न कमवावे तोच त्यांची

श्रमशक्ती परत मारली जाते. अर्थात इथेही उत्पादनवाढ झाली तर आणखी 'कुठे तरी' त्याची 'भरपाई' होत असतेच! पण हा खो खो चा खेळ असतो.

या सगळ्या चक्राकार खेळातून कामगारांची काय भरपाई होते? एका धंद्यातून ते बाहेर फेकले जात असतात. त्यांचा पेशा नाहीसा होत असतो. त्यांच्या श्रमशक्तीला फटके बसत असतात आणि कसबावर आधारलेले त्यांच्या श्रमशक्तीचे मूल्य वारंवार मारले जात असते. दुसऱ्या क्षेत्रात ते शिरतात अन् थोडेफार कसब कमवू लागतात तोच तिथेही तेच घडते. भांडवलशाहीमध्ये यंत्रे येतात तेव्हा भांडवलशाही स्वत:च एक अजस्र आंधळे यंत्र बनते. कामगारवर्गाच्या एकेका विभागाला आपल्या खेळात ओढीत स्वत:च्या गरजांप्रमाणे इतस्तत: फेकणारे एक अजस्र यंत्र बनते. मधून मधून नियमितपणे आदळणारी बेरोजगारीची कुऱ्हाड, तिच्याशी निगडित उपासमार, काम शोधण्याची वणवण आणि असुरक्षितता हा कामगारजीवनाचा स्थायी भाग बनतो.

६. सर्जनाच्या क्षमतांचे उफराटे रूप

कामगारजीवनात शिरलेल्या या असुरक्षिततेची सर्वांत विदारक बाजू मात्र ही असते की ती यंत्रांमुळे निर्माण झालेल्या सर्जनाच्या प्रचंड शक्यतांचेच एक उफराटे रूप असते. यंत्रे येतात ती व्यवसायनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या आधारावर. यंत्रांवरचे कसब आणि ज्ञान हे कोणत्याही माणसाला उपलब्ध असण्याचा अधिकार आहे. ज्ञान हे जातीच्या, व्यवसायाच्या किंवा धर्मांच्या भिंती मानीत नाही, हा क्रांतिकारक सामाजिक विचार त्यात अध्याहृत असतो. माणसांनी आपले ज्ञान सर्व विविध अंगांनी वाढवावे, तो त्यांचा अधिकार आहे; ती त्यांची मानवी क्षमता आहे हे त्यातले सूत्र असते. आणि भांडवलशाही कामगारांना या असुरक्षिततेतून हेच सांगत असते की बाबारे, तू पूर्वी कापड गिरणीत बाबीण भरीत होतास म्हणून काय झाले? तुझ्या मानवी क्षमता काय बाबीण भरण्यापुरत्या मर्यादित आहेत? नवीन ज्ञान, नवे सर्जनशील अनुभव घे. जा शिवणकाम शीक आणि शिवणकामातून तुला उडवले म्हणून काय झाले? तुला हजार धंदे शिकायला आहेत, हजार मानवी क्षमता आहेत, त्या आत्मसात कर! माणसांच्या सृजनक्षमतेच्या विविधतेवरचा त्यांचा अधिकार आणि त्यांची विविध क्षमता असुरक्षिततेचे उफराटे रूप घेऊन कामगारवर्गाच्या डोक्यावर बसतात.[६]

हेच उफराटेपण यंत्राधिष्ठित भांडवली कारखान्यांच्या अंतर्गत श्रमविभागणीमध्ये देखील कामगारांच्या माथी बसलेले असते. एका बाजूला यंत्रे हे जाहीर करीत असतात की पूर्णपणे यांत्रिक कामे, जिथे सृजनशीलतेला वाव नाही अशी कामे, माणसांनी करण्याची गरज नाही. अशी जास्तीत जास्त कामे यंत्रांवर सोपवून माणसे उत्पादनशील खऱ्या अर्थाने सृजनशील अशा कामांमध्ये जास्तीत जास्त वेळ घालू शकतात. कारखान्याच्या अंतर्गत मात्र या शक्यता भांडवली श्रमविभाणींच्या रूपात उलटे रूप घेतात. ही श्रमविभागणी हातकसबावर आधारलेली नसली तरी ती यंत्रांवर आधारलेली श्रमविभागणीच असते. एका बाजूला यंत्राला योग्य ते खाद्य त्याच्या वेगाने, त्याच्याशी जुळवून घेऊन यांत्रिकपणे करण्याची कामे बहुसंख्य कामगारांच्या वाट्याला येतात. दुसऱ्या बाजूला भांडवली उत्पादनाच्या हेतूशी आणि उद्देशांशी निगडित अशा निर्णयप्रक्रियेमध्ये काही ना काही भाग असलेल्या थोडक्या मॅनेजर, इंजिनिअर, सुपरवायझर इत्यादी कर्मचाऱ्यांची व्यवस्थापन किंवा मॅनेजमेंट नावाची यंत्रणा तयार होते. अन् या संपूर्ण यंत्रणेमार्फत अधिकारांची आणि कामाच्या तुकड्यांची एक शिस्तबद्ध उतरंडही तयार होते.

या भांडवली श्रमविभागणीला हातकारखान्यांमधल्या श्रमविभागणीपेक्षा एक वेगळे स्वरूप व आशय असतो. हातकसबाची श्रमविभागणी तशीच विकसित होऊ लागली की शारीरिक कुवतीच्या मर्यादेमुळे ती एका पातळीपर्यंत पोचून कुंठित होते. तिच्यात फार मोठ्या प्रमाणावर गुणात्मक बदल होण्याची शक्यता नसते. याउलट जसजशी नवनवी यंत्रे येतात तसतशी त्या यंत्रांभोवती होणारी श्रमविभागणी सतत गुणात्मकरीत्या बदलते. नवनवीन यंत्रांशी नवनवे कौशल्य हे पूर्वीप्रमाणे वर्षानुवर्षांच्या श्रमांतून कमावलेल्या हातकसबाच्या स्वरूपात नसते. विज्ञानाचा पाया असल्यामुळे ते सर्वसाधारणपणे कोणालाही उपलब्ध असणारे व विज्ञानाची सर्वसाधारण समज आवश्यक असणारे असते.

यंत्रांच्या या स्वरूपाशी सुसंगत अशा कोणत्या कुवती श्रमशक्तीमध्ये आवश्यक आहेत याचेही सूत्र त्यात अध्याहृत असते. विज्ञानाची सर्वसाधारण समज असलेली, नवनव्या कुवती आत्मसात करू शकणारी व करू इच्छिणारी श्रमशक्ती इथे अभिप्रेत असते. प्रत्यक्षात मात्र ही श्रमशक्ती व तिच्या कुवती भांडवली श्रमविभागणीच्या साचेबंद चौकटीत कोंबल्या जात असतात. ही साचेबद्धता आणि तिच्यातील उतरंडीची अचलता भांडवली श्रमविभागणीसाठी आवश्यक असतात. त्यामुळे भांडवली स्वरूपातील यंत्रांचा वापर फार तर ही

साचेबद्धता आणि उतरंड कायम ठेवून जुना साचा मोडून नव्या साच्यात श्रमशक्ती कोंबू शकतो. यंत्रांबरोबर निर्माण झालेल्या मानवी सृजनक्षमता, त्यांना कोंडणारे उफराटे रूप सतत मोडून काढत असतात. यंत्रांबरोबर भांडवलशाही फक्त वयात येते इतकेच नव्हे तर तिचे उच्चाटन केल्याशिवाय ज्या क्षमता सामाजिक व्यवहारात सामावून घेता येत नाहीत अशा क्षमतादेखील निर्माण करत असते. थोडक्यात, भांडवलशाहीत यंत्राधिष्ठित उत्पादन येते तेच मुळी कामगारवर्गीय क्रांतीचा पाया घालीत येते.

७. यंत्राधिष्ठित भांडवलशाही व कामगारांची चळवळ

सापेक्ष वरकड-मूल्यकामगारांवरील सर्वांगीण हल्ला

परंतु सापेक्ष वरकड-मूल्याच्या भांडवलशाहीचा जो आणखी एक महत्त्वाचा हल्ला होत असतो तो आपण अजून पाहिलेला नाही. भांडवलदाराला उत्पादित वस्तूचे मूल्य कमी करून सापेक्ष वरकडमूल्य वाढवण्याचे दोन प्रकारचे मार्ग असतात. एक म्हणजे जिवंत श्रमांची, कामगारांनी घातलेल्या प्रत्यक्ष श्रमाची, उत्पादकता वाढवून, आणि दुसरा म्हणजे संचित श्रमांची किंवा श्रमसामुग्रीमार्फत वस्तूत साठणाऱ्या मूल्याची बचत करून. उदाहरणार्थ जेव्हा कामगार ८ तासांऐवजी ४ तासात एखादी क्रयवस्तू तयार करतात तेव्हा जिवंत श्रमांची उत्पादकता वाढलेली असते. परंतु समजा कामगार ८ तासांत अजूनही एकच वस्तू निर्माण करत आहेत, पण १२ श्रमतासाऐवजी १० श्रमतासांची श्रमसामुग्री वापरीत आहेत तर संचित श्रमांची बचत झालेली असते. दोन्हीमुळे उत्पादित वस्तूचे मूल्य कमी होते व सापेक्ष वरकड-मूल्य मिळते. या दोन्हींचे सामाजिक परिणाम वेगवेगळे असतात. एक तर जिवंत श्रमांची उत्पादकता वाढण्यातून कामगारांचे चालू श्रम ताबडतोबीने कमी करणे शक्य होते. संचित श्रमांच्या बचतीमधूनदेखील एकंदर सामाजिक श्रम कमी करण्याची शक्यता तयार होत असते, पण हा परिणाम लांब पल्ल्याचा आणि तितकासा महत्त्वाचा नसतो.

संचित श्रमांची बचत करून सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याच्या मार्गाचे आणखीही एक वैशिष्ट्य असते. कामगारांना कामाच्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या सोयी (लाघवीसाठी मुतारी असण्यापासून ते पुरेशी शुद्ध हवा उपलब्ध असण्यापर्यंत) किंवा कामगारांचे शारीरिक अपायांपासून संरक्षण करणारी उपकरणे (मशीनच्या हलत्या भागांपासून, उफाळणाऱ्या रासायनिक द्रव्यांपासून,

पर्यावरणात निर्माण होणाऱ्या दूषित घटकांपासून इत्यादी) यांसारख्या गोष्टींवरील खर्च हा सर्व या संचित श्रमांचा—श्रमसामग्रीमार्फत वस्तूत साठणाऱ्या मूल्याचा—भाग असतो. कामगारांच्या सोयीमध्ये, संरक्षणामध्ये 'बचत' करणे हादेखील एक सापेक्ष वरकडमूल्याचा मार्ग ठरतो. कामाच्या परिस्थितीतील प्रत्येक बाजूवरच्या हल्ल्यात भांडवलदारांचे सापेक्ष वरकड-मूल्याचे हितसंबंध गुंतलेले असतात.

थोडक्यात, निव्वळ व सापेक्ष वरकड-मूल्याच्या दोन्ही प्रवृत्ती एकत्रितपणे पाहिल्या तर त्याचा अर्थ होतो कामगारवर्गाच्या अस्तित्वावर, त्याच्या जीवनावर चौफेर हल्ला. निव्वळ वरकड-मूल्याची प्रवृत्ती कामाचे तास वाढवण्याचा प्रयत्न करत असते. सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती श्रमशक्तीचे मूल्य कमी करण्याचा प्रयत्न करीत असते. तिचा विकास कामगारांचे श्रम आणि त्यांची तीव्रता वाढवत जात असतात. कामगाराला यंत्राच्या गरजा पुरवणारे यंत्र बनवण्याचा प्रयत्न करीत असतात, त्याला निर्णयप्रक्रियेपासून तोडीत असतात, आणि त्याच्या कामावरच्या प्रत्येक सोयीवर व संरक्षक बाबींवर हल्ला करत असतात. हा सततचा हल्ला थोपवून धरण्यासाठी कामगारवर्गाला संघर्ष करणे भाग पडत जाते.

कामगार चळवळ आणि भांडवलशाहीची क्रांतिकारकता

जितक्या प्रमाणात कामगार व हल्ला थोपवू शकतात, तितक्या प्रमाणात फक्त संचित श्रमांची बचत ही खरोखरच श्रमसामग्रीची बचत बनते, कामगारांच्या सोयींवर व संरक्षक बाबींवरचा हल्ला रहात नाही. आणि हेच भांडवलशाहीचे क्रांतीकारक कार्य आहे. जिवंत श्रमांची उत्पादकता वाढवत नेणे व संचित श्रमांची बचत करत जाणे यांतून पुढील समाजाला पायाभूत ठरू शकतील अशा उत्पादनशक्तींची निर्मिती. पण हे ऐतिहासिक क्रांतिकारक कार्य भांडवलशाही शक्य तितके पार पाडील हे पाहणारी शक्ती मात्र असते ती कामगार वर्गाची. त्याने या व्यवस्थेच्या चौकटीतच राहून पण ठामपणे उभ्या केलेल्या त्याच्या चळवळीची. या व्यवस्थेमध्ये चाललेल्या कामगारांच्या संघर्षाचे फळ म्हणजेच फॅक्टरी ॲक्ट, वर्कमेन्स काँपेन्सेशन ॲक्ट, किमान वेतन कायदा, वारंवार बसणाऱ्या वेतन आयोगांचे निर्णय, औद्योगिक कलह कायदा; अनेक बाजूंनी या संघर्षाला समाजाकडून व भांडवली राज्यसत्तेकडून मान्यता मिळवून तो हे दंडक वा नियम प्रस्थापित करून घेत असतो. अर्थात भांडवली शासन त्या प्रत्येक कायद्यामध्ये मेख मारून ठेवते, अपवादाची कलमे घालते.

कामगारांच्या आयुष्यापेक्षा जे उद्दिष्ट सरकारला महत्त्वाचे वाटेल (कधी अत्यावश्यक सेवा, कधी आणाबाणी, कधी उत्पादकता) त्याच्या नावाखाली, या नियमांचे जवळपास कुठलेही कलम उपकलम धाब्यावर बसवण्याचे हक्क स्वत:कडे राखून ठेवते व तसे करते देखील. पण तरीही हे कायदे म्हणजे संघर्षाचे एक हत्यार असते, कामगारवर्गाचे हित हे कुठपर्यंत सर्वसाधारण माणसांचे हित म्हणून मान्य झाले आहे याचे ते एक माप असते.

सर्वांगीण हल्ल्याला सर्वांगीण उत्तर

या हल्ल्याच्या चौफेर, सर्वंकष स्वरूपाचा एक अपरिहार्य परिणाम असतो. अगदी या व्यवस्थेच्या चौकटीतला लढादेखील अशा सर्वंकष पातळीवर लढतालढताच आपसूकपणे काही जाणते कामगार या हल्ल्याला व त्याच्याविरुद्ध करायच्या चळवळीला एकत्र बांधणारे सूत्र शोधू लागतात. हा चौकटीतलाच लढा हरघडी संपूर्ण व्यवस्थेबद्दलच प्रश्न निर्माण करत असतो, क्रांतीचे प्रश्न सतत उभे राहत असतात. व्यवस्थेच्या चौकटीतला लढा हा सातत्याने ती चौकट ओलांडणाऱ्या विचारांना व प्रवृत्तींनाही जन्म देत असतो. भांडवलशाही ज्याप्रमाणे एका बाजूला सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्तींमधून तिच्या चौकटीत न मावणाऱ्या उत्पादनक्षमता तयार करीत असते, त्याप्रमाणेच ती तिच्या या चौफेर हल्ल्यामधून, या उत्पादनक्षमता सामावून घेऊ शकणाऱ्या समाजव्यवस्थेबद्दल एक सर्वंकष क्रांतिकारक दृष्टिकोन कामगारवर्गामध्ये जन्माला घालण्यासही अपरिहार्यपणे मदत करत असते. कामगारवर्गाच्या चळवळीमध्ये यंत्रांबद्दलचा दृष्टिकोनही असाच घडलेला दिसतो.

हातकारखान्यांमधून आधुनिक यंत्रावर आधारलेले कारखाने सर्वप्रथम इंग्लंडमध्ये १८व्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाले. हा कालखंड इंग्लंडमध्ये कामगारांच्या यंत्रविरोधी विद्रोहाने गाजला. यंत्रे उखडून, उद्ध्वस्त करून अनेक ठिकाणी कामगारांनी कारखाने जमीनदोस्त केले. अनेक इतिहासतज्ञ कामगारांच्या या विद्रोहाकडे कामगारांमधल्या अडाणी, आडमुठ्या विभागांनी केलेला विद्रोह म्हणून पाहतात. पण खरे तर ज्या कामगारांनी हे बंडाचे निशाण उभे केले ते कामगार त्या ऐतिहासिक अवस्थेच्या संदर्भात लांब पल्ल्याचा विचार करणारे, पुढारलेले विभाग होते. त्यांच्या दृष्टीची झेप आज तोकडी वाटते कारण आज इतिहास पुढे सरकला आहे, यंत्रे जुनी झाली आहेत. पण नव्याने येताना यंत्रांचे कौतुकच होत होते. भांडवलदारांना दिसत होती ती वाढलेली उत्पादकता, श्रम वाचण्याची साधने. यंत्रांमधील,

यंत्रापलीकडील सामाजिक संबंधांचे वास्तव त्यांच्या गावी नव्हते. याउलट त्या काळच्या विद्रोही कामगारांना यंत्र सरळपणे कामगारांचा रोजगार हिरावून घेताना दिसत होते, काम वाढवताना व कामाचा वेग असह्य करताना दिसत होते, छोटीमोठी विश्रांतिस्थाने हडप करताना दिसत होते. जे यंत्रांचे भांडवली स्वरूप भांडवलदारवर्गाला दिसत नव्हते ते कामगारांनी मात्र पक्केपणे ओळखले होते. त्यांच्या दृष्टिकोनाला बंधने होती ती त्यांच्या ऐतिहासिक परिस्थितीची. यंत्रांवरील कामाचा त्यांना पुरेसा अनुभव नव्हता, परंपरा नव्हती. त्यांना मुख्यत: परंपरा होती हातकसबाची. त्यामुळे यंत्रांमधील क्षमता त्यांच्या लक्षात आल्या नव्हत्या.

यंत्रांधिष्ठित भांडवलशाहीच्या अनुभवातून गेलेले कामगार मात्र यंत्रांच्या क्षमतांना आणि त्यांच्या भांडवलशाहीतील उफराट्या रूपांना, दोन्हींना सतत सामोरे जात होते. त्यांना ही नवी सामूहिक उत्पादनशक्ती नष्ट करायची नव्हती तर तिला खाजगी मालकीच्या चौकटीत कोंबणारे भांडवली सामाजिक संबंध नष्ट करायचे होते. आहे ती व्यवस्था नष्ट करण्याचेच फक्त ध्येय त्यांच्यासमोर नव्हते तर त्यातून त्या नव्या सामूहिक शक्तीला योग्य असे माणसाला साजेसे सामाजिक रूप द्यायचे होते. ते फक्त बंडखोर न राहता क्रांतिकारक बनले होते. इतिहासाच्या मागच्या टप्प्यावर असलेल्या विचारांच्या मर्यादा गळून पडल्या होत्या. मार्क्स ज्या जिवंत, क्रांतिकारक चळवळींच्या खांद्याला खांदा लावून उभा होता त्यांमध्ये हे वैशिष्ट्य होते आणि तेच पुरेपूर काटेकोरपणे आपल्याला त्याच्या यंत्राधिष्ठित भांडवलशाहीच्या विश्लेषणामध्ये उतरलेले सापडते. त्यामुळे त्याच्या संकल्पना या नव्या टप्प्यावरच्या आजच्या क्रांतिकारक कामगार चळवळीला आधारभूत आहेत.

---

१ व्यवसायनिरपेक्षतेने आपल्याला व्यावसायिक ज्ञानाचे विज्ञानाधिष्ठीत स्वरूप अभिप्रेत आहे. विज्ञान हे जाहीर, वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिरपेक्ष असते. भांडवलशाहीमध्ये विज्ञानाचे व्यावसायिक तंत्रविज्ञानात व त्यामार्फत उत्पादनसाधनात रूपांतर होताना त्याला नेमके याच्या उलटे रूप लाभते; ते गुप्त, उद्योग आणि व्यवसायनिष्ठ बनते. हा अंतर्विरोध पुढे आपण पाहणार आहोत.

२ यंत्रांमुळे कामगारांचा उत्पादनावरील सामूहिक ताबा एकाअर्थी वाढतही असतो, पण त्याचवेळी प्रत्येक कामगाराचे वैयक्तिकपणे यंत्राशी बांधले जाणारे नाते हे मात्र कामगारालाच यंत्रांच्या ताब्यात देत असते. आधुनिक स्वयंचलित यंत्रांचे

(ऑटोमेशन) आगमन झाल्यावर सामूहिक ताबा व वैयक्तिक बांधिलकी हा तणाव प्रचंड ताणला जातो व त्यातून अनेकदा वैयक्तिक प्रश्नावर किंवा काही विभाग-उपविभागांच्या बांधिलकीच्या प्रश्नावर सुरू झालेले लढे अनेकदा व वेगाने सामूहिक ताब्याचा प्रश्न उपस्थित करताना दिसतात.

३ बदलते भांडवल कमी होण्याबरोबरच कायम भांडवलदेखील कमी होऊ शकते पण त्यामुळे पुढे मांडलेली रोजगारात तूट पडण्याची प्रवृत्ती आणखीनच वाढते.

४ इथे हे लक्षात ठेवले पाहिजे की आपण फक्त पुढील पहिल्या फेऱ्यात उत्पादन कायम ठेवून त्यापुढील फेऱ्यात उत्पादनवाढीला वाव ठेवून तुलना करीत नाही आहोत. आपल्याला सर्व फेऱ्यांच्या अंतिम परिणामी या क्रयवस्तूचे उत्पादन तेच राहील असे या तुलनेत अभिप्रेत आहे. या परिणामाची आपण त्यामुळे उलट्या फेऱ्यातून तपासणी करीत आहोत.

५ भांडवली विचारवंतांची एक मळलेली वाट असते. ती म्हणजे अनुभव प्रामाण्यवादी (एंपिरिसिस्ट) विचारधारेची. तिच्या आधारे ते म्हणू शकतात की रोजगारवाढीचा हा निष्कर्ष संदिग्ध राहतोय ना? तर आपण सरळ इतिहासाचा दाखला घेऊया. आतापर्यंत भांडवलशाहीमध्ये यंत्रे आल्यानंतर किती मोठी उत्पादनवाढ झालेली आहे ते आम्ही सांगायला नको. अन त्याचबरोबर यंत्रे आल्यावर किती मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्र वाढले आहे. जागतिक पातळीवर किती मोठ्या प्रमाणावर औद्योगिक रोजगार वाढला आहे ते पहा. त्यातून हेच स्पष्ट होते की उत्पादनवाढ हीच भांडवलशाहीमधील यंत्रांच्या वापरातली मुख्य प्रवृत्ती आहे. नाही म्हणायला तुमच्या पहिल्या प्रवृत्तीमुळे तिची शक्ती थोडी कमी होते, पण तरीही एकंदर परिणाम हा रोजगारवाढीचा असतो.

याउलट मार्क्सची सैद्धांतिक काटेकोरपणाची वाट असते. अनुभव प्रामाण्यवादी गृहिते सोडल्याशिवाय ती स्पष्टपणे समजूही शकत नाही. अनुभवप्रामाण्यवादी गृहितांच्या आधारावर इतिहासाचे दाखले देत राहिल्याने विश्लेषण काटेकोर बनत नाही. तसे करायचे म्हटले तर इतिहासाचे दाखले देऊन अनेक उफराटे निष्कष आपण काढू शकतो. उदाहरणार्थ, भांडवलशाहीमध्ये सर्वत्र कालांतराने फॅक्टरी ॲक्टसारखे कायदे निर्माण होताना दिसतात. म्हणून आपण कामगारांच्या कामावरील परिस्थिती जास्तीत जास्त सुसह्य व निर्धोक करण्याची भांडवलशाहीमध्ये सर्वसाधारण प्रवृत्ती आहे म्हणायचे का? किंवा भांडवलशाहीच्या विकासाबरोबर कामगारांचे जीवनमान सर्वसाधारणपणे वाढलेले दिसते, तेव्हा कामागारांचे जीवनमान वाढवणे ही भांडवलशाहीची सर्वसाधारण प्रवृत्ती म्हणायचे का? किंवा यंत्रांमुळे भांडवलशाहीमध्ये सर्वसाधारणपणे सामाजिक श्रम वाचतात, तेव्हा यंत्रांमुळे सामाजिक श्रम वाचवणे ही भांडवलशाहीची सर्वसाधारण प्रवृत्ती म्हणायची का?

इथेच नेमकी गोम आहे. इतिहासात हे भांडवलशाहीत घडत आले आहे असे फक्त दाखवून उपयोग नसतो. भांडवलशाहीच्या स्वरूपाशी या प्रवृत्ती निगडीत आहेत हे प्रथम सैद्धांतिक पातळीवर दाखवावे लागते तरच त्या इतिहासाच्या दाखल्याना अर्थ येतो. नाहीतर आता घेतलेल्या उदाहरणाप्रमाणे असेही होऊ शकते. भांडवलशाहीच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या विरोधात भांडवलशाहीला फरफटत नेणाऱ्या घडामोडीचा तो परिणाम असू शकतो. प्रत्यक्षात भांडवलशाहीमधील सर्वसाधारण प्रवृत्ती ही कामगाराच्या कामाच्या परिस्थितीवर हल्ला करण्याची असू शकते, अन् तरीही त्यासंदर्भातच फॅक्टरी ॲक्टसारखे कायदे होऊ शकतात. भांडवलशाहीमध्ये कामगारांचे जीवनमान शक्य तेवढे कमी ठेवण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असू शकते आणि तरीही कामगारांचे जीवनमान सर्वसाधारणपणे वाढते असू शकते; आणि भांडवलशाहीमध्ये यंत्रांना सामाजिक श्रम वाचवण्याचे सर्वसाधारण स्थान नसून सापेक्ष वरकड-मूल्याचे साधन हे स्थान असू शकते. अन् त्यामुळेच सर्वसाधारपण सामाजिक श्रमांचीही बचत होऊ शकते.

[६] टीप १ व २ च्या संदर्भात याच पद्धतीचे उफराटेपण महत्त्वाचे ठरते.

११. हस्तव्यवसाय, गृहोद्योग, लघुउद्योग : यंत्राधिष्ठित भांडवलशाहीचा परिणाम

भांडवलशाहीत उत्पादनाच्या एखाद्या क्षेत्रात यंत्रे आली की ती त्या क्षेत्रांमधील यंत्रे न आलेल्या उत्पादनावरही झपाट्याने परिणाम करू लागतात. यंत्रे येण्याअगोदरचे त्या क्षेत्रांचे स्वरूप, त्यांचे स्थान पार बदलून जाते. हस्तव्यवसाय, गृहोद्योग, लघुद्योग या नावांनी भांडवली उत्पादनाच्या वळचणीला हे उत्पादनाचे प्रकार वाढू लागतात. यंत्राधिष्ठित भांडवली उत्पादनाला तोंड देता देता त्यांच्या स्थानाचे खास प्रश्न तयार होतात.

१. यंत्रे आणि हस्तव्यवसाय

स्वतंत्र कारागिरांचे भांडवलीपूर्व उत्पादन होत असे तेव्हा त्याला खास वेगळे हस्तव्यवसाय हे नाव देण्याचा प्रश्नच उद्भवत नसे, कारण सर्वच उत्पादन हातांनी होई. यंत्रांच्या तुलनेतच त्यांना हस्तव्यवसाय हे नवे नाव मिळते आणि हे नाव त्यांच्या खालावणाऱ्या परिस्थितीचे निदर्शक बनते. पूर्वीच्या कारागिरी उत्पादनाचे फायदे गळून पडतात व हे एक पिचलेले, लयास चाललेले क्षेत्र बनते. त्या क्षेत्रातील यंत्राधिष्ठित भांडवली उत्पादनामार्फत भांडवलदारांचे वरकड-मूल्य वाढवण्याचे ते एक साधन बनते. आणि हे सर्व अगदी मूल्याच्या नियमाप्रमाणे, कुठेही मूल्याच्या नियमांचा भंग न करता घडू शकते.

कारागिरांच्या श्रमाचे अवमूल्यन

कारागिरांच्या उत्पादनात कारखान्यातील उत्पादनाच्या तुलनेत दर क्रयवस्तूमागे जास्त श्रम गेलेले असतात. त्यामुळे बाजारात जेव्हा सरासरीने किंमत ठरते तेव्हा कारागिरांना त्यांनी केलेल्या श्रमांच्या तुलनेत कमी आणि भांडवलदारांना जास्त मूल्य मिळते. परंतु एकतर हे सारे घडते ते क्रयवस्तूंच्या नियमांप्रमाणे, आणि दुसरे म्हणजे यातून जे जादा मूल्य कारागिरांकडून काढले जाते त्यातील कोणताही भाग कामगारांच्या खिशात पडत नाही.

बुटांच्या कारखान्याचे एक काल्पनिक उदाहरण घेऊ. समजा की भांडवलदारांच्या सर्व कारखान्यांमध्ये मिळून एक लाख श्रमतासांचे चामडे इत्यादी कच्च्या मालातून, दोन लाख श्रमतास इतकी श्रमसाधनांची झीज करून, एक लाख श्रमतासांच्या साहाय्याने, एक लाख बुटांचे जोड कामगार तयार करतात. तेव्हा या एक लाख जोडांमध्ये एकंदर सामावलेला सामाजिक श्रमकाल हा चार लाख श्रमतास असतो. स्वंतत्र हस्तव्यवसाय करणाऱ्या चर्मकारांचे उत्पादन एक लाख जोड धरले तर ते त्या मानाने श्रमसामग्री कमी वापरू शकतात पण प्रत्यक्ष श्रम मात्र बरेच जास्त घालणे भाग असते. असे समजा की त्यासाठी ते एक लाख श्रमतास चामडे इत्यादी कच्चामाल, एक लाख श्रमतास श्रमसामग्रीच्या साहाय्याने चार लाख तास श्रम घालतात. तेव्हा त्यांच्या एक लाख जोडांमध्ये सहा लाख श्रमतास सामावलेले असतात. म्हणजेच दोन्ही भाग मिळून एकंदर दोन लाख जोडांमध्ये दहा लाख श्रमतास सामावलेले असतात. किंवा बुटांचे सरासरीमधून येणारे मूल्य असते दर जोडामागे ५.० श्रमतास. म्हणजे दर जोडामागे स्वतंत्र चर्मकरांना मिळते ५.० श्रमतास इतके मूल्य. दर जोडामागे त्यांनी १ श्रमतास कच्चा माल, १ श्रमतासाची श्रमसाधने वापरलेली असतात व ४ श्रमतास श्रम घातलेले असतात. हातात आलेल्या मूल्यातून त्यांना श्रमसामग्रीचे २ श्रमतास वजा जाता ३.० श्रमतास इतके मूल्य उरते. थोडक्यात, त्यांना ४ श्रमतास कामाच्या मोबदल्यात ३.० श्रमतास मूल्य मिळालेले असते; त्यांच्या श्रमांचे अवमूल्यन झालेले असते.

दर बुटांच्या जोडामागे स्वतंत्र कारागिरांनी घातलेल्या ४ श्रमतासांपैकी उरलेले १.० श्रमतास कुठे जातात? बूट बनवणाऱ्या भांडवलदारांच्या खिशात. त्याच्या यंत्राधिष्ठित कारखान्यात दर जोडामागे श्रमसामग्रीमधून ३ श्रमतास व कामगारांच्या श्रमांमधून १ श्रमतास इतका श्रमकाळ सामावलेला असतो. त्याच्या हातात पडते ते सरासरीने ठरलेले ५.० श्रमतास मूल्य. कामगारांच्या १ श्रमतासाची श्रमशक्ती त्याने ०.५ श्रमतास मूल्यात विकत घेतलेली असते. त्यामुळे त्याला त्यातून ०.५ श्रमतास वरकड-मूल्य मिळत असते, व बिनयांत्रिक स्वतंत्र चर्मकरांच्या श्रमांतून

दर जोडामागे १.० श्रमतास हे जादा वरकड-मूल्य या स्वरूपात त्याला मिळत असते.

हस्तव्यवसायामुळे भांडवलदारांचा दुहेरी फायदा

थोडक्यात म्हणजे यंत्राधिष्ठित कारखाने चालवणारा भांडवलदार हा कामगारांच्या श्रमशक्तीच्या मूल्याच्या माध्यमातून वरकड-मूल्य मिळवत असतो त्याचवेळी त्या उत्पादनक्षेत्रामधील स्वतंत्र कारागिरांच्या श्रमांच्या अवमूल्यनाच्या माध्यमातून जादा वरकड-मूल्य मिळवत असतो.

या निष्कर्षातील शब्दन्‌शब्द महत्त्वाचा आहे. त्याचे अनेक पैलू आज बऱ्याचदा डोके वर काढणाऱ्या संघटित-असंघटित कामगार वगैरे वादांशी गुंतलेले आहेत. अनेकदा असे म्हटले जाते की यंत्राधिष्ठित कारखान्यात काम करणारे कामगार हे स्वतंत्र छोटेखानी हस्तव्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या श्रमांच्या या अवमूल्यनातून येणाऱ्या वरकड श्रमांचा वाटा मिळवत असतात. यातले निखालस खोटेपण या निष्कर्षातून उघडे पडते. कारागिरांच्या श्रमांच्या अवमूल्यातून येणाऱ्या जादा वरकड-मूल्याचा एक कणदेखील कामगारांपर्यंत पोचत नाही. तो फक्त त्या भांडवलदारांच्या वरकड-मूल्यात भर टाकतो. आणि हे अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवरही खरे असते. कुठल्याच देशातल्या कामगारांपर्यंत या जादा वरकड-मूल्यांचा एक कणदेखील पोचत नाही.

समान आणि असमान विनिमय

कारागिरांच्या हातात ४ तास श्रमांच्या बदल्यात ३.० श्रमतास मूल्य येते हेच मुळी काहीजण असमान विनिमयाचा भाग मानतात. पण भांडवली दृष्टीने पाहता यात कुठेही असमान विनिमयाचा प्रश्नच येत नाही. येथे सर्व काही घडत असते ते अगदी पूर्णपणे क्रयवस्तूंच्या नियमांना धरून. बुटांच्या जोड्यांच्या एकूण उत्पादनामध्ये जाणारा सामाजिक श्रमकाळ अगदी काटेकोरपणे सर्व बुटांवर समानपणे पसरतो व बुटांच्या जोडाचे मूल्य ठरते. त्यामुळेच कारागिरांकडून दर जोडामागे १.० श्रमतास मूल्य, भांडवली यंत्राधिष्ठित कारखान्याच्या मालकांना जादा वरकड-मूल्य म्हणून मिळते. या घडामोडीतून दिसतो तो असमान विनिमय नव्हे तर क्रयवस्तूंच्या समान विनिमयाचेच उफराटेपण!

अनेकदा कारागिरांच्या श्रमांचे अवमूल्यन हे असमान विनिमयामुळे या वरील पातळीच्याही खाली ढकलले जाते. सावकार-व्यापारी यांच्या साखळीने हे छोटेखानी, विखुरलेले कारागीर सहजपणे नाडले जाऊ शकतात. क्रयवस्तूंच्या

नियमांप्रमाणे यंत्राधिष्ठित कारखान्याच्या मालकांना मिळणाऱ्या जादा वरकड-मूल्याखेरीज क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून, असमान विनिमयामधूनही ही साखळी त्यांच्याकडून वरकड मूल्य काढत असते. या दोन्ही प्रकारच्या पिळवणुकीमुळे कारागिरांच्या श्रमांचे होणारे एकंदर अवमूल्यन अनेकदा श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षाही कमी मोबदला त्यांच्या हातात ठेवते व कामगारांच्या राहणीमानापेक्षाही वाईट राहणीमान या कारागिरांच्या नशिबी येते.

२. 'सहकार': सहकार्यच, पण श्रमप्रक्रियेबाहेर!

स्वतंत्र कारागिरांना श्रमांच्या अवमूल्यनावर एक हमखास उपया नेहमी सांगितला जातो—तो म्हणजे सहकार. आता येथे प्रथम हे लक्षात घेणे आवश्यक आहे की हा 'रामबाण' सहकार वेगळा, आणि मघाशी चर्चा केलेले श्रमप्रक्रियेमधील सापेक्ष वरकड-मूल्याचा आधार असलेले सहकार्य वेगळे. त्यांच्यात जमीनअस्मानाचा फरक आहे. हा रामबाण उपाय गणला गेलेला भांडवली पायावरील सहकार म्हणजे उत्पादनातील, श्रमप्रक्रियेमधील सहकार्य सोडून इतर सर्व बाबतीतला सहकार असतो. कच्च्या मालाच्या आणि श्रमसामग्रीच्या खरेदीमधील सहकार, किंवा उत्पादनाच्या विक्रीमधील सहकार, किंवा पतपुरवठ्यामधील सहकार. याउलट सापेक्ष वरकड-मूल्याच्या उफराट्या रूपात व्यक्त होत असते ते श्रमप्रक्रियेतील सहकार्य असते, श्रमांच्या उत्पादकतेतील वाढ त्यामुळे त्याच्यात अंतर्भूत असते. उत्पादनाबाहेरचा सहकार आणि सहकारी चळवळ एक गोष्ट जरूर करू शकते. क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करण्यामुळे व्यापारी-सावकारांच्या साखळीने जे वरकड-श्रम मधल्यामध्ये हडप केलेले असतात ते ही सहकारी चळवळ रोखू शकते. पण तिची पूर्ण शक्ती लावल्यानंतरदेखील कारागिरांच्या श्रमांचे अवमूल्यन थांबत नाही. कारण क्रयवस्तूंच्या नियमांप्रमाणे होणारे त्यांच्या श्रमाचे अवमूल्यन हा सहकार थांबवू शकत नाही.

स्वतंत्र कारागीर हे राहणीमानाच्या बाबतीत, त्यांच्या श्रमांना मिळणाऱ्या मोबदल्याच्या बाबतीत कामगारवर्गाकडे सरकू लागले तरी त्यांचे वर्गीय स्थान वेगळे असते. आणि त्यामुळे स्वत:च्या हितरक्षणासाठी उभी राहणारी त्यांची चळवळ ही नेहमी श्रमप्रक्रियेच्या बाहेरच्या सहकारावर आधारलेली चळवळ राहते. प्रत्येक कारागिराच्या वैयक्तिक खाजगी मालकीची श्रमसाधने व त्याच्या खाजगी अखत्यारीत चालणारी श्रमप्रक्रिया भांडवलशाहीमुळे धोक्यात आलेली

असली तरी ती वैयक्तिक मालकीच त्यांच्या विचारांना आधारभूत राहते. त्यांची सहकारी चळवळ त्यामुळे त्यांचे हे घसरते स्थान फारतर क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे ठरणाऱ्या 'वाजवी' अवमूल्यनापाशी थोपवून धरू शकते.

३. गृहोद्योग व यंत्रे

ज्या क्षेत्रात अशा चळवळीतून आपले घसरते स्थान थोपवून धरणे कारागिरांना शक्य होत नाही त्यांमध्ये त्यांच्यासमोर एक वेगळेच भविष्य वाढून ठेवलेले असते. त्यांच्या श्रमांचे त्यांना मिळणारे मूल्य तर श्रमशक्तीच्या मूल्याच्या खाली जातेच, शिवाय त्यांच्या उत्पादनाच्या परिस्थितीचे इतर घटकही त्यांना कामगारांच्या जोडीला खेचू लागतात. पादत्राणांचेच उदाहरण घ्या. जसजसे यंत्राधिष्ठित पादत्राणांचे उत्पादन वाढू लागते तसतसा बाजारपेठेत फरक पडू लागतो. पूर्वीचे गिऱ्हाईक मापाप्रमाणे चप्पल बनवायची ऑर्डर देई, त्याबद्दल आगाऊ रक्कमही भरत असे. आता प्रथा पडते ती तयार माल पैसे टाकून उचलायची. निरनिराळ्या मापांच्या चपला दुकानात तयार ठेवणे हे स्पर्धेमुळे महत्त्वाचे बनते. म्हणजे त्यासाठी लागणारी श्रमसामग्री, कच्चा माल, तयार माल इत्यादी गोष्टी अंगावर ठेवणे भाग पडते. उत्पादनात स्वतंत्र कारागीर म्हणून रहायचे म्हटले तरीदेखील त्यासाठी जास्तजास्त पैसा हातात असावा लागतो. भांडवली उत्पादनाचे निकष कारागिरांवर आपसूक लादले जातात. घाऊक बाजारपेठेला महत्त्व येऊ लागते. व्यापारी सावकारांची एकत्रित साखळी नवी शक्कल लढवते. ती त्याला कच्चा माल आणून देते तयार माल त्याच्याकडून घेऊन जाते. अशा वेळी कारागिरी उत्पादनाचा गृहोद्योग झालेला असतो. अर्थातच कारागिरांच्या श्रमांना पूर्वीइतकाही मोबदला मिळत नाही, पण स्वतंत्र कारागीर म्हणून टिकायचे तर लागणारा पैसा हाती नसल्यामुळे नाइलाजाने तो ही कामे स्वीकारतो.

या गृहोद्योगातदेखील त्याची तुटपुंजी श्रमसाधने बऱ्याचदा त्याच्याजवळ असतात. त्यामुळे त्याच्या 'स्वतंत्र' उत्पादनाचे स्थान नाममात्र उरले असले आणि श्रमांचे अवमूल्यन पार श्रमशक्तीच्या मूल्याच्या खाली गेलेले असले तरी त्याच्या 'स्वतंत्र' असण्याचा आभास निर्माण करता येतो. आणि हे गृहोद्योगाचे 'मॉडेल' अनेक क्षेत्रांत पसरते. पारंपरिक कारागिरीशी, कसबाशी संबंध नसलेल्या अनेक क्षेत्रांमध्येदेखील ते पसरते. या सर्व गृहोद्योगांचा एकच एक आधार असतो; श्रमशक्तीच्या मूल्याखाली अवमूल्यन झालेले श्रम. या

आधाराशिवाय हे गृहोद्योग मुळात किफायतशीर ठरून यंत्राधिष्ठित उत्पादनाशी स्पर्धा करूच शकत नाहीत.

४. स्वस्त श्रमशक्ती हाच लघुउद्योगाचा आधार

हाच प्रकार लघुउद्योगांमध्येही दिसतो. यंत्राधिष्ठित उत्पादनाच्या स्पर्धेत त्याच क्षेत्रातील लघुउद्योगांचे उत्पादन टिकून राहू शकते याचेही कारण स्वस्त श्रमशक्ती हेच असते. भांडवली लघुउद्योगांतील वरकड-मूल्याचा एक हिस्सा अगदी अशाच प्रकारे यंत्राधिष्ठित मोठ्या कारखान्यांच्या मालकांनी जादा वरकड-मूल्याच्या रूपाने मिळत असतो. ही तूट भरून काढण्याचा मार्ग असतो स्वस्त श्रमशक्ती.

> मघाच्या बुटाच्या उत्पादनाचेच उदाहरण घ्या. यंत्राधिष्ठित कारखान्यांमधील बुटांमागचा हिशेब पुढीलप्रमाणे पडतो; १ श्रमतास कच्चा माल, २ श्रमतास श्रमसाधनांचा घसारा, ०.५ श्रमशक्तीचे मूल्य, ०.५ वरकड-मूल्य, १.० जादा वरकड-मूल्य, म्हणजे ३.५ श्रमतास गुंतवणुकीमागे १.५ श्रमतास वरकड-मूल्य. कारागिराऐवजी त्याच परिस्थितीतला लघुउद्योग आहे असे आपण धरू या. जर त्या कामगारांना श्रमशक्तीच्या मूल्याप्रमाणे मूल्य दिले तर दर बुटामागे जाणाऱ्या कामगारांच्या ४ श्रमतासामागे त्यांना २ श्रमतासांचे मूल्य हातात ठेवावे लागेल. त्याप्रमाणे हिशेब पुढीलप्रमाणे येईल; १ श्रमतास कच्चा माल, १ श्रमतास श्रमसाधनांचा घसारा व २ श्रमतास श्रमशक्तीचे मूल्य, किंवा एकूण बुटांमागची गुंतवणूक ४ श्रमतास. पण लघु उद्योगातल्या भांडवलदाराच्या हातात मात्र सरासरीप्रमाणे ठरलेले ५.० श्रमतास मूल्यच येईल. म्हणजे ४ श्रमतासांमागे १.० श्रमतास वरकड-मूल्य. त्याला जर यंत्राधिष्ठित कारखान्यांच्या बरोबरीने टिकायचे असेल तर त्याला वरकड-मूल्य वाढवावे लागेल. कच्चा माल किंवा श्रमसाधने इतर भांडवलदारांकडून काही तो कमी मूल्य देऊन मिळवू शकत नाही. उरतो एकच मार्ग, श्रमशक्तीच्या बदल्यात कमी मूल्य कामगाराच्या हातात ठेवणे.

आणि ही स्वस्त श्रमशक्तीदेखील त्याला यंत्रांनीच उपलब्ध करून दिलेली असते! भांडवली उत्पादनाच्या एकेका क्षेत्रात यंत्रे शिरतात तीच मुळी श्रमशक्तीच्या कसबाचे व संख्येचे शिरकाण करीत. हे कसे घडते हे आपण गेल्याप्रकरणात पाहिले आहे. ही स्वस्त श्रमशक्ती भांडवलदारवर्गाला उपलब्ध होण्याची क्रिया आपण पुढच्या प्रकरणांमध्ये पाहणार अहोतच. तूर्तास हे महत्त्वाचे आहे, की लघुउद्योग टिकून राहतात ते स्वस्त श्रमशक्तीच्या जोरावर, श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षाही कमी मूल्य घेऊन राबणाऱ्या कामगारांच्या जोरावर.

आज भांडवली लघुउद्योग, गृहोद्योग, आणि स्वतंत्र कारागिरी उत्पादन यांची फार मोठी तरफदारी अनेक ठिकाणांहून होत आहे. या 'पुरोगामी' भांडवली क्षेत्रांचे समर्थक भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत वाढणाऱ्या या वळचणीच्या क्षेत्रांचे एक रोमँटिक स्वप्न उभे करू पाहत आहेत. कारागिरांचे स्वातंत्र्य, रोजगारात वाढ, सुयोग्य तंत्रज्ञानाचा विकास आणि अनेक इतर प्रश्नांवर आज काहीजणांचा हमखास उपाय हे छोटेखानी क्षेत्र वाढवण्याचा आहे. त्यांच्या झापडे लावलेल्या दृष्टीला या छोटेखानी क्षेत्रांचे भांडवली स्वरूप दिसतच नाही, की दिसूनही त्यांनी वेड पांघरलेले असते या प्रश्नात जायची सध्या आपल्याला गरज नाही. फक्त आपल्या डोळ्यांवर मात्र ही झापडे असता काम नयेत.

यंत्राधिष्ठित भांडवली उत्पादनाच्या वळचणीला फोफावणाऱ्या छोटेखानी क्षेत्रामध्ये धड यंत्रांच्या वाढलेल्या उत्पादकतेचेही फायदे नसतात अन् धड स्वतंत्र भांडवलीपूर्व कारागिरी उत्पादनाचेही फायदे नसतात. हे क्षेत्र उभे असते ते सापेक्ष आणि निव्वळ वरकड-मूल्याच्या निर्मितीच्या सर्वात भीषण स्वरूपांवर. यंत्राधिष्ठित भांडवलशाहीच्या वळचणीला नांदणारे हे छोटेखानी भांडवली क्षेत्र म्हणजे अनियमित कामाचे तास, श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षाही खाली घसरलेला कामाचा मोबदला, अपुरी कामाची जागा, कोंदट हवा, सर्वप्रकारच्या सोयींचा अभाव, असुरक्षित अवजारे आणि कामगारांच्या संघटित ताकदीचे शिरकाण, आणि ही परिस्थिती नैमित्तिक किंवा अपवादात्मक नसते. या क्षेत्राने तग धरण्याचा तीच आधार असतो. यातली प्रत्येक गोष्ट ही भांडवल वाचवून स्वस्त श्रमशक्तीचे रक्षण करत असते. भांडवली उत्पादनाचा जो भाग यंत्रे काबीज करतात तोच फक्त यंत्रांमुळे बदलत नाही तर त्यांचा प्रभाव संपूर्ण उत्पादनावर पडतो. यंत्राधिष्ठित भांडवली उत्पादनाला छोटेखानी भांडवली क्षेत्र हे पर्याय नसते तर एक पूरक क्षेत्र बनते.

१२. साधे पुनरुत्पादन : भांडवल–संचयाची किमान अट

पंखा चालतो तेव्हा काय काय घडते, तो दिसतो कसा हे पंख्यांच्या पात्यांना एकच गिरकी देऊन नीट कळत नाही. फक्त एकच गिरकी दिली तर आसपासची हवा थोडीफार हललेली असेल आणि पाती पुन्हा आपल्या जागी येऊन स्थिरावलेली असतील. पण तो पंखा चालू लागला, पाती एकामागून एक गिरक्या घ्यायला लागली की हवेचा एक झोत वाहू लागेल, आणि पाती एका धूसर वर्तुळात अदृश्य होतील. एकाच गिरकीच्या पुनरावृत्तीमुळे होणारा प्रत्यक्ष परिणाम (हललेल्या हवेचा एक प्रवाह बनून हवेचा झोत निर्माण होणे) आणि त्याचे दृश्य स्वरूप (पाती धूसर वर्तुळात नाहीशी होणे आणि वाऱ्याची झुळुक जाणवणे) या दोन्हींमध्ये बदल होईल.

पुनरावृत्तीचे हे महत्त्व आपल्याला तसे नवीन नाही. पैशाबरोबर तयार होणाऱ्या विनिमयाची साखळी पुन्हापुन्हा गिरवली जाऊ लागली की काय होते तिथून मागोवा घेत आपण इथपर्यंत पोचलो अहोत. पण इथपर्यंत म्हणजे नेमके कुठपर्यंत याची नोंद घेणे जरूरीचे आहे.

१. साधे पुनरुत्पादन म्हणजे काय?

आपण भांडवलशाहीच्या विश्लेषणाला सुरुवात केली तेव्हा क्रयवस्तूच्या पसाऱ्यात, बाजारपेठेत उभे होतो. क्रयवस्तूंच्या निर्मितीत अमूर्त सामाजिक श्रम घातले गेले आहेत एवढे गृहित धरले पण याखेरीज बाजारपेठेपलीकडच्या त्या जगात आपण डोकावलो नाही. पण काटेकोर विश्लेषणाच्या गरजेतून त्या क्रयवस्तूच आपल्याला या उत्पादनाच्या खाजगी जगात घेऊन गेल्या. तिथे चाललेली घडामोड, कामगारवर्गाचे शोषण, त्याचे उत्पादन प्रक्रियेच्या विकासाबरोबर बदलणारे स्वरूप आपण पाहिले. आता क्रयवस्तूमधून क्रयवस्तू निर्माण झाल्या आहेत आणि त्या परत बाजारपेठेत परतत आहेत, विकल्या जाण्यासाठी. पंख्याच्या पात्यांनी एक गिरकी घेतलीय, भांडवली उत्पादनचक्राचे एक आवर्तन पूर्ण होत आहे.

पण भांडवली अर्थव्यवस्था म्हणजे काही हे एक आवर्तन नव्हे, तर या चक्राचे सततचे पुनरावर्तन. चक्राच्या एका आवर्तनामध्ये निरनिराळ्या टप्प्यांवर काय घडते याचा आपण वेध घेतला. आता जरा बाजूला सरकून या चक्राच्या पुनरावर्तनामधून काय निघते ते आपल्याला तपासायचे आहे. भांडवली बाजारपेठ आणि उत्पादन यांच्या जोडणीमधून हे चक्र फिरत राहते व भांडवली अर्थव्यवस्था उभी राहते. आतापर्यंत आपण काढलेले निष्कर्ष आता या व्यवस्थेच्या गतिमान आवर्तनामध्ये आपल्याला कसाला लावायचे आहेत आणि शिवाय या व्यवस्थेचा एकंदर परिणाम, तिची दिशा काय आहे ते आपल्याला तपासायचे आहे.

भांडवलशाहीत वाहणाऱ्या क्रयवस्तूच्या प्रवाहाचे एक आवर्तन आपण यापूर्वी असे मांडले होते

पैसा (मूळ भांडवल) (भा)	→	श्रमसामग्री (सा) श्रमशक्ती (श)	…	उत्पादन प्रक्रिया (उ)	…	क्रयवस्तू (क्र)	→	पैसा (पै)	वरकड-मूल्य (ब) मूळ भांडवल (भा)

पुनरावर्तनामधून निर्माण होणाऱ्या प्रवाहाचे चित्र आपल्याला असे दिसेल—

$$\text{भा}_{१} \rightarrow \begin{matrix}\text{सा}_{१}\\ \text{श}_{१}\end{matrix} \cdots \text{उ}_{१} \cdots \text{क्र}_{१} \rightarrow \text{पै}_{१} \begin{matrix}\text{ब}_{१}\\ \text{भा}_{२}\end{matrix}$$

$$\text{भा}_{२} \rightarrow \begin{matrix}\text{सा}_{२}\\ \text{श}_{२}\end{matrix} \cdots \text{उ}_{२} \cdots \text{क्र}_{२} \rightarrow \text{पै}_{२} \begin{matrix}\text{ब}_{२}\\ \text{भा}_{३}\end{matrix}$$

सतत वरकड-मूल्य प्रसवणारे क्रयवस्तूंच्या भांडवली अभिसरणाचे हे चक्र म्हणजे भांडवली व्यवस्थेचेच स्थूल चित्र आहे. परंतु या चक्राचे पुनरावर्तनदेखील दोन वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते. एक साधे पुनरावर्तन व दुसरे वाढते—वर्धित पुनरावर्तन. साध्या पुनरावर्तनामध्ये दुसऱ्या चक्रातून निघालेले व पहिल्या चक्रातून निघालेले वरकड-मूल्य सारखे असते. भांडवलदार हे वरकड-मूल्य श्रमप्रक्रियेच्या घटकांसाठी न वापरता स्वत:च्या उपभोगासाठी पूर्ण फस्त करीत असतात. त्यामुळे गुंतलेले भांडवल पहिल्याइतकेच असते. ($\text{ब}_{१} = \text{ब}_{२}$ आणि $\text{भा}_{१} = \text{भा}_{२}$) याला मार्क्स साधे पुनरुत्पादन हे नाव देतो. याउलट वर्धित पुनरार्वतनामध्ये दुसऱ्या चक्रातील गुंतलेले भांडवल व मिळालेले वरकड-मूल्य हे पहिल्या चक्रातील गुंतलेल्या भांडवलापेक्षा व मिळालेल्या वरकड-मूल्यापेक्षा अनुक्रमे जास्त असतात. यालाच मार्क्स भांडवल-संचय असे नाव देतो. या प्रकरणामध्ये आपण प्रथम साध्या पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेमधून जाणाऱ्या भांडवली व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करणार अहोत व त्यापुढील प्रकरणांमध्ये आपण भांडवल-संचयाचा विचार करणार अहोत.

साधे पुनरुत्पादन तपासायचेच कशाला?

आपण साधे पुनरुत्पादन तपासायला निघालो अहोत खरे, पण मुळात साधे पुनरुत्पादन तपासायचेच कशाला याबद्दल मात्र आपल्याला स्पष्टता पाहिजे. कारण साधे पुनरुत्पादन हे भांडवली अर्थव्यवस्थेच्या इतिहासात अभावानेच सापडते. अशी कुठलीच भांडवली व्यवस्था नाही किंवा भांडवली व्यवस्थेच्या इतिहासातला असा कुठलाच काळ नाही की जिथे वर्षानुवर्षे भांडवलदार तेवढेच भांडवल गुंतवत आहेत, तेवढीच श्रमशक्ती विकत घेत आहेत, तेवढीच श्रमसामग्री विकत घेत आहेत, तेवढ्याच मूल्याच्या क्रयवस्तू विकत घेत

आहेत, तेवढेच वरकड-मूल्य काढीत आहेत आणि ते सर्व उपभोगात खर्च करीत आहेत. उलट वाढत्या आणि घटत्या तेजी-मंदीच्या लाटा, पुनरावर्तनाची आलटपालट हा भांडवली अर्थव्यवस्थेचा स्थायीभाव आहे. आणि या तेजीमंदीच्या लाटांचा एकंदर परिणाम, भांडवलशाहीच्या ऐतिहासिक गतीचा एकंदर स्थायीभाव पहायचा झाला तर तो वाढत्या पुनरावर्तनाचा, भांडवलसंचयाचा आहे. तसे असेल तर मग आपण कुठेच अस्तित्वात नसणाऱ्या या साध्या पुनरुत्पादनाच्या भानगडीत पडायचेच कशाला? हे नेमके आपल्याला स्पष्ट असले पाहिजे.

पुनरावर्तनाचे समान घटक समजणे सोपे जाते

याचे पहिले कारण म्हणजे एकाच आवर्तनातून जे स्पष्ट होत नाही ते त्याच्या पुनरावर्तनातून स्पष्ट होऊ शकते. हे स्पष्ट होणारे घटक साधे आणि वाढते पुनरावर्तन दोन्ही प्रकारच्या पुनरावर्तनाच्या चक्रांना सामाईक असतात; परंतु ते समजून घेणे हे साध्या पुनरावर्तनामध्ये जास्त सोपे जाते. याचे विज्ञानामध्ये एक साधे आणि सोपे उदाहरण आपण पाहू शकतो. पदार्थविज्ञानामध्ये गतिशास्त्राचे नियम पाहताना घर्षण नाही अशी कल्पना करून त्याचे नियम प्रथम पाहिले जातात. वस्तुत: आपल्या भोवतालच्या नेहमीच्या परिचित घडामोडींमध्ये घर्षणविहीन अशा घडामोडी सापडतच नाहीत! अन् तरीही घर्षणविहीन अवस्थेच्या गृहीतावर आधारलेले गतिशास्त्राचे नियम हे घर्षणयुक्त अवस्थेच्या तपासणीसाठी आवश्यक ठरतात. त्याच पद्धतीने भांडवलशाहीच्या विश्लेषणामध्ये साध्या पुनरुत्पादनाच्या तपासणीला वैचारिक दृष्टीने एक महत्त्वाचे स्थान आहे.

परंतु साधे पुनरुत्पादन ही केवळ विश्लेषण सोपे करणारी वैचारिक संकल्पना नाही. भांडवल-संचयाच्या गतीचे ते एक प्रत्यक्ष मापदेखील असते. भांडवल-संचय झाला किंवा भांडवल-संचयाला खीळ बसली असे आपण म्हणतो ते साध्या पुनरुत्पादनाशी तुलना करूनच. भांडवल-संचय व्हायचा तर ज्या किमान अटी (या अटी आवश्यक असतात पण भांडवल-संचय व्हायला पुरेशा असतीलच असे नव्हे) भांडवली व्यवस्थेला पार पाडाव्या लागतात, त्या अटी साध्या पुनरुत्पादनाच्या अटी असतात. जे किमान संबंध बांधावे लागतात, ते संबंध साध्या पुनरुत्पादनामध्ये बांधले जाणारे संबंध असतात. या दृष्टीनेही साध्या पुनरुत्पादनाला एक स्वतंत्र महत्त्व आहे.

२. भांडवलशाहीचे पुनरुत्पादन व कामगार वर्ग

'स्वकष्टार्जित' पैशाचेही परकष्टार्जित अधिकारात रूपांतर

काही वेळा भांडवलदारांनी गुंतवलेला पैसा हा 'स्वकष्टार्जित' असल्यामुळे त्यांचा वरकड मूल्यांवर अधिकार आहे असे सांगितले जाते. आता इतिहासामध्ये भांडवलदार वर्गाकडे गुंतवायला आलेला पैसा हा 'स्वकष्टार्जित' किती होता हा प्रश्न आपण सध्या बाजूला ठेवू, किंवा नंतर सतत नव्याने उगवणारे भांडवलदार जो पैसा गुंतवायला आणतात तोही किती 'स्वकष्टार्जित' असतो तेही आपण बाजूला ठेवू. भांडवलदार वर्गाच्या हातात मूळ भांडवल-संचय कसा झाला याच्यावर आपण पुढे एक प्रकरणच खर्च करणार अहोत. तोपर्यंत अगदी असे धरून चालूया की भांडवलदारवर्गाने गुंतवलेला मूळ पैसा चक्क 'स्वकष्टार्जित' होता.

गुंतवलेला पैसा हा 'स्वकष्टार्जित' होता त्यामुळे त्याला पहिल्या प्रथम निघणाऱ्या वरकड-मूल्यांवर अधिकार सांगताही येतो, पण तो वरकड-मूल्याइतक्या पैशावरचा अधिकार म्हणून. समजा की २ हजार श्रमतासांचे 'स्वकष्टार्जित' मूल्य त्याच्याकडे पैशाच्या रूपात होते, ते त्याने भांडवल म्हणून गुंतवले व त्यामुळे त्याच्या कामगारांनी केलेल्या श्रमामधले २०० श्रमतास इतके वरकड-मूल्य त्याच्या हातात आले. अगोदर गुंतवायला काढलेला पैसा स्वकष्टार्जित होता यामुळे या पहिल्या चक्रातून निघालेल्या २०० श्रमतास इतके वरकड-मूल्य त्याच्या पहिल्या चक्रातून निघालेल्या २०० श्रमतासांवर त्याचा पैसा म्हणून अधिकार येतो. त्याचा पैसा भांडवल म्हणून आपली किमान कामगिरी बजावू लागला, साधे पुनरुत्पादन होऊ लागले की दर चक्रातून त्याच्या हातात २०० श्रमतास मूल्य येते. दहावे चक्र संपते तेव्हा त्याचे स्वकष्टार्जित २ हजार श्रमतास मूल्य त्याच्या हातात पैशाच्या स्वरूपात आलेले असते व ते सर्व त्याने उपभोगामध्ये फस्त केलेले असते. अकराव्या चक्रातून त्याच्या हातात येणाऱ्या २०० श्रमतास मूल्याचा त्याने गुंतवलेला पैसा स्वकष्टार्जित होता या गोष्टीशी काडीचाही संबंध उरत नाही. थोडक्यात म्हणजे भांडवल-संचयाच्या किमान अटीचा, साध्या पुनरुत्पादनावरून लागणारा अर्थ हा असतो की भांडवलदारवर्गाने गुंतवलेला पैसा हा मुळात स्वकष्टार्जित असता तरीसुद्धा त्यामुळे स्वकष्टार्जित पैसा या नात्याने वरकड-मूल्यांवर असणारा त्याचा अधिकारदेखील थोड्याच काळात नाहीसा होतो. भांडवली व्यवस्था

भांडवलदाराच्या स्वकष्टार्जित पैशाचेही रूपांतर पुनरुत्पादनाच्या प्रवाहामध्ये संपूर्णपणे शोषणावर आधारलेल्या पैशात करीत असते.

वास्तविक पाहता मूळ भांडवल हे स्वकष्टार्जित पैशातून आले असे वरकड मूल्याचे समर्थन हे भांडवलदार वर्गाच्या नवखेपणाचे लक्षण असते. आणि हे समर्थन येते ते छोटेखानी, बिगरभांडवली क्रयवस्तूच्या उत्पादनाशी निगडित अशा अभिजात मध्यमवर्गीय विचारामधून. अभिजात मध्यमवर्ग स्वत:च्याच मालकीच्या उत्पादन साधनांवर स्वत:चे श्रम करून वस्तूंचे उत्पादन करत असतो. त्यामुळे त्याच्या हातात येणारा पैसा हा भांडवलाची कामगिरी बजावीत नसतो. अशा उत्पादनामधून वर आलेला भांडवलदार वर्ग किंवा भांडवलशाहीचे समर्थन करणारा मध्यमवर्ग विचारांमध्ये आणि व्यवहारामध्ये बऱ्याचदा या बिगरभांडवली क्रयवस्तूंच्या उत्पादनक्षेत्राच्या जन्मखुणा बाळगून असतो. मार्क्स साधे पुनरुत्पादन तपासता तपासता त्यांच्या या जन्मखुणाच त्यांच्यावर उलटवतो! ठीक आहे, तुमच्या स्वकष्टार्जित पैशावरचा अधिकार मान्य केला तर कालांतराने त्याही पैशाची फेड होते आणि पुढच्या चक्रापासून ना तुमच्या भांडवलावर ते स्वकष्टार्जित असल्यामुळे तुमचा अधिकार उरतो, ना त्यातून निघणाऱ्या वरकड-मूल्यावर!! भांडवलशाही उत्पादनाचा भांडवलावरचा, वरकड-मूल्यावरचा अधिकार हा पूर्णपणे बिनकष्टाचा अधिकार आहे हे पुनरुत्पादनाची आवर्तने तपासल्यावर पूर्ण स्पष्ट होते.

भांडवलदार कामगारांना उपजीविकेची साधने पुरवतो?

हीच गोष्ट 'भांडवलदार कामगारांना उपजीविकेची साधने पुरवतो' या दाव्याला लागू होते. पुनरुत्पादनाच्या प्रवाहामध्ये भांडवली उत्पादनाचे चक्र तपासले की ही गोष्ट पूर्ण स्पष्ट होते. कामगारवर्गाला मागील चक्रातील श्रमांचा मोबदला या स्वरूपात त्या चक्रातील श्रमशक्तीचे मूल्य त्या चक्राच्या शेवटी दिले जाते. हे मूल्य त्याला पुढील चक्रातील काळासाठी उपजीविकेची साधने मिळवून देते, पण ही उपजीविकेची साधने व त्यांचे मूल्य दोन्हीही कामगारवर्गानेच मागील चक्रात निर्माण केलेली असतात! भांडवली मालकी हक्काच्या आधारे भांडवलदार वर्ग ती कामगारवर्गापासून तोडतो, स्वत:च्या ताब्यात घेतो. नंतर तो कामगारवर्गाला उपजीविकेची साधने विकत घ्यायला मुभा देणाऱ्या केवळ हुंड्या पुरवतो. प्रत्यक्षात प्रत्येक चक्रात कामगारवर्ग त्यानेच निर्माण केलेल्या उपजीविकेच्या साधनांपासून तोडला जात असतो, पण ते व्यक्त होत असते पूर्ण

उलट्या स्वरूपात, जणू काय भांडवलदारवर्ग कामगार वर्गाला उपजीविकेची साधने पुरवती असतो, कामगारवर्गाला या साधनांशी जोडत असतो!

कामगारांच्या कारखान्याबाहेरील आयुष्याचे स्थान

कामगार कारखान्यात आपली श्रमशक्ती खर्च करत असतात, आणि कारखान्याबाहेर ती पुनरुत्पादित करीत असतात. दोन घास अन्न खाऊन, सिनेमा पाहून, रेडियो ऐकून जिवाची थोडीफार करमणूक करून, एखादा छंद जडवून घेऊन, एखाद्या विषयात रस घेऊन, दुसऱ्याच्या अंगठ्याखाली न राहता मोकळेपणी वावरून ते आपल्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करीत असतात. पण त्यांचा हेतू काही श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करणे हा नसतो. त्यांना केवळ एका मानवी पातळीवर जगायचे असते. इतकेच. पण भांडवल-संचयाच्या अव्याहत चक्राच्या अगदी किमान गरजेप्रमाणे या सर्वाला काय स्थान असते? पुढील चक्राच्या गरजेप्रमाणे श्रमशक्तीचे पुनरुत्पादन होते इतकेच. या गरजेच्या पलीकडे या मानवी आकांक्षा फोफावू लागल्या आहेत असे थोडे जरी वाटू लागले तरी भांडवली समर्थकांचा जीव कासावीस होऊ लागतो. गावच्या दलितांनी ट्रान्झिस्टर बाळगायला लागणे हे जसे गावच्या सवर्णांना, शहरी मध्यम वर्गीय सवर्णांना खुपू लागते, तसेच कामगारवर्गाने मानवी जीवनाची थोडीफार जरी पातळी गाठली की या समर्थकांचाही जीव कासावीस होऊ लागतो. कामगारांपैकी काही टक्के घरांमध्ये टीव्ही येतो, त्यांची मुले इंग्रजी शाळेत जाऊ लागतात, झोपडीऐवजी दोन खोल्यांच्या ब्लॉकमध्ये राहू लागतात. आणि सज्जड पगार घेऊन सर्व तऱ्हेने जीवनाचा आनंद उपभोगणाऱ्या अनेक बुद्धिमंतांच्या नेमके हेच डोळ्यावर येऊ लागते. गैरखर्चाची हाकाटी, चलनफुगवट्याचा बागुलबुवा, बिचाऱ्या शेतमजुरांचे हाल, वाढती बेकरी . . . जे जे सापडेल त्याच्या साहाय्याने कामगारांवर हल्ला केला जातो. कामगारांच्या फॅक्टरीबाहेरील संपूर्ण जीवनालादेखील भांडवलशाहीच्या दृष्टीने एवढेच स्थान व महत्त्व असते—भांडवल-संचयाच्या आवर्तनाच्या गरजेतून निर्माण होणाऱ्या त्यांच्या जीवनावश्यक गरजा पुरवणे. भांडवलाचे पुनरुत्पादन याचा त्यामुळे अर्थ असतो—कामगारवर्गाच्या मानवी आकांक्षा व प्रेरणांना भांडवल-संचयाच्या चक्रात कोंबणे.

३. पुनरुत्पादनाच्या मार्क्सच्या विश्लेषणाचे मर्म

उत्पादनातून प्रत्येक घटकाचे पुनरुत्पादन

भांडवलशाहीच्या साध्या पुनरुत्पादनामध्ये भांडवली पुनरुत्पादनाचे मूळ स्वरूप अगदी स्पष्ट दिसू शकते. यापैकी पहिली आणि सहज समजणारी गोष्ट म्हणजे भांडवली उत्पादनाच्या एका आवर्तनातून होणारे भांडवली उत्पादनाला आवश्यक असणाऱ्या सगळ्या घटकांचे पुनरुत्पादन. त्या चक्रात कच्चा माल वगैरे जेवढा श्रमविषय खर्च होतो तितकाच तो निर्माणही होतो; तो विकत घेण्यासाठी आवश्यक ते मूल्यदेखील त्या त्या श्रमविषयाची गरज असणाऱ्या भांडवलदारांच्या हातात त्यांच्या क्रयवस्तू विकून पैशाच्या रूपाने आलेले असते. त्या चक्रात शेवटी श्रमसाधने खर्च होतात. तीही पुन्हा निर्माण झालेली असतात. व ती घेण्यासाठी आवश्यक ते मूल्यदेखील त्या त्या भांडवलदारांच्या हातात त्यांच्या क्रयवस्तू विकून पैशाच्या रूपाने आलेले असते. त्या चक्रात खर्च झालेली कामगारांची श्रमशक्ती पुन्हा निर्माण करण्यासाठी लागणारी उपजीविकेची साधने निर्माण झालेली असतात व ती साधने विकत घेण्यासाठी आवश्यक ते मूल्य श्रमशक्तीच्या मूल्यामधून पैशाच्या वेतनाच्या रूपाने कामगारवर्गाच्या हाती आलेले असते. या चक्रात भांडवलदारवर्गाने ज्या ज्या गोष्टी फस्त केलेल्या असतात त्याही पुन्हा निर्माण झालेल्या असतात व त्या त्या गोष्टी पुन्हा फस्त करण्यासाठी आवश्यक ते मूल्य वरकड-मूल्यातून पैशाच्या (नफ्याच्या) रूपाने भांडवलदारांच्या हातात आलेले असते. चक्र संपतासंपताच ते सुरू होतानाची परिस्थिती पुनरुत्पादित झालेली असते. त्याच स्वरूपात व तितक्याच प्रमाणात; त्यामुळे पुन्हा तेच चक्र गिरवले जाणे शक्य झालेले असते. साधे पुनरुत्पादन झालेले असते, याचा अर्थ चक्र सुरू होतानाची परिस्थिती चक्राच्या स्वत:च्या ओघातच चक्र संपता संपता तयार झालेली असते.

. . . आणि कामगाराच्या कामगारपणाचेदेखील

पण या पुनरुत्पादनाचा दुसरा आणि सहजपणे न दिसणारा एक पैलू मार्क्सच्या दृष्टीने तितकाच महत्त्वाचा असतो. कामगाराजवळ ना श्रमसाधने असतात ना उपजीविकेची साधने. क्रयवस्तूंच्यावर आधारलेल्या समाजामध्ये उत्पादन साधनांपासून व उत्पादनापासून तोडला गेलेला गरजू माणूस म्हणून तो उभा असतो. त्यामुळे गरजा भागवण्याचा त्याला एकच मार्ग शिल्लक असतो. तो

आपली श्रमशक्ती विकून भांडवलदाराच्या ताब्यात देतो. चक्र सुरू होते. कामगारवर्ग भांडवलदारवर्गाच्या कारखान्यांच्या गेटच्या आत प्रवेश करतो. त्याचा श्रमसाधनाशी संबंध जुळतो. तो श्रमातून स्वत:ची उपजीविकेची साधने निर्माण करतो तसेच भांडवलदार ज्या गोष्टी फस्त करतात त्याही गोष्टी निर्माण करतो, उत्पादन करून श्रमसामग्रीचे जुने मूल्य उत्पादित वस्तूंमध्ये कायम ठेवतो. पण हे सर्व करताना तो भांडवलाचा एक घटक म्हणून काम करीत असतो. जोपर्यंत तो बदलते भांडवल म्हणून कार्यक्षम असतो तोपर्यंतच उत्पादनसाधनांशी आणि उत्पादनाशी त्याचा संबंध टिकतो.

चक्र संपते. कामगार वेतन घेऊन गेटाबाहेर येतो, स्वत:च्या ताब्यात येतो. आणि त्याचा उत्पादनसाधनांशी आणि उत्पादनाशी जो संबंध असतो तो तुटतो. त्याची श्रमशक्ती खर्च झालेली असते. तो भुकेला, थकलेला, निवाऱ्याची व विश्रांतीची गरज असलेला, घटकाभर करमणुकीकडे ओढ घेणारा एक गरजू माणूस म्हणून बाहेर पडतो. पुढच्या चक्रापुरती त्याची श्रमशक्ती पुन्हा उत्पन्न करण्याइतपत गरजा भागवण्यापुरतेच मूल्य वेतनाच्या रूपाने कामगारवर्गाच्या हातात आलेले असते. त्याने भांडवलदारांसाठी काम न करण्याचे ठरवलेच तर तो जेमतेम पुढच्या चक्रापर्यंत आपला देहधर्म सांभाळू शकतो. त्याचा गरजूपणा कायम असतो, उत्पादनसाधनांपासून आणि उत्पादनापासून तो पूर्वीसारखाच तोडलेला असतो. त्याला स्वत:ची श्रमशक्ती भांडवलदाराला विकून ताब्यात द्यायला भाग पाडणाऱ्या परिस्थितीचेही पुनरुत्पादन झालेले असते. ज्याप्रमाणे चक्राच्या सुरुवातीला उत्पादनाचे घटक ज्या ज्या जागी असतात ते आपापल्या जागी पुन्हा निर्माण झालेले असतात, त्याप्रमाणेच कामगारवर्गाच्या भांडवली शोषणाला आधारभूत परिस्थितीदेखील भांडवली उत्पादनाच्या चक्राने स्वत:च्या ओघात पुन्हा निर्माण केलेली असते.

भांडवली उत्पादन–भांडवली व्यवस्थेचा पाया

निरनिराळ्या भांडवली अर्थशास्त्रज्ञांच्या मते भांडवली संचयाच्या प्रवाहाचे मर्म वेगवेगळे असते. कुणाच्या मते निरनिराळ्या माणसांच्या एकमेकांशी टक्कर घेणाऱ्या इच्छाआकाक्षांचा एकत्र मेळ घालणारे ते संतुलन असते. कुणाच्या मते समाजातल्या उद्योजकतेला प्रोत्साहन देत देत हा भांडवल–संचय होतो ही गोष्ट महत्त्वाची असते. कुणाच्या मते उत्पन्न वाढीतून शक्य होणारे उंचावलेले जीवनमान, शास्त्रीय प्रगती या गोष्टी महत्त्वाच्या असतात. कामगारवर्गाच्या दृष्टीने मात्र भांडवल संचयाचे मर्म हे असते की कामगारवर्गाच्या शोषणाला

आधारभूत परिस्थिती पुन्हा निर्माण होते. भांडवली उत्पादन हेच भांडवली शोषणाला आधारभूत परिस्थितीचे पुनरुत्पादन असते हे भांडवली अर्थव्यवस्थेचे मर्म होय.

हे मर्म समजले तर भांडवली उत्पादनाला मार्क्स भांडवली अर्थव्यवस्थेचा गाभा किंवा पाया का म्हणतो यातले मर्म समजू शकते. भांडवली उत्पादनामुळेच भांडवली अर्थव्यवस्था स्वत:च्या पायावर उभी राहू शकते, कारण पूर्ण होणारे प्रत्येक चक्र हे चक्र पुन्हा चालू होण्याची परिस्थिती स्वभावत:च निर्माण करीत असते. जोपर्यंत भांडवली उत्पादन उभे राहिलेले नसते तोपर्यंत सावकार-व्यापारी वर्गांना नफा जरी होत असला तरी तो नफा हा बिनभांडवली मार्गाने मिळालेल्या वरकड-श्रमांवर आधारलेला असतो. क्रयवस्तूंचा व्यवहार किती प्रमाणात स्वत:च्या पायावर उभा राहिला आहे याचे पैसा हे जसे लक्षण असते तसेच भांडवली व्यवहार किती प्रमाणात स्वत:च्या पायावर उभा राहिला आहे, याचे भांडवली उत्पादन हे लक्षण असते. आणि किमान लक्षणांपलीकडे जाऊन भांडवल-संचयाचे वाढते पुनरावर्तन सुरू झाले की भांडवलशाहीच्या या आक्रमक, फोफावत्या स्वरूपातून येणारे इतर परिणाम स्पष्ट होऊ लागतात.

१३. भांडवल-संचय: वरकड-मूल्याचे शोषक शक्तीत रूपांतर

केवळ पुनरुत्पादन होत राहणे हा काही भांडवलशाहीचा स्थायी भाव नव्हे किंवा मूळ प्रेरणाही नव्हे. तिचा स्थायी भाव आहे भांडवल-संचय. आधी हातात होते त्यापेक्षा जास्त भांडवल मिळवणे. पण हे जास्तीचे भांडवल येते कुठून? भांडवलदाराने भांडवल गुंतवून कामगारांकडून उत्पादन करून घेतले की निर्माण झालेल्या क्रयवस्तू तो विकतो. त्यांचे मूल्य त्याच्या हातात पैशाच्या रूपात येते. पण या मूल्याचा एक भाग—खर्च झालेल्या श्रमसामग्रीचे व श्रमशक्तीचे मूल्य मिळून बनलेला भाग—पूर्वीचेच भांडवल दर्शवतो. उरतो तो भाग वरकड-मूल्याचा असतो. आता पूर्वीपेक्षा जास्त भांडवल गुंतवायचेच झाले तर हे जास्तीचे भांडवल वरकड-मूल्यामधून यावे लागते. भांडवल-संचय याचा अर्थ वरकड-मूल्याचे भांडवलात रूपांतर हाच असतो.

भांडवल-संचय आणि भांडवल-संचयाचा वेग हा किती वरकड-मूल्याचे भांडवलात रूपांतर झाले आहे ते दर्शवत असतो. तसे पाहता भांडवल-संचय किती, कसा करावा याबद्दलचा निर्णय प्रत्येक भांडवलदार वैयक्तिकरीत्या घेताना दिसतो. तो त्याच्या आर्थिक स्वातंत्र्याचा परिपाक असतो. आणि अशा सर्व स्वतंत्र निर्णयांची गोळाबेरीज मिळून एकंदर सामाजिक पातळीवर होणारा भांडवल-संचय ठरताना दिसतो. पण हे केवळ 'अर्धसत्य' असते. कारण

प्रत्यक्षात अनेक सामाजिक बंधनांच्या आणि मर्यादांच्या चौकटीतच हे 'स्वातंत्र्य' काम करत असते. भांडवल-संचयाच्या मर्यादा अगोदरच सामाजिक पातळीवर ठरलेल्या असतात, भांडवल-संचयाच्या शक्यतांची व्याप्ती निश्चित झालेली असते. आणि खरे तर सर्व वैयक्तिक भांडवलदारांच्या निर्णयांतून या सामाजिक शक्यता थोड्याफार कमीजास्त प्रमाणात प्रत्यक्षात आणणे यापलीकडे या 'स्वतंत्र' निर्णयांचे स्वातंत्र्य जात नाही. भांडवलदारवर्गाने मागील टप्प्यात केलेल्या एकूण शोषणाचा क्रम अगोदरच भांडवलसंचयाच्या मर्यादा निश्चित करत असतो.

भांडवल-संचयाची व्याप्ती ठरवणारा पहिला घटक असतो—त्याआधी भांडवलदाराच्या हातात जमा झालेले वरकड-मूल्य. वरकड-मूल्याच्या आडात जे नाही ते भांडवल-संचयाच्या पोहऱ्यात कुठून येणार? अगोदरच्या टप्प्यात भांडवलदारवर्गाने किती कामगारांचे शोषण केले—किती तासांची श्रमशक्ती उत्पादनाला जुंपली व तिचे किती शोषण केले—वरकड-मूल्याचा दर किती होता—यावरून एक निश्चित अशी कमालमर्यादा भांडवल संचयाच्या वेगाला पडते. भांडवलदारवर्ग यापुढे किती कामगारांचे किती शोषण करू शकेल हे त्याअगोदर त्याने किती कामगारांचे किती शोषण केलेले असते त्यावर अवलंबून असते. याचाही एक महत्त्वाचा अर्थ कामगारांच्या दृष्टीने असतो. जितक्या प्रमाणात कामगारांचे शोषण करण्याची क्षमता भांडवलशाही कमावते, तितक्या प्रमाणात वाढत्या प्रमाणावर कामगारांचे शोषण करण्याची क्षमता भांडवलशाहीच्या ठायी तयार होते.

१. भांडवलदारापुढची नवी शृंगापत्ती

कामगारांच्या शोषणामधून हातात आलेल्या या वरकड-मूल्यापैकी किती भागाचे भांडवलात रूपांतर करायचे हा प्रश्न आता भांडवलदारवर्गासमोर उभा राहतो आणि या प्रश्नाच्या उत्तरात शिरले की भांडवली विचारांची नाळ, आपण पैशाच्या प्रकरणापाशी मागे सोडलेल्या कंजूष माणसाच्या कात्रीशी जोडलेली आपल्याला दिसते!

भांडवलदारांच्या हातात पूर्वीच्या शोषणातून काढलेले वरकड-मूल्य हे उपभोगाची साधने उपलब्ध करून देणाऱ्या पैशाच्या रूपात असते. या वरकड-मूल्यापैकी काही भागांचे भांडवलात रूपांतर करायचे म्हणजे जणू काही तितक्या वरकड-मूल्यातून शक्य होणाऱ्या उपभोगाला मुकायचे अशी एक

कल्पना भांडवली विचारात असते. या भूमिकेनुसार भांडवल-संचयाचा निर्णय म्हणजे भांडवलदारांच्या दृष्टीने एक क्लेशदायक अनुभव म्हणून उभा राहतो! भांडवल संचय हा भांडवली विचारातला एक मोठा नाट्यमय प्रसंग असतो— भांडवली नायकाच्या समोर मोह घालणारी ऐषआरामाची साधने उभी असतात आणि त्यांचा अव्हेर करून कर्तव्यबुद्धीने आणि त्यागी वृत्तीने तो भांडवल संचयाचा निर्णय घेत असतो!

भांडवल-संचयाच्या या निर्णयामागे खरोखरीच किती ऐषआरामाचा त्याग असतो हे जगभरच्या भांडवलदारवर्गाच्या जीवनमानावर जरा जरी नजर टाकली तरी ताबडतोब उघडे पडते. किंवा त्यांच्या घरीदारी जरा डोकावले तर उघड पडते. सामाजिक पातळीवर भांडवलदारवर्गाच्या हातातल्या वरकड-मूल्यातून भांडवलसंचय होतो तो ऐषआरामाच्या प्रचलित पातळीला धक्का न लागताच होतो![१] इतकेच नव्हे तर भांडवल-संचयाबरोबर ही जीवनमानाची पातळी वाढतसुद्धा जाते. कारण जितक्या प्रमाणात भांडवल-संचय होतो तितक्याच प्रमाणात वरकड-मूल्यही वाढते व त्यातला प्रचलित प्रमाणात होणारा भांडवल-संचय वजा जाता ऐषआरामासाठी उपलब्ध होणारा भागदेखील वाढतो!

पण मग मगाचच्या नाट्याचे काय? त्याची सगळी भावनिक, नाट्यमय झालर कापून काढली तर केवळ एक रोखठोक वस्तुस्थिती शिल्लक राहते. यापूर्वी भांडवलदारवर्गाने किती कामगारांचे किती शोषण केले त्यामुळे त्यांना भांडवल संचयासाठी किती मूल्य उपलब्ध असेल याला एक अतिकमाल मर्यादा पडलेली असते. त्याचप्रमाणे भांडवलदारवर्गाने स्वत:साठी प्रस्थापित केलेली ऐषआरामाची पातळी हीदेखील भांडवल-संचयासाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या मूल्यावर मर्यादा घालत असते. बस्स इतकेच. त्यागी वृत्ती, ऐषआरामाचा अव्हेर वगैरे बाकी सर्व केवळ झालर असते.

‘धोक्यातून’ नफ्याचे समर्थन

अर्थात ही झालरही काही बिनमहत्त्वाची नाही. तिला दोन प्रकारची धार आहे. एका बाजूला त्यातून नफ्याचे समर्थन होते. कंजूष माणसाला भेडसावणाऱ्या पूर्वीच्या कात्रीशी त्याची नाळ जोडलेली आहे. पैशाच्या बाबतीत कंजूष माणसाची ‘धरले तर चावते, आणि सोडले तर पळते’ अशी अवस्था असते. पैसा साठवला तर त्याचा उपयोग करता येत नाही आणि उपयोग केला तर तो

संपतो! कंजूष माणूसदेखील सुखाचा आणि ऐषआरामाचा त्याग करत असतो, पण तो पैसा नुसताच साठवत असतो. याउलट भांडवलदारसुद्धा त्या पैशातून शक्य असणाऱ्या ऐषआरामाचा त्याग करतो, पण ते केवळ पैसा साठवून न ठेवता धंद्यात घालण्याचा धोका पत्करत असतो. अन् त्याला बक्षीस मिळत असते ते म्हणजे नफा. हातात आलेली, पैसा म्हणून येणारी सुरक्षितता त्यागून तो पैसा धंद्याच्या धकाधकीत भांडवल म्हणून 'धोक्यात' घालतो. म्हणून भांडवलदाराला नफ्याचा हक्क प्राप्त होतो असे समर्थन यात अभिप्रेत असते. भांडवली विचारांच्या दृष्टीने प्रत्येक भांडवली धंद्याचे स्वरूप जुगाराचेच असते. त्यात दिवाळे निघण्याचीही शक्यता असते! आता पद्धतशीरपणे कंपन्याचे दिवाळे काढून गबर होणारीही अनेक माणसे असतात. पण त्यांचे जाऊ द्या. ह्यात मुख्य भाग हा असतो की वैयक्तिक भांडवलदाराचे दिवाळे निघाले तरी भांडवलदारवर्ग म्हणून वर्गीय पातळीवर हा 'धोका' मुळीच नसतो!

एकतर भांडवलदार नीट पारखून जिथे नफ्याची जास्त शक्यता आहे अशाच ठिकाणी भांडवल गुंतवत असतात. मोठ्या मक्तेदारी उद्योगांबाबत तर हे जास्तच खरे आहे. मक्तेदारांचे भांडवल अनेक क्षेत्रांमध्ये आणि अनेक कारखान्यांमध्ये गुंतलेले असते. त्यामुळे मंदीच्या लाटेनंतरही एकंदर औद्योगिक भांडवलापैकी अगदी थोडेच भांडवल खऱ्या अर्थाने धोक्यात आलेले सापडते.

आणि धोक्याचाच विचार करायचा झाला तर कामगारांनी पत्करलेल्या धोक्यावरही नजर टाकायला पाहिजे. जगभर कामावरील अपघातामध्ये दर पाच मिनिटाला एक कामगार ठार होतो. निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगांमध्ये कामगारांचे आरोग्य व आयुष्य कणाकणाने झिजवणारी औद्योगिक प्रक्रिया चालत असते. कामाचे तास, कामवाढ यातून कामगारांचे आयुष्य खच्ची होत असते. अपुऱ्या, कोंदट, आरोग्याला अपायकारक अशा जागांमध्ये बहुसंख्य कामगारांना रहावे लागत असते. ही यादी वाढवावी तितकी थोडीच आहे. थोडक्यात म्हणजे कामगार होणे म्हणजेच जगण्यामरण्याचा, निकृष्ट जीवनाचा, खालावलेल्या आयुर्मर्यादेचा, व्यावसायिक रोगांचा धोका पत्करणे असते.

'धोक्याचे' भांडवली माप

पण भांडवली विचारांच्या दृष्टीने याला महत्त्व नसते. 'धोका' या शब्दाची व्याप्तीच त्याच्या दृष्टीने क्रयवस्तूंच्या भाषेपुरती मर्यादित असते. आयुष्य पणाला लावणे, व्यावसायिक रोगांचा धोका पत्करणे वगैरेशी त्याचे काही

सोयरसुतक नसते. त्यांचा सवाल असतो—तुम्ही मूल्य पणाला लावलेत का? आणि किती लावलेत? या आधारावर कामगारांनी पत्करलेल्या धोक्याचीही 'भरपाई' करायची प्रगत भांडवलशाहीची तयारी असते. एखादा कामगार कामावर अपघातात ठार झाला तर त्याने पणाला लावलेल्या श्रमशक्तीच्या मूल्याची दहापाच हजार रुपये भरपाई भांडवलदार देतोच की नाही? इतकेच नव्हे. शरीराच्या कुठल्याही अवयवाला इजा झाल्यामुळे किती मूल्याचे नुकसान झाले याचे हिशेब करून भरपाई देण्याची सोय करणारा कायदाच कामगारांनी भांडवलदारांना करायला भाग पाडले ना? आता अर्थात कामगाराला हा अपघात त्यांच्या चुकीमुळे किंवा हलगर्जीपणामुळे झाला नाही आणि फक्त कामावरच्या परिस्थितीमधून उद्‌भवणाऱ्या धोक्यातून झाला हे सिद्ध करावे लागते. पण कामगारांनी केवळ धोका पत्करल्यामुळे, त्यांची चूक नसताना, त्यांनी पणाला लावलेल्या मूल्याची भरपाई भांडवलदारवर्ग मान्य करतोच की नाही?

खरेच आहे. एकदा मूल्याची भाषा मान्य केली की कामगारांच्या हक्काची मर्यादा त्या भाषेनेच मर्यादित होते! त्यांच्या हक्कावरच्या मर्यादा कॉम्पेन्सेशन ॲक्ट, प्रॉव्हिडंड फंड, हाउसिंग अलाउन्स, इ. एस्. आय्. एस्. यांमध्येच ठरून जातात. मात्र ही मूल्याची बैठक आधारभूत मानण्याचे तत्त्व भांडवलदाराला मात्र वेगळीच 'भरपाई' देण्याचे मान्य करते. त्याने जिवाचा धोका पत्करलेला नसतो, ना रोगट वातावरणाचा, ना कामावरच्या अपघाताचा, ना उपासमारीचा. पण त्याने गडगंज मूल्यावरची त्याची मालकी पणाला लावलेली असते, आणि साहजिकच अगदी लोकशाही पद्धतीने ज्याप्रमाणे कामगारांना मूल्याच्या धोक्याच्या आधारे भरपाई (कॉम्पेन्सेशन) देण्याचे भांडवलशाही मान्य करते त्याप्रमाणे, लोकशाही पद्धतीनेच, नफ्याच्या रूपात भरपाई मिळावी हे देखील उदार मनाने मान्य करते. नफा हे भांडवल-संचयाचे बक्षीस असते. या भांडवली विचारप्रवाहामध्ये भांडवलदारवर्गाला महत्त्व असते ते केवळ भांडवल-संचय करणारे एक माध्यम म्हणून; आणि नफा हे भांडवल-संचय घडवून आणणारे एक उत्तेजन (इन्सेंटिव्ह) ठरते! कारण हे बक्षीस मिळणार नसेल तर कोणता भांडवलदार भांडवल-संचयाचे ऐतिहासिक कार्य पार पाडील? हाती आलेला पैसा भांडवलीपूर्व शोषकवर्गांप्रमाणे तो उधळून टाकील. भांडवली विचारामध्ये भांडवल-संचय हे भांडवलशाहीचे प्रमुख लक्षण म्हणून ओळखलेले असते. नफ्याच्या स्वरूपात उत्पन्न मिळणे हे

त्यांच्या दृष्टीने अंतिमत: महत्त्वाचे नसते तर या मिळालेल्या नफ्यातून पुनर्गुंतवणूक किती होते, भांडवल-संचय किती होतो याचा त्यांना ध्यास लागलेला असतो. त्यांचे संपूर्ण आर्थिक धोरण त्याभोवती फिरत असते. आणि त्यातूनच भांडवल-संचयाचे धोकादायक काम अंगावर घेण्याचे बक्षीस म्हणून नफ्याचे समर्थन जन्मते.

२. उत्पादनवाढ आणि भांडवल-संचय

मूलभूत काय? उत्पादनवाढ की भांडवल-संचय?

शोषणातून पूर्वी जमा झालेले वरकड-मूल्य, वजा प्रचलित ऐषआराम कायम ठेवण्यासाठी लागणारे मूल्य, या बंधनापलीकडे तरी भांडवलदारवर्गांच्या निर्णयांचे स्वातंत्र्याचे क्षेत्र सुरू होते का? नाही, अजूनही ही बंधने संपलेली नसतात. समजा भांडवलदारवर्गाने २ लाख श्रमतास वरकडमूल्य भांडवल-संचयासाठी वेगळे केले व तो त्याचे भांडवलात रूपांतर करायला निघाला. भांडवलात रूपांतर करायचे म्हणजे काय? तर त्यातून श्रमसामग्री व श्रमशक्ती विकत घ्यायची. किती सोपे! पण त्यासाठी तितकी जास्ती श्रमसामग्री व श्रमशक्ती समाजात अगोदर उपलब्ध पाहिजे. पूर्वीइतकीच श्रमसामग्री जर उपलब्ध असेल तर हातात भांडवल-संचयासाठी जादा मूल्य असून त्याचा काडीचाही उपयोग नसतो. उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाची पूर्वअट असते. यामुळे झालेली उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाच्या शक्यतेवर आणखी एक मर्यादा घालत असते. भांडवल-संचय व्हायचा तर केवळ वाढते वरकड-मूल्य मिळून त्यातून जास्त वरकड-मूल्य भांडवलसंचयासाठी उपलब्ध होणे पुरेसे नसते, त्याशिवाय उत्पादनवाढ ही व्हावी लागते.

आणि म्हणूनच भांडवली अर्थशास्त्रज्ञांची नेहमी उत्पादनवाढीची हाकाटी चालू असते. कामगारांचा उत्पादनवाढीसाठी पिच्छा पुरवला जात असतो. कारण भांडवली स्वरूपातील उत्पादनवाढ ही भांडवल-संचय घेऊन येत असते; तिचा अर्थ असतो भांडवल-संचयाची बैठक घातली जाणे. पण इथेही भांडवली अर्थशास्त्रामध्ये भांडवल-संचय आणि उत्पादनवाढ यांच्यातील कार्यकारणभावाला एक उलटी कलाटणी अनेकदा दिलेली असते, उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाची पूर्व अट असते की भांडवल-संचय ही उत्पादनवाढीची पूर्वअट असते? यावर आपले म्हणणे स्पष्ट आहे. उत्पादनवाढ ही भांडवल-

संचयाची पूर्वअट असते. पण त्याचबरोबर बहुतेकदा भांडवल-संचयाचा परिणाम म्हणूनदेखील उत्पादनवाढ होते.

मार्क्सच्या दृष्टीने मूल्यसंबंधांचा विचार केला असता, भांडवल-संचयामध्ये अभिप्रेत असलेले भांडवल हे सरळसरळ उत्पादक श्रमांमार्फत गुंतवले गेलेले भांडवल असते.[२] तसे असेल तर उत्पादनवाढ आणि भांडवल-संचय ही एकाच प्रक्रियेची दोन अंगे ठरतात. उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाची पूर्वअट तर ठरतेच पण त्याबरोबरच ती भांडवल-संचयाचा आवश्यक परिणामदेखील ठरते. याउलट भांडवली अर्थशास्त्राच्या विचारव्यूहात अभिप्रेत असते ती भांडवल-संचयाची उथळ कल्पना. ही कल्पना उत्पादक श्रमांमार्फत गुंतलेल्या भांडवलापुरती मर्यादित नाही. अनुत्पादक श्रमांमार्फत खर्च होणारी श्रमसामग्री व गुंतणारे भांडवल हेदेखील या संकल्पनेनुसार भांडवलसंचयाचाच भाग आहे आणि ही भांडवली संकल्पना लक्षात घेतली तर भांडवलसंचय आणि उत्पादनवाढ यांच्यातील संबंध बदलतो. उत्पादक श्रमांमार्फत असो किंवा अनुत्पादक श्रमांमार्फत असो, भांडवल-संचयासाठी उत्पादनवाढ ही आवश्यक पूर्वअट राहतेच, पण उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाचा आवश्यक परिणाम राहत नाही. जर भांडवल-संचय उत्पादक श्रमांमार्फत झाला तरच भांडवल-संचयाचा परिणाम उत्पादनवाढीत होतो.

मार्क्सच्या काळात या अनुत्पादक श्रमांमार्फत गुंतणारे व खर्च होणारे भांडवलाचे महत्त्व आजच्यापेक्षा बरेच कमी होते. त्यामुळे त्याच्या समकालीन भांडवली अर्थशास्त्रज्ञांचा भांडवली व्यवस्थेसंबंधीचा धोशा सरळसरळपणे भांडवलसंचय हा होता. धर्मामध्ये देवाने दिलेल्या 'साक्षात्कारी' आदेशाला जसे स्थान होते तसे भांडवली विचारामध्ये भांडवल-संचयाला सरळसरळ स्थान होते. अजूनही ते स्थान नाहीसे झालेले नाही. पण अनुत्पादक श्रमांच्या आणि खर्चाच्या वाढलेल्या महत्त्वामुळे हल्ली भांडवल-संचयाच्या पूर्वअटींना उदारणार्थ राष्ट्रीय उत्पादनातील वाढीला म्हणजे उत्पादनवाढीला, जास्त महत्त्व आलेले आहे.

उत्पादनवाढ ही भांडवल-संचयाची एक आवश्यक पूर्वअट असते खरी, पण ही उत्पादनवाढ कोणत्याही उत्पादनक्षेत्रात कशीही होऊन चालत नाही. आणि तिच्या दृश्य स्वरूपातील गरजेपेक्षाही ती जास्त प्रमाणात व्हावी लागते. उदाहरणार्थ, असे धरून चालूया की रेशमी कापड बनवणाऱ्या क्षेत्रामध्ये १० टक्के भांडवल-संचय व्हायला पाहिजे आहे. साहजिकच श्रमसामग्रीच्या (रेशीम,

यंत्रे इत्यादीच्या) उत्पादनात १० टक्क्यांनी व श्रमशक्तीच्या उपलब्धतेमध्येही १० टक्क्यांनी वाढ व्हायला पाहिजे हे स्पष्ट आहे. पण या दहा टक्के वाढीनेच फक्त भागत नाही. याचे कारण ह्या श्रमसामग्रीच्या उत्पादनात दहा टक्क्यांनी वाढ व्हायची तर ती बनवण्यासाठी लागणाऱ्या श्रमसामग्रीच्या उत्पादनात व श्रमशक्तीच्या उपलब्धतेमध्ये तितकी वाढ व्हावी लागते. तसेच या सर्व श्रमशक्तीच्या मूल्याइतके गरजेच्या वस्तूचे उत्पादन वाढावे लागते. पुन्हा त्यासाठी लागणाऱ्या श्रमसामग्रीचे व त्याहीसाठी लागणाऱ्या श्रमसामग्रीचे . . . इत्यादी इत्यादी! अमुक एका क्षेत्रात अमुक इतका भांडवल-संचय व्हायचा तर पूर्वअट बनणाऱ्या उत्पादनवाढीसाठी निरनिराळ्या उत्पादनक्षेत्रांमध्ये निरनिराळी वाढ होणे आवश्यक असते! भांडवल-संचयासाठी आवश्यक अशा उत्पादनवाढीच्या स्वरूपावर व व्याप्तीवर त्यामुळे बंधने पडतात. ही उत्पादनवाढ या विशिष्ट क्षेत्रातील भांडवल-संचयाशी निगडीत अशा क्षेत्रांमध्ये व सुसंगत तेवढ्या व्याप्तीने व्हावी लागते आणि तसे नसेल तर प्रत्यक्षात झालेली उत्पादनवाढ आपल्या मुशीत बसेल इतपत व अशा पद्धतीच्या भांडवल-संचयाला जन्म देते!

३. वेतनावरील हल्ल्याचे खास महत्त्व

भांडवल-संचय सुलभ करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग वारंवार भांडवलशाहीमध्ये वापरला जातो. आतापर्यंत आपण त्याचा उल्लेख केला नव्हता कारण तो श्रमशक्तीचा मोबदला तिच्या मूल्यावरून ठरणाऱ्या किंमतीपेक्षा कमी करण्यावर अवलंबून असतो. आणि इथपर्यंत सर्व व्यवहार मूल्यनिर्मित किंमतीलाच चाललेला आहे असे आपण धरून चाललो होतो. भांडवल-संचयाच्या संदर्भात, श्रमशक्तीचा मोबदला (वेतन) मूल्यनिर्मित किमतीच्या खाली ढकलण्याच्या या मार्गाला पुन्हा एक वेगळे महत्त्व प्राप्त होते. याचाही सरळ दुहेरी परिणाम असतो. पहिला, वरकड-मूल्य वाढण्याचा परिणाम याबाबत जास्त महत्त्वाचा असतो. वरकड-मूल्य वाढण्याच्या इतर मार्गांपेक्षा या मार्गाचे स्वत:चे एक खास वैशिष्ट्य असते. निव्वळ वरकड-मूल्यामध्ये कामगारांचे वेतन कायम ठेवून त्यांचे कामाचे तास वाढवले तरी त्या वाढीव कामासाठी वाढीव श्रमसामग्री उपलब्ध करणे व वाढीव भांडवल गुंतवणे आवश्यक असते. भांडवल-संचय सुलभ होण्यासाठी अगोदर काहीएक भांडवल-संचय होणे हे त्यासाठी महत्त्वाचे असते. तीच गोष्ट सापेक्ष वरकड-मूल्यासाठीही खरी असते.

याउलट कामागारांच्या वेतनावरील हल्ल्यामधून जमा होणारे वरकड-मूल्य काढण्यासाठी कोणत्याही प्रकारची वाढीव गुंतवणूक आवश्यक नसते. वेतनावरील हल्ल्याच्या या वैशिष्ट्याचे महत्त्वाचे आणि दूरगामी परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे.

वरवर पाहता, हे वैशिष्ट्य नजरेआड करून, निव्वळ आणि सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीमधून येणाऱ्या वरकड-मूल्याच्या वाढीसमोर ही वाढ नगण्य वाटू शकते. हे वैशिष्ट्य मान्य केल्यावर मात्र वेतनावरील हल्ला हे एक महत्त्वाचे भांडवल-संचयाचे माध्यम बनते. आणि भांडवलशाहीच्या विकासाबरोबर याही छुप्या आणि उघड मार्गांचा विकास होत जातो. जीवनावश्यक वस्तूंचा वाढता निर्देशांक पैशाच्या रूपात ठरलेल्या वेतनावर छुपा हल्लाच करीत असतो. आणि त्यामुळे 'वाजवी' चलनफुगवटा हा आजकालच्या भांडवली अर्थशास्त्राच्या दृष्टीने 'प्रगतीचा' एक अविभाज्य भागच बनलेला असतो! अर्थात याविरुद्धही कामगार लढतात आणि महागाई निर्देशांकाला जोडून महागाईभत्ता मान्य करून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनही मार्ग असतो. महागाईभत्ता हा शंभर टक्के भरपाईवर कधीच आकारला जात नाही, आणि ताबडतोबीने वाढतही नाही. मूल्य निर्णित वेतनापर्यंत पोचायच्या शर्यतीमध्ये कामगार नेहमीच शर्यतीच्या अंतिम रेषेच्या मागे राहतील हे पाहिले जात असते. मधल्यामध्ये भांडवल-संचयाला मात्र टेकू मिळत असतो! वेतनाचा एखादा भाग देण्याचे लांबणीवर टाकणे हेदेखील त्याच पद्धतीने महत्त्वाचे ठरते. आणि त्यामुळे अशा पद्धतीने वेतनाचा भाग लांबवणे हेही भांडवलदारवर्गाला पथ्याचेच असते. कामगारांच्या दृष्टीने त्यांची श्रमशक्ती निकामी होईपर्यंतच्या काळात पुढच्या निवृत्तीच्या काळातील भविष्याची सोय करणे महत्त्वाचे वाटत असतेच—त्यांच्या या रास्त इच्छेचा उपयोग स्वत:साठी करून घेणे हे एक महत्त्वाचे भांडवल-संचयाचे साधन बनले आहे. कामगार स्वत:च्याच वेतनातून स्वत:चीच सोय करत असतात. पण मोठ्या उदारपणे ही सोय भांडवलदार मान्य करून त्यांच्या वेतनातून ग्रॅच्युइटी, प्रॉव्हिडंट फंड, विमाहप्ते इत्यादी कापून घेतात व कालांतराने तो भाग कामगारांना परत मिळतो. मधल्यामध्ये, सरकारी माध्यमातून असो किंवा खाजगी माध्यमातून असो, त्याचा उपयोग काहीही वाढीव गुंतवणूक केल्याशिवायच भांडवलदारवर्गाला भांडवलसंचयासाठी तात्पुरते मूल्य उपलब्ध करून देण्यासाठी झालेला असतो. अर्थात त्याच्यावर व्याजही मोठ्या मनाने दिले जाते. का देऊ नये? भांडवलसंचयाच्या इतर

मार्गांमध्ये करावी लागणारी वाढीव गुंतवणूक १८-२० टक्के दराने कर्जे घेऊन करावी लागते, त्याऐवजी जर ८-१० टक्के व्याजावर कामगार समाधान पावत असतील तर तितके मोठे मन करायला नको? थोडक्यात, कामगारांच्या वेतनाचा भाग या ना त्या प्रकारे भांडवल-संचयासाठी बांधणे, तात्पुरत्या वरकड-मूल्याच्या रूपात त्याचे अर्थभांडवलात रूपांतर करणे, ही एक महत्त्वाची प्रवृत्ती बनते.

हे सर्व छुपे मार्ग झाले. पण जेव्हा भांडवल-संचयाच्या गतीला खीळ बसते आणि भांडवल-संचयाचे नेहमीचे मार्ग कमी होऊ लागतात तेव्हा मात्र या मार्गाचे महत्त्व उघडपणे समोर येते. अशा छुप्या मार्गांनी भांडवल-संचयाला दिलेला टेकू पुरेनासा होतो. भांडवल-संचयाच्या गाडीला खीळ बसणे म्हणजेच भांडवली अरिष्टाची परिस्थिती आणि ती निर्माण होते तेव्हा कामगारांच्या वेतनावर सरळ चौफेर हल्ला चढवला जातो. वेतन गोठवणुकीपासून ते सरळसरळ वेतन कपातीपर्यंत सर्व मार्ग अवलंबले जाऊ लागतात. अरिष्टातून भांडवलशाही बाहेर पडते ती कामगारांना पायाखाली दडपूनच.

४. भांडवल-संचयाचे उफराटे मार्ग

या 'अपवादात्मक' परिस्थितीमध्ये (हा कितपत अपवाद आहे ते आपण पुढील प्रकरणामध्ये पाहणार अहोच) जे उघड होते ते मात्र भांडवल-संचयाच्या मूलभूत प्रक्रियेमध्येच अंतर्भूत असते. कारण कामगारवर्गाच्या दृष्टीने भांडवलसंचयाचा अर्थ वेगळा असतो. आपण मागे पाहिले आहे की केवळ पुनरुत्पादन म्हणजे कामगारांच्या कामगारपणाचे आणि त्यांच्या बांधिलपणाचेही तितकेच अपरिहार्य पुनरुत्पादन. भांडवल-संचयामध्येही हे पुनरुत्पादन अंतर्भूत असतेच, पण त्याही पुढचे काही असते. केवळ पुनरुत्पादनामध्ये कामगारांकडून करून घेतलेल्या वरकड-श्रमांच्या रूपातले वरकड-मूल्य भांडवलदारवर्गाच्या हातात पडते व उपभोगामध्ये खर्च होऊन संपते. याउलट भांडवल-संचय होताना हे वरकड-श्रमदेखील आता भांडवलाचे रूप घेऊन त्यांच्यासमोर उभे ठाकतात आणि त्यांच्याकडून पुन्हा वरकड-श्रमांच्या पिळवणुकीचा अधिकार कमावतात. वरकड-मूल्य हे केवळ शोषणाचे फळ राहत नाही तर आता वाढत्या शोषणाचे साधन बनते.

साध्या पुनरुत्पादनामध्ये कामगार त्यांनी घातलेल्या वरकड-श्रमापासूनच फक्त तोडले जात असतात, त्या श्रमांचा आणि त्यातून निर्माण झालेल्या उत्पादनाचा

ते उपभोग घेऊ शकत नाहीत. भांडवल-संचयाबरोबर ते त्या वरकड-श्रमापासून तोडले तर जातातच, पण आता तेच वरकड-श्रम भांडवलदाराच्या मार्फत भांडवल म्हणून त्यांच्यावर सत्ता गाजवणारी एक शोषक शक्ती म्हणून परततात. त्यांचीच सर्जकता, त्यांचेच श्रम, त्यांचीच शक्ती ही भांडवलशाहीमध्ये त्यांच्यापासून अलग केली जाऊन त्यांच्यावर शोषक सत्ता गाजवणारी शक्ती बनण्याचा क्रम भांडवल-संचयाने पूर्ण होतो. भांडवल-संचयामुळे जितक्या प्रमाणात कामगारांची उत्पादन शक्ती आणि सर्जकता वाढते तितक्या प्रमाणात त्यांच्यावर शोषक सत्ता गाजवणारी शक्ती वाढते, बलदंड होते. कामगारांच्या दृष्टीने, हा विपरित परिणाम हाच मुळी भांडवलशाही भांडवलसंचयाचे विदारक मर्म असतो. भांडवल-संचयाच्या या पूर्वअटी व हा मौलिक अर्थ लक्षात ठेवून आपल्याला भांडवल-संचयाचे परिणाम तपशिलामध्ये तपासायचे आहेत.

---

[१] एक खाजगी व्यक्ती या नात्याने असणारे भांडवलदाराचे स्थान व जबाबदाऱ्या आणि भांडवलाचा प्रतिनिधी म्हणून त्याचे स्थान व जबाबदाऱ्या यांची फारकत कायदेशीररीत्या शक्य झाली व भांडवलाचा प्रतिनिधी म्हणून त्याच्या स्थानाची झळ त्याला खाजगी व्यक्ती या नात्याने पोचणार नाही असे कायदेशीर संरक्षण मिळाले तर हे आणखी सोपे जाते. मर्यादित जबाबदारीची (लिमिटेड लायबिलिटी) कायदेशीर सोय नेमके हेच करते. पुरेशा मोठ्या भांडवलदारांसाठी!

[२] उत्पादक आणि अनुत्पादक श्रमांच्या वादग्रस्त प्रश्नाच्या तपशीलात आपण इथे शिरणार नाही. कारण त्याचा विचार आपण पुढे करणार आहोत. (पहा प्रकरण १९ व १९.१) भांडवली उत्पादन प्रक्रियेत क्रयवस्तूंची निर्मिती होत असताना तिच्या भौतिक उपयोग-मूल्याच्या निर्मितीमध्ये काही स्थान नसलेले सर्व श्रम हे अनुत्पादक खर्चामध्ये मोडतात. सध्या फक्त एक भावण्याजोगे उदाहरण घेऊ. उदाहरणार्थ पोलाद तयार करणाऱ्या कारखान्यात कामगारांनी झोतभट्टीवर करताना घातलेले श्रम हे उत्पादक श्रमांमध्ये मोडतात. पण या कारखान्याभोवती कुंपण घालणे, सुरक्षा दलाने दर पाळीला कामगारांचे खिसे तपासण्यामागे खर्च केलेले श्रम इत्यादी अनुत्पादक श्रमांमध्ये मोडतात कारण त्यांचा पोलादाच्या उपयोग-मूल्याच्या निर्मितीशी काडीचाही संबंध नसतो.

१४. उत्पादनशक्तीचे भांडवली रूप : भांडवलाचे आंगिक प्रमाण

भांडवल-संचयाचा कामगारांच्या जीवनावर काय परिणाम होतो हे ठरवण्यात भांडवलाची कायम भांडवल व बदलते भांडवल ही विभागणी सर्वांत महत्त्वाची असते. तुम्हाला आठवत असेलच की कामगारवर्गाच्या शोषणाचे स्वरूप उघड करताना ही विभागणी मार्क्सच्या विवेचनाचा सर्वांत महत्त्वाचा आधार होती. तीच विभागणी भांडवल-संचयाची अव्याहत प्रक्रिया तपासताना महत्त्वाची ठरते. भांडवल-संचयामुळे आता जे नवे भांडवल खर्च होणार त्यापैकी बदलत्या भांडवलाच्या रूपात खर्च होईल तेवढा भाग कामगारांच्या हातात श्रमशक्तीचे मूल्य म्हणून पडणार असतो. तेवढ्या श्रमशक्तीइतका कामगारांचा रोजगार वाढणार असतो. भांडवल-संचयाचा कामगारांच्या जीवनावर काय परिणाम होतो हे ठरवण्यामध्ये भांडवलाच्या या विभागणीची भूमिका सर्वांत महत्त्वाची असते.

१. भांडवलाची तांत्रिक जुळणी व आंगिक प्रमाण

ही विभागणी मार्क्स एका महत्त्वाच्या संकल्पनेद्वारा मांडतो. खर्च झालेल्या एकूण भांडवलापैकी कायम भांडवलाच्या मूल्याचे, बदलत्या भांडवलाच्या मूल्याशी असणारे प्रमाण याला मार्क्स भांडवलाचे आंगिक प्रमाण (ऑरगॅनिक कॉम्पोझिशन ऑफ कॅपिटल) हे नाव देतो. पण ही संकल्पना म्हणजे कोणत्याही प्रकारच्या श्रमसामग्रीच्या खर्चाचे कोणत्याही प्रकारच्या

श्रमशक्तीच्या खर्चाशी असलेले प्रमाण नाही. ते श्रमप्रक्रियेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या श्रमसामग्री व श्रमशक्ती यांच्या संबंधांचेच मूल्याच्या रूपात व्यक्त होणारे प्रमाण आहे. इथेही मार्क्सचा आरंभबिंदू श्रमप्रक्रिया हा असतो.

निश्चितपणे घडत असते ती मूर्त स्वरूपातील श्रमप्रक्रिया. उदाहरणार्थ लोखंडाच्या उत्पादनासाठी प्रचलित तंत्राच्या आधारावर एक श्रमप्रक्रिया उभी राहते. अमुक इतके लोखंडाचे खनिज, अमुक इतकी ऊर्जा, अमुक इतक्या क्षमतेची झोतभट्टी, अमुक इतक्या क्षमतेची लोखंडाच्या रसापासून सळ्या बनवणारी रोलिंग मिल आणि अमुक इतक्या तासांची श्रमशक्ती, या निरनिराळ्या घटकांमध्ये एक नियत मूर्त संबंध तयार होतो. या विविध प्रकारच्या निश्चित घटकांची एक नियत जुळणी यात अंतर्भूत असते. या मूर्त जुळणीला मार्क्स नाव देतो—भांडवलाची तांत्रिक जुळणी (टेक्निकल कॉम्पोझिशन ऑफ कॅपिटल).

भांडवलशाहीत हीच मूर्त श्रमप्रक्रिया वरकड-मूल्याच्या निर्मितीचे रूप घेत असते. या प्रक्रियेच्या संदर्भात या घटकांची मूर्त वैशिष्ट्ये महत्त्वाची नसतात, तर मूल्य निर्मितीशी संबंधित वैशिष्ट्ये महत्त्वाची असतात; म्हणूनच कायम भांडवल व बदलते भांडवल ही विभागणी महत्त्वाची असते. श्रमसामग्रीचे इतर घटक व श्रमशक्तीचा वापर यांच्यातील परस्पर-प्रमाण तांत्रिक जुळणीवरून ठरत असते. मूल्याच्या भाषेत, श्रमशक्तीखेरीज खर्ची पडलेल्या बाकीच्या सर्व घटकांच्या मूल्याची बेरीज म्हणजे कायम भांडवल दर्शवते. या सर्व निष्क्रिय असलेल्या घटकांपेक्षा वेगळा असा कर्त्याकरवित्या श्रमशक्तीचा खर्च असतो; वापरल्या जाणाऱ्या श्रमशक्तीचे मूल्य बदलते भांडवल दर्शवते. तांत्रिक जुळणीचे मूल्याच्या रूपात व्यक्त होणारे रूप म्हणजे कायम भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी असणारे प्रमाण. त्याला मार्क्स भांडवलाचे आंगिक प्रमाण म्हणतो.

> उदाहरणार्थ, असे समजू की १ किलो लोखंडी खिळे बनवण्यासाठी १.१ किलो लोखंड, १ लाख किलो खिळे बनवण्याची एकूण क्षमता असलेल्या एखाद्या यंत्राची लक्षांश क्षमता, आणि २ तासांची श्रमशक्ती लागते. तर १.१ किलो लोखंड, १ लाख किलो खिळे बनवण्याची क्षमता असलेले यंत्र व त्याची १ लक्षांश क्षमता आणि २ तासांची श्रमशक्ती ही मूर्त स्वरूपातील तांत्रिक जुळणी होते. मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेच्या संदर्भात ही प्रक्रिया व्यक्त होते ती एका बाजूला ज्याचे मूल्य श्रमांमार्फत जतन केले जाते अशा कायम भांडवलाच्या आकड्यात व दुसऱ्या बाजूने वाढीव, बदललेल्या मूल्याला जबाबदार असलेल्या बदलत्या

भांडवलाच्या आकड्यात. जर लोखंडाचे मूल्य किलोमागे १० श्रमतास, यंत्राचे १ लाख श्रमतास असेल व श्रमशक्तीचे मूल्य जर श्रमतासामागे अर्धा श्रमतास असेल तर वरील तांत्रिक जुळणी ही (१.१ × १०)+(१ लाख/१ लाख)=१२ श्रमतास कायम भांडवल व २ × ०.५ =१ श्रमतास बदलते भांडवल अशी १२:१ या आंगिक प्रमाणात व्यक्त होईल.

२. आंगिक प्रमाण व कामगारांचे वेतन

आंगिक प्रमाण कायम राहणे कामगारांना अनुकूल

भांडवलसंचयाच्या फेऱ्यामध्ये ज्या वरकड-मूल्याचे भांडवलात रूपांतर होते त्यापैकी किती भाग हा कामगारांच्या हातात वेतनाच्या रूपाने पडतो, त्यातून किती रोजगार वाढतो, व त्यामुळे उत्पादनातल्या क्रयवस्तू किती प्रमाणात कामगारवर्गाला उपलब्ध होतात या सर्वांचा भांडवलाच्या आंगिक प्रमाणाशी जवळचा संबंध असतो. त्याबाबत एक गोष्ट अगदी सहज व स्पष्टपणे दिसू शकते. कामगारवर्गाच्या दृष्टीने आंगिक प्रमाण कायम राहणे हे आंगिक प्रमाण वाढण्यापेक्षा फायद्याचे असते. याचे कारण की तितक्याच वरकड-मूल्याचे नव्या भांडवलात रूपांतर होताना, कामगारवर्गाच्या हातात पडणाऱ्या मूल्यात आणि श्रमशक्तीला असणाऱ्या मागणीमध्ये त्यामुळे तुलनेने जास्त वाढ होते.

उदाहरणार्थ आंगिक प्रमाण हे जर ३:१ असेल तर १०० श्रमतास वरकड मूल्याचे रूपांतर नव्या भांडवलात होऊन ते खर्ची पडताना ७५ श्रमतास कायम भांडवल व २५ श्रमतास मूल्य येते. वरकड-मूल्याचा दर १०० टक्के असेल तर त्यांच्या श्रमशक्तीला असणारी मागणी ५० श्रमतास एवढ्या श्रमशक्तीने वाढते. याउलट जर आता आंगिक प्रमाण वाढून ४:१ झाले तर नव्या खर्ची पडलेल्या १०० श्रमतास भांडवलाची विभागणी ८० श्रमतास कायम भांडवल, २० श्रमतास बदलते भांडवल अशी होते. कामगाराच्या हातात येणारे मूल्य पूर्वीच्या तुलनेत ५ श्रमतासांनी कमी होते, त्यांच्या श्रमशक्तीची मागणी १० श्रमतासांनी कमी होते.

थोडक्यात आंगिक प्रमाण कायम राहून भांडवल-संचय होत असेल तर ते कामगारांना तुलनेने जास्त अनुकूल असते. आणि म्हणून आपण आंगिक प्रमाणाबद्दलची तपशीलवार चर्चा दोन टप्प्यात करणार अहोत. प्रथम कामगारांना स्पष्टपणे अनुकूल परिस्थितीमध्ये कुठपर्यंत मजल गाठता येते त्याची चर्चा करू. ही मजल स्पष्ट केल्यानंतर, भांडवलशाहीमध्ये ही अनुकूल परिस्थिती अपवादात्मक असते की सर्वसामान्यपणे आढळते याची चर्चा करून

मगच पुढच्या प्रकरणामध्ये भांडवल-संचयाच्या सर्वसामान्य परिस्थितीमध्ये कामगारांवर काय परिणाम होतात त्याच्याकडे वळू.

अनुकूल परिस्थितीची सुवर्णसंधी?

आंगिक प्रमाण कायम राहून भांडवल-संचयाचे फेरे पडत राहिले तर ज्या वेगाने भांडवलात वाढ होत जाते त्याच वेगाने बदलते भांडवलही वाढत जाते. एकीकडे कामगारवर्गाच्या पदरी पडणारे एकंदर मूल्य भांडवलातल्या वाढीच्या प्रमाणात वाढत जाते, व दुसरीकडे भांडवलात ज्या वेगाने वाढ होते त्याच वेगाने कामगारांच्या श्रमशक्तीला असलेली मागणीदेखील वाढत जाते. आणि मागणी-पुरवठ्याच्या चष्म्यातून पाहिले तर अशा परिस्थितीमध्ये कामगारांसमोर एक महत्त्वाची संधी चालून येते. श्रमशक्तीचा पुरवठा हा काही इतर वस्तूंप्रमाणे उत्पादनवाढ करून वाढवता येण्यासारखा लवचिक असल्याचे दिसत नाही. आणि त्यामुळे या चौकटीतून पाहता श्रमशक्तीच्या मागणीमध्ये ज्या वेगाने वाढ होत चाललेली असते तितका श्रमशक्तीचा पुरवठा लवचिक नसल्याने कालांतराने तो कमी पडू लागतो. (श्रमशक्तीच्या पुरवठ्याच्या लवचिकपणाबद्दलची ही चौकट सध्या मान्य करूनच आपण पुढे जाऊया.) तसे असेल तर कोणाला असे वाटेल की 'या वाढत्या मागणीचा उपयोग करून आपले वेतन वाढवून घेऊन आपल्या इच्छेप्रमाणे जीवन जगण्याची सुवर्णसंधी कामगारांना प्राप्त होऊ शकते. कबूल, की भांडवलदार-कामगार हे नाते नाहीसे होत नाही. पण पाहिजे त्या प्रमाणात सामाजिक श्रमांचा वाटा आपल्याकडे घेण्याची, निदान वाढवत जाण्याची सुवर्णसंधी तर प्राप्त होतेच की नाही?'

आता, हे खरेच असते की आंगिक प्रमाण कायम असेल तर श्रमशक्तीचे मूल्य किंवा खऱ्या वेतनाची पातळी घसरवण्याच्या भांडवलदारांच्या प्रयत्नांना भांडवलसंचयाच्या अशा परिस्थितीमध्ये कामगारवर्ग जास्त खंबीरपणे तोंड देऊ शकतो. जीवनमानाच्या ज्या पातळीवर त्याने श्रमशक्तीचे मूल्य मान्य करून घेतलेले असते त्या पातळीचे रक्षण तो जास्त चांगले करू शकतो. पण याउलट आक्रमक चढाई करून ही पातळी उंचावून घेण्यामध्ये, वेतन त्यानुसार वाढवून घेण्यामध्ये व त्याद्वारे सामाजिक श्रमांचा जास्त वाटा आपल्याकडे घेण्यामध्ये फक्त या मागणीपुरवठ्याच्या दृश्य संबंधाशिवाय काही मर्यादा असत नाहीत का?[१] आणि इथेच खरी गोम आहे. या इतर गोष्टी लक्षात घेतल्या की या 'सुवर्ण' संधीचे पितळ उघडे पडते.

वेतन गरजेप्रमाणे कातरणारी कात्री

वाढलेल्या मागणीच्या आधारावर जसजसे जास्त जास्त कामगार आपल्या श्रमशक्तीच्या पूर्वीच्या मूल्यावरून ठरलेल्या वेतनापेक्षा जास्त वेतन मिळवून घेऊ लागतात तसतशा या वाढीला आपसूकच आळा घालणाऱ्या प्रक्रिया भांडवल-संचयाच्या माध्यमातून सुरू होतात. जितके जास्त कामगार अशा प्रकारची आक्रमक वेतनवाढ मिळवून घेतात तितक्या प्रमाणात भांडवल-संचयाच्या त्या फेऱ्यातून एका बाजूला भांडवलदारांच्या हातात साठणारे वरकड-मूल्य कमी होते. दुसऱ्या बाजूला, तितक्याच किंवा त्यापेक्षा जास्त भांडवलातून कमी वरकड-मूल्य मिळाल्यामुळे नफ्याचा दरही घसरू लागतो. आज मिळणारे वरकड-मूल्य पुढच्या भांडवल-संचयाची पूर्वअट असते. भांडवल-संचयाचा वेग हा त्याच्या या पूर्वअटीवर परिणाम झाल्यामुळे मंदावू लागतो. आणि त्याबरोबरच तितक्याच वेगाने श्रमशक्तीच्या मागणीतील वाढीचा वेगही घसरू लागतो. श्रमशक्तीच्या मागणीतील वाढीचा वेग हाच कामगारांनी आक्रमक वेतनवाढ जिंकून घेण्याचा आधार असतो. त्यामुळे त्या परिस्थितीचा फायदा जितके जास्ती कामगार जितका जास्ती घेतात तितक्या प्रमाणात हा आधारच खच्ची होतो! श्रमशक्तीची मागणी घसरू लागते, आणि कामगारांची ही वेतनवाढ तात्पुरतीच ठरते. भांडवलसंचयाच्या आंगिक प्रमाणाशी व पूर्वीच्या वेगाशी सुसंगत अशा मूल्यापाशी वेतन पुन्हा आणून ठेवले जाते.

यावरून एक मुख्य धडा हा की कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य (व त्याने निर्णित वेतन) हे श्रमशक्तीच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ पाहून ठरत नाही तर श्रमशक्तीचे मूल्य आणि भांडवल-संचय या दुकलीच्या अंतर्संबंधावरून ठरते. भांडवलसंचय आणि भांडवल-संचयाचा वेग यावरून श्रमशक्तीचे मूल्य आणि तिच्या मागणी पुरवठ्याचा मेळ ठरतो, उलट नव्हे. भांडवलाचे हितसंबंध आणि गरजा समाजाचे भवितव्य ठरवत असतात हे यातले मर्म आहे.[२]

कामगारांच्या श्रमशक्तीवर भांडवली हितसंबंध कसे कुरघोडी करतात हे देखील मोठे उद्बोधक आहे. कामगारांच्या श्रमशक्तीच्या मूल्याचे नियमन भांडवलसंचयाच्या पूर्वीच्या कात्रीतून होते. भांडवल-संचयाचा वेग निर्णित होत असतो तो तत्पूर्वी भांडवलदाराच्या हातात साठणाऱ्या वरकड-मूल्यावरून. हीच ती कात्री असते. या कात्रीचे एक पाते असे असते की कामगारांना त्यांच्या श्रमशक्तीची मागणी वाढायला पाहिजे असेल, तर त्यापूर्वी त्यांनी भांडवलदारांसाठी जास्त फुकट काम केलेले असावे लागते. किंवा श्रमशक्तीचे

मूल्य हे तिच्या वापरातून येणाऱ्या श्रमांच्या मानाने कमी असावे लागते. थोडक्यात, श्रमशक्तीचे मूल्य जितके कमी तितका भांडवल-संचयाचा वेग जास्त. ज्या पातळीपासून पुढे आक्रमक वेतनवाढ मागायची ती पातळीच कमी असावी लागते! या कात्रीचे दुसरे पाते याच्या बरोबर उलटे असते. आज कामगार जितक्या प्रमाणात आपल्या श्रमाचा जास्त वाटा वेतनामार्फत स्वत:कडे ठेवतात तितक्या प्रमाणात उद्याच्या भांडवल-संचयासाठी भांडवलदारांच्या हातात विनामोबदला पडणारे वरकड-मूल्य कमी होते, भांडवल-संचयाचा वेग मंदावतो व कामगारांना अनुकूल परिस्थिती नष्ट होते. अशा प्रकारे कात्रीच्या दोन पात्यांनी कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य नेमके भांडवलदारवर्गाच्या भांडवल-संचयाच्या गरजेबरहुकूम कातरले जाते! आणि याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मागील प्रकरणात आपण मांडलेला भांडवल-संचयाचा अर्थ. भांडवल-संचय म्हणजे शेवटी कामगारांनीच मागील फेऱ्यात केलेल्या फुकट वरकड श्रमाचा व पुढील फेऱ्यात त्यांनी घातलेल्या वाढीव श्रमांचा संबंध असतो. हा भांडवली संबंध हाच या कात्रीचा आधार असतो.

अनुकूल परिस्थिती : सर्वसाधारण नियम की अपवाद?

थोडक्यात, कामगारांना अनुकूल परिस्थितीतदेखील ज्या श्रमशक्तीच्या मूल्याच्या आधारावर भांडवल-संचय सुरू असतो त्याच्या मर्यादेपलीकडे कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य फारसे जाऊ शकत नाही. पण आता मुख्य प्रश्न उभा राहतो, आंगिक प्रमाण कायम राहून भांडवल-संचय होण्याची अनुकूल परिस्थिती ही भांडवलशाहीमधील सर्वसामान्य परिस्थिती आहे का? आणि याला मार्क्सचे ठाम उत्तर आहे—नाही, ही परिस्थिती सर्वसामान्य भांडवली परिस्थिती नसून अपवादात्मक असते.

मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे भांडवलशाहीमध्ये भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते. मार्क्सच्या पुढील निष्कर्षांचा हा महत्त्वाचा पाया आहे. आणि साहजिकच भांडवली विचारवंतांना या पायासकट त्यापुढील निष्कर्ष अजिबात मान्य नसतात. आणि त्यामुळे आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती भांडवलशाहीमध्ये आहे की नाही हा एक महत्त्वाचा मुद्दा बनतो. त्यामुळे आपण या प्रकरणाचा उरलेला भाग मुख्यत: मार्क्स आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या निष्कर्षापर्यंत का व कसा पोचतो व त्यावरील भांडवली आक्षेपांमध्ये काही तथ्य आहे काय यावर

खर्च करणार अहोत. हा पाया पक्का झाला की मगच पुढील प्रकरणांमध्ये आपण त्यावर आधारलेल्या निष्कर्षांकडे वळू.

३. आंगिक प्रमाण वाढण्याची प्रवृत्ती

मूळ प्रवृत्तीसर्वसाधारण उत्पादकतावाढ

आंगिक प्रमाण हे भांडवलाच्या तांत्रिक जुळणीवर अवलंबून असते. भांडवलाची तांत्रिक जुळणी इतर श्रमसामग्री व श्रमशक्ती यांमधील मूर्त संबंध निश्चित करते व हा मूर्त संबंध अमूर्त श्रमांच्या, क्रयवस्तूंच्या मूल्याच्या माध्यमातून कायम भांडवल व बदलते भांडवल या दोन मूल्यांच्या रकमा निश्चित करतो. या दोन रकमांचा भागाकार म्हणजेच आंगिक प्रमाण म्हणून व्यक्त होणारी भांडवलाची तांत्रिक जुळणी. या तांत्रिक जुळणीशी सर्वात जवळची निगडित गोष्ट म्हणजे श्रमांची उत्पादकता. आणि भांडवलशाहीमधील सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीमधून ही उत्पादकता वाढत जाणे ही एक सर्वसाधारण दिशा असते. ही सर्वसाधारण दिशा भांडवली विचारवंतांनाही मान्य करणे कठीण जाऊ नये! कारण त्यांच्या प्रिय भांडवलशाहीचे ते खास वैशिष्ट्य असते. अन् त्यामुळे श्रमांच्या उत्पादकतेमध्ये होणाऱ्या सर्वसाधारण वाढीमुळे आंगिक प्रमाण कसे बदलते हे आपण तपासले तर आंगिक प्रमाणाची सर्वसाधारण प्रवृत्ती काय आहे त्यापर्यंत आपण पोचू शकू.

उत्पादकतावाढीतून वाढणारे आंगिक प्रमाण

वाढत्या सर्वसाधारण उत्पादकतेचा एक निश्चित दिशेने आंगिक प्रमाणावर परिणाम होत असतो. उत्पादकता वाढली की तेवढ्याच श्रमशक्तीच्या वापरातून कामगार कितीतरी जास्त क्रयवस्तू निर्माण करीत असतात. मघाच्या खिळ्याच्याच उदाहरणापुरते पहायचे तर मघाशी आपण २ तासांच्या श्रमशक्तीच्या वापरातून १ किलो खिळे तयार होतात असे धरले होते. सर्वसाधारण उत्पादकतावाढ दुप्पट धरली तर आता २ तासांच्या श्रमशक्तीच्या वापरातून २ किलो खिळे तयार होतील. या २ किलो खिळ्यांसाठी आता पूर्वीपेक्षा दुप्पट लोखंड लागते किंवा २.२ किलो लोखंड लागते. यंत्राचे मात्र थोडे वेगळे असते. सुधारलेली यंत्रे ही उत्पादकतावाढीचा आधार असतात. त्यामुळे कदाचित आता जवळ जवळ पूर्वीइतकेच मोठे, तितकेच वजनदार यंत्र आता १ लाख ऐवजी २ लाख किलो खिळे बनवू शकते असे होऊ शकेल. त्यामुळे आता तांत्रिक जुळणी ही २.२ किलो लोखंड, खिळे बनवणाऱ्या यंत्राची एक लक्षांश क्षमता, व २

तासांची श्रमशक्ती अशी बनेल. तितक्याच श्रमशक्तीमागे आता जास्त मोठ्या प्रमाणावर श्रमसामग्री लागू लागते. तांत्रिक जुळणीमधील श्रमसामग्रीचे घटक श्रमशक्तीच्या घटकांच्या तुलनेत वाढतात हा उत्पादकतावाढीचा सर्वसाधारण परिणाम ठरतो.

अर्थात ही तांत्रिक जुळणी, आंगिक प्रमाणात कशी व्यक्त होईल हा प्रश्न उरतोच. कारण उत्पादकतावाढीमुळे या सर्वांचे मूल्यदेखील कमी होत असते. असे समजूया की सर्वांचे मूल्य अर्ध्यावर येते. तसे असेल तर आता लोखंडाचे मूल्य किलोमागे ५ श्रमतास, यंत्राचे मूल्य १ लाख खिळे क्षमतेमागे ५० हजार श्रमतास, व श्रमशक्तीचे मूल्य १ तास श्रमशक्तीमागे १/४ श्रमतास असे होईल. याप्रमाणे २ तास श्रमशक्तीच्या वापरातून कामगारांनी निर्माण केलेल्या २ किलो खिळ्यांमागचे आंगिक प्रमाण आपण आता काढू. त्यासाठी लागणाऱ्या २.२ किलो लोखंडाचे मूल्य २.२ × ५=११ श्रमतास होईल. खर्ची पडून खिळ्यात साठणारे यंत्राचे मूल्य हे (२/१ लाख) द ५० हजार = १ श्रमतास होईल. अशा रीतीने कायम भांडवलाचे मूल्य ११+१=१२ श्रमतास ठरेल. २ तास श्रमशक्तीचे मूल्य त्याप्रमाणे होईल ते २ × १/४=०.५ श्रमतास इतके बदलत भांडवल ठरेल. आंगिक प्रमाण हे १२:०.५=२४:१ होईल. थोडक्यात, आंगिक प्रमाण दुप्पट होईल.

सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती यावरून आपल्याला दिसते. ही प्रवृत्ती उत्पादकता वाढीच्या भांडवली स्वरूपाच्या दोन महत्त्वाच्या सर्वसाधारण परिणामांवर आधारलेली असते. एक म्हणजे, जसजसा भांडवली स्वरूपात उत्पादकतेचा विकास होतो, तसतशी दर क्रयवस्तूमागे जाणारी तांत्रिक जुळणीतील श्रमसामग्रीपैकी कच्च्यामालाची राशी सर्वसाधारणपणे तीच राहते, पण यंत्रांच्या क्षमतेचा वापर दर्शवणारी राशी कमी होते. त्यामुळे भांडवली विकासाच्या एका टप्प्यानंतर कायम भांडवलाच्या राशीचा कच्चा माल हा नियंत्रक बनतो. त्याचबरोबर या तांत्रिक जुळणीमधील दर क्रयवस्तूमागे लागणाऱ्या श्रमशक्तीचा भाग हा उत्पादकतावाढीमुळे कमी होतो. थोडक्यात, तांत्रिक जुळणीवरील सर्वसाधारण परिणाम हा दर क्रयवस्तूमागे कायम राहणारा कच्चा माल व कमी होणारी श्रमशक्ती अशा सर्वसाधारण प्रवृत्तीमध्ये व्यक्त होतो. कच्चा माल व श्रमशक्ती या दोन्हींचे मूल्य जरी सर्वसाधारण वेगाने कमी होत असले तरी तांत्रिक जुळणीमुळे एकाची राशी कायम राहत असते तर दुसऱ्याची राशी कमी होत असते. त्यामुळे सर्वसाधारण

उत्पादकतावाढीचा अंतिम परिणाम हा भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढण्यात होतो.

अर्थात, वर म्हटल्याप्रमाणे गणिताच्या आधारे हे दाखवता येतेच. पण यासाठी ठोस ऐतिहासिक पुरावादेखील उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, आपण अशी सुरुवात करू शकू: आंगिक प्रमाण वाढल्याचा काही पुरावा आपल्याला भांडवली विकासाबरोबर उत्पादनाच्या विभागणीमध्ये, स्वरूपामध्ये सापडू शकतो का? ज्या ज्या क्रयवस्तूंचे उत्पादन होते त्यापैकी सर्व क्रयवस्तू काही उपभोगाच्या वस्तू (कंझम्पशन गुड्स्) नसतात. बऱ्याच वस्तू ह्या श्रमसामग्रीत मोडणाऱ्या, उत्पादनासाठी वापरण्याकरता, म्हणजे भांडवली उत्पादनामध्ये भांडवलदारांसाठी निर्माण होणाऱ्या (कॅपिटल गूड्स्) असतात. भांडवली विकासाबरोबर उपयोगाच्या वस्तू आणि श्रमसामग्रीत मोडणाऱ्या वस्तू ही सामाजिक उत्पादनाची विभागणी कशी बदलते हे इथे महत्त्वाचे ठरते.

भांडवली विकासाबरोबर उपभोगांच्या वस्तूंचे उत्पादनामधील प्रमाण कमी होऊन श्रमसामग्रीचे वाढत जाताना आपल्याला दिसते आणि हा आंगिक प्रमाण वाढण्याच्या प्रवृत्तीचा ठोस पुरावा आहे. कारण एका चक्रातील उत्पादनातील उपभोगाच्या वस्तूंपैकी थोडाच भाग हा शेवटी पुढच्या चक्रातील बदलत्या भांडवलाचे मूल्य ठरवत असतो व श्रमसामग्रीचा संपूर्ण भाग हा पुढच्या चक्रातील कायम भांडवलाचे मूल्य ठरवत असतो. त्यामुळे उत्पादनाच्या प्रवाहामधील श्रमसामग्रीच्या उत्पादनाचे वाढते प्रमाण हे वाढत्या आंगिक प्रमाणाचेच दुसरे रूप असते. सैद्धांतिक आणि ऐतिहासिक अशा दोन्ही पायांवर, भांडवल-संचयाबरोबर किंवा भांडवली विकासाबरोबर आंगिक प्रमाण वाढण्याची मार्क्सने मांडलेली सर्व साधारण प्रवृत्ती ही निश्चितपणे खरी ठरताना दिसते.

४. आंगिक प्रमाणातील वाढ रोखणाऱ्या प्रवृत्ती

भांडवली आक्षेप

मार्क्सच्या वरील मांडणीला भांडवली अर्थशास्त्रज्ञांकडून आक्षेप घेतले जातात. त्यांचा अर्थ इतकाच असतो की भांडवली विकासामध्ये आंगिक प्रमाण कमी होणे शक्य असते. आणि गंमतीची गोष्ट अशी की मार्क्स हे कधीच नाकारत नाही. विशिष्ट परिस्थितीमध्ये, तात्कालिकत: आंगिक प्रमाण कमी होऊ शकते हे मार्क्सला अमान्य नाही. मार्क्सचे म्हणणे वेगळे आहे. आंगिक प्रमाण कमी

करणारी परिस्थिती ही विशिष्ट आणि तात्कालिक असते. सर्वसाधारण प्रवृत्ती नसते हे मार्क्सचे म्हणणे आहे.

भांडवलशाहीच्या विकासाबरोबर आंगिक प्रमाण वाढूही शकते आणि कमीही होऊ शकते या संदिग्ध निष्कर्षावर समाधान मानायचे तर मार्क्सची काहीच गरज नाही. मार्क्स विचारत आहे की या दोन्ही शक्यतांपैकी सर्वसाधारण प्रवृत्ती कोठली? आणि नेमका अशा प्रकारचा प्रश्न हाच मुळी भांडवली विचारवंतांच्या समजेबाहेरचा असतो. सर्वसाधारण प्रवृत्तीबद्दलचा त्यांचा दृष्टिकोनच मुळात एकारलेला आणि धोपटमार्गी असतो. अमुक एक सर्वसाधारण प्रवृत्ती आहे असे म्हटले की त्यांच्या दृष्टीने ज्या अपरिहार्यतेने सूर्य पूर्वेकडून उगवून पश्चिमेकडेच मावळतो त्या अपरिहार्यतेने ती सर्वसाधारण प्रवृत्ती प्रत्येकक्षणी प्रत्यक्षात यावी लागते. अंतर्विरोधी शक्यता प्रत्यक्षात येत येत, त्यातून मार्ग काढणारी व एकंदरीत प्रभावी ठरणारी सर्वसाधारण प्रवृत्ती त्यांना मुळात भावत नाही. दोन्ही शक्यता सारख्याच आहेत एवढे मान्य करून ते मोकळे होऊ शकतात.

विशिष्ट आणि सर्वसाधारण प्रवृत्ती

प्रत्यक्षात एक गुंतागुंतीची प्रक्रिया घडत असते. निरनिराळ्या क्षेत्रांत, निरनिराळ्या पद्धतीने व वेगाने उत्पादकता वाढत असते, तांत्रिक जुळणी बदलत असते. जितक्या प्रमाणात ही गुंतागुंतीची घडामोड सर्वसाधारण उत्पादकतावाढीला जन्म देत असते (आणि तसे व्हावेच लागते!) तितक्या प्रमाणात ती आंगिक प्रमाण वाढवत असते. यापलीकडे उरते ते उत्पादकतावाढीचे हे सर्वसाधारण रूप वजा जाता उरणारे विशिष्ट रूप, विशिष्ट संतुलन. आणि हे विशिष्ट संतुलन सर्वसाधारण प्रवृत्तीमुळे होणारी आंगिक प्रमाणातील वाढ कमी किंवा जास्त दोन्ही करू शकते. उत्पादकतावाढीच्या कोणत्या विशिष्ट संतुलनामुळे ही सर्वसाधारणपणे होणारी वाढ कमी होते हेही मार्क्सने मांडलेले आहे आणि ते लक्षात घेऊन या विरोधी प्रवृत्ती विशिष्ट आणि तात्कालिक स्वरूपाच्या असतात, त्या सर्वसाधारण प्रवृत्ती नाहीत हे स्पष्ट दाखवता येते.

उदाहरणार्थ मागे आपण म्हटले होते की भांडवली विकासाच्या एका टप्प्यानंतर कच्च्या मालाचा घटक हा कायम भांडवलाचा नियंत्रक घटक बनतो. पण जेव्हा भांडवली विकासाने एकंदर किंवा एखाद्या क्षेत्रात हा टप्पा गाठलेला

नसतो तेव्हा दर क्रयवस्तूमागे खर्च होणाऱ्या श्रमसाधनांच्या मूल्याला कच्च्या मालाच्या मूल्याइतकेच महत्त्व असू शकते. अशा परिस्थितीमध्ये तांत्रिक जुळणीमध्ये दर क्रयवस्तूमागे यंत्रांची वापरलेली क्षमता उत्पादकतावाढीमधून कमी होण्याचा परिणाम जास्त महत्त्वाचा ठरू शकतो व आंगिक प्रमाण कमी होऊ शकते. अशा प्रकारची परिस्थिती आपल्याला हातकसबावर आधारलेल्या तांत्रिक जुळणीचे यंत्राधिष्ठित जुळणीत रूपांतर होतानाच्या पहिल्या टप्प्यावर सापडते. पण इथेदेखील सामाजिक पातळीवर आंगिक प्रमाण कमी व्हायचे तर हे क्षेत्र एकंदर सामाजिक उत्पादनात पुरेसे महत्त्वाचे असावे लागते. आणि त्याचवेळी, कमी होणाऱ्या बदलत्या भांडवलापेक्षाही जास्त वेगाने श्रमसाधनांचे मूल्य कमी व्हावे लागते. असे असण्याचे कोणतेच सर्वसाधारण कारण नसते, ती विशिष्ट, अपवादात्मक परिस्थिती असते. अन् त्याबरोबरच ती तात्कालिक देखील असते. कारण एकदा का बदल पूर्ण झाला की त्याचाच परिणाम म्हणून दर क्रयवस्तूमागील श्रमसाधनांचे मूल्य हे कायम भांडवलातील कच्चा माल इत्यादी श्रमविषयांच्या तुलनेत लहान बनते, सर्वसाधारण परिस्थितीला जन्म देते! आंगिक प्रमाण कमी होण्याचा हा मार्ग एकदा वापरला की बंद होतो! थोडक्यात आंगिक प्रमाण कमी करणारी ही प्रवृत्ती विशिष्ट, तात्कालिक स्वरूपाची असते.

कच्चा माल वगैरे श्रमविषयांच्या तुलनेत दर क्रयवस्तूमागील खर्च होणारे श्रमसाधनांचे मूल्य महत्त्वाचे असलेला एक विभाग यंत्राधिष्ठित भांडवलशाहीतदेखील असतो. जिथे श्रमविषय म्हणजेच खुद्द निसर्गच असतो, अशा प्रकारचे खाणींसारखे उद्योग या विभागात मोडतात. खाणींमध्ये 'कच्चा माल' म्हणजे खुद्द पृथ्वीच. आणि काढलेल्या दर टन खनिजामध्ये या 'कच्च्या मालाचे' मूल्य नगण्य असते. या विशिष्ट विभागात कायम भांडवल हे प्रामुख्याने श्रमसाधनांचेच मूल्य दर्शवते. इथेदेखील पुरेशा वेगाने उत्पादकता वाढली तर आंगिक प्रमाण कमी होण्याची शक्यता असते. पण ही शक्यता प्रत्यक्षात यायची तर आणखी काही गोष्टी आवश्यक असतात. एकतर उत्पादकतावाढीतून, दर क्रयवस्तूमागे जाणारे श्रमशक्तीचे मूल्यही जवळपास उत्पादकतावाढीच्या वर्गाच्या प्रमाणात घसरत असते. तेव्हा खाणींमधील उत्पादकतावाढीमुळे त्यापेक्षाही वेगाने दर क्रयवस्तूमागील श्रमसाधनांचे मूल्य कमी होत जाणे आवश्यक असते. आणि एकंदर सामाजिक पातळीवर खाणींमधल्या उत्पादकतावाढीचा परिणाम होऊन आंगिक प्रमाण कमी व्हायचे

तर खाणउद्योगाची व्याप्ती आणि तिथे होणारी उत्पादकतावाढ दोन्ही प्रचंड असावी लागतात. अन् याला अर्थातच कोणतेही सर्वसाधारण कारण नसते!

खाणउद्योगांमधील वाढती उत्पादकता पुढे काय परिणाम करते, ती कितपत तात्कालिक असते हे पाहताना आपण आंगिक प्रमाण कमी करणाऱ्या आणखीही एका प्रवृत्तीचा विचार करू शकतो. भांडवली उत्पादनामध्ये उत्पादनासाठी कच्चा माल इत्यादी श्रमविषय पुरविणारे जे क्षेत्र असते त्याला इथे महत्त्व येते. श्रमविषय पुरवणाऱ्या क्षेत्रांमध्ये जर सर्वसाधारण उत्पादकतावाढीपेक्षाही पुरेशा जास्त प्रमाणात उत्पादकता वाढली तर सामाजिक पातळीवरील आंगिक प्रमाण कमी होऊ शकते. खाणउद्योगाचे उदाहरणही यातच मोडते. पण हे त्या आवर्तनापुरते झाले. ही प्रवृत्ती कायम पुढे जाऊन आंगिक प्रमाण कमी करत राहील का? की ती तात्कालिक ठरेल? याचे उत्तर मोठे उद्‌बोधक आहे.

या आवर्तनापुरते आंगिक प्रमाण कमी झाले होते ते श्रमविषय पुरवणाऱ्या क्षेत्रांमधील उत्पादकता ही सर्वसाधारण उत्पादकतावाढीपेक्षा पुरेशी जास्त होती म्हणून. थोडक्यात या विशिष्ट क्षेत्रातील उत्पादकतावाढ आणि सर्वसाधारण उत्पादनवाढ यांच्यातील तफावतीमुळे हे शक्य झाले होते. ही तफावत पुरेशी होती म्हणून आंगिक प्रमाण कमी झाले. पुढच्या आवर्तनात या तफावतीवर काय परिणाम होतो ते आपण पाहूया. मघाशी पाहिलेल्या परिस्थितीचा अर्थ असा होतो की श्रमविषयांचे मूल्य हे सर्वसाधारण उत्पादनवाढीमुळे जितके घसरले असते त्यापेक्षा जास्त घसरते. पुढच्या आवर्तनात हे श्रमविषय इतर क्रयवस्तू बनवण्यासाठी वापरले जातात व त्यांचेही मूल्य पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात पुढच्या आवर्तनात घसरते. याचा परिणाम म्हणून श्रमशक्तीचे मूल्यदेखील पूर्वीपेक्षा जास्त घसरते. पुढच्या आवर्तनात आंगिक प्रमाण कमी व्हायचे तर उत्पादकतावाढीतली तफावत आणखी वाढावी लागते, आणि असे कोणते सर्वसाधारण कारण आहे की ज्यामुळे भांडवलशाहीमध्ये श्रमविषयांच्या क्षेत्रामधली उत्पादकता आणि सर्वसाधारण उत्पादकता यांच्यातील तफावत वाढत गेली पाहिजे? कोणतेच नाही. तर थोडक्यात याचा अर्थ इतकाच होतो, की हा मार्ग तात्कालिकच असतो. आंगिक प्रमाण कमी करण्याची या मार्गाची यशस्विताच शेवटी त्याच्या आड येते!

तंत्रवैज्ञानिक क्रांती आणि आंगिक प्रमाण

आंगिक प्रमाण कमी करणाऱ्या ज्या प्रवृत्ती आपण वर पाहिल्या त्यांच्या मुळाशी तंत्रवैज्ञानिक बदल आणि त्यांच्या आधारावर बदलेली तांत्रिक जुळणी असते. तंत्रवैज्ञानिक क्रांतीच्या काळात हे बदल एकत्र येऊन त्याचा मोठा परिणाम संक्रमणकाळापुरता होऊ शकतो. संक्रमणकाळापुरतेच हे महत्त्वाचे असते; कारण आंगिक प्रमाण कमी करणारे नवीन तंत्र येते आणि सार्वत्रिक होते. या टप्प्यापर्यंतच त्याचा प्रभाव टिकतो. एकदा हे संक्रमण पूर्ण झाले की पुन्हा सर्वसाधारण प्रवृत्ती डोके वर काढते व आंगिक प्रमाण वाढू लागते. पण ही गोष्ट समजून न घेता जर पाहिले तर काय दिसते? आंगिक प्रमाण कधी वाढते तर कधी कमी होते—इतकेच! या संदिग्धतेखेरीज भांडवली अर्थशास्त्राजवळ याचे उत्तर नसते. उलट मार्क्सच्या संकल्पनांच्या आधारे सर्वसाधारण प्रवृत्ती ही विशिष्ट काळात का रोखली गेली याचेही स्पष्ट उत्तर देता येते. 'चालायचेच, कधी कमी होते, कधी वाढते' या छापाचे उत्तर मार्क्सच्या वैज्ञानिक प्रेरणेत बसत नाही.

परंतु अशा छापाचे एक उत्तर भांडवली विचारवंतांमध्ये रूढ करण्यामध्ये मात्र या तंत्रवैज्ञानिक बदलांचा मोठा हात असतो—तंत्रविज्ञानाला त्यांच्या विचारात क्रांतिकारक महत्त्व येते. आणि भांडवलशाहीच्या अंतर्गत रचनेमध्ये तंत्रवैज्ञानिक बदलांना तसे महत्त्वही असते. वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या यंत्रांचा शोध आणि विद्युत्शक्तीवर चालणाऱ्या यंत्राचा शोध हे अशाच प्रकारचे महत्त्वाचे बदल होते. त्यांना अनेकदा पहिली व दुसरी तंत्रवैज्ञानिक क्रांती म्हणून संबोधले जाते आणि दुसऱ्या महायुद्धानंतरची तिसरी तंत्रवैज्ञानिक क्रांती हे याचे सर्वांत अलीकडचे उदाहरण आहे. साहजिकच आहे, कारण १९२९ च्या प्रचंड अरिष्टाच्या व त्यानंतरच्या महायुद्धाच्या कडवट अनुभवानंतर युद्धोत्तर तेजीची एकदोन दशके भांडवली विचारवंतांना फारच गोड वाटत होती. या तंत्रवैज्ञानिक क्रांतीचे मूर्त व विशिष्ट पैलू हे या तेजीच्या काळाशी फार जवळपणे निगडित आहेत.

यापैकी पहिला महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वयंचलिततेचे (ऑटोमेशन) तत्त्व साध्य करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्सचा शोध. यातूनच पुढे नियंत्रणप्रक्रिया (कंट्रोल प्रोसेस) व गणिती प्रक्रिया (कॉम्प्युटिंग प्रोसेस) यांना यांत्रिकीकरणाचा आधार तयार होऊ शकला. जिथे पूर्वी तांत्रिक जुळणीमध्ये निर्णय घेण्याच्या मानवी बुद्धीच्या क्षमतांच्या (किंवा डोक्याच्या 'हातकसबाचा') वापर करावा लागला असता

किंवा अवजड श्रमसामग्रीचा वापर करावा लागला असता तिथे आता थोडक्या श्रमसामग्रीचा वापर होऊ लागला. एका अर्थाने 'हातकसबा' पासून यंत्रापर्यंत अशाच प्रकारचे हे संक्रमण होते. फक्त इथे हातकसब होते ते पुनरावृत्तीच्या साध्या मानसिक श्रमांचे. हातकसबाच्या काळात जसा आंगिक प्रमाणावर परिणाम झाला तसाच त्यामुळे इथेही झाला. पण तो संक्रमणकाळापुरताच, आणि तात्कालिक स्वरूपात.

यापैकी दुसरा पैलू म्हणजे श्रमविषयांमधले बदल. एखाद्या उपयोगमूल्यामागचे पूर्वीचे श्रमविषय जाऊन दुसऱ्या श्रमविषयावर आधारलेल्या दुसऱ्या क्रयवस्तूच्या स्वरूपात तेच उपयोगमूल्य येणे असा बदलही महत्त्वाचा ठरतो. उदाहरणार्थ कापड हे सुतापासून बनवण्याऐवजी रेयॉन किंवा नायलॉनसारख्या त्यापेक्षा कमी मूल्याच्या धाग्यापासून बनू लागते. श्रमविषयांच्या मूल्यात एकदम घट होऊ शकते. किंवा निरनिराळ्या ठिकाणी लागणाऱ्या लोखंडी किंवा लाकडी वस्तूऐवजी कमी मूल्याच्या प्लॅस्टिकने ते काम होते. हा श्रमविषयातील सार्वत्रिक बदल महायुद्धानंतर तंत्रवैज्ञानिक बदलांचा दुसरा महत्त्वाचा पैलू होता.

तिसरा पैलू ऊर्जेशी निगडित आहे. ऊर्जा किंवा काटेकोरपणे बोलायचे झाले तर इंधन हा दर क्रयवस्तूमागचा एक महत्त्वाचा श्रमविषय ठरतो. खनिज तेल व पेट्रोलियम यावर आधारलेले इंधन व नवे श्रमविषय या गोष्टी या काळात एकत्र आलेल्या दिसतात. दर क्रयवस्तूचे इंधनामार्फत खर्च होणारे मूल्य इंधनविषयक तंत्रवैज्ञानिक क्रांतीने झपाट्याने खाली आणले. या तिन्ही पैलूंमुळे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या तेजीच्या काळात मार्क्सच्या आंगिक प्रमाण वाढण्याच्या सिद्धांताला अनुल्लेखाच्या कोपऱ्यात ढकलणे फार सोपे जात होते. १९६० च्या पुढे मात्र हा संक्रमणकाळ संपला; ही तंत्र वैज्ञानिक क्रांती सार्वत्रिक होण्याच्याही आधी! आणि त्याला कारणही आहे. जशी काही विशिष्ट परिस्थिती आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती निष्प्रभ करत असते तशीच इतर प्रकारची विशिष्ट परिस्थिती तिला पुष्टीही देत असते. त्याही गोष्टी दुर्लक्षून चालणार नाही.

सर्वसाधारण प्रवृत्तीला पुष्टी देणारे घटक

आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीला पुष्टी देणारी एक विशिष्ट परिस्थिती म्हणजे तिला निष्प्रभ करणाऱ्या परिस्थितीच्या बरोबर उलटी

परिस्थिती असते. ज्यावेळी उपजीविकेच्या किंवा उपभोगाच्या क्रयवस्तूंच्या क्षेत्रातली उत्पादकता सर्वसाधारण उत्पादकतेच्या वाढीपेक्षा जास्त वाढत असते तेव्हा सर्वसाधारण प्रवृत्तीला पुष्टी मिळत असते. पण याशिवायही दोन इतर प्रवृत्ती महत्त्वाच्या असतात. आपण सर्वसाधारण प्रवृत्तीचा निष्कर्ष काढला तो उत्पादकतावाढीच्या आधारे किंवा सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीच्या आधारे. या सर्वसाधारण प्रवृत्तीला निव्वळ वरकड-मूल्याची प्रवृत्ती पुष्टी देत असते. यामुळे श्रमशक्ती व तिचा मोबदला यात बदल न होता कामगारांचे काम वाढते. पर्यायाने श्रमसामग्री वाढते. म्हणजे बदलते भांडवल तेच राहून कायम भांडवल वाढते.

शेवटी आपण नजर टाकणार अहोत आंगिक प्रमाण वाढवण्यास मदत करणाऱ्या भांडवलशाहीतल्या एका वैशिष्ट्यपूर्ण घडामोडीवर. ही घडामोड म्हणजे श्रमसाधनांचे आयुष्य संपल्यावर त्यांची जागा नव्या श्रमसाधनांनी घेणे. श्रमसाधने अनेक उत्पादनचक्रांमधून झिजत झिजत आपले आयुष्य संपवत असतात. त्यांचे आयुष्य संपले की त्यांची जागा जुन्याच प्रकारची श्रमसाधने जुन्याच आंगिक प्रमाणाप्रमाणे घेत नाहीत. मध्यंतरीच्या काळात झालेला सामूहिक श्रमांचा विकास, आणि वाढलेली उत्पादकता सामावून घेणारी नवी श्रमसाधने. नव्या तांत्रिक जुळणीवर त्यांची जागा घेतात. ती आपले मूल्य खर्च करू लागतात. ते या नव्या तांत्रिक जुळणीवर, नव्या वाढलेल्या आंगिक प्रमाणानुसार. ज्या ज्या वेळी जुनी श्रमसाधने टाकून दिली जातात आणि त्यांची जागा नवी श्रमसाधने घेतात त्या त्या वेळी आंगिक प्रमाण एका उडीमध्ये वाढत असते. सर्वसाधारण प्रवृत्तीला ठामपणे पुष्टी देणारी ही घडामोड भांडवलशाहीत सदोदित घडत असते.

थोडक्यात, सर्वसाधारण प्रवृत्तीला पुष्टी देणाऱ्या विशिष्ट परिस्थितींचा विचार केल्यानंतर सामाजिक पातळीवर आंगिक प्रमाण कमी होण्याची शक्यता आणखीच तात्कालिक व अपवादात्मक ठरते. आणि आपण मार्क्सच्या पूर्ण विचारांती काढलेल्या निष्कर्षापर्यंत पोचतो: सर्वसाधारणपणे भांडवल-संचयामध्ये आंगिक प्रमाण वाढत असते. तसेच, सर्वसाधारणपणे आंगिक प्रमाण कमी करणारी प्रवृत्ती या वाढीचा वेग मंदावू शकते पण फक्त अपवादात्मक, तात्कालिक परिस्थितीमध्येच ही वाढ ती थांबवू शकते. आंगिक प्रमाण वाढण्याची प्रवृत्तीही पुरेशा ठामपणे प्रस्थापित केल्यानंतर आपण आता या प्रवृत्तीचे परिणाम पहायला मोकळे झालो अहोत.

---

[१] वेतनाची पातळी आणि घातलेल्या श्रमांचा वाटा या अर्थातच दोन वेगळ्या गोष्टी आहेत. श्रमांचा वाटा कमी होत असूनदेखील वेतनाची पातळी वाढत असू शकते, कारण वेतनाच्या पातळीमध्ये निकष (नॉर्म) बनलेले क्रयवस्तूरूप जीवनमान अभिप्रेत असते. वेतनपातळीभोवती लढा दिसत असतो, पण त्यातून निर्णित होत असतो मूल्य व श्रमांचा वाटा. भांडवलदारवर्गाच्या तुलनेत कामगारांचे सामाजिक श्रमांच्या उपभोगात काय स्थान आहे याचा श्रमशक्तीचे मूल्य हे निर्देशांक असते आणि या 'सुवर्णसंधी' चा ही तुलना बदलण्यामध्ये काय उपयोग होतो हे आपण पहात आहोत.

[२] भांडवल-संचयाच्या वेगावरून कामगारांचा रोजगार व एकूण वेतनाचे नियंत्रण होते हा संबंध मार्क्समध्ये स्पष्ट आहे. पण याची स्पष्ट जाणीव भांडवली अर्थशास्त्रज्ञांच्या विचारामध्ये अंतभूर्त होणे ही घटना मात्र अगदी अलीकडची आहे. जॉन मेनर्ड केन्स यांनी प्रथम हे काम केले व त्याला भांडवली अर्थशास्त्रामध्ये सर्वसाधारण मान्यता दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातच मिळाली. या घटनाक्रमामध्ये भांडवली विचारांच्या स्वरूपाबद्दलचा एक महत्त्वाचा मुद्दादेखील लपलेला आहे.

औद्योगिक क्रांतीच्या सुमारास जो भांडवली अर्थशास्त्रीय प्रवाह परिपक्व होत होता तो मुक्त स्पर्धेवर आधारलेला होता व त्याला एक मक्तेदारीविरोधी टोकदेखील होते. व्यापारी भांडवलाच्या प्रभुत्वाच्या काळात राजेशाही राजवटी निरनिराळ्या कंपन्यांना असा मक्ता देत असत. त्यापैकी आपल्याला सर्वात जवळचे उदाहरण आहे ते ईस्ट इंडिया कंपनीचे. या औद्योगिक भांडवलदाराच्या परिपक्व होत जाणाऱ्या विचारामध्ये त्यामुळे मुक्तस्पर्धा, मक्तेदारी विरोध व शासनाची अर्थव्यवस्थेत कमीतकमी ढवळाढवळ ही महत्त्वाची सूत्रे होती आणि याचा परिणाम कामगारांचा एकूण रोजगार कसा ठरतो यावरही होत होता. सीमान्त उपयुक्तेच्या सिद्धांतांची जोड याला मिळाल्यावर हा विचार आपल्या पूर्ण स्वरूपात स्पष्टपणे पुढे येऊ लागला.

या सिद्धांताप्रमाणे वेतन व एकूण रोजगार हा श्रमांचा विक्रेता कामगार व गिऱ्हाईक भांडवलदार यांच्या स्पर्धेतून ठरतो. त्यामध्ये वेतन थोडे कमी स्वीकारण्याची तयारी ठेवली तर एकूण रोजगार त्यापेक्षा जास्त वाढतो व पर्यायाने कामगारांची वेतन-राशी जास्त वाढते हे सीमांत उपयुक्ततेच्या तक्त्यांच्या स्वरूपावरून सहज दाखवता येते. या विचाराप्रमाणे मुक्त स्पर्धेतून कामगारांना कमी वेतन स्वीकारावे लागते तरी सामूहिक पातळीवर रोजगार व वेतन-राशी दोन्हीमध्ये वाढ होण्याला वाव मिळतो. या सिद्धांतानुसार कामगार संघटनांचे मापन हे मुक्तस्पर्धेविरोधी ठरते. कामगार संघटना ही श्रमांच्या विक्रेत्यांमधील मक्तेदारी ठरते व मुक्तस्पर्धेला वाव न देता वेतन उंचावून धरणारी गोष्ट ठरते आणि सीमांत उपयुक्ततेच्या सिद्धांताप्रमाणे कामगारांनी

कमी वेतन स्वीकारूनही एकूण रोजगार व वेतन-राशी वाढण्याला अडथळा ठरते आणि भांडवल गुंतवणुकीला अडथळा ठरते. थोडक्यात बेरोजगारी, खालावलेले जीवनमान व मंदावलेली गुंतवणूक ही परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी कामगारांच्या स्वत:च्या हितरक्षणावर व संघटना तयार करण्यावर टाकली जाते आणि अशा अरिष्टातून वाटही स्पष्ट असते. कामगारांनी कमी वेतन स्वीकारावे, आपल्या संघटना विसर्जित कराव्यात की सर्व काही ठीकठीक होईल!

केन्स हादेखील एक भांडवली विचारवंत असला तरी तो भांडवलशाहीतील नव्या मक्तेदारी व वित्त-भांडवलाचे प्रभुत्व असलेल्या अवस्थेचा प्रवक्तादेखील होता. त्याची नजर स्पष्टपणे भांडवल-संचयाच्या व वित्त-भांडवलाच्या संबंधावर होती. त्याने प्रथम त्या आधारावर गुंतवणूक स्वतंत्रपणे कशी ठरते ते दाखवले व त्याआधारे एकूण वेतनखर्च कसा ठरतो हे दाखवले. थोडक्यात कामगार आणि भांडवलदार यांच्यात श्रमावरून जी स्पर्धा चाललेली असते त्यातून स्वतंत्रपणे निर्णीत झालेल्या गुंतवणुकीच्या मर्यादेत राहून रोजगार व वेतन-राशी बदलते त्यामुळे प्रत्यक्ष गुंतवणुकीवर परिणाम होऊन गुंतवणूक बदलत नाही! अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी गुंतवणुकीला आधारभूत होईल असा हस्तक्षेप शासनाने करणे आवश्यक असते तरच गुंतवणूक वाढण्यातून एकूण रोजगार व वेतन-राशी वाढू शकते हे त्याने दाखवले. केन्सच्या या उदारमतवादी दृष्टीकोनात महत्त्वाची आहे ती गुंतवणूक. मुक्त स्पर्धा की मक्तेदारी ही बाब गौण आहे. अन् त्याबरोबरच कामगार संघटना आहेत की नाहीत हीदेखील बाब गौण ठरते. कामगार संघटनांवर व मक्तेदारीवर मुक्त स्पर्धेच्या ध्यासातून हल्ला करत राहण्याने गुंतवणूक सुधारत नाही. ती सुधारते ती गुंतवणुकीला आधारभूत अशा शासकीय हस्तक्षेपापासून. केन्स अशा प्रकारचे उत्तर देऊ शकतो कारण त्याच्या दृष्टीकोनामध्ये मुक्त स्पर्धेचा अमूर्त ध्यास केंद्रस्थानी नाही, मक्तेदारी व कामगार संघटनांचे स्थिर झालेले अस्तित्व त्याचा विचार सामावून घेऊ शकतो. केन्स नव्या मक्तेदारी-वित्तभांडवली अवस्थेचा प्रवक्ता होता.

अर्थात, केन्सचा विचार सीमांत उपयुक्ततेच्या चौकटीतच घडतो. त्याच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या अर्थशास्त्राशी तो अतूट नाळेने बांधलेला होता. पण पैसा, व्याज आणि रोजगार यांच्या संबंधाबद्दल मांडलेला त्याचा विचार खुल्या स्पर्धेच्या युगामध्ये तयार झालेल्या भांडवली अर्थशास्त्राच्या आंतरिक घडणीपेक्षा निर्णायकपणे वेगळा होता. शेवटी ही आंतरिक घडण किती महत्त्वाची होती ते केन्सचा विचार भांडवलशाहीने कोणत्या प्रकारे स्वीकारला यामध्ये दिसते. त्यामध्ये दोन घडामोडी महत्त्वाच्या ठरल्या. १९२९ पासून सुरु झालेल्या तीव्र अरिष्टामुळे बेरोजगारी इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढली की पारंपारिक कल्पनांची डागडुजी पुरेनाशी झाली, दुसऱ्या बाजूला येऊ घातलेल्या दुसऱ्या महायुद्धामुळे सरकारी हस्तक्षेप अपरिहार्य बनू लागला. हे प्रचंड अरिष्ट आणि हे जागतिक महायुद्ध मिळूनच ही आंतरिक घडण

मोडून काढली गेली! मार्क्सने एक शतकापूर्वी मांडलेले सूत्र त्याच्या भांडवली स्वरूपात भांडवलदारांना स्वीकारण्यासाठी ही प्रचंड उलथापालथ आवश्यक ठरली!

१५. भांडवल–संचयाचे परिणाम

भांडवल–संचय म्हणजे मार्क्सच्या दृष्टीने केवळ भांडवलदारांच्या हातात जास्त भांडवल साठणे नव्हे, तर भांडवली व्यवस्थेच्या विकासाची दिशा व स्वरूप निश्चित करणारी ती एक प्रक्रिया आहे. मागील प्रकरणात आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या आपण इतक्या तपशिलात गेलो कारण ती भांडवल–संचयाची दिशा व स्वरूप ठरवणारी बाजू आहे. भांडवल–संचयाचा भांडवलदार–वर्गांतर्गत संबंधांवर काय परिणाम होतो आणि कामगारवर्गावर काय परिणाम होतो या दोन्ही गोष्टींची सुरुवात या सर्वसाधारण प्रवृत्तीपासूनच होते.

भांडवलदार–वर्गांतर्गत संबंधांवर भांडवल–संचयाचा काय परिणाम होतो त्यावर मार्क्स दोन नेमक्या, परस्परसंबंधी पण वेगवेगळ्या संकल्पनांच्या साहाय्याने बोट ठेवतो. या दोन संकल्पना म्हणजे अनुक्रमे भांडवलाचे घनीकरण (कॉन्सन्ट्रेशन) व भांडवलाचे केंद्रीकरण (सेंट्रलायझेशन). घनीकरण व केंद्रीकरण या हातात हात घालून जाणाऱ्या, वरवर एकसारख्या दिसणाऱ्या प्रक्रिया असल्या तरी वेगळ्या आहेत आणि त्यांचे वेगळेपण समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

१. भांडवलाचे घनीकरण व केंद्रीकरण

घनीकरणभांडवलाच्या अणू–परमाणूंचे!

भांडवलाचे घनीकरण म्हणजे काय हे पाहायचे झाले तर भांडवली उत्पादन ज्या अविभाज्य श्रमप्रक्रियेच्या तुकड्यांनी बनलेले असते त्यांच्याकडे वळावे लागते. ह्या श्रमप्रक्रियेच्या तुकड्यांचे विभाजन करता येत नाही. एक लेथ हा अख्खाच्या अख्खा वापरावा लागतो. अर्धा लेथ वापरता येत नाही. एकदा उभी राहिलेली पोलाद बनवण्याची झोतभट्टी अख्खीच्या अख्खी वापरावी लागते, अर्धी वापरू म्हटले तर चालत नाही. अशा अणुवत श्रमप्रक्रियेमध्ये कार्यरत असणारे एकूण भांडवल–मूल्यदेखील विभागता येत नाही. मग ते एका भांडवलदाराचे असो, शेकडो भांडवलदारांचे असो, कर्जाऊ घेतलेले असो. कसेही असले तरी कार्यरत होताना ते एका पूर्ण लेथसाठी लागणारे, एका पूर्ण झोतभट्टीसाठी लागणारे कायम व बदलते भांडवल मिळूनच कार्यरत व्हावे लागते. अणूंचे मिळून जसे व्यूहाणु (मॉलेक्यूल्स्) बनतात तसे या श्रमप्रक्रियांच्या अविभाज्य तुकड्यांनी मिळून, निरनिराळ्या क्षेत्रांतल्या एखाद्या क्रयवस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक अशा श्रमप्रक्रिया तयार होतात. आणि भांडवलशाहीच्या सर्वसाधारण घडामोडींच्या संदर्भात या श्रमप्रक्रियाही एका अर्थी अविभाज्य असतात. आणि त्यामुळे निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये एखाद्या क्रयवस्तूच्या उत्पादनामध्ये कार्यवाहीत येणारे भांडवल–मूल्य हे एकदम या संपूर्ण श्रमप्रक्रियेला लागणारे भांडवल–मूल्य म्हणूनच कार्यवाहीत यावे लागते. भांडवली उत्पादनासाठी आवश्यक किती भांडवल एकदम कार्यवाहीत यावे लागते हे या 'व्यूहाणूंच्या' तांत्रिक जुळणीने ठरत असते.

भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढण्याच्या प्रवृत्तीचे त्यामुळे घनीकरणाच्या संदर्भात दोन अर्थ निघतात. एकतर वाढत्या यंत्राधिष्ठित उत्पादकतेचा परिणाम म्हणून हे एकदम कार्यवाहीत यावे लागणारे किमान भांडवल वाढत असते याची चर्चा आपण अगोदरच केली आहे. सापेक्ष वरकड–मूल्याच्या विभागात भांडवली उत्पादनाचा विकास पाहताना प्रत्येक टप्प्यावर ही प्रवृत्ती स्पष्ट केलेली होती. दुसऱ्या बाजूला, आंगिक प्रमाणामध्ये होणाऱ्या वाढीमुळे या किमान भांडवलातील कायम भांडवलाचा हिस्सा वाढलेला असतो. 'व्यूहाणूस्वरूपातील' भांडवलात झालेली ही वाढ व कायम भांडवलाच्या

हिश्श्यात झालेली वाढ या दुहेरी प्रक्रियेला मार्क्सने दिलेले नाव आहे भांडवलाचे घनीकरण.

> उदाहरणार्थ, ५० कामगारांच्या श्रमांतून एकावेळी २० टन लोखंडाचा रस ओतू शकणारी १० लाख श्रमतास मूल्याची एक झोतभट्टी आहे असे धरू. तिची जागा आता ७५ कामगारांच्या श्रमातून तेवढ्याच वेळात ४० टन लोखंडाचा रस ओतणाऱ्या १५ लाख श्रमतास मूल्याच्या झोतभट्टीने घेतली असे समजा. पूर्वी १० लाख श्रमतास झोतभट्टीचे मूल्य, ५० कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य, २० टन लोखंडासाठी लागणारा खनिज कच्चा माल, कोळसा, ऊर्जा इत्यादी आणि २० टन लोखंडाच्या रसापासून कांबी तयार करण्यासाठी लागणारी श्रमसामग्री या सर्वांचे मिळून मूल्य म्हणजे कार्यवाहीत यावे लागणारे किमान अविभाज्य भांडवलमूल्य ठरले असते. आता पूर्वीपेक्षा दीड पट जास्त झोतभट्टीचे मूल्य, दीडपट जास्त बदलते भांडवल, दुप्पट खनिज, कच्चामाल, ऊर्जा आणि दुप्पट लोखंडाच्या रसासाठी कांबी तयार करणारी श्रमसामग्री हे सर्व मिळून पूर्वीच्या दीड पटीपेक्षा जास्त मूल्य हे कार्यरत व्हावे लागणारे किमान अविभाज्य भांडवल-मूल्य ठरेल. आणि त्याबरोबरच बदलते भांडवल दीड पटीने वाढले असले तरी श्रमविषयांमधील भांडवल दुपटीने वाढले असल्याने आंगिक प्रमाणही वाढलेले असेल. भांडवलाचे घनीकरण झालेले असेल.

केंद्रीकरण भांडवलाच्या मालकीचे

केंद्रीकरण ही एक वेगळी प्रक्रिया आहे, ती घनीकरणाप्रमाणे उत्पादनामध्ये होणारा बदल अपरिहार्यपणे प्रतिबिंबित करणारी प्रक्रिया नाही. ती केवळ भांडवलमूल्याच्या मालकीसंबंधामध्ये बदल व्यक्त करणारी प्रक्रिया आहे. जेव्हा एखादा कारखाना त्याच्या तांत्रिक जुळणीमध्ये काहीही बदल न होता दुसऱ्या एखाद्या भांडवलदाराच्या किंवा भांडवली गटाच्या हातात जातो तेव्हा या दुसऱ्या भांडवलदाराच्या किंवा भांडवली गटाच्या हातात भांडवलाचे शुद्ध केंद्रीकरण झालेले असते. उदाहरणार्थ, आत्ताच पाहिलेल्या झोतभट्टीच्या उदाहरणामध्ये जर ती श्रमप्रक्रिया ज्या कारखान्यात घडते आहे त्या कारखान्याच्या मालकाने तसाच दुसरा एक कारखाना ताब्यात घेतला तर भांडवलाचे शुद्ध केंद्रीकरण झालेले असते. वित्तभांडवल व भांडवलदारांची आपापसातील स्पर्धा हे केंद्रीकरण घडून येण्याचे मुख्य माध्यम असते. केंद्रीकरण हे घनीकरणाशिवाय होऊ शकते आणि अनेकदा तसे होतेही.

घनीकरण आणि केंद्रीकरण या वेगवेगळ्या प्रक्रिया असल्या तरी भांडवलसंचय होताना त्या एकमेकींना चालना देणाऱ्या, एकमेकींचा आधार तयार करणाऱ्या, हातात हात घालून चालणाऱ्या प्रक्रियादेखील असतात. घनीकरणामुळे कार्यवाहीत यावे लागणारे किमान भांडवल वाढते हे आपण पाहिलेच. याचा अर्थ हा होतो की ज्या भांडवलाचे केंद्रीकरण झालेले असेल व हाताशी असलेले भांडवलमूल्य मोठे असेल त्याच्या मालकाला या घनीकरणाचा फायदा घेणे, त्यातून मिळणाऱ्या सापेक्ष वरकड-मूल्याचा लाभ घेणे सोपे जाते. दुसऱ्या बाजूला भांडवलाचे केंद्रीकरण झाल्यामुळे त्यातील श्रमप्रक्रियांचे तुकडे एकत्र करून त्यातून नवा घनीकरण झालेला तुकडा उभा करणे शक्य होते. आणि त्यामुळे भांडवल-संचयाची प्रक्रिया ही भांडवलाचे घनीकरण आणि केंद्रीकरण दोन्ही घडवून आणत असते.[१]

२. भांडवलदारवर्गावर होणारे परिणाम

छोट्या भांडवलाचे शिरकाण

घनीकरण आणि केंद्रीकरण या दोन्ही प्रक्रियांचा मिळून अर्थ होतो बड्या भांडवलाच्या तुलनेत छोट्या भांडवलाचे शिरकाण. हे अनेक अंगांनी होत असते. घनीकरणामुळे छोट्या भांडवलावर सतत मोठे होत राहण्याचा दबाव पडत असतो. जे छोटे भांडवलदार घनीकरणाचा हा वेग सांभाळू शकत नाहीत त्यांना दिवाळे काढावे लागते. अर्थात दिवाळे वाजते ते त्या भांडवलदाराचे, भांडवलाचे नव्हे. छोट्या भांडवलदारांना आपले भांडवल लिलावात काढावे लागते किंवा एखाद्या मोठ्या भांडवलदाराला ते पडेल दरात द्यावे लागते किंवा अशा मोठ्या भांडवलदाराचे किंवा गटाचे आश्रित बनावे लागते. तो त्याच्या हातातील भांडवलापासून किंवा त्यावरील ताब्यापासून तोडला जातो. त्याच्या हातातले भांडवल एका मोठ्या भांडवलाचा भाग बनते व त्या माध्यमातून गठ्ठ्याने कार्यवाहीत येते. छोट्या भांडवलदारांचे दिवाळे निघते, पण त्यांच्या भांडवलाचे मात्र घनीकरण आणि केंद्रीकरण होते.

जितका एखाद्या क्षेत्रात भांडवली उत्पादनाचा विकास होतो, तितके हे खरे असते. त्यामुळे छोटे भांडवल हे समाजामधील अप्रगत उत्पादनाच्या क्षेत्रात लघुउद्योगांमध्ये, हस्तव्यवसायांमध्ये, गृहउद्योगांमध्ये साचत जाते. कामगारांच्या श्रमशक्तीच्या मूल्याच्याही खाली ढकलल्या गेलेल्या वेतनाच्या आधारावर ते अशा क्षेत्रांमध्ये तग धरते. पण छोट्या भांडवलाची या क्षेत्रात होणारी भाऊगर्दी

अत्यंत तीव्र स्पर्धेलाही जन्म देत असते. आणि ही स्पर्धेची तीव्रता पुन्हा केंद्रीकरणाचा आणि काही प्रमाणात घनीकरणाचा आधार बनते.

त्याचेवळी, कुठल्याही क्षेत्रात कार्यवाहीत येण्यासाठी लागणारा किमान भांडवलमूल्याचा गठ्ठा घनीकरणामुळे वाढलेला असतो. सामाजिक उत्पादनाच्या वाढत्या क्षेत्रामध्ये भांडवलदार बनून नव्याने प्रवेश करण्याकरता लागणारे किमान भांडवल वाढत चाललेले असते. त्यामुळे भांडवल-संचयाचा अर्थ नवे भांडवलदार तयार होणे असा न राहता जास्तीत जास्त प्रमाणात तो जुने, मोठे भांडवलदार किंवा भांडवली गट यांच्या हातातील भांडवलाचा संचय असा बनत चाललेला असतो. अशा रीतीने, भांडवल-संचयामुळे भांडवल सापेक्षतेने कमी कमी भांडवलदार किंवा भांडवली गटांच्या हातात जास्ती जास्ती मोठ्या अविभाज्य तुकड्यांमध्ये कार्यवाहीत येत असते. थोडक्यात, भांडवली विकासातील घनीकरण व केंद्रीकरण या प्रवृत्तींमधून छोट्या भांडवलाचे शिरकाण होत जाणे, त्यांची व्याप्ती सापेक्षतेने कमी होत जाणे हे अपरिहार्य असते.

भांडवल-संचय : एक वाढती तोडणूक!

भांडवल-संचयाच्या या पैलूमागे भांडवलसंचयाचा एक मूलभूत, अंतर्विरोधी अर्थ लपलेला असतो. भांडवली उत्पादन तपासायला सुरुवात करताना श्रमशक्ती ही क्रयवस्तू म्हणून उपलब्ध असल्याचा अर्थ आपण पाहिला होता. कष्टकऱ्यांच्या निर्णायक विभागाच्या हातात श्रमसाधने किंवा उपजीविकेची साधने नसणे हा श्रमशक्ती ही क्रयवस्तू बनण्याचा आधार आपण पाहिला होता. थोडक्यात जनतेचा एक मोठा निर्णायक विभाग हा भौतिक संपत्तीवरील खाजगी मालकीपासून तोडला जाणे हाच मुळात खाजगी मालकीचा पुरस्कार करणाऱ्या भांडवली उत्पादनाचा पायाभूत आधार असतो! प्रत्येक माणसाचा खाजगी मालकीवरील हक्क जन्मसिद्ध व अविभाज्य (इन्ॲलियेनेबल) मानणारी, शेवटपर्यंत तो लढवणारी ही व्यवस्था मुळात स्वत:च्या पायावर उभी राहते तीच मुळी बहुसंख्यांना हा हक्क नाकारून.

हा अंतर्विरोध म्हणजे भांडवलशाहीचा मूलाधार आहे. आणि नुकतेच पाहिलेले भांडवल-संचयाचे परिणाम म्हणजे या अंतर्विरोधाचेच उलगडणे आहे. भांडवलशाहीचा विकास किंवा भांडवल-संचय याचा अर्थ जास्तीत जास्त लोकांना खाजगी मालकीपासून तोडून, ती मालकी सापेक्षतेने कमीत कमी

लोकांमध्ये जास्तीत जास्त मोठ्या तुकड्यांमध्ये केंद्रीत करणे हाच ठरतो. भांडवल-संचयाच्या बाबतीत भांडवली व्यवस्था अगदी 'लोकशाही' पद्धतीने भांडवलदारवर्गातल्या लोकांनाही या प्रक्रियेत ओढीत असते इतकेच!

बिगरभांडवली कष्टकऱ्यांचे उच्चाटन

घनीकरण आणि केंद्रीकरण या प्रक्रिया जशा छोट्या भांडवलदारावर परिणाम करीत असतात त्याप्रमाणेच त्या बिगरभांडवली, अभिजात मध्यमवर्गाच्या क्रयवस्तू उत्पादनावरही परिणाम करीत असतात. अभिजात मध्यमवर्ग म्हणजे छोटेखानी उत्पादकांचा स्वत:च्या श्रमसाधनांवर स्वत: कष्ट घालून क्रयवस्तू निर्माण करणारा वर्ग असतो. सापेक्ष वरकडमूल्याची निर्मिती आणि घनीकरण भांडवली श्रमप्रक्रियेच्या विकासाच्या दोन बाजू आहेत, आणि यंत्राधिष्ठित सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीमुळे या वर्गातल्या उत्पादकांच्या श्रमांचे अवमूल्यन कसे होते व टप्प्याटप्प्याने त्यांच्या हातून श्रमसाधनांचा ताबा कसा सुटत जातो याचा विचार आपण एका स्वतंत्र प्रकरणात केलेलाच होता. ही प्रक्रिया भांडवल-संचयाच्याच प्रक्रियेची एक बाजू म्हणून आता स्पष्ट होते. तसेच या प्रक्रियेला दुहेरी टोक असते. त्यांच्या हातातील श्रमसाधनांची जागा एक गठ्ठ्याने भांडवल म्हणून भांडवलदारांमार्फत कार्यवाहीत येणाऱ्या साधनांनी घेतलेली असते हे तिचे एक टोक असते. दुसऱ्या बाजूला त्यांना श्रमसाधनांपासून तोडून आणि त्यांच्या श्रमांच्या अवमूल्यनातून ती या अभिजात मध्यमवर्गातील उत्पादकांना कामगारांमध्ये ढकलत असते, त्यांची श्रमशक्ती क्रयवस्तूच्या रूपात बाजारात पाठवत असते. तेव्हा रोजगार शोधणाऱ्या कामगारांच्या संख्येतील वाढ हे तिचे दुसरे टोक असते. आणि हे दुसरे टोक आपल्याला भांडवल-संचयाचे कामगारवर्गावर काय परिणाम होतात या प्रश्नापाशी आणून ठेवते.

भांडवल-संचयामुळे बिगरभांडवली उत्पादकांना श्रमसाधनांपासून तोडणारी जी प्रक्रिया असते तिची दोन्ही टोके सारख्या महत्त्वाची नसतात. एकीकडे भांडवलदारवर्गाच्या हातातले कार्यवाहीत येणारे भांडवल वाढत असते. भांडवलदारवर्गाच्या एकंदर भांडवलाच्या तुलनेत ही वाढ नगण्य असते, कारण या बिगरभांडवली उत्पादकांच्या हातातील मूल्य काही झाले तरी भांडवलदारवर्गाच्या हातातील मूल्यापेक्षा बरेच कमी असते. पण त्या मानाने, या प्रक्रियेचे दुसरे टोक खूपच महत्त्वाचे ठरते; कामगारवर्गाच्या संख्येत होणारी वाढ ही मात्र त्या तुलनेत खूपच जास्त असते. याचे कारण बिगरभांडवली

उत्पादनाची तांत्रिक जुळणी ही भांडवली उत्पादनाच्या तांत्रिक जुळणीपेक्षा खूपच अप्रगत असते. त्यातून 'मुक्त' होणाऱ्या श्रमसामग्रीचे मूल्य व 'मुक्त' होऊन क्रयवस्तू बनल्यामुळे श्रमशक्तीला आलेले मूल्य यांचे प्रमाण हे भांडवलाच्या प्रमाणापेक्षा बरेच कमी असते. त्यामुळे कामगारवर्गावर या प्रक्रियेचे होणारे परिणाम जास्त गंभीर असतात. या प्रक्रियेमधून भांडवलदारवर्गाच्या हातातले मूल्य ज्या प्रमाणात वाढते त्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात कामगारांच्या संख्येत भर पडते.

३. कामगारवर्गावरचा परिणाम

रोजगार कातरणारी भांडवल संचयाची पाती

कामगारवर्गावर भांडवल-संचयाचे काय परिणाम होतात त्याच्याकडे जाण्याचा हा एक महत्त्वाचा दुवा ठरतो, कारण कामगारांवर होणारा भांडवल-संचयाचा परिणाम हा कामगारांची संख्या व त्यांना भांडवली स्वरूपात उपलब्ध होणारा रोजगार यांच्या संबंधात सापडतो. बिगरभांडवली कष्टकऱ्यांचे क्रयवस्तूंचे उत्पादन जसे मोडीत निघते तसतशी भांडवली क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या तुलनेत कामगारांची संख्या जास्त होत जाते. यातच आपल्याला भांडवलसंचयाच्या कामगारांवर होणाऱ्या परिणामाचे मर्म सापडते. अर्थात, कामगारांची संख्या उपलब्ध रोजगारापेक्षा अशी जास्त होण्याच्या प्रक्रियेचा मुख्य आधार बिगरभांडवली उत्पादकाची उत्पादनसाधनांपासून होणारी तोडणूक हा नाही. आपले विवेचन भांडवलदारवर्गांतर्गत घडणाऱ्या घडामोडींपासून सुसंगतपणे कामगारांवर होणाऱ्या परिणामांकडे नेणारा तो केवळ एक दुवा आहे. आणि त्याला मार्क्सने दिले आहे त्यापेक्षा थोडेसे जास्त स्थान येथे दिले आहे; कारण भारतीय परिस्थितीमध्ये बिगरभांडवली क्रयवस्तू उत्पादन ही अजूनही एक महत्त्वाची वस्तुस्थिती असल्यामुळे तो एक प्रत्यक्षातदेखील महत्त्वाचा दुवा आहे. पण मूलतः हा परिणाम घडून येण्यासाठी बिगरभांडवली क्षेत्रातली ही प्रक्रिया हा आधार नाही, खुद्द भांडवली उत्पादनाच्या अंतर्गत घडामोडीच त्याला कारणीभूत असतात. आणि तेही रोजगार सापेक्षतेने कातरणाऱ्या एका कात्रीच्या स्वरूपात.

या कात्रीचे एक पाते म्हणजे अस्तित्वात असलेल्या भांडवली उत्पादनामध्ये होणारे बदल. श्रमसाधनांचे आयुष्य झिजून झिजून संपले की त्यांची जागा नव्या श्रमसाधनांनी घेणे या प्रक्रियेचा आंगिक प्रमाणाशी असलेला संबंध आपण

अगोदरच पाहिलेला आहे. अशा वेळी आंगिक प्रमाण एका उडीने वाढलेले असते. नव्या येणाऱ्या तेवढ्याच मूल्याच्या श्रमसाधनांची कामावर असलेल्या कामगारांची श्रमशक्ती आत्मसात करण्याची क्षमतादेखील एका उडीने कमी होत असते. श्रमसाधनांचे आयुष्य संपण्याच्या काळामधली तांत्रिक प्रगती जितकी जास्त, त्यातून मिळणारे सापेक्ष वरकड-मूल्य जितके जास्त, तितक्या जास्त प्रमाणात ही क्षमता कमी होत असते. भांडवली प्रगती हा संबंध नाहीसा करत नाही तर भांडवली प्रगती हीच मुळी त्या संबंधाचा पाया असते, हा संबंध दृढ करीत असते. या संबंधामुळे कामावर असणाऱ्या कामगारांपैकी काही कामगार बेरोजगार होऊन काम शोधणाऱ्या कामगारांमध्ये दाखल होण्याची एक साधारण प्रवृत्ती तयार होते. तात्कालिक स्वरूपात तिला आळा बसू शकतो पण ती नाहीशी होऊ शकत नाही, आणि भांडवली प्रगती जितक्या वेगाने होते तितक्या प्रमाणात ही प्रवृत्ती बलवान होते.

या कात्रीचे दुसरे पाते हे नव्याने भांडवल म्हणून आपले चक्र सुरू करणारे मूल्य आणि कामगार यांच्या संबंधामार्फत चालते. भांडवलाचा कार्यवाहीत येणारा प्रत्येक नवा तुकडा हा घनीकरणामुळे वाढलेल्या नव्या आंगिक प्रमाणानुसार कार्यवाहीत यावा लागतो. त्यामुळे बेरोजगार असणाऱ्या कामगारांची श्रमशक्ती आत्मसात करण्याची त्याचीही क्षमता दर फेऱ्यानंतर कमी होत असते. येथे कामाचे तास कायम ठेवूनच रोजगाराची व्याख्या होत असते याचा महत्त्वाचा भाग असतो. कार्यवाहीत येणाऱ्या नव्या श्रमसामग्रीची रोजगार ‘निर्माण’ करण्याची क्षमता भांडवली स्वरूपामुळे कमी होत असते. थोडक्यात, दर श्रमतास नव्या भांडवलगुंतवणीमागे वाढणारा रोजगार कमी होत जाण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती भांडवलसंचयामध्ये अंतर्भूत असते.

बेरोजगारांची फौजएक अपरिहार्य परिणाम

कार्यवाहीमध्ये असणाऱ्या व नव्याने कार्यवाहीत येणाऱ्या भांडवलाची श्रमशक्ती आत्मसात करण्याची क्षमता सातत्याने कमी होणे ही भांडवली विकासाची, भांडवल-संचयाची एक सर्वसाधारण प्रवृत्ती ठरते. अर्थात एकंदर वाढणाऱ्या भांडवलात वाढ खूप झाली तर आंगिक प्रमाण वाढूनदेखील रोजगार वाढू शकतो. त्यामुळे तेजीच्या काळात बेरोजगारी कमी झालेली आपल्याला दिसते. पण एकतर भांडवलातील वाढ अरिष्टांमुळे रोखली जाताना दिसते. मंदीच्या लाटा ही एक अपरिहार्य गोष्ट असते. त्या बरोबरच, ज्यावेळेस रोजगार खूप वाढू लागतो तेव्हा श्रमशक्तीचा मोबदलाही वाढू लागतो व भांडवल-संचयाच्या

कात्रीमुळे भांडवल-संचयाचा वेग मंदावून काय होते ते आपण पाहिलेच आहे. अन् तरीही आंगिक प्रमाण मात्र या सर्वांतून वाढतच असते. त्यामुळे कालांतराने कामगारवर्गामध्ये साचलेल्या स्वरूपातील बेराजेगारी हा भांडवल-संचयाचा आणि भांडवली विकासाचा सर्वसाधारण परिणाम ठरत असतो. या बेरोजगारांच्या फौजेच्या अस्तित्वाला ऐतिहासिक आणि सैद्धांतिक दोन्ही तऱ्हेने भरपूर आधार मार्क्सच्या विचारांच्या आधारावर तयार होतो.

इथे मार्क्सने दाखवलेल्या आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीचे महत्त्व आपल्या लक्षात येऊ शकते. आणि त्याविरुद्ध भांडवली टीकाकारांनी इतकी ओरड का करावी याचेही कारण सापडू शकते. कामगारांमध्ये बेराजेगारांची फौज निर्माण होणे ही भांडवलशाहीची सर्वसाधारण प्रवृत्ती म्हणून सिद्ध होते तीच मुळी आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या आधाराने! कामगारांमधल्या बेरोजगारांच्या या फौजेच्या निष्कर्षाला भरपूर ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. प्रत्येक देशांतर्गत भांडवली निकषांच्या आधारावरदेखील बेरोजगारी ही सतत आहे असेच सर्वसाधारणपणे दिसते. अगदी दुसऱ्या महायुद्धानंतरच्या बऱ्याच गाजावाजा झालेल्या 'पूर्ण रोजगाराच्या' काळात देखील २.५ ते ४ टक्क्यांच्या आसपास बेरोजगारी होती हे आता खुद्द भांडवली अर्थशास्त्रालादेखील मान्य झाले आहे. आणि इतर काळात ती होती याबद्दल त्यांचेही दुमत नाही. त्यांचे म्हणणे इतकेच असते की ती भांडवलशाहीचा अपरिहार्य परिणाम म्हणून नव्हती.

अर्थात प्रत्येक देशांतर्गत बेरोजगारीचे आकडे सुटेसुटे तपासणे यात महत्त्वाच्या त्रुटी आहेत. एक तर देशांतर्गत बेरोजगारीचे सुटे सुटे आकडे तपासणे हे गैरलागू असते; कारण भांडवलशाही ही एक जागतिक, आंतरराष्ट्रीय व्यवस्था आहे. तिचा भांडवल-संचय आणि त्याचे परिणाम दोन्ही जागतिक पातळीवर व्यक्त व्हावे लागतात. जागतिक पातळीवर बेरोजगारीचे आकडे एकत्र करून पाहिले तर दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळात ही बेरोजगारीची फौज थोडी कमी झालेली जरूर दिसेल पण 'पूर्ण रोजगाराचे' सुवर्णयुग कुठेच सापडणार नाही! त्यापेक्षाही महत्त्वाचे आणखी एक सैद्धांतिक कारणदेखील बेरोजगारीच्या फौजेबाबत महत्त्वाचे आहे. आणि शेवटी प्रश्न तिथेच येऊन पोचतो. कारण ऐतिहासिक आधार म्हणून आपण जागतिक पातळीवर प्रत्येक काळात बेरोजगारीचे आकडे जमा केले व ते भांडवली अर्थशास्त्रज्ञांसमोर मांडले तरी त्यांचे सैद्धांतिक पातळीवर थोडेच समाधान होणार आहे! ते म्हणू शकतात,

की ठीक आहे प्रत्येक देशात मिळून नेहमी बेरोजगारी होती हे ठीक आहे, ते तुम्ही दाखवलेत, पण ती भांडवलशाहीमुळे होती कशावरून? लोकसंख्या वाढीवरून नाही कशावरून? थोडक्यात त्याला भांडवलशाही जबाबदार होती हे उत्तर सैद्धांतिकदृष्ट्या त्यांना पटणारच नाही. तेव्हा आपण हा ऐतिहासिक आधार थोडा वेळ बाजूला ठेवू आणि जरा सैद्धांतिक बाजूकडे वळू. भांडवलशाहीमध्ये बेरोजगारांची फौज अस्तित्वात असण्याला आंगिक प्रमाणाखेरीज इतर काही सैद्धांतिक आधार आहे का?

श्रमशक्तीच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ

हा सैद्धांतिक आधार आपल्याला श्रमशक्ती या क्रयवस्तूच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ कसा घातला जातो याच्यात सापडतो. असे धरून चालू की बेरोजगारांची फौज अस्तित्वात नाहीच. पूर्ण रोजगाराचे भांडवली सुवर्णयुग चालू आहे आणि मागणी पुरवठ्याचा मेळ घातला जाऊन ते तसेच पुढे चालू रहायचे आहे. आता नवीन भांडवल-संचय होतो आणि ५ लाख श्रमतासांचे वरकड-मूल्य नवे भांडवल म्हणून कार्यवाहीत येते. त्याचे प्रमाण ४:१ धरून चालू. आता १ लाख तासांच्या श्रमशक्तीची मागणी वाढली. पुरवठा कुठून वाढणार? नेहमीचे किमती उंचावण्याचे उत्तर कामी येत नाही. समजा वेतन वाढले तर इतर धंद्यांमधून कामगार तिथे येतील, पण मग त्या धंद्यांमध्ये कामगारांचा तुटवडा पडेल.

अर्थात, एक उत्तर उपलब्ध असते. कामगारांची एक नवीन पिढी तयार होऊन कामगारवर्गांत दाखल होत असते, तेथून ही श्रमशक्तीची वाढलेली गरज भागवली जाऊ शकते. पण या मागणी-पुरवठ्याच्या माध्यमात लवचिकपणा नसतो, मागणी-पुरवठ्याचा मेळ घालण्याची क्षमता नसते. नव्याने कामगारवर्गांत दाखल होणाऱ्या या नव्या पिढीची संख्या अवलंबून असते ती पंधरा-वीस वर्षांपूर्वी कामगारवर्गांत जन्म घेतलेल्या मुलांच्या संख्येवर! पुरवठा वाढवण्यासाठी वाढलेले वेतन इथे अगदीच कुचकामी ठरते. कामगारवर्गाच्या प्रजननाचा आज बदलणारा वेग परिणाम करीत असतो पंधरा-वीस वर्षांनी, आणि भांडवलशाहीची श्रमशक्तीची मागणी बदलत असते ती आत्ता, या वर्षी, या महिन्यात, या दिवसाला. कुठे जुने कारखाने निकालात निघत असतात, कुठे नवे वाढतात, कुठे दहा टक्क्यांनी मागणी वाढते, कुठे तीस-चाळीस टक्क्यांनी, तर कुठे पंचवीस-तीस टक्क्यांनी कमी होत असते. श्रमशक्तीला येणाऱ्या या सतत बदलत्या, उलटसुलट वळणे घेणाऱ्या मागणीशी मेळ

घालण्याची लवचिकता, क्षमता कामगारांचे प्रजनन या पुरवठ्याच्या स्रोतामध्ये नाही.

. . . शेवटी बेरोजगारांच्या फौजेमार्फत!

कामगारवर्गामधली बेरोजगारांची फौज हाच श्रमशक्तीच्या मागणीला साजेसा लवचिकपणा असणारा साठा असतो. मागणी पुरवठ्याचा मेळ घालण्याचे माध्यम म्हणून हा साठा कार्य करत असतो. कामगारवर्गामधील कामावर असणारे व नसणारे ही विभागणी हा या माध्यमाचा आधार बनलेला असतो. श्रमशक्तीची मागणी वाढली की कामगारांमधली बेरोजगारांची फौज कमी होते, श्रमशक्तीची मागणी कमी झाली की ही फौज वाढते, पण यासाठी कामगारवर्गामध्ये एक बेरोजगारांचा विभाग कायमचा अस्तित्वात असणे हे आवश्यक असते! हा बेरोजगारांचा कायम अस्तित्वात असणारा विभाग हाच श्रमशक्तीच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ पडण्याचा आधार असतो. आणि भांडवली अर्थशास्त्रामध्ये हे सूत्रच बसत नाही. कामगारवर्गामधला एक विभाग हा कायमचा बेरोजगार असणे हा भांडवलशाहीचा अपरिहार्य परिणाम असतो हे भांडवली विचारांच्या चौकटीत कसे बसावे? यातून मार खाते ती वैज्ञानिकता, कारण श्रमशक्तीच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ घालू शकणारे दुसरे कोणतेही पर्यायी माध्यम भांडवली अर्थशास्त्र सांगू शकत नाही. पुन्हा एकदा श्रमशक्ती या वैशिष्ट्यपूर्ण क्रयवस्तूपाशी भांडवली अर्थशास्त्राची वैज्ञानिकता थांबते!

४. बेरोजगारांची राखीव फौज

भांडवलशाहीमध्ये कामगारांमध्ये असणारी कायमची बेरोजगारी ही नोंदलीही जात नाही. कारण ती दिसत नाही, असून भावत नाही. वरवर पाहिले तर नजरेतून सटकणाऱ्या या बेरोजगारांच्या विभागाला मार्क्स नाव देतो 'बेरोजगारांची राखीव फौज'. जरा डोळसपणे पाहिले तर ही बेरोजगारांची फौज सगळीकडे सापडू लागते—अगदी तुमच्यामध्ये आणि तुमच्या घरामध्येही! बदली कामगारच घ्या ना; गिरणीत अधिकृतपणे बदली कामगारांचे स्थान धारण करणारा कामगार काम नसेल तेव्हा बेरोजगारांच्या फौजेत मोडत असतो, पण बेरोजगारांमध्ये तो नोंदला जातोच असे नाही. कारण त्याच्याजवळ कार्ड असते! बेरोजगारांच्या राखीव फौजेचे तरंगता, सुप्त, साचलेला व बहिष्कृत असे चार विभाग मार्क्स पाडतो. आणि या चारही विभागांना भारताच्या संदर्भात काही खास महत्त्वदेखील आहे.[२]

फौजेची तरंगती तुकडी

बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या पहिल्या विभागाला मार्क्स तरंगता विभाग म्हणतो. या विभागात मोडणाऱ्या कामगारांचे भांडवलाच्या एका तुकड्याशी नुकतेच नाते तुटलेले असते, आणि दुसऱ्या तुकड्याशी (किंवा कधी कधी परत पहिल्याच तुकड्याशी) अजून नाते जुळायचे असते. दरम्यानच्या काळात तो तरंगत असतो. बदली कामगारांसारखेच कायमचे टेंपररी कामगार या विभागात मोडतात. प्रत्येक प्रकारच्या पेशामध्ये असा तरंगता विभाग सामाजिक पातळीवर अस्तित्वात असतो. आणि तोही प्रत्येक प्रकारच्या उत्पादनात. मोठमोठ्या कारखान्यांमध्ये काम केलेले, करणारे कामगारही त्यात असतात आणि अगदी लहान कारखान्यांमधले देखील. भांडवलशाहीची प्रत्येक प्रकारची प्रासंगिक मागणी पूर्ण करत हा विभाग भांडवलाच्या तुकड्यांतुकड्यांमधून किंवा कधी त्याच त्याच तुकड्यांपाशी फिरत असतो. नुकतीच कामाला लागलेली कामगारांच्या नव्या पिढीची श्रमशक्ती या तरंगत्या बेरोजगार विभागात एका बाजूने प्रवेश करत असते, तर दुसऱ्या बाजूने वयस्क व निकामी होत चाललेली जुन्या पिढीतील श्रमशक्ती बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या इतर विभागांमध्ये प्रवेश करत असते.

या तरंगत्या विभागाला निमकुशल आणि कुशल श्रेणीच्या श्रमशक्तीच्या प्रासंगिक मागणीच्या संदर्भात भांडवलशाहीत महत्त्वाचे स्थान असते. अकुशल श्रेणीची श्रमशक्ती भांडवलदाराला बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या इतर विभागांमधूनही उपलब्ध होऊ शकते पण निमकुशल आणि कुशल श्रेणींच्या बाबतीत मात्र तसे होऊ शकत नाही. भांडवलशाहीत निमकुशल आणि कुशल कामगारांचा एक बऱ्यापैकी भाग हा नेहमी या तरंगत्या विभागात मोडतो. भांडवली प्रगतीमुळे या विभागाची गरज नाहीशी न होता उलट एक नेहमीची गोष्ट बनते. कारण प्रगतीबरोबरच उलटसुलट वळणे आली, आणि या वळणांचा वेगही. निमकुशल आणि कुशल श्रेणींमधील कामावरील एकूण कामगार जितके जास्त तितकी या तरंगत्या विभागाची गरजही जास्त.

सुप्त बेरोजगारांची तुकडी

बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या दुसऱ्या विभागाला मार्क्स सुप्त बेराजगारीचा विभाग म्हणतो. बिगरभांडवली क्रयवस्तूंचे उत्पादन जिथे मोठ्या प्रमाणावर महत्त्वाचे असते अशा, विशेषत: ग्रामीण क्षेत्रामध्ये या विभागाचा मुख्य स्रोत

सापडतो. भांडवली क्षेत्रामध्ये होत असणाऱ्या रोजगाराच्या उपलब्धीमधील लहान मोठ्या आंदोलनांच्या वेळी या विभागाची बेरोजगारी स्पष्ट होत नाही; पण तसेच काही कारण घडले की अचानक या विभागातून रोजगार शोधणाऱ्या कामगारांचा एक लोंढाच बाहेर पडून औद्यागिक भांडवली क्षेत्रात येऊन दाखल होतो. बेरोजगारीचे प्रमाण फारसे नाही असे भासत असून एकदम बेरोजगारीचा राखीव साठा उघड पडतो.

या विभागाचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे गरीब शेतकऱ्यांसारखे अर्धसर्वहारा वर्ग. भांडवली उत्पादनाची बीजे एकदा शेतीक्षेत्रात रोवली गेली की घनीकरणामधून येणारी प्रवृत्ती व तिची बंधने एकूण सर्वच शेती उत्पादनाला लागू लागतात. घनीकरणामुळे बदललेल्या तांत्रिक जुळणीमध्ये श्रमसामग्रीला जास्त महत्त्व येत चाललेले असते. या भांडवली शेती उत्पादनाशी स्पर्धेत टिकायचे तर बिगरभांडवली गरीब व मध्यम शेतकऱ्यांनादेखील या तांत्रिक जुळणीची काही अंगे उत्पादकतावाढीसाठी स्वीकारावी लागतात. श्रमसामग्रीवर खर्च करण्यासाठी हातात जास्त पैसा असणे त्यांनाही आवश्यक बनू लागते व या पैशाचा जास्ती जास्त भाग त्यांना श्रमसामग्रीवर खर्च करणेही आवश्यक बनू लागते. भांडवली चष्म्यामधून मांडायचे झाले तर त्यांची बिगरभांडवली शेती 'भांडवलप्रधान' बनू लागते!

गरीब व मध्यम शेतकऱ्यांवर लादली गेलेली ही 'भांडवलप्रधान' शेती त्यांना एका दुष्टचक्रात अडकवते. बदललेल्या तांत्रिक जुळणीमुळे तुटपुंज्या जमिनीवरील त्यांच्या हातातील तुटपुंजी श्रमसामग्री ही त्यांची स्वत:ची श्रमशक्ती स्वत:च्या जमिनीवर पूर्णपणे वापरण्याच्या दृष्टीने अपुरी ठरू लागते. तरीही हा विभाग काम शोधणाऱ्या कामगारांच्या रूपात—उघडपणे बेरोजगार म्हणून—औद्योगिक कामगारवर्गात दाखल होत नाही. कारण त्याच्या तुटपुंज्या का होईना, पण श्रमसाधनांच्या मालकीने त्याला बिगरभांडवली उत्पादनाशी बांधून ठेवलेले असते. शेतीक्षेत्रामध्ये हा विभाग सर्वहारा होण्याच्या काठावर डगमगत उभा असतो. शेतीक्षेत्रात जेव्हा सापेक्ष वरकड-मूल्यावर आधारलेल्या केंद्रीकरणाची एखादी लाट येते किंवा एखादा दुष्काळाचा फेरा पडतो आणि तो या मालकीपासून तोडला जातो तेव्हाच तो निर्णायकरीत्या सर्वहारा बनून कामगारवर्गात दाखल होतो. किंवा भांडवलशाही उत्पादनाच्या औद्योगिक क्षेत्रातली तात्कालिक वाढ बऱ्याच वेगाने होत असेल तर त्या कायम रोजगाराच्या व वेतनाच्या पुरेशा बळकट प्रेरणेमुळे कधी शेती विकून, कधी ती

आप्तेष्टांना किंवा गावच्या सधन शेतकऱ्यांना बटाईने देऊन कामगारवर्गात दाखल होतो. पुरेसे कारण असल्याशिवाय या विभागातली सुप्त बेरोजगारी उघड्यावर येत नाही. दुष्काळ, त्या त्या क्षेतातील तीव्र मंदीच्या लाटा किंवा इतर क्षेत्रातील तीव्र तेजीच्या लाटा यांसारख्या घडामोडी या सुप्त विभागाचे डगमगते स्थान संपवतात व अचानक बेरोजगारांच्या फौजेचा हा भाग स्पष्टपणे व उघडपणे बेरोजगारांच्या फौजेचा भाग बनतो.

साचलेल्या बेरोजगारांची तुकडी

बेरोजगारांच्या राखीव फौजेचा तिसरा विभाग हा साचलेल्या किंवा कुंठित बेरोजगारीचा विभाग असतो. सुप्त बेरोजगारीच्या विभागाशी याचा जवळचा संबंध आहे. एका अर्थाने ज्या क्षेत्रांमध्ये बिगरभांडवली उत्पादनामधून भांडवली उत्पादनाकडे संक्रमण होते तिथे सुप्त बेरोजगारी हे त्या विभागातील बेरोजगारीचे पहिले रूप असते आणि साचलेल्या किंवा कुंठित बेरोजगारीचे रूप त्याचीच 'पुढची' अवस्था असते. जिथे भांडवली उत्पादनाचे प्रभुत्व तर निर्माण झालेले आहे पण हातकसब किंवा हातकारागिरी भांडवली उत्पादनालादेखील बंधनकारक आहे, अशा क्षेत्रांमध्ये ही कुंठित, साचलेली बेरोजगारी सापडते.

या क्षेत्रांमधल्या बहुसंख्य कामगारांचे स्थान हे बदली कामगारासारखे असते. काही दिवस रोजगार न मिळणे हा त्यांना काही दिवस रोजगार मिळण्याचाच एक अविभाज्य भाग बनलेला असतो! अशा क्षेत्रांमध्ये सापेक्ष वरकड-मूल्याच्या ऐवजी निव्वळ वरकड-मूल्याचे प्रभुत्व असते. कामावरील कामगारांचे दरडोई तास हे खूपच जास्त असतात. तेच काम कामाच्या तासांच्या 'वाजवी' ठरलेल्या मापांनी करायचे तर ते अनेक कामगारांमध्ये वाटले जाऊ शकते. पण भांडवली स्वरूपामुळे तसे न होता कामावरील कामगारांचे दरडोई तास आणि एका बेरोजगारांच्या विभागाचे शून्य तास असे मिळून ते वाटले गेलेले असतात. गृहोद्योगांमध्ये आणि कुटिरोद्योगांमध्ये तर हे अगदी पद्धतशीरपणे चालते. कामगारांमधली रोजगारासाठी तीव्र स्पर्धा ही गोष्ट या क्षेत्राचा आधारही असते आणि परिणामही. दिलेले काम हे काही कायम कामगारांऐवजी अनेक कामगारांना पाळीपाळीने देणे या क्षेत्रामधील भांडवलदार जास्त पसंत करतात व त्यांना ते शक्यही होते. कामगारांना त्यामुळे रोजगार सतत मिळत असतो व सतत सुटत असतो. एका अर्थाने या विभागाचे तरंगत्या विभागाशी साम्यही असते, कारण त्या विभागाप्रमाणेच या विभागातही कामावर नसलेल्या कामगाराचे भांडवलाच्या एका तुकड्याशी नाते नुकतेच तुटलेले

असते व दुसऱ्याशी अजून जुळू घातलेले असते. पण तरंगत्या विभागापेक्षा या विभागाचे एक महत्त्वाचे वेगळेपणही असते. हा फरक म्हणजे तरंगत्या विभागामध्ये कामावरील कायम कामगारांची संख्या ही बरीच मोठी असते व हा तरंगता विभाग त्या कायम रोजगाराशी जोडलेला एक छोटा भाग असतो. याउलट कुंठित बेरोजगारीच्या क्षेत्रांमध्ये कामावरील बहुसंख्य कामगारांना हे तरंगते स्थान आलेले असते हे त्याचे वैशिष्ट्य असते.

या प्रकारच्या विभागाला मार्क्सने दिलेले साचलेली, कुंठित बेरोजगारी हे नाव अगदी सार्थ आहे. कारण बेरोजगारीचे हे रूप नष्ट व्हायचे तर त्या क्षेत्रामध्ये सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती प्रभुत्वस्थानी येणे आवश्यक असते. आणि ही साचलेली बेरोजगारीच या बाबतीत अडथळा बनलेली असते. सापेक्ष वरकड-मूल्याच्या प्रवृत्ती क्षीण असल्यामुळे वेतन श्रमशक्तीच्या मूल्याच्या खाली ढकलले गेलेले असते, आणि निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीमुळे दरडोई 'वाजवी' भांडवली निकषांपेक्षा मोठा असलेला कामाचा दिवस हा त्या क्षेत्रात प्रचलित असतो. यंत्रे कशी येतात याची आपण चर्चा केली तेव्हा हे पाहिले होते की यंत्रांनी केवळ श्रम वाचले तर यंत्रे येतात असे नाही, तर भांडवलदारांना श्रमांसाठी द्यावे लागणारे मूल्य वाचले तरच सापेक्ष वरकडमूल्याचे साधन म्हणून यंत्रे येतात. श्रमशक्तीतून मिळालेले श्रम व त्या श्रमशक्तीसाठी द्यावे लागणारे मूल्य यातली तफावत या क्षेत्रात कमी वेतन व जास्त काम यांमुळे वाढलेली असते. जी यंत्रे वाजवी वेतन व वाजवी काम धरूनसुद्धा श्रमांसाठी भांडवलदारांना द्यावे लागणारे मूल्य वाचवतात अशी यंत्रेदेखील तिथे येणे दुरापास्त होऊन बसते. थोडक्यात, ही बेरोजगारी उत्पादनाच्या भांडवली स्वरूपामुळे स्वत:च्या कुंठित स्वरूपाचे पुनरुत्पादन करत असते.

बहिष्कृत, भणंग बेरोजगारांची तुकडी

बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या तळाच्या चौथ्या विभागाला मार्क्सने भणंग (पॉपर) विभाग हे नाव दिले आहे. या विभागामधील श्रमशक्तीला भांडवलशाहीने सामाजिक उत्पादनाच्या क्षेत्रामधून बहिष्कृत केलेले असते. या भणंग विभागातही काही उपविभाग असतात. गुन्हेगारी, लांडीलबाडी, चोरीमारी यांमध्ये ढकलली गेलेली श्रमशक्ती हा याचा पहिला उपविभाग असतो. भांडवली निकषांप्रमाणे त्यांना 'रोजगार' उपलब्ध असतो आणि ते त्यांचे त्यांचे 'व्यवसाय'च करत असतात. त्यामुळे बेरोजगारांच्या विभागामध्ये त्यांना धरणे

हे भांडवली सर्वेक्षणांच्या कक्षेत फारसे येत नाही! अन् तरीही भांडवली उत्पादनाच्या दृष्टीने हा उपविभाग म्हणजे बेरोजगारांची राखीव फौज जरूर ठरतो. संपकाळात तर या उपविभागातील टग्यांची भरती किती उपयोगी ठरते याचा अनुभव भांडवलदारांना—आणि कामगारांना—नेहमीच येत असतो!

या बहिष्कृतांमधील एका उपविभागाचे नाते भांडवलाच्या कोणत्याही तुकड्याशी इतके निर्णायकपणे तुटलेले असते की ही श्रमशक्ती भांडवली उत्पादन क्षेत्रामध्ये काम शोधण्याची तसदी देखील घेत नाही अन् त्यामुळे काम शोधणाऱ्या बेरोजगारांमध्ये तिची गणनाही होत नाही आणि नोंदही होत नाही. भांडवली समाजाच्या काठाशी ही श्रमशक्ती कशीबशी जगत असते. उकिरडे उपसून नासकेकुजके अन्न शोधून गोळा करणारी, भीक मागणारी, कागद वेचणारी ही श्रमशक्ती तुम्हाला अगदी पावलोपावली सापडू शकते. आता हा सुद्धा व्यवसाय, धंदा बनतो, त्यातही 'भांडवल' गुंतते ती गोष्ट वेगळी. पण आपण विचार करत आहोत भांडवली उत्पादनाचा, आणि ही श्रमशक्ती त्याच्या बाहेर तग धरून असते. एक राखीव फौज म्हणून. तेजीमंदीच्या लाटांच्या तीव्रतेबरोबर तिचीही वधघट चालू असते.

दुसरा एक उपविभाग अनाथ मुलांचा किंवा विनासहारा सोडून दिलेल्या मुलांचा. रोज पोलीस स्टेशनांमध्ये अशा सोडून दिलेल्या अर्भकांची आणि मुलांची नोंद होत असते. आणि रेल्वे-स्थानक हे अशा गोष्टींसाठी उत्तम ठिकाण असते. अर्थात या वरील दोन्ही उपविभागांमध्ये श्रमशक्तीचा मुक्काम तात्पुरता असतो. तिथून तिला हळूहळू गुन्हेगारी व्यवसायात गुंतलेल्या उपविभागात किंवा कुंठित विभागात सामील व्हावे लागते. नाहीतर पुढे वर्णन केलेल्या रुग्णाइतांच्या उपविभागामध्ये. गुन्हेगारी व्यवसायाचे तर हे भरतीचे ठाणे असते. बहुतेकदा या उपविभागामधला मुक्काम म्हणजे गुन्हेगारी विभागात सामील होण्यापूर्वीचा उमेदवारीचा काळ ठरतो.

या बहिष्कृत, भणंग विभागाचे उपविभाग इतके विविध आहेत की त्या सर्वांचे यथायोग्य वर्णन करणे अशक्य आहे, पण त्यांतील एका शेवटच्या उपविभागावर मात्र आपण थोडीफार नजर टाकली पाहिजे. तो म्हणजे भांडवलशाहीच्या 'रुग्णाइतांचा' उपविभाग. श्रमशक्ती पंगू झाल्यामुळे, वेगाने संपल्यामुळे 'निकामी' ठरलेल्या श्रमशक्तीचे भवितव्य त्यांना या उपविभागात घेऊन येते. भांडवल-संचयाच्या धकाधकीत यंत्रांमुळे, खाणीमुळे, धुळीमुळे, रसायनांमुळे, निकृष्ट आहार आणि जीवनमानामुळे अर्धवट किंवा कायमची

रुग्णाईत बनलेली, अपंग झालेली, काम करून क्षीण झालेली सर्व प्रकारची श्रमशक्ती यात मोडते. पूर्वी उद्धृत केलेला एक आकडा आठवत असेलच— जगात दर पाच मिनिटाला, केवळ नोंदल्या गेलेल्या कामावरील अपघातामध्ये, श्रमशक्ती संपूर्णपणे निकामी होणाऱ्या कामगारांची संख्या १४ आहे. म्हणजे दिवसाला ४ हजार कामगार यात दाखल होत असतात; न नोंदलेल्या, अर्धवट निकामी झालेल्या श्रमशक्तीची गोष्टच सोडा.

या सर्वांशिवाय भांडवलशाहीमधील क्रूर स्पर्धेशी जे जुळवून घेऊ शकत नाहीत, तिथल्या कोरड्या अनास्थेशी ज्यांचे जमत नाही असेही अनेकजण असतात. ही व्यवस्था एका बाजूला त्यांना पैशाशिवाय सर्व जीवनमूल्ये नाकारायला लावत असते पण दुसऱ्या बाजूला त्याच पैशापासून त्यांना तोडीत असते. या व्यवस्थेच्या अशा अंतर्विरोधातून निर्माण होणारे, भरडले जाणारे सर्व मानसिक रुग्णदेखील याच रुग्णाइतांच्या उपविभागात मोडतात. भांडवलशाहीशी सामाजिक, आर्थिक, मानसिकरीत्या जे जुळवून घेऊ शकत नाहीत, त्या सर्वांचा समावेश बेरोजगारांच्या राखीव फौजेच्या या बहिष्कृत विभागात होत असतो. भांडवलशाहीच्या रुग्णाइतांसाठी तिने हे अजब हॉस्पिटल खोललेले असते.

बेरोजगारांची फौजूएक वेगळे नाते

बेरोजगारांच्या या राखीव फौजेच्या विभागांबद्दल अर्थशास्त्रज्ञांना काय वाटत असेल ते वाटो. पण जरा डोळे उघडे ठेवून चारी बाजूला पाहिले तर ही राखीव फौज आपल्याला सगळीकडे आढळेल. हे साहजिकच आहे. कारण भांडवलशाहीमध्ये श्रमशक्ती ही 'क्रयवस्तू' म्हणून उपलब्ध व्हायची असेल, ती बाजारपेठेच्या नियमाप्रमाणे विकली जाऊन तिच्या मागणी-पुरवठ्याची सांगड बाजारपेठेमार्फत बसणे शक्य व्हायचे असेल तर, बेरोजगारांची फौज ही तिच्या राखीव विभागांसकट कामगारवर्गाचा भाग असणे आवश्यक असते. भांडवल-संचयाचा विचार करताना श्रमशक्तीचे पुनरुत्पादन याचा अर्थ भांडवलशाहीमध्ये या फौजेचेही पुनरुत्पादन हा असतो. आणि आंगिक प्रमाण वाढण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीतून निर्माण होणारी कात्रीसारखी परिस्थिती हीच या फौजेच्या पुनरुत्पादनाचा आधार असते. बेरोजगारांची फौज हीदेखील भांडवली उत्पादनामध्ये अंतर्भूत आहे, व तीही पुनरुत्पादित होत असते, हे भांडवल-संचयाचा, भांडवली विकासाचा विचार केल्यावर स्पष्ट होते.

बेरोजगारीची जबाबदारी कोणावर?

पण भांडवलशाहीला आवश्यक म्हणायचे तर या फौजेचे पुनरुत्पादन होते कुठून? अलीकडच्या काळातील काही प्रगत भांडवली देश सोडले तर या पुनरुत्पादनाची जबाबदारी ही मुख्यत: कामावरील कामगारांनाच उचलावी लागत असते. राखीव फौजेचे पहिले तीन विभाग तर सरळसरळ कामावरील कामगारांच्यापासून फारसे वेगळे काढता येत नाहीत. या विभागांतल्या कामगारांना 'फौजेच्या आत' व 'फौजेच्या बाहेर' असे 'तळ्यात की मळ्यात'चा खेळ भांडवलशाही खेळवत असते! कामगारवर्गाचा हा भाग फौजेच्या बाहेर आहे की आत हा फरक केवळ तात्कालिक असतो. नेहमी कामावर आणि नेहमी बेरोजगार ही दोन टोके सोडली तर मध्ये ही मोठी, हलती सरमिसळ असते. आणि ही दोन टोकेसुद्धा एक होत असतात! कारण नेहमी बेरोजगार असणारी श्रमशक्ती शेवटी नात्यागोत्याने, सग्यासोयरीकीतून कामावर असणाऱ्या श्रमशक्तीशीच जोडलेली असते. तिच्याच कामावर असलेल्या भावा-बहिणीकडे, मामा-काकूकडे ती राहत असते.

थोडक्यात, रोजगारातून कामगारवर्गाच्या हाती आलेल्या मूल्यामधून संपूर्ण कामगारवर्गाचे, बेरोजगारांच्या स्थायी, अस्थायी, राखीव फौजेसकट संपूर्ण वर्गाचे पुनरुत्पादन होणे आवश्यक असते. इथे वर्गीय संबंधांचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. व्यक्तीव्यक्ती म्हणून फोडून कामगारांचे दरडोई वेतन, दर ताशी वेतनाची पातळी यातून जे जीवनमान रास्त म्हणून मान्य होत असते त्यापेक्षा कितीतरी खालचे जीवनमान कामगारवर्गाच्या वाट्याला प्रत्यक्षात येत असते. भास होत असतो तो व्यक्तिगत श्रमांचा मोबदला दिल्याचा, प्रत्यक्षात मात्र होत असते ते संपूर्ण श्रमशक्तीचे पुनरुत्पादन. प्रत्यक्षातले कामगारांचे जीवनमान आणि भांडवलशाहीनेच घालून दिलेले उचित जीवनमानाचे निकष यांच्यातली तफावत त्यातून दडलेली राहते. वाढत्या वेतनपातळीला जर वाढत्या बेरोजगारांच्या फौजेची जोड असेल तर प्रत्यक्षात वेतन कमीदेखील होऊ शकते.

या दृष्टीने पाहता बेकारभत्त्याची मागणी एक वेगळेच महत्त्व घेते. भारतामध्ये अजून या मागणीने जोर धरलेला नाही. पण अनेक प्रगत भांडवली देशांमध्ये बेकारभत्ता या ना त्या स्वरूपात रूढ झालेला आहे. कामगार-चळवळीच्या दृष्टीने या मागणीला अनेक प्रकारचे महत्त्व आहे. एकतर त्यातून प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क प्रस्थापित होत असतो; अन् त्याबरोबरच ते जीवनमानाचे

निकष सर्वसाधारण मान्यता मिळवून मानवी अधिकारांच्या स्वरूपात कामगारवर्गाने जिंकून घेतलेले असतात ते प्रत्यक्षात लागू व्हावेत यासाठीही ते महत्त्वाचे असते. या अर्थाने श्रमशक्तीचे मूल्य प्रस्थापित निकषांवर दिले जावे यासाठीही ती मागणी असते. अर्थात बेकारभत्ता देण्याचे मान्य झाले तरी भांडवली चौकटीच्या आणि व्यवहाराच्या मर्यादा यातून नाहीशा होत नाहीतच. पण स्पष्ट होतात. ज्याप्रमाणे महागाई भत्ता कधीच शंभर टक्के भरपाईने मिळत नाही तसाच बेकार भत्ता देखील मान्य होतो तो अगदी निकृष्ट जीवनमानाशी बांधलेला, फक्त काही क्षेत्रांमध्ये आणि फक्त काही प्रकारच्या लांब पल्ल्याच्या बेरोजगारीसाठी. मान्यताप्राप्त निकष आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांच्यातील तफावत कमी होते, पण दूर होऊ शकत नाही. आणि मुख्य म्हणजे 'योग्य' बेकारभत्ता ठरला की या तफावतीची 'योग्य' पातळीदेखील आपोआप ठरते!

५. कामगारवर्गाच्या वाट्याला येणारी भांडवलशाहीची फळे

कामाबाहेरील कामगारजीवन आणि भांडवल-संचय

भांडवल-संचयाचा आणखी एक परिणाम हा कामगारांच्या कामाबाहेरील जीवनावर होत असतो. कामाबाहेरील स्वत:च्या जीवनात, स्वत:च्या श्रमांच्या आधारावर ज्या ज्या सुखसोयी निर्माण करण्याची क्षमता कामगारवर्गाच्या हातात असते ती देखील वाढत्या प्रमाणात मारली जात असते. हे काही बाबतीत इतक्या झपाट्याने झालेले असते की अशी काही प्रक्रिया घडली आहे हेच विसरले जावे. साधी घरांची गोष्ट घ्या. भांडवलीपूर्व समाजामध्ये मुबलकपणे उपलब्ध असणाऱ्या माती, लाकूडफाटा, गवत, इत्यादी गोष्टींपासून कष्टकरी स्वत:च्या श्रमातून स्वत: घरे बांधत. भांडवलशाही आल्यानंतर मात्र लाकूडफाटा, जंगलसंपत्ती या खाजगी मालकीच्या क्रयवस्तू बनतात. जमिनीचे तुकडे आणि त्यांतली मातीदेखील, किंवा समुद्रकिनारची आणि तळची वाळूदेखील. त्यांच्या संदर्भातही एक भांडवली उद्योग उभा राहतो. लाकूड आता विकत घ्यावे लागते, अन् मातीही, अन् असे सर्वच काही. कामगार बनल्यावर त्याच्या आयुष्याचा हा भागदेखील भांडवली उद्योगांवर अवलंबून असणाऱ्या क्रयवस्तूंशी निगडित भाग बनत जातो. कपडे, शिवणकाम, लाकडी वस्तू, घरातल्या सर्वच वस्तू हळूहळू भांडवली उद्योगातून येऊ लागतात. त्यासाठी लागणारा कच्चा माल, श्रमविषय हे भांडवली उद्योगांचे भाग बनणे हा या प्रक्रियेचा पहिला टप्पा असतो.

दुसऱ्या बाजूला अशा प्रकारच्या सोयी निर्माण करण्यासाठी लागणारे विविध प्रकारचे कसब आणि अशी श्रमशक्ती कामगारवर्गाच्या अंगी असणे हे महत्त्वाचे असते. भांडवलशाही एका बाजूला त्याची श्रमशक्ती ही पूर्णपणे कारखान्यातच खर्च करते. घरी येतो तो श्रमशक्ती संपलेला, उद्याच्या चक्रासाठी श्रमशक्ती पुनरुत्पादन करण्याची गरज असलेला एक गरजू, थकलेला कामगार. दुसऱ्या बाजूला अशा प्रकारचे कसब वापरण्यासाठी लागणारे श्रमविषय हे भांडवलशाहीने ताब्यात घेतलेले असतात. त्यासाठी श्रमशक्तीच्या मूल्यामधून मूल्य देणे त्याला जास्त जास्त कठीण होत जाते. आणि कसब वापरले गेले नाही की गंजते, आणि गंजून गंजून संपते. कष्टकऱ्यांची पुढची पिढी आणि अगोदरची पिढी यांच्यामध्ये या कसबाची देवाण-घेवाण व्हायची तर असे कसब वापरले जाऊन त्यातून त्या सोयी प्रत्यक्ष दोन पिढ्यांच्या सहकार्यातून तयार व्हाव्या लागतात. ही शक्यताच भांडवलशाहीने मारलेली असते. कामगारांची पुढील पिढी हे कसब आत्मसात न करताच वाढते. थोड्याच काळात हे कसब संपुष्टात येते. कामगारांचे कामाबाहेरचे जीवन हे त्या त्या गोष्टीसाठी आता भांडवली उत्पादनव्यवस्थेवर अवलंबून असते.

अर्थात, भांडवली अर्थव्यवस्थेमुळे जो श्रमप्रक्रियेचा विकास होतो त्यातून अशा वस्तू वा सोयी मिळवण्याच्या नवनव्या क्षमता वाढत असतात. त्यांची विविधता आणि उत्पादकताही वाढत असते. थोडक्या श्रमांमध्ये आपल्या मनाजोगते सामान बनवणे, विजेच्या उपकरणाची रचना करणे इत्यादी गोष्टी स्वहस्ते करण्याची शक्यता वाढत असते, अशा गोष्टींसाठी लागणारे ज्ञान वाढत असते, ग्रथित स्वरूपात सहज उपलब्ध असते. परंतु त्याचेवळी कामावरच कामगारवर्गाची श्रमशक्ती संपत असते, आणि त्यांच्या श्रमशक्तीचे मूल्य हे फक्त उपजीविकेसाठी आवश्यक क्रयवस्तूंपुरतेच मर्यादित होत असते. त्यामुळे पूर्वीच्या समाजव्यवस्थांपेक्षा भांडवलशाहीमध्ये या सर्व क्षमता वाढलेल्या असतात, पण त्याचवेळी या क्षमता स्वत:च्या जीवनात प्रत्यक्षात वापरता येण्यापासून कामगारवर्ग वंचित झालेला असतो. स्वत:च्या उपजीविकेसाठी स्वत:चे श्रम वापरून मनाजोगत्या सोयी उपलब्ध करून घेण्याच्या क्षमता कामवर्गासमोर निर्माण होत असतात पण त्याचवेळी तो त्या सोयींपासून तोडला जात असतो.

आणि अशा सोयी क्रयवस्तू बनल्या की त्यांना बाजारपेठेचे भांडवली नियम लागू होतात. वरकड-मूल्यातला उपभोगासाठी उपलब्ध झालेला भाग हा अशा

गोष्टींसाठी, त्यातल्या चांगल्यात चांगल्या गोष्टींसाठी उपलब्ध होत असतो. भांडवलदारांच्या गरजेसाठी, त्यांच्या मागणीप्रमाणे बाजारपेठ वळवणारे मूल्य वरकडमूल्याच्या रूपात कामगारच त्यांच्या हातात ठेवत असतात. रस्ते, घरे, शाळा, राहण्याच्या जागा, खेळाची मैदाने, पुस्तके जे जे म्हणून मानवी जीवनाच्या गरजा भागवता भागवता आनंद घेण्याचेही साधन असते त्याला हा नियम लागू होतो. रस्ते प्रथम निर्माण होतात ते भांडवलदारांच्या कारखान्यांपर्यंत आणि वस्त्यांपर्यंत, तेच नळांचे, तेच शाळांचे, मैदानांचे, पुस्तकांचे... आणि नंतर त्यांतील सर्वांत चांगल्या, सर्वांत आनंददायी अशा साधनांची निर्मिती भांडवलदारांसाठी होऊ लागते व जे जे निकृष्ट, आकारहीन, तुटपुंजे उत्पादन असते ते कामगारवर्गाच्या वाट्याला येऊ लागते. समाजात जसजशा नव्या शक्ती, नव्या क्षमता, नवे उत्पादन वाढू लागते तसतसे त्यांनाही हा नियम लागू होतो.

अर्थात, या सर्वांतूनही कामगारवर्गाला अनेक प्रकारच्या सोयी वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत असतात. पण भांडवलदारांच्या सोयीमधली अनेकपट वाढ ही कामगारांना उपलब्ध होणाऱ्या वाढीची अट असते. सापेक्षत:, भांडवलदारांना उपलब्ध होणाऱ्या साधनांच्या तुलनेत आणि समाजाच्या क्षमतांच्या तुलनेत, कामगारांचे जीवनमान सतत घसरत असते. भांडवल-संचयाचा हा अटळ परिणाम असतो. भांडवल-संचय, भांडवली विकास शेवटी हे फळ कामगारांच्या हाती ठेवत असतो; बेरोजगारांची अविभाज्य फौज, या फौजेच्या पुनरुत्पादनाचा वाढता पाया. आणि सामाजिकदृष्ट्या उपलब्ध क्षमतांच्या तुलनेत सतत घसरणारे जीवनमान.

मधून मधून हलाखीचा काळ अपरिहार्य

बेरोजगारांच्या फौजेच्या विवेचनाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे मार्क्सने काढलेले कामगारांच्या जीवनमानाबद्दलचे निष्कर्ष. सामाजिक क्षमतांच्या तुलनेत जरी कामगारांच्या जीवनमानात सतत घट होत असली तरी काही प्रमाणात श्रमशक्तीच्या मूल्याबाबत ठरणारे मान्यताप्राप्त निकष व प्रत्यक्षातले कामगारांचे जीवनमान वाढत असते हे मार्क्स अमान्य करत नाही. पण त्याचवेळी, मंदीच्या काळात बेरोजगारांच्या फौजेच्या अस्तित्वाचा परिणाम फारच गंभीर ठरत असतो. याचे उदाहरण घ्यायचे झाले तर भारताच्या इतिहासातील त्याच प्रकारचे एक समांतर उदाहरण घेता येईल. अवर्षण संपते कुठे आणि दुष्काळ कुठे सुरू होतो? कमी पाऊस पडणे म्हणजे काही दुष्काळ

नव्हे. जेव्हा शेतकऱ्यांकडे आपली किमान गरज भागवूनही काही साठा शिलकीत राहतो तेव्हा थोड्याफार अवर्षणाचे रूपांतर दुष्काळात होत नाही. पण जर शेतकरी आपल्या किमान गरजांच्या काठावर जेमतेम जगत असेल तर तितक्याच अवर्षणाचेही फटकन दुष्काळात रूपांतर होऊ शकते. बेरोजगारांची फौज कामगारवर्गावर असाच परिणाम करीत असते. मंदीच्या काळात बेरोजगारांची फौजही वाढते आणि श्रमशक्तीचे व्यक्तिगत मूल्यदेखील झपाट्याने घसरते. त्यामुळे मंदीच्या लाटांमध्ये कामगारवर्गाच्या जीवनमानात मोठ्या प्रमाणावर कपात होते. त्यामुळे एकंदरीत जरी वाढते जीवनमान कामगारवर्गाला लाभत असले तरी हलाखीचे काळ मधूनमधून येणे हेही कामगारवर्गाच्या लेखी अटळ असतेच.

भांडवली व्यवस्थेच्या कामगारांवरील परिणामांपर्यंत पोचण्यासाठी मार्क्सने क्रयवस्तूंपासून सुरू केलेले विश्लेषण इथे येऊन संपते. त्या व्यवस्थेचे संपूर्ण विदारक चित्र उभे करून. कामगारवर्गाच्या जीवनावर भांडवलशाही काय परिणाम करते हे सैद्धांतिक पातळीवर त्याने या सर्व विश्लेषणातून दाखवले. माणसांच्या मूलभूत प्रेरणा आणि कामगारवर्गाचे हित यांची पक्की सांगड त्याने घातली. आणि कामगारवर्गाने या व्यवस्थेला मूठमाती देऊन स्वत:च्या ताकदीवर नवी व्यवस्था उभी केल्याशिवाय, कामगारवर्गीय क्रांतीशिवाय खऱ्या अर्थाने मानवी समाज उभा राहू शकणार नाही या क्रांतिकारक निष्कर्षाचा सैद्धांतिक पाया त्याने भक्कमपणे घातला.

मार्क्सच्याच शब्दांत . . .

भांडवल-संचयाचे कामगारांवरील परिणाम मार्क्स एका प्रदीर्घ प्रकरणात अगदी तपशीलवार तपासतो. यासाठी त्या काळातल्या सर्वांत प्रगत भांडवली देशातील म्हणजे इंग्लंडमधील कामगारांची परिस्थिती त्याने निवडली. इंग्लंडमधल्या कामगारांमधील सर्व प्रकारच्या थरांची—मागासलेला, शेतीतील सर्वहारा-अर्धसर्वहारा थरांपासून ते सर्वात पुढारलेल्या उद्योगातील कामगारांची परिस्थिती सर्व प्रकारच्या तेजीमंदीच्या काळामध्ये कसकशी बदलत गेली ते मार्क्सने भांडवली स्रोतांच्या पुराव्याच्या आधाराने तपासले, आणि त्यावरील भांडवली भाष्यांचा व टीका-टिप्पणीचाही त्याचवेळी त्याने समाचार घेतला आहे. भांडवलशाहीतील कामगारवर्गांच्या अवस्थेचे एक दारुण चित्र शंभरएक पानांच्या सज्जड पुराव्याने सिद्ध होऊन आपल्यासमोर उभे राहते. त्यातला निष्कर्ष त्याच्याच शब्दात वाचण्याजोगा आहे.

'... सापेक्ष वरकड-मूल्याच्या उत्पादनाचे विश्लेषण करताना आपण हे पाहिले की, भांडवलदारी पद्धतीत सामाजिक श्रमांची उत्पादकता वाढवण्याच्या सर्व पद्धती व्यक्तिगत कामगाराच्या हिताचा बळी देऊन अमलात आणल्या जातात; उत्पादनाचा विकास करणारी सर्व साधने उत्पादक कामगारावर हुकमत गाजवण्याच्या व त्याचे शोषण करण्याच्या साधनात रूपांतरित होतात; कामगाराची छाटणी करून त्याला माणसाचा केवळ एक अंश बनवून टाकले जाते; त्याला केवळ यंत्राचा एक पूरक भाग या हीन पातळीवर नेऊन ठेवले जाते; त्याच्या कामातील सर्व गोडी काढून घेऊन त्याला चीड आणणाऱ्या कष्टाचे स्वरूप दिले जाते; श्रमप्रक्रियेत ज्या प्रमाणात एक स्वतंत्र शक्ती म्हणून विज्ञानाचा अंतर्भाव होतो त्या प्रमाणात त्या क्रियेत असणाऱ्या संभाव्य बौद्धिक क्षमतांपासून कामगार वंचित केला जातो; कामगार ज्या परिस्थितीत काम करतो तिला विकृत स्वरूप दिले जाते, आणि श्रमप्रक्रिया चालू असताना, अत्यंत क्षुद्र व म्हणून अधिकच तिरस्करणीय बनलेल्या जुलमाखाली त्याला जखडून ठेवले जाते; त्याचे सारे जीवनच कामाचा वेळ बनविले जाते आणि त्याच्या बायका-मुलांना भांडवलरूपी जगन्नाथाच्या रथाच्या चाकांखाली बळी दिले जाते. परंतु वरकड-मूल्य उत्पादनाच्या सर्व पद्धती त्याचवेळी संचय करण्याच्याही पद्धती असतात; आणि संचयाचा होणारा प्रत्येक विस्तार हा पुन्हा त्या पद्धती विकसित करण्याचे साधन बनतो. यावरून असा निष्कर्ष निघतो की, भांडवलाचा संचय ज्या प्रमाणात वाढत जातो त्या प्रमाणात कामगाराचे जीवन खालावतच गेले पाहिजे; मग त्यांचे वेतन जास्त असो की कमी. सापेक्ष वरकड लोकसंख्या किंवा औद्योगिक राखीव फौज, आणि संचयाची व्याप्ती आणि जोम यांच्यात समतोल प्रस्थापित करणारा नियमच अखेरीस ... कामगारांना भांडवलाशी जखडून टाकतो. या नियमामुळे भांडवलाच्या संचयाला अनुरूप असा दारिद्र्याचा संचयही होतो. म्हणूनच एका टोकाला होणारा संपत्तीचा संचय हा त्याच वेळी दुसऱ्या टोकाला दारिद्र्य, यातनामय कष्ट, गुलामगिरी, अज्ञान, क्रौर्य, मानसिक अधोगती यांचा संचय असतो; हे दुसरे टोक म्हणजे भांडवलाच्या स्वरूपात स्वतःचे उत्पादन करणारा कामगारवर्ग होय.'[३]

६. भांडवलशाहीच्या पूर्वअटींकडे . . .

येथपर्यंत, भांडवलशाही स्वत:च्या पायावर अगोदरच उभी आहे असे धरून तिचे विश्लेषण मार्क्स करतो. भांडवली उत्पादनव्यवस्था गृहीत धरून सुरुवात करून पुढील सर्व निष्कर्ष सैद्धांतिकदृष्ट्या अपरिहार्यपणे उलगडतात हे तो येथपर्यंत दाखवतो. पण एक प्रश्न मार्क्सने आतापर्यंत गुलदस्त्यात ठेवलेला होता. तो म्हणजे, भांडवलशाही उत्पादनाच्या पूर्वअटी कुठून तयार होतात? आपल्या स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या भांडवलशाही व्यवस्थेच्या विश्लेषणाच्या शेवटापर्यंत हा प्रश्न राखून ठेवण्याचे एक महत्त्वाचे कारणदेखील आहे. भांडवलशाहीच्या विश्लेषणातून भांडवल-संचयाचा, भांडवली विकासाचा जो अर्थ सिद्ध होतो त्याचाच संबंध भांडवलशाहीच्या पूर्वअटी निर्माण होण्याशी असतो. मार्क्सच्या भांडवलशाही व्यवस्थेच्या विश्लेषणाचा शेवट आपोआप त्याला तिच्या सुरुवातीकडे घेऊन जातो. सुरुवात तपासायला सैद्धांतिक आधार हा शेवटातून निर्माण झालेला असतो. पूर्वअटी तपासायला आधार परिणामांमधून तयार झालेला असतो.

भांडवलशाहीच्या जन्मकथेशी संबंध असलेला हा भांडवलशाहीचा परिणाम आपण घनीकरण आणि केंद्रीकरणाच्या संदर्भात पाहिला होता. भांडवल-संचय याचा तिथे उघड होणारा अर्थ म्हणजे समाजातील जास्तीत जास्त उत्पादनसाधनांच्या मालकीपासून जास्तीत जास्त लोकांना तोडून, ती मोठ्यात मोठ्या गठ्ठ्यामध्ये कमीत कमी लोकांच्या हातात केंद्रित करणे हा होता. कामगारवर्गावरचा परिणाम यात आणखी एक भर घालतो. कामगारवर्ग श्रमसाधनांच्या मालकीपासून जास्ती जास्ती प्रमाणात तुटतोच, पण कामावरील कामगारांना निदान बदलत्या भांडवलाच्या रूपात श्रमसाधनांशी नाते जोडणे शक्य होत असते. बेरोजगारांच्या फौजेचा अर्थ असा होतो की भांडवल-संचय कामगारवर्गाच्या एका भागाला श्रमसाधनांशी असलेल्या या तात्पुरत्या नात्यापासूनही कायमचे अलग करत असतो व त्यामार्फत त्यांना उपजीविकेच्या साधनांपासूनदेखील अलग करत असतो! थोडक्यात भांडवलशाहीचा विकास म्हणजे कष्टकऱ्यांची श्रमसाधनांपासून, निर्माण झालेल्या भौतिक संपत्तीपासून आणि त्यांच्या उपजीविकेच्या साधनांपासून वाढती तोडणूक! हाच भांडवल-संचयाचा अर्थ मार्क्सला भांडवलशाहीच्या जन्माकडे, भांडवली व्यवस्थेच्या पूर्वअटींकडे घेऊन जातो.

[१] घनीकरण आणि केंद्रीकरण या दोन्ही संकल्पांमधील फरक हा भांडवलशाहीच्या विकासातील मक्तेदारी अवस्थेशी जैवपणे संबंधित आहे. मक्तेदारीचे बहुतेक भांडवली विश्लेषण हे केंद्रीकरणावर आधारलेले असते. परंतु भांडवलशाहीच्या विकासामधील पुढचा टप्पा म्हणून जी मक्तेदारी अवस्था येते ती घनीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून येते. भांडवलाचे इतके घनीकरण झालेले असते की भांडवली स्वरूपात ते फक्त मक्तेदारीच्या स्वरूपातच सामावून घेतले जाऊ शकते. थोडक्यात, भांडवली चौकटीत राहून या मक्तेदारीविरुद्धचा लढा कधीच पूर्ण होऊ शकत नाही. याउलट घनीकरणाचा आधार नसलेली केवळ केंद्रीकरणावर आधारलेली मक्तेदारी ही भांडवली चौकटीत राहूनदेखील मोडून काढणे शक्य असते. त्यादृष्टीने घनीकरणाचा आधार नसलेली मक्तेदारी ही भांडवलशाहीची पुढची अवस्था नसते. भांडवली अर्थशास्त्रज्ञांच्या अर्थात हे गावीही नसते. यातील फरकाची दखल ते कुठेकुठे घेतात. पण त्यांच्या मक्तेदारीबद्दलच्या विचारांचा तो सैद्धांतिक आधार ठरू शकत नाही. त्यादृष्टीने लेनिन वगैरेंची मांडणी ही मार्क्सइतक्या काटेकोर आधारावर त्यांनी प्रस्थापित केलेली नसली तरी मक्तेदारी ही भांडवली विकासातली भांडवलशाहीची पुढची अवस्था म्हणून तिचे वेगळेपण पूर्णपणे आत्मसात करणारी दिसते.

[२] नोकरीवर नसलेल्या आणि घरकाम करणाऱ्या स्त्रिया हा या चारी विभागांना काही प्रमाणात छेदून जाणारा बेरोजगारांच्या राखीव फौजेंचा एक महत्त्वाचा भाग असतो. त्याची स्वतंत्रपणे स्त्रियांच्या घरकामाबद्दलच्या परिशिष्टामध्ये नोंद घेतलेली आहे.

[३] कार्ल मार्क्स, कॅपिटल, खंड १, प्रोग्रेस पब्लिशर्स, मॉस्को, १९७७, पृ.६०४

१६. आदिम संचय : भांडवलशाहीचा पूर्वेतिहास

आतापर्यंतच्या विश्लेषणात मार्क्सने भांडवली व्यवस्थेच्या पूर्वअटी गृहीत धरल्या होत्या. भांडवलदारवर्गाच्या हातात पुरेसे भांडवल आहे, त्याने गुंतवलेले मूळ भांडवल त्याच्या हातात आहे, असे गृहीत धरले होते. उत्पादनसाधनांपासून तोडली गेलेली माणसे श्रमशक्तीच्या स्वरूपात त्यांची निर्मितीक्षमता क्रयवस्तूंच्या बाजारात विकायला उभी आहेत असे गृहीत धरले होते. आणि आलेले उत्पादन विकायला आवश्यक ती बाजारपेठ तयार आहे असेही गृहीत धरले होते. एकदा या पूर्वअटी मान्य केल्या की नंतर केवळ क्रयवस्तूंच्या नियमांच्या आधारे भांडवलशाही कशी चालते, तिच्या नफ्याचे रहस्य काय, तिच्या विकासाची दिशा काय, आणि या सर्वांचा कामगारवर्गासाठी अर्थ काय याचा मार्क्सने काटेकोर शोध घेतला. त्यातून या व्यवस्थेच्या उच्चाटनाच्या क्रांतिकारक निष्कर्षाचा पाया त्याने घातला. स्वत:च्या पायावर उभे राहिलेले मूळ भांडवली संबंध ही वस्तुस्थिती एकदा मान्य केली की घडणारे हे सर्व अपरिहार्य परिणाम मार्क्स दाखवतो. पण या गृहीतकृत्याचे काय? या भांडवली व्यवस्थेच्या पूर्वअटी कुठून निर्माण झाल्या? या क्रयवस्तूंच्या नियमांच्या आधारावर निर्माण झाल्या आहेत का? आणि त्यापासून कामगार वर्गाला काही धडा मिळतो का? हे सर्व प्रश्न मार्क्सने

काटेकोरपणे वेचून बाजूला ठेवलेले होते—भांडवली व्यवस्थेवर व विचारावर एक शेवटचा घणाघाती प्रहार करण्यासाठी.

१. मूळ भांडवलाची भांडवली दंतकथा

भांडवलदारवर्ग मुळात भांडवलदार का बनतो व राहतो आणि कामगारवर्ग कामगारवर्ग का बनतो व राहतो यासंबंधी भांडवली विचारामध्ये एक नाट्यमय दंतकथा प्रचलित असते. पाठ्यपुस्तकांमध्ये ती कितपत डोके वर काढते ते स्थलकालावर अवलंबून असले तरी जनमानसामध्ये मात्र हा भांडवली विचार घडोघडी रुजवला जात असतो. भाषणाभाषणांमधून, गप्पांमधून आणि उपदेशामधून तो सतत डोके वर काढतो. तसेच एखाद्या भांडवलदाराची भाटगिरी करणारे चरित्रही हेच सांगत असते. या दंतकथेचा नायक असतो सचोटीचा, प्रामाणिक, बचतीच्या कल्पनेने भारलेला एक उद्योजक माणूस. क्रयवस्तूंच्या नियमाशी इमान राखून तो आपल्या कष्टांतून, निघेल त्या मिळकतीतून पै-पैने बचत करतो. वाचवलेला पैसा किफायतशीर धंद्यात हळूहळू गुंतवत असतो. उधळमाधळ, दारूसारखी व्यसने, ऐषआरामी नाद यांच्यापासून तो मुक्त असतो. याउलट दुसऱ्या बाजूला हाती येईल तो पैसा खर्चण्यासाठीच आहे असे समजून तो दारू आणि चैन यांच्यामध्ये उधळून टाकणारी अनेक माणसे असतात. ही दोन्ही प्रकारची माणसे बिगर-भांडवलाने, फक्त स्वत:च्या कष्टांपासून सुरुवात करतात. त्यांच्या जवळ उत्पादनसाधने असतात की नाही हा मुद्दा तसा गौणच असतो. कारण या बचत करणाऱ्या कर्मयोग्यांकडे कालांतराने उत्पादनसाधने विकत घेण्याइतपत पैसा साठतो, तो ती विकत घेतो व कारखाना टाकून रोजगार निर्माण करतो. इतर उधळ्या, चैनी, दूरदृष्टी नसलेल्या माणसांजवळ पैसा राहातच नसतो. असलेली उत्पादनसाधनेही त्यांना विकावी लागतात. आणि अन्नाला मोताद होऊ घातलेल्या या उधळगीरांना हा 'कर्मयोगी' रोजगार उपलब्ध करतो. कारखाना उभा राहिल्यावरही हा क्रम सुरूच राहतो. उधळगीरांना बेशिस्तपणा हाही स्वाभाविक दोष चिकटलेलाच असतो. शिस्त असती तर बचत नसती का झाली? उधळगीर आणि बचतवीर यांचा हा लढा चालूच राहतो. नायकाने उपदेश करूनही शिस्तीने वागून कामगार बचत काही करू शकत नाहीत आणि ते कामगारच राहतात. बचतवीरांच्या हातात भांडवल वाढत राहते.

अशी ही दंतकथा आहे. थोड्याफार फरकाने भांडवली विचारामध्ये सर्वदूर सापडणारी–चित्रपटांमध्ये, कथाकादंबऱ्यांमध्ये आणि इतर अनेक ठिकाणी. मूळ भांडवल कुठून येते आणि भांडवल–संचय कसा होतो या दोन्ही गोष्टी त्यात एकाच सूत्रात गोवलेल्या असतात—हिशेबी, बचतीवर आधारलेली दूरदृष्टी आणि उधळी, बेशिस्त अदूरदृष्टी यांतून एका बाजूला भांडवल–संचय आणि दुसऱ्या बाजूला गरिबीचा संचय हेच त्याचे उत्तर असते.

आदिम भांडवल–संचय : क्रयवस्तूंच्या नियमांना धरून?

आपण भांडवल–संचयाचे मर्म खूप तपशिलात मागेच पाहिले. पण मूळ भांडवलाचे काय? हे मूळ भांडवल भांडवलदारांच्या हातात साठून भांडवलशाही स्वत:च्या पायावर उभ्या राहण्याच्या प्रक्रियेला मार्क्सचे नाव आहे आदिम भांडवल–संचय आणि तो हा प्रश्न एका वेगळ्याच पद्धतीने हाताळतो. भांडवल–संचय कसा होतो व आदिम भांडवल–संचय कसा होतो या दोन्ही गोष्टी मार्क्स वेगवेगळ्या पद्धतीने हाताळतो. यातच मार्क्सच्या विचारांचे आगळेपण व मर्म आहे. या वेगवेगळ्या हाताळणीला एक वेगळा सैद्धांतिक पाया आहे, तो नेमका भांडवली विचारामध्ये नसल्यामुळे या दोन्ही प्रश्नांना भांडवली विचार एकसारखे उत्तर देतो.

आदिम भांडवल–संचयाची जी भांडवली कहाणी आपण वर पाहिली तिचे एक महत्त्वाचे लक्षण काय होते? तर आदिम भांडवल–संचयदेखील क्रयवस्तूंच्या नियमांनुसारच होतो. हेच नेमके मार्क्सला मान्य नसते. आदिम भांडवल–संचयाला क्रयवस्तूंचा, क्रयवस्तूंच्या नियमांचा संदर्भ असतो हे मार्क्सला अमान्य नाही, पण आदिम भांडवल–संचय ही प्रक्रिया क्रयवस्तूंच्या नियमानुसार मात्र घडत नाही. बिगरभांडवली परिस्थितीतून भांडवलशाहीच्या पूर्वअटी निर्माण होणे ही प्रक्रिया म्हणजे आदिम भांडवल–संचयाची प्रक्रिया असते. ही प्रक्रिया घडल्यानंतर भांडवली संबंध प्रभुत्वस्थानी येतात व क्रयवस्तूंचे नियम हे अर्थव्यवस्थेला लागू होतात, अर्थव्यवस्थेचे नियमन करणारे नियम बनतात. त्याअगोदर क्रयवस्तूंचे उत्पादन आणि क्रयवस्तूंचे नियम यांना नियामक स्थान असू शकत नाही. आणि क्रयवस्तूंच्या नियमानुसार भांडवल–संचय होतो असे म्हणणारा विचार या काळात भांडवल–संचय कसा झाला याचे वैज्ञानिक उत्तर देऊ शकत नाही. भांडवली अर्थव्यवस्थेचा जन्म आणि अस्तित्वात असणाऱ्या भांडवली अर्थव्यवस्थेचा विकास या दोन टप्प्यांमध्ये भांडवल–संचय हा सर्वस्वी वेगळा असतो. त्याचे सामाजिक संदर्भ

वेगळे असतात आणि अर्थ वेगळा असतो. हे वेगळेपण वजा केले तर उरते एक दंतकथा.

या दंतकथेमागे एक ऐतिहासिक प्रश्न दडलेला असतो. शेवटी भांडवलशाहीचा जागतिक पातळीवर जन्म ही एका कालखंडात घडून गेलेली ऐतिहासिक घटना आहे. भांडवलशाही कशी जन्माला येते (म्हणजे कुठेही, व केव्हाही) असा अमूर्त सर्वसाधारण प्रश्न येथे नाही. खरा प्रश्न आहे तो हा की भांडवली अर्थव्यवस्था प्रत्यक्षात कशी जन्माला आली, व भांडवली अर्थव्यवस्था स्वत:च्या पायावर कशी उभी राहिली. अर्थात त्यानंतरदेखील जागतिक पातळीवर भांडवली अर्थव्यवस्था बिगरभांडवली क्षेत्रे पादाक्रांत करीत आली आहे. पण त्याचा संदर्भ हा केवळ बिगरभांडवली परिस्थितीतून भांडवली अर्थव्यवस्थेच्या पूर्वअटी निर्माण होणे इतकाच नसतो; जागतिक पातळीवर स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या भांडवली अर्थव्यवस्थेमुळे क्रयवस्तूंच्या नियमांच्या नियामक स्थानाचे भक्कम बळ तिच्या पाठीशी असते. त्यामुळे हे बळ पाठीशी नसताना झालेल्या आदिम भांडवल-संचयाला एक वेगळेच महत्त्व येते. आणि म्हणूनच आदिम संचयाच्या भांडवली दंतकथेमागे दडलेल्या भांडवलशाहीच्या पूर्वेतिहासाकडे मार्क्स वळतो.

या पूर्वेतिहासामधून हे स्पष्ट होते की भांडवलदारवर्गाच्या हातात मूळ भांडवल जमले ते बचतवीरांच्या बचतीतून नव्हे. ते जमले ते एका दुहेरी प्रक्रियेमधून. एका बाजूला कष्टकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर त्यांच्या उत्पादनसाधनांपासून तोडणूक झाली. त्याचवेळी ती उत्पादनसाधने व पैशाच्या रूपात त्यांच्यावरील ताबा हा उगवत्या भांडवलदारवर्गाच्या हातात केंद्रित झाला. या प्रक्रियेला मार्क्स नाव देतो आदिम संचय. मार्क्स भांडवलशाहीचा पूर्वेतिहास तपासतो तो या आदिम संचयाच्या दुहेरी प्रक्रियेच्या संदर्भात.

२. कष्टकऱ्यांची उत्पादन साधनांपासून तोडणूक

यंत्राधिष्ठित भांडवलशाहीचा काळ हा गेल्या जेमतेम दोनशे वर्षांचा आहे. त्याच्या जवळजवळ दुप्पट काळ—सुमारे चारएकशे वर्षे—हा भांडवलशाहीच्या आदिम संचयाने व्यापलेला आहे. ही सर्व कथा सुरू होते ती पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून. या मूळ संचयाचे केंद्रस्थान होते पश्चिम युरोप व मुख्यत: इंग्लंड. मार्क्स यावरच आपली नजर केंद्रित करतो. पंधराव्या

शतकाच्या उत्तरार्धामध्ये लोकरीचे भाव वधारू लागले. हा क्रयवस्तूंचा साधा संदर्भ एका वेगळ्याच प्रक्रियेला चालना देऊन गेला.

भूदासांची जमिनीवरून हुसकावणी

इंग्लंडमधील जमीनदारी पद्धतीमध्ये भूदास हे जमिनीला व जमीनदाराला बांधील असत. पण त्याबरोबरच भूदासांना जमिनीच्या ताब्याचे, वापराचे, वहिवाटीचे किमान का होईना पण अधिकारदेखील असत. गावच्या जमिनीचे सर्वसाधारण तीन भाग पडत. एक भाग हा भूदासांनी कसून उत्पन्न स्वत: घेण्याचा असे, एक भाग जमीनदारासाठी भूदास वेठीने फुकट श्रम घालून कसत, तर एक सामूहिक वहिवाटीचा भाग हा गावचा लाकूडफाटा, चारा इत्यादी सार्वजनिक उपयोगांसाठी राखलेला असे. लोकरीचा भाव वधारला आणि जमीनदारांना वेगळेच विचार सुचू लागले—मेंढपाळीचे. पण मेंढ्या पाळायच्या तर मोठमोठी गवताची कुरणे पाहिजेत. ही कुरणे त्यांनी निर्माण केली ती भूदासांना त्यांच्या वहिवाटीच्या जमिनीवरून व गावजमिनीवरून हुसकून लावून. भूदासांची जागा मेंढ्या घेऊ लागल्या आणि गावेच्या गावे उद्ध्वस्त होऊ लागली. गावांच्या जागी कुरणे आणि मेंढ्या दिसू लागल्या.

मार्क्सने उद्धृत केलेला या काळचा एक इतिहासकार म्हणतो, 'इकडे तिकडे एखादे गाव वाढले असले तरी पूर्ण, अर्धे किंवा पाव गाव किंवा शहर उद्ध्वस्त झालेले आहे अशा अनेक गावांबद्दल आणि शहरांबद्दल (बोलता येईल); सबंध गाव मेंढ्यांच्या कुरणासाठी मोडून काढले आहे आणि आता तिथे आमच्या जमीनदारांखेरीज कोणी नाही अशा गावांबद्दल बरेच काही बोलता येईल.' इतक्या मोठ्या प्रमाणावर भूदासांना उत्पादनसाधनांपासून तोडल्यानंतर या 'मोकळ्या' लोकांची भीती वाटणेही साहजिक होते. त्यामुळे कमालधारणा कायदे करण्याचेही क्षीण प्रयत्न झाले! उपयोग फारसा झाला नाही. याच सुमारास इंग्लंडच्या 'पुरोगामी' राजांनी जर्मनीतून, धर्मगुरूंची दलाली नाकारणारा प्रोटेस्टंट धर्म इंग्लंडमध्ये आयात केला. या रिफर्मेशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बदलाची बिगरअध्यात्मिक बाजू जरा तपासून पाहण्याजोगी आहे. रिफर्मेशन अगोदर इंग्लंडमधील सर्वांत मोठा जमीनदार म्हणजे कॅथॉलिक चर्च होते. इंग्लंडच्या राजाने प्रोटेस्टंट धर्म आयात केला तेव्हा कॅथॉलिक चर्चची जमीनदारी मोडून काढली. चर्चच्या जमिनीवरून भूदासांना हुसकून राजाच्या कृपेने प्रोटेस्टंट कुरणे स्थापणारे काही कमी नव्हते. खुद्द राजा तरी याला अपवाद कुठे होता? त्याच्या जमिनीवरही तेच चालू होते. हे सर्व पार १९व्या

शतकाच्या पूर्वार्धापर्यंत, अगदी यंत्राधिष्ठित भांडवलशाहीच्या उगवत्या काळातही चालू होते. १८१४ ते १८२० या सात वर्षांमध्ये सदरलँडच्या डचेसने सुमारे ८ लाख एकर जमिनीवरील तीन हजार भूदास कुटुंबांना पद्धतशीरपणे हुसकून लावले. गावे पाडून गाडली गेली. अर्थात 'भरपाई' दिलीच! या कुटुंबाना समुद्रकिनाऱ्यावरच्या सहा हजार एकर खार जमिनीमध्ये वसवले गेले व त्यांच्याकडून या जमिनीचे दरसाल दर एकरी अडीच शिलिंग भाडे आकारले गेले! १८३५ पर्यंत या तीन हजार कुटुंबांची पूर्वीच्या जमिनीवरची जागा सुमारे दीड लाख मेंढ्यांनी घेतली.

स्वदेशी बाजारपेठ आणि श्रमसाधनांपासून तोडणूक

लोकरीच्या वधारत्या भावामुळे भूदासांची झालेली हुसकावणी ही या आदिम संचयाच्या काळातल्या प्रक्रियांचे सर्वांत स्पष्ट उदाहरण आहे. आणि तिचे महत्त्वही आता सर्व इतिहासकारांना मान्य आहे. एका फटक्यात यातून भांडवलशाहीच्या सर्व पूर्वअटी घडवल्या जातात. एका बाजूला एका वर्गाच्या हातात उत्पादनसाधने व पैसे साठतात. दुसऱ्या बाजूला एक वर्ग त्याच्या पारंपरिक उत्पादनसाधनांपासून व पर्यायाने उत्पादनापासून तोडला जातो. याचा परिणाम म्हणून तिसरीही पूर्वअट तयार होते. पारंपरिक पद्धतीने भूदास आता आपल्या गरजा भागवू शकत नाही. अन्नापासून सर्व गोष्टी आता त्याला विकत घेणे भाग असते. स्वदेशी बाजारपेठ निर्माण होते. अगोदर भांडवलीपूर्व संबंधांच्या फक्त वळचणीला संथपणे वाढणारी बाजारपेठ आता घोंगावत वाढू लागते व हळूहळू सामाजिक उत्पादनाचा निर्णायक भाग व्यापू शकते.

या प्रक्रियेसमोर भांडवली कहाणीचे पितळ उघडे पडते. तिथे लोकरीचा वधारता भाव आणि जमीनदारांची खाजगी मालमत्तेची हाव यापुरतीच क्रयवस्तूंच्या नियमांची कामगिरी मर्यादित होती. पण या निमित्ताने जो आदिम भांडवल-संचय होतो तो एकाच नियमावर—शस्त्रबळाच्या पाठबळावर उभ्या असलेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय सत्तेच्या आधाराने आणि त्या शस्त्रबळाचा वापर करून. आदिम भांडवल-संचयाचे माध्यम असते ते शस्त्रबळ, क्रयवस्तूंचे नियम नव्हेत.

भूदासांची 'मेंढ्यांनी' केलेली हुसकावणी हा आदिम भांडवल-संचयाचा केवळ एक पैलू झाला. आदिम भांडवल-संचय ही एक अनेकांगी प्रक्रिया होती आणि तिचे इतर पैलूदेखील नजरेआड करून चालणार नाहीत. लोकरीसारखा एखादा

तुरळक धंदा सोडला तर इतर ठिकाणी उत्पादकता अत्यंत निकृष्ट होती. तिथे कामाला माणसे मिळायची तर निकृष्ट उत्पादकतेमुळे त्यांचे वेतन अत्यंत कमी असणे हे वरकड-मूल्याच्या निर्मितीसाठी आवश्यक होते. ही काही यंत्राधिष्ठित भांडवलशाही नव्हती की ती उदारपणे श्रमशक्तीला क्रयवस्तूंचे नियम लावणे मान्य करील!

मुसक्या बांधणारे कायदे

ज्यांना उत्पादनसाधनांपासून तोडून आदिम संचयाने सर्वहारा बनवलेले होते त्यांना बडगा दाखवून उगवत्या भांडवलदारांच्या पायाशी घालणाऱ्या कायद्यांचे एक सत्र या काळात सुरू झाले. कामाच्या तासांशी ज्यांचा संबंध होता त्या कायद्यांवर आपण मागेच नजर टाकली आहे. इथे इतर काही कायद्यांचा मासला पाहूया. प्रोटेस्टंट धर्म आयात करणाऱ्या आठव्या हेन्रीच्या काळात बिनाकाम हिंडणाऱ्या धट्ट्याकट्ट्या माणसाला घोडागाडीच्या मागे बांधून रक्त येईपर्यंत चाबकाने फोडून काढण्याची शिक्षा होती. त्यानंतर? त्यानंतर त्याने त्याच्या जन्मगावी, किंवा जिथे तो गेली तीन वर्षे राहत असेल त्या गावी जाऊन काम करण्याची शपथ घेणे आवश्यक होते. किंवा राणी एलिझाबेथच्या सुवर्णयुगातला एक कायदा पहा. या कायद्याप्रमाणे १४ वर्षांवरील बिनाकाम भीक मागणाऱ्या व्यक्तीला जबर चाबकाच्या माराची शिक्षा होती. त्यानंतर एखाद्याने त्याला दोन वर्षे काम देऊ केले तर ठीक, नाहीतर त्याचा डावा कान डागला जायचा. पुन्हा सापडला तर पुन्हा शिक्षा आणि पुन्हा दोन वर्षे कोणी काम देऊ केले तर ठीक नाहीतर पुन्हा डाग. आणि तिसऱ्यांदा सापडला तर? सरळ शिरच्छेद! या कायद्यांना त्याच वेळी जोड होती ती कमाल वेतन कायद्यांची आणि कामगारांच्या संघटनाबंदीच्या कायद्यांची. १३५० पासून निरनिराळ्या धंद्यांतले निरनिराळ्या ठिकाणचे कमाल वेतन ठरवण्यात आले होते. एलिझाबेथच्या सुवर्णयुगात हे वेतन ठरवण्याच्या कामाचे 'विकेंद्रीकरण' झाले. म्हणजे ते 'जस्टीस ऑफ पीस' म्हणून मिरवणाऱ्या धनाढ्यांच्या हातात आले! भांडवली क्षेत्राच्या वाढीबरोबर यांचेही क्षेत्र वाढत होते. या कायद्याचा भंग करणाऱ्यांची सजाही नमुनेदार आहे. उदाहरणार्थ एलिझाबेथच्या काळातल्या कायद्याप्रमाणे जो कमाल वेतनापेक्षा जास्त वेतन देईल त्याला दहा दिवसांची व घेईल त्याला एकवीस दिवसांची शिक्षा होती! अगदी यंत्राधिष्ठित उत्पादनाच्या बाल्यावस्थेत, १८१३ पर्यंत हे कायदे होते आणि शेवटी ४५० वर्षांनंतर हे कमाल वेतन कायदे एकदाचे बंद झाले. हीच गत कामगारांच्या

संघटना बंदीबाबत होती. आणि मार्क्स लिहीत होता त्या काळात १८७३ च्या सुमारासदेखील या कायद्याचे अवशेष शिल्लकच होते! उदाहरणार्थ कामगार भांडवलदार यांच्यामधील करार भंग झाला तर करार मोडणाऱ्या मालकाविरुद्ध कामगार फक्त मुलकी दावा दाखल करू शके तर करार मोडणाऱ्या कामगाराविरुद्ध मात्र मालक गुन्हेगारी कायद्याखाली दावा करू शके!!

थोडक्यात, बिगरभांडवली कष्टकऱ्यांमधून सर्वहारा वर्ग केवळ निर्माण होऊन पुरणार नव्हते. या वर्गाची नाकेबंदी करून, त्याला हाकारीत, क्षुल्लक वेतनावर काम करायला भांडवलदारवर्गाच्या पायाशी घालणेदेखील भाग होते. आणि त्यातून जरा वर डोके काढायचा प्रयत्न केला तर खडा पहारा देऊन त्याला मोडून काढून परत मुसक्या बांधून भांडवलदारांच्या पायाशी घालण्यासाठी सुसज्ज राहणेही भाग होते.

३. पैशाची रास : वसाहतींची लूट व राष्ट्रीय कर्जे

पैशाची भूक आणि वसाहती

आतापर्यंत आपण पाहिली ती भांडवलशाहीच्या आदिम संचयाची केवळ स्वदेशी बाजू. पण आदिम संचय ही काही फक्त 'देशी' गोष्ट नव्हती. भांडवलशाहीच्या पूर्वअटी निर्माण होण्याची ती प्रक्रिया होती आणि त्यामुळे ती आंतरदेशीय होती यात नवल कोणतेच नाही. लक्षात घ्यायची गोष्ट इतकीच की हे जागतिक स्वरूपदेखील तितकेच निर्णायक आणि अपरिहार्य होते. उत्पादनसाधने ताब्यात येणे, त्यांच्यापासून तोडलेल्या माणसांना श्रमशक्ती विकायला भाग पडणे या गोष्टीइतकीच किंबहुना त्यापेक्षा काकणभर जास्तच महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसा साठणे. भांडवलाची चक्रे फिरायची तर त्यांची सुरुवातच मुळी होते ती पैसा या मूल्याच्या अवतारापासून, अमूर्त श्रमांच्या या सगुण रूपापासून. आणि स्वदेशी बाजारपेठ निर्माण होत होती खरी पण ज्या कफल्लक भूदासांमध्ये ती निर्माण होत होती, तिथून पैशाचा संचय काही फार मोठ्या प्रमाणावर होणार नव्हता. किंबहुना पैशाचा संचय ही पूर्वअट पूर्ण झाल्याखेरीज ही बाजारपेठ वाढून काही फायदा नसतो. कारण या भणंगांना उत्पादनात ओढून उत्पादन करायचे आणि ते विकत घ्यायला वेतनामार्फत पैसा पुरवायचा म्हटले तरी त्यासाठी पैसा पाहिजे असतोच. ही पैशाची भूक भागवली ती वसाहतींनी आणि त्यांच्याशी वासाहतिक धोरणामधून बांधलेल्या व्यापाराने.

आदिम संचयाच्या काळातच खऱ्या अर्थाने वासाहतिक धोरण व त्यावरील व्यापार उभा राहिला. या व्यवहाराचा एकच एक नियम होता—कुठलेही नियम न पाळता, वासहतिक देशांमधल्या लोकांच्या इच्छेची, प्राणाची तमा न बाळगता जमेल तितकी शस्त्रबळाशिवाय नाहीतर शस्त्रबळाच्या जोराने जास्तीत जास्त संपत्ती गोळा करणे, व जास्तीत जास्त प्रदेश घशात घालणे. या कामी उद्योजकता फारच कामाला येत होती. राजाश्रयाने ईस्ट इंडिया कंपनीसारख्या कंपन्या उभ्या राहिल्या व त्यांना सैन्य बाळगण्याची मुभा मिळाली, आरमाराची संरक्षक व आक्रमक दोन्ही प्रकारची सेवा त्यांना उपलब्ध करण्यात आली. या व्यापाराने कंपनीच्या व राजांच्या तुंबड्या तर भरल्याच, पण त्याबरोबरच कंपनीच्या नोकरदारांची पिढ्यान्‌पिढ्यांची सोय करून ठेवली. कंपनीचा सुप्रसिद्ध गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याच्यावर भ्रष्टाचारासाठी चाललेला खटला म्हणजे अशा माहितीची खाण आहे. १७५७ ते १७६६ या दहा वर्षांमध्ये, उदाहरणार्थ केवळ भेट म्हणून कंपनीला व तिच्या नोकरदारांना साठ लाख पौंड मिळाले होते! आजच्या दराने हे ६० कोटी रुपये होतात. स्थिर किंमतीच्या आधारावर ही रक्कम आज किती होत असेल याची कल्पनाच केलेली बरी! आणि याखेरीज युद्धातून वसूल केलेल्या खंडण्या, निरनिराळ्या राजेरजवाडे-मांडलिकांना केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून घेतलेली किंमत व प्रदेश, आणि अनेकदा सरळसरळ केलेली नागडी लुटालूट. वसाहतीतून निघणारा हा संपत्तीचा ओघ आदिम भांडवल-संचयाच्याच कामी लागत होता. भांडवलशाहीची एक पूर्वअट तयार केली जात होती.

वासाहतिक देशांतल्या संपत्तीबरोबरच त्या देशांमधल्या श्रमशक्तीवरही तितकेच गंभीर परिणाम होत होते. या संपत्तीच्या बाहेर जाणाऱ्या ओघाच्या परिणामांनी वासाहतिक देशांतल्या बिगरभांडवली समाजांना एक साचलेपण येत होते. क्रयवस्तूंच्या व्यवहारात ओवले गेल्याने येणाऱ्या तेजीमंदीच्या लाटांमुळे अनेक जण उत्पादन साधनांपासून तुटत होते. पारंपरिक शोषक वर्गाच्या जोडीला हा राक्षसी भुकेचा नवा शोषकवर्ग निर्माण झाल्याने कष्टकरी वर्गांच्या उत्पादनापैकी फारच थोडा भाग त्यांच्या हातात उरत होता. अवर्षणाचा आणि अतिवृष्टीचा बारीकसा धक्कादेखील दुष्काळाला जन्म देत होता. पण तरीही हे सर्व आदिम संचयाचे अप्रत्यक्ष परिणाम होते. याहीपेक्षा गंभीर असे प्रत्यक्ष परिणाम वासाहतिक देशांतील कष्टकऱ्यांच्या जीवनावर होत होते. हे परिणाम दोन प्रकारचे होते.

गुलामांचा व्यापारसंचयाचे सुटसुटीत साधन

पहिल्या प्रकारचा परिणाम भोगला तो प्रामुख्याने आफ्रिकेतील कष्टकऱ्यांनी. या प्रचंड महाखंडावर ताबा बसवणे पाश्चात्य वसाहतवाद्यांना फारच ‘जिकीरीचे’ होते. त्यापेक्षा तेथील माणसांना गुलाम बनवून त्यांचा व्यापार करणे हे जास्त नफ्याचे व कमी जिकीरीचे काम होते. सशांची, हरणांची शिकार करण्याची मोहीम निघावी तशा अफ्रिकेच्या जंगलांमध्ये गुलाम पकडण्याच्या मोहिमा निघत. एखाद्या टोळीवर धाड घातली जाई व त्यातली धष्टपुष्ट माणसे निवडत. एकाच दोरखंडात मणी ओवावेत तशी ही माणसे ओवत किंवा प्रत्येकाला लाकडी साच्यात बंदिस्त करत आणि शेळ्यांचा कळप हाकत कत्तलखान्यात न्यावा तसा हा माल हाकत समुद्रकिनारी नेला जाई. आणि तिथून गलबतांमध्ये भरून अनेकदा आरमाराच्या संरक्षणाखाली (कारण शत्रुपक्षाने हा माल ‘पळवला’ तर!) ही स्वस्त श्रमशक्ती पाश्चात्य देशांमध्ये रवाना होई. स्वदेशी श्रमशक्तीचे मूल्यही अर्थात घसरे. भांडवलदारवर्गाला तो बोनस मिळे.

माणसांच्या जीवाची सीमांत उपयुक्तता

दुसऱ्या प्रकारच्या परिणामांचे सर्वात सुस्पष्ट उदाहरण सापडते ते अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांमध्ये. वासाहतिक जनतेचे इथे सरळसरळ शिरकाण झाले. आता अमेरिकन संयुक्त संस्थानांमध्येच आफ्रिकन गुलामांचाही सर्वात जास्त खप होत होता. इथे असा प्रश्न उभा राहील की मग स्थानिक रेड इंडियन लोकांनाच गुलाम का नाही केले? पुन्हा एकदा जिकीरीचा प्रश्न उभा राहतो. एखाद्याला त्याच्याच देशात, त्याच्याच भूमीवर गुलाम करायचे म्हटले की फार जिकीरीचे पडते. त्याच्या आसपासचा दगडन्‌दगड त्याला त्याच्या पूर्वेतिहासाची जाणीव करून देत असतो. सारखी बंडाळी करत राहणारी ही श्रमशक्ती जिकीरीने सांभाळण्यापेक्षा तिचे शिरकाण हा स्वस्त व सोपा मार्ग होता. आणि अमेरिकत गोरे प्रथमपासूनच शिस्तबद्ध होते! नफा हे उत्पादनासाठी, उत्पादकतावाढीसाठी आर्थिक प्रोत्साहन असते तसेच याही कामासाठी त्यांनी नीटपणे आर्थिक प्रोत्साहन योजलेले होते.

आज तंत्रविद्येचे माहेरघर म्हणून तिथले मॅसॅचुसेट्स्‌ संस्थान प्रसिद्ध आहे. हेच संयुक्त संस्थानांच्या आद्य संस्कृतीचेही माहेरघर ठरते. १७४४ मध्ये स्वयंनिर्णयाच्या मागणीसाठी अमेरिकेचा ब्रिटनबरोबर लढा होऊ घातलेला असताना या संस्थानात खालील बक्षिसे जाहीर झाली होती—प्रत्येक १२

वर्षांवरील रेड इंडियन पुरुषाच्या सोललेल्या कातडीसाठी १०० पौंड, अशा जिवंत कैद्यासाठी १०५ पौंड, रेड इंडियन स्त्रिया व मुलांच्या सोललेल्या कातडीसाठी ५० पौंड व अशा जिवंत कैद्यासाठीदेखील ५० च पौंड. या आर्थिक प्रोत्साहनामागील क्रयवस्तूंच्या विचारांची आर्थिक सुसंगती तर पहा. रेड इंडियन स्त्रिया व मुले यांना ठार करून कातडी सोलण्याऐवजी त्यांना जिवंत ठेवण्याची सीमांत उपयुक्तता काय? काहीच नाही. याउलट १२ वर्षांवरील रेड इंडियन पुरुषाला ठार करण्याऐवजी जिवंत ठेवून गुलाम केले तर कामाला तरी उपयोग होता. त्यामुळे स्त्रिया व मुलांच्या जिवाची सीमांत उपयुक्तता शून्य तर १२ वर्षांवरील पुरुषाच्या जिवाची ५ पौंड! सीमांत उपयुक्ततेचा सिद्धांत आज सर्वात भक्कमपणे अमेरिकेत उभा का असावा याचे कोडे आता पडू नये.

आदिम संचयाची ही क्रूर प्रक्रिया उगाळावी तितकी थोडीच आहे. मार्क्सच्या काळात उजेडात आलेल्या या प्रक्रियेचा शतांशदेखील भाग मार्क्स आपल्या विस्तृत प्रकरणात मांडत नाही. आणि त्याच्या प्रकरणातील केवळ काही मासलेवाईक उदाहरण आपण पाहिली आहेत. आतापर्यंत केलेली उकल या प्रक्रियेचे सूत्र मांडण्यासाठी पुरेशी आहे.

राष्ट्रीय कर्जे आणि सार्वजनिक पतसंस्था

आंतरराष्ट्रीय पातळीवर वासाहतिक धोरणातून हा संपत्तीचा ओघ चालू राहायचा तर खुद्द देशांतर्गतही काही धोरणे आवश्यक ठरत होती. वासाहतिक व्यापारामधल्या संपत्तीच्या दर्शनाने दिपून गेलेल्या वसाहतवादी देशांमध्ये या व्यापारावर ताबा मिळवण्यासाठी जोरदार स्पर्धा चालू झाली होती व वारंवार युद्धाला तोंड फुटत होते. या सर्वाला टिकून उरायचे तर राजाश्रय आवश्यक होता. शासनसंस्थेचे बळ पाठीशी असणे आवश्यक होते. अन् शासनसंस्थेचे हे बळ आपल्यामागे उभे करताकरता या उगवत्या भांडवलदारवर्गाच्या हाती पैसा जमा होण्याच्या नवनव्या संधी उपलब्ध होत होत्या.

राजेशाहीने बाळगलेली खडी फौज गरजेची बनत होती. शासनसंस्थेच्या जबाबदाऱ्या वाढत होत्या. आणि 'राष्ट्राच्या' वाढत्या संपत्तीला साजेसा दिमाख बाळगण्याचीही जबाबदारी वाढत होती. अन् या सर्वांचा अर्थ होता शासनसंस्थेची पैशांची वाढती भूक. राष्ट्रीय कर्जे (नॅशनल डेट्) किंवा सार्वजनिक पत-पद्धती (पब्लिक क्रेडिट) यांची याच काळात भरपूर वाढ

झालेली दिसते. या पद्धती म्हणजे भांडवलदारवर्गाला विनासायास पैशाचा संचय करायला मुभा देण्याऱ्या पद्धतीच!

पैसा गुंतवण्याचा एक अत्यंत सुरक्षित मार्ग ताबडतोबीने उपलब्ध होत होता. उद्योगात, व्यापारात किंवा सावकारीमध्ये जो किमान धोका पत्करावा लागायचा त्याचीही गरज नव्हती. कारण पैसा सरकारच्या हवाली केला की त्याबद्दल सरकारी कर्जरोखे मिळत. त्यांवर विनासायास व्याज तर मिळेच, पण हे कर्जरोखे म्हणजे सार्वजनिक पातळीवर पैशाचे, मोबदल्याच्या साधनाचेच एक रूपही ठरत असे. कारण ते निर्धोकपणे दुसऱ्याच्या हवाली करता येत, हुंडीप्रमाणे वटवता येत. थोडक्यात पैसा द्यायचा, व्याजही घ्यायचे अन् शिवाय तितका पैसा हातातही ठेवायचा! एक लाख पौंड सरकारला द्यावे, सरकारकडून त्या एक लाखावरचे व्याज घ्यावे, इकडे एक लाख पौंड उद्योगात, व्यापारातही सरकारी कर्जरोख्याच्या स्वरूपात वापरावेत आणि त्यावर नफाही घ्यावा. राष्ट्रीय कर्ज म्हणजे खरोखरच उगवत्या भांडवलदारांसाठी मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे 'आकाशातून पडलेले भांडवल होते!'

पण याचे सर्वात ढळढळीत उदाहरण दिसते ते बँकांचे. सट्ट्यांच्या किंवा पतपेढ्यांच्या रूपात वावरणाऱ्या अनेक संस्था हळूहळू बँका बनत होत्या व त्यातील सर्वात उद्‌बोधक उदाहरण आहे ते इंग्लंडच्या सध्याच्या राष्ट्रीय बँकेचे—बँक ऑफ इंग्लंडचे. ज्या नोटा आज चलन म्हणून सर्व भांडवली देशांमध्ये वावरतात त्यांची मुळे आदिम संचयाच्या काळात बँक ऑफ इंग्लंडला आलेल्या स्थानामध्ये सापडतात.

१६९४ साली बँक ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. सरकारला ८ टक्के दराने कर्ज देऊन तिने कामाला सुरुवात केली. सरकारला पुरवलेल्या या भांडवलाच्या जोरावर तितक्या प्रमाणात पैसे पाडण्याचा व बँक नोटांच्या रूपात तो पैसा पुन्हा जनतेला कर्जाऊ देण्याचा अधिकारही पार्लमेंटकडून घेतला. हुंड्या वटवायला, गहाणवटीच्या व्यवहाराला, सोनेचांदी विकत घ्यायला या नोटा वापरायचा अधिकार मिळाला. कालांतराने सरकारला दिले जाणारे कर्जही याच नोटांच्या रूपात दिले जाऊ लागले! शेवटी मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे 'एका हाताने जेवढे दिले त्यापेक्षा जास्त दुसऱ्या हाताने बँक घेत राहिली..... (आणि) राष्ट्राची कायमची धनको बनली.' हळूहळू याच पद्धतीचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवरही झाला. इतका की १८व्या शतकात हॉलंडचे प्रत्यक्ष वासाहतिक व्यापारातले स्थान घसरू लागले तसे त्यांनी त्यांच्या प्रतिस्पर्धी

इंग्लंडला मोठ्या प्रमाणात रकमा कर्जाऊ देऊन आपला पैशाचा संचय चालू ठेवला.

वाढणारे करआदिम संचयाचे साधन

पत-पद्धतीवर व राष्ट्रीय कर्जावर आधारलेल्या या पैशाच्या संचयाची दुसरी बाजू होती ती करपद्धतीची. राजकोषाचा ताळेबंद जमण्यासाठी करांचे ओझे हे राष्ट्रीय कर्जाचीच दुसरी बाजू ठरते. जीवनावश्यक वस्तूंवर लादलेले कर व त्यांच्या त्यामुळे वाढणाऱ्या किंमती ही आपोआपच एखाद्या अपघाती, नैमित्तिक स्वरूपाची गोष्ट न राहता ते एक अपरिहार्य धोरण बनते. इतकेच नव्हे, तर मार्क्सने उध्दृत केलेल्या डच देशभक्त डी विट् याच्या मते जीवनाश्यक वस्तूंवर जादा कर लावणे हा वेतनदार कामगारांना कष्टाळू, कष्टकरी, सहनशील बनवण्याचा सर्वात चांगला मार्ग होता! अर्थात कामगारांवरील हा परिणाम हा भांडवल-संचयाच्या नंतरच्या काळात जास्त महत्त्वाचा ठरतो. आदिम संचयाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो तो अशा करांचा शेतकरी, कुळे, कारागीर व निम्नमध्यमवर्गावर होणारा परिणाम. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीमुळे त्यांचे जास्ती मोठे विभाग हलाखीच्या परिस्थितीत जगू लागतात आणि आपली उत्पादनसाधने किंवा उपजीविकेची साधने गमावून बसतात. ज्यांनी ती साधने अगोदरच गमावलेली असतात त्यांना त्या साधनांशी वैयक्तिक मालकीचे नाते जोडणे आणखी कठीण होत जाते. थोडक्यात राष्ट्रीय कर्जे ही आदिम संचयाच्या नाण्याच्या दोन्ही बाजू त्या काळात पार पाडताना दिसतात. एका बाजूला उगवत्या भांडवलदारवर्गाच्या हातात ती 'आकाशातून पडलेले भांडवल' ठेवत असतात, तर दुसऱ्या बाजूला जास्तीत जास्त कष्टकऱ्यांना उत्पादनसाधनांपासून तोडण्यासाठी कर-पद्धतीमार्फत मदत करत असतात.

४. भांडवलशाहीच्या पूर्वेतिहासाचे धडे

क्रयवस्तूंचे नियम नव्हेत, शस्त्रबळ

या प्रकरणाबरोबर मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेच्या चौकटीबाहेर एक पाऊल टाकले आहे. एखादी व्यवस्था तिच्या पायावर उभी राहिली म्हणजे ती कशी चालते याचे विश्लेषण एक असते. भांडवलशाही व्यवस्थेचे असे वर्णन मार्क्स आतापर्यंत करीत होता. पण तिच्या अगोदरच्या व्यवस्थांमधून एखादी व्यवस्था

स्वत:च्या पायावर कशी उभी राहते हा पूर्वेतिहास मात्र वेगळ्या नियमांनी चालतो. ती व्यवस्था स्वत:च्या पायावर अस्तित्वात असताना ज्या नियमांनुसार चालते त्या नियमांप्रमाणे ती जन्माला येत नाही. ती जन्म घेऊन स्वत:च्या पायावर उभी राहते ती शस्त्रबळाच्या जोरावर. स्वत:च्या पूर्वअटी निर्माण करते ती पूर्वीच्या व्यवस्थेमधील वर्गांवर शस्त्रबळाने मात करत. भांडवलशाहीमध्ये जे मार्ग वैध ठरतात, जे नियम संचयाच्या प्रक्रियेला लागू होतात, त्यांना तिच्या जन्मक्रियेमध्ये नियामक स्थान नसते. रक्ताने व घाणीने नखशिखांत लडबडून ती स्वत:च्या पायावर उभे राहते व नंतर हे रक्त धुवायचे, ही घाण साफ करायची तिची धडपड चालू असते. सिद्धांताच्या नावावर दंतकथा खपवून.

अर्थात सर्वच दंतकथांत असतो तसा तसूभर सैद्धांतिक अर्थ आदिम संचयाच्या भांडवली दंतकथेतदेखील असतो. खरोखरच छोटे कारागीरदेखील थोडाफार पैसा साठवून जास्त उत्पादनसाधने विकत घेत असतात. त्यावर मोलाने श्रमशक्ती विकत घेऊन कामाला लावत असतात. पण यातून होणारा आदिम संचय नगण्य असतो. या संचयासाठी श्रमशक्ती अगोदरच हाताशी असावी लागते, बाजारपेठ उपलब्ध असावी लागते, पैसा उपलब्ध असावा लागतो. भांडवलशाहीच्या पूर्वअटी निर्माण करण्याची क्षमता या प्रक्रियेत नसते. त्या निर्माण होतात मार्क्सने वर्णन केलेल्या वर वर्णिलेल्या भीषण प्रक्रियेमधून. या भीषण प्रक्रियेच्या आधारावर आणि तिच्या वळचणीला भांडवली दंतकथेतले तसूभर सत्यही नांदत असते.

स्वकष्टार्जित उत्पन्नाच्या अधिकाराचे शिरकाण

मार्क्सच्या या प्रकरणाचे महत्त्व भांडवलशाहीच्या पूर्वेतिहासाबद्दलचा एक अपसमज खोडणे इतकाच नाही. या प्रकरणाचा एक जैव संबंध भांडवलशाहीच्या भविष्याशी, ते भविष्य घडवण्याशी आहे. इतिहास आणि इतिहासाची समज शेवटी भविष्याचा आणि ते घडवण्याचा आधार असतात हेही विसरून चालणार नाही. या भांडवली दंतकथेचे दुसरेही एक सत्य असते. क्रयवस्तूंचे इतर कुठले नियम या पूर्वेतिहासाला लागोत किंवा न लागोत. एक नियम मात्र त्याला कडकपणे लागत असतो. आदिम भांडवल-संचय आणि पुढील भांडवल-संचय यांच्यात एक समान धागा असतो—खाजगी मालमत्तेची हाव. खाजगी मालमत्तेचा अधिकार एक स्वकष्टार्जित उत्पन्नाचा हक्क म्हणून भांडवली दंतकथा प्रस्थापित करू इच्छित असते. तो अधिकार येतो ते स्वकष्टार्जित उत्पन्नाच्या अधिकाराचे अपरिहार्यपणे शिरकाण करत येतो.

खाजगी वैयक्तिक मालकीच्या पायावर कष्टकऱ्यांना उपजीविकेचे अधिकार देऊ करणारे तत्त्वच कष्टकऱ्यांच्या स्वत:च्या उपजीविकेवरील अधिकाराचा नकार बनते.

नेमका हा निष्कर्ष भांडवलशाहीच्या भविष्यासाठी महत्त्वाचा ठरतो. भांडवलशाही जसजशी फोफावते, बलदंड बनते तसतशी भांडवली गोटातूनदेखील भांडवलशाहीवरील टीका वाढू लागते. यात, विशेषत: लघुउत्पादक मध्यमवर्गाकडून, एक टीका नेहमी होत असते. कष्टकऱ्यांच्या आणि छोटेखानी उत्पादकांच्या खाजगी मालमत्तेचा अधिकार कायम ठेवून ते केवळ मोठ्या भांडवली मालकीच्या खाजगी मालमत्तेला नकार द्यायचा प्रयत्न करत असतात. मग मक्तेदारविरोधी कलमे तरी उभी राहतात, किंवा ट्रस्टीशिपची कल्पना निघून भांडवलदारांना सामाजिक विश्वस्तपद बहाल केले जाते. अनेक प्रकारांनी बाहेर पडणाऱ्या या टीकेचे मर्म इतकेच असते की खाजगी मालमत्तेचा अधिकार कायम ठेवून फक्त भांडवली मालकीचे अधिकार नाहीसे करायचा प्रयत्न करणे. खाजगी मालमत्तेच्या आधारावर भांडवलशाहीला दिलेला हा केवळ तार्किक नकार असतो.

मार्क्सचे आदिम संचयाच्या रौद्र प्रक्रियेचे वर्णन नेमके या विचारसरणीचा फोलपणा दाखवून जाते. हा तार्किक नकार फोल असतो कारण खाजगी मालमत्तेची बैठक मुळातच अपरिहार्यपणे छोटेखानी उत्पादन मोडून काढीत असते. वाढलेल्या प्रचंड सामूहिक शक्ती खाजगी मालमत्तेच्या व क्रयवस्तूंच्या आधारावर केवळ भांडवली रूपच घेऊ शकत असतात. भांडवली टीकाकारांनी सुचवलेला पर्याय या सामूहिक शक्ती सामावून घेऊ शकत नाहीत. या सामूहिक शक्ती आणि तिच्या भांडवली पूर्वअटी दोन्ही खाजगी मालकीतून अपरिहार्यपणे निर्माण झालेल्या असतात. भांडवलशाहीला खऱ्या अर्थाने वेगळे भविष्य घडवण्याची दृष्टी ठेवून नकार द्यायचा असेल तर या सामूहिक शक्ती सामावून घेऊ शकेल, पुढे नेऊ शकेल असा नकार आवश्यक असतो. भांडवलशाहीला तिच्या पूर्वेतिहासाकडे खेचणारा केवळ तार्किक नकार पुरेसा नसतो तर भांडवलशाहीच्या पोटात वाढलेल्या क्षमता पचवून त्यापुढचा मानवी इतिहास घडवू शकण्याची क्षमता असलेला नकार आवश्यक असतो. आणि अर्थात असा नकार देण्यामध्ये ज्यांचे हित गुंतलेले आहे व ज्यांच्या अंगी ही क्षमता आहे असा वर्गदेखील आवश्यक असतो. भांडवलशाहीच्या पुढचे भविष्य

लिहिण्याची क्षमता कामगारवर्गाची व कामगारवर्गीय विचाराची असते. निम्न भांडवली छोटेखानी उत्पादकांच्या वर्गाची किंवा त्यांच्या विचाराची नव्हे.

क्रांतीची आवश्यकता

आणि शेवटी सर्वात महत्त्वाचे म्हणजे यातून मार्क्स कामगारवर्गासाठी स्पष्टपणे क्रांतीची आवश्यकता मांडीत असतो. भांडवलदार जेव्हा प्रत्यक्षात आणि विचारांमध्ये कामगारवर्गाच्या क्रांतिकारक प्रेरणांवर हल्ला चढवत असतात तेव्हा त्यांचे म्हणणे असते, की आमच्या या चौकटीत रहा. त्यात राहून सनदशीर मार्गाने, शिस्तीने तुमचे हित राबवा. त्यातून ही चौकटही बदला. पण शस्त्रबळाच्या आधारावर मालकी हक्कांवर गदा आणू नका. त्याला मार्क्सचे हे ठाम उत्तर असते की मुळात ही चौकट, हे खाजगी मालकीचे अधिकार, हे सनदशीर मार्ग—हे आले कुठून? शस्त्रबळाच्या जोरावर बहुसंख्यांच्या मालकीचे, कष्ट करणाऱ्यांच्या मालकीचे शिरकाण करून. भांडवलशाहीच्या स्थापने अगोदर चार शतकांच्या नंग्या नाचातून. त्यानंतरचाही इतिहास पाहण्यासारखा आहे. अनेक युद्धे, वासाहतिक जनतेचे शिरकाण, दोन महायुद्धे त्यानंतर होऊन गेली आहेत आणि तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत जग जगत आहे. नवी व्यवस्था जन्म घेते तेव्हा शस्त्र बळाच्या जोरावर जुन्या मालकीचे शिरकाण करून नव्या पद्धतीची मालकी निर्माण होते. तुम्हा उपदेशकांची व्यवस्थाही अशीच जन्माला आली आहे. आमचीही अशीच जन्माला यावी लागेल.

फक्त इतकेच की तुमच्या समाजव्यवस्थेने सुमारे साडेचारशे वर्षे अव्याहत कष्टकऱ्यांच्या रक्ताने इतिहासाची पाने भरली तेव्हाच ते शक्य झाले. तुमच्या व्यवस्थेइतका प्रदीर्घ आणि निर्मम हिंसाचार आमच्या व्यवस्थेच्या निर्मितीच्या वेळी होणार नाही. कारण तुमची व्यवस्था ही बहुसंख्यांची मालकी मोडून, त्यांच्याविरुद्ध हिंसा करीत मूठभरांच्या हातात ती मालकी केंद्रित करीत जन्मली. आम्ही फक्त बोलतो अहोत ते मूठभरांच्याच हातातील मालकी काढून घेऊन बहुसंख्यांची मालकी प्रस्थापित होण्याबद्दल.

विभाग२

भांडवलशाहीत मूल्यसंबंध प्रत्यक्षात येत असतात ते 'कहीं पे निगाहे, कहीं पे निशाना' अशा पद्धतीने! माणसांच्या नजरेसमोर असतात, किंमती, पैसा, महागाई, व्यापारी, उद्योगपती, बँका, व्याज, नफा, नफ्याचा दर. नजरेसमोरच्याच या गोष्टींवर आधारलेली माणसांची विचाराची आणि व्यवहाराची भाषा घडलेली असते. या भाषेच्या आधारावरच ते निर्णय घेत असतात. श्रमतासांचे, मूल्यांचे, वरकड-मूल्याचे, पिळवणुकीचे गणित मांडून व्यवहार कोणीच करत नसते. अन् तरीही निशाना साधला जात असतो तो श्रमतासांचा, वरकड-मूल्याचा, आंगिक प्रमाणाचा किंवा एकंदरच मूल्यसंबंधांनी बनलेल्या आशयाचा. भांडवलशाहीत सर्वजण मूल्यसंबंधांचे रूप नजरेसमोर ठेवून चालत असतात, त्या रूपावर आधारलेल्या भाषेत निर्णय घेत असतात. आणि निशाना साधला जात असतो मूल्यसंबंधांनी बनलेल्या आशयाचा. मूल्यसंबंधांचा आशय व रूप, आणि परिणाम व माध्यम यांच्यातील या वैचित्र्यपूर्ण संबंधाचा एक छोटासा मासला आपण सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती तपासतेवेळी पाहिला होता. परंतु या वैचित्र्यपूर्ण संबंधामधून आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो.

पुस्तकाच्या पहिल्या भागात आपण मूल्यसंबंधांचे रूप नजरेआड केले होते व आशयावर लक्ष केंद्रित केले होते. मूल्यसंबंधांचे रूप नजरेआड करून आपण भांडवलशाहीच्या गतीचा, अर्थाचा शोध घेत गेलो. मार्क्सने काढलेले सर्व क्रांतिकारक निष्कर्ष हे आशयावर लक्ष केंद्रित करून, रूप नजरेआड करूनच, आपण पाहत चाललो होतो. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की जर

मूल्यसंबंधांचे रूप नजरेआड केले नाही तर काय होईल? मूल्यसंबंधांचे रूप लक्षात घेतले, त्या रूपाचे वैशिष्ट्य व त्याच्यामुळे पडणारी बंधने लक्षात घेतली तर फक्त आशयावर लक्ष केंद्रित करून काढलेले निष्कर्ष टिकतील का?

या प्रश्नाला काही गोष्टींमुळे मोठे सैद्धांतिक महत्त्व प्राप्त होते. पहिले म्हणजे रूपाचे सार्वत्रिक महत्त्व. क्रयवस्तूंच्या व्यवहारावर आधारलेले संबंधच मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे असे उफराटे असतात की सर्वजण फक्त किंमतीवर, रूपावर आधारलेला विचार करतात. तेव्हा फक्त रूपावर नजर केंद्रित करून माणसे जो व्यवहार करतात त्यातून मार्क्सने आशयाच्या आधारावर काढलेल्या निष्कर्षाचा निशाना साधला जायला हवा. दुसरे कारण म्हणजे खुद्द मार्क्सदेखील रूपहीन आशयाच्या विरोधात उभा असतो. आशय आणि रूप मिळूनच संबंधांची बांधणी होते हा मार्क्सच्या विचारांचा आधार असतो. रूपांच्या वैशिष्ट्यांचा आणि बंधनांचा कस लावूनदेखील मार्क्सने काढलेले निष्कर्ष टिकतात, बळकट होतात हे दाखवणे या दोन गोष्टींमुळे महत्त्वाचे बनते.

पुस्तकाच्या या दुसऱ्या भागात आपण नेमके हेच करणार आहोत. मार्क्सच्या 'कॅपिटल'च्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडांतील काही महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा आपण करणार अहोत. क्रयवस्तूच्या मूल्याची तपासणी करताकरता मागे आपण पैसा या गोष्टीपर्यंत आलो होतो. पैशाशी निगडित असे काही गुणात्मक फरकही असल्याचे आपल्याला आढळले होते. आणि त्यामुळे मूल्यसंबंधांच्या आशयाला धक्का तर लागत नव्हताच, उलट त्यांचा आशय वृद्धिंगत करणारे, तो प्रत्यक्षात आणणारे पैसा हे सुसंगत रूप ठरते असे आपण पाहिले होते. थोडक्यात पैसा हे रूप लक्षात घेतल्यामुळे गुणात्मक बदल जरूर होतात परंतु ते आशय वृद्धिंगत करणारे, प्रत्यक्षात आणणारे बदल असतात, आशयाला धक्का लावणारे बदल नसतात हे आपण पाहिले होते.

पुस्तकाच्या या दुसऱ्या भागात आपण वरकड-मूल्याच्या नफा या रूपावर लक्ष केंद्रित करून चालणार आहोत. त्यातूनही आपल्याला काही गुणात्मक बदल होताना दिसतील आणि ते बदलही आत्तापर्यंत काढलेले निष्कर्ष पक्के करणारे, आशय वृद्धिंगत करणारे आहेत हे प्रस्थापित होईल. पण इथे एक इशाराही देणे इष्ट ठरेल. नफा या रूपाची ही तपासणी करताना आपण एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि मार्क्सच्या समर्थकांमध्येही वादग्रस्तक्षेत्रात पाऊल टाकत आहोत, तेव्हा आपली वाटचाल त्या प्रमाणात थोडीफार कठीण असणार आहे. तेव्हा आस्तेकदम. इतकेच!

१७. मूल्य–किंमत रूपांतर : नफ्याच्या रूपात वरकड–मूल्याचे वाटप

वरकड–मूल्य व्यक्त व्हावे लागते ते नफा या रूपात, आणि या दोन्हींचे दर, आकडे आणि हिशेब वेगवेगळे असतात. वरकड–मूल्य नफा या रूपात व्यक्त झाले पाहिजे असे म्हणताच आपण या दोन्ही प्रकारच्या हिशेबांचा आणि आकड्यांचा संबंध वेगवेगळा असणार असे आपोआप म्हणत असतो. आणि, भांडवलदार हे वरकड–मूल्याच्या मागे लागले आहेत असे गृहीत धरून आपण जे निष्कर्ष काढले होते, जे संबंध बांधले जातात असे म्हटले होते, ते भांडवलदार प्रत्यक्षात नफ्याच्या मागे लागलेले असतात या वस्तुस्थितीमुळे बदलतात का हे पाहणे आवश्यक ठरते. त्यासाठी आपण वरकड–मूल्य व नफा यांचे वेगवेगळे हिशेब तपासून सुरुवात करूया.

१. वरकड–मूल्य व नफा : आशय व रूप

वरकड–मूल्याचा आणि नफ्याचा वेगवेगळा ताळेबंद

उदाहरणार्थ, असे समजा की भांडवलदारवर्गाच्या कारखान्यांमध्ये कामगारवर्ग ४० लाख श्रमतास मूल्याची श्रमसामग्री खर्च करून ८ लाख तास श्रमांच्या साहाय्याने क्रयवस्तूंचे उत्पादन करत आहे आणि कामगारांच्या एक तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य अर्धा श्रमतास आहे; म्हणजे कामगारवर्गाच्या ८ लाख

तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य ४ लाख श्रमतास आहे. त्यावरून वरकड-मूल्याच्या व नफ्याच्या हिशेबानुसार पुढील दोन ताळेबंद मांडता येतील.

वरकड-मूल्याचा ताळेबंद:

कायम भांडवल = ४० लाख श्रमतास
बदलते भांडवल = ४ लाख श्रमतास
वरकड मूल्य = ४ लाख श्रमतास
उत्पादित मालाचे मूल्य = ४८ लाख श्रमतास
वरकड-मूल्याचा दर = वरकड-मूल्य/बदलते भांडवल
= ४ लाख श्रमतास/४ लाख श्रमतास
= १०० %

नफ्याचा ताळेबंद : हाच हिशेब भांडवलदारांच्या दृष्टीने खालीलप्रमाणे दिसेल.

खर्च झालेले भांडवल = ४४ लाख श्रमतास (कायम + बदलते भांडवल)
नफा = ४ लाख श्रमतास (वरकड मूल्य)
नफ्याचा दर = नफा/खर्च झालेले भांडवल
= वरकड-मूल्य/(कायम + बदलते भांडवल)
= ४ लाख श्रमतास/४४ तास श्रमतास
= ९.०९%

नफ्यामध्ये अंतर्भूत सामाजिक विधान

या दोन हिशेबांमधला फरक पाहिला तर वरकड-मूल्य आणि त्याचे नफा हे रूप यांच्यातील पहिला फरक स्पष्ट होतो. वरकड-मूल्याचा दर काढताना आपण वरकड-मूल्याचा दर स्वाभाविकपणेच बदलत्या भांडवलाशी जोडला होता. याचे कारणही आपण पूर्वीच पाहिले आहे. वरकड-मूल्य निर्माण होण्यात कायम भांडवलाचा काहीही भाग नसतो. श्रमप्रक्रियेमधील श्रमशक्ती या एकमेव कर्त्याकरवत्या घटकाचे वैषिष्ट्य ओळखणे, या मानवी श्रमशक्तीचा वरकड-मूल्याशी सरळ संबंध जोडणे हे वरकड-मूल्य या संकल्पनेतच अभिप्रेत असते. सामाजिक संबंधांबद्दलचे हे विधान मार्क्सच्या वरकड-मूल्य या कल्पनेत अंतर्भूत आहे.

याउलट नफ्याचा संबंध हा स्वाभाविकपणे एकंदर भांडवलाशी असतो. कारण भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने श्रमप्रक्रियेतील श्रमशक्ती या घटकाला एकमेव कर्तेकरवते स्थान वगैरे बिलकुल नसते. त्याच्या दृष्टीने कच्चा माल काय, विद्युत्शक्ती काय, यंत्रे काय, इमारती काय आणि कामगाराची श्रमशक्ती काय,

सगळ्या गोष्टींना त्याच्या लेखी एकच महत्त्व असते. ज्यांच्यात भांडवल गुंतवावे लागते असे सगळे घटक. त्याच्या लेखी कर्ताकरवता घटक असतो तो त्याच्या हातातले या सगळ्या घटकांमध्ये त्याला गुंतवावे लागणारे मूल्य— त्याचे भांडवल. सामाजिक संबंधांबद्दलचे हे विधान नफा या नेहमीच्या भांडवली संकल्पनेमध्ये अंतर्भूत असते. आणि त्यामुळे नफा किती प्रमाणात झाला याचे माप म्हणून स्वाभाविकपणेच तो नफ्याला त्याच्या कर्त्याकरवत्या भांडवलाशी जोडतो! बदलत्या भांडवलाच्या रूपात कामगारांनी निर्माण केलेले वरकड–मूल्य रूप घेते ते भांडवलाने निर्माण केलेल्या नफ्याचे!

तसे पाहिले तर वरकड–मूल्य म्हणजेदेखील ४ लाख श्रमतास, आणि नफा म्हणजेही तेच ४ लाख श्रमतास. आकडा तोच आणि फक्त नाव बदललेले, नाही का? सतत आकड्यांत गुंतलेल्या जमाखर्चाच्या वधघटीचा हिशेब पाहणाऱ्या अर्थशास्त्राच्या दृष्टीने हा केवळ गणिती खेळ असतो, नाव बदलण्याचा खेळ असतो. पण प्रत्यक्षात मात्र ती सामाजिक संबंधांबद्दलची वेगवेगळी आकलने व्यक्त करणारी वेगवेगळी विधाने असतात. वरकड–मूल्य हे नफ्याचे रूप घेते असे मार्क्स म्हणतो तेव्हा त्याला हे वेगळे विधान, वेगळे आकलन अभिप्रेत असते. केवळ ४ लाख श्रमतासांना वेगळे नाव त्याला द्यायचे नसते. कामगारवर्ग हा भांडवलदारवर्गासाठी ४ लाख श्रमतास वरकड–मूल्य निर्माण करतो एवढाच रूपहीन आशय मार्क्सला अभिप्रेत नसतो. तर कामगारवर्गाची उत्पादकता ही भांडवलदारवर्गांच्या हातातील भांडवलाची उत्पादकता म्हणून नफ्याच्या उफराट्या रूपात व्यक्त होते हादेखील भांडवली संबंधांचा एक जैव अपरिहार्य भाग असतो हे मार्क्स मांडत असतो.

मागच्या दोन ताळेबंदांत साहजिकच नफ्याचा दर आणि वरकड–मूल्याचा दर यांच्यात तफावत दिसते. आणि भांडवलदारांना दिसत असतो तो नफ्याचा दर. नफ्याच्या दरावर नजर ठेवून भांडवलदार जे जे करणार त्यातूनच भांडवलशाहीतल्या सर्वसाधारण प्रवृत्तींचा निशाना साधला गेला पाहिजे असे आशय–रूप संबंध आपल्याला सांगतो. आपण पुस्तकाच्या पहिल्या भागात मात्र नफ्याच्या दराबद्दल न बोलता फक्त वरकड–मूल्याच्या दराबद्दल विवेचन करून निष्कर्ष काढले होते. पण वरकड–मूल्याचा दर आणि नफ्याचा दर हे दोन्ही दर तर वेगवेगळे दिसतात. त्यामुळे आता आपल्यावर एक जबाबदारी येऊन पडते. नफ्याच्या दरावर (आणि किंमतींवर) नजर ठेवून भांडवलदार जे जे करतील त्यातून, आपण पहिल्या भागात भांडवलशाहीच्या ज्या सर्वसाधारण

प्रवृत्ती पाहिल्या व तिच्याबद्दलचे जे निष्कर्ष काढले त्याच प्रवृत्तींचा व निष्कर्षांचा निशाना साधला जातो हे आपल्याला दाखवणे आवश्यक ठरते. नफा या वरकड-मूल्याच्या रूपामुळे जी जी जास्तीची बंधने आपल्या विश्लेषणावर पडतील त्यातून पूर्वी काढलेल्या निष्कर्षांना धक्का पोचत नाही हे सिद्ध करावे लागते.

२. आशयाच्या आविष्कारावर पडणारी रूपाची बंधने

नफ्याच्या दराचे पहिले बंधन

वरील ताळेबंदांमध्ये दिसणारा नफ्याच्या व वरकड-मूल्याच्या दरांमधला फरक हे त्याचे पहिले बंधन ठरते. हा फरक अगदी साध्या गोष्टीमुळे निर्माण होतो. वरकड-मूल्याचा दर काढताना वरकड-मूल्याच्या राशीला भाग लावताना फक्त बदलत्या भांडवलाने भाग देता येतो, त्याऐवजी नफ्याचा दर काढताना मात्र कायम भांडवलाची त्याला जोड देऊन, एकूण भांडवलाने भाग द्यावा लागतो.

या बंधनाचा पहिला परिणाम म्हणजे नफ्याचा दर हा नेहमीच वरकड-मूल्याच्या दरापेक्षा कमी दिसतो. यातून पिळवणुकीचे प्रमाण लपते, आहे त्याच्यापेक्षा कमी भासते. उदाहरणार्थ, 'कामगारांच्या श्रमांतून भांडवलदार ९.०९ टक्के नफा मिळवतात' या विधानातून कुणालाही सहजासहजी हे मुळीच कळणार नाही की कामगारांनी जितके तास स्वत:च्या जगण्यासाठी आवश्यक वस्तू निर्माण करण्यात घालवलेत तितकेच तास त्यांनी भांडवलदारांसाठी वस्तू निर्माण करण्यात घालवलेत. गुंतवलेल्या एकूण भांडवलाचे प्रमाण जितके जास्त असेल तितकी पिळवणूक लपते, म्हणजेच भांडवली उत्पादनाचा जितका जास्त विकास होतो तितकी ती जास्त लपते. मघाच्याच उदाहरणात कायम भांडवल ४० श्रमतासांऐवजी ९६ श्रमतास असले तर पिळवणुकीच्या दरात फरक न होता नफ्याचा दर मात्र फक्त ४ टक्क्यावर उतरेल. आणि भांडवलदार म्हणू शकतील की अहो, आम्हाला जेमतेम ४ टक्के नफा होतो अन् हे कामगार पिळवणुकीची भाषा करतात!

याच नाण्याची उलटी बाजूदेखील आहे. जेव्हा नफ्याचा दर वाढतो तेव्हा पिळवणुकीचा दर त्यापेक्षा कितीतरी जास्त वाढलेला असतो. वरील उदाहरणात जर कायम भांडवल तेवढेच राहून नफ्याचा दर ४ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर जायचा असेल तर पिळवणुकीचा दर मात्र १०० टक्क्यांवरून १४० टक्क्यांच्याही वर जावा लागतो. नफ्याच्या दरामध्ये २० टक्के वाढ होण्यासाठी

पिळवणुकीचा दर ४० टक्क्यांनी वाढावा लागतो! नफ्याचा दर वाढवण्याची प्रवृत्ती ही वरकडमूल्याचा, किंवा पिळवणुकीचा दर वाढण्याची प्रवृत्ती जास्तच तीव्र करणारी गोष्ट ठरते. नफा या रूपाचा विचार केल्यानंतर मार्क्सने मांडलेली ही वाढत्या पिळवणूक-दराची प्रवृत्ती क्षीण होण्याऐवजी, जास्तच तीव्र होताना आढळते!

तीच गोष्ट निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीबद्दल घडताना आपल्याला दिसेल. उदाहरणार्थ, फक्त वरकड-मूल्याचा किंवा वरकड-मूल्याच्या दराचा विचार केला तर ८ तासांऐवजी कामगारांनी १२ तास काम करण्यामुळे ४ तास आणखी वरकडमूल्य काढता येते. हे साधे कारण निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीमागे असते. पण नफ्याच्या दराचा विचार केला तर कामगारांच्या कामांच्या तासांची वाढ करण्याची याशिवाय आणखी कारणे तयार होतात. उदाहरणार्थ कामाचे तास ८ वरून १२ तासांवर गेले म्हणून कायम भांडवल ४० वरून नेमके दीडपटीवर जाणार नाही. कदाचित ते फक्त ५० श्रमतासांवर जाईल. कारण या भांडवलापैकी काही भागाचा (उदा. अप्रत्यक्ष श्रमसाधनांचा) भाग हा कामगारांनी कितीही काम केले तरी स्थिर असेल. फक्त कायम भांडवलाचा इतर भागच दीडपटीने वाढेल (कच्चा माल, प्रत्यक्ष श्रमसाधने इ.) त्यामुळे कामगारांनी जास्त तास काम केले तर ज्या राशीला भाग द्यायचे तो नफा वाढतो म्हणून नफ्याचा दर वाढतोच. शिवाय ज्या राशीने भागायचे ती भांडवलाची राशी मात्र तितक्या वेगाने वाढत नाही म्हणूनदेखील नफ्याचा दर वाढतो. नफा या रूपामुळे निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीला अडथळा न येता, उलट ती प्रवृत्ती जास्त तीव्र होते. हीच गोष्ट सापेक्ष वरकडमूल्याच्या प्रवृत्तीबद्दल दाखवता येते. किंबहुना नफ्याचा दर काढताना वरकडमूल्याला एकूण भांडवलाने भाग द्यावा लागतो या पहिल्या बंधनामुळे मार्क्सचे निष्कर्ष कमकुवत होण्याऐवजी जात भक्कम बनतात हे याच पद्धतीने दाखवता येते.

नफा या रूपाचे दुसरे बंधन

नफा या रूपातून प्रवृत्तीच्या स्वरूपात एक दुसरे बंधनदेखील पुढे येते. निरनिराळ्या, वैयक्तिकरीत्या कार्यवाहीत येणाऱ्या भांडवलाच्या तुकड्यांचा नफ्याचा दर सारखा असावा लागतो. याची मुळे भांडवली स्वरूपातील स्पर्धेच्या बंधनामध्ये आहेत. एखाद्या क्षेत्रात नफ्याचा दर जास्त असेल तर तो जिथे कमी आहे अशा क्षेत्रांमधील भांडवल त्या क्षेत्रात शिरते, भांडवलदारांमधील आपापसातील स्पर्धा वाढते. परिणामी त्या क्रयवस्तूची किंमत कमी होते. व नफ्याचा जास्त असलेला दर कमी होतो. अशा रीतीने

स्पर्धेमार्फत सर्व क्षेत्रांमधला दर एका सर्वसाधारण दराच्या जवळ जाण्याची प्रवृत्ती असते. आपण जेव्हा सर्व भांडवलाच्या तुकड्यांना सारखा नफ्याचा दर लागू होतो असे गृहीत धरीत असतो तेव्हा हीच प्रवृत्ती व्यक्त होते आहे, साकार होते आहे असे धरत असतो. थोडक्यात, निरनिराळ्या क्रयवस्तूंच्या उत्पादनात भांडवलदारांना सारखा नफ्याचा दर पडायला हवा हे बंधन आता नफा या रूपामुळे पडते, व सैद्धांतिकदृष्ट्या मार्क्सच्या मूल्यसिद्धांताच्या आधारावर हे शक्य आहे असे दाखवून देता यायला हवे.

३. मूल्यसंबंधांची निश्चिती करण्याचा प्रश्न

वेगळ्या गणिताची गरज

आता हे दाखवायला सुरुवात करायची म्हटले की प्रथम आपल्याला निरनिराळ्या क्रयवस्तूंचे मूल्य एकाच वेळी काढणे भाग पडते. आत्तापर्यंत आपण मूल्य काढण्यासाठी जी साधी फोड करून मूल्य काढत होतो ती पद्धत इथे अपुरी पडू लागते. आपण आतापर्यंत एका क्रयवस्तूच्या मूल्याची फोड करताना इतर क्रयवस्तूंचे मूल्य गृहीत धरत होतो, म्हणजेच ते स्वतंत्रपणे काढले गेलेले आहे असे गृहीत धरत होतो. निरनिराळ्या क्रयवस्तूंचे मूल्य एकाच वेळी काढताना इतकी साधी फोड आपल्याला करता येत नाही.

उदाहरणार्थ, समजा की आपण पोलादाचे मूल्य काढत अहोत, ते आपल्याला माहीत नाही. आपण या मूल्याची फोड करून कच्चा माल इ. खर्च झालेल्या श्रमविषयांचे मूल्य, खर्च झालेल्या श्रमसाधनांचे मूल्य, व कामगारांनी घातलेले श्रम यांची बेरीज केली असती व पोलादाचे मूल्य काढले असते. पण श्रमसाधनांचे मूल्य काय? त्यांचेही मूल्य आपल्याला काढायचे आहे. श्रमसाधनांचे मूल्य पुन्हा फोड करून काढायचे म्हटले तर त्यात पोलादाच्या मूल्याचा पुन्हा संबंध येतो! ही साधी फोड करत राहिले तर पोलादाचे मूल्य हे श्रमसाधनांचे मूल्य काढल्याशिवाय निश्चित होत नाही, आणि श्रमसाधनांचे मूल्य पोलादाचे मूल्य काढल्याशिवाय निश्चित होत नाही! एक दुष्टचक्र तयार होते.

मार्क्सच्या श्रममूल्याच्या सिद्धांतामधल्या त्रुटीमुळे हे दुष्टचक्र तयार होत नाही. अडचण आहे ती त्यातील गणिताच्या प्राथमिक पातळीवरील समजेची. कुठल्याही क्रयवस्तूचे मूल्य किंवा किंमत अशी सुटी सुटी फोड करून मिळत नसते. क्रयवस्तूंच्या व्यवहारातून तयार झालेली संबंधांची वीण सर्व क्रयवस्तूंचे मूल्य एकाच वेळी ठरवत असते. आपल्याला ही वीण सामावून घेईल अशा

गणितावर आधारलेली समज आवश्यक असते. अंकगणिताच्या पद्धतीने साधी फोड करण्याऐवजी आपल्याला अगदी साध्याच परंतु बीजगणिताची आवश्यकता असते. प्रत्येक क्रयवस्तूच्या माहीत नसलेल्या मूल्यासाठी आपण एक चिन्ह वापरले तर प्रत्येक क्रयवस्तूच्या मूल्याची साधी फोड एका साध्या समीकरणाला जन्म देते. सर्व क्रयवस्तूंच्या समीकरणांचा मिळून एक संच तयार होतो व ह्या समीकरणांचा संच सोडवून आपल्याला प्रत्येक क्रयवस्तूचे मूल्य मिळते.

भांडवली उत्पादनाचे एक गणिती प्रतिरूप

हे कसे होते हे पाहण्यासाठी आपण एका भांडवली उत्पादनव्यवस्थेचे एक सोपे प्रतिरूप (मॉडेल) उभे करूया. या प्रतिरूप भांडवलशाहीमध्ये लोखंड, गहू व सोने या तीन क्रयवस्तूंचे भांडवली उत्पादन होत आहे असे आपण धरूया. आणि त्याबरोबर भांडवल–संचयाची किमान अट, साधे पुनरुत्पादन पार पडत आहे असे धरूया. या सर्व गृहितांना एक विशिष्ट अर्थ आहे. आपण निवडलेल्या तीन क्रयवस्तू या भांडवली उत्पादनाच्या तीन महत्त्वाच्या विभागाची प्रतिरूपे आहेत. लोखंड हे विभाग एक किंवा श्रमसामुग्रीच्या उत्पादनाच्या विभागाचे प्रतिरूप आहे. गहू हे विभाग दोन किंवा कामगारवर्गाच्या उपयोगासाठी ज्या विभागाचे उत्पादन कामी येते त्याचे प्रतिरूप आहे. (भांडवली निकषांप्रमाणे ज्या क्रयवस्तू माणसांना जीवनावश्यक ठरवल्या गेल्या आहेत त्यांचे प्रतिरूप आहे.) आणि सोने हे विभाग तीनचे प्रतिरूप आहे. भांडवली निकषांप्रमाणेच त्या समाजात सर्वसाधारण माणसांना जीवनावश्यक न मानलेल्या, पर्यायाने चैनीच्या गोष्टींचे ते प्रतिरूप आहे. आणि शेवटी साधे पुनरुत्पादन ही किमान अट आपण गृहीत धरीत आहोत. (भांडवल–संचय गृहीत धरला तर गणिताची सैद्धांतिक बैठक बदलणार नाही, पण गणित मात्र अधिक गुंतागुंतीचे होईल.)

या प्रतिरूपाप्रमाणे आता आपल्यासमोर चार क्रयवस्तू आहेत; लोखंड, गहू, सोने व अर्थातच श्रमशक्ती. या चारही क्रयवस्तूंच्या मूल्यांना आपण खालीलप्रमाणे चिन्हे देऊ.

एक टन लोखंडाचे मूल्य = $म_१$ श्रमतास

एक टन गव्हाचे मूल्य = $म_२$ श्रमतास

१० गॅम सोन्याचे मूल्य = $म_३$ श्रमतास

एक तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य = $म_०$ श्रमतास

आता ही चिन्हे वापरून प्रत्येक क्रयवस्तूच्या मूल्याची फोड करून आपल्याला समीकरणांचा एक संच मिळेल. या संचावरून क्रयवस्तूंची मूल्ये निश्चित होत असल्याने आपण त्याला मूल्यसंच म्हणू या. तेव्हा प्रथम आपल्याला हा मूल्यसंच मांडता आला पाहिजे, व त्यातून प्रत्येक क्रयवस्तूचे मूल्य निश्चित झाले पाहिजे, म्हणजे, उत्तरांचा एकच एक संच मिळाला पाहिजे. हा संच मांडायचा तर त्यासाठी आपल्याला श्रमप्रक्रियेतील घडामोडींपासून सुरुवात करावी लागेल. श्रमप्रक्रियेमध्ये श्रमसामुग्री व श्रमशक्तीमार्फत जे मूल्यसंबंध बांधले जातात तेच आपल्याला या समीकरणांमध्ये सामावून घ्यावे लागतील. उदाहरणार्थ, असे धरू की कामगार ३०० तास श्रम करून १५० टन लोखंड (श्रमसामग्री) खर्च करून २०० टन लोखंड निर्माण करतात. यावरून आपल्याला खालील समीकरण मिळेल.

$$१५०म_१ + ३०० म_० + ३०० (१- म_०) = २०० म_१ \qquad ...१$$

(श्रमसामुग्रीचे मूल्य + श्रमशक्तीचे मूल्य + वरकड-मूल्य
= उत्पादनाचे मूल्य)

हे समीकरण म्हणजे सरळ भांडवली श्रमप्रक्रियेचे वर्णन आहे. १५० टन लोखंड या श्रमसामग्रीचे $१५०म_१$ इतके मूल्य उत्पादित मालात राखले जाते. कामगार प्रथम स्वत:च्या श्रमशक्तीच्या मूल्याइतके नवे मूल्य निर्माण करतात, म्हणजे $३००म_०$ इतके नवे मूल्यही उत्पादित मालात साठते. शिवाय कामगार वरकड-मूल्याच्या रूपात $३००(१-म_०)$ इतके नवे मूल्य देखील उत्पादित मालात साठवीत असतात. हे सर्व मूल्य मिळून उत्पादित २०० टन लोखंडाचे मूल्य $२००म_१$ श्रमतास ठरते.

त्याच पद्धतीने इतर क्रयवस्तूंसाठी समीकरणे तयार होतात. असे धरूया की गव्हाच्या उत्पादनात ५०० श्रमतास घालून व ३० टन लोखंड व १ टन गहू खर्च करून १० टन गव्हाचे उत्पादन करतात. त्याप्रमाणे,

$$३० म_१ + म_२ + ५०० म_० + ५०० (१-म_०) = १० म_२ \qquad ...२$$

तसेच सोन्याच्या उत्पादनामध्ये कामगार २०० श्रमतास घालून २० टन लोखंड खर्च करून ५० ग्रॅम सोने तयार करतात असे धरू. त्याप्रमाणे,

$$२० म_१ + २०० म_० + २०० (१-म_०) = ५ म_३ \qquad ...३$$

उरले श्रमशक्तीचे मूल्य. ते जीवनावश्यक वस्तूंच्या राहणीमानाच्या मार्फत ठरेल. आपल्या प्रतिरूपात गव्हाच्या स्वरूपातील राहणीमानावरून. असे धरूया की त्यातून
१ तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य ५ किलो गव्हाच्या मूल्याइतके ठरते. याप्रमाणे,

$म_० = ०.००५\ म_२$ ...४

ही चार समीकरणे एकत्र केली की चार अज्ञात मूल्यांसाठी मिळून मूल्यसंच खालीलप्रमाणे मिळतो :

$१५०म_१ + ३००\ म_० + ३००\ (१ - म_०) = २००\ म_१$ ...१

$३०\ म_१ + म_२ + ५००\ म_० + ५००\ (१ - म_०) = १०\ म_२$ ...२

$२०\ _{म१} + २००\ म_० + २००\ (१ - म_०) = ५\ म_३$ ...३

$म_० = ०.००५\ म_२$ ...४

ही चार समीकरणे एकत्रितपणे बीजगणिताच्या पद्धतीने सोडवली तर आपल्याला चारी क्रयवस्तूंचे मूल्य खालीलप्रमाणे निश्चित होऊन उत्तरांचा एकच एक संच मिळतो.[१]

$म_१$ = एक टन लोखंडाचे मूल्य = ६ श्रमतास

$म_२$ = एक टन गव्हाचे मूल्य = ७५.५ श्रमतास

$म_३$ = दहा ग्रॅम सोन्याचे मूल्य = ६४ श्रमतास

$म_०$ = एक तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य = ०.३७७५ श्रमतास

यावरून आपण वरकड-मूल्याचा किंवा पिळवणुकीचा दर (टक्क्यांमध्ये) खालीलप्रमाणे काढू शकतो :

पिळवणुकीचा दर $= ((१-म_०)/म_०) \times १००$

$= ((१-०.३७७५)/०.३७७५) \times १००$

$=(०.६२२५/०.३७७५) \times १००$

$= १८९\%$

थोडक्यात, आपण श्रमप्रक्रियेच्या आधारावर मूल्य निश्चित करणारा समीकरणांचा संच-मूल्यसंच मांडला. तो सोडवून आपल्याला एकच एक उत्तरांचा संचही मिळाला. निरनिराळ्या क्रयवस्तूंचे मूल्य एकाचवेळी काढून पहिला टप्पा आपण पार केला. जर मार्क्सच्या सैद्धांतिक संकल्पनांमध्ये काही त्रुटी असत्या तर ह्या संकल्पनांच्या आधारे अशा प्रकारचा एकच एक उत्तर असलेला समीकरणांचा संच (मूल्य-संच) बनवता आला नसता.

४. मूल्यसंचाकडून किंमतींच्या निश्चितीकडे

श्रमतासांचे सरळ भाषांतर अपुरे ठरते

आता आपल्याला किंमत व नफ्याचा दर यांची बंधने पाहायची आहेत. त्यासाठी आपण श्रमतासांची भाषा कायम ठेवून (आशय तपासण्याचीच भाषा कायम ठेवून) नफ्याचा दर हे रूप तपासून काय होते ते पाहू. म्हणजेच क्रयवस्तूंच्या मूल्यांचे व किंमतींचे आपापसातले प्रमाण सारखे आहे, त्यांचे सरळ सरळ भागाकाराने भाषांतर होऊ शकते असे गृहीत धरून पुढे जाऊया.

त्याप्रमाणे खालील कोष्टक मिळते. नफ्याचा दर या रूपामुळे नफ्याचा दर हा सर्व क्षेत्रात सारखा असणे आवश्यक होते. श्रमतासांची भाषा कायम ठेवून काढलेल्या कोष्टकामधील नफ्याच्या दराकडे नजर टाकली तर एक गोष्ट स्पष्ट होते—या कोष्टकात नफ्याचा दर प्रत्येक विभागामध्ये वेगवेगळा येतो. किंवा श्रमतासांची सरळ सरळ भाषा नफ्याचा दर या रूपाचे निकष पार पाडू शकत नाही.

उत्पादन विभाग	कायम भांडवल	बदलते भांडवल	एकूण भांडवल	वरकड-मूल्य (%)	नफ्याचा दर (%)*
लोखंड	९००.०	११३.५	१०१३.५	१८६.७५	१८.४
गहू	२५५.५	१८८.५	४४४.०	३११.२५	७०.१
सोने	१२०.०	७५.५	१९५.५	१२४.५०	६३.७
एकूण	१२७५.५	३७७.५	१६५३.०	६२२.५०	३७.७

* : नफ्याचा दर = (वरकड-मूल्य/एकूण भांडवल) × १००

आंगिक प्रमाण आणि नफ्याचे वेगवेगळे दर

श्रमतासांच्या गणितामध्ये नफ्याचा दर हा वेगवेगळा कशामुळे येतो याचे कारण आपल्याला मार्क्सच्या आंगिक प्रमाण या महत्त्वाच्या संकल्पनेमध्ये सापडते. निरनिराळ्या क्रयवस्तूंच्या उत्पादनामध्ये गुंतलेल्या भांडवलाचे आंगिक प्रमाण व श्रमतासांच्या आधारे मोजलेला नफ्याचा दर यांचे कोष्टक तयार केले तर ते खालीलप्रमाणे दिसते.

उत्पादन विभाग	कायम भांडवल (श्रमतास)	बदलते भांडवल (श्रमतास)	नफ्याचा दर (%)	आंगिक प्रमाण (%)*
लोखंड	९००.०	११३.५	१८.४	७.९३
गहू	२५५.५	१८८.५	७०.१	१.३६
सोने	१२०.०	७५.५	६३.७	१.५९
एकूण	१२७५.५	३७७.५	३७.७	३.३८

* :आंगिक प्रमाण = कायम भांडवल/बदलते भांडवल

या कोष्टकावरून आपल्याला असे दिसते की जिथे आंगिक प्रमाण जास्त आहे तिथे नफ्याचा दर कमी आहे. याचे कारण सोपे असते. वरकड-मूल्याचा दर सारखा असेल आणि आंगिक प्रमाण वेगवेगळे असेल, तर श्रमतासांमध्ये सरळ मोजलेला नफ्याचा दर वेगवेगळा येणे अपरिहार्य असते. उदाहरणार्थ, वरकड-मूल्याचा दर आपण १०० टक्के धरू. समजा एखाद्या क्षेत्रामध्ये १०० श्रमतास भांडवल ४:१ या आंगिक प्रमाणात खर्च होत आहे व दुसऱ्या क्षेत्रातही १०० श्रमतास भांडवल ३:१ प्रमाणात खर्च होत आहे. पहिल्या क्षेत्रात १०० पैकी २० श्रमतास बदलते भांडवल असेल व त्यामुळे तिथे २० श्रमतास वरकड-मूल्य निर्माण होईल. दुसऱ्या क्षेत्रात २५ श्रमतास बदलते भांडवल असेल व २५ श्रमतास वरकड-मूल्य निर्माण होईल. पहिल्या क्षेत्रात श्रमतासात मोजलेला नफ्याचा दर २० टक्के येईल तर दुसऱ्या क्षेत्रात २५ टक्के.

वरकड-मूल्याचा वेगवेगळा दर का धरायचा नाही?

अर्थात्, श्रमतासांचेच सरळ माप किमतींना लावूनदेखील नफ्याचा दर सारखा येऊ शकेल, पण मग पिळवणुकीचा दर वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळा आहे असे गृहीत धरावे लागेल. परंतु असे गृहीत धरणे मार्क्सला काही महत्त्वाच्या कारणांमुळे अमान्य होते.

त्यातील पहिले कारण रूपाच्या महत्त्वाशी निगडीत आहे. नफ्याचा दर सारखा येण्यासाठी वेगवेगळा पिळवणुकीचा दर गृहीत धरावा लागतो. कारण श्रमतासांचेच, आशयाचे सरळ माप किंमत या रूपाला लावायचा आपण प्रयत्न करीत अहोत आणि मार्क्सला नेमके हेच सूत्र मान्य नाही. श्रमतासाचे माप सरळसरळ किंमतीना लागू शकत नाही. म्हणूनच तर त्याच्या मते पैसा जन्माला येतो!

दुसरे कारण म्हणजे ज्याप्रमाणे नफ्याचा दर समान असण्याची एक प्रवृत्ती भांडवलशाहीमध्ये असते त्याचप्रमाणे पिळवणुकीचा किंवा वरकड-मूल्याचा दर दोन मर्यादांनी निश्चित होतो. कामाचे तास व श्रमशक्तीचे मूल्य. श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीतून व्यक्त होणाऱ्या वर्गसंघर्षामार्फत या दोन्ही मर्यादांचे सर्वसाधारण निकष तयार होऊन ते प्रत्यक्षात येण्याची प्रवृत्ती असते. कामाचे सर्वसाधारण तास व श्रमशक्तीचे सर्वसाधारण मूल्य गृहीत धरणे याचा अर्थ वरकड-मूल्याचादेखील एक सर्वसाधारण दर सर्वक्षेत्रांसाठी गृहीत धरणे असा होतो. तेव्हा नफ्याचा एकच सर्वसाधारण दर गृहीत धरण्यामागे जितकी सबल कारणे असतात तितकीच वरकड-मूल्याचाही एकच दर गृहीत धरण्यामागे असतात.

या दोन्ही कारणांबरोबरच, एक तिसरे सैद्धांतिक परिपूर्णतेचे महत्त्वाचे कारण यामागे असते. सैद्धांतिकदृष्ट्या, भांडवलशाहीमध्ये वरकड-मूल्याचा दर आणि नफ्याचा दर या दोन्ही गोष्टी सर्व क्षेत्रांसाठी समान नसण्याचे कोणतेही कारण नसते. उलट असतात ती कारणे हे दोन्ही दर समान असण्याच्या बाजूची असतात. तेव्हा मार्क्सच्या सैद्धांतिक संकल्पना जर वैज्ञानिकदृष्ट्या परिपूर्ण असतील तर वरकड-मूल्याचा आणि नफ्याचा दर दोन्ही गोष्टी सर्व क्षेत्रांसाठी समान आहेत अशी परिस्थिती त्याच्या सिद्धांतामध्ये सामावून घेणे शक्य व्हावे लागते. ही परिस्थिती सामावून घेणे हा त्या संकल्पनांचा कस लावणारी परिस्थिती (टेस्ट केस) बनते आणि अशा सैद्धांतिक परिपूर्णतेच्या कुठल्याच आव्हानाला भिऊन मार्क्स पळवाट काढत नाही.

मूल्य-किंमत संबंधांचा कस लागतो

तेव्हा आपल्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. श्रमतासांच्या (आशयाच्या) भाषेतील वरकड-मूल्याचा दरही सर्व क्षेत्रांसाठी सारखा राहिला पाहिजे; आणि त्याबरोबरच किंमतीच्या (रूपाच्या) भाषेतील नफ्याचा दरही सर्व क्षेत्रांसाठी समान राहिला पाहिजे. किंमतींचे प्रमाण जर श्रमतासांमध्ये मोजलेल्या मूल्याच्या सरळसरळ प्रमाणात धरले तर हे होत नाही असे आपण पाहिले; तेव्हा किंमतींचे प्रमाण हे श्रमतासातील मूल्याच्या प्रमाणात असणार नाही हे उघड आहे. पण असे म्हटले की काही प्रश्न उभे राहतात.

पहिला प्रश्न म्हणजे या किंमती निश्चित करण्याचा. मूल्यसंबंधांवरून जर किंमती निश्चित होत असतील तर आपल्या प्रतिरूपामध्ये क्रयवस्तूंच्या

किंमतींचा एकचएक संच हा बरोबर ठरला पाहिजे. एका क्रयवस्तूला एकापेक्षा जास्त वैध किंमती असणे हे चुकीचे ठरेल. दुसरा प्रश्न म्हणजे त्या किंमती मूल्यसंबंधांच्या मूल्य संचात मांडलेल्या समीकरणांवरून निर्णित (डिटरमिन) होतात हेही दाखवणे आपल्याला भाग पडेल आणि तिसरा प्रश्न म्हणजे त्यातून पुनरुत्पादनाच्या अटींचा भंग होत नाही हे दाखवणे भाग पडेल.

वरील प्रश्न आपण सोडवू शकतो ते मार्क्सच्या मूल्यसिद्धांतामधील रूपाचे वैशिष्ट्य काटेकोरपणे पाळून. मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे श्रमप्रक्रियेमध्ये जे मूल्य संबंध बांधले गेले आहेत तेच किंमतीच्या रूपात व्यक्त होतात. एकच श्रमप्रक्रिया त्यामार्फत व्यक्त होत असते. मूल्यसंचात प्रत्येक क्षेत्रातील श्रमप्रक्रियेवर आधारलेले एकेक समीकरण तयार करून आपण मांडले होते. त्या समीकरणांमधील प्रत्येक घटकाचे रूप लक्षात घेतले की एक नवीन समीकरणांचा संच मिळतो. हा नवा संच जर सुटण्याजोगा असला आणि त्यातील किंमतींना मिळून एकच एक उत्तरांचा संच आपणाला मिळाला तर प्रश्न सुटलेला असतो. हे कसे होते ते पाहण्यासाठी आपल्या मागच्या प्रतिरूपासाठी हा नवीन समीकरणांचा संच तयार करून बघू.[२]

किंमत संच

या नवीन संचासाठी आपण खालील चिन्हांचा उपयोग करू.

$कि_{१}$ = एक टन लोखंडाची किंमत रुपयांमध्ये

$कि_{२}$ = एक टन गव्हाची किंमत रुपयांमध्ये

$कि_{३}$ = १० ग्रॅम सोन्याची किंमत रुपयांमध्ये

व = एक तास श्रमांचे वेतन रुपयांमध्ये

न = नफ्याचा दर

आता आपण मगाचचे लोखंडाच्या उत्पादनाचे समीकरण पुन्हा मांडू.

$$१५० म_{१} + ३०० म_{०} + ३०० (१ - म_{०}) = २०० म_{१} \qquad \ldots (१)$$

यातील घटकांचे रूप लक्षात घेता आपल्याला खालील नवे समीकरण मिळेल.

$$१५० कि_{१} + ३०० व + न (१५० कि_{१} + ३०० व) = २०० कि_{१} \qquad \ldots (१अ)$$

या नव्या समीकरणात रूपाचा पैलू खालीलप्रमाणे लक्षात घेतलेला आहे १५० टन लोखंडाचे मूल्य हे लोखंडाची किंमत या रूपात १५० $कि_{१}$ म्हणून व्यक्त होईल. ३०० तास श्रमशक्तीचे मूल्य हे तितक्या तासांचे वेतन या रूपात ३०० व

म्हणून व्यक्त होईल. आणि ३०० ($१—म_०$) हे वरकड-मूल्य भांडवलदाराच्या भांडवलावरील न या समान दराने मिळालेला नफा या रूपात व्यक्त होईल. म्हणजेच ते, न (१५० $कि_१$ + ३०० व) म्हणून व्यक्त होईल. व उत्पादित लोखंडाचे मूल्यही त्याचप्रमाणे २०० $कि_१$ म्हणून व्यक्त होईल.

याच पद्धतीने गव्हासाठी, सोन्यासाठी व श्रमशक्तीसाठी अशीच तीन समीकरणे मिळतील. म्हणजे एकूण चार नव्या समीकरणांचा खालील संच आपल्याला मिळेल. मूल्यसंचातील चार समीकरणांमधील प्रत्येक घटकाच्या रूपाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन त्यांचे या चार समीकरणांमध्ये रूपांतर झालेले असेल. ती चार समीकरणे खालीलप्रमाणे असतील.

$$१५० कि_१ + ३०० व + न (१५० कि_१ + ३०० व) = २०० कि_१ \quad ... (१अ)$$

$$३० कि_१ + कि_२ + ५०० व + न (३० कि_१ + कि_२ + ५०० व) = १० कि_२ \quad ... (२अ)$$

$$२० कि_१ + २०० व + न (२० कि_१ + २०० व) = ५ कि_३ \quad ... (३अ)$$

$$व = ०.०५ कि२ \quad ... (४अ)$$

या वरील संचातून आपल्याला किंमतींचे परस्परांशी प्रमाण किंवा विनिमय मूल्ये मिळतील, परंतु खुद्द किंमती मिळणार नाहीत. कारण किंमत म्हटले की पैशाचाही प्रश्न आलाच. पैसा हा संबंध कुठल्या क्रयवस्तूंमध्ये (किंवा क्रयवस्तूंच्या नियत मिश्रणामध्ये) अंतर्भूत आहे हे सांगणारे आणखी एक समीकरण किंमती मिळण्यासाठी आवश्यक आहे. या ठिकाणी सोयीसाठी आपण सोने हेच मूल्याचे माप व किंमतीचे परिमाण म्हणून काम करत आहे असे धरू आणि सोन्याची किंमत ही १० ग्रॅमला ३०,००० रुपये आहे व या प्रमाणात पैशाचा संबंध व्यक्त होतो आहे असे धरू. यावरून आपल्याला पैशाचा संबंध सांगणारे आणखी एक पाचवे समीकरण मिळेल.

$$कि_३ = ३०,००० \quad ... (५ अ)$$

ही पाच समीकरणे मिळून एक संच बनेल व त्यामध्ये आपल्या प्रतिरूपामधील मूल्यसंबंधांच्या रूपाचे पूर्ण वैशिष्ट्य अंतर्भूत असेल. या संचाला आपण किंमतसंच असे नाव देऊ.

हा पाच समीकरणांचा किंमतसंच सोडवणे हे मूल्यसंच सोडवण्याइतके सोपे नाही. प्रथमदर्शनी एकचएक उत्तरांचा संच असेल हेही स्पष्ट होत नाही. परंतु तो

सोडवण्याजोगा आहे व त्याला खालील उत्तरांचा एकच संच मिळतो हे गणिताने दाखवता येते.[३]

कि$_{१}$ = लोखंडाची टनामागे किंमत = ४,५०० रुपये

कि$_{२}$ = गव्हाची टनामागे किंमत = ३०,००० रुपये

कि३ = सोन्याची १० ग्रॅममागे किंमत = ३०,००० रुपये

व = एक तासाचे वेतन = १५० रुपये

न = नफ्याचा सर्वसाधारण दर = ०.२५ = २५ टक्के

या किंमतींच्या आधारावर प्रतिरूपामधील उत्पादनप्रक्रियेच्या घटकांचे कोष्टक मांडले तर ते खालीलप्रमाणे दिसेल.

उत्पादन विभाग	कायम भांडवल	बदलते भांडवल	एकूण भांडवल	नफा	नफ्याचा दर (%)	उत्पादनाची किंमत
लोखंड	६,७५	४५	७,२०	१,८०	२५	९,००
गहू	१,६५	७५	२,४०	६०	२५	३,००
सोने	९०	३०	१,२०	३०	२५	१,५०
एकूण	९,३०	१,५०	१०,८०	२,७०	२५	१३,५०

सर्व आकडे '००० रु. मध्ये; नफ्याचा दर=(नफा/एकूण भांडवल) × १००

या सर्व गणितावरून आपल्याला असे आढळते की अनुक्रमे टनामागे ६ श्रमतास, टनामागे ७५.५ श्रमतास, १० ग्रॅममागे ६४ श्रमतास, व तासामागे ०.३७७५ श्रमतास मूल्य असलेल्या लोखंड, गहू, सोने व श्रमशक्ती या क्रयवस्तू अनुक्रमे टनामागे ४,५०० रुपये, टनामागे ३०,००० रुपये, १० ग्रॅममागे ३०,००० रुपये, व तासामागे १५० रुपये वेतन या किंमतींना विकल्या जातात व त्यामार्फत १८९ टक्के सर्वसाधारण पिळवणुकीच्या दराचे २५ टक्के सर्वसाधारण नफ्याच्या दरामध्ये रूपांतर होते.

मूल्य–किंमत गणितामागील अर्थ

'मूल्यसंच' आणि 'किंमतसंच' बनवणे व ती समीकरणे सोडवणे, या सर्व गणिती खटाटोपातून आपण नेमके काय केले हे नीट लक्षात घेतले पाहिजे. मार्क्सच्या दृष्टिकोनानुसार सामाजिक संपत्तीच्या निर्मितीत माणसे आपसात जे संबंध बांधतात ते भांडवलशाहीत क्रयवस्तूंना चिकटलेल्या आकड्यांमार्फत व्यक्त होतात. त्यांच्या संबंधांची संगती ही या आकड्यांच्या संगतीमधून स्पष्ट

व्हावी लागते. आणि आकड्यांची संगती ही प्रत्यक्ष माणसामाणसांमधील संबंधांच्या संगतीप्रमाणेच लागते हे दाखवणे ही एक महत्त्वाची सैद्धांतिक अट बनते. क्रयवस्तूंच्या विभूतीकरणाचाच तो परिपाक असतो. आणि नेमके हेच आपण या खटाटोपामधून मांडले आहे.

मार्क्सचे भांडवली उत्पादनाचे विश्लेषण उभे राहते तेच मुळी श्रमप्रक्रियेच्या तपासणीतून. त्यामुळे आपणही तिथूनच सुरुवात केली होती. आपल्या प्रतिरूपातील भांडवलशाहीमधील सामाजिक श्रमप्रक्रिया अमूर्त श्रमकाळ या मूल्यसंबंधांच्या आशयाच्या रूपात कशी पुनरुत्पादित होईल याबद्दल मार्क्सचा सिद्धांत जे म्हणतो त्यावरून आपण मूल्यविषयक समीकरणांचा 'मूल्यसंच' तयार केला. मार्क्सच्या सिद्धांताची सुसंगतीही या समीकरणांमध्ये व्यक्त व्हायला हवी. हा समीकरणांचा संच सुटण्याजोगा होता व श्रमप्रक्रियेच्या विशिष्ट संगतीच्या आधारावर त्यांना एकच निश्चित उत्तरांचा संच होता यावरून ती सिद्ध झाली.

नंतर त्याच श्रमप्रक्रियेच्या पायावर मार्क्सचे मूल्यसंबंधांच्या रूपाबद्दलचे जे म्हणणे आहे ते आधाराला घेऊन आपण किमतसंच तयार केला. मार्क्सच्या मूल्य संबंधांच्या रूपाबद्दलच्या सिद्धांताची सुसंगतीही या समीकरणांमध्ये व्यक्त व्हावी लागते. हाही समीकरणांचा संच सुटण्याजोगा होता, व श्रमप्रक्रिया आणि मूल्यसंबंध या दोन्हींच्या विशिष्ट संगतीच्या आधारावर त्यांना एकच निश्चित उत्तरांचा संच मिळावा यावरून ही सुसंगती सिद्ध झाली.

थोडक्यात, सामाजिक श्रमप्रक्रियेमध्ये क्रयवस्तूंचे उत्पादन होत आहे या गृहितावरून क्रयवस्तूंचे मूल्य हा आशय निश्चित होतो हे आपण दाखवले. तसेच या श्रमक्रियेमधील मूल्यसंबंधांचा आशय गृहीत धरून मूल्यसंबंधांचे दृश्य रूप—क्रयवस्तूंच्या किंमती—निश्चित होतात हेही आपण दाखवले. मूल्यसंबंधांची वीण व तिचा आशय हा त्यांचे रूप किंवा किंमती निश्चित करतो हे आपण दाखवले. मार्क्सच्या मूल्यसिद्धांतामध्ये गणिती विसंगती नाही हे आपण प्रस्थापित केले. यातील गणिताचा तपशील आवश्यक ठरला कारण मूल्य आणि त्याचे किंमत हे रूप, दोन्ही शेवटी आकडेच असतात व त्यांची संगती ही गणिताच्या आधारानेच दाखवावी लागते.

मूल्य–किंमत रूपांतरामुळे नेमके काय बदलते?

अर्थात्, मूल्याचे किंमतीत रूपांतर होते तेव्हा काही महत्त्वाचे बदल जरूर घडतात. तसे नसते तर रूपाला स्वत:चे असे महत्त्वच उरले नसते. त्यामुळे मूल्य–किंमत रूपांतरामुळे कोणत्या गोष्टी कोणत्या पद्धतीने बदलतात हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तसे करायला लागले की मूल्यसंबंधांचा आशय व त्यांचे रूप यांच्यातील संबंधांबद्दलही आपली स्पष्टता वाढत जाते.

उदाहरणार्थ, आपल्या उदाहरणातील वस्तूंच्या मूल्यांच्या किंमतींतील रूपांतरामुळे मूल्य आणि किंमत यांचा सरळसरळ समानतेचा संबंध नाहीसा होतो. एक टन गहू व दहा ग्रॅम सोने यांची किंमत सारखीच आहे. तीस हजार रुपये—पण त्यांचे मूल्य मात्र वेगळे आहे. अनुक्रमे ७५.५ श्रमतास व ६४ श्रमतास. याचा निरनिराळ्या संबंधांवर काय परिणाम होतो किंवा होत नाही ते पाहणे आवश्यक ठरते. त्यासाठी आपण प्रतिरूपामधील सामाजिक पुनरुत्पादनाच्या वर्गीय पातळीवरील अटी या रूपांतरामुळे कशा बदलतात किंवा बदलत नाहीत ते पाहत जाऊ.

(१) श्रमसामुग्री : मूल्यसंचामध्ये हे गृहीत होते की एकूण २०० टन लोखंड व १ टन गहू भांडवलदारवर्ग उत्पादनप्रक्रियेत खर्च करतो व पुन्हा विकत घेतो. ही अट किंमतसंचदेखील पार पाडतो असे दिसेल. पण त्याचबरोबर पुनरुत्पादनाच्या दृष्टीने याचे भांडवलदारवर्गाच्या अंतर्गत वाटपही महत्त्वाचे असते. त्यातील लोखंड, गहू व सोने निर्माण करणाऱ्या कारखान्यांच्या मालकाला अनुक्रमे १५० टन लोखंड, ३० टन लोखंड व एक टन गहू, आणि २० टन लोखंड असे श्रमसामुग्रीचे वाटप होणेही महत्त्वाचे असते, ही अट किंमतसंच पार पाडताना दिसतो. थोडक्यात, श्रमसामुग्रीमार्फत बांधल्या जाणाऱ्या कोणत्याही उत्पादन संबंधांना आपले रूपांतर धक्का लावत नाही.

(२) श्रमशक्ती : मूल्यसंचामध्ये १,००० तासांची कामगारवर्गाची श्रमशक्ती वापरली जाते व हातात पडणाऱ्या मूल्यामार्फत दर तासाच्या श्रमशक्तीमागे ६ किलो गहू याप्रमाणे ती पुनरुत्पादित होत हे गृहीत होते. किंमतसंचामध्येही कामगारवर्गाची १,००० तासांची श्रमशक्ती वापरली जाते व हातात पडणाऱ्या वेतनामार्फत ती त्याच पद्धतीने पुनरुत्पादित होताना दिसते. तसेच लोखंड, गहू, व सोने निर्माण करणाऱ्या कारखान्यांच्या मालकांमध्ये या श्रमशक्तीचे अनुक्रमे ३०० तास ५०० तास व २०० तास असे वाटप होणेही आवश्यक असते.

थोडक्यात, श्रमशक्तीमार्फत बांधल्या जाणाऱ्या कोणत्याही उत्पादनसंबंधांना धक्का लागत नाही.

(३) वरकड–मूल्य : सामाजिक उत्पादनापैकी २०० टन लोखंड व एक टन गहू हे श्रमसामुग्रीमार्फत उत्पादनात वापरले जात असतात, आणि त्याचबरोबर ५ टन गहू हे श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी वापरले जात असतात. उरलेले ४ टन गहू व ५० ग्रॅम सोने हे भांडवलदारवर्गाच्या हातात वरकड–मूल्याच्या रूपाने पडत असतात. किंमतसंचातदेखील भांडवलदारवर्गाच्या हातात तितकेच समाजिक उत्पादन नफ्याच्या रूपात पडताना दिसते. थोडक्यात भांडवलदारवर्गाच्या पातळीवर कामगारांच्या शोषणातून हातात येणारा सामाजिक श्रमांचा वाटा किंमतसंचामध्ये तोच राहतो.

बदलते ते भांडवलदारांमधले वरकड–मूल्याचे वाटप

भांडवलदारवर्गाच्या अंतर्गत वरकड–मूल्याचे वाटप मात्र किंमतसंचामध्ये बदललेले दिसते. मूल्यसंचानुसार त्या त्या विभागात निर्माण झालेले वरकड–मूल्य, व किंमत या स्वरूपात व्यक्त होऊन त्याच्या हातात पडणारे नफा या रूपामार्फत वाटप झालेले वरकड–मूल्य यांचे कोष्टक खालीलप्रमाणे दिसते.

उत्पादन विभाग	वरकड–मूल्याची निर्मिती		नफ्याच्या रूपातील वाटप	
	वरकड–मूल्य (श्रमतास)	वरकड मूल्याचा वाटा (टक्के)	नफा ('०००रु.)	नफ्याचा वाटा
लोखंड	१८६.७५	३०	१,८०	६७
गहू	३११.२५	५०	६०	२२
सोने	१२४.५०	२०	३०	११
एकूण	६२२.५०	१००	२,७०	१००

थोडक्यात, मूल्यसंचाचे किंमतसंचात रूपांतर होऊन मूल्यसंबंध प्रत्यक्षात येतात तेव्हा काय होते याचे खालील शब्दांत वर्णन करता येईल. पुनरुत्पादनाच्या कोणत्याही संबंधांना, वर्गावर्गांमधील संबंधांना धक्का न लागता फक्त वरकड–मूल्याचे भांडवली स्पर्धेच्या निकषांप्रमाणे भांडवलदारवर्गाच्या अंतर्गत वाटप होते. दुसऱ्या अर्थाने आपण असे म्हणू शकतो, की मूल्यसंचात अंतर्भूत असलेल्या वर्गीय आशयाने घालून दिलेल्या कक्षेत राहूनच किंमतसंचामुळे

होणारे फेरफार घडतात. मूल्यसंबंध हा आशय व किंमत हे रूप, यांच्यातील संबंध हा खऱ्या अर्थाने आशय–रूप संबंध म्हणून आपल्यासमोर उभा राहतो. आशय व रूप दोन्हींचे आपापले महत्त्व व आशयाने घालून दिलेल्या मर्यादांच्या कक्षेत बदलणारे रूप हे त्याचे मर्म असते.[४]

ज्या विभागांमध्ये आंगिक प्रमाण जास्त असल्यामुळे नफ्याचा दर कमी होता तिथे मूल्यसंबंधांच्या वर्गीय आशयाला धक्का न लावता मूल्याच्या तुलनेत किंमत जास्त ठरते, आणि तसेच जिथे ते कमी होते तिथे ती त्याच पद्धतीने कमी ठरते. महत्त्वाचे हे असते की वर्गीय आशयाला धक्का न लावता हा तुलनात्मक बदल होतो.

अन् त्याचबरोबर मूल्यसंबंधांची दिशा हीदेखील अपरिहार्यपणे किंमतसंचात प्रतिबिंबित होत असते. हे गणिताने दाखवता येते. एखाद्या वस्तूचे मूल्य वाढले की किंमत वाढते, मूल्य कमी झाले तर किंमत कमी होते. वरकड–मूल्याचा दर वाढला की नफ्याचा दर वाढतो, तो कमी झाला तर नफ्याचा दर कमी होतो. श्रमतासात मोजलेले आंगिक प्रमाण वाढले की किंमतींच्या आधारावर काढलेले आंगिक प्रमाणही वाढते आणि कमी झाले तर कमी होते. मूल्याच्या राशींच्या हालचालीच्या दिशेसंबंधी, प्रमाणांमधील बदलांसंबंधी जे जे म्हटलेले असते ते सर्व किंमतीच्या रूपात व्यक्त होणाऱ्या त्या त्या राशींबद्दल आणि प्रमाणांबद्दल खरे ठरते. किंमत हे रूप नजरेआड करून देखील भांडवली उत्पादनाच्या दिशेबद्दल, बदलांबद्दल जे जे निष्कर्ष मार्क्सने काढले ते किंमत हे रूप लक्षात घेतल्यामुळे कुठेही बदलत नाहीत. बदलतात ते आकडे, बदलांची दिशा नव्हे!

५. रूपांतरावरील अभिजात भांडवली आक्षेप

प्राथमिक समज मार्क्सची की टीकाकारांची?

मार्क्सच्या मूल्यसिद्धांतावरील अभिजात भांडवली आक्षेप हे क्रयवस्तूंच्या मूल्यांचे आपापसातले प्रमाण व किंमतीचे आपापसातले प्रमाण यांच्यातील तफावतीवर आधारलेले आहे. उदाहरणार्थ, वरील उदाहरणात सोन्याची किंमत १० ग्रॅम मागे ३०,००० रुपये होती, व गव्हाची किंमत टनामागे ३०,००० रुपये होती. म्हणजे त्यांच्या किंमतींचे प्रमाण हे १:१ ठरते. पण त्याचबरोबर सोन्याचे १० ग्रॅममागे मूल्य होते ६४ श्रमतास व गव्हाचे टनामागे ७५.५ श्रमतास होते. त्यामुळे त्यांचे मूल्यांचे प्रमाण हे ६४:७५.५ ठरते. तेव्हा हे

भांडवली टीकाकार म्हणतात की जर मूल्यावरून किंमत ठरत असेल तर किंमतींचे प्रमाणदेखील ६४:७५.५ पाहिजे. तसे नसेल तर कुठे उरला मार्क्सचा मूल्यसिद्धांत?

या टीकाकारांची मार्क्सच्या मूल्यसिद्धांताची समजच तोकडी असते, कारण मार्क्सचा मूल्यसिद्धांत मुळात मूल्यांचे प्रमाण = किंमतींचे प्रमाण या संबंधावर आधारलेला नाही. मूल्यावरून किंमत ठरते याचा अर्थ एकतर हा असतो की एकंदर मूल्यसंबंधांची वीण मिळून किंमती ठरवत असते आणि दुसरे म्हणजे मूल्यांच्या स्वरूपात, श्रमतासांच्या भाषेत, जे उत्पादनाचे संबंध असतील त्या आशयाच्या कक्षेत, त्या आशयाला धक्का न लावता किंमत या रूपामुळे होणारे फेरफार व्हावे लागतात. हे भांडवलशाहीत कसे होते ते आपण वर पाहिलेच आहे. किंबहुना मूल्यांचे प्रमाण = किंमतींचे प्रमाण अशी मार्क्सच्या सिद्धांतबाबतची प्राथमिक आणि चुकीची समज या भांडवली टीकाकारांनीच करून घेतली आहे हे उघडकीस येते.

टीकाकारांना सापडणारे दोन मार्क्स

पण इतक्यावर हा मामला संपत नाही. भांडवली विचारवंत खुद्द मार्क्सची साक्ष त्यांच्या बाजूने काढतात आणि प्रकरण आणखी गुंतागुंतीचे बनते. इथे ते हमखास मार्क्सच्या कॅपिटलच्या पहिल्या खंडाची साक्ष काढतात. पहिल्या खंडामध्ये पैशाचे प्रकरण संपल्यानंतर पुढील सर्व भागांमध्ये मार्क्स श्रमतासातील मूल्याचे सरळसरळ पैशात रूपांतर करत असतो. (आपण या पुस्तकात केलेले नाही व त्याची कारणे आता चर्चेच्या ओघात आपोआपच स्पष्ट होतात.) उदाहरणार्थ, २ श्रमतास = १ रुपया असे धरून तो १० श्रमतास मूल्याच्या जागी ५ रुपये, १२ श्रमतास मूल्याच्या जागी ६ रुपये असे धरत जातो. थोडक्यात, पहिल्या खंडामध्ये तो मूल्यांचे प्रमाण हे सरळ किंमतींचे प्रमाण म्हणून धरीत असतो. आणि नेमकी याच गोष्टीची साक्ष टीकाकार त्यांच्या बाजूने काढतात!

ही साक्ष खरी आहे असे एकदा गृहीत धरले की मार्क्सलाच मार्क्सवर उलटवणे अगदी सोपे असते. त्यांना दोन मार्क्स सापडतात. रूपांतराचा प्रश्न हाताळणारा तिसऱ्या खंडातील एक मार्क्स म्हणत असतो की भांडवलशाहीमध्ये सर्वसाधारण नफ्याचा दर सारखा असण्याची प्रवृत्ती लक्षात घेतली की त्याचा अर्थ असा होतो की मूल्यांचे प्रमाण व किंमतींचे प्रमाण यांच्यात अपरिहार्यपणे

तफावत असते. आंगिक प्रमाण जास्त असलेल्या क्रयवस्तूंच्या किंमतीचे प्रमाण हे तिच्या मूल्यांच्या प्रमाणापेक्षा जास्त असते. थोडक्यात भांडवलशाहीमध्ये प्रत्यक्षात मूल्यांचे प्रमाण व किंमतींचे प्रमाण कधीच सारखी नसतात. आणि पहिल्या खंडात, दुसरा एक मार्क्स भांडवली व्यवस्थेवर एकामागून एक घणाघाती घाव घालत आपले क्रांतिकारक निष्कर्ष मांडीत जात असतो, ते कशाच्या आधारावर? तर मूल्यांचे प्रमाण हे सरळपणे किंमतींच्या प्रमाणाबरोबर धरून केलेल्या गणिताच्या आधारावर! म्हणजे भांडवलशाहीत जी परिस्थिती कधीच प्रत्यक्षात अस्तित्वात नसते अशा परिस्थितीच्या आधारावर!!

भांडवली टीकाकार त्यामुळे म्हणू शकतात आम्ही कुठे मार्क्सला खोडून काढत आहोत? मार्क्स स्वत:च स्वत:ला खोडून काढत आहे!

यासाठीच आपण या प्रकरणामध्ये सुरुवातीचा बराच वेळ मार्क्सच्या पूर्वीच्या निष्कर्षांना, त्यांच्या वर्गीय आशयाला, आणि त्यांनी प्रतिपादन केलेल्या भांडवली विकासाच्या दिशेला रूपांतरामुळे कुठेही धक्का बसत नाही हे दाखवण्यामध्ये खर्च केला. तरीही एक प्रश्न उरतोच की आपण जे म्हटले ते मार्क्सच्या दृष्टिकोनावर आधारलेले होते का नाही? कारण त्यांच्या मते कॅपिटलच्या पहिल्या खंडामध्ये मूल्य आणि किंमत यांच्या तफावतीविषयी मार्क्स जागरूक नाही. आणि शिवाय क्रयवस्तूंच्या मूल्यांचे आणि किंमतींचे प्रमाण भांडवलशाहीत कधीच एक असू शकत नाही हे जर मार्क्सला माहीत होते तर नेमकी ही प्रमाणे सारखी धरून भांडवलशाहीचे विश्लेषण करण्यामध्ये वैज्ञानिकता कुठे दिसते? मार्क्सचा वारसा सांगायचा तर आपण याही प्रश्नांना उत्तरे देणे महत्त्वाचे बनते.

पहिल्या खंडात असलेला तिसऱ्या खंडातला मार्क्स

खरे म्हणजे या दोन वेगवेगळ्या भासणाऱ्या मार्क्सना जोडणारा त्याच्या मूल्यसिद्धांताचा एकसंध धागा समजावून घ्यायची या विचारवंताना फारशी इच्छा नसते व बहुश: ती कुवतही नसते. आणि त्यामुळे थेट पहिल्या खंडामध्येही असलेला तिसऱ्या खंडातला मार्क्स त्यांना दिसतच नाही! विनिमयाचे क्षेत्र सोडून आपल्याबरोबर वाचकाला उत्पादनक्षेत्रामध्ये घेऊन जाण्याअगोदरच्या प्रकरणाच्या शेवटी, पहिल्या खंडातच आपल्याला या संदर्भातील एक तळटीप आढळते. त्या तळटीपेत मार्क्स म्हणतो,

'...किंमतीत सतत होणारी आंदोलने, चढ-उतार हे एकमेकांना छेद देतात व स्वत:ला एका सरासरी किंमतीत परिवर्तित करतात; जी (सरासरी किंमत) त्यांची अदृश्य नियामक असते. ज्या उपक्रमामध्ये (काही ना काही) काळ खर्च होतो अशा प्रत्येक उपक्रमामध्ये व्यापाऱ्यांचा किंवा कारखानदारांचा (ही सरासरी किंमत) मार्गदर्शक बनते. त्याला माहीत असते की दीर्घ कालखंडाचा विचार केला तर क्रयवस्तू (त्यांच्या सरासरी किंमतीपेक्षा) जास्त किंवा कमी किंमतीला विकल्या जात नाहीत तर त्या सरासरी किंमतीलाच विकल्या जातात. तेव्हा जर त्याने अशा बाबींचा विचार केलाच, तर तो भांडवलाच्या निर्मितीच्या प्रश्नाची मांडणी पुढीलप्रमाणे करील—किंमती या सरासरी किंमतीने नियंत्रित केल्या जातात, म्हणजेच **अंतिमत:** क्रयवस्तूंच्या मूल्याने नियंत्रित केल्या जातात हे गृहीत धरून आपणास भांडवलाच्या उत्पत्तीची कशी कारणमीमांसा करता येईल? मी 'अंतिमत:' म्हणतो, कारण ॲडम स्मिथ, रिकार्डो आणि इतर (अर्थशास्त्रज्ञ) समजतात त्याप्रमाणे **क्रयवस्तूंच्या सरासरी किंमती या त्यांच्या मूल्याशी सरळपणे जुळत्या नसतात**.'[५]

या तळटीपेवरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे मूल्यांचे प्रमाण व किंमतीचे प्रमाण सरळ सारखे धरतो तो मार्क्सचा श्रममूल्याचा सिद्धांत नव्हे, तर खुद्द ॲडम स्मिथ व रिकार्डोसारख्या भांडवली अर्थशास्त्रज्ञांचा मूल्यसिद्धांत! आणि दुसरे हे की मार्क्सला पहिला खंड लिहितेवेळीच तिसऱ्या खंडातील त्याच्या निष्कर्षांची जाणीव होती. इतकेच नव्हे तर पहिला खंड संपादित करून पूर्ण करण्याअगोदरच त्याच्याकडे तिसऱ्या खंडातील रूपांतराच्या प्रश्नासंबंधीच्या मजकुराचा मसुदा तयार होता याला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारचा पुरावा उपलब्ध आहे. म्हणजे हे माहीत असूनही मार्क्स जाणीवपूर्वक मूल्यांचे प्रमाण व किंमतीचे प्रमाण हे एक असते असे पहिल्या खंडात धरून चालत होता.

मूल्य आणि किंमत यांची प्रमाणे सारखी आहेत की नाहीत हा नेहमीचा घोटाळा होऊ नये म्हणूनच आपण या पुस्तकाच्या संपूर्ण पहिल्या भागामध्ये सरळ सरळ श्रमतासांचेच गणित वापरले होते. थोडक्यात, किंमती संपूर्णपणे बाजूला ठेवून सरळ मूल्यसंबंधांवर लक्ष केंद्रित केले होते. मार्क्सदेखील हेच करत होता परंतु एका वेगळ्या प्रकारे. तो प्रत्यक्षपणे रुपया-नाण्यांचे गणित करत होता. पण मूल्य आणि किंमत यांची प्रमाणे सारखीच धरलेली असल्यामुळे, पैशांच्या गणितामार्फत तो श्रमतासांचेच गणित करीत होता. फक्त सरळपणे श्रमतासांचे अपरिचित गणित वापरण्याऐवजी त्याच्या वाचकांना

भांडवलशाहीने चिरपरिचित बनवलेल्या पैशाचे गणित वापरून. मूल्य–किंमत रूपांतराच्या प्रश्नाशी गल्लत होऊ नये म्हणून थोडे अपरिचित वाटले तरी सरळसरळ श्रमतासांचेच गणित आपण पहिल्या भागात वापरले आहे.

मूल्य आणि किंमत सारखे धरण्यामागील कारण वरील तळटीपेत मार्क्सने स्वतःच दिले आहे. मूल्य हे सरळपणे किंमत म्हणून व्यक्त होत असले तरीदेखील भांडवलाची निर्मिती सैद्धांतिकरीत्या शक्य झाली पाहिजे. आणि नेमके हेच आक्षेप घेणाऱ्या भांडवली अर्थशास्त्रज्ञांना अमान्य होते—कारण सर्व भांडवलदारांना एकाच सर्वसाधारण दराने नफा व्हायचा तर मूल्य आणि किंमत यांची प्रमाणे वेगवेगळी असतात. नफ्याचा एकच सर्वसाधारण दर हा त्यांच्या दृष्टीने भांडवलशाहीचाच अविभाज्य भाग होता. त्यामुळे भांडवलशाहीमध्ये नफ्याचा दर वेगवेगळा धरणे हे त्यांना शक्य नव्हते. परंतु मार्क्सच्या दृष्टीने नफ्याचा सर्वसाधारण दर हे भांडवलशाहीतील स्पर्धेचे स्वरूप आणि प्रवृत्ती असते, कामगार–भांडवलदारांच्या संबंधासारखा तो भांडवलशाहीचा एक जैव, सैद्धांतिकदृष्ट्या अनिवार्य भाग नसतो. निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये नफ्याचा दर वेगवेगळा आला तरीदेखील ती भांडवलशाहीच राहते.

किंबहुना नफ्याचा एकच सर्वसाधारण दर हे ज्याला मुक्त, बिगरमक्तेदारी भांडवली स्पर्धा म्हणता येईल अशा भांडवली स्पर्धेचे एक रूप असते. मक्तेदारी अवस्थेमध्ये मक्तेदारी विभागांमध्ये इतर विभागांपेक्षा नफ्याचा दर जास्त असणेही शक्य असते. किंवा भांडवलशाहीच्या बाल्यावस्थेत जेव्हा भांडवल एका क्षेत्रातून उचलून सहजपणे दुसऱ्या क्षेत्रात घालता येत नसेल, आणि जेव्हा पाहिजे त्या प्रकारची श्रमशक्ती पाहिजे तितक्या लवचिकपणे सर्व क्षेत्रात उपलब्ध होत नसेल, अशा परिस्थितीतदेखील नफ्याचा एकच सर्वसाधारण दर असण्याऐवजी निरनिराळे नफ्याचे दर असू शकतील. नफ्याचा दर आणि तत्सम मार्गांनी नफा हा भांडवलदारवर्गामध्ये कसा वाटला जातो हा एकंदर भांडवलशाहीच्या विकासाच्या दिशेच्या व मूलस्वरूपाच्या दृष्टीने गौण मुद्दा असतो.

नफ्याचा एकच सर्वसाधारण दर हे भांडवली स्पर्धेचे सर्वात महत्त्वाचे रूप असते खरे, परंतु शेवटी ते सैद्धांतिकदृष्ट्या अनेक रूपांपैकी एक रूप असते. वैज्ञानिकतेची कसोटी लावायची तर असे म्हणावे लागते की तुमच्या संकल्पना ही सर्व रूपे सामावून घेण्याइतक्या लवचिक असल्या पाहिजेत आणि त्यांतील सर्वात महत्त्वाची रूपे सामावून घेण्याची त्यांची क्षमता स्पष्टपणे मांडली गेली

पाहिजे. मार्क्सच्या संकल्पना या कसोटीला उतरतात तर त्याच्या विरोधकांच्या भांडवली संकल्पना फक्त त्या सर्वांत महत्त्वाच्या रूपाने मर्यादित झालेल्या असतात. मुक्त स्पर्धेचेही एका अर्थी भांडवली विचारवंतांसाठी विभूतिकरण झालेले असते.

---

[१] आपण निवडलेले उदाहरण सोपे आहे म्हणून ही समीकरणे क्रमवारही सुटू शकतात. प्रत्यक्षात श्रमप्रक्रियेच्या भौतिक घटकांचे परस्परावलंबित्व किती आहे, सामाजिक पातळीवर श्रमप्रक्रियेची सामाजिक वीण किती घट्ट आहे त्यावर या समीकरणांमधील किमान एक उपसंच हा एकत्रितपणे (सायमल्टेनियसली) सोडवणे भाग असते. हा उपसंच इतर सर्व क्रयवस्तूंच्या मूल्यांसाठी महत्त्वाचा ठरतो.

[२] मार्क्सने तिसऱ्या खंडात वापरलेल्या मूल्य-किंमत रूपांतराच्या पद्धतीपेक्षा आपण वापरलेली पद्धत प्रथमदर्शनी तरी संपूर्णपणे वेगळी वाटू शकते. मार्क्सने वापरलेल्या पद्धतीशी तिचे काय नाते आहे यासाठी पहा खालील टीप क्र.४.

[३] किंमतसंचामध्ये नफ्याच्या दरासाठी एकाहून जास्त उत्तरे मिळणे शक्य असते. नफ्याचा दर जितक्या समीकरणांमध्ये अंतर्भूत आहे तितकी नफ्याच्या दराची उत्तरे येऊ शकतात. परंतु यांतील जो नफ्याचा दर सर्वांत कमी असतो, त्या दरासाठीच फक्त सर्व क्रयवस्तूंच्या किंमतींच्या राशी धन (पॉझिटीव्ह) असतात. किंमतींच्या ऋण (निगेटीव्ह) राशी गैरलागू असल्याने हा एकच एक नफ्याचा दर संचाला लागू होतो.

किंमतसंचामधील आणखी एक परस्परसंबंध महत्त्वाचा आहे. मूल्यसंचातील इतर क्रयवस्तूंच्या मूल्यांची समीकरणे ही श्रमशक्तीच्या मूल्याच्या समीकरणावर अवलंबून नसतात. याउलट किंमतसंचातील इतर क्रयवस्तूंच्या किंमतींची समीकरणे ही श्रमांच्या वेतनाच्या समीकरणावर निर्णायकपणे अवलंबून असतात. याचा परिणाम किमान कोणत्या क्रयवस्तूंची समीकरणे ही एकत्रितपणे सोडवणे भाग असते या उपसंचावर होतो.

असा उपसंच किती मोठा आहे व त्यात कोणकोणत्या वस्तू मोडतात या गोष्टी उत्पादनाच्या सामाजिकतेची वीण किती घट्ट आहे ते दाखवतात. मूल्यसंचामध्ये अशा उपसंचात फक्त श्रमसामुग्रीचे घटक मोडू शकतात. भौतिक श्रमप्रक्रियेच्या पातळीवर उत्पादनव्यवहाराची सामाजिक वीण किती घट्ट आहे ते हा उपसंच दाखवतो. याउलट किंमतसंचामध्ये जो क्रयवस्तूंचा किमान उपसंच ठरतो त्यामध्ये वरील क्रयवस्तूंखेरीज इतरही क्रयवस्तूंचा समावेश होतो. श्रमांच्या वेतनात ज्या क्रयवस्तू मोडतात त्या आणि श्रमसामुग्रीमार्फत ज्या ज्या क्रयवस्तूंच्या मूल्याचा अंतिमत: वेतनात मोडणाऱ्या क्रयवस्तूंच्या मूल्यात समावेश होतो त्या सर्व क्रयवस्तूंचा या किंमतसंचाच्या किमान उपसंचात समावेश होतो. हाच स्राफा इत्यादी

नवरिकार्डोवाद्यांना अभिप्रेत असलेल्या मौलिक (बेसिक) क्रयवस्तूंचा संच आहे. परंतु तो मौलिक इतक्याच अर्थाने असतो की भौतिक श्रमप्रक्रियेच्या भांडवली स्वरूपाची सामाजिक वीण किती घट्ट आहे इतकेच तो दाखवतो.

हे लक्षात घेतले पाहिजे की श्रमप्रक्रियेच्या भांडवली स्वरूपातील सामाजिक विणीचे हे माप आहे. श्रमप्रक्रियेबाहेरील अभिसरणातील घडामोडी समीकरणांमध्ये अंतर्भूत केल्या की त्यानंतर असा किमान उपसंच वेगळा काढता येत नाही. (पहा परिशिष्ट ३ शेवटचा समीकरण संच) रिकार्डोप्रमाणेच स्राफामध्येदेखील पैशाच्या स्वायत्त भूमिकेला व पर्यायाने वित्त आणि अर्थ भांडवलाला स्थान नाही. त्यामुळे तो हा मौलिक उपसंच वेगळा काढतो. प्रत्यक्षात भांडवलशाहीमध्ये दोनच प्रक्रिया दिसतात. किंमतींच्या पातळीवर मौलिक उपसंचाला अस्तित्वच नसते. सर्व क्रयवस्तूंचा संच एकत्रितपणे सोडवणे भाग असते. खरा मौलिक उपसंच हा मूल्यसंचातील उपसंच असतो कारण तो भौतिक श्रमप्रक्रियेच्या आधारावर सामाजिकतेची वीण किती घट्ट आहे ते दाखवत असतो. भांडवली स्वरूपातील सामाजिकतेमागे प्रत्यक्षात अपरिहार्य ठरलेल्या सामाजिकतेचे माप तो पुढे मांडत असतो.

[४] प्रथमदर्शनी, आपण वापरलेली मूल्य–किंमत रूपांतराची पद्धत ही मार्क्सने वापरलेल्या पद्धतीपेक्षा एकदम वेगळी वाटते. परंतु मार्क्स ज्या दिशेने हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न करत होता, त्याच दिशेने पुढे जाऊन त्याचे गणित पूर्ण करण्यातून ती निर्माण होते हे जास्त खोलात गेले तर स्पष्ट होऊ शकते.

आपल्या भाषेत मार्क्सची ही पद्धत खालीलप्रमाणे मांडता येते. मार्क्स निरनिराळ्या क्षेत्रांमधील मूल्याचा ताळेबंद मांडून एकूण वरकड–मूल्याची बेरीज काढतो. हे एकूण वरकड–मूल्य मग तो प्रत्येक क्षेत्रातील भांडवल–मूल्याच्या प्रमाणात वाटतो. त्या क्षेत्रातील भांडवल–मूल्य आणि वाटप झालेले वरकड–मूल्य यांची बेरीज करतो. व या रूपांतरित मूल्यांच्या प्रमाणात किंमती ठरवतो. आपल्या प्रतिरूपामध्ये हे खालील दोन तक्त्यांप्रमाणे करता येते.

उत्पादन विभाग	**कायम भांडवल**	**बदलते भांडवल**	**एकूण भांडवल**	**निर्मित वरकड–मूल्य**	**वाटप झालेले वरकड–मूल्य**
लोखंड	९००.०	११३.५	१०१३.५	१८६.७५	३७९.०
गहू	२५५.५	१८८.५	४४४.०	३११.२५	१६६.०
सोने	१२०.०	७५.५	१९५.५	१२४.५०	७७.५
एकूण	१२७५.५	३७७.५	१६५३.०	६२२.५०	६२२.५

उत्पादन विभाग	एकूण भांडवल	वाटप झालेले वरकडमूल्य	रूपांतरित मूल्य
लोखंड	१०१३.५	३७९.०	१३९२.५
गहू	४४४.०	१६६.०	६१०.०
सोने	१९५.५	७७.५	२७३.०
एकूण	१६५३.०	६२२.५	२२७५.५

तेव्हा याप्रमाणे २०० टन लोखंड, १० टन गहू, व ५० ग्रॅम सोने यांच्या किंमती अनुक्रमे १३९२.५ : ६१०.० : २७३.० या प्रमाणात ठरतात किंवा १ टन लोखंड, १ टन गहू व १० ग्रॅम सोने यांच्या अनुक्रमे ६.९६ : ६१ : ५४.६ या प्रमाणात ठरतील. अर्थातच हे प्रमाण आपल्या प्रमाणापेक्षा वेगळे आहे.

इतक्यावरच थांबले तर असे आढळून येईल की वरील प्रमाण पुनरुत्पादनाच्या किमान अटी पूर्ण करू शकत नाही. उदाहरणार्थ लोखंड क्षेत्रातील भांडवलदारांच्या हातात पैशाच्या रूपात १३९२.५ श्रमतास रूपांतरित मूल्य येते. त्यातील नफा (वाटप झालेले वरकड-मूल्य) वजा जाता त्यांच्या हातात १०१३.५ श्रमतासांचे रुपांतरित मूल्य उरते. त्या आधारावर त्यांना श्रमप्रक्रियेचे घटक पुन्हा विकत घेणे शक्य झाले पाहिजे. ही पुनरुत्पादनाची किमान अट आहे. तेव्हा त्यातून त्यांना १५० टन लोखंड व ३०० तासांची श्रमशक्ती विकत घेता आली पाहिजे. आता रूपांतरित मूल्याप्रमाणे या दोन्ही घटकांची किंमत होते.

$$१५० \times ६.९६ + १.५ \times ६१ = १०४४ + ९१.५ = ११३५.५ \text{ श्रमतास.}$$

प्रत्यक्षात त्यांच्या हातात नफा वजा जाता उरणारा पैसा मात्र १०१३.५ श्रमतासांचे रूपांतरित मूल्य दर्शवीत असतो तर पुनरुत्पादनासाठी त्यांना ११३५.५ श्रमतासांचे रूपांतरित मूल्य आवश्यक असते. पुनरुत्पादनाच्या किमान अटीचा भंग होतो. मार्क्स ज्या दिशेने चालला होता त्यामध्ये या टप्प्यावर थांबण्याने हे प्रश्न उद्‌भवतात.

एखादा गणिती प्रश्न सोडवताना क्रमाक्रमाने नेमक्या उत्तराच्या जवळ पोचत जाण्याची एक पुनरावर्तीनी चक्रांची (इटरेशन प्रोसेस) पद्धती गणितात सापडते. या पद्धतीमध्ये नेमक्या उत्तराच्याजवळ नेणारी (दिशा अंगभूत करणारी) गणिती प्रक्रिया नक्की केली जाते. प्रथम ही प्रक्रिया वापरून एक तात्पुरते उत्तर काढले जाते. या उत्तराचा पूर्ण वापर करून पुन्हा पुढचे उत्तर काढले जाते. जितकी अशा चक्रांची जास्त आवर्तने पार पडतात तितके मिळालेले उत्तर हे नेमक्या उत्तराच्या जवळ जात जाते.

मार्क्सने दिशा पक्की करणारी प्रक्रिया निश्चित करून फक्त पहिले चक्र पार पाडलेले असते. त्याच दिशेने व त्याच पद्धतीने पुढील चक्रे जितकी पार पाडू तितके आपण

नेमक्या उत्तराच्या जास्त जवळ सरकत जातो. त्यासाठी खालील गोष्टी करणे आवश्यक असते.

मागील चक्रात काढलेल्या क्रयवस्तूंच्या रूपांतरित मूल्याच्या आधारावर भांडवलमूल्य परत निश्चित करायचे. एकूण वरकड-मूल्याचे त्याच पद्धतीने या नव्या रूपांतरित भांडवलमूल्याच्या आधारावर पुन्हा वाटप करायचे व क्रयवस्तूंचे नवे रूपांतरित मूल्य काढायचे. थोडक्यात मार्क्सची दिशा कायम ठेवून ही पुनरावर्तनाची चक्रे पुढे नेत राहायचे.

एखादा प्रश्न सोडविण्याची पुनरावर्तनी चक्राची पद्धत ही एक पद्धती झाली. हा प्रश्न समीकरणांच्या संचांच्या रूपात मांडूनही अनेकवेळा नेमके उत्तर काढता येते. आपण तेवढेच केले आहे. मार्क्सच्या पद्धतीने पुढे जाऊन पुनरावर्तनी चक्रातून देखील आपण त्याच उत्तरांपर्यंत पोचतो.

[५] कार्ल मार्क्स, कॅपिटल, खंड १, प्रोग्रेस पब्लिशर्स, मॉस्को, १९७७, पृ. १६३. जाड ठसा व भाषांतर आमचे.

१८. स्थिर व खेळते भांडवल : वरकड-मूल्याचे बदलते वाटप

नफा या वरकड-मूल्याच्या रूपाने पडणारी बंधने विचारात घेतली तर क्रयवस्तूंच्या मूल्यांचे आपापसातले प्रमाण व त्यांच्या किंमतींचे आपापसातील प्रमाण यामध्ये तफावत पडते हे आपण पाहिले. मूल्य आणि किंमत यांच्यातील ही तफावत भांडवलदारवर्ग व कामगारवर्ग यांच्यात प्रस्थापित झालेल्या वर्गीय संबंधांना कुठेही धक्का लावत नाही हेही आपण पाहिले. थोडक्यात, भांडवली स्पर्धेनुसार नफ्याच्या दराबाबत जे निकष लागू होतात त्याप्रमाणे या मूल्य-किंमत तफावतीमार्फत या दोन्ही वर्गांमध्ये बांधल्या गेलेल्या पिळवणुकीच्या संबंधांना व त्यांच्या विकासाच्या दिशेला धक्का न लावता निर्माण झालेल्या वरकड-मूल्याचे फक्त वाटप होते. मात्र भांडवलदारवर्गाच्या अंतर्गत कोणते संबंध बांधले जात आहेत व त्यानुसार भांडवली स्पर्धेचे नफ्याच्या दराबाबतचे निकष कसे बदलत आहेत, यावरून हे वाटप प्रत्यक्षात ठरते. जसजसे आपण हे भांडवलदारवर्गांतर्गत संबंध व नफ्याच्या दराचे निकष जास्त तपशीलात तपासत जाऊ, तसतसे त्या किंमतींमधून भावणारे संबंध हे भांडवलशाहीच्या नेहमीच्या परिचित दृश्य रूपाकडे सरकत जातील. या व पुढील प्रकरणात आपल्याला हाच प्रवास करायचा आहे.

१. खर्ची पडलेल्या आणि गुंतलेल्या भांडवलातील तफावत

या प्रकरणामध्ये आपण खर्च झालेले भांडवल व गुंतलेले भांडवल यांच्यातील तफावतीचा, तिच्यामागील कारणांचा, व तिचा किंमत व नफा या रूपांवर होणाऱ्या परिणामाचा विचार करणार अहोत. मागील प्रकरणात आपण फक्त खर्च झालेले भांडवल विचारात घेतले होते. याचे कारण आपण सरळपणे मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले होते.

खर्ची पडलेल्या भांडवलाचा ताळेबंद . . .

उदाहरणार्थ, असे समजा की तयार कपड्यांचा एक कारखानदार कामगारांकडून वर्षाला १२ हजार श्रमतासांची श्रमशक्ती विकत घेतो. जर वरकड-मूल्याचा दर १०० टक्के असेल तर या श्रमशक्तीचे ६ हजार श्रमतास मूल्य हे बदलते भांडवल या स्वरूपात वर्षाला खर्च होईल. कापड, धागा, इत्यादी कच्च्या मालासाठी वर्षाकाठी समजा ६ हजार श्रमतास मूल्याचे श्रमविषय खर्च होतात. त्याबरोबरच, असे समजा की १,२०,००० श्रमतास मूल्य असलेली, श्रमशक्तीच्या वापराच्या वरील वेगाने दहा वर्षे टिकणारी शिवणयंत्रे इ. श्रमसाधने त्यासाठी लागतात. तेव्हा त्यांचे एकदशांश आयुष्य दर्शवणारे १२ हजार श्रमतास मूल्य खर्ची पडेल. त्याचा खर्च झालेल्या भांडवलाचा ताळेबंद खालीलप्रमाणे येईल.

खर्ची पडलेले भांडवल (एक वर्षाचे)

कायम भांडवल	– श्रमविषय	६,००० श्रमतास
	– श्रमसाधने	१२,००० श्रमतास
बदलते भांडवल	– श्रमशक्ती	६,००० श्रमतास
एकूण खर्ची पडलेले भांडवल		२४,००० श्रमतास
निर्माण झालेले वरकड-मूल्य		६,००० श्रमतास

. . . आणि गुंतलेल्या भांडवलाचा ताळेबंद

त्याने २४ हजार श्रमतास भांडवल खर्ची घालून ६ हजार श्रमतास वरकड-मूल्य काढले. पण हे वरकड-मूल्य काढण्यासाठी त्याला किती भांडवल गुंतवावे लागले तो आकडा मात्र खर्ची पडलेल्या भांडवलापेक्षा वेगळा असेल.

उदाहरणार्थ, त्याला शिवणयंत्रे अख्खीच्या अख्खीच विकत घ्यावी लागतील. म्हणजे श्रमसाधनांमध्ये त्याचे १,२०,००० श्रमतास भांडवल गुंतलेले असेल. आणि जर असे धरले की त्याचा तयार माल महिन्याच्या महिन्याला विकला जात आहे, तर त्याला इतर गोष्टींमध्ये गुंतवावे लागणारे भांडवल हेदेखील खर्ची पडणाऱ्या भांडवलापेक्षा वेगळे असेल.

उदाहरणार्थ, त्याचे एक महिन्यात खर्ची पडणारे श्रमविषयांचे व बदलते भांडवल हे दोन्ही अनुक्रमे ५०० श्रमतास आहे. त्याने महिन्याचा माल विकला की त्या मालाच्या किंमतीमार्फत तितका (मूल्याप्रमाणे निर्णित) पैसा त्याच्या हातात येईल. पुढच्या महिन्याचे श्रमविषय विकत घ्यायला किंवा श्रमशक्तीचे मूल्य द्यायला त्याला नवे भांडवल गुंतवावे लागणार नाही, तोच पैसा पुन्हा कामी येईल. श्रमसाधनांव्यतिरिक्त इतर श्रमप्रक्रियेच्या घटकांसाठी त्याला फक्त १००० श्रमतास मूल्यच गुंतवावे लागेल.

आणखीही एक गोष्ट महत्त्वाची असेल. कोणत्याही क्षणी काही कच्च्या मालाचा साठा पडून असेल, काही माल अर्धवट कातरलेल्या व शिवलेल्या अवस्थेत श्रमप्रक्रियेमध्ये अडकलेला असेल, आणि काही तयार मालदेखील तसाच पडून असेल. यातही त्याचे भांडवल गुंतलेले असेल. वर्षाच्या सुरुवातीला हीच परिस्थिती असेल व शेवटीदेखील. या अंगावर पडून असलेल्या भांडवलाचेही पुनरुत्पादन व्हावे लागेल. आपण असे समजू या की यामध्ये त्याचे अनुक्रमे ५०० श्रमतास इतके भांडवल गुंतलेले आहे. तेव्हा 'अंगावर माल पडून असल्यामुळे' गुंतलेले भांडवल हे एकूण २ हजार श्रमतास होईल.

सर्वप्रकारे गुंतलेल्या भांडवलाच्या आधारावरील त्याचे गणित खालीलप्रमाणे येईल.

गुंतलेले भांडवल (एक वर्षाचे)

कायम भांडवल	– श्रमविषय	५०० श्रमतास
	– श्रमसाधने	१,२०,००० श्रमतास
बदलते भांडवल	– श्रमशक्ती	५०० श्रमतास
अंगावरील भांडवल		२,००० श्रमतास
एकूण गुंतलेले भांडवल		१,२३,००० श्रमतास
निर्माण झालेले वरकड-मूल्य		६,००० श्रमतास

नफ्याच्या दरावर दोन्ही ताळेबंदाचा परिणाम

त्याच्या लेखी त्याने १,२३,००० श्रमतास भांडवल गुंतवून ६ हजार श्रमतास वरकड-मूल्य काढलेले असेल. खर्ची पडलेले व गुंतवलेले भांडवल ही तफावत लक्षात घेतली की नफ्याचा दरही बदलेल. (हा नफ्याचा दर काढण्यासाठी आपण सरळसरळ मूल्याचेच गणित यापुढे करत जाणार आहोत. कारण एकतर मागील प्रकरणामध्ये मूल्यसंबंधांची दिशा तशीच राहते हे आपण दाखवले आहे व दुसरे म्हणजे या व पुढील प्रकरणामधील गोष्टींसाठी किंमतींचे गणिती प्रतिरूप उभे करूनदेखील हे दाखवता येते. ते गणित वाचकांना जरूर भासल्यास परिशिष्ट ३ मध्ये सापडेल.)

उदाहरणार्थ, वरील उदाहरणामध्ये नफ्याचा दर हा खर्ची पडलेल्या भांडवलाशी काढला तर तो (६०००/२४०००)×१०० = २५ टक्के येतो. याउलट जर तो गुंतवलेल्या भांडवलाशी काढला तर तो (६०००/१,२३,०००)×१०० = ४.९ किंवा सुमारे ५ टक्के येतो.

थोडक्यात म्हणजे, गुंतवलेल्या भांडवलाचा विचार केला की स्पर्धेचे स्वरूप बदलते, वरकड-मूल्याच्या वाटपामध्ये समान दराची प्रवृत्ती ही भांडवलदारांच्या गुंतवलेल्या भांडवलाच्या प्रमाणात वरकड-मूल्याचे भांडवलदारांमध्ये वाटप करते. किंमती हा नवा सर्वसाधारण नफ्याचा दर व्यक्त करण्याजोग्या बदलतात. त्यामुळे सैद्धांतिक दृष्ट्या, खर्ची पडलेल्या व

गुंतलेल्या भांडवलामधील ही तफावत कोणकोणत्या गोष्टींनी ठरते व तिचे काय काय परिणाम होतात हे पाहणे आवश्यक ठरते.

प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की क्रयवस्तूंच्या मूल्यानुसार घडणाऱ्या वरकड–मूल्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेवर या तफावतीचा काहीएक परिणाम होत नाही. जोपर्यंत खर्ची पडलेल्या भांडवलाचे घटक व वरकड–मूल्याचा दर तोच आहे तोपर्यंत ही तफावत कमी आहे की जास्त याचा मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेवर काही परिणाम होत नाही. तितकेच मूल्य व तितकेच वरकड–मूल्य निर्माण होत असते, फरक पडतो तो फक्त वरकड–मूल्याच्या निरनिराळ्या भांडवलदारांमध्ये होणाऱ्या वाटपामध्ये.

या तफावतीला जन्म देणारे घटक आपल्या वर्णनामध्ये अगोदरच मांडले गेले आहेत पण स्पष्टपणे पुढे आलेले नाहीत. उदाहरणार्थ मघाशी आपण असे धरले, की भांडवलदाराचा माल महिन्याच्या महिन्याला विकला जातो, त्यावरून, आपण निष्कर्ष काढला की त्याला फक्त एक महिन्यासाठी आवश्यक इतके कापड, धागा इ. श्रमविषयांपुरते भांडवल गुंतवले तरी पुरते.

याचे कारण हे होते की महिन्याभराने, पुन्हा महिनाभराच्यासाठी हे घटक विकत घेण्यापुरता पैसा त्याच्या हातात आला होता. त्याच्या हातात भांडवल म्हणून खेळणारे मूल्य त्याच्या हातात निरनिराळ्या रूपात असते व त्या रूपांचा पैसा या रूपाशी कसा संबंध असतो हे महत्त्वाचे ठरत असते. त्याच्या हातात भांडवल म्हणून खेळणाऱ्या मूल्याचे सतत रूपांतर चाललेले असते.

२. भांडवलाच्या रूपांतराचं चक्र

भांडवलदारांच्या हातातील भांडवलाचे पैसा ते पैसा असे रूपांतराचे चक्र चालू असते, जे आपल्याला खालीलप्रमाणे दर्शविता येईल.

पैसा	→	श्रमविषय श्रमसाधने श्रमशक्ती	…	क्रयवस्तू	→	पैसा	→	वरकड-मूल्य भांडवल
(अर्थ भांडवल)		(उत्पादक भांडवल)		(क्रयवस्तू भांडवल)		(अर्थ भांडवल)		

भांडवलाच्या मूल्याचा प्रत्येक तुकडा हा क्रमाने तीन रूपे घेत असतो. प्रथम तो पैशाच्या रूपात किंवा अर्थ-भांडवलाच्या (मनी कॅपिटल) रूपात असतो. त्यानंतर त्याची श्रमप्रक्रियेचा घटक असलेल्या एखाद्या क्रयवस्तूशी अदलाबदल होते. ती क्रयवस्तू महत्त्वाची असते ती तिच्या उत्पादनातील वापरासाठी. त्या तुकड्याने आता उत्पादक-भांडवलाचे (प्रॉडक्टिव्ह कॅपिटल) रूप घेतलेले असते. या रूपात ते सर्व मूल्य श्रमप्रक्रियेत शिरते. तिथून बाहेर पडते ती बाजाराकडे तोंड करून उभी असलेली क्रयवस्तू. त्या तुकड्याने आता क्रयवस्तू-भांडवलाचे (कमॉडिटी कॅपिटल) रूप घेतलेले असते. त्यानंतर ती तयार क्रयवस्तू विकली जाते व त्या मूल्याच्या तुकड्याचे पुन्हा पैशात म्हणजे अर्थ-भांडवलात रूपांतर झालेले असते. चक्र पूर्ण होऊन पुन्हा सुरू होते.

क्रयवस्तूंच्या अभिसरणाच्या दृष्टीने, भांडवलदाराचे भांडवल त्याच्याच ताब्यात राहून पण सतत क्रमाने ही रूपे घेत राहणारे मूल्य असते. पण भांडवलदाराला या सर्वांमधला पैसा या सुरुवात आणि शेवटामध्ये रस असतो. त्याच्या दृष्टीने, ते

अर्थ-भांडवल → उत्पादक भांडवल → क्रयवस्तू भांडवल →अर्थ भांडवल

असे, शेवटी नफा या रूपात वरकड-मूल्य काढून देणारे चक्र असते. हे चक्र किती वेगाने पार पडते व त्याचा उत्पादनप्रक्रियेशी आणि एकंदर मूल्यसंबंधांशी काय संबंध असतो यावर त्याच्या खर्ची पडलेल्या व गुंतवलेल्या भांडवलामधील तफावत अवलंबून असते.

रूपांतराच्या चक्रातील श्रमसाधनांच्या मूल्याचा वेगळा प्रवास

भांडवल प्रथम भांडवलदाराच्या हातात असते ते अर्थ-भांडवल या रूपामध्ये. त्या पैशाने श्रमप्रक्रियेचे घटक क्रयवस्तूंच्या रूपात विकत घेतले जातात व त्यांचे उत्पादक भांडवलात रूपांतर होते. परंतु श्रमप्रक्रियेच्या घटकांपैकी सर्व घटक हा प्रवास एकसारख्या पद्धतीने करत नाहीत. त्या दृष्टीने श्रमविषय व

श्रमशक्ती हे हा प्रवास एक प्रकारे करतात तर श्रमसाधने हा प्रवास वेगळ्या पद्धतीने करतात.

विकत घेतलेले श्रमविषय व श्रमशक्ती संपूर्णपणे खर्च होऊन त्यांचे मूल्य संपूर्णपणे क्रयवस्तूच्या मूल्याचा भाग बनते. याउलट श्रमसाधने आपले उपयोगी आयुष्य अंशत:च खर्च करतात, त्यांचे संपूर्ण उपयोग-मूल्य त्या क्रयवस्तूंसाठी खर्च होत नाही. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण मूल्याचा एक छोटा भागच त्या क्रयवस्तूच्या मूल्याचा भाग बनतो. श्रमसाधनांच्या श्रमप्रक्रियेतील वैशिष्ट्याचेच ते मूल्यप्रक्रियेतले प्रतिबिंब असते.

श्रमप्रक्रियेतील श्रमसाधनांच्या या वैशिष्ट्याचे प्रतिबिंब रूपांतराच्या चक्रामध्येदेखील उमटते. ज्यावेळी क्रयवस्तू विकली जाते तेव्हा तिच्या श्रमप्रक्रियेला आवश्यक त्या श्रमविषयांचे व श्रमशक्तीचे संपूर्ण मूल्य पैशाच्या रूपाने हातात येते. पुन्हा क्रयवस्तू निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या श्रमविषयांसाठी व श्रमशक्तीसाठी ते मूल्य पुरेसे असते. परंतु क्रयवस्तू विकली गेल्यावर तिच्यामार्फत श्रमसाधनांचे हाती आलेले मूल्य त्यांच्या एकूण मूल्याचा एक छोटा भाग असते. पुन्हा क्रयवस्तू निर्माण करण्यासाठी आवश्यक ती श्रमसाधने घेण्यास ते मूल्य पुरेसे नसते. ते पैसा म्हणून हातात आलेले मूल्य तुकड्यातुकड्यांनी साठून संपूर्ण श्रमसाधने विकत घेण्याइतके होईपर्यंत अनेक उत्पादन-चक्रे पार पडावी लागतात. थोडक्यात, श्रमविषयांचे व श्रमशक्ती यांचे संपूर्ण मूल्य पैशाच्या रूपात एका उत्पादन-चक्रात परतते तर श्रमसाधनांचे संपूर्ण मूल्य पैशाच्या रूपात अनेक उत्पादन-चक्रांनंतर परतते.

आवर्तन-काळ

पैशाच्या रूपात भांडवलदारांच्या हातातील एखादा मूल्याचा तुकडा किती काळाने परततो त्याला आपण त्या मूल्याच्या तुकड्याचा आवर्तनकाळ (टर्नओव्हर टाईम) म्हणू. भांडवलाच्या रूपांतराचे चक्र किती वेगाने फिरत आहे याचे ते एक माप ठरते.

श्रमविषयांमध्ये गुंतलेल्या मूल्याच्या सर्व तुकड्यांचा आवर्तन-काळ हा स्थूलमानाने सारखा असतो. दोन घटकांच्या बेरजेने बनलेला असतो. त्या क्रयवस्तूच्या उत्पादनामध्ये जाणारा उत्पादनाचा काळ (प्रॉडक्शन टाईम) हा त्याचा पहिला घटक असतो. श्रमविषय विकत घेण्यासाठी व निर्माण झालेली क्रयवस्तू विकण्यासाठी लागणारा अभिसरणाचा काळ (सर्क्युलेशन टाईम) हा

याचा दुसरा घटक असतो. त्यांच्या बेरजेतून येणारा आवर्तन-काळ हा त्या भांडवलाचा मूळ आवर्तन काळ म्हणता येईल कारण श्रमप्रक्रियेच्या इतर घटकांच्या आवर्तनाचा काळ हा या काळाच्याच संदर्भाने ठरत असतो.

श्रमशक्तीचा मोबदला श्रम घडून गेल्यावर द्यावा लागत असल्यामुळे (श्रमशक्तीची विक्री उधारीवर होत असल्यामुळे) श्रमशक्तीमध्ये गुंतलेल्या मूल्याचा आवर्तन काळ हा मूळ आवर्तन काळामधून हा उधारीचा काळ वजा करून मिळतो.

याउलट श्रमसाधनांमध्ये गुंतलेल्या भांडवलाचा आवर्तन-काळ हा मूळ आवर्तनाच्या काळापेक्षा जास्त असतो. श्रमसाधने उत्पादन-काळाची किती चक्रे होईपर्यंत टिकतात यावर तो अवलंबून असतो. श्रमसाधने जितकी उत्पादन-चक्रे टिकतात तो चक्रांचा आकडा गुणिले उत्पादन-काळ हा त्यांच्या आवर्तनाच्या काळाचा पहिला घटक असतो. त्यात अभिसरणाच्या काळाची बेरीज केली की श्रमसाधनांच्यात गुंतलेल्या भांडवलाचा एकूण आवर्तन-काळ मिळतो.

वरील प्रकारे भांडवलाच्या प्रत्येक तुकड्याचा आवर्तन-काळ मूळ आवर्तनाच्या काळाच्या घटकांच्या संदर्भात ठरतो. भांडवलाच्या सर्व तुकड्यांचा एकंदर विचार केला तर संपूर्ण भांडवलाचा मिळून सरासरी आवर्तन-काळ ठरतो. प्रत्येक कार्यवाहीत असणाऱ्या भांडवलासाठी हा सरासरीचा काळ महत्त्वाचा असतो. आणि याच पद्धतीने एकूण भांडवलदारवर्गाच्या भांडवलाचा सामाजिक पातळीवरील सरासरी आवर्तन-काळ हा नफ्याच्या सर्वसाधारण दरासाठी महत्त्वाचा ठरतो.

यावरून एक गोष्ट सहज स्पष्ट होते, की आवर्तन-काळ जितका कमी तितक्या वेगाने श्रमप्रक्रियेचे घटक पैसा या रूपात लवकर हातात येतात. खर्ची पडलेल्या तितक्याच भांडवलामागे तितके कमी भांडवल पैसा या रूपात गुंतवावे लागते. उत्पादन-काळ आणि आवर्तन-काळ यांच्या परस्परसंबंधांवरून खर्ची पडलेले भांडवल व गुंतवलेले भांडवल यांच्यातील तफावत ठरते. गुंतवलेल्या भांडवलाप्रमाणे सर्वसाधारण नफ्याचा दर ठरतो तेव्हा वरकड-मूल्याचे वाटपही बदलते. एकंदर भांडवलदारवर्गाचा सरासरी आवर्तन-काळ जितका कमी असतो, त्यानुसार तेवढेच भांडवल खर्ची पडूनदेखील सर्वसाधारण नफ्याचा दर तितका जास्त ठरतो. यामार्फत वरकड-मूल्याचे जे वाटप होते त्यामध्ये मात्र ज्या क्रयवस्तूंच्या उत्पादनामध्ये सरासरी आवर्तन-काळ जास्त असतो त्यांना

वरकड-मूल्याचा जास्त वाटा मिळतो. त्यामुळे असे वाटू शकते की मग आवर्तन-काळ कमी होण्याकडे भांडवलशाहीत काही प्रवृत्ती असते की नाही?

आवर्तन-काळ आणि भांडवली प्रवृत्ती

सरासरी आवर्तन-काळ भांडवलदारवर्गासाठी कमी होणे हे सापेक्ष वरकड-मूल्याप्रमाणेच जादा वरकड-मूल्याच्या माध्यमातून होते. एकाच क्रयवस्तूच्या उत्पादनात दोन भांडवलदारांनी कामगारांना लावले असले तर ज्या भांडवलदाराचा आवर्तन-काळ कमी असतो त्याला जादा वरकड-मूल्य मिळते. इतर भांडवलदारांनीही आवर्तन-काळ कमी केला तर सर्वांचा आवर्तन-काळ पुन्हा एका पातळीवर येतो व जादा वरकड-मूल्य नाहीसे होते. परंतु हे जादा वरकड-मूल्य पुसले जातानाच सरासरी आवर्तन-काळ कमी होण्याचा निशाना साधला गेलेला असतो व त्यातून सर्वसाधारण नफ्याचा दर उंचावलेला असतो.

थोडक्यात, जादा वरकड-मूल्यामुळे भांडवलदारांचा वैयक्तिकरीत्या आवर्तनकाळ कमी करण्याची प्रवृत्तीही भांडवलदारवर्गाच्या, आवर्तन काळ कमी करून सर्व साधारण नफ्याचा दर वाढवण्याच्या प्रवृत्तीचे माध्यम असते. त्यामुळे वरकड-मूल्याच्या निर्मितीवर होत नसला तरी वाटपावर व मापनावर निश्चित परिणाम होत असतो.

आवर्तन-काळ कमी करण्याची ही प्रवृत्ती भांडवलशाहीच्या सापेक्ष आणि निव्वळ वरकड-मूल्याच्या मूळ प्रवृत्तींना नवे आधार व नवी कारणे निर्माण करते. सापेक्ष वरकड-मूल्याची प्रवृत्ती ही श्रमांच्या उत्पादकतेवर उभी असते. श्रमांची उत्पादकता वाढणे याचीच दुसरी बाजू म्हणजे उत्पादन-काळ कमी होणे, आणि पर्यायाने आवर्तन-काळ कमी होणे ही असते. यामुळे नफ्याचा दर वाढवण्याच्या संदर्भात श्रमांची उत्पादकता वाढवून श्रमशक्तीचे मूल्य कमी करून सापेक्ष वरकडमूल्य वाढण्याला आणखी एक आधार तयार होतो. तीच गोष्ट निव्वळ वरकड मूल्याच्या प्रवृत्तीची. श्रमांची उत्पादकता तीच ठेवूनही जर कामगारांचा श्रमकाळ वाढत असेल तर श्रमसाधने जास्त वेगाने वापरली जातात. उत्पादन-काळामार्फत होत नसला तरी श्रमसाधनांमार्फत सरासरी आवर्तन-काळ कमी होतो व निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीला एक नवीन आधार तयार होतो.

३. स्थिर व खेळते भांडवल

मार्क्सच्या विभागणीचा सैद्धांतिक आधार

श्रमसाधनांचा हा प्रश्न आपल्याला भांडवलाच्या एका नव्या विभागणीपाशीही घेऊन येतो. ही म्हणजे मार्क्सला अभिप्रेत असलेली स्थिर भांडवल (फिक्स्ड् कॅपिटल) व खेळते भांडवल (सरक्यूलेटिंग कॅपिटल) ही विभागणी. मार्क्सच्या या विभागणीला श्रमप्रक्रियेमध्ये भक्कम मुळे आहेत. उत्पादन-चक्राच्या संदर्भात ज्या घटकांचे मूल्य पूर्णपणे निर्मित क्रय वस्तूच्या मूल्याचा भाग बनते अशा श्रमविषय व श्रमशक्ती या घटकांमध्ये गुंतलेले भांडवल हे मार्क्सला अभिप्रेत असलेले खेळते भांडवल ठरते. याउलट श्रमसाधनांमध्ये गुंतलेले भांडवल एका चक्रातून पूर्णपणे परतत नाही म्हणून ते स्थिर भांडवल ठरते. दोन्हीची व्याख्या ही काटेकोरपणे श्रमप्रक्रिया व तिचे मूल्य-स्वरूप यावरून ठरत असते.

याउलट भांडवली अर्थविचारामधली खेळते व स्थिर भांडवल ही एक नैमित्तिक विभागणी आहे. ज्याचा आवर्तन-काळ हा जास्त असतो ते स्थिर भांडवल व कमी असतो ते खेळते भांडवल इतपतच हा फरक मानला जातो. किती जास्त आणि किती कमी याचे माप हे अगदी मनमानेल ते (आरबिट्ररी) असते. ते माप शेवटी बनते भांडवली हिशेबाचे संदर्भमाप—एक वर्ष. त्यापेक्षा कमी, कधी सहामहिने किंवा त्यापेक्षा कमी ज्याचा आवर्तनकाळ ते खेळते भांडवल, व इतर ते स्थिर भांडवल! आणि ते साहजिकच आहे कारण यांच्या डोळ्यासमोर भांडवली उत्पादनाचे खाजगी क्षेत्र हे केंद्रस्थान नसतेच! त्यांच्यासमोर असते ते एकंदर अभिसरणाचे क्षेत्र. क्रयवस्तूंची अदलाबदल हे विभूतिकरण झालेले केंद्रस्थान कायम असते!

स्थिर भांडवल व खेळते भांडवल या विभागणीची उत्पादन-काळातील मुळे भांडवली विश्लेषणात लपतात याला काही महत्त्वाची कारणे असतात. एक म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादनात निरनिराळा उत्पादन-काळ असतो. एखादे जहाज बांधायला काही वर्षे लागू शकतात. आडसाली उसाला दीड वर्ष लागते. एखादी मोटार तयार व्हायला काही दिवस लागू शकतात तर काही रासायनिक क्रियांमध्ये कच्च्या मालाचे रूपांतर तयार मालात काही मिनिटातदेखील होऊ शकते. उत्पादन-काळाच्या या विविधतेमुळे त्याने आवर्तन-काळाचे केलेले नियंत्रण पटकन सापडू शकत नाही.

दुसरे म्हणजे उत्पादन-काळाच्या जोडीला असलेला अभिसरणाचा काळ. उत्पादन-काळ हा आवर्तनाच्या काळाला एक किमान मर्यादा घालीत असतो. ही मर्यादा अपरिवर्तनीय असते, आणि ती फार वेगाने बदलत नाही. तिच्यातील बदल त्या मानाने हळू होत असतात, लांब पल्ल्याचे असतात. याउलट अभिसरणाचा काळ हा बाजाराच्या परिस्थितीप्रमाणे झपाट्याने कमी जास्त होत असतो. अभिसरणाच्या काळातील बदलांमुळे आवर्तनाच्या काळात होणारे बदल हे नजरेसमोरचे, सतत जाणवून दिले जाणारे असतात व त्यामुळे आवर्तन-काळ हा विनिमयामधील, अभिसरणामधील घडामोडींमुळे ठरतो हे सूत्र भांडवली अर्थशास्त्रात तयार झालेले असते. हे बदल ज्या उत्पादन-काळाच्या आधारावर होत असतात त्याने आवर्तनाच्या काळाचे केलेले नियंत्रण त्यामानाने दृष्टिआड होत जाते.

तिसरे म्हणजे उत्पादकतावाढ पुरेशी झाली की सामाजिक उत्पादनामधील उत्पादन-काळ हा अभिसरण-काळाच्या तुलनेत लहान बनतो, दुर्लक्षणीय बनतो. व नफ्याचा दर उंचावण्यासाठी अभिसरण-काळ कमी करण्याचे मार्ग भांडवलदारांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे बनतात. तीच गत अंगावर ठेवलेल्या भांडवलाबद्दल होते. याला समांतर भांडवली कल्पना म्हणजे साठे (इनव्हेंटरीज) आणि त्यांच्या नियमनाचे शास्त्र (इनव्हेंटरी कंट्रोल). आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ते आज भरपूर भाव कमवून आहे!

अंगावर ठेवावे लागणारे भांडवलदेखील भांडवलाच्या तीन रूपांमधील—अर्थ-भांडवल, उत्पादक-भांडवल, व क्रयवस्तू-भांडवल यांच्या अस्तित्वामुळे आवश्यक बनते. भांडवलाच्या तिन्ही रूपांचा मेळ घालणे आवश्यक ठरते. निरनिराळ्या कारणांमुळे तिन्ही स्वरूपातील किमान भांडवल अंगावर ठेवण्याची गरज निर्माण होते. आणि उत्पादनाचा वेग व व्याप्ती जितकी जास्त होते तितके हे अंगावर ठेवावे लागणारे भांडवल वाढत असते.

थोडक्यात, वरील तिन्ही कारणांमुळे स्थिर भांडवल व खेळते भांडवल यांच्यातील भेद भांडवली अर्थशास्त्र उत्पादन-काळाशी व उत्पादनप्रक्रियेशी निर्णायकपणे जोडू शकत नाही. त्यांच्यासाठी हा भेद महत्त्वाचा असतो कारण नफ्याच्या दरावर त्याचा निर्णायक परिणाम होत असतो. अन् तरीही त्यांच्याकडे या विभागणीसाठी ठाम सैद्धांतिक आधार नसतो. कमी आवर्तन-काळ ते खेळते भांडवल ठरते पण किती कमी म्हणजे खेळते भांडवल या मापासाठी त्यांच्याकडे सैद्धांतिक आधार नसतो!

स्थिर, खेळते की कायम, बदलते?

भांडवली अर्थशास्त्राच्या दृष्टीने नफ्याच्या दराचे नियमन करणाऱ्या स्थिर व खेळते भांडवल या विभागणीला जवळपास तितकेच महत्त्व असते, जितके वरकड-मूल्य निर्मितीच्या प्रक्रियेच्या संदर्भात कायम व बदलते भांडवल या विभागणीला असते. अन् या दोन विभागण्यांची अनेकदा, विशेषत: मार्क्सबद्दल लिहिणाऱ्या सर्वसामान्य भांडवली अर्थशास्त्रज्ञांची गल्लतही होते. त्यामुळे त्यांच्यातला भेद लक्षात घेणे आवश्यक आहे.

वर्गीय पातळीवर, वरकड-मूल्याच्या निर्मितीचा संबंध फक्त कायम व बदलते भांडवल आणि वरकड-मूल्याचा दर या गोष्टींशी असतो. त्याचा स्थिर व खेळते भांडवल या विभागणीशी काडीचाही संबंध नसतो. स्थिर व खेळते या विभागणीचा मात्र फक्त नफ्याच्या दरामार्फत होणाऱ्या वरकड-मूल्याच्या वाटपाशी संबंध असतो. या वाटपाचे स्वरूपच असे असते की किंमतींचे प्रमाण हे मूल्यांच्यापेक्षा वेगळे असते. त्यामुळे वाटप होऊन एखाद्या भांडवलदाराला मिळालेले वरकड-मूल्य व त्याच्या भांडवलाची कायम व बदलते भांडवल ही विभागणी यांचा किंमतीच्या रूपातला संबंध पुसला गेलेला असतो. त्यामुळे कायम व बदलते ही विभागणी भांडवली अर्थशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची राहतच नाही! महत्त्वाची असते ती स्थिर भांडवल व खेळते भांडवल ही विभागणी.

स्थिर भांडवलाला यामुळेच भांडवली अर्थशास्त्रात एक अत्यंत महत्त्वाचे स्थान येते. भांडवली उत्पादनाच्या विकासातील (नुसत्या वाढीतील नव्हे) एक सर्वसाधारण प्रवृत्ती मार्क्सने मांडलेली होती. उत्पादकतावाढीबरोबर खर्ची पडलेल्या भांडवलाचे आंगिक प्रमाण सर्वसाधारणपणे वाढण्याची प्रवृत्ती असते. ती प्रत्यक्षात व्यक्त होते गुंतवलेल्या भांडवलामधील स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढण्यामध्ये. यंत्राधिष्ठित उत्पादनाचा विकास भांडवलशाहीत रूप घेतो ते स्थिर भांडवलाच्या विकासाचे, श्रमसाधनांमध्ये गुंतलेल्या भांडवलाच्या प्रभुत्वाचे. स्थिर भांडवल व श्रमसाधने ही या उत्पादकतावाढीमागची शक्ती ठरते. यंत्रांवरच्या प्रकरणात आपण पाहिले होते की कामगारांच्या सामूहिक श्रमांची क्षमता ही भांडवलाच्या क्षमतेचे रूप घेते. आता आपल्याला असे आढळते की या भांडवलाचाही एक भाग ही शक्ती आत्मसात करीत असतो. भांडवलाच्या विभूतिकरणाच्या शेजारीच स्थिर भांडवलाचे रूप घेतलेल्या श्रमसाधनांचे—यंत्रांचे विभूतिकरण होत असते.

स्थिर भांडवलाची ही शक्ती भांडवलदारांना फार जवळून जाणवत असते, कारण वरकड–मूल्याचे वाटप व नफ्याचे भांडवली हिशेब यांचा एक महत्त्वाचा आंतर–संबंध असतो. भांडवली विचारानुसार, नफा होतो तो क्रयवस्तूंच्या उत्पादनासाठी आलेल्या खर्चापेक्षा जास्त किंमत ठेवून. खर्ची पडलेल्या भांडवलापेक्षा क्रयवस्तूची किंमत किती जास्त ठेवता येते याचे प्रमाण म्हणजे लाभमात्रा (प्रॉफिट मार्‌जिन). या लाभमात्रेचेही आपले स्वत:चे एक महत्त्व असते.

लाभमात्रा जितकी जास्त तितक्या कमी आर्थिक उलाढालीमध्ये जास्त नफा मिळतो. यंत्राधिष्ठित उत्पादनाचे भांडवली महत्त्व नेमके इथे स्पष्ट होते. यंत्राधिष्ठित उत्पादनामध्ये एका बाजूला गुंतवलेल्या भांडवलामध्ये स्थिर भांडवलाचे निर्णायक स्थान असते. पण त्याचबरोबर खर्ची पडलेल्या भांडवलामध्ये श्रमसाधनांच्या खर्ची पडलेल्या मूल्याला अत्यंत कमी स्थान असते. याचा अर्थ खर्ची पडलेले भांडवल व गुंतवलेले भांडवल यांच्यातील तफावत ही खूप मोठी असते. त्यामुळे गुंतवलेल्या भांडवलावर समान नफा मिळण्याचा अधिकार म्हणजेच खर्ची पडलेल्या भांडवलावर मोठ्या लाभमात्रेचा अधिकार असा होतो. कमीतकमी आर्थिक उलाढाल करून जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा तो मार्ग बनतो. ही शक्ती भांडवलदारांना सरळ सरळ कळते. आणि तिच्यातच स्थिर भांडवलाच्या रूपात श्रमसाधनांच्या विभूतिकरणाचे सार सापडते.

१९. व्यापारी व वित्त भांडवलदार : मूल्य रूपांतराची प्रक्रिया

आतापर्यंत आपण भांडवलदारवर्ग म्हणजे निरनिराळ्या औद्योगिक भांडवलदारांचा मिळून बनलेला समूह असे धरून चाललो होतो. परंतु नफा या रूपामध्ये जेव्हा वरकड-मूल्याचे भांडवलदारवर्गामध्ये वाटप होते तेव्हा औद्योगिक भांडवलदारांखेरीज व्यापारी भांडवलदार, वित्त-भांडवलदार इत्यादी इतर प्रकारचे भांडवलदार त्यात वाटेकरी असतात. यांच्यात हे वाटप कसे होते हेही पाहणे महत्त्वाचे आहे. या प्रकरणामध्ये आपण टप्प्याटप्प्याने भांडवलदारवर्गाच्या अनुक्रमे व्यापारी भांडवलदार व वित्त-भांडवलदार या दोन विभागांमध्ये हे वाटप कसे होते ते पाहणार आहोत.

१. अभिसरणात क्रयवस्तूंवर घडणाऱ्या प्रक्रिया

व्यापारी भांडवलदार आपल्याला वावरताना दिसतात ते अभिसरणाच्या क्षेत्रामध्ये. ते तयार माल किंवा क्रयवस्तू विकत असतात. कारखान्याच्या गेटबाहेर क्रयवस्तू आल्या की त्या अभिसरणाच्या क्षेत्रात दाखल होतात. तिथून पैशाच्या बदल्यात एखादे गिऱ्हाईक त्यांचा उपयोग करण्यासाठी जोपर्यंत त्यांची खरेदी करत नाही तोपर्यंत त्या अभिसरणाच्या क्षेत्रातच असतात. व्यापारी भांडवलदारांच्या ताब्यात त्या असोत किंवा औद्योगिक भांडवलदारांच्या

ताब्यात असोत, भांडवलदारवर्गाच्या ताब्यात असतांना क्रयवस्तूंना काही ना काही काळ अभिसरणाच्या क्षेत्रात घालवावा लागतो व त्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या विशिष्ट क्रिया त्यांच्यावर घडाव्या लागतात.

अभिसरणाच्या क्षेत्रात क्रयवस्तूंवर दोन प्रकारच्या प्रक्रिया घडत असतात. एक म्हणजे त्यांचे स्थलांतर होत असते. दुसरे म्हणजे त्यांचे रूपांतर होत असते. या दोन्ही प्रक्रियांचा आपल्याला वेगवेगळा विचार करावा लागेल कारण या दोन्ही प्रक्रिया एकमेकांमध्ये गुंतून घडणाऱ्या असल्या तरी त्या दोन्ही मूलत: वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत व वरकड-मूल्याची निर्मिती आणि वाटप यांच्याशी त्यांचे संबंध निरनिराळे आहेत.

२. अभिसरणातील पहिली प्रक्रियाक्रयवस्तूंचे स्थलांतर

स्थलांतर म्हणजे वस्तूंची एका विशिष्ट ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण. ही एक भौतिक प्रक्रिया आहे व एक आवश्यक असणारी भौतिक गरज आहे. जिथे वस्तू निर्माण होतात तिथून जिथे त्यांचा उपयोग होतो तिथपर्यंत त्यांची वाहतूक ही सर्व समाजव्यवस्थांमध्ये मानवी गरजा भागवणारी श्रमप्रक्रिया आहे. त्यामुळे स्वाभाविकत:च स्थलांतर ही क्रयवस्तूंच्या व्यवहारामध्ये मूल्यनिर्मितीची प्रक्रिया असते, आणि भांडवली स्वरूपामध्ये वरकड-मूल्याच्या निर्मितीची प्रक्रियाही असते.

थोडक्यात, स्थलांतराची प्रक्रिया ही अभिसरणाच्या क्षेत्रात त्या क्षेत्रामधील इतर प्रक्रियांना समांतर चालणारी उत्पादनप्रक्रियाच असते. त्या प्रक्रियेमध्ये खर्च होणारे श्रम व त्यातून बांधले जाणारे मूल्यसंबंध अगदी भांडवली उत्पादनाच्या क्षेत्रातल्यासारखेच असतात. स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये भांडवलदारांसाठी काम करणारे कामगार आपल्या श्रमांच्या मूर्त स्वरूपामुळे या प्रक्रियेत खर्च होणाऱ्या श्रमसामुग्रीचे मूल्य राखत असतात व आपल्या श्रमांच्या अमूर्त स्वरूपामुळे स्वत:च्या श्रमशक्तीचे मूल्य व वरकड-मूल्य निर्माण करीत असतात.

कारखान्यांच्या गेटापर्यंतचा ताळेबंद

उदाहरणार्थ, कारखान्यांच्या गेटांच्या आत भांडवली उत्पादनामध्ये २० लाख श्रमतास मूल्य असलेली श्रमसामुग्री खर्च करून कामगार १५ लाख श्रमतासांची श्रमशक्ती खर्च करीत आहेत असे धरूया. आपण असेही धरून चालू या की त्यासाठी औद्योगिक भांडवलदारांना श्रमसामुग्रीमध्ये एकूण ४० लाख श्रमतास

मूल्याचे भांडवल गुंतवावे लागते आणि वरकड-मूल्याचा दर हा २०० टक्के आहे. कारखान्यांच्या गेटांपर्यंत सामाजिक उत्पादनाच्या मूल्याचा ताळेबंद खालीलप्रमाणे मिळेल.

खर्च झालेल्या श्रमसामुग्रीचे मूल्य (राखले गेलेले जुने मूल्य)	२० लाख श्रमतास
श्रमशक्तीचे मूल्य (निर्माण झालेले नवे मूल्य)	५ लाख श्रमतास
खर्च झालेले भांडवल-मूल्य	२५ लाख श्रमतास
निर्माण झालेले वरकड-मूल्य (निर्माण झालेले नवे मूल्य)	१० लाख श्रमतास
उत्पादित क्रयवस्तूंचे मूल्य	३५ लाख श्रमतास

गुंतवलेले भांडवल-मूल्य = श्रमसामुग्रीत गुंतलेले + श्रमशक्तीमध्ये गुंतलेले
= ४० + ५ = ४५ लाख श्रमतास

स्थलांतरासकट उत्पादनाचा ताळेबंद

आता स्थलांतराची प्रक्रिया लक्षात घेऊ. उदाहरणार्थ, असे धरा की या उत्पादित क्रयवस्तूंची ने-आण करून, उपयोग करणाऱ्या गिऱ्हाईकांपर्यंत त्यांचे स्थलांतर करण्यासाठी २ लाख श्रमतासांची श्रमसामुग्री खर्च होत आहे, त्या श्रमसामुग्रीमध्ये त्या भांडवलदारांचे ४ लाख श्रमतास भांडवल-मूल्य गुंतले आहे, त्यासाठी त्याच २०० टक्के वरकड-मूल्याच्या दराने कामगारांची १.५ लाख तासांची श्रमशक्ती खर्ची होते आहे. त्यावरून आपल्याला खालील ताळेबंद मिळेल.

खर्च होणाऱ्या श्रमसामुग्रीचे मूल्य	
औद्योगिक भांडवलदारांच्या कारखान्यात	२० लाख श्रमतास
स्थलांतराच्या क्षेत्रातील भांडवलदारांमार्फत	२ लाख श्रमतास
	२२ लाख श्रमतास
श्रमशक्तीचे मूल्य	
औद्योगिक कामगारांचे	५.० लाख श्रमतास
स्थलांतराच्या क्षेत्रातील कामगारांचे	०.५ लाख श्रमतास
	५.५ लाख श्रमतास
वरकड-मूल्य	
औद्यागिक कामगारांकडून काढले गेलेले	१० लाख श्रमतास
स्थलांतराच्या क्षेत्रातील कामगारांकडून काढले गेलेले	१ लाख श्रमतास

	११ लाख श्रमतास
उत्पादित क्रयवस्तूंचे अंतिम मूल्य	**३८.५ लाख श्रमतास**
गुंतवलेले भांडवल-मूल्य	
औद्योगिक भांडवलदारांचे	४० + ५ = ४५.० लाख श्रमतास
स्थलांतराच्या भांडवलदारांचे	४ + ०.५ = ४.५ लाख श्रमतास
	४९.५ लाख श्रमतास

स्थलांतराचा सरळ औद्योगिक क्षेत्रात प्रवेश

थोडक्यात, आपण यापुढे कामगारांना कामाला लावून स्थलांतराची प्रक्रिया घडवणाऱ्या व विकणाऱ्या भांडवलदारांचा सरळ औद्योगिक क्षेत्रात समावेश करू शकतो. मूल्य प्रक्रियेच्या व वरकड-मूल्याच्या वाटपाच्या प्रक्रियेत कोणताही गुणात्मक बदल आपल्याला त्यामुळे करावा लागणार नाही किंवा मूल्य-किंमत रूपांतराबाबत कुठलेही वेगळ्या प्रकारचे गणित वापरावे लागणार नाही. रूपांतराची रीत बदलणार नाही. फक्त उद्योग क्षेत्रात या नव्या वाहतूक क्षेत्राचा समावेश केल्याने उत्पादित क्रयवस्तूंच्या मूल्यात, खर्च झालेल्या व गुंतवलेल्या भांडवलात आणि निर्माण झालेल्या वरकड-मूल्यामध्ये वाढ होईल. हा समावेश करून आपण आता वाहतूक क्षेत्रासकट एकंदर औद्योगिक भांडवलदारांचा ताळेबंद खालीलप्रमाणे सोप्या पद्धतीने मांडू शकतो.

एकंदर औद्योगिक भांडवलदारवर्गाचा (वाहतूक क्षेत्र धरून) ताळेबंद

श्रमसामुग्रीमार्फत खर्च होणारे भांडवल	२२.० लाख श्रमतास
श्रमशक्तीमार्फत खर्च होणारे भांडवल	५.५ लाख श्रमतास
एकूण खर्च होणारे भांडवल	२७.५ लाख श्रमतास
निर्माण होणारे वरकड-मूल्य	११.० लाख श्रमतास
उत्पादित क्रयवस्तूंचे मूल्य	३८.५ लाख श्रमतास
गुंतवलेले भांडवल	४९.५ लाख श्रमतास

३. अभिसरणातील दुसरी प्रक्रियारूपांतर

अभिसरणाच्या क्षेत्रात घडणाऱ्या रूपांतराच्या प्रक्रियेचा मात्र आपल्याला वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागेल. रूपांतराची प्रक्रिया क्रयवस्तूच्या मूल्याचे फक्त रूप बदलत असते. क्रयवस्तूचे पैशात व पैशाचे क्रयवस्तूत अशी ही दुहेरी प्रक्रिया असते. ही भौतिक प्रक्रिया नसते, त्यातून माणसांची कुठलीही भौतिक गरज भागत नाही. रूपांतर ही प्रक्रिया मूल्याचे केवळ रूप बदलत

असते, मूल्याच्या आशयाशी रूपांतराचा काही एक संबंध नसतो. त्या वस्तूमध्ये कोणत्याही प्रकारचे नवे भौतिक उपयोग-मूल्य निर्माण करणारे सामाजिक श्रम जात नसतात. त्यामुळेच रूपांतराची प्रक्रिया ही मूल्यनिर्मितीची प्रक्रिया असू शकत नाही, कारण मूल्य निर्माण होणे याचाच अर्थ मूल्याच्या आशयात फरक पडणे आणि ती मूल्यनिर्मितीची प्रक्रिया नसेल तर अर्थातच ती वरकड-मूल्याच्याही निर्मितीची प्रक्रिया असू शकत नाही.[१]

परंतु वरकड-मूल्याच्या किंवा मूल्याच्या निर्मितीची ती प्रक्रिया असो का नसो तिच्यामुळे क्रयवस्तूंच्या मूल्याचा आशय बदलो किंवा न बदलो, ती भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने एक आवश्यक प्रक्रिया असते हे मात्र खरे असते. कारण भांडवलाने पैसा या रूपात केलेला प्रवास 'अधिक पैसा' या टप्प्यापाशी पोचून संपायचा तर त्यासाठी क्रयवस्तूंचे पैशात रूपांतर ही एक भांडवलदारवर्गासाठी आवश्यक ठरणारी गोष्ट बनते आणि हे करायचे तर त्यासाठी श्रमसामुग्रीही खर्च करणे भांडवलदारवर्गाला भाग पडते आणि मोलाने घेतलेली श्रमशक्तीही खर्च करणे भाग पडते. तेव्हा त्यासाठी मूल्य निर्माण होवो की न होवो, मूल्य खर्च करणे भाग असते. नाहीतर नफ्याचे फळ पदरीच पडत नाही. नफा मिळवण्यासाठी, म्हणजे स्वत:च्या अस्तित्वासाठी, त्यांना हे मूल्य खर्च करणे आवश्यक ठरते.

रूपांतरासाठी मूल्य कुठून येते?

यातून प्रश्न निर्माण होतो की हे मूल्य येणार कोठून? मूल्यनिर्मितीच्या म्हणजेच भांडवली रूपातील वरकड-मूल्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेमधील संबंधांना धक्का न लावता हे मूल्य उपलब्ध होणे भाग असते. कारण असा धक्का पोचला तर बांधले गेलेले उत्पादनसंबंधांचे गृहीतच कोसळेल, पुनरुत्पादन अशक्य होईल. थोडक्यात मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेत खर्च होणाऱ्या श्रमसामुग्रीच्या व श्रमशक्तीच्या मूल्याव्यतिरिक्त इतर मूल्यातून हा खर्च करावा लागतो आणि श्रमसामुग्रीच्या व श्रमशक्तीच्या मूल्याचा खर्च वजा जाता भांडवलदारवर्गाच्या हातात उरलेले असते ते वरकड-मूल्य. तेव्हा रूपांतराच्या प्रक्रियेत खर्च होणारी श्रमसामुग्री व श्रमशक्ती यांच्यासाठी भांडवलदारवर्गाचे जे मूल्य खर्च होते ते वरकड-मूल्यामधून द्यावे लागते.

रूपांतराच्या प्रक्रियेतील खर्च भांडवलदारवर्गाला वरकड-मूल्यामधून करावा लागतो याचे दोन महत्त्वाचे परिणाम नफ्याच्या दराशी जोडलेले असतात.

पहिला परिणाम म्हणजे रूपांतरासाठी लागणाऱ्या श्रमसामुग्रीचे व श्रमशक्तीचे मूल्य वजा जाता जे वरकडमूल्य उरते तेच फक्त भांडवलदारवर्गात नफ्याच्या रूपात वाटपासाठी शिल्लक राहते. नफ्याच्या रूपात वाटपासाठी उपलब्ध होणारी वरकड–मूल्याची राशी कमी होते.

दुसरा परिणाम ज्या भांडवलाच्या राशीच्या आधारावर नफ्याचा दर ठरायचा त्या भांडवलाच्या राशीवर होतो. भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने मूल्याच्या रूपांतरासाठी खर्च होणारे व गुंतणारे मूल्य हे मूल्यनिर्मितीसाठी खर्च होणाऱ्या व गुंतवणाऱ्या मूल्यापेक्षा वेगळे नसतेच. नफा काढण्यासाठी जे जे आवश्यक भांडवल खर्च करावे लागते ते ते सर्व भांडवल तो स्वाभाविकपणे जमेस धरतो. त्याच्या दृष्टीने मूल्याची निर्मिती व त्याचे रूपांतर दोन्ही एकाच प्रक्रियेचे दोन आवश्यक भाग असतात. त्यामुळे नफ्याच्या दरासाठी, रूपांतराच्या प्रक्रियेमार्फत खर्च हाणारे व गुंतणारे भांडवल–मूल्य व मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेमार्फत खर्च होणारे व गुंतणारे भांडवल–मूल्य या दोन्हींची बेरीज आधारभूत ठरते. नफ्याचा दर ठरवणारी गुंतवलेल्या भांडवलाची राशी वाढते.

याचा सरळसरळ परिणाम हा नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्यामध्ये होतो. कारण वरकड–मूल्याची राशी कमी होणे आणि नफ्याच्या दरासाठी आधारभूत भांडवल वाढणे या दोन्हींचा स्वतंत्र परिणाम नफ्याचा दर उतरवण्याचा असतो आणि इथेच व्यापारी भांडवलदार या भांडवलदारवर्गाच्या विभागाचा प्रश्न येतो.

रूपांतर – व्यापारी भांडवलदारांचे व्यवच्छेदक लक्षण

रूपांतराच्या प्रक्रियेचा बराच भाग सांभाळणारा भांडवलदारवर्गाचा विभाग म्हणजे व्यापारी भांडवलदार हा विभाग. ही रूपांतराची उलाढाल हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण असते. आपल्या पुढील विश्लेषणामध्ये हा विभाग पूर्णपणे मूल्याच्या रूपांतराच्या उलाढालीमध्येच गुंतला आहे असे आपण धरणार आहोत. या गृहीताच्या आधारावर त्याच्या हातामधील भांडवलाच्या रूपांतरांच्या चक्राचा आलेख खालीलप्रमाणे दिसतो.

पैसा → क्रयवस्तू → जास्त पैसा
(भांडवल) (भांडवल + नफा)

तो पैशापासून सुरुवात करतो. त्यातून औद्योगिक भांडवलदारांकडून क्रयवस्तू विकत घेऊन त्याच्या पैशाचे क्रयवस्तूंमध्ये (व औद्योगिक भांडवलदाराच्या क्रयवस्तूंचे पैशामध्ये) रूपांतर करतो. त्यानंतर तो त्याच क्रयवस्तू उपयोग

करणाऱ्या गिऱ्हाईकाला विकतो. (किंवा त्याच्या पुढच्या व्यापारी भांडवलदाराला विकतो. औद्योगिक भांडवलदाराच्या कारखान्याच्या गेटापासून ते उपयोग करणाऱ्या गिऱ्हाईकापर्यंत अनेक व्यापारी भांडवलदारांचे दुवे असू शकतात. उदाहरणार्थ, अधिकृत एजंट, ठोक व्यापारी, किरकोळ दुकानदार इत्यादी. आपल्याला या दुव्यांचे स्वरूप फक्त पाहायचे असल्यामुळे आपण व्यापारी भांडवलाचा एकच दुवा आहे असे गृहीत धरले आहे.) तेव्हा तो पुन्हा त्याच्याकडील क्रयवस्तूंचे पैशात (व गिऱ्हाईकाच्या पैशाचे क्रयवस्तूमध्ये) रूपांतर करतो. केवळ रूपांतराच्या या उलाढालीमधून तो आपला नफा, अर्थात् वरकड-मूल्याचा स्वत:चा हिस्सा मिळवीत असतो.

व्यापारी भांडवलदार पूर्णपणे रूपांतराच्या उलाढालीत गुंतला आहे असे धरण्यामागे सैद्धांतिक व ऐतिहासिक अशी दोन्ही कारणे असतात. सैद्धांतिक कारणाचा संदर्भ रूपांतराची उलाढाल हे व्यापारी भांडवलदारांचे व्यवच्छेदक लक्षण असण्याशी आहे. प्रत्यक्षात अनेक व्यापारी भांडवलदार अभिसरणाच्या क्षेत्रामधील स्थलांतर व रूपांतर या दोन्ही प्रक्रिया पार पाडत असतात. परंतु जर त्याने रूपांतराची उलाढाल केली नाही तर तो व्यापारी भांडवलदार राहत नाही. दुसरे ऐतिहासिक कारण हे स्थलांतराच्या व रूपांतराच्या प्रक्रियांमध्ये पडणाऱ्या फारकतीचे आहे. जसजसा भांडवलशाहीचा विकास होतो तसतसा या दोन प्रक्रिया सांभाळणारे वेगवेगळे भांडवलदारांचे विभाग तयार होतात. वाहतूक कंपन्या व त्यांचे मालक यांच्याकडून इतरांप्रमाणे व्यापारी भांडवलदार देखील स्थलांतराची प्रक्रिया विकत घेऊ लागतात. थोडक्यात भांडवली विकासाबरोबरच व्यापारी भांडवलदार हा पूर्णपणे रूपांतराच्या उलाढालीमध्ये गुंतलेला विभाग बनू लागतो.

औद्योगिक भांडवलदारांचे रूपांतराचे खर्च

अर्थात, इथे हेही लक्षात ठेवावे लागेल की संपूर्ण भांडवलदारवर्गाची रूपांतराच्या प्रक्रियेत खर्च होणारी श्रमसामुग्री व श्रमशक्ती ही केवळ व्यापारी भांडवलदारांमार्फत खर्च होत नाही. खुद्द औद्योगिक भांडवलदारांमार्फतही अशा प्रकारे फार मोठी श्रमसामुग्री व श्रमशक्ती खर्च होत असते. कारखान्यात उत्पादन होणाऱ्या भौतिक उपयोग-मूल्यामार्फत मूल्यनिर्मितीशी आणि श्रमप्रक्रियेशी काहीही संबंध नसलेल्या, व केवळ वरकड-मूल्याचे नफ्यात रूपांतर करण्याशी संबंध असलेल्या कामांमध्ये किती श्रमसामुग्री व श्रमशक्ती

औद्योगिक कारखान्यांमध्ये खर्च होत असते याची कल्पना अशा कामांच्या यादीकडे नजर टाकली तर येऊ शकेल.

उदाहरणार्थ, माहितीच्या नावाखाली लोकांच्या भावनांवर परिणाम करून प्रतिस्पर्ध्यांच्या मालाऐवजी आपला मालच लोक कसे घेतील यावर कंपनीचे जाहिरात खाते मोठ्या प्रमाणावर श्रमसामुग्री व श्रमशक्ती खर्च करीत असते. बँकांशी संधान बांधून रूपांतराच्या गरजा कमीत कमी वेळात भागाव्यात म्हणूनही एक खाते असेच खर्च करत असते. सरकारदरबारी नेमके रिपोर्ट नेमक्या पद्धतीने जाऊन नफ्याचा शक्य तितका भाग कंपनीतच रहावा यासाठी चार्टर्ड अकांउंटंट्स आपल्या ताफ्यासहित राबत असतात. किंवा कंपनीच्या भागभांडवलामध्ये एखाद्या शत्रुपक्षीय स्पर्धकाला चंचुप्रवेश मिळू नये, भागधारकांवरील नियंत्रण स्वत:च्याच गटाचे राहावे यासाठी डायरेक्टर-बोर्ड व सेक्रेटेरिअल डिपार्टमेंट हातात हात घालून काम करत असतात. कामगारांवर वचक राहावा, त्यांच्या असंतोषाचा स्फोट होऊ नये म्हणून चुचकारणे, धमकावणे, ठोकणे इत्यादि सर्व मार्गांसकट वेल्फेअर व पर्सोनेल डिपार्टमेंट राबत असते. आणि या शिवाय काळा पैसा, लोकसंपर्काच्या (पब्लिक रिलेशन्स) नावे झोडल्या जाणाऱ्या पार्ट्या, अधिकारीवर्गाचे भत्ते, हाताशी धरलेल्या सरकारी मंत्री-नोकर-चाकर यांचे हात ओले करणे, अशा अनेक कामांमध्ये औद्योगिक भांडवलदारवर्गही फार मोठ्या प्रमाणावर श्रमशक्ती व श्रमसामुग्री खर्च करत असतो. या सर्वांचा मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेशी काहीही संबंध नसतो. कारखान्यात उत्पादन होणाऱ्या क्रयवस्तूंमध्ये त्यातून कोणत्याही प्रकारचे उपयोग-मूल्य निर्माण होत नसते. परंतु या सर्व प्रक्रिया भांडवली स्वरूपामधील क्रयवस्तूंच्या रूपांतराच्या किंवा वरकड-मूल्याच्या नफ्यातील रूपांतराच्या गरजेमधून भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया असतात. व्यापारी भांडवलदारांचा विचार करताना औद्योगिक भांडवलदारांचाही याप्रकारचा खर्च त्याच पायावर विचारात घेणे सयुक्तिक ठरते.

व्यापारी भांडवलदार आणि वैयक्तिक आवर्तनाचा काळ

भांडवलदारवर्गांमध्ये व्यापारी भांडवलदार असा एक वेगळा विभाग असण्यामुळे भांडवलदारवर्गाचा काय फायदा होतो असा एक प्रश्न उभा राहू शकतो. व्यापारी भांडवलदारांऐवजी ते पार पाडत असलेली जबाबदारी खुद्द औद्योगिक भांडवलदारांनीच पार पाडली तर व्यापारी भांडवलदारांना द्यावा लागणारा वरकड-मूल्याचा भागही त्यांनाच मिळेल. आणि शिवाय याप्रकारची बरीच

जबाबदारी नाहीतरी त्यांना सांभाळावी लागतेच की! मग व्यापारी भांडवलदारांचा वेगळा विभाग निर्माण होण्याची गरज काय?

या प्रश्नाचे काही उत्तर त्यातून येणाऱ्या सुटसुटीतपणा वगैरे कारणांच्या आधारे देता येते. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे कारण असते ते त्याचा नफ्याच्या दरावर होणाऱ्या परिणामाचे. व्यापारी भांडवलदार या एका वेगळ्या विभागाच्या हातात ही जबाबदारी सोपवली की औद्योगिक भांडवलदारांच्या भांडवलाचा वैयक्तिक आवर्तन-काळ कमी होतो. नाही तर त्यांनी उत्पादन केलेली क्रयवस्तू ही उपयोग करणाऱ्या गिऱ्हाईकाच्या हातात पोचेपर्यंत त्यांच्या क्रयवस्तू भांडवलाचे अर्थ-भांडवलात रूपांतर होत नाही. व्यापारी भांडवलदारांच्या अस्तित्वामुळे हे रूपांतर त्या अगोदर होते. त्यामुळे सामाजिक पातळीवर जरी त्या विशिष्ट क्रयवस्तूचा आवर्तन-काळ तोच राहिला, तरीदेखील औद्योगिक भांडवलदारांच्या भांडवलाचा वैयक्तिक आवर्तन-काळ कमी होतो. त्याशिवाय त्या क्रयवस्तूचा एकंदर आवर्तनकाळही कमी होण्याची शक्यता असते.

मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेवर यामुळे कोणताच परिणाम होत नाही. तितक्याच काळात, तितक्याच क्रयवस्तू, तितकेच भांडवल खर्च होऊन निर्माण होत असतात. फक्त त्यांचे अभिसरण जास्त वेगाने होते. परंतु याचा निर्णायक परिणाम गुंतवलेल्या भांडवलावर होतो. मूल्यनिर्मितीशी संबंध नसलेल्या बाबींवरील खर्चामुळे नफ्याचा दर आणखी खालावू लागतो.

रूपांतराच्या ताळेबंदाची गृहीते

मूल्यसंबंधांच्या गणिताच्या संदर्भात हे कसे घडते ते पाहण्यासाठी आपण या खर्चाबद्दलचे काही आकडे गृहीत धरूया. मागच्याच प्रमाणे वाहतूक क्षेत्र धरून, एकंदर औद्योगिक क्षेत्रामधून २२ लाख श्रमतासांचे मूल्य असलेली श्रमसामुग्री खर्च करून, २०० टक्के वरकड-मूल्याच्या दराने कामगारांची १६.५ लाख तासांची श्रमशक्ती खर्च होऊन, ३८.५ लाख श्रमतासांच्या वस्तू निर्माण होत आहेत असे धरूया. त्यासाठी संपूर्ण आवर्तन-काळ लक्षात घेता ४९.५ लाख श्रमतास गुंतवणूक आवश्यक ठरत असे.

आता आपण असे धरू की या औद्योगिक भांडवलदारांना मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेबाहेर, रूपांतराशी निगडित सर्व प्रकारच्या प्रक्रियांमध्ये ३ लाख श्रमतासांचे मूल्य असलेली श्रमसामुग्री खर्च करणे भाग पडत आहे व त्याबरोबर २०० टक्के वरकड-मूल्याच्या दराप्रमाणे ठरलेले वेतन देऊन ३ लाख तासांची

कामगारांची श्रमशक्ती वापरावी लागत आहे. थोडक्यात, त्यांचा हा खर्च अनुक्रमे ३ लाख श्रमतास मूल्य श्रमसामुग्रीसाठी व १ लाख श्रमतास श्रमशक्तीसाठी असा येतो. त्यासाठी त्यांना एकंदर आवर्तनाचा काळ लक्षात घेता ८ लाख श्रमतास मूल्याचे भांडवल गुंतवावे लागते असे गृहीत धरूया.

त्याच पद्धतीने व्यापारी भांडवलदारांना १.५ लाख श्रमतासांची श्रमसामुग्री व ०.५ लाख श्रमतास मूल्य असलेली १.५ लाख श्रमतासांची श्रमशक्ती खर्च करावी लागत आहे असे गृहीत धरूया. व यासाठी एकंदर आवर्तनाचा काळ लक्षात घेता त्यांना ४ लाख श्रमतास मूल्याचे भांडवल गुंतवावे लागते असे गृहीत धरूया. आपण असेही धरूया की औद्योगिक भांडवलदारांकडून ३८.५ लाख श्रमतास मूल्य असणाऱ्या क्रयवस्तू ते ३७.५ लाख श्रमतास मूल्याने निर्णीत किंमतीला विकत घेतात.[२]

आणि सरतेशेवटी आपण असे धरूया की व्यापारी भांडवलदारांच्या अस्तित्वामुळे क्रयवस्तूंचा सामाजिक पातळीवरील एकंदर आवर्तनाचा काळ बदलत नाही. परंतु औद्योगिक भांडवलदारांच्या भांडवलाचा वैयक्तिक आवर्तन-काळ मात्र पूर्वीपेक्षा पाऊणपट (०.७५ पट) इतका कमी होतो. व्यापारी भांडवलदाराचा वैयक्तिक आवर्तन-काळ हा एकंदर आवर्तन-काळाच्या पावपट (०.२५) होईल. याप्रमाणे मग आपला खर्च झालेल्या मूल्याचा ताळेबंद खालीलप्रमाणे येईल.

मूल्यनिर्मिती प्रक्रिया	
(राखले जाणारे व निर्माण होणारे मूल्य)	
मूल्यनिर्मितीमध्ये खर्च होणाऱ्या श्रमसामुग्रीचे मूल्य	२२.० लाख श्रमतास
श्रमशक्तीने निर्माण केलेले श्रमशक्तीचे मूल्य	५.५ लाख श्रमतास
श्रमशक्तीने निर्माण केलेले वरकड-मूल्य	**११.० लाख श्रमतास**
	३८.५ लाख श्रमतास
मूल्य रूपांतराची प्रक्रिया	
(वरकड-मूल्य खर्ची पडते)	
औद्योगिक भांडवलदारांचा खर्च	
श्रमसामुग्रीचे मूल्य	३.० लाख श्रमतास
श्रमशक्तीचे मूल्य	१.० लाख श्रमतास
व्यापारी भांडवलदारांचा खर्च	
श्रमसामुग्रीचे मूल्य	१.५ लाख श्रमतास

श्रमशक्तीचे मूल्य	०.५ लाख श्रमतास
रूपांतरात खर्च झालेले एकूण वरकड-मूल्य	**६.० लाख श्रमतास**
वाटपासाठी शिल्लक असलेले वरकड-मूल्य	**५ लाख श्रमतास**

गुंतवलेल्या मूल्यातील बदल

या ताळेबंदावरुन आपल्याला वाटपासाठी शिल्लक राहणाऱ्या वरकड-मूल्याची राशी मिळते. यानंतर आपल्याला बदललेला आवर्तनकाळ लक्षात घेऊन दोन्ही विभागांचे गुंतलेले भांडवल काढावे लागेल.

औद्योगिक भांडवलदार

एकंदर आवर्तन-काळ धरून

मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये गुंतलेले भांडवल	४९.५ लाख श्रमतास
मूल्यरूपांतराच्या प्रक्रियेमध्ये गुंतलेले भांडवल	८.० लाख श्रमतास
	५७.५ लाख श्रमतास

बदलेला आवर्तन-काळ धरून चालूया. त्याप्रमाणे नव्या परिस्थितीमध्ये,

गुंतलेले भांडवल = ५७.५ × ०.७५ = ४३.१३ लाख श्रमतास

व्यापारी भांडवलदार

एकंदर आवर्तन-काळ धरून

क्रयवस्तू विकत घेण्यात गुंतलेले भांडवल	= ३७.५ लाख श्रमतास
रूपांतराच्या प्रक्रियेत गुंतलेले भांडवल	= ४.० लाख श्रमतास
	४१.५ लाख श्रमतास

बदललेला आवर्तन-काळ धरून वरीलप्रमाणेच गृहीत धरून नव्या परिस्थितीमध्ये,

गुंतलेले भांडवल = ४१.५ × ०.२५ = १०.३७ लाख श्रमतास

बदललेला नफ्याचा सर्वसाधारण दर

थोडक्यात, आता वाटपासाठी उपलब्ध असलेले ५ लाख श्रमतास वरकड-मूल्य हे या गुंतलेल्या भांडवलावरील समान दराच्या न्यायाने व्यापारी व औद्योगिक भांडवलदारांमध्ये वाटले जाईल. मूल्याच्याच भाषेत हे काढायचे म्हटले तर (किंवा रूपांतराच्या अगदी प्राथमिक रूपामध्ये) नफ्याचा दर हा खालीलप्रमाणे येतो.

नफ्याचा दर = ५/(१०.३७ + ४३.१३) = ५/५३.५ = ९.३५ टक्के

रूपांतराचा खर्च लक्षात न घेता हा नफ्याचा दर खालीलप्रमाणे आला असता.

नफ्याचा दर = ११/४९.५ = २२.२२ टक्के

थोडक्यात, रूपांतराचे खर्च लक्षात घेतले की मूल्याच्या भाषेतील नफ्याचा दर या उदाहरणामध्ये सुमारे २२ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत उतरतो. वरील सर्व गणित हे मूल्यसंबंधांच्या आशयाच्या भाषेत सांगितले आहे. प्रत्यक्षात मात्र हे मूल्य-किंमत तफावतीमधून, किंमत या रूपाला लागू होणाऱ्या समीकरणांमार्फत होते. वरील सर्व वर्णन अंतर्भूत करणारी समीकरणे मांडून त्यांचा संच सोडवून आपण याचे नेमके उत्तर पाहू शकतो. अशा प्रकारचा समीकरणांचा संच परिशिष्ट ३ मध्ये दिला आहे व त्यातून मिळणारी उत्तरेही तिथे मांडलेली आहेत.

४. रूपांतरामधील सैद्धांतिक प्रश्न

वरील सर्व मांडणीतून दोन प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात. पहिला म्हणजे मूल्यनिर्मिती व मूल्यरूपांतराच्या प्रक्रियांमध्ये आपण भेद करणेच बरोबर आहे काय? दुसरा प्रश्न म्हणजे याच संदर्भात रूपांतराच्या प्रक्रियेत खर्च होणाऱ्या श्रमशक्तीचा प्रश्न. हे दोन्ही प्रश्न वेगवेगळ्या कारणांसाठी महत्त्वाचे आहेत; कारण या दोन्हीबाबत, वरवर पाहता, मार्क्सच्याच मूल्यसिद्धांताच्या आधारावर हरकत घेता येते असे वाटू शकते.

मूल्यनिर्मिती व रूपांतर यात फरक का करायचा?

यासाठी प्रथम आपण मूल्यनिर्मिती व मूल्यरूपांतराच्या प्रक्रियांमध्ये फरक करण्याबाबत घेण्यात येणाऱ्या हरकतीचा विचार करू. उदाहरणार्थ, असे म्हटले जाऊ शकते की दोन्ही प्रक्रियांमध्ये कामगारांची श्रमशक्तीच खर्च होत आहे, सामाजिक श्रम खर्च होत आहेत. तेव्हा त्यांचे अमूर्त श्रमकाळात रूपांतर होणेदेखील आवश्यक आहे. त्यामुळे रूपांतराच्या तुमच्या तथाकथित प्रक्रियेमध्येदेखील मूल्य निर्माण होते आहे. तेव्हा मार्क्सच्याच सिद्धांताच्या आधारे तुम्ही मूल्यनिर्मितीची प्रक्रिया आणि रूपांतराची प्रक्रिया वेगळी कशी मानता?

मार्क्सच्या मूल्यसिद्धांताची एक वेगळी समज अशा हरकतींमध्ये अभिप्रेत असते. ही समज, कोणीही, कुठेही, आणि कसाही पण जोपर्यंत कोणत्यातरी प्रकारचा श्रमकाळ घातला आहे तोपर्यंत त्याचा अमूर्त श्रमात व मूल्यात

समावेश होणे अपरिहार्य मानते. अन् हेच मुळात चुकीचे आहे. मार्क्स प्रथमपासूनच क्रयवस्तूंकडे पाहताना उपयोग-मूल्य आणि विनिमय-मूल्य यांच्या रूपात पाहतो. भौतिक उपयोगमूल्यामार्फत मूल्य व्यक्त व्हावे लागते असा आग्रह धरतो. इतकेच नव्हे, तर पैशावरील प्रकरणामध्ये तो उपयोग-मूल्य नसतानाही केवळ क्रयवस्तूंचे रूप घेणाऱ्या गोष्टी सामाजिक श्रमांचा एकतर्फी मोबदला कसा मिळवतात हेही स्पष्ट करतो. त्याच्या दृष्टीने हे मूल्य हे क्रयवस्तूंच्या रूपातील भौतिक संपत्ती व ती निर्माण करण्यात खर्च झालेली श्रमशक्ती यांच्या आवश्यक संबंधांतून गोठवला गेलेला अमूर्त श्रमकाळ असतो. त्यामुळे मूल्याची निर्मिती व मूल्याचे रूपांतर या प्रक्रियांमधला भेद त्याच्या संकल्पनांच्या मुळाशीच अंतर्भूत असतो.[३]

वरकड-मूल्य निर्माण होते. परंतु हे निर्माण झालेले वरकड-मूल्य पैशाच्या रूपात येऊन स्वत:लाच मिळावे यासाठीदेखील सामुग्री व श्रमशक्ती खर्च करावी लागते. जास्तीत जास्त वरकड-मूल्याचा वाटा आपल्याला कसा मिळेल हे पाहणे, वारंवार या वरकड-मूल्याचा निरनिराळ्या पद्धतीने हिशेब करून वाटप करणे, सरकारदरबारी, आयकर खात्यामधून त्याचा जास्तीत जास्त भाग शाबूत रहावा यासाठी प्रयत्न करणे इत्यादी कोणत्याही कामातून मूल्याची निर्मिती होत नसते, तर फक्त भौतिक संपत्ती खर्च होत असते. अशा प्रक्रियांमध्ये भांडवल खर्ची पडत नाही तर वरकड-मूल्य खर्च होते असे म्हणताना हेच अभिप्रेत असते.

मूल्यनिर्मिती व रूपांतराच्या प्रक्रियांचे वेगवेगळे परिणाम

या भेदाचे परिणामदेखील आपल्याला सैद्धांतिक दृष्ट्या स्पष्टपणे तपासता येतील. समजा की रूपांतराच्या प्रक्रियेमधील खर्च तेच ठेवून फक्त मूल्यनिर्मितीतील खर्च वाढवीत नेले तर भौतिक संपत्ती जास्त जास्त निर्माण होत जाईल. रूपांतराचे खर्च तेच ठेवल्याने त्या मूल्याचे कदाचित अभिसरण होऊ शकणार नाही. पण निर्माण झालेले मूल्य वाढते राहील हे स्पष्ट आहे. याउलट जर मूल्यनिर्मितीसाठी होणारे खर्च तेच ठेवून रूपांतराचे खर्च वाढवीत गेले तर मात्र नेमके उलटे होईल. उपलब्ध असलेली संपत्ती प्रथम कमी होत जाईल व होता होता मूल्य निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या खर्चालाच धक्का लागण्याची परिस्थिती निर्माण होईल. दोन्ही मूल्यनिर्मितीच्या प्रक्रिया असत्या तर असे व्हायचे काहीच कारण नव्हते.

परंतु यापेक्षाही वेगळ्या प्रकारचे महत्त्वदेखील या भेदाला आहे. मार्क्सच्या संकल्पनांना भांडवलशाहीच्या समीक्षात्मक विश्लेषणाचा संदर्भ आहे हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्याच्या विश्लेषणानुसार भांडवलशाहीच खुद्द आपल्या अंतर्विरोधांमधून पुढील समाजाची बैठकही तयार करीत असते. ही भांडवलशाहीची क्रांतिकारक बाजू आहे व तिचे भान मार्क्सला सतत आहे. त्या दृष्टीनेही मूल्याच्या संकल्पनेवर आधारलेली मूल्यनिर्मितीची व मूल्यरूपांतराची प्रक्रिया यांच्यामधील फरक महत्त्वाचा बनतो. या दोन्ही प्रक्रियांचा पुढील समाजाच्या बैठकीशी वेगवेगळा संबंध असतो. मूल्यनिर्मिती करणाऱ्या उत्पादनक्षमता या बऱ्याच अंशी सरळपणे पुढील समाजाची बैठक बनू शकतात. याउलट रूपांतराच्या प्रक्रियेतील श्रमसामुग्री व खर्च होणाऱ्या श्रमशक्तीचे मूर्त स्वरूप दोन्ही अगदी मूलभूतदृष्ट्या वेगळ्या असतात. पुढील समाजामध्येही, निर्माण झालेल्या भौतिक संपत्तीचे वितरण व नियमन करणारी यंत्रणा चालवण्यासाठी श्रमसामुग्री व श्रमशक्ती फक्त खर्च होणे आवश्यक असते. पण त्याच्या तुलनेत भांडवली विकासाबरोबर वाढत जाणारा रूपांतराचा खर्च हा बराच मोठा असतो. मोठ्या प्रमाणावर मोकळ्या होऊ शकणाऱ्या उत्पादनक्षमता या अनुत्पादक मार्गांनी वाया घालवणे भांडवलशाहीत अपरिहार्य बनते. ह्यावर बोट ठेवणे हाही भांडवलशाहीच्या समीक्षेचा एक भाग बनतो.

हा भेद दृश्य स्वरूपांमध्ये मात्र नाहीसा होत असतो. वरकड-मूल्याचे किंमतींमार्फत वाटप झाल्यानंतर मूल्यसंबंधांच्या आशयाच्या पातळीवर स्पष्ट असलेला हा फरक नाहीसा होतो. कारण व्यापारी भांडवलदारही भांडवलावर नफा मिळवत असतो आणि औद्योगिक भांडवलदारही! दोघांच्या हातातले भांडवल स्वत:पेक्षा जास्त मूल्य निर्माण करत आहे असेच दृश्य असते. किंमत व नफा या रूपांमार्फत मूल्यनिर्मिती व मूल्यरूपांतर या प्रक्रियांमधील भेद नाहीसा होतो!

रूपांतरामध्ये खर्च होणारी श्रमशक्ती

दुसरा महत्त्वाचा प्रश्न असतो. तो म्हणजे अशा मूल्यरूपांतराच्या कामांमध्ये खर्च होणाऱ्या श्रमशक्तीचा; या श्रमशक्तीच्या मालकांचा—आपण सध्या त्यांना कर्मचारी म्हणूया. या कर्मचाऱ्यांचे शोषण होते की नाही? दिसते असे की त्यांच्या श्रमातून जर मूल्य निर्माणच होत नसेल तर त्या वरकड-मूल्याचा भाग विनामोबदला काढून घेण्याचा तरी प्रश्न कुठे येतो? आणि त्यामुळे त्यांचे शोषण होत नाही इतकेच नव्हे तर त्यांना कितीही कमी मोबदला दिला तरी शोषणाचा

प्रश्न येत नाही! पुन्हा एकदा वरवर पाहता मार्क्सच्याच सिद्धांताच्या आधारेच हा निष्कर्ष काढलेला दिसतो.

पण जास्त खोलात गेले तर वरील निष्कर्ष हा अर्धसत्य असतो. म्हणजे या कर्मचाऱ्यांचे शोषण होत असते, पण ते त्यांच्याकडून वरकड-मूल्य न काढता! यासाठी पुन्हा एकदा आपल्याला श्रमशक्ती विकणे या मूलभूत प्रक्रियेकडे वळावे लागेल. आपण असे समजून चालूया की हे कर्मचारी स्वत:ची श्रमशक्ती न विकता श्रम विकत आहेत. क्रयवस्तूंच्या व्यवहारात कुठल्याही प्रकारचे श्रम विकत घेण्यासाठी तितके मूल्य देणे भाग पडत असते कारण सामाजिक श्रमकाळाच्या साठ्याचा एक भाग हा त्यातून विकत घ्यावा लागतो. सर्व प्रकारच्या श्रमांना हे मूल्य देणे भाग असते. मग ते सुताराचे टेबल बनवण्याचे असोत किंवा एखाद्याने मालिश करण्याचे असोत किंवा पाय चेपण्याचे असोत. त्यामुळे रूपांतराच्या प्रक्रियेत खर्च होणारे श्रम भांडवलदारवर्गाला विकत घेणे भाग असते.

जर हे कर्मचारी भांडवलदारवर्गाला श्रम विकत आहेत असे गृहीत धरले तर त्यांना तितके श्रमतास मूल्य देणे हे त्यामुळे भाग पडत असते. मगाचच्या उदाहरणामध्ये व्यापारी व औद्योगिक भांडवलदारांचे मिळून हे श्रम होते ४.५ लाख श्रमतास, आणि कर्मचाऱ्यांना त्यामुळे ४.५ लाख श्रमतास मूल्य देणे भांडवलदारवर्गाला भाग पडले असते.

परंतु कर्मचाऱ्यांकडून भांडवलदारवर्ग श्रम विकत घेत नाही तर श्रमशक्ती विकत घेतो. व जो न्याय सर्वसाधारण श्रमांना लागतो तोच भांडवलशाहीमध्ये सर्वसाधारण श्रमशक्तीला लागतो. त्या श्रमांच्या मोबदल्यात, ते श्रम करण्याची कुवत निर्माण करण्यासाठी आवश्यक तितकेच मूल्य कर्मचाऱ्यांच्या हातात ठेवणे भांडवलदारवर्गासाठी आवश्यक असते. थोडक्यात त्यांच्याकडून वरकड श्रम काढण्याचा भांडवलदारवर्गाचा हक्क अबाधित असतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हातात १.५ लाख श्रमतास मूल्य, श्रमशक्तीचे मूल्य चुकवण्यापुरते ठेवले की त्याला कर्मचाऱ्यांकडून ३ लाख तासांचे श्रम हे विनामोबदला काढता येतात.

त्याचा परिणाम सरळपणे वाटपासाठी उपलब्ध होणाऱ्या वरकड-मूल्यावर होत असतो. भांडवलदारवर्गाचे हितसंबंध हे कर्मचाऱ्यांकडूनदेखील श्रमांऐवजी श्रमशक्ती विकत घेण्यामध्ये गुंतलेले असतात. उदाहरणार्थ, वरील उदाहरणामध्ये भांडवलदार ४.५ लाख तास श्रमांसाठी १.५ लाख श्रमतास मोबदला देऊन

मोकळा होतो. जर त्याला सरळपणे त्या श्रमांसाठी ४.५ लाख श्रमतास मूल्य द्यावे लागले असते तर तो वाढीव खर्चदेखील वरकड-मूल्यातून देणे भाग पडले असते. त्यामुळे जिथे ५ लाख श्रमतास वरकड-मूल्य वाटपासाठी उपलब्ध होत होते तिथे फक्त ५ - (४.५ - १.५)= २ लाख श्रमतास वरकड-मूल्य शिल्लक राहिले असते. वरकड-मूल्यामध्ये ६० टक्क्यांनी तूट आली असतो.

थोडक्यात, कर्मचाऱ्यांनाही श्रमशक्तीच विकावी लागते. या भांडवली संबंधामुळे भांडवलदारवर्ग त्यांच्याकडून ३ लाख तास वरकड श्रम काढू शकतो. या श्रमातून मूल्य निर्माण होत नाहीच, तसेच या ३ लाख तास वरकड श्रमांचे वरकड-मूल्यातही रूपांतर होत नाही. परंतु त्या वरकड श्रमांइतकेच पूर्वी निर्माण झालेले वरकड-मूल्य वाचते, वरकड-मूल्याची बचत होते. तेव्हा कर्मचाऱ्यांचे शोषण होत असतेच, परंतु त्यांच्याकडून वरकड-मूल्य न काढता, केवळ वरकड श्रम काढून व तितक्या वरकड-मूल्याची बचत होऊन. भांडवलदारवर्गाचा हितसंबंध त्यातून स्पष्ट दिसतो.

शोषणाचे दृश्य माप शोषण लपवते

रूपांतराचे खर्च लक्षात घेतले की आणखीही एक बदल दृश्य स्वरूपात होत असतो. कामगारवर्गाचे शोषण आता निर्णायकपणे लपते. उदाहरणार्थ, हे श्रम नजरेआड करून जे मूल्यसंबंध उभे असतात त्यांच्यामध्ये एकत्रित नफा व एकत्रित वेतन यांच्यातील संबंध हा सरळपणे वरकड-मूल्य व श्रमशक्तीचे मूल्य यांच्यातील संबंध दर्शवीत असतो. आता मात्र एकत्रित नफा व एकत्रित वेतन यांचे प्रमाण सरळपणे वरकड-मूल्याचा दर व्यक्त करत नाही.

उदाहरणार्थ, असे धरा की प्रत्यक्षात २०० टक्के वरकड-मूल्याच्या दराने भांडवलदारवर्ग ३ लाख तासांची श्रमशक्ती वापरीत आहे. त्याचवेळी रूपांतराच्या उलाढालीत भांडवलदारवर्गाला (व्यापारी भांडवल जमेस धरून) ०.१ लाख श्रमतासाची श्रमसामुग्री व १.५ लाख तासांची श्रमशक्ती वापरावी लागत आहे.

मूल्यनिर्मिती प्रक्रिया	
श्रमशक्तीचे मूल्य (वेतन)	१.० लाख श्रमतास
वरकड-मूल्य	२.० लाख श्रमतास
रूपांतराची प्रक्रिया	
रूपांतरात खर्च होणाऱ्या श्रमसामुग्रीचे मूल्य	०.१ लाख श्रमतास

रूपांतरात खर्च होणाऱ्या श्रमशक्तीचे मूल्य (वेतन) ०.५ लाख श्रमतास

वाटपासाठी उपलब्ध वरकड-मूल्य (नफा) = २ - ०.१ - ०.५

=१.४ लाख श्रमतास

एकूण वरकड-मूल्य व ते निर्माण करणाऱ्या कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य यांचे प्रमाण खालीलप्रमाणे येते:

वरकड-मूल्याचा दर = २ लाख श्रमतास/१ लाख श्रमतास = २००%

याउलट एकूण नफा व एकूण वेतन यांच्यातील प्रमाण खालीलप्रमाणे येते.

दर वेतन-मूल्यामागचा नफा = १.४/(१+०.५) = ९३.३३%

थोडक्यात, मूल्यनिर्मिती व रूपांतर हा फरक केला नाही, तर प्रत्यक्ष वरकड-मूल्याचा दर व एकूण नफा भागिले एकूण वेतन यातून दिसणारा दर यामध्ये जास्तच तफावत पडते. एकूण नफा भागिले एकूण वेतन हे प्रत्यक्ष शोषणाची पातळी लपवणारे वरकड-मूल्याचे रूप ठरते.

व्यापारी भांडवलदाररूपांतराचे प्रातिनिधीक उदाहरण

व्यापारी भांडवलदारांना वरकड-मूल्याचा भाग कसा मिळतो हे पाहणे दोन-तीन कारणांसाठी महत्त्वाचे ठरते. मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेत ज्यांचे भांडवल गुंतलेले नाही अशा भांडवलदारांना वरकड-मूल्याचा भाग कसा मिळतो या प्रश्नाचे ते एक उदाहरण होते. त्यावरून आपण खालील महत्त्वाचे सर्वसाधारण निष्कर्ष काढू शकतो. एक म्हणजे, मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेबाहेर जी श्रमसामुग्री व श्रमशक्ती खर्च होते तिचे मूल्य हे वरकड-मूल्यातून वजा होते व त्याप्रमाणे वाटपासाठी उपलब्ध असलेले वरकड-मूल्य कमी होते. अशा प्रक्रियांमुळे सामाजिक पातळीवर व वैयक्तिक भांडवलदारांच्या पातळीवर आवर्तन-काळात जो बदल होतो तो जमेस धरून मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेत व त्या प्रक्रियेबाहेर गुंतलेल्या भांडवलामध्ये फरक पडतो. मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेबाहेर कार्यवाहीत असणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या भांडवलाला त्याच्या त्याच्या प्रकाराला अनुरूप अशा दृश्य संबंधावरून ठरणाऱ्या रूपांनुसार वरकड-मूल्याचा भाग मिळतो. (आपल्या उदाहरणात केवळ पैसा-क्रयवस्तू-जास्त पैसा हा आलेख गिरवून व्यापारी भांडवलाने व्यापारी नफा या रूपात वरकड-मूल्याचा भाग मिळवणे आवश्यक होते.) प्रत्येक भांडवलाला अशा तऱ्हेच्या वाटपातून मिळालेला वरकड-मूल्याचा भाग व त्यांची नव्या परिस्थितीप्रमाणे गुंतवलेली राशी यांच्यावरून नफ्याचा सर्वसाधारण दर व क्रयवस्तूंच्या किंमती ठरतात.

अन् त्याबरोबरच श्रम विकत घेण्याऐवजी श्रमशक्ती विकत घेण्याचा भांडवली अधिकार मिळाल्यामुळे रूपांतराच्या प्रक्रियेमध्ये श्रम घालणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून भांडवलदारवर्ग वरकड श्रम काढू शकतो. या वरकड श्रमांतून वरकड-मूल्य निर्माण होत नसेल तरी तितकेच वरकड-मूल्य खर्च न करावे लागल्यामुळे वाचते, व भांडवलदारवर्गांतर्गत वाटपासाठी उपलब्ध राहते.

या सूत्रांच्या आधारे आपण भांडवलदारवर्गाच्या निरनिराळ्या विभागांमधील वरकड-मूल्याच्या वाटपाचे संबंध तपासू शकतो. यात सर्वांत महत्त्वाचे असते ते त्या त्या विभागांमधील दृश्य संबंधांच्या रूपाप्रमाणे वाटप होणे. अन्यथा इतर सर्व गोष्टी या अशा सगळ्या विभागासाठी सारख्याच असतात. याच्या स्पष्टतेसाठी केवळ या दृश्य रूपावर लक्ष केंद्रित करून आपण वित्त-भांडवलाचाही (इंटरेस्ट बेअरिंग कॅपिटल) विचार करूया.

५. वित्त-भांडवल : रूपांतरातील खर्चाचे दुसरे उदाहरण

वित्त-भांडवलाची महती भांडवली अर्थशास्त्राच्या कुठल्याही पुस्तकात सापडते. कुठल्याही प्रकारच्या भांडवलाचे चक्र पैशापासूनच सुरू व्हावे लागते आणि पैशाच्या रूपातच त्याचा शेवट व्हावा लागतो. त्यामुळे अर्थ-भांडवल या भांडवलाच्या रूपाला एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते. अनेक वेळा तितकेच मूल्य क्रयवस्तू भांडवलाच्या किंवा उत्पादक-भांडवलाच्या रूपात असून भागत नाही, ते पैशाच्या रूपात, अर्थ-भांडवल या रूपातच हातात असावे लागते. त्याचा सतत पडणारा तुटवडा हा अनेकदा मोठा प्रश्न होऊन बसतो. उदाहरणार्थ दोन महिन्यांनी पाहिजे त्यापेक्षा जास्त भांडवल पैशाच्या रूपाने हातात परतणार असते पण गरज आता असते. अशी लहानमोठी तफावत सतत तयार होत असते व अर्थ-भांडवल याच रूपात भांडवल हातात असण्याची गरज निर्माण होत असते. वित्त-भांडवल म्हणजे असे अर्थ-भांडवल पुरवणारे भांडवल असते. आपल्या हातातील पैसा हा अर्थ-भांडवल या रूपात इतर भांडवलदारांना देऊ करणारे भांडवलदार हे आपल्या भांडवलाचे वित्त-भांडवलात रूपांतर करीत असतात. आणि अशा भांडवलाला व्याज या दृश्य रूपातच वरकड-मूल्याचा भाग मिळणे आवश्यक असते.

वित्त-भांडवलदारांसकट नवा ताळेबंद

यासाठी आपण मगाच्याच उदाहरणाकडे वळू. इथे आपल्याला केवळ गुंतवलेले निरनिराळे भांडवल व वाटपासाठी उपलब्ध असलेले एकूण वरकड-

मूल्य यावरच लक्ष केंद्रित करायचे आहे. त्याप्रमाणे खालील गोष्टी आपल्याला दिसतात.

औद्योगिक भांडवलदारांचे गुंतलेले भांडवल = ४३.१ लाख श्रमतास

व्यापारी भांडवलदारांचे गुंतलेले भांडवल = १०.४ लाख श्रमतास

वाटपासाठी उपलब्ध असलेले वरकड-मूल्य = ५ लाख श्रमतास

आपण असे गृहीत धरूया की औद्योगिक भांडवलदारांना आपल्या गुंतवलेल्या भांडवलापैकी ६० टक्के भांडवल हे वित्त-भांडवलदारांकडून व्याजी घ्यावे लागते तर व्यापारी भांडवलदारांना ५० टक्के. व्याजाचा दर १० टक्के आहे असे आपण गृहीत धरू. त्याप्रमाणे वित्त-भांडवलदारांचे कार्यवाहीत येणारे भांडवल

= ४३.१ × ०.६० + १०.४ × ०.५०

= २५.९ + ५.२ = ३१.१ लाख श्रमतास

त्यावरून वित्त-भांडवलदारांना व्याजाच्या दृश्य रूपामार्फत मिळावे लागणारे

वरकड-मूल्य = ३१.१ × ०.१० = ३.११ लाख श्रमतास

इतक्या रकमेने आता वाटपासाठी उपलब्ध असलेले वरकड-मूल्य कमी होईल. आता वाटपासाठी उपलब्ध वरकड-मूल्य

= ५ - ३.११ = १.८९ लाख श्रमतास

वित्त-भांडवलदारांखेरीज इतर भांडवलदारांना स्वत:चे किती भांडवल गुंतवावे लागते त्याप्रमाणे या उरलेल्या वरकड-मूल्यावरून सर्वसाधारण नफ्याचा दर ठरेल. त्याप्रमाणे

नफ्याचा नवा सर्वसाधारण दर = १.८९/(४३.१ × ०.४ + १०.४ × ०.५)

= १.८९ / २२.४ = सुमारे ८.४४%

अर्थात हे उत्तर अजून तसे अपुरे आहे. अजून आपण व्याज या रूपामार्फत वित्त-भांडवलदारांना पडणाऱ्या नफ्याच्या दराबद्दल विचार केलेला नाही. त्यांनाही होणारा नफा हा सर्वसाधारण नफ्याच्या दराने व्हायला हवा व त्याप्रमाणे व्याजाचा दर निश्चित होईल.[४]

वित्त-भांडवलदारांचा नफा व व्याजाचा दर

आपण असे गृहीत धरूया की वित्तभांडवलदार आपल्या उलाढालींमध्ये ३१.१ लाख श्रमतास गुंतवून ०.०८७ लाख श्रमतासांची श्रमसामुग्री खर्च करतात,

०.३३३ श्रमतास मूल्य असलेली १ लाख तासांची श्रमशक्ती खर्च करतात व त्यासाठी त्यांचे ०.८४ लाख श्रमतास भांडवल गुंतते.[५]

तेव्हा खर्च वजा जाता त्यांना नफा म्हणून वरकड-मूल्य

= ३.११ - (०.०८७ + ०.३३३)

= २.६९ लाख श्रमतास

त्यानी गुंतवलेले एकूण भांडवल

= ३१.१० + ०.८४ = ३१.९४

त्यांचा नफ्याचा दर = २.६९/३१.९४ = सुमारे ८.४२%

स्थूलमानाने दोन्ही नफ्याचे दर जवळपास सारखे असल्याने व्याजाचा आपण धरलेला १० टक्के दर निश्चित होईल. अर्थात वरील उत्तर हे दुसऱ्याही अर्थाने प्राथमिक आहे. अचूक उत्तरासाठी वरील सर्व संबंध हे रूपांतरित मूल्याच्या म्हणजेच किंमतींच्या रूपात मांडावे लागतील. थोडक्यात त्यावरून समीकरणांचा संच तयार करून तो सोडवावा लागेल. त्याचे उदाहरण परिशिष्ट ३ मध्ये सापडेलच. परंतु त्यातील सर्व गणित म्हणजे वरील मूल्याच्या भाषेतील गृहीतांचेच किंमतीच्या भाषेत रूपांतर असेल.

अर्थ-भांडवलाच्या रूपात भांडवल पुरवणारे व त्या बदल्यात व्याजाचा मोबदला घेणारे वित्त-भांडवल हेदेखील भांडवली व्यवस्थेच्या दृष्टीने एक आवश्यकता बनते. आदिम-संचयामध्ये असणारे त्याचे महत्त्वाचे स्थान आपण पूर्वीच पाहिले आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये उत्पादनाच्या व्याप्तीच्या शक्यता वाढवणे वित्तभांडवलामुळे शक्य होते. वित्त-भांडवल नसते तर केवळ स्वत:च्या भांडवलाच्या जोरावर जो कारखाना टाकला गेला असता त्यापेक्षा मोठा कारखाना टाकणे शक्य होते. सापेक्ष वरकड-मूल्याचा वित्त-भांडवल हे एक आधार बनते. त्याबरोबरच अर्थ-भांडवल, उत्पादक-भांडवल, व क्रयवस्तू-भांडवल यांच्यातील मेळ साधला जाऊन उत्पादन त्याच पातळीवर चालू राहायचे झाले, तर केवळ हा मेळ साधण्यासाठी वेळोवेळी थोडक्या काळासाठी वित्त-भांडवलाची गरज भासते. आणि आवर्तन-काळामधील अभिसरणाचा काळ संकोच पावून आवर्तन-काळ सामाजिक पातळीवर कमीही होऊ शकतो. या गोष्टीमुळे एकतर बऱ्याचदा नफ्याचा दर खालावण्याऐवजी सुधारु शकतो; दुसरे म्हणजे तसा तो खालावला तरीदेखील भांडवली

उत्पादनाची एका आवश्यकता किंवा गरज म्हणून वित्त-भांडवल भक्कमपणे प्रस्थापित होते.

६. अर्थ-भांडवलाचे विभूतिकरण

भांडवलदारवर्गाच्या निरनिराळ्या प्रकारच्या विभागांमध्ये वरकड-मूल्य हे किंमतीमार्फत वाटले गेले की त्यातून जी निरनिराळी रूपे तयार होतात तीच नफ्याच्या भांडवली समर्थनांचा आधार बनतात. उदाहरणार्थ, औद्योगिक भांडवलदार हे उत्पादनामध्ये आणि क्रयवस्तूंच्या खरेदी-विक्रीत गुंतलेले असतात. व्यापारी भांडवलदार हे फक्त क्रयवस्तूंच्या खरेदी-विक्रीत गुंतलेले असतात आणि वित्तभांडवलदार हे उत्पादनातही गुंतलेले नसतात आणि क्रयवस्तूंच्या खरेदी-विक्रीतही गुंतलेले नसतात. आणि तरी तिन्ही प्रकारच्या भांडवलदारांना नफ्याच्या रूपात वरकड-मूल्य मिळत असते. त्यांच्या भांडवलाच्या रूपांतराची चक्रे पाहिली तर ती अनुक्रमे खालीलप्रमाणे दिसतात.

औद्योगिक भांडवलदार :

अर्थ-भांडवल → उत्पादक-भांडवल → क्रयवस्तू-भांडवल → (अर्थ-भांडवल + नफा)

व्यापारी भांडवलदार :

अर्थ-भांडवल → क्रयवस्तू-भांडवल → (अर्थ-भांडवल + नफा)

वित्त-भांडवलदार :

अर्थ-भांडवल → (अर्थ-भांडवल + नफा)

या तिन्ही रूपांना समान काय असते? तर पैशाचे अर्थ-भांडवलात रूपांतर. त्याचे वर्णन निरनिराळ्या प्रकारे केले जाते. पैसा खर्च करण्याऐवजी तो धोक्यात घालणे, किंवा पैसा खर्च करण्यातून जो उपयोग होऊ शकतो त्याचा त्याग करणे. पैसा नुसता खर्च करण्याऐवजी नेमक्या ठिकाणी नेमक्या पद्धतीने गुंतवण्याची उद्योजकता दाखवणे इत्यादि. मूल्यसंबंध आणि मूल्य-किंमत रूपांतर नजरेआड केले तर नफ्याचा उगम कामगारांच्या शोषणामधून भांडवली उत्पादनामध्ये निर्माण होणाऱ्या वरकड-मूल्यात पाहिला जात नाही. त्याऐवजी नफ्याचा उगम हा ताबडतोबीच्या उपभोगाच्या त्यागामध्ये, किंवा पैसा गुंतवल्यामुळे पत्करलेल्या तथाकथित धोक्यामध्ये, किंवा उद्योजकतेमध्ये पाहिला जातो. पैशाच्या प्रकरणात पाहिल्याप्रमाणे पैशामुळे ज्यांना क्रयवस्तूंचे

केवळ रूप लाभू शकते अशाच गोष्टींना शेवटी नफा चिकटवावा लागतो. भांडवली विचारांचे हे सूत्र बनते.

भांडवली विचारांचे हे सूत्र प्रस्थापित होते यामागे महत्त्वाचे ऐतिहासिक कारणदेखील आहे. ऐतिहासिकदृष्ट्या व्यापारी व सावकार हे भांडवलदारवर्गाचे विभाग औद्योगिक भांडवलदारांच्या जन्माअगोदरच तयार झालेले असतात. वरकड-मूल्याचा किंवा नफ्याचा उगम भांडवली उत्पादनामध्ये होतो हा विचार त्यामुळे भांडवली विचारवंतांना पटण्याजोगा नसतो. कारण तसे असेल तर भांडवली उत्पादन प्रस्थापित होण्याअगोदर व्यापारी व सावकार विभाग अस्तित्वात कसे आले असते?

हा प्रश्न आपल्या दृष्टीनेही थोड्याफार महत्त्वाचा आहे. त्यासाठी आपण दोन गोष्टी वेगळ्या करणे आवश्यक आहे. एक म्हणजे व्यापारी व सावकार यांना भांडवलीपूर्व समाजामध्ये असलेले स्थान व दुसरे म्हणजे भांडवली व्यवस्थेमधले त्यांचे स्थान. प्रथम एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की आपले मागील सर्व विश्लेषण हे व्यापारी-भांडवलदार व वित्त-भांडवलदार यांच्या भांडवलशाही व्यवस्थेतील स्थानाबद्दल चालले होते. म्हणूनच आपण नफ्याचा सर्वसाधारण दर तिथेही गृहीत धरला होता. कारण भांडवलशाहीच्या स्वत:च्या नियमांनी हे विभाग नियंत्रित झाले होते असे आपण गृहीत धरतो.

भांडवलीपूर्व समाजामध्ये मात्र सावकारी व व्यापारी भांडवल हे खुद्द भांडवली नियमांच्या आधारावर उभे नव्हते. ते भांडवलीपूर्व शोषकवर्गांच्या वळचणीला वाढणारे वर्ग होते. परंतु तेव्हाही त्यांचा नफा उत्पादनातूनच येत असे व शोषणातूनच येत असे. त्या समाजातील शोषकवर्गांशी जे सामाजिक-राजकीय नाते त्यांचे असेल त्याप्रमाणे त्यांना नफ्याचा दर पडत असे व अनेकदा तो भरमसाट दरानेही पडत असे. या भांडवलीपूर्व समाजामधील व्यापारी व सावकार वर्गाची व त्यांना लागू होणाऱ्या नियमांची भांडवली व्यवस्थेतील व्यापारी व वित्त-भांडवलदारांशी किंवा त्यांना लागू होणाऱ्या नियमांशी गल्लत करून चालणार नाही.

भांडवली व्यवस्था एकदा स्वत:च्या पायावर उभी राहिली, म्हणजेच भांडवली उत्पादन प्रस्थापित झाले की मगच व्यापारी व वित्त-भांडवलदार वर्गांना भांडवली नियम लागू होतात. भांडवलीपूर्व शोषणाचे वाटेकरी बनण्याऐवजी ते आता भांडवली शोषणाचे वाटेकरी, वरकड-मूल्याचे वाटेकरी बनतात. तेव्हा सावकार व व्यापारी हे भांडवलशाही व्यवस्थेअगोदर अस्तित्वात असले तरी

त्यामुळे सावकारी व व्यापारी भांडवल हे भांडवलशाहीचा पाया ठरत नाही. भांडवलशाही व्यवस्थेत व त्याअगोदर दोन्ही वेळेस ते शोषणाचे वाटेकरी फक्त असतात. मूळ शोषणाचे संबंध त्यांच्या अखत्यारीबाहेरच बांधले जात असतात.

---

१ मूल्यनिर्मिती व मूल्यरूपांतर या दोन प्रक्रियांमधील आम्ही मांडत असलेल्या फरकाची अनेकदा वेगळ्या पद्धतीने चर्चा केली जाते. बहुधा या चर्चेमध्ये दोन्ही प्रक्रियांमध्ये घातलेले श्रम हे अनुत्पादक श्रम आहेत की उत्पादक श्रम आहेत हा मूळ संदर्भ असतो. मूल्यनिर्मिती व मूल्यरूपांतर यात आम्ही जो फरक करू पाहत आहोत याद्वारे व्यापारी व वित्त-भांडवलापुरते या प्रश्नाचेही स्पष्ट उत्तर अभिप्रेत आहे. रूपांतराच्या प्रक्रियेत घातले गेलेले श्रम हे अनुत्पादक श्रम ठरतात, कारण त्यातून मूल्य निर्माण होत नाही.

अनुत्पादक श्रम व उत्पादक श्रम या संकल्पनांचा मार्क्स कसा वापर करतो हा एक अत्यंत वादग्रस्त मुद्दा आहे. विशेषत: मार्क्सच्या लिखाणामध्ये या शब्दाचा वेगवेगळ्या वेळी त्याने वेगवेगळ्या अर्थाने वापर केलेला आढळतो. स्थूलमानाने मार्क्स उत्पादक श्रम ही कल्पना तीन वेगवेगळ्या अर्थाने वापरताना दिसतो, त्याप्रमाणे उत्पादक

श्रम यांचा अर्थ ज्यांच्यामधून भौतिक उपयोग-मूल्य निर्माण होते असे श्रम, किंवा ज्यांच्यामधून मूल्य निर्माण होते असे श्रम किंवा ज्यांच्यामधून वरकड-मूल्य निर्माण होते असे श्रम असे तीन अर्थ निघतात.

या तिन्ही अर्थांचा मार्क्सचा वापर आणि आम्ही केलेली मांडणी यांची सुसंगती दाखवणे हे या पुस्तकाच्या कक्षेबाहेरचे काम आहे. परंतु त्याचा मुख्य आधार कोणता आहे ते थोडक्यात खाली देत आहोत. वाचकांना तो पडताळून पाहता येऊ शकेल. हे तीन अर्थ म्हणजे आवश्यक (पण पुरेशा नव्हेत) अटींची एक उतरंड म्हणून पाहता येतात. वरकड-मूल्य निर्माण करणारे श्रम हे मूल्य निर्माण करणारे श्रम असावे लागतात, आणि मूल्य निर्माण करणारे श्रम हे भौतिक उपयोग मूल्य निर्माण करणारे श्रम असावे लागतात. तेव्हा वरकड-मूल्य निर्माण करणार श्रम या तीनही दृष्टीने उत्पादक श्रम असावे लागतात. परंतु ही उतरंड उलटी मात्र काम करीत नाही. जे श्रम भौतिक उपयोग-मूल्य निर्माण करतात ते मूल्य निर्माण करतीलच असे नाही किंवा जे श्रम मूल्य निर्माण करतात ते वरकड-मूल्य निर्माण करतीलच असे नाही. या तीनही अर्थांची ही सांगड मार्क्सच्या मूल्यसिद्धांतांमध्ये महत्त्वाची आहे आणि या उतरंडीचा संबंध क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या विकासाबरोबरच निर्माण होत जाणाऱ्या

नवनव्या बंधनांशी असतो. क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्या विकासाबरोबर त्यातील निम्नभांडवली संबंधांमुळे उपयोग-मूल्याच्या निर्मितीच्या क्षमतेबरोबरच मूल्यनिर्मितीची क्षमताही महत्त्वाची बनते. त्या आधारावर भांडवली संबंध बांधले गेले की मूल्यनिर्मितीबरोबरच वरकड-मूल्याच्या निर्मितीची क्षमता महत्त्वाची बनते. या संबंधांची उतरंड ही उत्पादकतेच्या निरनिराळ्या अर्थाच्या उतरंडीच्या मुळाशी असते.

मार्क्सच्या अनुत्पादक आणि उत्पादक श्रम या संकल्पनांचा प्रमुख वापर हा त्याच्या 'थिअरीज ऑफ सरप्लस व्हॅल्यू' च्या तीन खंडांमध्ये आढळतो. तिथे तो वेगवेगळ्या कालखंडातील प्रमुख भांडवली अर्थशास्त्रज्ञांची किंवा प्रवाहांची त्यांच्या वैशिष्ट्यावर भर देऊन समीक्षा करत होता. त्यामुळे प्रतिस्पर्ध्याच्या नजरेतून वरील तीनही अर्थाची सांगड जिथे सुटते तिथे तो भर देताना आढळतो. हे नजरेआड करून जर त्याचे वेगवेगळे लिखाण तपासले तर मात्र त्याच्या मनात या तीन अर्थांबद्दल नि:संदिग्धता नव्हती असे वाटू लागते किंवा यापैकी कोणत्याही एका अर्थाला चिकटून इतर अर्थ पूर्णपणे बाद ठरवले जाऊ शकतात.

[२] यातील आकडे सन्निकट (ॲप्रॉक्झिमेट) आहेत. अचूक उत्तरासाठी पहा परिशिष्ट ३.

[३] मार्क्सच्या दृष्टीने भौतिक उपयोग-मूल्याच्या निर्मितीबाहेर घडणाऱ्या आवश्यक श्रमांना महत्त्वच नव्हते असे नव्हे किंवा त्याने ते विचारातच घेतले नव्हते असे नव्हे. तो दाखवतो ते इतकेच की आवश्यक असणे वेगळे आणि त्यातून भौतिक उपयोग-मूल्ये निर्माण होणे वेगळे. उदाहरणार्थ समाजवादी समाजामध्येही भौतिक उपयोग-मूल्याच्या निर्मितीबाहेरचे असे श्रम आवश्यक असतील. पण ते स्पष्टपणे एक आवश्यक परंतु अनुत्पादक खर्च म्हणून जमेस धरले जातील. भांडवलशाहीत मात्र त्याचे वाटप हे वरकड-मूल्याच्या वाटपामार्फत होताना असे होत नाही. व्यापारी भांडवलालादेखील नफा होतो. यातून त्यांच्या कर्मचाऱ्यांनी खर्च केलेली श्रमशक्ती व त्यामार्फत खर्च होणारी श्रमसामुग्री ही आवश्यक व उत्पादक असे दुहेरी फसवे रूप घेते. प्रत्यक्षात सामाजिक संपत्तीचा खर्च हा उत्पन्नाचे रूप घेतो.

[४] प्रत्यक्षात वित्त-भांडवलदार त्यांच्याकडील ठेवींवर व पैशांवर व्याज देत असतात. त्याचा एक वेगळा दर असतो व वित्त-भांडवलदार जी कर्जे देतात त्याचा एक वेगळा त्यापेक्षा जास्त दर असतो. आपल्या प्राथमिक गणितामध्ये वित्तभांडवलदाराकडील ठेवीवर त्यांनी दिलेले व्याज हे लक्षात घेतलेले नाही. ते लक्षात घेण्याने गणिताची पद्धती बदलत नाही.

[५] यातील आकडे सन्निकट आहेत. अचूक उत्तराच्या पद्धतीसाठी पहा परिशिष्ट ३.

२०. नफ्याचा दर घसरण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती

१. नफ्याचा दर घसरण्याच्या प्रवृत्तीचे स्थान

मार्क्सचा सर्वात वादग्रस्त निष्कर्ष

भांडवलशाहीमध्ये नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते हा मार्क्सचा निष्कर्ष त्याच्या भांडवलशाहीबद्दलच्या विश्लेषणातील सर्वांत वादग्रस्त निष्कर्ष आहे. पुस्तकाच्या या शेवटच्या प्रकरणामध्ये आपण याच वादग्रस्त निष्कर्षाचा विचार करणार अहोत. भांडवली टीकाकारांना तर हा निष्कर्ष अमान्य असतोच. परंतु मार्क्सची मूल्य-किंमत रूपांतराची सैद्धांतिक बैठक मान्य करणारे काही मार्क्सचे समर्थकदेखील, सर्वसाधारण नफ्याचा दर कमी होण्याची ही प्रवृत्ती मान्य करीत नाहीत. यावरून या निष्कर्षाच्या वादग्रस्ततेची कल्पना येऊ शकते.

मार्क्सचा हा निष्कर्ष वादग्रस्त बनावा यात नवल नाही. आपण अगोदरच पाहिले आहे की भांडवलशाहीमध्ये सर्व व्यवहार किंमत या मूल्यसंबंधाच्या रूपामार्फत व्यक्त होणाऱ्या आकड्यांच्या माध्यमातून चालतात. यांपैकी भांडवलदारांना सर्वात निर्णायकपणे महत्त्वाचा वाटणारा आकडा नफ्याच्या दराचा असतो. भांडवलसंचयाचे निर्णय या दराच्या माध्यमातून घेतले जात असतात. नफ्याचा दर वाढत असताना भांडवल-संचय सहज होतो, तो उतरू

लागला की मंदावतो. तेजीमंदीशी नफ्याचा दर जोडलेला असतो. नफ्याचा दर कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती मान्य करणे म्हणजे एका अर्थाने मंदीची, मंदीच्या काळाच्या अपरिहार्यतेची प्रवृत्ती मान्य करणे असते. म्हणजेच भांडवलशाही सुस्थितीत चालू न शकण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती मान्य करणे असते. आणि साहजिकच हा निष्कर्ष वादग्रस्त ठरतो.

या निष्कर्षाभोवती जो वाद चालतो त्याचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत. वादाचा पहिला मुद्दा या निष्कर्षाच्या सिद्धतेबद्दलचा आहे. मार्क्सने मांडलेल्या संकल्पनांच्या आधारावर जे गणित मांडता येते त्यातून हा निष्कर्ष एक सर्वसाधारण प्रवृत्तीच्या स्वरूपात सिद्ध करता येतो की नाही हा एक महत्त्वाचा मुद्दा बनतो. वादाचा दुसरा मुद्दा हा या निष्कर्षाचे मार्क्सच्या विश्लेषणाच्या क्रांतिकारक बैठकीमध्ये कोणते स्थान आहे याबद्दलचा आहे. काही जणांच्या मते हा निष्कर्ष मानला किंवा न मानला तरी मार्क्सच्या क्रांतिकारक दृष्टिकोनाला काही बाधा येत नाही, तर काहींच्या मते हा निष्कर्ष अंतर्भूत झाल्यावरच मार्क्सचे भांडवलशाहीचे क्रांतिकारक विश्लेषण परिपूर्ण रूपात उभे राहते. आपल्याला या दोन्ही प्रश्नांबद्दल विचार करायचा आहे.

मार्क्सच्या सिद्धतेतील उणीव

नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीबद्दलची मार्क्सची मांडणी कॅपिटलच्या तिसऱ्या खंडाच्या काही प्रकरणांमध्ये समाविष्ट आहे. मार्क्स या भागातील सर्व गणित हे सरळसरळ (डायरेक्टली) मूल्याच्या भाषेत करतो. अर्थात, आपण पूर्वीच्या प्रकरणांमध्ये हे सिद्ध केले होते की मूल्य-किंमत रूपांतरामुळे मूल्यसंबंधांची दिशा बदलत नाही, किंवा मूल्याच्या भाषेत मोजलेला सर्वसाधारण नफ्याचा दर ज्याप्रमाणे कमी जास्त होतो त्याप्रमाणे किंमतीत व्यक्त होणारा सर्वसाधारण नफ्याचा दरदेखील कमी जास्त होत असतो. त्यामुळे मूल्याच्या भाषेमधील सर्वसाधारण नफ्याचा दर उतरतो हे सिद्ध करणे पुरेसे असते.

मार्क्स नफ्याच्या दराची (म्हणजेच यापुढे मूल्याच्या भाषेतील सर्वसाधारण नफ्याच्या दराची) फोड खालीलप्रमाणे करतो.

नफ्याचा दर = वरकड-मूल्य/गुंतवलेले भांडवल

= वरकड-मूल्य/(कायम भांडवलामध्ये गुंतलेले भांडवल + बदलते भांडवल)

= (वरकड-मूल्य/बदलते भांडवल)/
((कायम भांडवलामध्ये गुंतलेले भांडवल / बदलते भांडवल)+१)
= वरकड-मूल्याचा दर/(गुंतवलेल्या भांडवलाचे आंगिक प्रमाण + १)

आता मात्र तो, वरकड-मूल्याचा दर ज्या वेगाने वाढतो त्यापेक्षा जास्त वेगाने गुंतवलेल्या भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढते असे गृहीत धरूनच पुढे जातो. अन् त्या ठिकाणी असे गृहीत का धरावे याची कारणे उद्‌धृत करत नाही. किंवा इतरत्रही गृहीत धरलेली ही बाब त्याने साधार सिद्ध केलेली सापडत नाही. ही बाब गृहीत धरणे म्हणजे एका अर्थाने जे सिद्ध करायचे तेच गृहीत धरण्यासारखे असते! मार्क्सच्या विरोधकांनी नेमकी हीच मांडणी आपले लक्ष्य बनवले आहे व या चक्राकार गृहीतामुळे मार्क्सचा निष्कर्ष खोडून काढला आहे.

या वरील गृहीताची (गुंतवलेल्या भांडवलाचे आंगिक प्रमाण हे सर्वसाधारणपणे वरकड-मूल्याच्या दरापेक्षा जास्त वेगाने वाढते) सरळसरळ सिद्धता मार्क्समध्ये नाही हे या विरोधकांचे म्हणणे खरे आहे. पण वरकड-मूल्याचा दर, आंगिक प्रमाण, कायम भांडवलातील श्रमविषय व श्रमभांडवलाचे खर्ची मूल्य, स्थिर भांडवल व खेळते भांडवल, सापेक्ष वरकड-मूल्य, नफ्याचा दर ठरवणारे घटक—अशा घटकांमध्ये उत्पादकतावाढीबरोबर कसकसे बदल होतात याबद्दल मार्क्सने या गृहीताला आधारभूत ठरेल अशी सविस्तर चर्चा ठिकठिकाणी केलेली आहे. त्या चर्चेच्या आधारावर, भांडवलशाहीच्या विकासामध्ये होणाऱ्या सर्वसाधारण उत्पादकता वाढीपासून सुरुवात करून, या निरनिराळ्या घटकांवर काय परिणाम होतो हे काटेकोरपणे तपासून नफ्याचा दर कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती गणिताद्वारे सिद्ध करणे शक्य आहे. मार्क्सच्या समर्थकांनी मार्क्सच्या मूळ गणितात थोडीफार सुधारणा करून ही सिद्धता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सर्वसाधारण उत्पादकतावाढ ही सुरुवात धरून, एकक उत्पादनामागचे निरनिराळे घटक कसे बदलतात हे पद्धतशीरपणे व काटेकोरपणे तपासून निष्कर्ष काढण्याचे काम केले गेलेले नाही. ते आपण या प्रकरणात पुढे करणार अहोत.

२. मार्क्सच्या या निष्कर्षाचे महत्त्व

मार्क्सच्या या वादग्रस्त निष्कर्षाच्या सिद्धतेच्या गणिती पसाऱ्यात शिरण्याअगोदर या सिद्धतेच्या प्रश्नाला का व कोणते महत्त्व आहे याची जाणीव असणे आवश्यक आहे. वरवर पाहता असे वाटेल की मार्क्सचा हा निष्कर्ष

सिद्ध झाला नाही तरी मार्क्सच्या क्रांतिकारक निष्कर्षांना कुठलीच बाधा येत नाही! अन् असे असेल तर या सिद्धतेवर इतके लक्ष मुळात केंद्रित कशाला करायचे, सिद्धतेच्या गणिती पसाऱ्यात शिरायची गरजच काय असे प्रश्न तयार होतात.

प्रथमदर्शनी या मांडणीत बरेच तथ्य वाटते. वरील निष्कर्षामुळे ज्या निष्कर्षांना धक्का पोचत नाही त्यांची जंत्रीच पहा ना. भांडवली व्यवस्था ही क्रयवस्तूंच्या नियमाचा भंग न करता होणाऱ्या कामगारवर्गाच्या शोषणावरच उभी असते; तिचा विकास म्हणजे कामगारवर्गाच्या शोषणाचा विकास असतो; तिच्या पूर्वअटी म्हणजे कामगारवर्गाच्या शोषणाच्या पूर्वअटी असतात, या सर्व अटी मार्क्सने सिद्ध केलेल्या असतात. भांडवली व्यवस्थाच कामगारवर्गाला भांडवली चौकटीमधले स्वत:चे हितसंबंध जपताजपता संघटित व्हायला भाग पाडत असते; स्वत:च्या मालकीच्या श्रमशक्तीला क्रयवस्तूंचे साधे नियम लागू करून घेताना देखील ते स्वत:सकट सर्वांना लागू होणाऱ्या किमान सर्वसाधारण मानवी अधिकारांच्या रूपातच कामगारवर्गाला लागू करून घ्यावे लागतात; त्यामुळे कामगारवर्गाच्या लढ्याचा सर्वांगीण विकास कामगारवर्गाला वेळोवेळी भांडवली व्यवस्थेच्या चौकटीपलिकडे पोचणाऱ्या सर्वसाधारण मानवी अधिकारांच्या प्रश्नाकडे घेऊन जात असतो. याही सर्व गोष्टी मार्क्सच्या मांडणीत अध्याहृत असतात. थोडक्यात, भांडवली व्यवस्थाच कामगारवर्गाला संघटित व्हायला भाग पाडून त्याला वारंवार भांडवलशाही चौकट ओलांडणाऱ्या प्रश्नांकडे घेऊन जाते या निष्कर्षाचा सैद्धांतिक आधार मार्क्सने तयार केलेला असतो.

शिवाय, भांडवलशाहीमध्ये वाढणाऱ्या उत्पादनक्षमता म्हणजे खुद्द कामगारांच्याच सामूहिक श्रमांच्या विकासाच्या क्षमता असतात हेदेखील त्याने दाखवलेले असते. तेव्हा भांडवलशाही व्यवस्थेचा उच्छेद केल्यावर पुढील समाजाला पायाभूत ठरणाऱ्या क्षमता या खुद्द कामगारवर्गात सामावलेल्या असतात, पुढील व्यवस्थेच्या उत्पादनाचा गाडा हाकण्याची क्षमतादेखील भांडवली व्यवस्थेनेच कामगार वर्गामध्ये निर्माण केलेली असते.

तेव्हा भांडवलशाहीमधले शोषण, त्यामुळे भांडवलशाहीचा उच्छेद करण्यात हितसंबंध गुंतलेली शक्ती, तिचे संघटन, तिला वारंवार व्यवस्थेची चौकट ओलांडणाऱ्या प्रश्नांना भिडावे लागणे व तिची पुढील समाजाच्या उत्पादनाचा पाया बनण्याची श्रमता या सर्व गोष्टी मार्क्सने भांडवलशाहीच्या विश्लेषणातून

सिद्ध केलेल्या असतात. भांडवलशाहीविरोधी कामगारवर्गीय क्रांतीचे वरील सर्व आधार भांडवली व्यवस्था स्वत:च तयार करत असते हे मार्क्सने दाखवलेले असते. आणि या सर्व निष्कर्षांमध्ये कुठेही नफ्याचा दर कमी होण्याच्या प्रवृत्तीचा आधार घ्यावा लागत नाही!

या निष्कर्षांशिवाय मार्क्स इच्छावादी बनतो!

भांडवलशाहीविरोधी कामगारवर्गीय क्रांतीच्या वरील सर्व घटकांशिवाय एक महत्त्वाचा घटक मात्र वरील जंत्रीमध्ये समाविष्ट नाही. या घटकाची सर्वात सरळ व स्पष्ट मांडणी आपल्याला लेनिनच्या लिखाणात आढळते. शोषित वर्गांना पूर्वीच्या अवस्थेत जगणे अशक्य होणे, त्यांनी कमरा बांधून त्या व्यवस्थेच्या विरोधात रस्त्यावर येणे, यासारख्या घटकांबरोबरच क्रांतीकारक परिस्थितीचे आणखीही एक महत्त्वाचे लक्षण लेनिन मांडतो. राज्यकर्त्यांना आणि शोषक वर्गांना पूर्वीप्रमाणे राज्य हाकणे, व्यवस्था चालवणे अशक्य होते हा देखील क्रांतिकारक परिस्थितीच्या घटकांपैकी एक आवश्यक घटक असतो. इतर सर्व घटकांचा आधार भांडवलशाही व्यवस्था जशी तयार करते तसेच या आवश्यक घटकाचा आधारदेखील भांडवलशाही व्यवस्था तयार करते हे दाखवणे महत्त्वाचे असते. आणि नेमका हाच आधार आतापर्यंतच्या सैद्धांतिक निष्कर्षांमधून तयार झालेला नाही.

या अपरिहार्य घटकाचा आधार सैद्धांतिकरीत्या प्रस्थापित झाला नाही तर त्याचे परिणाम दूरगामी महत्त्वाचे ठरतात. जर भांडवली व्यवस्था तिच्या विकासाबरोबर तितकीच बलाढ्य होणार असेल, व्यवस्था चालवण्याची व राज्य करण्याची तिची क्षमता जर तिच्या विकासाबरोबर दिवसेंदिवस जास्त भक्कम व अभेद्य बनत असेल तर कामगारवर्गीय क्रांती कामगारवर्गाच्या केवळ इच्छेच्या व संघटनेच्या जोरावर कामगारवर्गाला पार पाडणे भाग पडते असा निष्कर्ष त्यात अभिप्रत असतो.

कामगारवर्गाचे संघटन, ताकद व उर्मी जितक्या जोमाने वाढतात तितक्याच जोमाने जर भांडवलशाहीचे सामर्थ्य वाढत असेल तर मार्क्स हा शेवटी एक इच्छावादी (व्हॉलंटरिस्ट), स्वप्नाळू (रोमँटिक) क्रांतिकारक ठरतो. परंतु मार्क्स हा स्वप्नाळू नाही; त्याची स्वप्ने जरूर आहेत पण ती व्यावहारिकतेच्या निकषावर उभी असलेली स्वप्ने आहेत, प्रत्यक्षात येऊ पाहणाऱ्या व्यावहारिक शक्यतांना तोंड फोडणारी स्वप्ने आहेत. आणि त्याच्या दृष्टीने क्रांतिकारक

परिस्थितीच्या या अपरिहार्य घटकाचा आधारदेखील भांडवलशाहीच्या विकासाच्या क्रमात तयार होणे महत्त्वाचे ठरते. भांडवली व्यवस्थेमध्ये भांडवली वर्गांना आणि राज्यकर्त्यांना पूर्वीप्रमाणे व्यवस्था चालवणे, राज्यकारभार हाकणे अशक्य होईल असे कालखंड येणे अपरिहार्य आहे हेही सैद्धांतिकदृष्ट्या प्रस्थापित होणे महत्त्वाचे ठरते. तेव्हाच कामगारवर्गीय क्रांती ही एक व्यावहारिक कृती म्हणून, प्रत्यक्षात येऊ पाहणाऱ्या शक्यतांना तोंड फोडणारी कृती म्हणून सिद्ध होऊ शकते. आणि इथे नफ्याचा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीला महत्त्व येते. स्वत:विरुद्ध होऊ घातलेल्या क्रांतीच्या सर्व पूर्वअटींचा आधार भांडवली व्यवस्था स्वत:च कशी तयार करते याचे मार्क्सचे विश्लेषण या प्रवृत्तीच्या सिद्धतेबरोबरच पूर्ण होऊ शकते. हे महत्त्व लक्षात घेऊनच आपण सिद्धतेकडे वळूया.[१]

३. सर्वसाधारण प्रवृत्तीची गणिताधारे सिद्धता

नफ्याचा दर ठरवणारे निरनिराळे घटक

आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती तपासताना आपण जी पद्धत वापरली होती त्याच प्रकारची पद्धत आपण नफ्याचा दर खालावण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीसाठी वापरणार अहोत. पुस्तकातील १७व्या प्रकरणामध्ये व परिशिष्ट ३ मध्ये दाखवल्याप्रमाणे इथे आपल्याला मूल्याच्या भाषेतील नफ्याचा दर खालावण्याची प्रवृत्ती सिद्ध केली तरी पुरेसे आहे. पूर्वीप्रमाणेच सर्वसाधारण उत्पादकता ‘उ’ या प्रमाणात वाढली आहे असे गृहीत धरून (पहा, परिशिष्ट १) नफ्याचा दर काढताना त्या दराची फोड करून त्या फोड केलेल्या रकमा तपासत आपल्याला पुढे जावे लागणार आहे.

नफ्याचा दर = वरकड–मूल्य/गुंतवलेले भांडवल

= (वरकड–मूल्य/बदलते भांडवल)/(गुंतवलेले भांडवल/बदलते भांडवल)

= (वरकड–मूल्याचा दर)/(गुंतवलेले भांडवल/बदलते भांडवल)

गुंतवलेले भांडवल

= श्रमविषयांमध्ये खर्च झालेले भांडवल + श्रमसाधनांमध्ये गुंतलेले भांडवल

+ अंगावर ठेवावे लागणारे भांडवल + बदलते भांडवल

आपण एकक उत्पादनामागे (युनिट प्रॉडक्शन) गुंतलेले भांडवल व बदलते भांडवल यांच्या राशींचा संदर्भ घेऊनच मागीलप्रमाणे गणित करूया. त्यासाठी आपण खालील चिन्हे वापरू.

एकक उत्पादनामागे खर्च झालेल्या श्रमविषयांचे मूल्य = वि

एकक उत्पादनामागे खर्च झालेल्या श्रमसाधनांचे मूल्य = सा

एकक उत्पादनामागे गुंतलेल्या श्रमसाधनांचे मूल्य = र

एकक उत्पादनामागे अंगावर ठेवावे लागणारे भांडवल = ठ

एकक उत्पादनामागे खर्च होणाऱ्या श्रमशक्तीचे मूल्य किंवा बदलते भांडवल = ब

श्रमशक्तीचे मूल्य = म

एकक उत्पादनामागे खर्च होणारी श्रमशक्ती = श्र

वरकड-मूल्याचा दर = द = (१ - म)/म

नफ्याचा दर = न

तेव्हा वरील चिन्हांचा वापर करून

न = द/((वि/ब)+(र/ब)+(ठ/ब)+१)

यातील प्रत्येक राशि ही सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर कशी बदलते ते आपण आता पाहत जाऊ.

१. वरकड-मूल्याचा दर (द)

द = (१-म)/म

परिशिष्ट १ मध्ये आपण अगोदरच पाहिले आहे की उत्पादकतावाढीचे सर्वसाधारण प्रमाण 'उ' असेल तर,

$म_२ = म_१/उ$

त्यावरून

$द_२ = (१-म_२)/म_२ = (१-(म_१/उ))/(म_१/उ)$

$= उ\ ((१-म_१)/म_१) + (म_१-(म_१/उ))/म_१$

$= उ\ (द_१ + १-१/उ)$

भांडवलशाहीच्या विकासाबरोबर द हा वाढत जात असल्यामुळे आपण $द_१$ च्या तुलनेत पुढील (१-१/उ) हा भाग दुर्लक्ष करू शकतो. व सर्वसाधारणपणे मांडू शकतो की,

$द_२ = उ \times द_१$ ...(१)

२) बदलते भांडवल (ब)

परिशिष्ट १ मध्ये दाखवले आहे की सर्वसाधारण उत्पादकतावाढ 'उ' असेल तर दर क्रयवस्तूमागचे बदलते भांडवल हे खालील समीकरणाप्रमाणे बदलते.

$ब_२ = ब_१ / (उ \times उ) = ब_१/उ^२$ ... (२)

३) कच्च्या मालात गुंतलेले भांडवल (वि)

कच्चा माल हा खेळत्या भांडवलाचा भाग असल्यामुळे गुंतलेले भांडवल हे खर्च झालेल्या मूल्याइतकेच (वि) असेल. परिशिष्ट १ मध्ये दाखवले आहे की सर्वसाधारण उत्पादकता वाढ 'उ' असेल तर क्रयवस्तूमागचे श्रमविषयांचे खर्च झालेले भांडवल हे खालील समीकरणाप्रमाणे बदलते.

$वि_२ = वि_१/उ$

आणि त्यामुळे

$(वि_२/ब_२) = (वि_१/उ)/(ब_१/उ^२) = उ\ (वि_१/ब_१)$ ...(३)

४) श्रमसाधनांमध्ये गुंतलेले भांडवल (र)

परिशिष्ट १ मध्ये आपण सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर दर क्रयवस्तूमागचे खर्च झालेल्या श्रमसाधनांचे मूल्य पाहत होतो. श्रमसाधनांच्या बाबतीत स्थिर भांडवलाच्या विशिष्ट संबंधांमुळे खर्च झालेल्या व गुंतलेल्या भांडवलात जी तफावत असते तिच्यामुळे आपण त्या निष्कर्षांचा उपयोग करू शकणार नाही. परंतु याबाबत आपण १८व्या प्रकरणामध्ये काही निष्कर्ष काढलेले होते. तिथे आपण असे पाहिले होते की यंत्राधिष्ठित भांडवलशाहीच्या विकासाबरोबर स्थिर भांडवलाला जास्त महत्त्व येत जाते व त्याचे श्रमप्रक्रियेच्या घटकांमार्फत गुंतलेल्या खेळत्या भांडवलाच्या तुलनेत प्रमाण वाढत जाते. खेळते भांडवल हे 'ख' या चिन्हाने दाखवले तर,

$र_२/ख_२ > र_१/ख_१$

किंवा $र_२/र_१ > ख_२/ख_१ = (वि_२ + ब_२)/(वि_१ + ब_१)$

$= (वि_१/उ + ब_१/उ^२)/(वि_१ + ब_१)$

$= ((वि_१/उ + ब_१/उ) — (ब_१/उ^२)\ (उ-१))\ /\ (वि_१ + ब_१)$

$= (१/उ\ )(१- (((उ-१)/उ)) \times (ब_१/(वि_१ + ब_१)))$

सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर बदलत्या भांडवलाच्या तुलनेत श्रमविषयांचे खर्च होणारे मूल्य कसे वाढत जाते हे आपण परिशिष्ट १ मध्ये दाखवलेच आहे. सुरुवातीची उत्पादकता त्यामुळे जर पुरेशी आहे असे गृहीत धरले, किंवा भांडवली विकास पुरेसा झालेला आहे असे धरले तर

$१ >> ((उ-१)/उ) \times (ब_१/वि_१+ब_१)$

आणि त्यावरुन

$र_२/र_१ > १/उ$

किंवा $र_२= क्ष/(उ \times र_१)$ आणि $क्ष > १$

$र_२/ब_२=(क्ष/उ)र_१/(ब_१/उ^२)$

$= उ \times क्ष (र_१/ब_१)$ ... (४)

५) अंगावर ठेवावे लागणारे भांडवल (ठ)

याही बाबतीत आपण काही सर्वसाधारण निष्कर्ष काढू शकतो. जसजशी उत्पादनाची व्याप्ती व उत्पादनाचा आकारमान (स्केल) वाढत जाते तसतसे हे निरनिराळ्या स्वरूपामध्ये अंगावर ठेवावे लागणारे भांडवल वाढत जाते. जितकी श्रमसाधनांची, त्यांच्या सुट्या भागांची, श्रमविषयांची विविधता वाढते आणि एकाचवेळी घडणाऱ्या विविध व्यवहारांची संख्या व व्याप्ती वाढते तितके त्याचे महत्त्व वाढते. श्रमविषयांच्या आणि श्रमसाधनांच्या दोन्हींच्या व्याप्ती व स्तराप्रमाणे ते वाढत असते. त्यामुळे असे म्हणता येईल की खेळत्या भांडवलाच्या तुलनेत याचेही प्रमाण वाढणे आवश्यक असते. तेव्हा या घटकाबद्दलही असेच म्हणता येईल की,

$ठ_२/ख_२ > ठ_१/ख_१$

म्हणून $ठ_२/ठ_१ > ख_२/ख_१$

स्थिर भांडवलाकरता जसे केले होते त्याच पद्धतीने याची फोड करून शेवटी खालील समीकरण मांडता येते.

$ठ_२/ब_२ = (य/उ) \times ठ_१ / (ब_१/उ^२)$ ...($य > १$)

$= उ \times य (ठ_१/ब_१)$ ... (५)

नफ्याचा दर घसरण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती

समीकरण १ ते ५ मध्ये अंतर्भूत असलेले निरनिराळ्या घटकात होणारे बदल निश्चित झाले की त्यावरून नफ्याच्या दरात होणारा बदल आपण ती समीकरणे वापरून खालीलप्रमाणे काढू शकतो.

$न_१ = द_१ /(वि_१/ब_१ + र_१/ब_१ + ठ_१/ब_१ + १)$

$न_२ = द_२ /(वि_२/ब_२ + र_२/ब_२ + ठ_२/ब_२ + १)$

$= उ \times द_{१} /$

$(उ (वि_{१}/ब_{१}) + उ \times क्ष (र_{१}/ब_{१}) + उ \times य (ठ_{१}/ब_{१}) + १)$

$न२/न१ = ((वि_{१}/ब_{१}) + (र_{१}/ब_{१}) + (ठ_{१}/ब_{१}) + १)$

$/((वि_{१}/ब_{१}) + क्ष (र_{१}/ब_{१}) + य (ठ_{१}/ब_{१}) + १/उ)$ ...(६)

सर्वसाधारण उत्पादकता वाढ 'उ' ही वाढती असली तरी $र_{१}/ब_{१}$ व $ठ_{१}/ब_{१}$ या दोन्ही संख्या एकापेक्षा बऱ्याच मोठ्या असल्यामुळे व 'क्ष' आणि 'य' या दोन्ही संख्या एकापेक्षा जास्ती असल्यामुळे समीकरणामधील उजव्या बाजूच्या रकमेमध्ये भाज्यापेक्षा भाजक मोठा ठरतो व उजवीकडील संख्या ही एकापेक्षा लहान ठरते. आणि त्यामुळे

$न_{२}/न_{१} < १$

किंवा $न_{२} < न_{१}$ ... (७)

थोडक्यात, भांडवलशाहीमध्ये नफ्याचा दर कमी होण्याची एक सर्वसाधारण प्रवृत्ती यातून सिद्ध होते. मार्क्सच्या मांडणीपेक्षा ही मांडणी वेगळी आहे, परंतु त्यातील प्रत्येक दुवा हा मार्क्सने निरनिराळ्या ठिकाणी प्रस्थापित केलेल्या निष्कर्षांवरच आधारला आहे. अर्थात यासाठी ज्या सर्वसाधारण गोष्टी गृहीत धरल्या आहेत त्या आवश्यक असतात. विशिष्ट कालखंडापुरती विशिष्ट परिस्थिती असेल तर यातील घटकांच्या वेगवेगळ्या रचनेमुळे इतर विशिष्ट प्रवृत्तीही निर्माण होतात. त्या प्रवृत्ती सर्वसाधारण प्रवृत्ती नाहीत, काही काळानंतर त्यांची सर्वसाधारण प्रवृत्तीला विरोध करण्याची क्षमता कमी होते हेही दाखवणे आवश्यक आहे. सर्वसाधारण प्रवृत्तीच्या सिद्धतेबरोबरच तिला विरोध करणाऱ्या प्रवृत्ती या विशिष्ट स्वरूपाच्या प्रवृत्ती आहेत हे दाखवणेदेखील आपली पुढची जबाबदारी ठरते.

४. विरोधी प्रवृत्ती व त्यांचे विशिष्ट स्वरूप

वरील सर्वसाधारण प्रवृत्ती ही सर्वसाधारण उत्पादकतावाढीशी निगडित असते. त्याचवेळी, या उत्पादकतावाढीचे विशिष्ट स्वरूप, निरनिराळ्या क्षेत्रातील वेगवेगळ्या उत्पादकतावाढीचे संतुलन आणि कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांच्यातील संघर्षामधील त्यांच्या शक्तींचे संतुलन यामुळे त्याला पुष्टीही मिळत असते किंवा विरोधही होत असतो. थोडक्यात, उत्पादकतावाढीच्या सर्वसाधारण स्वरूपाबरोबरच तिची निरनिराळी विभागणी व वैशिष्ट्ये ही नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्याची प्रवृत्ती तीव्र तरी करू शकतात किंवा

तिला बांध घालून प्रसंगी उलटवूदेखील शकतात. आपण पुढील भागात मुख्यत: नफ्याचा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीला विरोध करणाऱ्या प्रवृत्तींसंबंधी विचार करू.

श्रमसामुग्रीच्या क्षेत्रात जास्त वेगाने उत्पादकतावाढ

एखाद्या कालखंडामध्ये जर श्रमविषयाच्या किंवा श्रमसाधनांच्या उत्पादनामध्ये सर्वसाधरण उत्पादकतावाढीच्या वेगापेक्षा जास्त वेगाने उत्पादकता वाढत असली तर सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता कमी करणारी विरोधी प्रवृत्ती तयार होते. (याउलट जर या क्षेत्रातील वाढीचा वेग सर्वसाधारण वाढीच्या वेगापेक्षा कमी असेल तर अर्थातच सर्वसाधारण प्रवृत्तीला पुष्टी मिळून ती आणखी तीव्र होते.) श्रमशक्तीचे मूल्य ठरवणाऱ्या क्रयवस्तूंच्यापेक्षा श्रमसामुग्रीचे मूल्य जास्त झपाट्याने कमी होत असल्यामुळे हे शक्य होते. उत्पादनवाढीच्या वेगातील ही तफावत एखाद्या कालखंडातील परिस्थितीमध्ये सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता किती कमी होईल ते ठरवत असते. अन् ही तफावत पुरेशी मोठी असली तर नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्याऐवजी वाढूदेखील शकतो.

परंतु या विरोधी प्रवृत्तीचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. एका उत्पादन-चक्रामध्ये जास्त झपाट्याने वाढणाऱ्या उत्पादकतेमधून जी श्रमसामुग्री निर्माण होते तिचा वापर पुढील उत्पादन-चक्रामध्ये इतर क्रयवस्तू निर्माण करण्यासाठी होतो. त्यामुळे सर्वसाधारण उत्पादकतावाढ पुढील चक्रात जास्त झपाट्याने होते. त्यामुळे सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी त्यापुढील चक्रात आवश्यक ठरणारी तफावतदेखील वाढते. थोडक्यात, ही विरोधी प्रवृत्ती अस्तित्वात आली की पुढील चक्रात ती स्वत:चा परिणाम आणखी क्षीण करत जाते. जोपर्यंत ही वाढती तफावत टिकवून धरता येते तोपर्यंत एखाददोन दशकेदेखील सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता ती कमी करू शकते. परंतु कालांतराने आवश्यक तफावत इतकी मोठी होते की तिची विरोधी शक्ती क्षीण पडते.

निम-भांडवली क्षेत्राचा समावेश

सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता कमी करणारी दुसरीही एक विरोधी प्रवृत्ती महत्त्वाची आहे. ही प्रवृत्ती निम-भांडवली किंवा बिगर-भांडवली उत्पादनाच्या एखाद्या क्षेत्राचा भांडवली उत्पादनक्षेत्रात समावेश होण्यामधून जन्म घेते. अशा भांडवली उत्पादनात नव्याने खेचल्या गेलेल्या क्षेत्रांमध्ये गुंतवलेल्या व खर्च

झालेल्या दोन्ही प्रकारच्या भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी प्रमाण तुलनेने बरेच कमी असते. याच्या परिणामी सामाजिक पातळीवर गुंतवलेल्या भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी सरासरी प्रमाण उतरते. किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर या क्षेत्रामध्ये सामाजिक पातळीवर निर्मित वरकड-मूल्य व त्यासाठी गुंतवलेले भांडवल-मूल्य यांचे प्रमाण इतर क्षेत्रांपेक्षा जास्त असते, त्यामुळे गुंतवलेल्या भांडवल-मूल्यात ज्या प्रमाणात वाढ होते त्यापेक्षा जास्त प्रमाणात वाटपासाठी उपलब्ध होणारे वरकड-मूल्य वाढते व नफ्याचा दर कमी होण्याची तीव्रता कमी होते.

पण याही विरोधी प्रवृत्तीचे वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. एखाद्या क्षेत्रासाठी हा मार्ग एकदाच वापरता येतो. एकदा हे क्षेत्र भांडवली उत्पादनाचा भाग बनले की त्यानंतर मात्र नव्याने ठरलेल्या नफ्याच्या दराच्या पातळीवर ते परिणाम करू शकत नाही. सर्वसाधारण प्रवृत्तीचा नियम याही क्षेत्राला लागू होतो. थोडक्यात, कुठल्याही क्षेत्रासाठी फक्त एकदाच या मार्गातून नफ्याचा दर वाढवण्याची संधी असते!

५. सर्वसाधारण प्रवृत्ती व आधुनिक भांडवली धोरणे

वरील सर्व विश्लेषणामध्ये आपल्याला 'सर्वसाधारण नफ्याचा दर' म्हणजे सामाजिक पातळीवरील एकूण नफा व एकूण गुंतलेले भांडवल यातले प्रमाण अभिप्रेत आहे. हा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीबद्दल किंवा त्याविरोधी प्रवृत्तीबद्दल आपण जे निष्कर्ष काढले ते या सामाजिक पातळीवरील दराला लागू होतात. भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेनंतर निरनिराळ्या विभागांसाठी निरनिराळा सर्वसाधारण दर तयार होतो. इतर विभागांचा व एकंदर सर्वसाधारण दर खालावत असूनही प्रभुत्वस्थानी असणाऱ्या विभागांचा नफ्याचा दर वाढता असू शकतो. मार्क्सच्या मृत्यूनंतरच्या काळात अशाही मार्गांचा वापर महत्त्वाचा ठरू लागलेला आहे. त्यांच्या पूर्ण तपशिलात गेले नाही तरी एखाद्या महत्त्वाच्या उदाहरणामार्फत हे कसे घडते याची नोंद घेणे व त्यांच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण सतत चर्चिल्या जाणाऱ्या सरकारी उर्फ तथाकथित 'सार्वजनिक' क्षेत्र व खाजगी क्षेत्र या विभागणीचा विचार करू.

सरकारी क्षेत्र, सार्वजनिक हित, आणि सर्वसाधारण प्रवृत्ती

सरकारी क्षेत्र किंवा राष्ट्रीकृत उद्योग हे राष्ट्रीय किंवा सार्वजनिक हितासाठी ना नफा ना तोटा तत्त्वावर चालवले जाणारे क्षेत्र समजले जाते. सार्वजनिक हितासाठी ते अनेकदा तोटाही सहन करताना दिसते. परंतु आपण इतकेच गृहीत धरूया की हे सरकारी क्षेत्र सर्वसाधारण नफ्याच्या दरापेक्षा कमी नफा घेणारे क्षेत्र आहे.(तोटा किंवा शून्य नफा दोन्हीचा यात समावेश होतो.) त्यातून कुणाचे व कसे हित साधले जात असते ते आपण पाहूया.

उदाहरणादाखल असे धरा की एकूण १० लाख श्रमतास भांडवल गुंतवणुकीपैकी ६ लाख श्रमतास हे श्रमसामुग्रीमध्ये गुंतवलेले आहेत व ४ लाख श्रमतास हे बदलते भांडवल आहे. वरकड-मूल्याचा दर ५० टक्के आहे असे धरले तर त्यातून २ लाख श्रमतास वरकड-मूल्य मिळते. सर्वसाधारण नफ्याचा दर हा त्यानुसार (२/१०) × १०० = २० टक्के निर्णीत होईल.

आता असे समजू की मगाचच्या भांडवलापैकी अर्धे भांडवल हे सरकारी क्षेत्रात मोडते आहे व सार्वजनिक हितासाठी त्याने फक्त १०% नफा घ्यायचे ठरवले आहे. लक्षात घ्या, की इथे ते कोणती क्रयवस्तू विकत आहे याच्याशी काही कर्तव्य नाही. ते लोखंडासारखी श्रमसामुग्री विकत असेल किंवा कपड्यांसारखी गरजेची गोष्ट विकत असेल किंवा एखादी चैनीची गोष्ट विकत असेल. वाटपासाठी उपलब्ध असलेल्या २ लाख श्रमतास वरकड-मूल्यापैकी भांडवलाच्या प्रमाणात ५ × १० / १०० = ०.५ लाख श्रमतास वरकड-मूल्य त्या क्षेत्राच्या वाट्याला येईल. उरलेले १.५ लाख श्रमतास वरकड-मूल्य हे खाजगी क्षेत्राच्या वाट्याला येईल व त्याच्या भांडवलावर वाटले जाऊन त्याचा नफ्याचा दर ठरेल. त्याच्या नफ्याचा दर (१.५ / ५) × १०० = ३० टक्के होईल.

थोडक्यात, सरकारी क्षेत्राच्या अस्तित्वामुळे व त्याच्या 'सार्वजनिक हिताच्या' काळजीमुळे खाजगी क्षेत्राच्या नफ्याचा सर्वसाधारण दर २० टक्क्यांवरून ३० टक्क्यांवर गेलेला दिसतो. तेव्हा सरकारी क्षेत्रासारख्या क्षेत्राच्या निर्मितीचा पहिला परिणाम म्हणजे नफ्याच्या सामाजिक पातळीवरील दरापेक्षा खाजगी क्षेत्राचा म्हणून व्यक्त होणारा दर वाढतो. साहजिकच सर्वसाधारण दर कमी होण्यामुळे खालावणाऱ्या नफ्याच्या दराला सरकारी क्षेत्राच्या निर्मितीने टेकू

दिला जातो. भांडवली व्यवस्थेच्या चौकटीमध्ये जोपर्यंत राष्ट्रीयीकरण होते, आणि जेव्हा 'सार्वजनिक' हिताच्या नावाखाली हे सरकारी क्षेत्र वरकड-मूल्याचा भाग नाकारते तेव्हा नाकारलेल्या वरकड-मूल्याचा एक कणदेखील भांडवलदारवर्गाबाहेर झिरपत नाही, भांडवलदारवर्गाच्या सार्वजनिक हिताचेच त्यातून संरक्षण होत असते.

सरकारी क्षेत्राच्या विरोध करण्याच्या मर्यादा

खाजगी क्षेत्राचा म्हणून व्यक्त होणारा हा सर्वसाधारण नफ्याचा दर वाढवून घेण्याच्या या विरोधी प्रवृत्तीलाही मर्यादा असतात. एकतर यासाठी खाजगी भांडवलदारांना एका क्षेत्रावरचा ताबा सरळसरळ गमवावा लागतो. शासकीय भांडवलशाहीची अनिर्बंध वाढ त्यांना सहन होण्यासारखी नसते. स्वत:च्या कमकुवतपणाच्या जाणिवेमधून, आपद्धर्म म्हणून खाजगी भांडवलदार हा मार्ग वापरतात. दुसरे म्हणजे एखाद्या क्षेत्रासाठी हा मार्ग वापरला की तो पुन्हा वापरता येत नाही. आणि तिसरे, एकूण भांडवली शासन हादेखील एक मोठा उद्योगच असतो. त्यांच्या जमाखर्चाचा मेळही बसणे आवश्यक असते. उत्पन्नाच्या बाबी, करांचा बोजा आणि नोटाची छपाई यांचा खर्चाशी मेळ बसावा लागतो. शासकीय भांडवली क्षेत्राच्या वाढीबरोबर हा मेळ बसणेदेखील कठीण होत जाते.

परंतु या सर्वांपेक्षाही महत्त्वाची मर्यादा ही सर्वसाधारण प्रवृत्तीची असते. यापूर्वी विचार केलेल्या विरोधी प्रवृत्तीमुळे सामाजिक पातळीवर एकूण नफा व एकूण गुंतवलेले भांडवल यांच्यातील संबंधांवर सरळसरळ परिणाम होऊन सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता कमी होत होती. केवळ एखादे क्षेत्र सरकारी क्षेत्रात गेले व इतर मूल्यसंबंधामध्ये काही बदल झाला नाही तर सर्वसाधारण प्रवृत्तीची तीव्रता अजिबात कमी झालेली नसते. या तीव्रतेचा भार काही काळासाठी खाजगी क्षेत्रावर पडणार नाही याची सोय झालेली असते इतकेच. सर्वसाधारण दर कमी होतच असतो, फक्त नफ्याचे वाटप बदललेले असते. जोपर्यंत पूर्वी वर्णन केलेल्या विरोधी प्रवृत्ती प्रत्यक्षात काम करू लागत नाहीत तोपर्यंत सरकारी क्षेत्राचा मार्ग हा सर्वसाधारण प्रवृत्तीची झळ खाजगी क्षेत्राला लागण्याचा काळ लांबवतो इतकेच.

पुन्हा वरकड–मूल्याची निर्मिती व वाटप!

याचे कारणदेखील लक्षात घेण्याजोगे आहे. भांडवलशाहीमध्ये निरनिराळ्या विभागांचा नफ्याचा दर हा दोन प्रकारच्या गोष्टींवर अवलंबून असतो. मूल्यनिर्मितीशी संलग्न अशा वरकड–मूल्याच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या संबंधांवर व त्याचबरोबर निर्मित वरकड–मूल्याच्या निरनिराळ्या प्रकारच्या वाटपामध्ये गुंतलेल्या सबंधांवर. एखादे क्षेत्र सरकारी बनणे व त्यातून सर्वसाधारण दरापेक्षा त्या क्षेत्राने नफ्याचा कमी दर स्वीकारणे यातून वरकड–मूल्याच्या वाटपावर फक्त परिणाम होतो. नफा उंचावण्याच्या या प्रकारच्या मार्गामधून सामाजिक उत्पादनाच्या पातळीवर सर्वसाधारण प्रवृत्तीला मुळात खीळ बसलेलीच नसते; फक्त त्या प्रवृत्तीचा भार कुणी वाहायचा यात बदल झालेला असतो.

अर्थातच भांडवली विचारवंतांच्या दृष्टीने वरकड–मूल्याच्या निर्मितीतून काय किंवा वाटपातून काय—त्यांना महत्त्वाचा वाटेल असा नफ्याचा दर उंचावला की त्यांचे भागते. मार्क्सच्या मृत्यूनंतरच्या काळात व विशेषत: विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अरिष्टांवर मात करण्यासाठी त्यांनी जे नवनवे मार्ग शोधून काढले आहेत त्यामुळे वरकड–मूल्याच्या निर्मितीवर परिणाम होतो की वाटपावर याची त्यांना क्षिती नसते. आर्थिक 'नियोजन', सरकारी क्षेत्राची निर्मिती, अर्थ–भांडवलाचे नवनवे प्रकार—भांडवलशाहीच्या या नव्या दिशांमध्ये व धोरणांमध्ये वरकड–मूल्याच्या निर्मितीवर परिणाम होऊन सर्वसाधारण प्रवृत्तीला विरोध व्हावा असे कोणतेही परिणाम अपरिहार्यरीत्या निगडित नाहीत. मात्र वाटपावर परिणाम करून प्रभुत्वस्थानी असलेल्या विभागांऐवजी इतर भांडवली विभागांवर सर्वसाधारण प्रवृत्तीचा भार पडावा याची सोय ते मार्ग काही काळ करू शकतात.

अरिष्टाची चाहूल लागताच भांडवलशाहीमध्ये एकापाठोपाठ हे मार्ग वापरण्याची धडपड चालू होते. प्रभुत्वस्थानी नसलेल्या निरनिराळ्या विभागांना अरिष्टाची झळ जाणवू लागते, पण प्रभुत्वस्थानी असलेल्या विभागांना ती काही फार प्रमाणात जाणवत नाही. अपघाती पद्धतीने थोड्या काळासाठी एखाददुसऱ्या धोरणाचा परिणाम मूल्य निर्मितीच्या प्रक्रियेशी गुंतलेल्या संबंधांवरही होऊ शकतो. परंतु सुसूत्र पद्धतीने विशिष्ट प्रवृत्तींना एकत्र आणून अरिष्टाबाहेर पडणे या धोरणांमार्फत शक्य होत नाही. आपण पुढे तपशिलात पाहू की हे कार्य खुद्द अरिष्ट खोलवर होण्यामार्फतच झाले तर होऊ शकते. आणि नेमके तेच ही धोरणे होऊ देत नाहीत! त्यामुळे फरक पडला आहे तो इतकाच की पूर्वी

एकदम कोसळून आसमंत धुवून काढणारी अरिष्टे येत असत; त्याऐवजी आता अरिष्टे रिपरिपणारी, कुंठित, एक एक विभाग हळूहळू ग्रासत जाणारी लांब पल्ल्याची अरिष्टे बनतात. थोडक्यात, अरिष्टे नाहीशी होत नाहीत परंतु अरिष्टे कोणत्या स्वरूपात व्यक्त होतात ती स्वरूपे मात्र आधुनिक काळात बदललेली दिसतात.[२]

६. अरिष्टांची अपरिहार्यता : समज व गैरसमज

एकांगी समज व आपोआपवाद

अर्थात इथेदेखील नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीमधून निर्माण होणाऱ्या अरिष्टांच्या अपरिहार्यतेबद्दल एकांगी व यांत्रिक समज करून घेणे चुकीचे होईल.

अशा समजेतून एकप्रकारचा आपोआपवाद निर्माण होऊ शकतो. या समजेप्रमाणे नफ्याचा दर घसरण्याची प्रवृत्ती शेवटी इतकी तीव्र होत जाते की त्यातून शेवटी एक असे अरिष्ट तयार होते की ज्यामधून भांडवलशाही बाहेर पडणे शक्यच नसते. भांडवलशाहीने काहीही व कितीही धडपड केली तरी तिला या अरिष्टातून बाहेर पडता येत नाही. याचा अर्थ असा होतो की भांडवलशाही या प्रवृत्तीच्या भाराने आपोआप कोसळते. या समजेप्रमाणे भांडवलशाही उलथण्याचे काम ही प्रवृत्तीच करत असते, कामगारवर्ग हा त्यासाठी एक निमित्तमात्र असतो. अन् या समजुतीमध्ये एका नेमस्त विचाराची बीजेदेखील अंतर्भूत असतात. जोपर्यंत समोरील अरिष्ट हे अशा प्रकारचे 'निर्णायक' अरिष्ट नसेल तोपर्यंत कामगारवर्गाने क्रांतिकारक मार्गाने लढण्याचा प्रयत्न करू नये अशा नेमस्त विचाराची बैठकदेखील त्यातून तयार होऊ शकते.

मार्क्समध्ये अशा आपोआपवादाचा लवलेशही नाही. ही प्रवृत्ती भांडवलशाही कोसळवणारे एखादे 'महाअरिष्ट' जन्माला घालते असा मार्क्सचा मुळात दावाच नाही. त्याला ही प्रवृत्ती महत्त्वाची वाटते कारण या प्रवृत्तीमुळे कामगारवर्गाच्या क्रांतिकारक लढ्याला अनुकूल भूमी वारंवार तयार होणे अपरिहार्य ठरते. कामगारवर्गाच्या क्रियाशील व जाणीवपूर्वक आघाताशिवाय भांडवलशाही कोसळू शकत नाही. कामगारवर्गाचा त्या कालखंडापुरता निर्णायक पराभव झाला तर काहीएक किंमत मोजून भांडवलशाही अरिष्टामधून बाहेर पडू शकते. कामगारवर्गाचा जाणीवपूर्वक कृतिशील आघात हा भांडवलशाहीविरोधी क्रांतीचे केवळ निमित्त नसते तर त्या क्रांतीची एक निर्णायक अट असते.

यासाठी अरिष्टाचे दुहेरी स्वरूप लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. एका बाजूला कामगारवर्गाच्या क्रांतिकारक लढ्याला अनुकूल भूमी तयार होत असते. हे तर खरे असतेच. त्याबरोबरच दुसऱ्या बाजूला सर्वसाधारण प्रवृत्तीला विरोध करणाऱ्या सर्व प्रवृत्ती अरिष्टामुळेच एकत्र बांधल्या जाण्याची प्रक्रियादेखील घडत असते. सर्व साधारण प्रवृत्तीच्या विरोधी प्रवृत्ती इतर काळात सुट्यासुट्या व अपघाती पद्धतीने (सेपरेटली अँड रँडमली) विरोध करत असतात. त्याऐवजी त्या आता एकत्रितपणे बांधल्या जातात व त्या कालखंडापुरत्या, कामगारवर्गाच्या निर्णायक पराभवाच्या आधारावर, भांडवलशाहीला अरिष्टातून वर काढतात. अर्थात या उलथापालथीतून बाहेर पडलेल्या भांडवलशाहीचे तांत्रिक, आर्थिक आणि वर्गीय पातळीवर पुनर्घटनही झालेले असते. किंबहुना अरिष्ट हे मुळी भांडवलशाही व्यवस्थेचे दूरगामी पुनर्घटन होण्याचे माध्यम असते. या प्रक्रियेची कल्पना येण्यासाठी आपल्याला या प्रक्रियेचा एक धावता परंतु सर्वांगीण आढावा घ्यावा लागेल.

कामगारवर्गावरील हल्ला अरिष्टांमध्ये महत्त्वाची ठरणारी विरोधी प्रवृत्ती

नफ्याचा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या विरोधी प्रवृत्तींची चर्चा करताना एका विशिष्ट प्रकारच्या प्रवृत्तीची चर्चा आम्ही मुद्दाम राखून ठेवली होती. या सर्व प्रवृत्तींचा अर्थ एकच असतो, कामगारवर्गांवरील हल्ला आणि त्यातून दर तासाच्या श्रमांमागे गुंतवलेल्या भांडवलात वाढ न करता, उत्पादकतेमध्ये बदल न करता वरकड-मूल्यात वाढ करण्याचे मार्ग—थोडक्यात भांडवलशाहीच्या बिनक्रांतिकारक पैलूशी निगडित असे निव्वळ व सापेक्ष वरकड-मूल्याचे प्रकार. कामाच्या तासांमध्ये या ना त्या प्रकारे वाढ आणि श्रमशक्तीच्या वेतनात या ना त्या मार्गाने कपात.

कामगारवर्गावरील सर्वांगीण हल्ल्यातून नफ्याचा दर उंचावण्याचे हे मार्ग भांडवलदारवर्गाच्या ताब्यातले व ताबडतोबीने फळ देणारे मार्ग असतात. याउलट पूर्वी वर्णिलेले मार्ग हे लांब पल्ल्याचे, धोरणात्मकदृष्ट्या जटिल व अनेकपदरी सामाजिक-आर्थिक माध्यमातून राबवावे लागणारे मार्ग असतात. उदाहरणार्थ, श्रमसामुग्रीच्या व विशेषत: श्रमसाधनांच्या क्षेत्रामध्ये सर्वसाधारण उत्पादकतावाढीपेक्षा जास्त वेगाने उत्पादनवाढ योजली जाऊन प्रत्यक्षात होणे हा एक मार्ग आहे. पण हे ताबडतोबीने कसे साधणार? त्यासाठी खास संशोधन, तशा खास सवलती मिळवून त्या क्षेत्रामध्ये त्यांचा वापर होऊन

त्यातून निघालेली श्रमसामुग्री व श्रमसाधने इतर क्षेत्रांमध्ये वापरली जाऊ लागतात तेव्हा कुठे त्याचे फळ मिळते!

अरिष्टामुळे जेव्हा नफ्याचा दर सार्वत्रिकपणे घसरू लागलेला असतो तेव्हा सर्वप्रथम ताबडतोबीने फळ देणारे व ताब्यात असलेले नफ्याचा दर उंचावण्याचे मार्ग महत्त्वाचे बनतात व सर्वप्रथम कामगारवर्गावर हल्ला सुरू होतो. निव्वळ वरकड-मूल्याची प्रवृत्ती जोर धरू लागते. कामाचे तास वाढवले जातात, सक्तीचा ओव्हरटाईम सुरू होतो. सुट्ट्यांमध्ये, रजांमध्ये कपात होऊ लागते. 'राष्ट्रीय' (!) हितासाठी कामगारांना पंधरा मिनिटे अगोदर कामावर रुजू होऊन पाळीच्या ठोक्याला मशीनवर तयार रहायचे फर्मान सुटते. कामगारांच्या विश्रांतीस्थानांचे श्रमकाळात रूपांतर केले जाऊ लागते. विडी ओढायला बंदी, लघवीसाठी एकदाच व पाचच मिनिटे जाऊ देणे इ. इ. श्रमांची तीव्रता वाढते. बदली किंवा टेंपररी कामगारांमध्ये कपात होऊन त्यांची कामे इतर कामगारांमध्ये वाटली जाऊ लागतात, दोन ऐवजी चार यंत्रांना 'काम पुरवत राहावे लागते'. एक ना दोन. उघड आणि छुप्या मार्गाने कामगारवर्गाकडून निव्वळ वरकड-मूल्य काढले जाऊ लागते.

त्याचवेळी या ना त्या मार्गाने कामगारांचे वेतन हे श्रमशक्तीच्या मूल्याने निर्णित वेतनाच्या खाली ढकलण्याच्या पद्धती वापरल्या जाऊ लागतात. थोडक्यात, सापेक्ष वरकड-मूल्याची सर्वात साधी पद्धती वापरात येऊ लागते. याचे मार्ग वापरण्यात तर भांडवलदारवर्ग आपली सर्व नावाजलेली 'उद्योजकता' (!) पणाला लावतो. प्रथम तोट्याकडे किंवा घसरत्या नफ्याकडे बोट दाखवून बोनस, एक्सग्रॅशिया इ. सारख्या जिंकून घेतलेल्या वेतनाच्या भागामध्ये कपात होते, वेतन गोठवले जाते किंवा वेतनवाढ काही मुदतीसाठी जप्त केली जाते. कमी वेतनापासून आज सुरू होणारी किंवा कमी वार्षिक वेतनवाढ देणारी पण पुढे कधीतरी पूर्वीपेक्षा जास्त वेतनापर्यंत चढण्याचे गाजर दाखवणारी वेतनश्रेणी घडवली जाते आणि कामगारांना, विशेषत: नव्याने भरती केल्या जाणाऱ्या कामगारांना लागू केली जाते. महागाईभत्त्याच्या निर्देशांकाच्या वाढीची भरपाई आणखी कमी केली जाते. किंवा महागाईभत्त्याचा एक भाग मूळ पगारात धरून निर्देशांकामागची वाढ कमी करण्याचा प्रयत्न होतो. याचे इतके विविध मार्ग शोधले गेले आहेत की त्याच्यावर अनेक प्रबंध लिहिले जाऊ शकतील. त्याचवेळी भांडवलसंचयाचा वेग कमी होत असतो, बेरोजगारी वाढत असते आणि प्रत्यक्षात कामगारवर्गाचे एकंदर दरडोई वेतन कमी होतच असते.

सार्वत्रिक, सर्वांगीण हल्ल्यातून राजकारणाकडे

अरिष्टाच्या काळात होणारा हा हल्ला आणि इतर काळातील याच प्रवृत्ती यामध्ये एक महत्त्वाचा गुणात्मक फरक देखील असतो. नेहमीच्या काळात होणारा हल्ला हा आता जास्त तीव्र होतो इतकेच त्याला महत्त्व नसते. नेहमीच्या काळात होणाऱ्या अशा हल्ल्याचे महत्त्व जादा वरकड-मूल्य मिळवण्याचे असते, वरकड-मूल्याच्या मुख्य स्रोताला पूरक असे त्याचे स्थान असते. परंतु आता त्याचे स्थान बदललेले असते. सार्वत्रिकपणे व ताबडतोबीने, नफ्याचा घसरता दर सुधारण्याचा तो एकमेव मार्ग असतो. त्याचे स्थान केवळ पूरक राहत नाही तर ती एक भांडवलशाहीची सार्वत्रिक गरज बनते. आणि सार्वत्रिकपणे हा हल्ला व्हायचा तर कामगारवर्गाची सार्वत्रिक ताकद खच्ची करणे आवश्यक असते. कामगारवर्गाविरुद्ध राजकीय आणि सामाजिक पातळीवर आघाडी उघडणे हे भांडवलशाहीला सार्वत्रिक पाठिंब्यासाठी आवश्यक ठरते. पेपरांचे रकाने कामगारांवर आगपाखड सुरू करतात. उत्पादकतावाढ, शिस्त, राष्ट्रीय हित, यांच्या नौबती झडू लागतात. पण त्याचा परिणाम दुधारी असतो. सर्व वातावरणच राजकीय बनत जाते तसे कामगारवर्गालाही स्वत:ची राजकीय-सामाजिक फळी बांधणे भाग पडत जाते.

त्याचवेळी या भोवतालच्या राजकारणामध्येही एक गुणात्मक फरक पडलेला असतो. भांडवली विचारांचा आणि व्यवहाराचा एकसंधपणा व सुसूत्रपणा गळून पडतो. तेजीच्या काळात गुण्यागोविंदाने नांदणारे भांडवली विभाग आपापले विभागीय तट्टू इतरांची पर्वा न करता पुढे दामटीत असतात. निर्यातक्षेत्राच्या सवलती निर्यात न करणाऱ्या क्षेत्रांना खुपू लागतात. निर्यातक्षेत्रातले भांडवलदार इतर भांडवलदारांवर परकीय चलनाचे राष्ट्रीय (!) महत्त्व न ओळखण्याबद्दल आरोप करू लागतात. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनाविरुद्ध आग ओकू लागतात. तेजीच्या काळात उदारपणे पोटात घातलेल्या लाचलुचपत, काळा पैसा, स्मगलिंग, वशिलेबाजी इत्यादी गोष्टी आता एकदम जाचू लागतात व चव्हाट्यावर मांडल्या जातात. लघुउद्योग विरुद्ध बडे उद्योग, मक्तेदार विरुद्ध बिगर मक्तेदार, ग्रामीण विरुद्ध शहरी, सरकारी विरुद्ध खाजगी—वादांमागून वादांचे पेव फुटते. भांडवली विभागांची कामगारवर्गाविरुद्धची धार सारखी असली तरी त्यांचा आपापसातला मेळ पार बिघडतो. कुठल्याच धोरणाभोवती ते एकवटू शकत नाहीत. भांडवलदारवर्गाला स्वत:चा कारभार चालवणे अशक्य बनू लागलेले असते.

या सगळ्या गदारोळामधून भांडवलशाहीच्या निरनिराळ्या विभागांचे व पैलूंचे बुरखे इतर विभाग फाडून काढत असतात व ठिकठिकाणी तिचे खरे व भीषण स्वरूप उघडे पडत असते. भांडवलशाहीचे खरे स्वरूप तुकड्यातुकड्यानी पण तीव्रतेने चव्हाट्यावर मांडले जात असते. भांडवलशाहीचा मर्मभेद करण्याची साधने दृश्य व उघड स्वरूपात कामगारवर्गाच्या हाताशी असतात. क्रांतिकारक लढ्याला व शिक्षणाला अनुकूल भूमी, अरिष्ट सर्वार्थाने तयार करत असते, व कामगारवर्गाला निर्णायकपणे लढ्यात उतरायला भाग पाडत असते.

या अनुकूल भूमीवर लढूनदेखील त्या कालखंडापुरता कामगारवर्गाचा निर्णायक पराभव झाला तर मात्र अरिष्ट स्वत:च विरोधी प्रवृत्तीना एकत्र आणते व त्यातून भांडवलशाही पुनर्घटित होऊन बाहेर पडते ही अरिष्टाची दुसरी बाजूही इथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

अरिष्टातून पुनर्रचना व विरोधी प्रवृत्तींची बांधणी

कामगारवर्गाच्या त्या काळापुरत्या निर्णायक पराभवाचे सर्वप्रथम दोन महत्त्वाचे परिणाम होतात. वेतन हे श्रमशक्तीच्या मूल्यनिर्मित वेतनाच्या खाली निर्णायकपणे घसरते व निव्वळ वरकडमूल्यात निर्णायक वाढ होते. नफ्याच्या दराच्या संदर्भात या दोन्ही परिणामांचा एकच अर्थ होतो—गुंतवणुकीत फारशी वाढ न होता वरकड-मूल्याचा दर एका उडीत वाढतो. लांब पल्ल्याच्या विरोधी प्रवृत्तीचा परिणाम होईपर्यंत नफ्याचा दर टिकवण्याचे उद्दिष्ट भांडवलदारवर्गाने कामगारांचा पराभव करून साध्य करून घेतलेले असते.

त्याचवेळी नफ्याचा दर घसरल्यामुळे सर्वप्रथम फटका बसतो तो भांडवलसंचयाला किंवा नव्या भांडवल गुंतवणुकीला, आणि पर्यायाने श्रमसामुग्रीच्या मागणीला. उतरत्या बाजारपेठेमुळे श्रमसामुग्रीची प्रथम किंमत घसरते व मूल्यनिर्णीत किंमतीच्या खाली उतरते. कालांतराने या नव्या किंमतीशी सुसंगत असे कमी मूल्य असणारे जास्त उत्पादक उद्योग टिकून राहतात. बाकीच्यांचे दिवाळे निघते किंवा पहिल्या उद्योगसमूहांमध्ये त्यांना सामील व्हावे लागते. श्रमसामुग्री निर्माण करणाऱ्या क्षेत्रावर उत्पादकतावाढीला वेग आणायला भाग पाडणारे हे बंधन ठरते.

अर्थातच श्रमसामुग्रीखेरीज इतर क्रयवस्तूंची निर्मिती करणाऱ्या क्षेत्रांवरदेखील असा परिणाम होतोच. आणि याचाही एक वेगळा परिणाम श्रमसामुग्रीच्या क्षेत्रावर होतो. प्रचलित श्रमसामुग्रीऐवजी आता वेगळ्या प्रकारच्या

श्रमसामुग्रीला महत्त्व येते. ज्या श्रमसामुग्रीचे मूल्य पुरेसे कमी आहे व जिची श्रमांमार्फत उत्पादनक्षमता पुरेशी जास्त आहे अशाच मूर्त प्रकारची श्रमसामुग्री तिच्या वापरातून निर्माण होणाऱ्या क्रयवस्तूंचे मूल्य त्याच्या घसरलेल्या किंमतीशी सुसंगत पातळीवर आणून ठेवू शकते. अशा निवडक श्रमसामुग्रीच्या उत्पादनाला व सार्वत्रिक वापराला त्यामुळे महत्त्व येते.

या दोन्ही प्रक्रियांचा मिळून अर्थ विरोधी प्रवृत्तींना एकत्र बांधण्याचा होतो. प्रथम या निवडक प्रकारच्या श्रमसामुग्रीच्या उत्पादनाला महत्त्व येते व त्या उत्पादनात अरिष्टामुळे पूर्वीपेक्षा कमी मूल्य असणे महत्त्वाचे ठरते. परंतु पुरेशा प्रमाणात श्रमसामुग्रीचे अगोदर उत्पादन होईपर्यंत तिचा श्रमसामुग्रीव्यतिरिक्त क्षेत्रांमध्ये वापर होऊ शकत नाही. त्यामुळे पहिला परिणाम हा श्रमसामुग्रीच्या क्षेत्रांमध्ये इतर क्षेत्रांच्या तुलनेत उत्पादकतावाढ होण्याचा असतो. त्याचबरोबर या निवडक श्रमसामुग्रीचा वापर इतर क्षेत्रांमध्ये सार्वत्रिक होण्यातून, सार्वत्रिक पातळीवर नफ्याच्या राशिमागील गुंतवलेले भांडवलाचे मूल्य कमी होते व नफ्याचा दर सुधारतो. जी गोष्ट इतर काळात अपघाती स्वरूपाने होत असते, त्या त्या क्षेत्रापुरती होत असते ती अरिष्टाच्या दबावामुळे सर्व क्षेत्रांसाठी एकत्र बांधली जाते.

अशा तऱ्हेने अरिष्ट खोल होत जाण्याच्या माध्यमातूनच नफ्याचा एकंदर दर उंचावतो व कालांतराने अरिष्ट संपते. कालांतराने संपते ही बाब महत्त्वाची आहे. कारण हा तसा लांब पल्ल्याचा परिणाम आहे. त्यामुळेच हा परिणाम प्रत्यक्षात येईपर्यंत कामगारवर्गाच्या निर्णायक पराभवातून खालावलेले वेतन व वाढलेले निव्वळ वरकड-मूल्य हा नफ्याचा दर टिकवण्याचा एकमेव मार्ग असतो. कामगारवर्गाच्या निर्णायक पराभवामधूनच अरिष्टाचा काळ नफ्याचा दर उंचावणाऱ्या प्रवृत्ती एकत्र बांधतो व अरिष्टाचा काळ संपतो.

अर्थात, अशा अरिष्टातून बाहेर पडताना भांडवलशाहीमध्ये मोठ्या प्रमाणावर पुनर्घटन झालेले असते. अनेकदा मोठमोठे तांत्रिक बदल, तंत्रवैज्ञानिक क्रांती त्यात झालेली असते. भांडवलदारवर्गाच्या अंतर्गत विभागांचे आपापसांमधले संतुलन बदललेले असते. भांडवलाचे केंद्रीकरण व घनीकरण झालेले असते. मक्तेदारीने नवी क्षेत्रे व्यापलेली असतात. भांडवलाचे पुनर्घटन झालेले असते.[३]

ही पुनर्घटित भांडवलशाही नव्या उंचावलेल्या नफ्याच्या दराच्या पातळीपासून पुन्हा प्रवास सुरू करते. अरिष्टाचा दबाव संपला की विरोधी प्रवृत्तीला एकत्र बांधून ठेवणारे माध्यमही तुटते. विरोधी प्रवृत्ती पुन्हा अपघाती व बिनासुसूत्र

पद्धतीने काम करू लागतात. तेजीच्या जोरावर कामगारवर्ग पुन्हा अरिष्टपूर्व परिस्थितीतील जीवनमान व कामाची परिस्थिती जिंकून घेतो. भांडवलशाहीची सर्वसाधारण परिस्थिती चालू होते. उंचावलेला नफ्याचा दर सर्वसाधारण प्रवृत्ती पुन्हा पोखरू लागते. एकत्र न बांधल्या गेलेल्या विरोधी प्रवृत्ती तिला यदृच्छा (रँडमली) विरोध करीत राहतात पण सर्वसाधारण प्रवृत्ती नफ्याचा दर पोखरून काढत राहते. पुन्हा पुढच्या अपरिहार्य अरिष्टापर्यंत!

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की यामध्ये कुठेही आपोआपवादाचा लवलेश देखील नाही. मार्क्सचा कामगारवर्गाला हा उपदेश नाही की 'स्थस्थ बसा, नफ्याचा दर कमी होण्यामधून भांडवलशाही कधी तरी कोसळणारच आहे'! साध्या भाषेत सांगायचे तर तो म्हणत असतो की 'नफ्याचा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीमधून येणारा अरिष्टाचा काळ हा तुमच्यासाठी अत्यंत अनुकूल काळ आहे. संपूर्ण शक्तीनिशी, जास्तीत जास्त पाठिंब्याने चढाई करा.' आणि या चढाईत कामगारवर्गाचा पराभव झाला तर तो पुढे म्हणतो की, 'आता दिसणाऱ्या भांडवलदारांच्या सामर्थ्यांच्या प्रदर्शनाने नाऊमेद होऊ नका, किंवा मध्यंतरीच्या थोड्याफार सुसह्य काळामुळे सुस्तावूही नका. तुम्हाला अनुकूल काळ पुन्हा येणे हे नफ्याचा दर कमी होण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीमुळे अपरिहार्य आहे. तुम्ही लढाई हरला असलात तरी युद्ध जिंकणार आहात. पुढच्या लढाईच्या तयारीला लागा. इतिहास तुमच्या बाजूने आहे.'

७. मार्क्सच्या मूळ संकल्पना व अरिष्टे

मार्क्सचे क्रयवस्तूच्या तपासणीपासून सुरू झालेले भांडवलशाहीचे विश्लेषण शेवटी भांडवली अरिष्टांच्या अपरिहार्यतेपाशी येऊन संपते. आणि भांडवलशाहीविरोधी कामगारवर्गीय क्रांतीचा सैद्धांतिक पायादेखील त्याचवेळी परिपूर्ण होऊन उभा राहतो. म्हणूनच मार्क्स त्याला केवळ विश्लेषण म्हणत नाही; तो स्वत:च्या विश्लेषणपद्धतीला समीक्षा किंवा टीकात्मक विश्लेषण म्हणतो (क्रिटीक, किंवा क्रिटिकल ॲनॅलिसीस). ती भांडवलशाहीची केवळ टीकादेखील नसते, तर भांडवलशाहीच्या टीकात्मक विश्लेषणातून, भांडवलशाही ओलांडून पुढे जाण्याचा भांडवलशाहीनेच निर्माण केलेला मार्ग एकजीव पद्धतीने स्पष्ट करणारी टीका असते. भांडवलशाहीविरुद्ध बंडखोरीची प्रेरणा त्याने पूर्णपणे आत्मसात केलेली असते. पण एकजीव विश्लेषणाचे अधिष्ठान मिळून तिचे सर्वार्थाने व्यवहारी क्रांतिकारी प्रेरणेत रूपांतर झालेले असते.

भांडवली व्यवस्थेवरील कामगारवर्गीय टीका आणि तिचे वैज्ञानिक विश्लेषण हे इतक्या एकजीवपणे मार्क्सच्या 'कॅपिटल' मध्ये सापडते याचे सर्वात महत्त्वाचे कारण मार्क्सच्या मूळ संकल्पनांच्या जडणघडणीला दिले पाहिजे. मार्क्सच्या विश्लेषणाचा शेवट आणि सुरुवात या संकल्पनांमुळे अतूटपणे एकत्र बांधली जातात. या संकल्पनांच्या स्वरूपाशी इमान राखून उलगडत जाणारे विश्लेषण हे त्यामुळे अपरिहार्यपणे भांडवलशाहीची उलगडत जाणारी टीका ठरते आणि तिच्याविरुद्ध ही 'टीका' प्रत्यक्षात आणू शकणाऱ्या कामगारवर्गीय क्रांतीचा उलगडत जाणारा पाया ठरते. अरिष्टाच्या काळामध्ये जे घडते त्याचा मार्क्सच्या मूळ संकल्पनांशी काय संबंध आहे हे पाहिले की हे अतूट नाते आपल्यासमोर स्पष्टपणे उभे राहू शकते.

उपयोग–मूल्य व मूल्य यातील अंतर्विरोध

क्रयवस्तूंच्या तपासणीच्या सुरुवातीलाच आपल्याला त्यांच्यामध्ये एक दुहेरी संबंधांचे वास्तव नांदताना दिसले. उपयोग–मूल्य, श्रमप्रक्रिया, मूर्त श्रम हे वास्तव एका बाजूला तर मूल्य, विनिमय–मूल्य, मूल्य–निर्मिती, अमूर्त श्रम हे वास्तव दुसऱ्या बाजूला. क्रयवस्तूचे उपयोग–मूल्य नजरेआड केले तर उरते ते मूल्याशी संबंधित वास्तव; उपयोग–मूल्य आणि मूल्य (आणि त्यांच्याशी संबंधित मूर्त श्रम, अमूर्त श्रम इ. इतर जोड्या) या परस्परविरोधी, परस्पर पर्यायी (म्यूच्युअली एक्स्लूझीव्ह) बाजू म्हणून उभ्या राहतात.

उपयोग–मूल्य, मूर्त श्रम आणि त्यांच्याशी संबंधित सामाजिक उत्पादनव्यवहाराचे सर्व पैलू हे समाजातील उत्पादनशक्तीचे प्रत्यक्ष रूप असते. इतिहासाच्या कोणत्याही कालखंडामधील माणसांनी निसर्गाशी झगडत, जमवून घेत स्वत:चे मानवी जीवन निर्माण करण्याच्या, उपभोगण्याच्या क्षमतांचे ते रूप असते. माणसांनी माणसांसारखे जगण्याचा कितपत आधार निर्माण केला आहे त्याचे या उत्पादनशक्ती द्योतक असतात. याउलट मूल्य, अमूर्त श्रम आणि त्यांच्याशी संबधित सामाजिक उत्पादनव्यवहाराचे सर्व पैलू हे क्रयवस्तूंवर आधारलेल्या समाजापुरतेच वैध असतात. आणि क्रयवस्तूंचा व्यवहार सार्वत्रिक बनण्याचे माध्यम भांडवलशाही व्यवस्था हेच असल्यामुळे त्यांच्या विकसित सार्वत्रिक रूपात ते भांडवली उत्पादनसंबंध असतात. उपयोग–मूल्य आणि मूल्य या दुहेरी वास्तवाचा संबंध त्यामुळे उत्पादनशक्ती व भांडवली उत्पादनसंबंध या दुपदरी वास्तवाशी लागतो.

कुठल्याही समाजाचा प्रत्यक्ष उत्पादनव्यवहार हा उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध यांच्या एकत्रित विणीमधूनच उभा राहतो, आणि याचा परिणाम म्हणजे भांडवलशाहीमध्ये उपयोग-मूल्य व मूल्य या परस्परविरोधी बाजूंवर एकमेकींना पूरक बनणे, एकमेकींचा आधार व पूर्वअट बनणे लादले जाते. क्रयवस्तूंच्या सार्वत्रिक व्यवहारात एखाद्या क्रयवस्तूचे मूल्य विक्रेत्याच्या हातात यायचे तर तिला ते मूल्य द्यायला तयार असणाऱ्या कुणासाठी तरी उपयोग-मूल्य असावे लागते व ते द्यावे लागते; याउलट एखाद्या गरजू माणसाला वस्तूचे उपयोग-मूल्य हातात यायचे असेल तर तिला मूल्य असावे लागते व तेवढे मूल्य त्याच्यापाशी असावे लागते. उपयोग-मूल्य हे मूल्य प्रत्यक्षात येण्याची पूर्वअट व माध्यम बनते, तर मूल्य हे उपयोग-मूल्य प्रत्यक्षात येण्याची पूर्वअट व माध्यम बनते!

. . . व त्यातून येणारे अरिष्ट

जोपर्यंत भांडवलशाहीचा सर्वसाधारण काळ चालू असतो तोपर्यंत सर्व सुरळीत चाललेले असते आणि उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातला अंतस्थ विरोध पुढे येत नाही. या काळावरच फक्त नजर ठेवून चालले तर असेच भासते की, उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यात विरोध नाही, त्या एकमेकांना मूलत: पूरक बाजू आहेत. म्हणजेच उत्पादनशक्ती व भांडवली उत्पादनसंबंध यांच्यात मूलत: विरोध नाही तर एकोपा आहे. भांडवली उत्पादनसंबंध हे समाजातील उत्पादनशक्ती वाढवणारी गोष्ट आहे, त्यांच्या वाढीवरील बंधन नाही. या सर्वसाधारण काळात हे बंधन छुपे राहते, स्पष्ट होत नाही.

अरिष्टाची सुरुवातच मुळी होते ती भांडवल-संचय थंडावण्याने, उत्पादनशक्तींची वाढ खुंटण्याने. अरिष्ट जसजसे खोल जाऊ लागते तसे अस्तित्वात असलेले कारखानेदेखील फुंकून टाकले जातात किंवा बंद पडतात. उत्पादित मालाची नासाडी होते. उत्पादनशक्ती मारल्या जाऊ लागतात. आणि याची सर्वात जास्त झळ पोचते समाजाच्या जिवंत उत्पादनशक्तीला—कामगारवर्गाला. कामगारवर्गाच्या श्रमशक्तीच्या वाढत्या भागाला उत्पादनशक्तीत रूपांतरित होण्याचा हक्क एका बाजूला नाकारला जातो; तर दुसऱ्या बाजूला कामगारवर्गाच्या ज्या श्रमशक्तीचे उत्पादनशक्तीत रूपांतर होते त्याची लांब पल्ल्याची उत्पादनक्षमता निव्वळ वरकड-मूल्याच्या प्रवृत्तीतून मारली जात असते.

या काळात या उत्पादनशक्तींच्या वापरातून निर्माण होणाऱ्या उपयोगमूल्याची गरज नसते असे काही नसते. उत्पादनशक्तीच्या वापरातून निर्माण होणाऱ्या उपयोगी वस्तू क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे मूल्यनिर्णीत किंमतीला विकल्याही जाऊ शकतात. परंतु त्या मूल्यनिर्णीत किंमतीला विकून भांडवलदारांना पुरेसा नफा होत नाही इतकेच. थोडक्यात उपयोग-मूल्य प्रत्यक्षात यायला मूल्य प्रत्यक्षात आले पाहिजे. या क्रयवस्तूंच्या नियमांच्या वाटेवर क्रयवस्तूंच्याच नियमावर उभे असलेले भांडवली उत्पादनसंबंध अडथळा बनतात. बरे त्या उत्पादनशक्तींसाठी भांडवल अपुरे पडते असेही नसते. उलट भांडवल मुबलक असते, नफ्याच्या राशीच्या तुलनेत भांडवल मुबलक होते हाच अडथळा असतो! अरिष्ट हे अतिरिक्त भांडवलाचे अरिष्ट असते. क्रयवस्तूंच्या स्वरूपात वाढण्याच्या उत्पादनशक्तींवर लादलेल्या रूपामुळे भांडवली उत्पादनसंबंध हे उत्पादनशक्तींवरील बंधन ठरत असतात.

अर्थात, भांडवली विचारवंतांच्या दृष्टीने हा भांडवलशाहीचा ‘असाधारण’ काळ असतो. भांडवलशाहीच्या सर्वसाधारण परिस्थितीमध्ये भांडवली उत्पादनसंबंध हे उत्पादनशक्तींना त्यांच्या मते पूरकच असतात. आणि इथेच नेमके मार्क्सच्या नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या निष्कर्षाचे महत्त्व उभे राहते. कारण मार्क्स याद्वारे दाखवत असतो की अरिष्ट हे सर्वसाधारण प्रवृत्तीच्या तीव्रतेमुळे, नफ्याचा दर कमी झाल्यामुळे दृश्य होणारा गुणात्मकरीत्या वेगळा काळ आहे. उत्पादनशक्तीचा—विशेषत: समाजामधील जिवंत उत्पादनशक्तीचा—वारंवार विध्वंस ही उत्पादनशक्तींच्या भांडवली स्वरूपातील वाढीला द्यावी लागणारी अपरिहार्य किंमत असते.

भांडवलशाहीचे ऐतिहासिक मापन करायचे झाले तर भांडवलीपूर्व संबंध व बंधने मोडून काढून समाजातील उत्पादनशक्ती प्रचंड प्रमाणावर वाढवणे हे तिचे ऐतिहासिक शक्तिस्थान असते. मार्क्सच्या मांडणीचे वैशिष्ट हे आहे की तिचे ऐतिहासिक शक्तिस्थान हेच नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीला जन्म देत असते हे तो दाखवतो. अरिष्ट हे भांडवलशाहीचे मर्मस्थान असते. तिच्या सर्व ऐतिहासिक मर्यादा अरिष्टांमध्ये स्पष्ट होतात, कामगारवर्गाला तिच्यावर मर्माघात करायला उद्युक्त करणारा तो कालखंड असतो. त्यामुळे मार्क्सच्या मांडणीप्रमाणे भांडवलशाहीचे मर्मस्थान हे तिच्या ऐतिहासिक शक्तिस्थानाचाच परिपाक असते. भांडवलशाहीची शक्तिस्थाने कायम ठेवून तिच्यातील मर्मस्थाने नाहीशी करण्याचा कोणताही भांडवली सुधारणावादी

कार्यक्रम त्यामुळे फोल ठरतो. नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीच्या निष्कर्षाला पायाभूत असलेले हे शक्तिस्थान व मर्मस्थान यांचे द्वंद्व सुधारणावादी दृष्टिकोनाची वाट बंद करून टाकते. जी क्रांतीकारी समीक्षा मार्क्सच्या तपासणीच्या सुरुवातीच्या मूलभूत संकल्पनांच्या पोटात सामावलेली असते ती विश्लेषणाच्या शेवटी कामगारवर्गीय क्रांतीचा समग्र सैद्धांतिक पाया घालूनच पूर्ण होते.

---

१ अतिरिक्त उत्पादनाचे अरिष्ट : भांडवलशाहीमध्ये ज्याप्रमाणे एका बाजूला उपभोगासाठी आवश्यक क्रयवस्तूंची (कन्झुमर गुडस् किंवा पूर्वी उल्लेख केलेला विभाग २) बाजारपेठ असते त्याचप्रमाणे श्रमसामुग्रीचीही बाजारपेठ असते. आंगिक प्रमाण वाढण्याच्या प्रवृत्तीतून श्रमसामुग्रीची बाजारपेठ (कॅपिटल गुडस् किंवा पूर्वी उल्लेख केलेला विभाग १) ही उपभोगाच्या वस्तूंच्यापेक्षा निर्णायक ठरू लागते. पण त्यातून पुढे एक अडचण तयार होते. या सर्व श्रमसामुग्रीचा उपयोग शेवटी पुन्हा कुठल्या ना कुठल्यातरी उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनाचा भाग बनावा लागतो. थोडक्यात याचा परिणाम पुन्हा उपभोगाच्या वस्तूंची प्रचंड वाढ होण्यात व त्यात वाढत्या मूल्याच्या श्रमसामुग्रीच्या मूल्याची भर पडण्यात होतो.

त्याचवेळी आंगिक प्रमाण वाढण्याचा परिपाक म्हणून सामाजिक उत्पादनाच्या तुलनेत कामगारांची संख्या व राहणीमान वाढत असले तरी जीवनावश्यक उपयोगी वस्तूंचे उत्पादन ज्या वेगाने वाढते त्याच्या तुलनेत कामगारांची खरेदीशक्ती कालांतराने तोकडी पडते. हा माल (विभाग २ चे उत्पादन) पडून राहू लागतो, त्याच्या किंमती उतरतात. त्यातून त्यासाठी लागणारी श्रमसामुग्री पडून राहू लागते. काही कारखान्यांचे दिवाळे वाजते. त्यातून बेरोजगारीत वाढ होते व कामगारांची खरेदीशक्ती आणखी कमी होते. कामगारांच्या खरेदीशक्तीच्या तुलनेत होणारे हे अतिरिक्त उत्पादनाचे अरिष्ट भांडवलशाहीला ग्रासते.

अतिरिक्त उत्पादनाचे अरिष्ट हे खरे महत्त्वाचे की नफ्याचा दर घसरण्याच्या सर्वसाधारण प्रवृत्तीतून येणारे अरिष्ट जास्त महत्त्वाचे अशी चर्चा बऱ्याचदा केली जाते. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की नफा घसरण्याच्या प्रवृत्तीतून येणारे अरिष्ट हे देखील अतिरिक्त उत्पादनाच्या रूपात येते! नफ्याचा दर घसरणे व अतिरिक्त उत्पादन होणे या दोन्ही बाबी एकाच मूलभूत यक्षप्रश्नाचा अविष्कार आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हा यक्षप्रश्न म्हणजे भांडवलशाहीमध्ये उत्पादनशक्ती व त्याना आकार देऊ पाहणारे भांडवली उत्पादनसंबंध यांच्यात एकोपा आहे की विरोध. भांडवली उत्पादनसंबंधामधून उत्पादनशक्तींचा अरिष्टांमार्फत वारंवार ऱ्हास व्हावा लागतो हेच या दोन्ही सिद्धांतांमधून स्पष्ट होत असते. नफ्याचा दर कमी होण्याची प्रवृत्ती ज्या काटेकोर पद्धतीने सिद्ध करता येते त्या पद्धतीने अतिरिक्त

उत्पादनाची प्रवृत्ती स्पष्ट केलेली नाही. पण या दोन्ही प्रवृत्ती भांडवलशाहीच्या मुळाशी तितक्याच निगडित आहेत. मार्क्सच्या लिखाणात अतिरिक्त उत्पादनाबद्दल देखील अनेक मूलगामी परिच्छेद आहेत हे इथे लक्षात ठेवायला हवे.

अतिरिक्त उत्पादनाच्या ज्या प्रवृत्तीची वर चर्चा केली आहे त्याबद्दल एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. या सिद्धांताशी साधर्म्य असलेला एक सिद्धांतदेखील काही वेळा मांडला जातो. त्यामध्ये श्रमसामुग्रीचे क्षेत्र (विभाग १) व उपयोगी वस्तूंचे क्षेत्र (विभाग २) यांच्यातील मेळ न बसल्यामुळे किंवा असंतुलनामुळे येणाऱ्या अतिरिक्त उत्पादनाचा आधार घेतलेला असतो. यामध्ये मार्क्सच्या कॅपिटलच्या दुसऱ्या खंडामधील साध्या व वर्धित पुनरुत्पादनाच्या प्रतिरूपांमधून गैरअर्थ काढलेला असतो. तिथे विभाग १ व विभाग २ मध्ये विशिष्ट प्रकारचे संतुलन आवश्यक असते हे मार्क्स दाखवतो. परंतु हे संतुलन प्रस्थापित न होण्याची कोणतीही सर्वसाधारण प्रवृत्ती तो दाखवत नाही किंवा त्यामधून अरिष्टाची अपरिहार्यता दाखवायचाही प्रयत्न करत नाही. निरनिराळ्या क्षेत्रांमधले अशा प्रकारचे असंतुलन व त्याचा मेळ बसणे ही मागणी-पुरवठ्याच्या आंधळ्या माध्यमामार्फत होणारी नेहमीची प्रक्रिया आहे. त्यातून प्रासंगिक व तात्कालिक अरिष्टाची परिस्थितीदेखील निर्माण होते. परंतु या अरिष्टाची सद्दी ही काही क्षेत्रांपुरती मर्यादित असते व ती ओलांडण्यासाठी सर्वसाधारण प्रवृत्तीमधून येणाऱ्या अरिष्टाप्रमाणे भांडवलशाहीचे मूलगामी पातळीवर पुनर्घटनही आवश्यक नसते.

[२] याच्या तपशिलामध्ये आपण इथे जाऊ शकत नाही. आधुनिक काळातील भांडवलशाहीच्या अरिष्टांबद्दलच्या सुबोध चर्चेसाठी पहा. ‘भांडवली अर्थव्यवस्था’, लेखक अनंत फडके, मागोवा प्रकाशन; विशेषत: प्रकरण नऊ, दहा व पुस्तकाचा संपूर्ण दुसरा विभाग.

[३] भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढण्याच्या प्रवृत्तीबद्दलच्या प्रकरणात आपण या तंत्रवैज्ञानिक पुनर्घटनाची थोडीशी चर्चा केलेली होती, पहा प्रकरण १४ मधील ‘तंत्रवैज्ञानिक क्रांती आणि आंगिक प्रमाण’ या शीर्षाखालील भाग.

परिशिष्ट १ : आंगिक प्रमाण वाढण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती

श्रमांच्या वाढत्या सर्वसाधारण उत्पादकतेमधून आंगिक प्रमाण कसे बदलते हे पाहायचे झाले तर आपल्याला या आंगिक प्रमाणाची फोड करून त्याचा प्रत्येक घटक हा या सर्वसाधारण उत्पादकतेमुळे कसा बदलतो याच्या गणिती तपशिलामध्ये जावे लागेल. व शेवटी या घटकांचा परिणाम एकत्रित करून एकंदर आंगिक प्रमाण कसे बदलते ते पहावे लागेल.

इथे आपल्याला अभिप्रेत आहे ती सर्वसाधारण उत्पादकतावाढ. आपण धरून चालूया की प्रत्येक क्रयवस्तूच्या उत्पादनामधील श्रमांची उत्पादकता ही 'उ' या प्रमाणात वाढली आहे. इथे अभिप्रेत असलेल्या उत्पादकतेचा 'दर श्रमतासामागे निर्माण होणारे मूल्य' किंवा रुपयात मोजलेल्या उत्पादकतेशी (रुपी प्रॉडक्टिव्हिटी) काही संबंध नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. याचे कारण मार्क्समध्ये उत्पादकतेचा संबंध हा निर्माण होणारे मूर्त उपयोग-मूल्य आणि जिवंत श्रम यांचा संबंध आहे. तिचे परिमाण हे मूलत: प्रत्येक क्रयवस्तूसाठी दर श्रमतासामागे अमुक इतक्या वस्तू असे आहे. त्यामुळे सर्वसाधारण उत्पादकतावाढ १०० टक्के आहे याचा अर्थ दर श्रमतासामागे आता दुप्पट वस्तू निर्माण होतात हा आहे. दुप्पट मूल्य किंवा दुप्पट किंमतीचा माल निर्माण होत आहे हा नव्हे. उदाहरणार्थ, जर लोखंडाच्या क्षेत्रामध्ये ही उत्पादकता पूर्वी

कामगारांच्या दर श्रमतासामागे ६ टन लोखंड अशी असेल तर आता ती कामगारांच्या दर श्रमतासामागे (६ × उ) इतके टन झालेली असेल.

वाढत्या उत्पादकतेमुळे आंगिक प्रमाण कसे बदलते?

आंगिक प्रमाण (अ) ठरवताना ते दोन रकमांचा भागाकार असेल, भाज्य हे कायम भांडवल (क) व बदलते भांडवल (ब) हा भाजक असेल.

अ = कायम भांडवल/बदलते भांडवल = क/ब ... (१)

भाज्यातील कायम भांडवलदेखील दोन महत्त्वाच्या रकमांची बेरीज असेल. एक म्हणजे श्रमविषयांमार्फत (कच्चा माल इ.) खर्च झालेले भांडवल, (याला आपण चिन्ह वापरूया 'वि') आणि श्रमसाधनांमार्फत खर्च झालेले भांडवल (याला आपण चिन्ह वापरूया 'सा').

त्यामुळे अ = (वि + सा)/ब ... (२)

आता उत्पादकतावाढीबरोबर आपण एकक उत्पादनामागे (युनिट प्रॉडक्शन) हे सर्व घटक कसे बदलतात ते तपशिलात पाहून शेवटी 'अ' बद्दल निष्कर्ष काढू.

१) दर क्रयवस्तूमागील बदलते भांडवल (ब)

एकक उत्पादनामागील बदलते भांडवल हे दोन संख्यांचा गुणाकार असेल. एकक उत्पादनामागील श्रमशक्ती (श्र) व श्रमशक्तीचे मूल्य (म). उत्पादकतावाढीअगोदरच्या संख्या १ या तळचिन्हाने व उत्पादकतावाढ (उ) झाल्यावरील संख्या आपण २ या तळचिन्हाने दर्शवू. त्याप्रमाणे उत्पादकतावाढीअगोदरचे एकक उत्पादनामागील बदलते भांडवल;

$ब_१ = श्र_१ \times म_१$ ... (३)

आता आपल्याला उत्पादकतावाढीबरोबर या संख्या कशा बदलतात ते पहायचे आहे.

अ) दर क्रयवस्तूमागील श्रमशक्ती (श्र) : कामाचे तास व श्रमांची तीव्रता कायम राहिली तर उत्पादकतावाढीबरोबर एकक उत्पादनामागील श्रमशक्ती कशी बदलते ते स्पष्ट आहे. ज्या प्रमाणात उत्पादकता वाढते त्या प्रमाणात ती कमी होते. थोडक्यात,

$श्र_२ = श्र_१/उ$ ... (४)

ब) श्रमशक्तीचे मूल्य (म) : श्रमांच्या सर्वसाधारण उत्पादकतावाढीमुळे श्रमशक्तीचे मूल्य हे त्याच प्रमाणात, किंवा त्याहून थोड्या कमी प्रमाणात घसरते हे दाखवता येते. या गोष्टीला पहिला आधार म्हणजे श्रमशक्तीचे मूल्य ज्या निकषावर ठरते तो निकष. श्रमशक्तीचे मूल्य हे कामगारवर्गाला जगण्यासाठी कोणत्या क्रयवस्तू आवश्यक आहेत त्या क्रयवस्तूरूप जीवनमानाच्या आधारावर ठरत असते. श्रमशक्ती मूल्याच्या नियमानुसार विकली जाते याचा अर्थ या निकषाप्रमाणे विकली जाते. श्रमांच्या उत्पादकतावाढीबरोबर या क्रयवस्तूरूप जीवनमानातील प्रत्येक क्रयवस्तूचे मूल्य घसरते. सध्या गणिती सोयीसाठी आपण क्रयवस्तूंचे मूल्य उत्पादकतावाढीच्या प्रमाणात (उ) घसरते असे धरून चालूया. (प्रत्यक्षात क्रयवस्तूचे मूल्य घसरण्याचे प्रमाण व सर्वसाधारण उत्पादकतावाढीचे प्रमाण हे एक नसते. क्रयवस्तूंचे मूल्य उत्पादकतावाढीपेक्षा कमी प्रमाणात घसरते. सर्व विभागांमधले आंगिक प्रमाण जर सारखे धरले तर सर्वसाधारण उत्पादकतावाढ 'उ' मुळे वस्तूंचे मूल्य घसरण्याचे एक सर्वसाधारण प्रमाण 'घ' ठरेल. आणि $१ < घ < उ$ हा संबंध प्रस्थापित होतो. या गृहिताच्या आधारावर आपण पुन्हा त्याच सर्वसाधारण निष्कर्षांपर्यंत पोचू शकतो. मात्र त्यातून काही उपसिद्धांतही निघतात. त्यात शिरणे हे सध्याच्या आपल्या कक्षेबाहेरचे आहे.) याचा अर्थ असा होतो की श्रमशक्तीचे योग्य मूल्यदेखील त्या प्रमाणात घसरते.

थोडक्यात, $म_२ = म_१/उ$ ... (५)

अर्थात, इथे दुसऱ्याही आधाराचा प्रश्न तयार होतो. उत्पादकतावाढीबरोबर कामगार स्वत:साठी उंचावलेल्या जीवनमानाचे निकषही जिंकून घेऊ शकतात. पण ही वाढ नेहमीच उत्पादकतावाढीच्या (आणि त्यातून क्रयवस्तूंचे मूल्य घसरण्याच्या) प्रमाणात अल्प असते. भांडवल-संचयाची कात्री कामगाराला जे कातरून देते त्याचा हा परिणाम मघाशीच वर्णन केलेल्या परिस्थितीमध्ये अभिप्रेत असतो. हे नसेल तर भांडवल-संचयावर उलटा परिणाम होतो हे दाखवता येते. आणि हे साध्या उदाहरणांवरून स्पष्टही असते. उदाहरणार्थ, मार्क्सचे पूर्वीचे सुयांचे उदाहरण घ्या. प्राथमिक सहकार्याच्या काळात १० कामगार दिवसाकाठी जेमतेम ५ हजार सुया बनवीत. त्याऐवजी यंत्रांवर आधारलेले उत्पादन आल्यावर १० कामगार दिवसाकाठी १५ लाख सुया बनवीत. उत्पादकता ३०० पटीनी वाढली म्हणून काय कामगारांचे जीवनमान ३०० पटीनी वाढले? की सुयांचे मूल्य जर १०० पटीनी कमी झाले तर

कामगारांचे जीवनमान काय १०० पटींनी वाढलेले दिसते? आणि गणिती गुंतागुंत टाळण्यासाठी आपण कायम जीवनमान धरले आहे इतकेच. वरील बंधनांचा विचार केल्यानंतरही त्याचा आपल्या अंतिम निष्कर्षावर परिणाम होत नाही हेही दाखवता येते.

थोडक्यात,

$ब_२ = श्र_२ \times म_२ = (श्र_१/उ) \times (म_१/उ)$ ... (४ व ५ वरून)

$= (श्र_१ म_१)/उ \times उ = ब_१/उ^२$ (३ वरून) ... (६)

२) एकक उत्पादनामागील श्रमविषयांमार्फत खर्च होणारे भांडवल (वि)

एकक उत्पादनामागे खर्च होणाऱ्या कायम भांडवलातील हा हिस्सा म्हणजे कच्च्या मालासारखे जे श्रमविषयाचे घटक असतात त्यांच्या मूल्याची बेरीज असते. एकक उत्पादनामागे हे घटक जितक्या मूर्त प्रमाणात लागतात त्यात उत्पादकतावाढीमुळे बदल होण्याचे कोणतेच सर्वसाधारण कारण नसते. एक किलो सुतामागे जितका कापूस लागतो तितकाच कापूस सर्वसाधारणपणे उत्पादकतावाढीनंतरही लागतो, फक्त त्या कापसात जाणारे कामगारांचे श्रम मात्र कमी होतात. पण सर्वसाधारण उत्पादकतावाढीमुळे त्या प्रत्येक घटकाचे मूल्य मात्र कमी होत असते. पूर्वीप्रमाणेच वस्तूंचे मूल्य हे सर्वसाधारण उत्पादकतेच्या प्रमाणात (उ) ने कमी होते असे धरले तर प्रत्येक घटकामार्फत क्रयवस्तूमागचे खर्च होणारे भांडवलदेखील, त्याचे मूर्त स्वरूप कायम असल्याने त्याच्या मूल्याच्या प्रमाणात घसरते व एकंदर बेरीजही त्या प्रमाणात घसरते म्हणजे थोडक्यात,

$वि_२ = वि_१/उ$ ...(७)

३) दर क्रयवस्तूमागील श्रमसाधनांमार्फत खर्च होणारे भांडवल (सा)

कायम भांडवलाचा हा हिस्सा जरा वेगळा असतो. बाकीच्या घटकांइतक्या सोप्या पद्धतीने त्याची उत्पादकतावाढीशी गणिती सांगड घालता येत नाही. पण इतर घटकांच्या संदर्भात तो कसा बदलतो याची दिशा आपल्याला निश्चित करता येते. यंत्र हे सापेक्ष वरकड-मूल्य काढण्याचे साधन कसे होते ही चर्चा आपण मागे केली आहे. एकक उत्पादनामागे त्याचा खर्च होणारा भाग हा झपाट्याने कमी व्हावा लागतो. हाच सापेक्ष वरकड-मूल्याचा आधार असतो. नवनवी यंत्रे भांडवलशाहीत येण्याचा आधार असतो.

इथे श्रमविषयांचा घटक असलेल्या मूल्याच्या संदर्भात त्याचा वेगळा संबंध ठरतो. यंत्राधिष्ठित उत्पादनाच्या विकासाचा एक निश्चित टप्पा ओलांडल्यानंतर कायम भांडवलाचा श्रमसाधनांचा खर्च दाखवणारा भाग हा श्रमविषयांमार्फत खर्च होणाऱ्या भागाच्या तुलनेन कमी होतो. याचा भांडवली स्वरूपातदेखील प्रत्यय येतो. एकक उत्पादनामागील श्रमसाधनांच्या घसाऱ्याची किंमत व त्या काळात वापरल्या गेलेल्या श्रमविषयांची किंमत यांची तुलना केली तर हे सहज दिसू शकते. याचा अर्थ असा होतो की कायम भांडवलातील बेरजेवर (वि + सा) त्याचा परिणाम हा श्रमविषयांमार्फत खर्च होणाऱ्या भांडवलाचा (वि) जो परिणाम होतो त्या मानाने नगण्य होऊ लागतो. गणिती पद्धतीने मांडायचे तर,

$$\text{सा} << \text{वि} \qquad \ldots(८)$$

आणि म्हणून, $\text{वि} + \text{सा} \approx \text{वि}$ ...(९)

याचा उपयोग केला तर खालील गोष्टी मिळतात.

$$\text{क}_{१} = \text{वि}_{१} + \text{सा}_{१} \approx \text{वि}_{१}$$

$$\text{क}_{२} = \text{वि}_{२} + \text{सा}_{२} \approx \text{वि}_{२} \qquad \ldots(१०)$$

सर्वसाधारण प्रवृत्ती : आंगिक प्रमाण वाढणे . . .

या चर्चेच्या आधारावर आपण आता भांडवलाचे आंगिक प्रमाण सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर कसे बदलते ते मांडू शकतो.

$$\text{अ}_{२} = \text{क}_{२}/\text{ब}_{२} \qquad \ldots (\text{१ वरून})$$

$$= \text{वि}_{२}/\text{ब}_{२} \qquad \ldots (\text{१० वरून})$$

$$= (\text{वि}_{१}/\text{उ})/(\text{ब}_{१}/\text{उ} \times \text{उ}) \qquad \ldots (\text{६ वरून})$$

$$= \text{उ} \times \text{अ}_{१}$$

थोडक्यात, सर्वसाधारण उत्पादकतावाढीबरोबर सर्वसाधारणपणे आंगिक प्रमाण हे उत्पादकतेच्या वाढीच्या प्रमाणात वाढते हे आपण सिद्ध केले आहे. आंगिक प्रमाण वाढणे ही भांडवली स्वरूपातील श्रमप्रक्रियेच्या विकासाची सर्वसाधारण प्रवृत्ती ठरते.

परिशिष्ट २ : असमान विनिमयाचे सिद्धांत आणि मूल्य–किंमत रूपांतर

रूपांतराच्या प्रश्नाच्या संदर्भात या ना त्या प्रकारे शोषणाचा ‘असमान विनिमया’चा सिद्धांत मांडणाऱ्या प्रवाहांची समीक्षा करणे महत्त्वाचे आहे.[१] हा प्रवाह वैचारिकदृष्ट्या एकसंध नाही. किंवा वर्गीय पाठिंब्याच्या दृष्टीने नाही, किंवा प्रगल्भतेच्या दृष्टीनेही नाही. किंमतीमार्फत होणाऱ्या मूल्याच्या वाटपामध्ये, हा सिद्धांत एक वेगळ्या प्रकारचे शोषण पाहतो. या विचारानुसार शोषक–शोषित यांच्यामध्ये जी रेघ पडते ती मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे ठरणाऱ्या शोषक–शोषित रेघेला छेद देऊन जाते. त्यांच्या मांडणीनुसार, मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे शोषक ठरणारे व शोषित ठरणारे यांचे मिळून बनलेले एखादे क्षेत्र, दुसऱ्या एका तशाच प्रकारे शोषक व शोषित यांनी मिळून बनलेल्या क्षेत्राचे शोषण करत असते. मार्क्सच्या सिद्धांताच्या वर्गीय बैठकीला हे सिद्धांत छेद देतात. त्या त्या क्षेत्रातील शोषक–शोषित संबंध गौण ठरवणे, किंवा सरळसरळ दुर्लक्षित करणे हा या सिद्धांताना एकत्र जोडणारा धागा असतो. प्रत्यक्षात ही क्षेत्रे प्रवक्त्यागणिक वेगळी असतात—कोणी उद्योगक्षेत्र हे शेतीक्षेत्राचे शोषण करते असे मांडत असते, कोणी ‘इंडिया’ हा ‘भारताचे’ शोषण करीत असल्याचे मांडत असते, कोणी संघटित क्षेत्र हे असंघटित क्षेत्राचे

शोषण करते असे मांडत असते, तर कोणी पुढारलेले देश हे मागासलेल्या देशांचे शोषण करतात असे मांडत असते.

या वादांमध्ये शोषित क्षेत्रांचे कैवारी असल्याचा दावा करणारे उपप्रवाह शेवटी सैद्धांतिकदृष्ट्या या ना त्या प्रकारच्या असमान विनिमयाच्या सिद्धांताचाच आधार घेत असतात. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. यापुढील विश्लेषणामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या किंवा क्षेत्रातल्या श्रमशक्तीच्या वेतनातील फरकामुळे असमान विनिमयामार्फत शोषण होते असे मानणाऱ्या सिद्धांतांचा विचार केलेला नाही, कारण प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे वेतन, वेतनश्रेणी व वेतनातील चढउतार यांचा आवश्यक तपशील पुस्तकाच्या कक्षेबाहेर पडतो. त्याबरोबर क्षेत्रागणिक इतकी विविधता आहे की त्या त्या प्रवाहाच्या वैशिष्ट्यांना न्याय देणे आपल्या पुस्तकाच्या कक्षेबाहेरचे आहे. आपण त्याचे सर्वसाधारण स्वरूप कसे आहे यावरच फक्त लक्ष केंद्रित करूया. या प्रवाहामध्ये जसे काही थोडे प्रामाणिक आणि प्रगल्भ अर्थशास्त्रीय प्रवाह आहेत त्याप्रमाणेच उथळ हौश्या-नवश्या-गवश्यांचीदेखील प्रचंड गर्दी आहे. त्यामुळे प्रथम आपण या सिद्धांताचे सर्वात उथळ रूप पाहू. त्यानंतर फक्त क्षेत्रीय विचारासाठी संदर्भ म्हणून शेती विरुद्ध उद्योग ही विभागणी घेऊन त्यांची जास्त गुंतागुंतीची स्वरूपे पुढील भागात तपासू.

वरकड-मूल्याचे वाटप म्हणजेच असमान विनिमय!

असमान विनिमयाचे सर्वात उथळ स्वरूप हे नफ्याचा एकच सर्वसाधारण दर तयार होताना किंमतीमार्फत वरकड-मूल्याचे जे वाटप होते, त्यालाच असमान विनिमय म्हणते. उदाहरणार्थ, १७ व्या प्रकरणात विचारात घेतलेल्या प्रतिरूपात, प्रत्येक क्षेत्रात निर्माण झालेले वरकड-मूल्य व त्याचे नफ्यात रूपांतर होऊन वाटप होऊन मिळालेले वरकड-मूल्य यांचा तक्ता खालीलप्रमाणे होता.

उत्पादन विभाग	वरकड-मूल्याची निर्मिती		नफ्याच्या रूपातील वाटप	
	वरकड-मूल्य (श्रमतास)	वरकड मूल्याचा वाटा (टक्के)	नफा (रु.)	नफ्याचा वाटा
लोखंड	१८६.७५	३०	१२,०००	६७
गहू	३११.२५	५०	४,०००	२२

सोने	१२४.५०	२०	२,०००	११
एकूण	६२२.५०	१००	१८,०००	१००

लोखंडाच्या निर्मितीत भर घालणाऱ्या कामगारांच्याकडून काढलेले वरकड-मूल्य हे एकंदर कामगारवर्गाकडून काढलेल्या वरकड-मूल्याच्या ३० टक्के होते. लोखंड उद्योगातील भांडवलदाराच्या हातात पडणारा नफा हा मात्र एकूण भांडवलदारवर्गाच्या नफ्याच्या ६७ टक्के होता. म्हणजे लोखंड उद्योगातील कामगारांकडून जितके वरकड-मूल्य काढले गेले त्याच्या दुपटीहून जास्त लोखंड उद्योगातील भांडवलदारांना मिळाले. याउलट गव्हाचे दिसते. तिथल्या भांडवलदारांना त्यांच्या उद्योगांतील कामगारांकडून जितके वरकड-मूल्य काढले गेले त्याच्या निम्म्यापेक्षाही कमी नफा म्हणून हातात मिळते! यालाच हा उथळ प्रवाह असमान विनिमय म्हणतो.

असमानतेचा आरोप करायचा तर त्यामागे एक समानतेचा निकष असतो. आणि इथे मार्क्सवरील अभिजात आक्षेपांशी त्यांचे आक्षेप जुळताना दिसतात. मूल्याच्या प्रमाणात किंमती असल्या पाहिजेत हा समानतेचा, समान विनिमयाचा निकष ते अध्याहृतपणे वापरत असतात. तो स्पष्ट करायची त्यांना गरज वाटत नाही कारण त्यांच्या मते तो साहजिकच समान विनिमय असतो. पण हाही विनिमय किती 'समान' असतो ते आपण मागे पाहिले आहे. एखादा माणूस शारीरिक व्यंगामुळे, किंवा सीमित ज्ञानामुळे आपली पूर्ण कुवत वापरून ८ तास श्रम करून १ वस्तू निर्माण करतो असे धरा. दुसरा माणूसदेखील पूर्ण कुवत वापरून ४ तास श्रम करून तीच वस्तू निर्माण करतो. तर काय होईल? त्या वस्तूचे मूल्य ठरेल १२/२ = ६ श्रमतास. दोघांनीही पूर्ण कुवत घालून श्रम केले, तरी पहिल्या माणसाला त्याने घातलेल्या दर ४ तास श्रमांमागे ३ श्रमतास मूल्य मिळेल तर दुसऱ्या माणसाला त्याने घातलेल्या दर २ तास श्रमांमागे ३ श्रमतास मूल्य मिळेल. तरीही त्यांच्या दृष्टीने तो विनिमय समानच असेल. त्याला असमान विनिमय का म्हणू नये?

क्रयवस्तूंच्या जगात त्याला असमान विनिमय म्हणता येत नाही कारण समान म्हणजे काय याची व्याख्याच क्रयवस्तूंच्या व्यवहारातल्या सामाजिक संबंधांप्रमाणे इतिहासात बदलत असते. भांडवलीपूर्व, छोटेखानी क्रयवस्तूंच्या उत्पादनामध्ये अमूर्त श्रमांच्या, मूल्याच्या पातळीवरील समानता हा एकच समानतेचा निकष असतो. ही अमूर्त समानता कदाचित वरील उदाहरणातल्या

प्रमाणे स्वाभाविक समानतेवर नांगर फिरवतही जाईल अन् तरीही ती स्वत:चे समानतेचे निकष पूर्णपणे पार पाडत असेल.

भांडवली उत्पादन प्रस्थापित झाल्यावर समानतेचा निकषदेखील बदलतो. तेव्हा पूर्वीच्या निकषावर समानता तपासता येत नाही कारण ते निकष ज्या परिस्थितीतून आले ती परिस्थितीच कालबाह्य झालेली असते. आता निकष असतो तो सर्वसाधारण नफ्याच्या दराचा, आपल्या भांडवलाच्या प्रमाणात 'वाजवी' नफ्याचा. वाजवीपेक्षा जास्त नफा ही नफेखोरी ठरते. खरे तर सगळेच भांडवलदार त्यासाठी प्रयत्न करत असतात! पण फार काळ एखाद्याच क्षेत्रात 'नफेखोरी' वाढली तर इतर भांडवलदारांना सामूहिक पोटशूळ होतो. त्या क्षेत्रावर बंधने येतात किंवा स्पर्धा वाढते. सर्वसाधारण नफा हाच समानतेचा निकष प्रत्यक्षात सामाजिक संबंधांमध्ये अंतर्भूत झालेला असतो.

आणि त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे यातून गहू क्षेत्राचे, लोखंड क्षेत्राकडून शोषण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शोषण होत असते गहू आणि लोखंड दोन्ही क्षेत्रांतील कामगारांचे आणि हे शोषण करीत असतात ते गहू आणि लोखंड दोन्ही क्षेत्रातील भांडवलदार. या लाटलेल्या मालाचे वाटप तुझ्यामाझ्यात कसे करायचे या भांडवलदारांमधल्या प्रश्नासाठी कुठले समानतेचे निकष लावायचे? लाटलेल्या मालाचे चोरांमध्ये वाटप कसे व्हावे हे शेवटी त्या चोरांच्या टोळीच्याच समानतेच्या निकषावर ठेवावे लागते. तो निकष असतो सर्वसाधारण नफ्याचा दर. समजा एका चोराने जास्त पैसे लाटले व दुसऱ्याने कमी. त्या टोळीचा नियम लूट एकत्र करून ती पूर्वीच्या लुटीच्या प्रमाणात वाटायची असा आहे. त्याप्रमाणे पहिल्या चोराला आता त्याने आणलेल्या लुटीपेक्षा कमी भाग मिळतो तर दुसऱ्या चोराला त्याच्या लुटीपेक्षा जास्त भाग मिळतो. स्वत:च्या अध्याहृत स्वाभाविक समानतेच्या कल्पनांपलिकडे त्या परिस्थितीची जाण नसलेला एखादा येतो आणि म्हणतो की तुम्ही हे सगळे पैसे एकत्र करून पुन्हा वाटता त्यामध्ये या पहिल्या माणसाचा पैसा दुसऱ्या माणसाच्या हातात जातोय हे शोषण आहे! असमान विनिमयाचे वरील प्रकारचे सिद्धांत नेमके हेच करीत असतात!

थोडक्यात सांगायचे तर प्रश्न असतो तो भांडवलदारांमधील वरकड-मूल्याच्या समान वाटपाचा, दोन क्षेत्रांमधील समान विनिमयाचा नव्हे. कारण क्षेत्र नावाचा प्रकारच दुंभगलेला असतो. दोन क्षेत्रांतल्या चोरांचे लुटीच्या वाट्यावरुन चाललेले ते भांडण असते. एका क्षेत्राने दुसऱ्या क्षेत्राचे शोषण करण्याचा प्रश्न

नसतो, तर दोन्ही क्षेत्रांतील भांडवलदारांनी दोन्ही क्षेत्रांतील शोषितांचे शोषण करून जमा केलेला माल भांडवलदारांमध्ये कसा वाटला जावा याचा प्रश्न असतो. ही सैद्धांतिक गल्लत असमान विनिमयाच्या सिद्धांतामध्ये असते. आणि ती शेवटी शोषित ठरवल्या गेलेल्या क्षेत्रामधील भांडवलदार वर्गांच्या हिताची असते. त्यांना त्यायोगे कामगार-कष्टकरी वर्गांमध्ये फूट पाडून त्यांपैकी एक विभाग हा आपल्या मागे खेचता येतो.

प्रामाणिक समर्थकांसमोरील निम्नभांडवली उत्पादक

असमान विनिमयाच्या प्रामाणिक समर्थकांना मात्र शोषित ठरवलेल्या क्षेत्रामधील फक्त भांडवलदार कामगार बहुश: अभिप्रेत नसतात. त्यांना एक पिचत जाणारा, स्वत:च्या श्रमसाधनांवर श्रम करून उत्पादन करणारा निम्नभांडवली कष्टकरीदेखील अभिप्रेत असतो. याचे सर्वात बहुचर्चित उदाहरण शेतीक्षेत्राचे आहे. आपण तेच उदाहरण घेऊन पुढे जाऊया. पण अर्थात शेतीक्षेत्रातील शोषणाची वैशिष्ट्ये व प्रगत भांडवली उद्योगक्षेत्र आणि शेती यांचा संबंध तपशीलवार येथे तपासायचा नाही; तो वेगळाच, जास्त गुंतागुंत असलेला विषय आहे. येथे केवळ असमान विनिमयाच्या प्रश्नाचे सर्वसाधारण सैद्धांतिक स्वरूप स्पष्ट व्हावे इतक्याच दृष्टीने हे उदाहरण घेतले आहे.

असमान विनिमयाच्या सर्वात उथळ रूपाची चर्चा करताना आपण हा निम्नभांडवली कष्टकरी नजरेआड केला होता. त्यामुळे असमान विनिमयाचे प्रामाणिक समर्थक म्हणू शकतात की, काय हा दुटप्पीपणा! काही थोडके मजूर लावणाऱ्या शेतकऱ्यांना फार तर तुम्ही भांडवलदार म्हणून तुमच्या चोरांच्या टोळीत सामील करून टाकाल. पण जरा सर्वसाधारण शेतकऱ्याकडे पहा. त्याची काय परिस्थिती आहे, तो कसा दिवसेंदिवस देशोधडीला लागून शहराकडे धाव घेतो, रोजगार हमीच्या आणि दुष्काळाच्या कामावर कसा उतरतो, त्याला जमीन विकावी कशी लागते ते सर्व पहा आणि मग बोला. आम्ही असमान विनिमयाबद्दल बोलतो त्याचे कारण हे आहे. असमान विनिमयातून सधन, भांडवली शेतकऱ्यांसह संपूर्ण शेतीक्षेत्राचे उद्योगक्षेत्राने जे शोषण चालवले आहे त्याचा हा परिपाक आहे. सर्वसाधारण शेतकऱ्यांचा समावेश न करणाऱ्या प्रतिरूपांच्या आधारावर बोलणे आणि असमान विनिमयाचे सिद्धांत खोडून काढणे सोपे आहे!

या रास्त प्रश्नाला योग्य उत्तर दिल्याशिवाय मार्क्सचा रूपांतराचा सिद्धांत पूर्ण प्रस्थापित होणार नाही. तेच आपल्याला करावे लागणार आहे. पण त्याबरोबरच आपण ज्या निष्कर्षांपर्यंत त्यातून पोचू त्याचा संदर्भदेखील दिशा स्पष्ट करण्यासाठी आवश्यक आहे. मार्क्सच्या पद्धतीने याचे उत्तर येते की खरेच, निम्नभांडवली शेतकऱ्याचे शोषण होत असते. पण ते शोषण उद्योगक्षेत्रातील भांडवलदार व कामगार मिळून करत नसतात. उलट औद्योगिक भांडवलदारवर्ग व भांडवली शेतकरी मिळून एकंदर भांडवलदारवर्गच त्यांचे शोषण करीत असतो. आणि या शोषणामध्ये विनिमय समान असो किंवा असमान असो, भांडवली शेतकरी हा या शोषणाच्या प्रक्रियेचा जैव व कळीचा भाग असतो. त्याच्यामार्फतच हे शोषण होत असते. आणि त्यामुळे हे शोषण शेतीक्षेत्राचे उद्योगक्षेत्राने केलेले शोषण आहे असे म्हणणे सैद्धांतिकदृष्ट्या चुकीचे आहे व वर्गीय दृष्ट्या भांडवली शेतकऱ्यांची तळी नाहक उचलून धरणारे धोक्याचे समर्थन आहे. हेच आपल्याला सिद्ध करायचे आहे.

निम्नभांडवली उत्पादकांचा प्रतिरूपात समावेश

१७व्या प्रकरणामधील प्रतिरूपाकडे आपण त्यासाठी परतूया. तेथे आपण गव्हाच्या भांडवली उत्पादनाचे वर्णन करणारे समीकरण खालीलप्रमाणे मांडले होते.

$$३० म_{१} + म_{२} + ५०० म_{०} + ५०० (१-म_{०}) = १० म_{२} \qquad \ldots (क)$$

थोडक्यात ३० टन श्रमसामुग्री व एक टन गहू यांच्या साहाय्याने भांडवली शेतकऱ्यासाठी ५०० तास श्रम घालून शेतमजूर १० टन गव्हाचे उत्पादन करतात. आता याच्या जोडीला निम्नभांडवली शेतकऱ्याचा समावेश आपण करू. त्यांच्याकडे सर्वसाधारणपणे श्रमसाधने वरील मानाने कमी असतील व तसेच त्यांच्या श्रमांची उत्पादकता कमी असेल. आपण टोकाची परिस्थिती धरूया, की काहीही श्रमसामुग्री न वापरता, एक टन गहू वापरून १००० श्रमतासांच्या साहाय्याने ते तितकाच म्हणजे १० टन गहू निर्माण करतात. त्याचे खालीलप्रमाणे समीकरण तयार होईल.

$$म_{२} + १००० = १० म_{२} \qquad \ldots (ख)$$

बाजारात हे दोन्ही उत्पादन एक होऊन त्या समीकरणांच्या बेरजेवरुन मूल्य ठरेल. ते समीकरण खालीलप्रमाणे येईल.

$$३०म_{१} + २म_{२} + ५०० म_{०} + ५०० (१-म_{०}) + १००० = २० म_{२} \ldots (ग)$$

$म_१$ = ६ श्रमतास हे पूर्वीप्रमाणे धरून आपण $म_२$ ची व त्यावरुन $म_०$ आणि १–$म_०$ ची किंमत काढू शकतो.

$म_२$ = ९३.३ श्रमतास

$म_०$ = ०.४७ श्रमतास

१–$म_०$ = ०.५३ श्रमतास

बाजारामध्ये आता दर टनाला ९३.३ श्रमतास याप्रमाणे गहू विकला जातो. निम्नभांडवली शेतकऱ्याचे खर्च होणारे व हातात पडणारे मूल्य यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे दिसेल.

हातात पडणारे मूल्य = १० × ९३.३ = ९३३.० श्रमतास

खर्च होणारे मूल्य = १ × ९३.३ = ९३.३ श्रमतास

१००० तास श्रमांचा मोबदला = ८३९.७ श्रमतास

निम्नभांडवली शेतकऱ्यांच्या हातात १००० तास श्रम करून ८३९.७ श्रमतास मूल्य येते. त्यांच्याकडून १६०.३ तास श्रम काढून घेतले गेले आहेत. ही प्रक्रिया व भांडवलदारांमध्ये वरकड–मूल्याचे नफ्यामार्फत होणारे वाटप ही प्रक्रिया या दोन्हीमधील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे असते. 'अ' क्षेत्रातील भांडवलदारांकडून जेव्हा काही वरकड–मूल्य 'ब' क्षेत्रातील भांडवलदाराच्या हाती पडते तेव्हा शोषणाचा प्रश्न नसतो. 'अ' क्षेत्रातील भांडवलदाराकडून 'ब' कडे जाणारे वरकड–मूल्य हे दुसऱ्यांच्या विनामोबदला श्रमातून आलेले होते, नफा मिळवणाऱ्या वर्गाच्या वरकड–मूल्याचा तो भाग होतो. याउलट निम्नभांडवली शेतकरी हा नफा मिळवणारा नव्हे तर स्वत:च्या श्रमांचा मोबदला मिळवणारा वर्ग असतो. त्यांच्याकडून १६०.३ श्रमतास काढून घेतले जाणे याचा अर्थ त्याचे तितके शोषण होते असा होतो. (एक लक्षात घ्या, गव्हाला एक भाव पडला पाहिजे या समान विनिमयाच्या गरजेतून हे झाले आहे.) पण हे १६०.३ श्रमतास जातात कुठे?

त्यासाठी आपल्याला भांडवली शेतकऱ्याचा ताळेबंद काढावा लागले.

हातात पडणारे मूल्य	**खर्च होणारे मूल्य**
१० $\times$ ९३.३ = ९३३ श्रमतास	३० $\times$ ६ = १८०.० श्रमतास
	१ $\times$ ९३.३ = ९३.३ श्रमतास
	५०० $\times$ ०.४७ = २३५.० श्रमतास
	५०८.३ श्रमतास
	हातात पडणारे वरकड-मूल्य = ४२४.७ श्रमतास
	९३३.० श्रमतास

गणितातील आकडे सन्निकट (ॲप्रॉक्झिमेट) आहेत

भांडवली शेतकऱ्यांच्या हातात शेतमजुरांच्या शोषणातून वरकड-मूल्य मिळत असते (५००(१-म०) = ५०० $\times$ ०.५३ = २६५) ते वजा केले की आपल्याला जे जादा वरकड-मूल्य उरलेले सापडते ते या निम्नभांडवली शेतकऱ्याकडून काढलेल्या श्रमांइतकेच असते. शेतीक्षेत्रात निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून काढले गेलेले श्रम प्रथम भांडवली शेतकऱ्याच्या हातात जादा वरकड-मूल्याच्या रूपात साठतात. अर्थात ते तिथेच राहत नाहीत. इतर भांडवलदारांचाही त्यावर हक्क असतो! वरकड-मूल्याच्या प्रस्थापित माध्यमांमधून त्यांचे वाटप होऊन भांडवली शेतकऱ्यांसकट संपूर्ण भांडवलदारवर्गात वाटप होते. त्यातला कणभरदेखील कामगारांच्या हाती पडत नाही. म्हणजे उद्योगक्षेत्रांतील भांडवलदार भांडवली शेतकऱ्यांच्या मार्फत व त्यांना त्यांचा वाटा देऊन, निम्नभांडवली शेतकऱ्यांचे शोषण करत असतात. मग याला औद्योगिक भांडवलदार आणि कामगार मिळून बनलेल्या औद्योगिक क्षेत्राने, भांडवली शेतकरी व इतर निम्नभांडवली शेतकरी मिळून बनलेल्या शेतीक्षेत्राचे केलेले शोषण कशासाठी म्हणायचे?

प्रतिरूपामध्ये असमान विनिमयाचाही समावेश

असमान विनिमयाच्या समर्थकांना या विश्लेषणात मेख मारायला अजून जागा आहे. आपण अजूनही वस्तू मूल्यनिर्मित किंमतीना विकल्या जातात असे गृहीत धरून चाललो होतो. एखाद्या क्षेत्राच्या वस्तू मूल्यनिर्णित किंमतीच्या खाली विकल्या जाणे हे खरोखरीच असमान विनिमयाचे लक्षण असते. प्रत्यक्षात हा असमान विनिमय होत आहे की नाही हा एक जटिल आणि वेगळा प्रश्न आहे.

आपल्याला एक वेगळा सैद्धांतिक प्रश्न तपासायचा आहे. एखाद्या क्षेत्रातील माल हा मूल्यनिर्णित किंमतीच्याखाली विकला जात असेल असे धरून, असमान विनिमय गृहीत धरून देखील, त्यातून एका क्षेत्राने दुसऱ्या क्षेत्राचे केलेले शोषण सिद्ध होते का? हा प्रश्न आपल्या वरील उदाहरणावरून आपण तपासून पाहूया.

आपण आता असे धरून चालूया की गहू हा ९३.३ श्रमतास या मूल्याने निर्णीत होणाऱ्या किंमतीऐवजी आता ७५.५ श्रमतास या मूल्याने निर्णीत होणाऱ्या किंमतीला विकला जात आहे. थोडक्यात आता त्या क्रयवस्तूच्या किंमतीमार्फत ७५.५ श्रमतास मूल्य व्यक्त होत आहे. तसे धरले तर आपल्याला निम्नभांडवली शेतकऱ्याचा खालील ताळेबंद मिळतो.

हातात पडणारे मूल्य = १० × ७५.५ = ७५५.० श्रमतास

खर्च होणारे मूल्य = १ × ७५.५ = ७५.५ श्रमतास

१००० तास श्रमांचा मोबदला = ६७९.५ श्रमतास

निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून आता तब्बल ३२०.५ श्रमतास काढले जात असतात. त्याचे शोषण जवळजवळ दुप्पट झालेले असते.

तरीही भांडवली शेतकरी शोषकच राहतो

आणि भांडवली शेतकऱ्याचे काय होते? वरवर पाहता असे भासते की त्यांना आता वाजवी नफा होत असावा, त्यांचे जादा वरकड-मूल्य पुसले गेले असावे, कारण १७व्या प्रकरणामध्ये प्रतिरूपासाठी जी समीकरणे आपण वापरली होती त्याप्रमाणे त्यांच्यासाठी गव्हाचे मूल्य ७५.५ ठरत होते. आता बाजारपेठेतील किंमतही ७५.५ श्रमतास मूल्याने निर्णीत किंमतच आहे. तेव्हा त्याला जादा वरकड-मूल्य मिळत नसावे, आणि त्यामुळेच निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून जे श्रम काढले गेले आहेत त्यांचाही भाग मिळत नसावा असे भासते.

हे वरवर पाहता झाले, पण जरा खोलात जाऊन पाहू. गहू जर मूल्यनिर्णीत किंमतीच्या खाली विकला जाऊ लागला तर कामगारांचे तासामागचे वेतन, त्यांना पैशात द्यावे लागणारे मूल्य घसरते. (श्रमशक्तीचे मूल्य घसरत नाही.) अजूनही एक तासाच्या श्रमशक्तीच्या मोबदल्यात पूर्वीइतक्याच मूल्याचे पूर्वीइतकेच गहू मिळत असतात. पूर्वी गहू मूल्यनिर्णीत किंमतीला विकला जात होता तेव्हा पैशाच्या रूपात द्यावे लागणारे त्याचे मूल्य होते. म = ०.००५ ×

९३.३ = ०.४७ श्रमतास. त्याऐवजी गव्हाचे मूल्य तेच असूनदेखील पैशाच्या रूपात त्याला द्यावे लागणारे तासाचे वेतन हे आता व = ०.००५ × ७५.५ = ०.३८ श्रमतासाइतके असते.

त्यामुळे प्रत्यक्षात वरकड-मूल्याचा दर वाढला नसला तरी अप्रत्यक्षपणे आता पैशाच्या रूपात वेतनाची बचत झाल्यामुळे कामगारांच्या दर तासामागे आता ०.४७—०.३८ = ०.०९ श्रमतासानी वरकड-मूल्य वाढते. हे वाढलेले वरकड-मूल्य कामगारांकडून काढलेल्या वरकड श्रमातून येत नाही, तर ते प्रत्येक भांडवलदाराला सर्व निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून काढलेल्या श्रमांचा भाग म्हणून मिळत असतात. त्यामुळे आता भांडवलदारवर्गात वाटपासाठी उपलब्ध झालेले वरकड-मूल्य म्हणजे कामगारवर्गाकडून काढलेले वरकड-मूल्य आणि निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून हस्तगत केलेले मूल्य यांचे मिळून बनलेले असते. आणि भांडवली शेतकऱ्यालाही या प्रक्रियेमधून निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून काढलेल्या मूल्याचा यथायोग्य हिस्सा असमान विनिमयातदेखील मिळत असतोच.

उदाहरणार्थ, आता भांडवली शेतकऱ्याचा पैशाच्या रूपात व्यक्त होणारा मूल्याचा हिशेब खालीलप्रमाणे होईल. (गणितातील आकडे सन्निकट आहेत.)

हातात पडणारे मूल्य	**खर्च होणारे मूल्य**
१० × ७५.५ = ७५५ श्रमतास	३० × ६ = १८०.० श्रमतास
	१ × ७५.५ = ७५.५ श्रमतास
	५०० × ०.३८ = १९०.० श्रमतास
	४४५.५ श्रमतास
कामगारांकडून काढलेले वरकड-मूल्य	५०० × ०.५३ = ४२४.७ श्रमतास
निम्नभांडवली शेतकऱ्यांकडून काढलेले वाढीव वरकड-मूल्य	५०० × ०.०९ = ४५ श्रमतास
	७५५.० श्रमतास

गणितातील आकडे सन्निकट (ॲप्रॉक्झिमेट) आहेत

निम्नभांडवली विभागांचा आपल्या प्रतिरूपात समावेश करूनदेखील आपण पुन्हा त्याच निष्कर्षापर्यंत पोचतो. निम्नभांडवली विभागांचे नक्कीच शोषण होत

असते. त्यांच्या शोषणाचे फळ संपूर्ण भांडवलदारवर्गाला मिळत असते. भांडवली संबंध हेच त्यांच्या शोषणाच्या मुळाशी असतात—विनिमय असमान असो का नसो, या कारणात फरक पडत नाही. त्यांच्या शोषणाचे फळ त्याच क्षेत्रातील भांडवली विभागानाही मिळत असते आणि त्या क्षेत्रातले भांडवली विभाग हेच त्या शोषणाचे माध्यम असतात. त्यांच्या मार्फतच शोषणाचे फळ संपूर्ण भांडवलदारवर्गात वाटले जात असते. आणि त्या शोषणाच्या फळाचा काडीचाही भाग हा इतर क्षेत्रातील कामगारांच्या पदरी पडत नसतो. इतके सगळे असताना याला औद्योगिक क्षेत्राने शेतीक्षेत्राचे केलेले किंवा एका क्षेत्राने दुसऱ्या क्षेत्राचे केलेले शोषण कशाला म्हणायचे? असमान विनिमयाच्या सिद्धांताच्या मांडणीतून फक्त एखाद्या क्षेत्रातील निम्नभांडवली विभागांच्या शोषणाला तोंड फोडले जात नसते. ही मांडणी त्याच्या पुढे जाऊन त्या क्षेत्रातील भांडवली विभागांचे हितच पुढे रेटण्याचे सामाजिक स्थान बजावीत असते. अन् त्यामुळे पिचत चाललेल्या निम्नभांडवली विभागांच्या शोषणाला वाचा फोडण्यासाठी असमान विनिमयाचे सिद्धांत मांडणाऱ्या प्रामाणिक विचारवंतांच्या भोवती पाहता पाहता भांडवली विभागीय हितसंबंध बाळगणाऱ्या हौश्या-नवश्या-गवश्यांचे कोंडाळे तयार होते!

शेवटी पुन्हा क्रयवस्तूंचे विभूतिकरण

थोडक्यात, असमान विनिमयाचे सिद्धांत मांडणाऱ्या भांडवली प्रवाहांची रूपांतराच्या संदर्भात मार्क्सला छेद देणारी मांडणी कुचकामी ठरते. तिच्यामागे अनेकदा सद्हेतू व शोषणाविरुद्धची बंडखोरी असते खरी पण तीदेखील आपली भांडवली चौकट ओलांडू शकत नाही. कारण असमान विनिमयाच्या या सिद्धांतांच्या तोकडेपणामागे आपल्याला शेवटी काय आढळते? क्रयवस्तूंचे विभूतिकरण! कारण इथेही रंगमंचाच्या मध्यभागी असते क्रयवस्तू. अशी क्रयवस्तू की जी मूल्यनिर्णीत किंमतीपेक्षा कमी भावाने विकली जात असते. या क्रयवस्तूपुरत्या बांधल्या जाणाऱ्या संबंधावर फक्त नजर ठेवली, त्यामार्फत व्यक्त होणारे सामाजिक-वर्गीय संबंध नजरेआड केले तर काय उरते? त्या त्या क्रयवस्तूशी जोडलेले क्षेत्र—ज्याच्यातील धागा एक समान क्रयवस्तू आहे अशी एक वर्गविहीन संकल्पना! असमान विनिमयाच्या भांडवली सिद्धांतांची वैज्ञानिकताही शेवटी क्रयवस्तूंच्या विभूतिकरणापर्यंत येऊन अडखळून थांबते.

---

[१] असमान विनिमयाच्या वरील सिद्धांताबरोबरच पिअरो स्राफाप्रणीत नवरिकार्डोवादी आक्षेपांची समीक्षा करणे हे देखील आज एक महत्त्वाचे सैद्धांतिक काम आहे. पण तो एक स्वतंत्र व विस्तृत विषय आहे. त्या विस्तारामुळे या पुस्तकाच्या कक्षेत ते घेणे शक्य झालेले नाही.

परिशिष्ट ३ : मूल्याचे किंमतीत टप्प्याटप्प्याने रूपांतर

भांडवलदारांमध्ये आपापसात कोणते संबंध बांधले जात आहेत, कोणकोणते भांडवली विभाग कोणकोणत्या पद्धतीने वरकड-मूल्याचा भाग मिळवीत आहेत, व नफ्याचा दर कोणत्या आधारावर ठरत आहे त्याप्रमाणे मूल्याचे किंमतीत व वरकड-मूल्याचे नफ्यात होणारे रूपांतर बदलत असते. त्याचे मूल्याच्या भाषेतील वर्णन पुस्तकामध्ये येऊन गेलेच आहे. आणि हे रूपांतरित मूल्याच्या भाषेत किंवा किंमतीमार्फत होणे महत्त्वाचे आहे याची नोंदही तिथे घेतली आहे. या परिशिष्टामध्ये आपण एका प्रतिरूपाच्या आधारे या गणिती रूपांतरामधील समीकरणांचे स्वरूप व त्यातून येणाऱ्या उत्तरांचे स्वरूप पाहणार अहोत. उत्पादनाची एकच अवस्था कायम ठेवून आपण त्यात फक्त वरकड-मूल्याचे बदलते वाटप टप्प्याटप्प्याने कसे होत जाते ते पाहणार अहोत.

पुस्तकातील रूपांतराच्या प्रकरणाप्रमाणेच आपण याही प्रतिरूपात लोखंड, गहू व सोने या तीन प्रातिनिधिक क्रयवस्तूंचे उत्पादन होत आहे असे गृहीत धरीत आहोत. प्रतिरूपामध्ये आपण खालील चिन्हे सर्व समीकरणसंचांमध्ये वापरणार आहोत. प्रतिरूपातील आकडे हे पद्धती स्पष्ट करण्यापुरते केवळ उदाहरणादाखल निवडलेले आहेत.

लोखंडाचे दर टनामागे मूल्य = $म_१$ श्रमतास व किंमत = $कि_१$ रुपये

गव्हाचे दर टनामागे मूल्य = $म_२$ श्रमतास व किंमत = $कि_२$ रुपये

सोन्याचे दर दहा ग्रॅमचे मूल्य = $म_३$ श्रमतास व किंमत = $कि_३$ रुपये

एक तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य = $म_०$ श्रमतास व वेतन = व रुपये

नफ्याचा सर्वसाधारण दर = न (अपूर्णांकामध्ये, टक्क्यांमध्ये नव्हे)

सर्व समीकरणसंचांमध्ये सोने ही क्रयवस्तू पैशाचा आधार धरलेली आहे. तेव्हा सोन्याचे दहा ग्रॅम हे २ हजार रुपयांचे किंमतीचे परिमाण गृहीत धरले आहे. त्यामुळे सर्व किंमत संचांमध्ये $कि_३$ = २००० रुपये समीकरणाचा समावेश आहे.

त्याबरोबरच सर्व समीकरणसंचांमध्ये श्रमशक्तीचे मूल्य ज्या जीवनमानावरून ठरायचे ते गव्हाच्या स्वरूपात १० किलो किंवा ०.०१ टन धरले आहे. त्यामुळे मूल्यसंचामध्ये $म_०$ = ०.०१ $म_२$ व सर्व किंमत संचांमध्ये व = ०.०१ $कि_२$ या समीकरणांचा समावेश आहे.

मूल्यसंच

मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये पुढील श्रमप्रक्रियेचे घटक गृहीत धरले आहेत.

१. ६१.१ टन लोखंडासाठी श्रमसामुग्री = २० टन लोखंड, ६०० तासांची श्रमशक्ती.

२. ६० टन गव्हासाठी श्रमसामुग्री = १२ टन लोखंड, २ टन गहू, १६०० तासांची श्रमशक्ती.

३. १२०० ग्रॅम सोन्यासाठी श्रमसामुग्री = १० टन लोखंड, ४०० तासांची श्रमशक्ती.

त्यानुसार मूल्यसंचातील समीकरणे खालीलप्रमाणे येतात.

२० $म_१$ + ६०० = ६१.१ $म_१$ ...१

१२ $म_१$ + २ $म_२$ + १६०० = ६० $म_२$ ...२

१० $म_१$ + ४०० = १२० $म_३$ ...३

$म_०$ = ०.०१ $म_२$ ...४

या समीकरणातून मिळणारी उत्तरे खालीलप्रमाणे येतात. (उत्तरे शतांशापर्यंत मांडलेली आहेत.)

$म_१$ = २३.४६ श्रमतास = एक टन लोखंडाचे मूल्य

$म_२$ = २७.५९ श्रमतास = एक टन गव्हाचे मूल्य

$म_३$ = ३.३३ श्रमतास = दहा ग्रॅम सोन्याचे मूल्य

$म_०$ = ०.२७५९ श्रमतास = एक तासाच्या श्रमशक्तीचे मूल्य

यावरून काढलेला टक्क्यांमधला वरकडमूल्याचा दर (पूर्णांकापर्यंत) खालीलप्रमाणे येते.

वरकड मूल्याचा दर = २६२ टक्के.

या संचातील एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. उत्पादनात खर्च झालेले लोखंड = २० + १२ + १० = ४२ टन येते तर लोखंडाचे उत्पादन हे ६१.१ टन आहे. साधे पुनरुत्पादन गृहीत धरले असल्यामुळे उरलेले ६१.१ - ४२ = १९.१ टन लोखंड हे उत्पादनात घातले जाऊ शकत नाही कारण तो भांडवल-संचय होईल. तेव्हा या १९.१ टन लोखंडाचे काय होते असा प्रश्न उभा राहू शकतो. त्यासाठी आपल्याला हे लक्षात घ्यावे लागेल की भांडवली स्वरूपातील पुनरुत्पादनात रूपांतर ही अनुत्पादक प्रक्रियाही आवश्यक असते. आपण शेवटच्या किंमतसंचयाशी पोचू तेव्हा आपल्याला असे आढळेल की उत्पादक आणि अनुत्पादकरीत्या (किंवा मूल्यनिर्मितीत व मूल्यरूपांतरात) मिळून खर्च झालेले लोखंड हे बरोबर साध्या पुनरुत्पादनाच्या अटी पूर्ण करीत असेल.

किंमत संच१

या किंमतसंचासाठी आपण स्थिर भांडवल नजरेआड करीत आहोत व भांडवलदारांमधील औद्योगिक भांडवलदाराखेरीज सर्व विभाग देखील नजरेआड करीत आहोत. या गृहीताच्या आधारावर पुस्तकात वर्णन केलेल्या मूल्यसंबंधांवरून पुढील समीकरणांचा संच मिळेल.

$२०कि_१ + ६००व + न(२०कि_१ + ६००व) = ६१.१\ कि_१$ ... १.१

$१२कि_१ + २कि_२ + १६००व + न(१२कि_१ + २कि_२ + १६००व) = ६०कि_२$ ... १.२

$१०कि_१ + ४००व + न(१०कि_१ + ४००व) = १२०कि_३$ ... १.३

$व = ०.०१\ कि_२$ ... १.४

$कि_३ = २०००$ ... १.५

या समीकरणांवरून खालील उत्तरे मिळतात.

$कि_१$ = एक टन लोखंडाची किंमत = ७,१८५.८८ रुपये

$कि_२$ = एक टन गव्हाची किंमत = ९,३०३.७१ रुपये

$कि_३$ = दहा ग्रॅम सोन्याची किंमत = २,०००.०० रुपये

व = एक तासाचे वेतन = ९३.०४ रुपये

न = नफ्याचा दर = १.२००३ = १२०.०३ टक्के

किंमतसंच२

या किंमतसंचामध्ये आपण स्थिर भांडवल विचारात घेणार आहोत. परंतु भांडवलदारांमधले औद्योगिक भांडवलदारांखेरीज निरनिराळे प्रकार बाजूलाच ठेवणार अहोत. त्यामुळे आता आपल्याला स्थिर भांडवलामार्फत गुंतवलेल्या भांडवलात व खर्च झालेल्या भांडवलात जी तफावत असते तिचा विचार करावा लागेल. आपण त्यासाठी असे गृहीत धरू की लोखंड, गहू व सोने यांच्या उत्पादनात लोखंडामध्ये (श्रमसाधनांमध्ये) गुंतलेले भांडवल हे खर्च झालेल्या लोखंडाच्या अनुक्रमे १० पट, २ पट व ५ पट असते. त्यानुसार आपल्याला खालील समीकरणांचा संच मिळेल.

$$२०कि_१ + ६००व + न(१०\times२०कि_१ + ६००व) = ६१.१कि_१ \quad ... २.१$$

$$१२कि_१ + २कि_२ + १६००व + न(२\times१२कि_१ + २कि_२ + १६०० व) = ६० कि_१ \quad ...२.२$$

$$१०कि_१ + ४००व + न(५ \times १०कि_१+४००व) = १२० कि_३ \quad ...२.३$$

$$व = ०.०१ कि_२ \quad ...२.४$$

$$कि_३ = २००० \quad ...२.५$$

या समीकरणातून मिळणारी उत्तरे खालीलप्रमाणे येतात.

$कि_१$ = एक टन लोखंडाची किंमत = ११,१२९.२६ रुपये

$कि_२$ = एक टन गव्हाची किंमत = ४,८२४.८४ रुपये

$कि_३$ = दहा ग्रॅम सोन्याची किंमत = २,०००.०० रुपये

व = एक तासाचे वेतन = ४८.२५ रुपये

न = नफ्याचा दर = ०.१९०० = १९ टक्के.

या व पुढील सर्व संचांमध्ये आपण लोखंड हे उत्पादनक्षेत्र हे श्रमसाधनांना समांतर धरीत आहोत. त्यामुळे गव्हाचे क्षेत्र सोडता इतर ठिकाणी श्रमविषयांना

समांतर अशी गोष्ट उरत नाही. अर्थात आणखी एका समीकरणाचा समावेश करून हे करता येते पण त्याने रूपांतराच्या प्रश्नामध्ये फारसा फरक पडत नाही. त्यामुळे त्याचा समावेश केलेला नाही.

किंमतसंच३

या किंमतसंचामध्ये आपण व्यापारी भांडवलदारांच्या विभागाचा समावेश समीकरणांमध्ये करणार आहोत. त्यामुळे अर्थातच आपल्याला औद्योगिक भांडवलदारांच्या मूल्यनिर्मितीबाहेरील खर्चाचाही समावेश करावा लागणार आहे. खालील संचामध्ये स्थलांतराच्या क्षेत्रातील भांडवलदारांचा प्रश्न नजरेआड केला आहे कारण औद्योगिक भांडवलदारांपेक्षा त्यांचा प्रश्न फारसा वेगळा नाही हे अगोदरच दाखवले गेले आहे. या संचासाठी खालील गोष्टी गृहीत धरल्या आहेत.

लोखंड, गहू व सोने या तिन्ही क्षेत्रातील औद्योगिक भांडवलदारांचा रूपांतराच्या प्रक्रियेतील लोखंडाचा खर्च हा त्यांच्या मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेतील लोखंडाच्या खर्चाच्या अनुक्रमे ०.५, ०.२ व ०.२५ पट गृहीत धरला आहे व तसेच श्रमशक्तीचा खर्च अनुक्रमे १.००, ०.२० व ०.५० पट धरलेला आहे. खर्च झालेल्या लोखंडाचे मूल्य व त्यात गुंतवलेले मूल्य यांची तफावत पूर्वीप्रमाणेच अनुक्रमे १०, २ व ५ पट गृहीत धरली आहे.

लोखंड, गहू व सोने या तिन्ही क्षेत्रातील व्यापारी भांडवलदारांचा लोखंडाचा खर्च हा अनुक्रमे १.५०, १.१ व ०.५ टन धरलेला आहे. त्यांचा श्रमशक्तीचा खर्च हा अनुक्रमे १२०, ३२० व ८० श्रमतास धरलेला आहे व खर्च झालेल्या लोखंडाचे व त्यात गुंतवलेले मूल्य यांच्यातील तफावतही अनुक्रमे १०, २ व ५ पट धरली आहे.

ह्याबरोबर क्रयवस्तूंचा एकंदर सामाजिक पातळीवरील खांदेपालटाचा काळ तोच राहतो असे धरून, तिन्ही क्षेत्रांमध्ये व्यापारी भांडवलदारांमुळे औद्योगिक भांडवलदारांच्या खांदेपालटाच्या काळामध्ये अनुक्रमे ०.७५, ०.२५ व ०.५० पटीने बचत होत आहे असे गृहीत धरले आहे आणि गुंतवलेले भांडवल हे खांदेपालटाच्या काळाच्या सरळ प्रमाणात बदलते असे गृहीत धरले आहे.

या गृहीतांवरून आपल्याला किंमतसंच पूर्वीइतक्या सहजपणे उभा करता येणार नाही. त्यासाठी आपल्याला टप्प्याटप्प्याने जावे लागेल.

किंमतसंच३ : पहिला टप्पा (औद्योगिक भांडवलदारांचे गुंतलेले भांडवल)

औद्योगिक भांडवलदारांच्या गुंतलेल्या भांडवलाला आपण तीनही क्षेत्रांसाठी अनुक्रमे अ१, अ२, अ३ अशी चिन्हे वापरू. तेव्हा वरील गृहीतांवरून,

$$(१०\times२०कि_{१} + ६००व + १०\times०.५\times२०कि_{१} + १\times६००व)(१ - ०.७५) = अ_{१} \quad ... ३.११$$

$$(२\times१२कि_{१} + २कि_{२} + १६००व + २\times०.२\times१२कि_{१} + ०.२\times१६००व)(१ - ०.२५) = अ_{२} \quad ...३.१२$$

$$(५\times१०कि_{१} + ४००व + ५\times०.२५\times१०कि_{१} + ०.५\times४००व)(१—०.५०) = अ_{३} \quad ...३.१३$$

किंमतसंच३ : दुसरा टप्पा (औद्योगिक भांडवलदारांना पडणारी किंमत)

औद्योगिक भांडवलदारांना पडणारी किंमत आपण तीनही क्षेत्रासाठी अनुक्रमे $ब_{१}$, $ब_{२}$ व $ब_{३}$ या चिन्हांनी दर्शवू. सर्वसाधारण नफ्याचा दर पूर्वीप्रमाणेच न धरू या. तेव्हा

$$२०कि_{१} + ६००व + ०.५\times२०कि_{१} + १\times६००व + न\timesअ_{१} = ब_{१} \quad ...३.२१$$

$$१२कि_{१} + २कि_{२} + १६००व + ०.२\times१२कि_{१} + ०.२\times१६००व + न\timesअ_{२} = ब_{२} \quad ...३.२२$$

$$१०कि_{१} + ४००व + ०.२५\times१०कि_{१} + ०.५\times४००व + न\timesअ_{३} = ब_{३} \quad ...३.२३$$

किंमतसंच३ : तिसरा टप्पा (व्यापारी भांडवलदारांचे गुंतलेले भांडवल)

व्यापारी भांडवलदारांचे गुंतलेले भांडवल आपण तिन्ही क्षेत्रांसाठी अनुक्रमे $ड_{१}$, $ड_{२}$, $ड_{३}$ या चिन्हांनी दर्शवूया. तेव्हा,

$$(ब_{१} + १०\times१.५कि_{१} + १२०व)\ (०.७५) = ड_{१} \quad ...३.३१$$

$$(ब_{२} + २\times१.१कि_{१} + ३२०व)\ (०.२५) = ड_{२} \quad ...३.२३$$

$$(ब_{३} + ५\times०.५कि_{१} + ८०व)\ (०.५०) = ड_{३} \quad ...३.३३$$

किंमतसंच३ : चौथा (व शेवटचा टप्पा) (व्यापारी भांडवलदारांमार्फत ठरणाऱ्या अंतिम किंमती)

व्यापारी भांडवलदारामार्फत ठरणाऱ्या किंमती या आपल्याला अभिप्रेत असलेल्या अंतिम किंमती आहेत त्यामुळे त्या आपण कि१, कि२, कि३ या चिन्हांनी दर्शविणार आहोत. त्याप्रमाणे

$$ब_{१} + १.५कि_{१} + १२०व + न_{\times}ड_{१} = ६१.१कि_{१} \quad ...३.४१$$

$$ब_{२} + १.१कि_{१} + ३२०व + न_{\times}ड_{२} = ६०कि_{२} \quad ...३.४२$$

$$ब_{३} + ०.५कि_{१} + ८०व + न_{\times}ड_{३} = १२०कि_{३} \quad ...३.४३$$

$$व = ०.०१ कि_{२} \quad ...३.४४$$

$$कि_{३} = २००० \quad ...३.४५$$

मागील तीन टप्प्यांवरून या वरील संचातील प्रत्येक समीकरण म्हणजे एक लांबलचक समीकरण आहे असे दिसले. ते आपण तुकड्यातुकड्यानी सुटसुटीतपणे मांडले आहे इतकेच. हा संच सोडवला तर खालील उत्तरे मिळतात.

$कि_{१}$ = एक टन लोखंडाची किंमत = ९,६१७.४४ रुपये

$कि_{२}$ = एक टन गव्हाची किंमत = ६,०९१.१० रुपये

$कि_{३}$ = दहा ग्रॅम सोन्याची किंमत = २,०००.०० रुपये

व = एक तासाचे वेतन = ६०.९१ रुपये

न = नफ्याचा सर्वसाधारण दर = १६.७८ टक्के

किंमत संच४

या किंमतसंचामध्ये आपण वित्त भांडवलदारांचा समावेश करणार अहोत. त्यासाठी आपण खालील गोष्टी गृहीत धरीत अहोत. औद्योगिक भांडवलदार हे वित्त-भांडवलदारांकडून तीनही क्षेत्रात अनुक्रमे ९०, ४० व ८० टक्के गुंतवलेले भांडवल कर्जाऊ घेत आहेत. व्यापारी भांडवलदार हे वित्त-भांडवलदारांकडून तिन्ही क्षेत्रात अनुक्रमे ८०, ३० व ७० टक्के गुंतवलेले भांडवल कर्जाऊ घेत आहेत. वित्त-भांडवलदार आपल्या उलाढालीमध्ये १.१ टन लोखंड व ५०० श्रमतासांची श्रमशक्ती खर्च करत आहेत, व त्यांच्या खर्च झालेल्या लोखंडाचे मूल्य व त्यात गुंतलेले मूल्य यांमधील तफावत ही ८ पट आहे. व्याजाचा दर आपण 'द' या चिन्हाने दर्शवूया.

हा किंमतसंच तयार करण्यासाठी आपण किंमतसंच–३ मधील टप्पे जवळपास जसेच्या तसे वापरू शकू. त्यात फक्त नफ्याच्या दराच्या संदर्भात बदल होईल. वित्त–भांडवलदारांखेरीज इतर भांडवलदारांना पूर्वीच्या संचात गुंतवलेल्या दर रुपयामागे न रुपये नफा होत होता. त्याऐवजी आता गुंतवलेल्या प्रत्येक रुपयाच्या कर्जाऊ भांडवलाच्या भागावर व्याज + स्वत:च्या भांडवलाच्या भागावर नफा या पद्धतीने दर रुपयामागे मिळकत असावी लागेल. श्रमसामुग्रीच्या व श्रमशक्तीच्या खर्चांमध्ये ही मिळकत आपल्याला किंमती काढतांना मिसळावी लागेल. औद्योगिक भांडवलदारांनी गुंतवलेल्या एकूण (स्वत:च्या व कर्जाऊ) भांडवलाच्या प्रत्येक रुपयामागील हा मिळकतीचा दर आपण तिन्ही क्षेत्रांसाठी अनुक्रमे ख१, ख२, ख३ या चिन्हांनी दर्शवूया व त्याचप्रमाणे व्यापारी भांडवलदारांचा हा दर अनुक्रमे ग१, ग२, ग३ या चिन्हांनी दर्शवूया. तेव्हा वरील गृहीतांवरून आपण खालील समीकरणे मांडू शकतो.

$$०.९ \times द + (१-०.९) \times न = ख_{१} \qquad \ldots ४.०१$$

$$०.४ \times द + (१-०.४) \times न = ख_{२} \qquad \ldots ४.०२$$

$$०.८ \times द + (१-०.८) \times न = ख_{३} \qquad \ldots ४.०३$$

$$०.८ \times द + (१-०.८) \times न = ग_{१} \qquad \ldots ४.०४$$

$$०.३ \times द + (१-०.३) \times न = ग_{२} \qquad \ldots ४.०५$$

$$०.७ \times द + (१-०.७) \times न = ग_{३} \qquad \ldots ४.०६$$

हा मिळकतीचा दर वापरुन आपल्याला पूर्वीच्या टप्प्यांमधली समीकरणे खालीलप्रमाणे बदललेली आढळतील.

किंमत संच४ : पहिला टप्पा

काहीही बदल नाही.

किंमत संच४ : दुसरा टप्पा

$$२०कि_{१} + ६००व + ०.५ \times २०कि_{१} + १ \times ६००व + ख_{१} \times अ_{१} = ब_{१} \qquad \ldots ४.२१$$

$$१२कि_{१} + २कि_{२} + १६००व + ०.२ \times १२कि_{१} + ०.२ \times १६००व + ख_{२} \times अ_{२} = ब_{२} \qquad \ldots ४.२२$$

$$१०कि_{१} + ४००व + ०.२५ \times १०कि_{१} + ०.५ \times ४०० व + ख_{३} \times अ_{३} = ब_{३} \quad ...४.२३$$

किंमत संच४ : तिसरा टप्पा

काहीही बदल नाही.

किंमत संच४ : चौथा टप्पा

$$ब_{१} + १.५कि_{१} + १२०व + ग_{१} \times ड_{१} = ६१.१कि_{१} \quad ...४.४१$$

$$ब_{२} + १.१कि_{१} + ३२०व + ग_{२} \times ड_{२} = ६०कि_{२} \quad ...४.४२$$

$$ब_{३} + ०.५कि_{१} + ८०व + ग_{३} \times ड_{३} = १२०कि_{३} \quad ...४.४३$$

$$व = ०.०१कि_{२} \quad ...४.४४$$

$$कि_{३} = २००० \quad ...४.४५$$

पूर्वीप्रमाणेच हा समीकरणसंच आहे. त्यातील सर्व समीकरणांचे कि१, कि२, कि३ चिन्हे असलेल्या लांबलचक समीकरणांमध्ये रूपांतर होऊ शकते. मात्र त्यात ‘द’ हे एक नवे अज्ञात चिन्ह येते. त्यासाठी वित्त-भांडवलदारांचे नफ्याच्या दराचे समीकरण मांडावे लागेल. त्यासाठी आपल्याला प्रथम त्यांनी कर्जाऊ दिलेल्या एकूण अर्थभांडवलाची रक्कम काढावी लागेल. ती रक्कम आपण ‘घ’ या चिन्हाने दर्शवूया. त्यावरून

$$घ = ०.९अ_{१} + ०.४अ_{२} + ०.८अ_{३} + ०.८ड_{१} + ०.३ड_{२} + ०.७ड_{३} \quad ...४.४६$$

ही रक्कम गृहीत धरून आपल्याला खालील समीकरण मिळते.

$$१.१कि_{१} + ५००व + न(८ \times १.१कि_{१} + ५००ब + घ) = घ \times द \quad ...४.४७$$

ही सर्व समीकरणे एकत्र सोडवली तर आपल्याला खालील उत्तरे मिळतात.

$कि_{१}$ = एक टन लोखंडाचे मूल्य = ९,६९६.९९ रुपये

$कि_{२}$ = एक टन गव्हाचे मूल्य = ५,९४२.९६ रुपये

$कि_{३}$ = दहा ग्रॅम सोन्याचे मूल्य = २,००० रुपये

व = एक तासाचे वेतन = ५९.४३ रुपये

न = नफ्याचा सर्वसाधारण दर = १३.९१ टक्के

द = व्याजाचा दर = १७.५ टक्के.

वाचकांना गणिताच्या आधारे याच्यावरून खात्री करून घेता येईल की मूल्यसंचापासून ते किंमतसंच-४ पर्यंत फक्त वरकड-मूल्याचेच निरनिराळ्या पद्धतीने वाटप मूल्य-किंमत रूपांतरातून होत आहे. शिवाय किंमतसंच-४ मध्ये भांडवलदारवर्गाचे अपेक्षित विभाग लक्षात घेतल्यानंतर खर्च झालेले लोखंड = निर्माण झालेले लोखंड हा अपेक्षित साध्या पुनरुत्पादनाचा परिणामदेखील आढळून येईल. या (किंवा या प्रकारच्या) प्रतिरूपांमार्फत अनेक निष्कर्षांचा पडताळा येऊ शकेल.

परिशिष्ट ४ : घरकाम, स्त्रियांचा प्रश्न आणि मार्क्सचा मूल्यसिद्धांत

मार्क्स स्त्रीमुक्तीचा पुरस्कर्ता होता. त्याच्या लिखाणामध्ये स्त्रियांच्या दडपणुकीचे संदर्भ जागोजागी सापडतात. कम्युनिस्ट जाहीरनाम्यामधील काही महत्त्वाचे परिच्छेद हे कुटुंबसंस्थेला व तिच्या भांडवली रूपामधून स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या स्थानाला वाहिलेले आहेत. कॅपिटलमध्येदेखील अनेक ठिकाणी स्त्रियांच्या दडपणुकीचे संदर्भ आहेत. स्त्रियांची श्रमशक्ती ही श्रमशक्तीच्या एका राखीव साठ्याच्या स्वरूपात भांडवलशाही कशी वापरते हे अभिप्रेत असलेले संदर्भही अनेक ठिकाणी सापडतात. आणि १८४४ साली त्यानी लिहिलेल्या व आता 'आर्थिक व दार्शनिक हस्तलिखिते' (इकॉनॉमिक अँड फिलॉसॉफिकल मॅन्युस्क्रिप्ट्स्) या नावाने प्रसिद्ध झालेल्या लिखाणामध्ये तर तो स्त्री-पुरुष नात्याचे मानवीपण हे एकंदर मानवी संबंधांच्या मानवीपणाच्या विकासाचे माप म्हणून मांडतो. परंतु इतके असूनही स्त्रियांच्या घरकामांच्या श्रमांचा आपल्या मूल्यसिद्धांतामध्ये कसा अंतर्भाव होतो याची सैद्धांतिक तपासणी मार्क्सने केलेली आढळत नाही.

घरकाम म्हणजे कुटुंबसंस्थेमार्फत स्त्रिया या नात्याने सामाजिक श्रमविभागणीमधील जे काम स्त्रियांच्या वाट्याला येते असे काम असते. ज्या स्त्रिया भांडवलदाराकडे स्त्री-कामगार म्हणून काम करतात त्यांच्या कामाच्या सैद्धांतिक तपासणीचा पाया मार्क्सचा मूल्यसिद्धांत स्पष्टपणे घालताना दिसतो.

परंतु कामगार वर्गातील ज्या स्त्रिया स्त्री-कामगार नसतात आणि केवळ घरकामात गुंतलेल्या असतात त्या स्त्रियांच्या संदर्भात घरकामाच्या सैद्धांतिक तपासणीचा प्रश्न पुढे येतो. आणि स्त्री कामगारांना तरी कुठे घरकाम चुकलेले असते? स्त्री कामगारांना पुरुष कामगारांपेक्षा ज्या वेगळ्या परिस्थितीला व दडपणुकीला तोंड द्यावे लागते त्याची मुळे शेवटी भांडवलशाहीमध्ये कुटुंबव्यवस्थेमार्फत स्त्रियांवर लादल्या गेलेल्या सामाजिक स्थानात सापडतात. आणि मार्क्सच्या पद्धतीने विचार करायचा झाला तर या स्थानाशी निगडित घरकामाच्या स्वरूपाची व त्यातून बांधल्या जाणाऱ्या मूल्यसंबंधांची सैद्धांतिक तपासणी करूनच या प्रश्नाची उकल करायला सुरुवात करणे आवश्यक असते.

मात्र मार्क्सच्या मूल्यसिद्धांताच्या संदर्भात ही तपासणी सुरू करण्याअगोदर आपल्याजवळील मार्क्सकडून लाभलेल्या सैद्धांतिक शिदोरीचे भान ठेवणेही आवश्यक आहे. यापूर्वी आपण चर्चा केलेल्या अनेक प्रश्नांबद्दल मार्क्सने काही ना काही थोडीथोडकी मांडणी अगोदर करून ठेवली होती. मग तो प्रश्न मक्तेदारीचा असो, असमान विनिमयाचा असो, किंवा मूल्यरूपांतराचा असो. घरकामाबद्दल मात्र मार्क्सने स्पष्टपणे केलेल्या सैद्धांतिक मांडणीची शिदोरी आपल्याजवळ नाही. आपल्याजवळ आहे ती इतर सर्व प्रश्नांबाबत मार्क्सने केलेली मांडणी व त्यातून समग्रपणे स्पष्ट होणाऱ्या मार्क्सच्या मूल्यसिद्धांताच्या मूलभूत संकल्पना. तितक्याच शिदोरीच्या आधारावर, आपल्याला एक मांडणी निर्माण करायची आहे व या नव्या मांडणीच्या क्षमता कसाला घालायच्या आहेत. त्यासाठी आपल्याला मार्क्सच्या मूलगामी कल्पनांचे समग्र भान सतत ठेवावे लागणार आहे.

घरकामाच्या सैद्धांतिक तपासणीमधून प्रश्न तयार होतो तो श्रमशक्तीच्या मूल्याचा. संपूर्ण पुस्तकामध्ये आपण मार्क्सच्या पावलावर पाऊल टाकून श्रमशक्तीच्या मूल्याची फोड करत होतो. कामगारवर्गाच्या एकूण श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी, जीवनमानाच्या प्रचलित सरासरी पातळीवर ज्या क्रयवस्तू कामगारवर्गाला विकत घ्याव्या लागतात त्यांच्या मूल्यांची बेरीज म्हणजे श्रमशक्तीचे मूल्य असे आपण धरून चाललो होतो. घरकामाचा मूल्यसंबंधांच्या संदर्भात काटेकोर विचार करायला लागलो की सर्वप्रथम प्रश्न असा निर्माण होतो की श्रमशक्तीच्या मूल्याची अशी फोड करणे हे सैद्धांतिकदृष्ट्या बरोबर आहे का?

श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाची प्रक्रिया पाहिली तर त्या प्रक्रियेत उपभोग्य क्रयवस्तूंमार्फत जसा सामाजिक श्रमकाळ अप्रत्यक्षरीत्या खर्च होत असतो, त्याचप्रमाणे घरकामामार्फत प्रत्यक्षपणेदेखील (डायरेक्टली) श्रमकाळ खर्च होत असतो. उदाहरणार्थ, विकत घ्यावे लागणारे गहू, ते दळून मिळण्याची सेवा, त्याच्या चपात्या बनविण्यासाठी विकत घ्यावे लागणारे इंधन या क्रयवस्तूंमार्फत श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनामध्ये अप्रत्यक्षपणे श्रमकाळ खर्च होत असतो. पण त्याबरोबर तो गहू निवडण्यामध्ये, तो डब्यात भरून दळून परत आणण्यामध्ये, कणकेपासून मळून, लाटून, इंधन वापरून चपात्या करण्यामध्ये प्रत्यक्ष श्रमकाळही खर्च होत असतो. तेव्हा जर मार्क्सचा मूल्यसिद्धांत काटेकोरपणे श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाला लावायचा झाला तर या घरकामाच्या प्रत्यक्ष श्रमकाळाचाही समावेश श्रमशक्तीच्या मूल्यात करायला नको का? थोडक्यात, श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक क्रयवस्तूंचे एकूण मूल्य ४ श्रमतास असेल, व श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनामध्ये घरकामाद्वारे खर्च होणारा प्रत्यक्ष श्रमकाळ जर ४ श्रमतास असेल तर प्रश्न असा तयार होतो की श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास धरायचे की ८ श्रमतास? आणि या प्रश्नाचे महत्त्वही इथे आपण लक्षात घेऊ. वरकड-मूल्य, किंवा भांडवलदाराला क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे मिळणारा शोषणाचा भाग हा कामाचे तास वजा श्रमशक्तीचे मूल्य इतका असतो. तेव्हा वरील प्रश्नाला आपण कसे उत्तर देतो हे फार महत्त्वाचे आहे.

१. घरकाम कशाला म्हणायचे?

प्रथमदर्शनी इतके स्पष्ट होते की घरकामाचे श्रम हे भांडवलदारांच्या मालकीच्या श्रमप्रक्रियेबाहेर व कामगारवर्गातील कुटुंबव्यवस्थेमार्फत घातले जातात. हे श्रम व त्या श्रमांमार्फत खर्च होणाऱ्या क्रयवस्तू कामगारवर्गाच्या किंवा उपभोगाच्या क्षेत्रात मोडताना दिसतात. भांडवलशाहीमध्ये या संपूर्ण क्षेत्राला श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाचे स्थान असते. वेतनातून विकत घेतलेल्या क्रयवस्तू व कुटुंबव्यवस्थेमार्फत कामगारवर्गाने घातलेले घरकामाचे श्रम या दोन्हीमधून कामगारवर्ग आपला चरितार्थ चालवतो, विरंगुळा शोधतो व खर्च झालेल्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करतो, ताजातवाना होऊन पुन्हा भांडवलदारवर्गाला ही पुनरुत्पादित झालेली श्रमशक्ती विकायला उभा राहतो. आणि अर्थातच यात कामगारवर्गाचा कामावर नसलेला विभाग, कामगारवर्गाच्या संख्येत प्रजननातून होणारी वाढ, पुढील कामगारपिढीचे संगोपन इ. साठी प्रचलित सामाजिक

पातळीवर आवश्यक त्या सर्व क्रयवस्तू व घरकाम दोन्ही गोष्टींचा समावेश असतो.

ही व्याख्या करेपर्यंतच्या गोष्टी सुरळीतपणे स्पष्ट होतात. परंतु त्यातील घरकामाची फोड करताना एक बारीकशी पण महत्त्वाची अडचण तयार होते. ही अडचण श्रमशक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाशी निगडित आहे. उदाहरणार्थ चपाती तयार करणे व चपाती खाणे या दोन्ही गोष्टींत माणसांच्या आयुष्याचा काळ खर्च होतो. चपाती खाण्यामध्ये खर्च होणारा माणसांचा वेळ व श्रम हे इतर कुठल्याही भौतिक संपत्तीच्या संदर्भात सामाजिकदृष्ट्या आवश्यक ठरत नाहीत. परंतु श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाच्या संदर्भात मात्र ते सामाजिकदृष्ट्या आवश्यक ठरतात. आणि जी गोष्ट चपाती खाण्यामध्ये घालवलेल्या वेळाला लागू होते तीच गोष्ट झोपण्यामध्ये घालवलेल्या वेळाला लागू होऊ लागते, व तसेच आरामखुर्चीवर बसून अन्न पचवत पेपर वाचवण्यात घालवलेल्या वेळेलाही! कामगारवर्गातील सर्वांनी भांडवलदाराच्या मालकीच्या श्रमप्रक्रियेबाहेर जगलेल्या आयुष्याचा सर्व काळ हा या व्याख्येनुसार घरकामात मोडू लागतो!

अर्थातच घरकाम या शब्दाने आपल्याला अभिप्रेत असलेल्या श्रमांची व्याप्ती इतकी मोठी नाही. अन् या अर्थाने घरकाम हे स्त्रियांच्या स्थानाचे व्यवच्छेदक लक्षणही राहत नाही. पण प्रश्न भावण्याचा नसून सैद्धांतिक निकषांचा आहे. चपाती बनवणे, कपडे धुणे, शिवणकाम, मुलांची देखभाल इत्यादी व चपाती खाणे, झोपणे, सिनेमा पाहणे इत्यादी या दोन्ही प्रकारच्या खर्च होणाऱ्या काळांमध्ये अनुक्रमे भौतिक संपत्तीची, उपयोग-मूल्यांची निर्मिती होणे व न होणे असा फरक आपण पाहू शकत होतो. पण आता केवळ हा निकष लावून चालत नाही. कारण श्रमशक्ती ही देखील माणसांच्या ठायी असलेली भौतिक संपत्तीच्या निर्मितीला आधारभूत अशी भौतिक संपत्ती असते; किंबहुना पुढील सर्व भौतिक संपत्तीच्या निर्मितीला आधारभूत अशी भौतिक संपत्ती असते. त्यामुळे केवळ या निकषावर हा फरक करणे हे सैद्धांतिकदृष्ट्या वैध राहत नाही. श्रमशक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचा आधार घेऊ शकेल अशा निकषाची जोड त्याला असणे आता आवश्यक ठरते.

हा निकष अगदी बारका पण महत्त्वाचा आहे. आणि तो माणसांच्या व्यक्तिगत अस्तित्वाशी निगडित आहे. स्वत:च्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेमधील जी जी कामे व जे जे श्रम एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर सोपवू

शकते फक्त अशा कामांचा व श्रमांचाच सामाजिक श्रमकाळामध्ये व पर्यायाने घरकामामध्ये समावेश होऊ शकतो. एखाद्या व्यक्तीला स्वत:ची श्रमशक्ती पुनरुत्पादित करायची असेल तर चपाती खाणे, सिनेमा पाहणे, झोपणे यामध्ये स्वत:च वेळ खर्च करणे आवश्यक असते. दुसऱ्या व्यक्तीवर ती कामे सोपवून त्या व्यक्तीची श्रमशक्ती पुनरुत्पादित होणे शक्य नसते. त्यामुळे अशा कामांचा घरकामांमध्ये समावेश होऊ शकत नाही.

घरकामाची व्याप्ती अशा तऱ्हेने मर्यादित केल्यावर देखील त्यात समावेश होणाऱ्या कामांची एक लांबलचक जंत्री उरते. स्वत:साठी किंवा/आणि इतरांसाठी स्वयंपाक करणे, कपडे धुणे, राहत्या जागेची साफसफाई, सजावट करणे, श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी अनुकूल असे भौतिक, मानसिक वातावरण तयार करणे, मुलांचे संगोपन करणे, पाय चेपणे, वारा घालणे इत्यादी सर्वांचा घरकामामध्ये समावेश होतो. आणि अर्थातच ही रेष आपसूकच भौतिक उपयोग-मूल्यांची निर्मिती होणे व न होणे या रेषेने दाखवलेली व्याप्तीच वेगळ्या प्रकारे स्पष्ट करत असते.

घरकामाच्या विश्लेषणाच्या पुढच्या टप्प्याकडे वळण्याअगोदर आपण घरकामाची व्याप्ती ठरवता ठरवता काय साधले याचाही विचार करून पुढे जाऊ. माणसांनी खर्च केलेल्या वेळातील कोणता भाग उपयोग-मूल्यांची निर्मिती करणाऱ्या सामाजिक श्रमकाळामध्ये मोडतो याची पूर्ण व स्पष्ट निश्चिती आपण प्रथमच केली. त्याबरोबरच आपण उपभोगाच्या क्षेत्राचीही तशीच स्पष्ट व पूर्ण निश्चितीदेखील प्रथमच केली. घरकामाच्या प्रश्नाचा विचार करण्याअगोदर आपण एका जुजबी पद्धतीने ही निश्चिती केली होती. कामगारवर्गाने भांडवलदारांच्या मालकीच्या श्रमप्रक्रियेबाहेर घालवलेला सर्व काळ हा आपण उपभोगाच्या क्षेत्रात मोडणारा काळ धरत होतो. घरकामाची तपासणी केल्यानंतर यापैकी काही काळ हा उत्पादनात खर्च झालेल्या सामाजिक श्रमकाळाच्या साठ्यात मोडतो व फक्त उर्वरित भाग हा उपभोगाच्या क्षेत्रात मोडतो असे आपल्याला आढळले.

वरील विश्लेषणातून ज्याप्रमाणे घरकामाची व्याप्ती स्पष्ट झाली त्याचप्रमाणे घरकामातून उपयोग-मूल्ये निर्माण होतात, उपयोग-मूल्यांच्या संदर्भात घरकामाचे श्रम हे उत्पादक श्रम आहेत असेही प्रस्थापित झाले. श्रमशक्तीच्या मूल्याबद्दलचा जो प्रश्न उपस्थित करून आपण सुरुवात केली होती त्या संदर्भात आता पुढचा प्रश्न उपस्थित होतो. घरकामामधून उपयोग-मूल्यांची निर्मिती होत

असली तरी त्यातून मूल्यनिर्मिती होते की नाही हा प्रश्न बनतो. घरकामातून उपयोग-मूल्य निर्माण होत नाही अशा निष्कर्षापर्यंत आपण पोचलो तर घरकामांच्या श्रमाचा अर्थातच श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश होत नाही; याउलट जर घरकामातून मूल्य निर्माण होते असे धरले तर अर्थातच श्रमशक्तीच्या मूल्यामध्ये घरकामाच्या श्रमांचा समावेश होतो. या प्रश्नाबाबत आज दोन्ही प्रकारची उत्तरे दिली जातात.

२. पहिले प्रतिपादन : घरकामातून मूल्यनिर्मिती होत नाही

प्रथम आपण श्रमशक्तीच्या मूल्यामध्ये घरकामाच्या श्रमांचा समावेश न करणाऱ्या प्रवाहाकडे वळू. या प्रवाहातील निरनिराळ्या स्पष्टीकरणांना एक समान गाभा असतो. इथे कुटुंबव्यवस्थेमार्फत हे श्रम घातले जातात ही बाब महत्त्वाची बनते. घरकामामधून ही भौतिक उपयोग-मूल्ये निर्माण होतात खरी, पण ती कुटुंबव्यवस्थेमार्फत ताबडतोबीने खर्च होतात. थोडक्यात म्हणजे क्रयवस्तूंच्या खरेदीविक्रीच्या माध्यमाशिवाय ही उपयोग-मूल्ये निर्माण होऊन खर्च होत असतात. उदाहरणार्थ एखाद्या कुटुंबामधील स्त्री ही जेव्हा नवऱ्याचे, स्वत:चे व मुलांचे अन्न स्वयंपाकातून तयार करते तेव्हा तिने ती उपयोग-मूल्ये नवऱ्याला, स्वत:ला किंवा मुलांना विकण्यासाठी तयार केलेली नसतात. तिने ती कामे स्वत:च्या स्थानाबद्दलच्या कल्पनांमधून ('ही कामे बाईने नाही करायची तर कुणी!') किंवा नवरा व मुलांवरील प्रेमापोटी किंवा त्यांच्याविषयी वाटणाऱ्या कर्तव्यातून किंवा हे सर्व नसूनही दुसरा काही मार्ग नाही म्हणून ('बाईचे नशीब म्हणायचे झाले!') केलेली असतात. त्याचबरोबर ही उपयोग-मूल्ये ज्यांच्या ताब्यात जातात त्यांच्याशी तिने खरेदीविक्रीचे संबंधही बांधणे आवश्यक नसते. त्यामुळे घरकामाच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन त्यातून मूल्यनिर्मिती होण्यालाही सामाजिक आधार नसतो असे या प्रवाहाचे म्हणणे असते.

याचाच अर्थ वेगळ्या पद्धतीने मांडायचा झाला तर अशा तऱ्हेने मांडता येतो की भांडवलदारवर्गाकडून होणाऱ्या शोषणाच्या क्षेत्रात घरकामाचे श्रम मोडत नाहीत. म्हणजेच स्त्रिया या नात्याने सामाजिक श्रमविभागणीमधील जे स्थान स्त्रियांच्या वाट्याला येते ते असे असते की त्यातून भांडवलदारवर्गाकडून स्त्रियांचे शोषण होत नाही; हे स्थान भांडवली शोषणाच्या क्षेत्राबाहेर असते. अर्थात त्यांना पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेमार्फत स्त्रियांची होणारी दडपणूक किंवा

शोषण अमान्य असतेच असा याचा अर्थ अजिबात होत नाही. किंवा भांडवली शोषणाच्या स्वरूपाचा व व्याप्तीचा परिणाम स्त्रियांच्या दडपणुकीवर किंवा शोषणावर होतो हे ही त्याना मान्य असू शकते. परंतु इतके मात्र नक्की असते की कामगारवर्गाचे भांडवली शोषण व स्त्रियांची दडपणूक व शोषण या दोन सुट्या, वेगवेगळ्या गोष्टी असतात; एकमेकींवर परिणाम करणाऱ्या पण एकमेकींच्या क्षेत्राबाहेर असणाऱ्या गोष्टी असतात. थोडक्यात, भांडवलशाहीमधील, स्त्रियांची स्त्रिया या नात्याने होणारी दडपणूक किंवा त्यांचे शोषण हे कामगारवर्गाच्या भांडवली शोषणाचा जैव भाग ठरत नाही.

या प्रवाहाचा स्त्रियांच्या दडपणुकीकडे व शोषणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा स्थूलपणे खालील पद्धतीने मांडता येईल. धर्म, भाषा, लिंगभेद, जात, वंश इत्यादी अनेक दडपणुकीचे संबंध भांडवली शोषणाच्या वळचणीला निरनिराळ्या समूहांचे शोषण करत असतात. वंशवादामुळे होणारी काळ्यांची दडपणूक, एखाद्या प्रांतातील/प्रदेशातील भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्यांकांची होणारी दडपणूक, जातिव्यवस्थेतून होणारी दलितांची दडपणूक या प्रत्येक प्रकारच्या दडपणुकीचे संबंध भांडवली शोषणाच्या वळचणीला असतात व त्यांची त्यांची स्वत:ची वैशिष्ट्ये असतात. त्याचप्रमाणे पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेमार्फत स्त्रियांची होणारी दडपणूक किंवा शोषण भांडवली शोषणाच्या वळचणीला नांदत असते व या दडपणुकीची व शोषणाचीही स्वत:ची खास वैशिष्ट्ये असतात.

मार्क्सच्या श्रममूल्याच्या सिद्धांताशी ताडून पाहताना हे स्पष्टीकरण मान्य करायला कोणतीच अडचण असू नये असे वाटू शकते. हे स्पष्टीकरण कोणकोणत्या गोष्टी प्रस्थापित करते त्याच्यावर आपण जरा नजर फिरवूया. घरकामाच्या श्रमांचा श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश होत नाही त्यामुळे मार्क्सने गृहीत धरल्याप्रमाणे श्रमशक्तीचे मूल्य हे प्रचलित पातळीवर कामगारवर्गाला श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक अशा क्रयवस्तूंच्या मूल्याच्या बेरजेइतके ठरते. स्त्रियांची दडपणूक वा शोषण हेही स्पष्टपणे ओळखले जाते. भांडवली शोषणाबाहेर नांदणाऱ्या वंश, जात, धर्म इत्यादी मागासलेल्या दडपणुकीच्या संबंधांप्रमाणेच पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेमार्फत स्त्रियांची दडपणूक होत असते आणि भांडवली शोषणाचा परिणाम हा स्त्रियांच्या दडपणुकीवरही होत असतो (उदाहरणार्थ, महागाई टंचाई इत्यादी).

दोन दार्शनिक त्रुटी

आमच्या मते मात्र हे स्पष्टीकरण जसेच्या तसे मान्य करण्यात महत्त्वाच्या अडचणी आहेत. या स्पष्टीकरणामधील अंतर्भूत सैद्धांतिक बैठकीशी त्या निगडीत आहेत. एक म्हणजे या स्पष्टीकरणामध्ये अंतर्भूत असलेली भांडवली शोषण व स्त्रियांची दडपणूक किंवा शोषण यांची फारकत. भांडवलशाहीमध्ये या दोन्ही मूलत: वेगळ्या, परस्परांच्या क्षेत्राबाहेरील प्रक्रिया ठरतात. आणि यातून दोन प्रकारच्या निष्कर्षांना आधार तयार होतो, की जे निष्कर्ष मार्क्सच्या कामगारवर्गीय क्रांतीबद्दलच्या मूलगामी कल्पनांचाच उच्छेद करू शकतात. या फारकतीमुळे एका बाजूला, भांडवली चौकटीमध्येच स्त्रियांची पुरुषप्रधान कुटुंबसंस्थेमुळे होणारी दडपणूक नाहीशी होऊ शकते अशा विचारांचा सैद्धांतिक आधार तयार होतो तर दुसऱ्या बाजूला, या फारकतीमुळे, भांडवली शोषणाचा उच्छेद होऊन देखील स्त्रियांच्या दडपणुकीचा उच्छेद होऊ शकत नाही अशा विचारांचाही सैद्धांतिक आधार तयार होतो. वरील दोन्ही निष्कर्ष मार्क्सच्या कामगारवर्गीय क्रांतीच्या संकल्पनेच्या समग्रतेवर घाव घालतात. कारण मार्क्सला अभिप्रेत असलेली कामगारवर्गीय क्रांती ही भांडवली शोषणाच्या उच्छेदामधून माणसांनी माणसांच्या (स्त्रियांसकट!) केलेल्या सर्व प्रकारच्या शोषणाचा उच्छेद करणारी, मानवी इतिहासातील शोषणाच्या इतिहासाचा अंत करणारी क्रांती असते.

दुसऱ्याही एका अशाच कारणासाठीदेखील हे स्पष्टीकरण मान्य करणे बरोबर ठरत नाही. वंश, धर्म, जात, भाषा इत्यादींवर आधारलेल्या समूहांचे शोषण व स्त्रियांचे शोषण या सर्व गोष्टी गुणात्मकरीत्या या स्पष्टीकरणामध्ये एकाच पातळीवर आणल्या जातात. या यादीमधील इतर गोष्टींच्यापेक्षा स्त्रियांच्या प्रश्नाला व दडपणुकीला एक मूलभूतरीत्या वेगळे स्थान आहे या गोष्टीची दखल त्यात घेतली जात नाही. उदाहरणार्थ, पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेमार्फत स्त्रियांचे शोषण हा इतिहासातील इतर सर्व प्रकारच्या शोषणापेक्षा जुना, सर्वात चिवट अशा शोषणाचा संबंध आहे असे आपल्याला आढळते. तसेच वंश, धर्म, जात, भाषा इत्यादींवर आधारलेल्या कुठल्याही समूहाच्या शोषणाला छेद देणारा स्त्रियांच्या शोषणाचा संबंध आहे. शिवाय आज सर्व भांडवली देशांमध्ये धर्म, जात, भाषा इत्यादींवर आधारलेल्या शोषित समूहांची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर कमी जास्त झालेली आढळते पण आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व

भांडवली देशांमध्ये स्त्रियांचे शोषण हे हमखास त्या देशातील अर्ध्याअधिक जनतेला ग्रासताना दिसते.

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की हे स्पष्टीकरण अमान्य करण्याची वरील दोन्ही कारणे ही दार्शनिक (फिलॉसॉफिकल) स्वरूपाची आहेत. मूल्यसिद्धांताच्या कोणत्याही मूर्त संकल्पनांवर ती आधारलेली नाहीत; त्या संकल्पना न राबवता ही कारणे आम्ही दिली आहेत. ती देण्याचा मुद्दा हा आहे की या दार्शनिक खूणगाठीदेखील महत्त्वाच्या आहेत. आपण करीत असलेल्या विश्लेषणाच्या दूरगामी, दार्शनिक परिणामांबद्दल सजग असण्याच्या मार्क्सच्या विचारपद्धतीमध्ये अशा खूणगाठींनाही महत्त्व आहे. त्यातून वाटचालीची दिशा निर्देशित होते. पण त्यापुढे या खूणगाठीच्या आधारावर निर्देशित होणाऱ्या दिशेने पुढे जाऊन मूर्त सैद्धांतिक संकल्पनांच्या आधारावर ठाम निष्कर्ष प्रस्थापित करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे असते.

३. दुसरे प्रतिपादन : घरकामातून मूल्यनिर्मिती

अशा पद्धतीने या निर्देशित वाटेने पुढे जाण्याचा एक मार्ग सरळ दिसतो. घरकामाच्या श्रमांचा श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश होतो असे धरायचे. पूर्वी दिलेल्या स्पष्टीकरणावर मूल्यसिद्धांताच्या आधारे टीका करून घरकामाच्या श्रमांचा श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश करणाराही एक प्रवाह आज अस्तित्वात आहे. आणि पूर्वीचे स्पष्टीकरण स्त्रियांच्या शोषणाचा प्रश्न मूलगामी अर्थाने सामावून घेऊ शकत नाही याबद्दलचे असमाधान ही त्या प्रवाहाची सैद्धांतिक प्रेरणा आहे. त्यांची पूर्वीच्या स्पष्टीकरणाबद्दलची टीकाही चांगलीच भरीव न दुर्लक्षिण्यासारखी आहे. त्यांच्याबरोबर त्यांच्या पद्धतीने निर्देशित मार्गावर चालून, आपण कुठपर्यंत पोचू शकतो त्याचा आपण शोध घेऊ.

दुसऱ्या प्रवाहाची मांडणी श्रमशक्ती या क्रयवस्तूच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची दखल घेण्यावर आधारलेली असते. पहिला प्रवाह मांडत असतो की कुटुंबव्यवस्थेमार्फत, क्रयवस्तूंच्या खरेदीविक्रीच्या माध्यमाशिवाय घरकामातून निर्माण होणारी उपयोग-मूल्ये सरळ उपभोगाच्या क्षेत्रात शिरत असतात, त्यामुळे घरकामाचे अमूर्तीकरण होऊन मूल्यनिर्मिती होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. इथे नेमका श्रमशक्तीच्या वैशिष्ट्यांचा प्रश्न उभा राहतो. श्रमशक्ती ही क्रयवस्तू म्हणून उभी राहिल्यानंतर उपभोगाचे क्षेत्र हे फक्त उपभोगाचे क्षेत्र राहत नाही; ते त्याचवेळी खर्च झालेल्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनातून श्रमशक्ती ही

क्रयवस्तू पुन्हा निर्माण करणारे क्षेत्र असते. त्यामुळे घरकामाबद्दल आपण असे म्हणू शकतो की घरकामाचे श्रम हे कुटुंबव्यवस्थेमार्फत, त्या श्रमांच्या खरेदीविक्रीचा व्यवहार न होता श्रमशक्ती या क्रयवस्तूमध्ये साठतात. पहिल्या स्पष्टीकरणात मांडल्याप्रमाणे ते उपभोगाच्या क्षेत्रात शिरत असतात पण तेवढ्यावर थांबून चालत नाही. उपभोगामार्फत ते एका क्रयवस्तूमध्ये साठत असल्यामुळे घरकामाच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन त्यातून मूल्यनिर्मिती होत असते.

या मांडणीमधला एक प्रश्न अजूनही टोचू शकतो. घरकामाचे श्रम हे एका क्रयवस्तूमध्ये साठतात हे खरे पण ते कुटुंबव्यवस्थेमार्फत, खरेदी-विक्रीच्या माध्यमाशिवाय या गोष्टीची दखल घेतली तरीदेखील घरकामाच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन त्यातून मूल्य निर्माण होते असे धरता येते का? समांतर उदाहरणांच्या तपासणीवरून हे दाखवता येते की तरीही ते श्रम मूल्य निर्माण करणारे श्रम असतात.

यासाठी आपण दोन समांतर उदाहरणे उभी करू. पूर्वी प्रमुख कुशल कारागिरांना (मास्टर क्राफ्ट्स्मन) आपल्या पदरी अत्यल्प वेतनात किंवा आश्रिताला मिळणाऱ्या जुजबी निर्वाहाखेरीज कोणताही मोबदला न देता शिकाऊ कारागीर (जर्नीमेन) बाळगण्याची मुभा असे. कुशल विणकराकडे उमेदवारीच्या या काळात शिकाऊ कारागिरांनी कापडात श्रम घातलेले असत. ते शिकाऊ कारागिराने कुशल कारागिराशी बांधलेल्या भांडवलीपूर्व, पारंपरिक गुरुशिष्य नात्यातून व त्याच्याशी संबंधित कर्तव्यबुद्धीच्या प्रेरणेमार्फत घातलेले असत. म्हणून काय त्यांच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन ते कापडाच्या मूल्यात साठत नसत? यातून त्यांच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन मूल्यात रूपांतर होत नाही असे सिद्ध होत नाही. त्यांच्या श्रमांतून मूल्य निर्माण होत होतेच. सिद्ध होते ते इतकेच की भांडवलीपूर्व, पारंपरिक माध्यमामुळे त्या मूल्याचा भाग त्यांच्या हातात न पडू देण्याचा एक हक्क हा कुशल कारागिरांना उपलब्ध होत असे.

किंवा त्यापेक्षाही जवळचे एक उदाहरण घेऊ. असे धरून चाला की ठाण्याजवळ बरजोरसेठ नावाचा कोणी गवताचा व्यापारी आहे. पारंपरिक जमीनदारी अधिकारातून व शस्त्रबळाच्या जोरावर आदिवासींवर प्रस्थापित केलेल्या अधिकारांमुळे तो आदिवासींना वेठीनेसंपूर्णपणे-विनामोबदला कामाला लावू शकतो. आदिवासींना वेठीला धरून बरजोरसेठ आदिवासींकडून गवत

कापण्याचे, गठ्ठे बांधण्याचे, वाहण्याचे काम करून घेतो. आता आदिवासींचे श्रम वेठीच्या माध्यमातून गवतात घातले जाताहेत, म्हणून त्यांच्या श्रमांचे अमूर्तीकरण होत नाही, त्यांचे मूल्यात रूपांतर होत नाही असे कुठेही सिद्ध होत नाही. तसे असते तर बरजोरसेठ गवताच्या व्यापारातून गबर होऊ शकलाच नसता! सिद्ध होते पुन्हा ते इतकेच की वेठीच्या माध्यमामुळे, भांडवली शोषणाच्या क्षेत्राबाहेरील माध्यमामुळे बरजोरसेठच्या हातात या मूल्याचा कोणताही भाग हा आदिवासींच्या हातात पडू न देण्याचा अधिकार येतो इतकेच.

स्त्रियांचे शोषण भांडवली शोषणाचा भाग ठरते . . .

दुसऱ्या प्रवाहाच्या मते घरकामाची परिस्थिती ही वरील उदाहरणांना समांतर असते. घरकामाचे श्रम हे श्रमशक्ती या क्रयवस्तूच्या निर्मितीत जात असल्यामुळे त्यांचे अमूर्तीकरण होऊन मूल्य निर्माण होत असते. श्रमशक्तीचे मूल्य हे कामगारवर्गाच्या उपजीविकेसाठी आवश्यक त्या क्रयवस्तूंचे एकूण मूल्य आणि घरकामाच्या श्रमाने दर्शविलेले मूल्य मिळून बनते. हे श्रम उपभोगाच्या क्षेत्रात नाहीसे होताना दिसत असतात किंवा ते कुटुंबव्यवस्थेमार्फत खरेदीविक्रीच्या माध्यमाशिवाय घातले जातात यामुळे यात काही फरक पडत नाही. त्यातून सिद्ध होते ते इतकेच की त्यामुळे भांडवलदारांच्या हातात घरकामाच्या श्रमांइतके वरकड-मूल्य संपूर्णपणे विनामोबदला मिळवण्याचा अधिकार पोचतो.

कुटुंबव्यवस्थेच्या पुरुषप्रधान स्वरूपातून घरकाम हे स्त्रियांच्या वाट्याला येणारे व्यवच्छेदक काम असल्यामुळे याचा अर्थ हाही होतो की भांडवलदारांना स्त्रियांकडून घरकामाइतके वरकड-मूल्य विनामोबदला काढण्याचा अधिकार प्राप्त होतो. (अर्थात, कुटुंबव्यवस्थेमार्फत होणाऱ्या सर्व घरकामाचा -स्त्रियांनी केलेले वा पुरुषांनी केलेले असो यात समावेश असतो. परंतु सामाजिक पातळीवर पुरुषांचा घरकामातील सहभाग हा कमी व दुय्यम असतो.) थोडक्यात भांडवलदारवर्ग हा त्याच्या कारखान्यांमध्ये घडणाऱ्या कामामार्फत कामगारवर्गाकडून कामाचे तास वजा वेतनाने दर्शविलेले मूल्य इतके वरकड-मूल्य काढत असतो; आणि कारखान्याबाहेर स्त्रियांकडून घरकामांच्या श्रमांइतके वरकड-मूल्य काढत असतो. दोन्ही मिळून भांडवली शोषणाची व्याप्ती ठरत असते व स्त्रियांचे शोषण हा भांडवली शोषणाचा जैव भाग असतो या निष्कर्षापर्यंत या प्रवाहाची मांडणी आपल्याला आणून सोडते.

४. दुसऱ्या प्रतिपादनातील काही गंभीर त्रुटी

मूल्यनिर्णीत किंमतींचा सिद्धांत श्रमशक्तीपाशी कोलमडतो

वरील दुसऱ्या प्रकारच्या स्पष्टीकरणामधून स्त्रियांचे शोषण हे भांडवली शोषणाचा जैव भाग आहे हे दाखवले जाते खरे, परंतु त्याबरोबरच काही गंभीर त्रुटी या स्पष्टीकरणामधून तयार होतात. पहिला अभिप्रेत परिणाम होतो तो मार्क्सच्या मूल्य-किंमत संबंधाबद्दलच्या तत्त्वावर. क्रयवस्तू या मूल्यनिर्णीत किंमतीला विकल्या जातात हे मार्क्सच्या मूल्य सिद्धांताचे एक पायाभूत तत्त्व आहे. सर्व क्रयवस्तूंना ते लागू होणे महत्त्वाचे असते. दुसऱ्या प्रवाहाच्या स्पष्टीकरणाचा एक परिणाम म्हणजे हे तत्त्व श्रमशक्तीला लागू होत नाही, असे आपल्याला दिसेल.

पुस्तकाच्या मुख्य भागात आपण पाहिले होते की कामगारवर्गाच्या उपजीविकेसाठी आवश्यक अशा क्रयवस्तूंचे एकूण मूल्य हे श्रमशक्तीचे वेतन निर्णीत करते. जोपर्यंत आपण हे एकूण मूल्य म्हणजेच श्रमशक्तीचे मूल्य धरून चाललो होतो तोपर्यंत श्रमशक्तीच्या मूल्याचे किंमतीतील रूप म्हणजे वेतन हे श्रमशक्तीच्या मूल्यावरून निर्णीत होत होते व तसे आपण दाखविलेही. परंतु आता श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे या क्रयवस्तूंचे मूल्य अधिक घरकाम इतके ठरते. परंतु वेतन मात्र उपजीविकेच्या क्रयवस्तूंइतकेच ठरते. म्हणजे श्रमशक्तीच्या मूल्याचे किंमतीतील वेतन हे रूप श्रमशक्तीच्या मूल्याने निर्णीत होत नाही. ते आता श्रमशक्तीच्या मूल्याने निर्णीत किंमतीच्या नेहमी खाली असणे भाग असते. थोडक्यात, क्रयवस्तूंची किंमत ही क्रयवस्तूच्या मूल्याने निर्णीत होते हे मार्क्सचे पायाभूत तत्त्व इतर सर्व क्रयवस्तूंना लागू होते, पण सर्व क्रयस्तूंच्या उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या श्रमशक्तीसारख्या सार्वत्रिक क्रयवस्तूबाबत कोलमडते.

मूल्य–किंमत जोडीतील बदलांची दिशा बिघडते

दुसरा परिणाम अभिप्रेत होतो तो मूल्य–किंमत या जोडीमधील बदलांच्या दिशेच्या परस्परसंबंधाबाबतच्या मार्क्सच्या पायाभूत तत्त्वावर. मूल्य वाढले की किंमत वाढणे आवश्यक असते, ते कमी झाले की ती कमी होणे आवश्यक असते. थोडक्यात, मूल्य ज्या दिशेने बदलते त्याच दिशेने किंमत बदलते हे मार्क्सच्या मूल्य–किंमत संबंधाबाबत तितकेच पायाभूत तत्त्व आहे, आणि या तत्त्वाच्या आधारावरच भांडवलशाहीमधील सर्वसाधारण प्रवृत्ती आपण सिद्ध

करू शकलो. घरकामाच्या सामाजिकीकरणामुळे श्रमशक्तीच्या मूल्यावर व वेतनावर काय व कसे परिणाम होतात हे लक्षात घेतले की दुसऱ्या प्रवाहाच्या निष्कर्षातून जे अभिप्रेत होते त्यातून याही पायाभूत तत्त्वाचा भंग होतो असे आपल्याला दिसेल. मात्र त्यासाठी आपल्याला एक साधे उदाहरण घेऊन ते तपशीलवार तपासावे लागेल.

असे धरून चालू की एका कामगार कुटुंबासाठी सरासरीने दिवसाला ४ श्रमतास मूल्याच्या उपजीविकेच्या क्रयवस्तू आवश्यक ठरतात. या कुटुंबातील स्त्री ही ८ तास घरकामात खर्च करते. या दोन्हीतून संपूर्ण कुटुंबाची दिवसभराची श्रमशक्ती पुनरुत्पादित होते. या कुटुंबातील पुरुष भांडवलदाराच्या कारखान्यात दिवसभर काम करतो तेव्हा एक दिवसाच्या श्रमशक्तीचे मूल्य हे आता उपजीविकेच्या क्रयवस्तूचे मूल्य आणि घरकाम मिळून ४+८=१२ श्रमतास आहे. वेतन मात्र अर्थातच उपजीविकेच्या क्रयवस्तूंच्या मूल्याने म्हणजे ४ श्रमतास मूल्याने निर्णीत होणार आहे.

आपण असेही समजून चालूया की या कुटुंबाचे कपडे धुण्यामध्ये कुटुंबातील स्त्री ८ तासांपैकी १/२ श्रमतास खर्च करते व त्यासाठी वेतनाने निर्देशित ४ श्रमतास मूल्याच्या उपजीविकेच्या वस्तूंच्या मूल्यापैकी १/२ श्रमतास मूल्य हे साबण इ. साठी खर्च होते. म्हणजे कपडे धुण्याद्वारे १/२ श्रमतास साबण इ. चे मूल्य व १/२ श्रमतास घरकाम मिळून १ श्रमतासाचे मूल्य कामी येते. आता कपडे धुणे या घरकामाचे सामाजिकीकरण झाले असे गृहीत धरून काय होते ते पाहू या.

कपडे धुण्याच्या कामाचे सामाजिकीकरण झाले याचा अर्थ आता सरासरीने कामगारवर्गीय कुटुंबे घरी कपडे धुण्याऐवजी धुलाई-लाँड्री उद्योगातील भांडवलदारांकडून सेवेच्या रूपात, क्रयवस्तू म्हणून विकत घेऊ लागली आहेत. साहजिकच यंत्राधिष्ठित (हे आवश्यक नाही पण परिणाम स्पष्टपणे पुढे आणणारे आहे) सामूहिक श्रमप्रक्रियेच्या आधारावर ही सेवा आता उपलब्ध होत आहे. त्यामुळे आता एका कुटुंबाचे कपडे धुण्यामध्ये खर्च होणाऱ्या सामुग्रीचे मूल्य वाढलेले असेल; पूर्वीच्या १/२ श्रमतास सामुग्रीऐवजी आता ५/८ श्रमतास मूल्याची श्रमसामुग्री लागते असे आपण धरून चालू त्याबरोबरच तितके कपडे धुण्यामध्ये खर्च होणारे श्रम कमी होतील; पूर्वीच्या १/२ श्रमतासांऐवजी आता फक्त १/८ तास श्रम त्यात खर्च होतात असे आपण धरू या. तेव्हा या सेवेचे एका कामगार कुटुंबासाठी मूल्य होईल ५/८+१/८=३/४ श्रमतास.

आता याचा श्रमशक्तीच्या मूल्यावर व वेतनावर काय परिणाम होतो ते आपण पाहू. कामगार कुटुंबाला उपजीविकेच्या वस्तूंपैकी कपडे धुण्यासाठी लागणारा साबण इ. घ्यावा लागणार नाही, परंतु त्याचवेळी त्याला कपडे धुण्याची एकंदर सेवाच क्रयवस्तूच्या रूपात विकत घ्यावी लागेल, त्यामुळे आता कामगार कुटुंबाला लागणाऱ्या उपजीविकेच्या वस्तूंचे मूल्य हे (४-१/२+३/४)=४ १/४ श्रमतास इतके असेल. त्यामुळे वेतन हे ४ १/४ श्रमतासाने निर्णीत वेतन असेल. त्याचवेळी कुटुंबातील स्त्रीचे घरकाम १/२ तासाने कमी होईल. तेव्हा तिचे घरकाम आता ८-१/२=७ १/२ श्रमतास असेल. स्पष्टीकरणाप्रमाणे श्रमशक्तीचे मूल्य हे ४ १/४+७ १/२ =११ ३/४ श्रमतास असेल.

या सर्वाचा एकूण ताळेबंद खालीलप्रमाणे दिसतो. श्रमशक्तीचे मूल्य हे १२ श्रमतासांवरून ११ ३/४ श्रमतासांवर गेले; किंवा १/४ श्रमतासाने कमी झाले. त्याचवेळी वेतन मात्र ४ श्रमतासांवरून ४ १/४ श्रमतासाने निर्णीत वेतनावर गेले; वेतन १/४ श्रमतासाने वाढले. श्रमशक्तीचे मूल्य कमी झाले, व या मूल्याचे किंमतीतील रूप वेतन हे मात्र वाढले. हा सामाजिकीकरणातून वाढलेल्या उत्पादकतेचा अपरिहार्य परिणाम आहे.

थोडक्यात, दुसऱ्या प्रवाहाच्या स्पष्टीकरणाच्या परिणामी घरकामाच्या सामाजिकीकरणातून मूल्यातील बदलाची दिशा ही त्याच दिशेने बदलणाऱ्या किंमतीत व्यक्त होते हे मार्क्सचे पायाभूत तत्त्वदेखील कोलमडते. इथे आपण मूल्य-किंमत यांच्यातील बदलांमध्ये बिघडणारे नाते हे स्पष्टपणे पुढे येईल अशा तऱ्हेने वरील उदाहरण मांडले. प्रत्यक्षात जरा वेगळी प्रक्रिया घडत असते. क्रयवस्तूंचे मूल्य उत्पादकतावाढीतून कमी होऊन आहे त्या वेतनात प्रचलित क्रयवस्तू विकत घेऊन शिवाय घरकामाची जागा घेणाऱ्या सेवा विकत घेता येतात. उदाहरणार्थ, कपडे धुण्याऐवजी लाँड्रीतून धुऊन घेणे शक्य होते. अशा वेळी वेतन तेच राहून मूल्य मात्र घसरते! किंवा इतर वेळा मूल्य ज्या प्रमाणात घसरते त्याने मूल्यनिर्णीत पातळीने जितके घसरायला पाहिजे त्यापेक्षा वेतन कमी घसरते.

कामगारवर्गाचे शोषण क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून, पाळून नव्हे

वरील दोन्ही परिणामाइतकाच, किंबहुना काकणभर जास्त गंभीर असा तिसरा परिणामदेखील या दुसऱ्या प्रवाहाच्या स्पष्टीकरणामधून अभिप्रेत होतो. त्यासाठी इतर क्रयवस्तूंप्रमाणे श्रमशक्ती ही तिच्या मूल्यनिर्णीत किंमतीला विकली जाऊ

लागली तर काय होईल ते पहावे लागेल. श्रमशक्तीचे पूर्ण मूल्य देऊन भांडवली शोषण शक्य व्हायचे तर एक आवश्यक अट पूर्ण व्हावी लागते श्रमशक्तीचे मूल्य हे श्रमशक्तीच्या वापरातून मिळणाऱ्या मूल्यापेक्षा, कारखान्यात कामावर असणाऱ्या उत्पादक कामगारांच्या कामाच्या तासांपेक्षा, कमी असावे लागते.

वस्तुस्थिती मात्र अशी असते की कामगारवर्गातील थोडेसेच कामगार भांडवलदारांच्या कारखान्यांमध्ये कामावर असतात व त्यांच्यापैकीही सगळे उत्पादक श्रमांत गुंतलेले नसतात. पण पुनरुत्पादन व्हावे लागते ते संपूर्ण कामगारवर्गाच्या श्रमशक्तीचे. भांडवलदारांकडे कामावर असलेल्या उत्पादक व अनुत्पादक स्त्री व पुरुष कामगारांच्या कामावर नसलेल्या पण काम शोधणाऱ्या कामगारांच्या श्रमशक्तीचे, कामावर न जाणाऱ्या स्त्रियांच्या, काम करू न शकणाऱ्या वृद्धांच्या व मुलांच्या साऱ्यांच्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन व्हावे लागते. या पुनरुत्पादनासाठी लागणारे घरकामाचे श्रम भांडवलदारांच्या कारखान्यात उत्पादक श्रमामध्ये कामगारांनी घातलेल्या श्रमांपेक्षा कितीतरी जास्त असतात हे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. उदाहरणार्थ, मगाचच्या कामगार कुटुंबाच्या श्रमशक्तीचे मूल्य होते १२ श्रमतास व त्या कुटुंबातील कारखान्यात घातले गेलेले श्रम होते ८ श्रमतास. दुसऱ्या प्रतिपादनानुसार ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य ठरते ४ श्रमतास उपजीविकेची साधने व त्यात गेलेले १२ तासांचे घरकाम मिळून १६ श्रमतास! याचा सरळ अर्थ असा होतो की श्रमशक्ती मूल्यानुसार विकली गेली तर भांडवलदारांना नफा होऊ शकत नाही. भांडवली नफा क्रयवस्तूंच्या नियमांना धरून मिळणाऱ्या वरकड-मूल्यातून मिळत नाही, तर श्रमशक्तीबाबत क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून मिळतो. भांडवली शोषण हे भांडवली व्यवस्थेच्या नियमाबरहुकूम होते, त्या नियमांचा भंग करून नव्हे हे मार्क्सच्या क्रांतिकारकतेला पायाभूत असलेले तत्त्वदेखील कोलमडते.

५. घरकामाबद्दल उभे राहणारे त्रांगडे व त्याची सोडवणूक

घरकामाच्या श्रमांबद्दल जी दोन पर्यायी प्रचलित स्पष्टीकरणे आपण तपासली त्यांच्यामुळे आपल्यासमोर एक त्रांगडे उभे राहते. घरकामांच्या श्रमांचे मूल्यात रूपांतर होत नाही व त्यामुळे त्या श्रमांचा श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश होत नाही असे मांडणारे पहिले प्रचलित स्पष्टीकरण मार्क्सच्या श्रमशक्तीच्या मूल्याबद्दलच्या गृहितांना, मूल्य-किंमत संबंधांच्या आणि व्यवस्थेच्या

नियमाबरहुकूम शोषण शक्य होण्याच्या पायाभूत तत्त्वांना धक्का लावत नाही असे दिसते. पण त्याबरोबरच एका बाजूला हे स्पष्टीकरण उपभोगाच्या क्षेत्रामधून खर्च झालेली श्रमशक्ती पुन्हा निर्माण होते या मार्क्सच्या महत्त्वाच्या निष्कर्षाची दखल घेत नाही असे दिसते व दुसऱ्या बाजूला स्त्रियांचे शोषण हे भांडवली शोषणाचा एक जैव भाग म्हणून सामावून घेऊ शकत नाही असे दिसते. या सैद्धांतिक त्रुटींच्या टीकेतून उभे राहणारे दुसरे स्पष्टीकरण घरकामाच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन त्या श्रमांचा श्रमशक्तीच्या मूल्यात समावेश झाला पाहिजे असे मार्क्सच्याच मूल्यसिद्धांताच्या आधारे दाखवते. त्यायोगे आता स्त्रियांचे शोषण हे भांडवली शोषणाचा एक जैव भाग बनते. पण मार्क्सच्या श्रमशक्तीच्या मूल्याबद्दलची गृहीते शिवाय मूल्य-किंमत संबंधांबद्दलची आणि व्यवस्थेच्या नियमाबरहुकूम शोषण शक्य होण्याच्या आवश्यक अटीदेखील कोलमडतात. इकडे आड अन् तिकडे विहीर अशी परिस्थिती आपल्यासमोर उभी राहते !

घरकामावरून निर्माण होणारे हे त्रांगडे रिकार्डो आणि रिकार्डियन समाजवादी यांच्यामध्ये 'श्रमांच्या किंमतीवरून' निर्माण होणाऱ्या त्रांगड्याला समांतर असे त्रांगडे आहे. आणि ही समांतरता अपघाती नाही. रिकार्डो 'श्रमांची किंमत' म्हणजे उपजीविकेच्या क्रयवस्तूंची किंमत धरत असे. अन् असे एकदा धरले की कामगारवर्गालाही श्रमांची योग्य किंमत देऊन नफा उरत असे. थोडक्यात कामगारवर्गाचे शोषण हे त्यात सामावून घेतले जात नसे. याउलट रिकार्डियन समाजवाद्यानी 'श्रमांची किंमत' ही त्या श्रमांइतकीच धरलेली असे. त्यामुळे कामगारवर्गाचे शोषण स्पष्ट होई, परंतु हे शोषण हे श्रमशक्तीबाबत क्रयवस्तूंच्या नियमांचा भंग करून होणारे शोषण म्हणून सिद्ध होई. व्यवस्थेच्या नियमाबरहुकूम शोषण सिद्ध होऊन विश्लेषण हे त्या व्यवस्थेची टीका बनवण्याची आवश्यक अट पूर्ण होत नसे. तेथेही इकडे आड आणि तिकडे विहीर अशीच परिस्थिती निर्माण होत होती. मार्क्सने हे त्रांगडे सोडवले ते श्रमशक्ती व श्रम हा महत्त्वाचा भेद करून. श्रमशक्ती या अंतर्विरोधी वास्तवाचे समग्र भान ठेवून. आता आपल्यासमोर उभे असणारे त्रांगडेही याच अंतर्विरोधी वास्तवाशी निगडित आहे. आणि त्या वास्तवाचे समग्र व मूलगामी भान ठेवूनच आपण हे त्रांगडे सोडवू शकू.

वस्तुस्थिती अशी आहे की दुसऱ्या पर्यायी प्रवाहाने पहिल्या प्रवाहाची केलेली टीका ही पूर्णार्थाने चूक नाही; ती मुळात पुरेशी समग्र व मूलगामी नाही.

'श्रमशक्तीचे मूल्य कसे काढायचे?' या प्रश्नाबद्दल जी बैठक पहिल्या स्पष्टीकरणाने स्वीकारली आहे तीच या दुसऱ्या स्पष्टीकरणाने टीका न करता उचलली आहे. वरील प्रश्नाला अभिप्रेत असलेले एक उत्तर दोन्ही स्पष्टीकरणांना समाईक आहे. इतर कुठल्याही क्रयवस्तूप्रमाणे, श्रमशक्ती या क्रयवस्तूच्या निर्मितीची प्रक्रिया मांडायची, तिच्यात खर्ची पडणारी निरनिराळी उपयोग-मूल्ये व घातले जाणारे श्रम तपासायचे, त्यांची अमूर्तीकरणातून उभी राहणारी रूपे व संबंध तपासायचे, ही मूलपद्धत म्हणून दोन्ही स्पष्टीकरणांना मान्य आहे. मूलपद्धत तीच ठेवून, उपभोगाच्या क्षेत्रातून श्रमशक्ती निर्माण होत असते हे श्रमशक्तीचे एक वैशिष्ट्य जमेस धरून, दुसरे स्पष्टीकरण आपला निष्कर्ष काढते. पण मुळात ही पद्धतच श्रमशक्तीबाबत बरोबर आहे का असा खरा प्रश्न आहे; प्रथम प्रश्न विचारणे आवश्यक आहे की श्रमशक्तीचे मूल्य काय दर्शवते?

मूल्यामागचा संबंध महत्त्वाचा

मागे आपण श्रमशक्ती आणि पैसा या जोडगोळीच्या अंतर्विरोधावर बराच मजकूर खर्च केला होता. श्रमशक्ती ऐवजी पैशाबाबत असा प्रश्न विचारला तर मुद्याचे महत्त्व ढळढळीतपणे स्पष्ट होईल. गृहीत धरा की एक रुपयांच्या नोटा सर्वत्र चलनात आहेत. आणि तुम्हाला प्रश्न आहे, की एक रुपयाचे मूल्य काय? तर तुम्ही काय कराल? इतर क्रयवस्तूंप्रमाणे एक रुपयाच्या नोटेमध्ये किती कागद खर्च झाला, किती श्रम घातले गेले अशी या रुपयाच्या नोटेची श्रमप्रक्रिया उभी करून तुम्ही उत्तर काढणार नाही. अगदी भांडवली अर्थतज्ज्ञ देखील काढणार नाही. कारण पैशाचे मूल्य (चलन म्हणून) काय दर्शवते याबद्दल एक वेगळे उत्तर तिथे अभिप्रेत आहे. चलनी पैशातून श्रमप्रक्रियेमार्फत चलनी पैशात साठणारा अमूर्त श्रमकाळ व्यक्त होत नाही, तर क्रयवस्तूंमधला आपापसातला संबंध त्या दर्शनी मूल्याच्यामार्फत दर्शवला जातो. रुपयाच्या नोटेमागे जाऊन त्या नोटेमध्ये क्रयवस्तूच्या स्वरूपात कोणता संबंध गोठलेला आहे ते पाहून मगच आपण तिचे मूल्य काढण्यापर्यंत पोचू शकतो व तिचे मूल्य काय दर्शवते याचा आधार निर्माण करू शकतो. सर्वसाधारणपणे बहुतेक क्रयवस्तूंमध्ये गोठलेला हा संबंध म्हणजे श्रमक्रियेमध्ये प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे खर्च झालेल्या सामाजिक श्रमकाळाचे अमूर्तीकरण इतकाच असतो. परंतु ज्यामध्ये इतर प्रकारचा संबंध गोठलेला असेल अशा क्रयवस्तूंचे, म्हणजे पैसा, अर्थ-भांडवल, श्रमशक्ती इत्यादि क्रयवस्तूंचे मूल्य

श्रमप्रक्रियेमार्फत खर्च झालेल्या एकंदर श्रमकाळाच्या अमूर्तीकरणावरून काढून चालत नाही. त्या त्या क्रयवस्तूमध्ये गोठलेल्या वैशिष्ट्यपूर्ण संबंधांवरून त्या त्या क्रयवस्तूचे मूल्य कसे व किती ठरते ते अवलंबून असते.

मार्क्समधले नेमके हेच महत्त्वाचे असते

समोरच्या विभूतिच्या भासमान स्वरूपाला न भुलता, तिच्या विभूतिकरणाचा भेद करून, तिच्याशी जोडलेला तिच्यामागचा संबंध शोधणे, हेच तर महत्त्वाचे असते. श्रमशक्तीबाबत हाच शोध प्रथम आपल्याला घ्यायला पाहिजे. सध्याच्या संदर्भात—श्रमशक्तीचे मूल्य काय दर्शविते या प्रश्नाच्या संदर्भात, हे लक्षात घेतले पाहिजे की श्रमशक्ती ही काही स्वाभाविकपणे एखादी क्रयवस्तू नाही की ती स्वतःपासून वेगळी करून दुसऱ्याच्या हातात देता येईल. आणि त्यामुळेच तिची स्वाभाविकपणे कुठलीच फॅक्टरी नाही की कारखाना नाही की जिथे आपण तिच्या निर्मितीची काही मापे उभी करू शकू. प्रत्यक्षात असते माणसांचे जीवन—शक्य त्या साधनांनिशी, यथाशक्ती धडपडून, मानवी गुणदोषांसकट जगायचा प्रयत्न करण्यातून उभे राहिलेले. ज्या अर्थाने सल्फ्युरिक ॲसिड तयार करण्याची श्रमप्रक्रिया असते तशी ती श्रमप्रक्रिया नसते. माणसांच्या प्रत्यक्ष जीवनावर श्रमप्रक्रियेचे स्थान आरोपित होते ते श्रमशक्तीला मूल्य निर्माण झाल्यामुळे, या श्रमप्रक्रियेतील घरकामाचे अमूर्तीकरण होण्यातून नव्हे. म्हणून हे पाहिले पाहिजे की श्रमशक्तीच्या मूल्याचे मूल्यसंबंधातले स्थान काय, श्रमशक्तीला मूल्य कशामुळे येते?

श्रमशक्तीच्या मूल्यामागचा संबंधउपजीविकेच्या साधनांपासून तोडणूक

श्रमसाधनांपासून कामगारवर्ग निर्णायकपणे तोडला गेला की श्रमशक्ती नावाची क्रयवस्तू आणि तिच्या मूल्याचा आधार तयार होतो. हे झाले की क्रयवस्तूंच्या प्रभुत्वामुळे कामगारवर्ग उपजीविकेच्या साधनांपासून तोडला जातो, कारण ती आता क्रयवस्तूंच्या रूपात भांडवलदारवर्गाच्या हातात असतात. कामगारवर्गाला इच्छा असते ती स्वतःचे जीवन चालू ठेवण्याची. त्यासाठी आवश्यक ते घरकाम कुटुंबसंस्थेमार्फत उपलब्ध असते. त्यासाठी त्याला बाजारात जायची आवश्यकता नसते. त्यासाठी तो मोबदलाही मागत नाही. पण घरकामासाठी आवश्यक ती उपजीविकेची साधने मिळवणे आवश्यक असते, अन् ती तर त्याच्यापासून क्रयवस्तूच्या रूपात तोडली गेलेली असतात. श्रमशक्तीचे मूल्य कामगारांना पुढील चक्रापर्यंत व तितपतच, या क्रयवस्तूच्या रूपात तोडल्या

गेलेल्या उपजीविकेच्या साधनांशी जोडत असते. भांडवली व्यवस्थेच्या नियमानुसार श्रमशक्तीच्या मूल्यातून हा संबंध व्यक्त होत असतो, श्रमशक्तीच्या निर्मितीच्या कल्पिलेल्या श्रमप्रक्रियेद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे खर्च होणाऱ्या सामाजिक श्रमकाळाचे अमूर्तीकरण हा तो संबंध नसतो. श्रमशक्तीच्या मूल्यामार्फत व्यक्त होणारा हा संबंध लक्षात घेतला तर श्रमशक्तीचे मूल्य हे कामगारांच्या घरांतील सर्वांसाठी क्रयवस्तूंच्या स्वरूपात विकत घ्याव्या लागणाऱ्या उपजीविकेच्या साधनांच्या एकूण मूल्याइतके ठरते.

६. वरकड श्रमांमार्फत शोषण

क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे श्रमशक्तीचे मूल्य हे उपजीविकेसाठी आवश्यक क्रयवस्तूंच्या एकूण मूल्याइतके ठरते या पायाभूत निष्कर्षांपासूनच आपण सुरुवात करू शकतो. श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनामध्ये उपजीविकेच्या वस्तूही खर्ची पडत असतात आणि घरकामाचे श्रमही खर्च होत असतात. परंतु क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे फक्त उपजीविकेच्या वस्तूंपैकी क्रयवस्तूंच्या स्वरूपात विकत घ्याव्या लागणाऱ्या वस्तूचे एकूण मूल्य इतकेच श्रमशक्तीचे मूल्य वैध ठरते याचा एकत्रितपणे अर्थ आपल्याला लावणे आवश्यक आहे. त्याचा अर्थ क्रयवस्तूंचे नियम हे भांडवलदारवर्गाला कामगार वर्गाकडून घरकामाइतके विनामोबदला किंवा वरकड श्रम (लक्षात घ्या, वरकड-मूल्य नव्हे) काढण्याचा अधिकार बहाल करतात. भांडवली शोषणाची व्याप्तीही त्याबरोबरच स्पष्ट होते. श्रमशक्ती ही क्रयवस्तू बनून, क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे तिचे मोल देऊन भांडवलदारवर्ग हा कामगारवर्गाकडून कामाचे तास वजा श्रमशक्तीचे मूल्य इतके वरकड-मूल्य व घरकामाइतके वरकड-श्रम काढीत असतो. घरकामामार्फत होणारे शोषण या निष्कर्षांप्रमाणे भांडवली शोषणाच्या क्षेत्राबाहेर घडणारी प्रक्रिया नसते तर भांडवली शोषणाच्या प्रक्रियेचा जैव भाग असते.

वरकड-मूल्य नव्हे, वरकड श्रम! किती बारका फरक, जवळपास शब्दच्छलच! पण हा शब्दच्छल नाही. ज्याप्रमाणे 'श्रम नव्हे श्रमशक्ती' हा शब्दच्छल नव्हता. त्यामागे खोलवरची सैद्धांतिक कारणे आहेत. आणि त्या सर्वांचा संबंध श्रमशक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाशी आहे.[१]

घरकामाच्या श्रमांतून भौतिक उपयोग-मूल्ये तयार होत असतात. ते उत्पादक श्रम असतात. पण जोपर्यंत ते कामगारवर्गांच्या सहज प्रेरणांतून, पुरुषसत्ताक

कुटुंबव्यवस्थेतून किंवा अन्य प्रचलित सामाजिक संबंधांमुळे कामगारवर्गाचा एक भाग स्वत:हून पार पाडत असतो तोपर्यंत त्यासाठी भांडवलदारवर्गाला एक छदामही मोबदला द्यावा लागत नाही. त्यामुळे आवश्यक आणि उत्पादक असूनही अशा श्रमांचा समावेश मूल्य किंवा नफा निर्माण करणाऱ्या खर्चामध्ये किंवा श्रमांमध्ये होत नाही. थोडक्यात, भांडवलशाही घरकामातील प्रत्यक्षात उत्पादक खर्चाचे रूपांतर अनुत्पादक खर्चात करत असते! भांडवलशाहीमध्ये घरकामाच्या श्रमांचे होणारे सामाजिक-सांस्कृतिक अवमूल्यन हे शेवटी उत्पादन व्यवहारामध्ये गुंतलेल्या या मूल्यसंबंधांवर आधारलेले असते.

आणि इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की घरकामाद्वारा विनामोबदला वरकड श्रम भांडवलदाराला लाभत असल्याने क्रयवस्तूंच्या नियमाप्रमाणे श्रमशक्तीच्या मूल्यात त्यांचा समावेश करावा लागत नाही म्हणूनच मूल्यनिर्णीत किंमतीला श्रमशक्ती विकत घेऊन भांडवलदाराला पुरेसे वरकड-मूल्य मिळू शकते. थोडक्यात, घरकामामार्फत होणाऱ्या म्हणजेच स्त्रियांचे स्त्रिया या नात्याने होणाऱ्या शोषणाची दखल घेतल्याशिवाय क्रयवस्तूंच्या नियमाबरहुकूम होणाऱ्या कामगारवर्गाच्या शोषणाचे विश्लेषण पूर्ण होत नाही. घरकामाद्वारा विनामोबदला मिळणारे वरकड श्रम ही भांडवली शोषणाची पूर्व अट असते. घरकामाचा प्रश्न हा फक्त स्त्रियांचा प्रश्न नसतो, तर तो भांडवली शोषणाच्या प्रश्नाचा अविभाज्य भाग असतो.

७. क्रयवस्तूंचे विभूतिकरण व पुरुषसत्ताक संबंधांची वीण

आपण एक टप्पा पार केला. श्रमशक्तीचे मूल्य हे कामगारवर्ग उपजीविकेच्या साधनांपासून किती प्रमाणात तोडला गेला आहे याचे माप असते. आणि म्हणून मार्क्सने गृहीत धरल्याप्रमाणे कामगारवर्गाच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक त्या क्रयवस्तूंचे एकूण मूल्य हे श्रमशक्तीचे मूल्य असले पाहिजे अशा निष्कर्षापर्यंत आपण पोचलो. त्यामुळे तितक्या वरकड श्रमांच्या रूपात घरकामाद्वारा कामगारवर्गाचे भांडवलदारांकडून शोषण हे देखील सिद्ध झाले. आणि घरकाम हे कामगारवर्गातील स्त्रियांचे स्त्रिया या नात्याने ठरणारे काम असल्यामुळे घरकामामार्फत कामगारवर्गातील स्त्रियांचे भांडवलादारांकडून प्रत्यक्ष शोषण होते हे सिद्ध झाले. तरीही आपण आतापर्यंत स्त्रियांच्या शोषणाचा सतत संदर्भ घेत असलो तरी प्रत्यक्ष त्या प्रश्नाला पूर्ण हात घातलेला नाही. घरकाम हे स्त्रिया करतात हा संदर्भ वजा करून देखील आपल्या

घरकामाबद्दलच्या विश्लेषणात फरक पडणार नाही; आपल्या आतापर्यंतच्या विश्लेषणासाठी इतकेच आवश्यक आहे की कामगारवर्गांतर्गत संबंधांमधून घरकामाचे श्रम हे परस्पर घातले जातात, मग ते स्त्रियांनी घातलेले असोत, की पुरुषांनी घातलेले असोत. मार्क्सच्या पद्धतीने पुढे जायचे तर, घरकामाच्या श्रमाइतके वरकड श्रम काढले जाणे या शोषणाच्या आशयाबरोबर या शोषणाचे रूपदेखील तपासणे तितकेच महत्त्वाचे ठरते. हा आपल्या विश्लेषणाचा पुढचा टप्पा आहे.

क्रयवस्तूंचे विभूतिकरण : कुणाची श्रमशक्ती?

त्यासाठी आपण पुन्हा एकदा भांडवलदारांच्या कारखान्यांच्या गेटावर परतूया, क्रयवस्तू व पैसा यांनी बनलेल्या साखळीच्या मधल्या टिंबांपाशी. कारण कामगारवर्ग आपली श्रमशक्ती भांडवलदार वर्गाला विकतो या अमूर्त संबंधाला इथेच प्रत्यक्ष रूप मिळणार आहे. भांडवलदार वर्गाच्या कारखान्यात काम करायला येणारी चालती-बोलती, विचार करणारी माणसे शेवटी हा संबंध घडवून आणणार आहेत. हा संबंध घडवून आणल्यावर या माणसांना काय दिसते? त्यांनी त्यांचे श्रम विकले व त्यांना त्यांच्या श्रमांचे वेतन मिळाले. क्रयवस्तूंचा नियम हाच असतो की जी गोष्ट विकली ती गिऱ्हाईकाच्या हवाली करावी लागते. त्यांना वेतन मिळते तोपर्यंत त्यांनी त्यांचेच श्रम फक्त हवाली केलेले दिसतात, इतरांचे श्रम विशेषतः घरकामाचे श्रम हे त्यांनी भांडवलदारांच्या हवाली केलेले दिसत नाहीत. स्वतःचे श्रम हवाली करताना ते श्रम शक्य करणारे, श्रमशक्ती निर्माण करणारे इतरांचे व स्वतःचे जे श्रम भांडवलदाराच्या हवाली केले जात आहेत ते त्यांना दिसत नाहीत. शिवाय घरकामाच्या श्रमांचे सामाजिक पातळीवर अवमूल्यनच होत असते. त्या श्रमांना प्रतिष्ठा देखील नसते. घरकामाचे श्रम भांडवलदारवर्गाच्या हवाली केले जात आहेत ही बाबच अदृश्य करणारे या संबंधाचे रूप असते.

भांडवलदारांकडून स्त्रियांचे होणारे शोषण अदृश्य होते

हे रूप क्रयवस्तूंचे विभूतिकरण आणि पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेच्या आधारावर उभी राहणारी विचारसरणी यांच्या एकत्र विणीवर आधारलेले असते. उदाहरणार्थ कौशल्यसंपादनात/प्रशिक्षणात खर्च होणाऱ्या श्रमांना निदान अप्रत्यक्ष मान्यता मिळते, कारण त्यामध्ये या माणसांनी पैसा किंवा स्वतःचे श्रम ओतलेले असतात. याला कारणही तसेच असते. मागे पाहिले होते

त्याप्रमाणे पैशाचा उगम झाल्यानंतर क्रयवस्तूंच्या व्यवहारातील पैशाच्या प्रभुत्वामुळे क्रयवस्तूंना एक नवी व्याख्या लाभते. जिच्या बदल्यात पैसा मिळतो ती क्रयवस्तू. त्याच्याशी संलग्न दुसराही एक विचार क्रयवस्तूंच्या प्रभुत्वातून तयार होत असतो. ज्या श्रमांच्या बदल्यात पैसे मोजावे लागतात तेच श्रम महत्त्वाचे, उत्पादक समजले जातात व बनतात. त्यांनाच उत्पादक श्रमांमध्ये आणि अर्थव्यवहारामध्ये स्थान येते. घरकामासाठी पैसे द्यावे लागलेले नसतात. तेव्हा अर्थव्यवहाराच्या दृष्टीने, मूल्यनिर्मितीच्या दृष्टीने ते दिसू नयेत, हा या विभूतिकरणाचाच परिणाम असतो. अर्थव्यवहारात ते श्रम लक्षात न घेण्याच्या लायकीचे, दुय्यम दर्जाचे ठरतात.

क्रयवस्तूंच्या विभूतिकरणातून निर्माण होणाऱ्या या रूपाला पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्था व विचारसरणीची पूरक जोड मिळून दोन्हीची घट्ट वीण पडते. घरकाम ही स्त्रियांनी करावयाची गोष्ट असते कारण पुरुषसत्ताक भांडवली विचारसरणीनुसार ती दुय्यम दर्जाची गोष्ट असते; मोबदल्याची अपेक्षा न करता कुटुंबासाठी स्त्रियांनी ते पार पाडायचे कर्तव्य असते; त्यांचा धर्म असतो. आणि वेळोवेळी स्त्रियांच्या घरकामाचे महत्त्व व त्यांच्या सामाजिक महत्तेबद्दल कितीही गोडवे गायले जाते असोत परंतु जिथे पुरुषार्थाचा संबंध आहे त्या घराबाहेरच्या सामाजिक-आर्थिक व्यवहारात घरकाम खिजणगतीत घ्यायचे नसते. त्याबरोबरच व त्याचा परिणाम म्हणून भांडवलदाराच्या कारखान्यात जो सामाजिक श्रमकाळ घातला जातो त्यातला स्त्रियांचा सहभाग हा सर्वसाधारणपणे प्रमाणाने कमी, स्थानाने दुय्यम व स्वरूपाने प्रासंगिक/अर्धवेळ असतो. याबद्दल सज्जड ऐतिहासिक पुरावादेखील या प्रश्नावरील प्रत्येक अभ्यासाने निर्माण केलेला आहे. याचा अर्थ असा होतो की प्रातिनिधिक स्वरूपात भांडवलदारांच्या कारखान्यात खर्च होणारी श्रमशक्ती ही व्याप्तीने व प्रभुत्वानेदेखील पुरुषांची श्रमशक्ती असते व त्यामुळे आपणहून घरकामांच्या श्रमांबद्दल जाणीव होणे हे कामावरील कामगारांमध्ये अशक्य नसले तरी असंभवनीय असते. थोडक्यात, क्रयवस्तूंच्या विभूतिकरणातून निर्माण होणाऱ्या अदृश्यतेला या पुरुषसत्ताक संबंधांचे व विचारांचे भक्कम अधिष्ठान मिळून घरकामाचे श्रमदेखील भांडवलदारवर्गाच्या हवाली केले गेले आहेत ही बाब पूर्णपणे अदृश्य होते.

याचा सर्वात पहिला परिणाम म्हणजे 'स्त्रियांचे श्रम' म्हणून घरकाम बिनबोभाटपणे होते, त्यातील शोषणाची बिलकुल जाणीव न होता! याचा दुसरा

परिणामही गंभीर असतो. कामावरील कामगार व घरकाम करणाऱ्या स्त्रिया भांडवलदारांसाठी उत्पादक श्रम करत असतात, दोघांचेही भांडवलदारांकडून शोषण होत असते, दोघांकडून विनामोबदला श्रम काढले जात असतात. पण सर्वसाधारणपणे कामावरील कामगार फक्त कामगारवर्गात मोडतात. घरकाम करणाऱ्या स्त्रियांचा कामगारवर्गात समावेश केला जात नाही, केलाच तर तो फक्त कामावरील कामगारांची आई, बहीण, पत्नी, मुलगी इत्यादी नात्यांनी. कामावरील कामगारांइतकाच भांडवलदारवर्ग ज्याचे शोषण करतो असा विभाग म्हणून, समानतेच्या नात्याने त्यांचा कामगारवर्गात समावेश होत नाही. क्रयवस्तूंचे विभूतिकरण आणि पुरुषसत्ताक संबंध यांच्या एकत्रित विणीचा समग्र भेद केल्याशिवाय स्त्रियांना सामाजिक पातळीवर त्यांचे कामगारवर्गातील स्वायत्त स्थान लाभू शकत नाही.

घरकामाला पुरुषांच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाचे स्थान येते

क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाची पुरुषसत्ताक संबंधांशी वीण पडणे ही भांडवलशाहीसाठी एक अत्यंत आवश्यक गोष्ट असते. आपण मगाशी उल्लेख केला त्याप्रमाणे भांडवलदारवर्गाच्या कारखान्यामध्ये खर्च होणाऱ्या श्रमशक्तीपैकी प्रमाणाने निर्णायकपणे जास्त, स्थानाने अव्वल व स्वरूपाने स्थायी श्रमशक्ती ही पुरुषांची असते. भांडवलदारवर्गाच्या दृष्टीने त्यामुळे जी श्रमशक्ती सुस्थितीत पुनरुत्पादित होणे आवश्यक असते ती पुरुषांची असते. घरकामातून कामगारवर्गाच्या एकंदर श्रमशक्तीचे केवळ विनामोबदला पुनरुत्पादन होणे पुरेसे नसते. त्यासाठी घरकामाला पुरुषांच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाचे स्थान प्राप्त होणे हे देखील तितकेच महत्त्वाचे असते. आणि हे विनासायास तेव्हा होते, जेव्हा क्रयवस्तूंच्या विभूतिकरणाला पुरुषसत्ताक संबंधांची जोड मिळते तेव्हा.

प्रत्यक्षात अर्थातच कुटुंबसंस्थेमार्फत सर्व व्यक्तींच्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन होत असते. प्रश्न सुस्थितीचा असतो. कुटुंबातील इतर व्यक्तींच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाला मिळवत्या श्रमशक्तीच्या सुस्थित पुनरुत्पादनाचे साधन म्हणून महत्त्व असते. मुले, स्त्रिया व वृद्ध व्यक्ती यांचे सर्व व्यवहार 'थकून-भागून आलेल्या पुरुषाच्या' श्रमशक्तीच्या सर्वांगीण व सुस्थितीत पुनरुत्पादन होण्याच्या दृष्टीने चालावे लागतात. ही इतर मंडळी कितीही थकली-भागली असोत, त्यांना या निकषापुढे मान तुकवावी लागते. आज संपर्क माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे 'आदर्श कुटुंबाचे' चित्र हे पूर्णपणे या चौकटीत बसते.

या पुनरुत्पादनाची सर्वांगीणता देखील अत्यंत महत्त्वाची ठरते. ती सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भावनिक सर्व पातळ्यांवरील बाब असते. याचे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे पुरुषसत्ताक व्यवस्थेमार्फत अप्रत्यक्षपणे जमा होणाऱ्या भांडवलशाहीविरोधी क्षोभाचा वारंवार निचरा करून कामगारांची मनःस्थिती 'सुस्थितीत' पुनरुत्पादित करण्याचे कार्य. व्यक्त-अव्यक्तपणे वाढणाऱ्या या क्षोभाचा स्त्रियांवर व त्याबरोबरच मुलांवर, वृद्धांवर, कामावर नसणाऱ्यांवर राग काढून निचरा होणे ही एक महत्त्वाची गोष्ट असते. पण हा क्षोभ कुठेही आणि कसाही व्यक्त होऊन असा निचरा होत नाही. अपराधी भावनेतून तो व्यक्त झाला तर ती टोचणी मनस्थितीच्या 'सुस्थितीतील' पुनरुत्पादनाच्या कामी अडथळा आणते. अपराधी भावना निर्माण न होता हा क्षोभ व्यक्त व्हायचा तर तो पुरुषसत्ताक विचारातून व संबंधांमधून व्यक्त व्हावा लागतो. कारण या विचारसरणीच्या मूळ स्वरूपात तो पुरुषांचा हक्कच असतो. परंतु तिच्या उदारमतवादी स्वरूपातदेखील चुकीचा असला तरी तो क्षोभ क्षम्य असतो. असे निचरा होण्याचे मार्ग सफलतेने वापरण्यातून अशी विचारसरणी पक्कीदेखील होत असते. थोडक्यात, कामगारवर्गामध्ये हा पुरुषसत्ताक विचारदेखील श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाबरोबरच पुनरुत्पादित होत असतो.

८. भांडवली विकास व घरकामाची बदलती परिस्थिती

स्त्रियांचे शोषण हे भांडवली शोषणाचा भाग कोणत्या रूपात बनते हे आपण पाहिले. तसेच क्रयवस्तूंचे विभूतिकरण व पुरुषसत्ताक संबंध यांची पूरक वीण आपण पाहिली. परंतु मार्क्सच्या पद्धतीने पुढे जायचे तर आणखीही एक गोष्ट आपल्याला करावी लागते. कामावरील कामगारांच्या शोषणाची रूपे ही भांडवलशाहीच्या विकासाचा अविभाज्य भाग म्हणून भांडवली शोषणाच्या निरनिराळ्या गरजांमधून कशी निर्माण झाली हे मार्क्सने दाखवले, त्याप्रमाणे स्त्रियांच्या शोषणांच्या रूपांचा आपल्याला कामगारवर्गाच्या शोषणाच्या इतिहासाचा भाग म्हणून दाखवता येणे आवश्यक ठरते. त्याबद्दलच्या एका सैद्धांतिक रूपरेषेच्या स्वरूपात हा विकास मांडण्याचा आपण यापुढील भागात यथाशक्ती प्रयत्न करू.

निकृष्ट भांडवली उत्पादकता व घरकाम

मार्क्सने कामाच्या तासांच्या प्रकरणात, व एंगल्सने त्याच्या 'कंडिशन ऑफ दी वर्कींग क्लास इन इंग्लंड' मध्ये वर्णन केलेल्या अवस्थेकडे आपण वळू.

भांडवशाहीचा त्या सुमाराचा काळ हा प्राथमिक अवस्थेतला व अत्यंत कमी उत्पादकतेचा काळ होता. ही कमी उत्पादकता गृहीत धरून काय काय निष्कर्ष निघतात ते आधी पाहू. आपण असे धरून चालू या की कामाचा दिवस स्त्रीपुरुषांसाठी १२ तासांचा व मुलांसाठी १० तासांचा आहे. आपण असेही धरून चालू या की नजिकच्या भांडवलीपूर्व काळात कष्टकऱ्यांची जी जीवनमानाची सरासरी पातळी होती ती २४ श्रमतास मूल्यांच्या क्रयवस्तू व १२ श्रमतासांचे घरकाम यावर आधारलेली होती आणि सरासरीने एका कामगार कुटुंबामध्ये एका पुरुषाची १२ तास, एका स्त्रीची १४ तास व एका मुलाची १० तास श्रमशक्ती उपलब्ध होते.

अशा परिस्थितीत भांडवलदाराने जर कुटुंबाची ही भांडवलीपूर्व काळातली जीवनमानाची पातळी श्रमशक्तीचे मूल्य म्हणून मान्य केली तर कुटुंबातील स्त्रीचे १२ तास हे घरकामामध्ये जाणार व तिची फक्त २ तासांची श्रमशक्ती उपलब्ध राहणार. आता त्याने कुटुंबाची सर्वउरलेली श्रमशक्ती वापरली तर त्याला पुरुषाचे १२; स्त्रीचे २ व मुलाचे १० मिळून २४ श्रमतास मूल्य हातात येते व त्यासाठी त्याला २४ श्रमतास मूल्य क्रयवस्तूंसाठी कामगार कुटुंबाच्या हाती ठेवावे लागणार. म्हणजे वरकड-मूल्य शून्य. अशा परिस्थितीमध्ये त्याला पुरेसे वरकड-मूल्य मिळायचे तर एकतर त्याला उपलब्ध होणारी श्रमशक्ती वाढली पाहिजे किंवा कामगार कुटुंबाच्या हातामध्ये बरेच कमी मूल्य ठेवले पाहिजे. दोन्हीचा अर्थ विशिष्ट तऱ्हेने खालावणारे कामगार वर्गाचे जीवनमान असा होतो.

घरकामाचे शिरकाण . . . .

यासाठी सर्वप्रथम आवश्यक ठरते ते घरकाम नाहीसे करून खालावणारे जीवनमान. याचा दुहेरी परिणाम होतो. जितक्या प्रमाणात घरकामाचे श्रम नाहीसे होतात तितक्या प्रमाणात स्त्रियांची श्रमशक्ती भांडवलदारांच्या कारखान्यात वापरासाठी मोकळी होते. एक लक्षात घेतले पाहिजे की इथे घरकाम नाहीसे होते ते खालावणाऱ्या जीवनमानातून; श्रमांच्या उत्पादकता वाढीतून नव्हे. विश्रांतीच मिळत नसेल तर घर विश्रांतीयोग्य करण्याच्या घरकामाचा प्रश्न नाही. घालायला एकच कपडा असेल तर कपडे धुण्याचे घरकाम एकदम कमी झाले. चवीढवीने स्वयंपाक करण्याची सामुग्रीही नाही आणि सवडही नाही म्हणजे त्यातलेही घरकाम कमी झाले. इ. आपण असे धरूया की घरकामाला अशा तऱ्हेने कात्री लागून घरकाम २ तासांवर येते.

याचा दुसराही परिणाम होतो—कपडे धुण्याचा प्रश्न नाही तेव्हा साबण ही गोष्ट पुनरुत्पादनासाठी आवश्यक रहात नाही. त्याच पद्धतीने कपड्यांचे, संगोपनासाठी आवश्यक वस्तूंचे, अन्नाला चवढव देणाऱ्या तेल, मीठ, साखर, मसाल्याचे इत्यादी, इत्यादी. आपण असे धरू की या क्रयवस्तूंना कात्री लागून त्यांचे मूल्य २४ श्रमतासांवरून १८ श्रमतासांवर उतरते.

इथे मुद्दाम ही प्रक्रिया घरकामाचा संदर्भ घेऊन उलटी मांडली आहे पण प्रत्यक्षात कामगार कुटुंबाच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी त्यांच्या हातात पडणारे वेतन हे त्यांची जास्तीत जास्त श्रमशक्ती वापरून देखील फक्त १८ श्रमतास होईल असे ठेवण्यातून होते. या मूल्याच्या बदल्यात तितकी श्रमशक्ती भांडवलदारांना उपलब्ध करून देण्याच्या धडपडीत कामगारवर्ग स्वतःच्या जीवनमानाला कात्री लावण्यातून हे घडवून आणतो. त्यासाठी भांडवलदार इतकेच करतो की पुरुषांचे वेतन दिवसाला ९, स्त्रियांचे ५ व मुलांचे ४ श्रमतास ठेवतो. त्यामुळे भांडवलदाराला पुरुषाचे १२, स्त्रीचे १२ व मुलाचे १० तास उपलब्ध करून आपल्या किमान गरजा १८ श्रमतासात भागवण्याच्या धडपडीत कामगारवर्गच हे घडवून आणतो.

या निम्न उत्पादन अवस्थेत वेतनाची ही पातळी असणे भांडवली चौकटीत अपरिहार्य ठरते हे इथे लक्षात घेणे आवश्यक आहे. श्रमशक्तीचे मूल्य भांडवलीपूर्व जीवनमानाच्या पातळीला धरून २४ श्रमतास असायला हवे होते व आता वेतन हे या मूल्याने निर्णीत पातळीच्याखाली घसरले आहे अशातला भाग नाही. कारण जर २४ श्रमतास वेतन ठरले तर त्याच्याशी सुसंगत १२ श्रमतास घरकामात जाणार व वरकड-मूल्य उरणार नाही. इतकेच नव्हे तर वेतन १८ श्रमतासावर येऊनदेखील काय काय होते ते पाहण्याजोगे आहे. फक्त पुरुषाची शक्ती कामाला लावली तर फक्त १२ श्रमतास म्हणजे वेतनापेक्षा कमी मूल्य मिळणार. जोडीला मुलाला लावले तर १० + १२ = २२ श्रमतास मूल्य मिळते. पण वरकड-मूल्याचा दर पडतो (२२-१८)/१८=४/१८ किंवा सुमारे २० टक्के, आणि इतर भांडवलखर्च लक्षात घेता तो आणखी कमी होणार. जेव्हा स्त्रीचेदेखील १२ तास श्रम उपलब्ध होतात तेव्हा कुठे वरकड-मूल्याचा दर (१२+१२+१०-१८)/१८=१६/१८ किंवा सुमारे ९० टक्के इतका जरा भरीव दिसू लागतो. थोडक्यात, घरकामाचे शिरकाण, श्रमशक्तीचे खालावलेले मूल्य व कुटुंबातील सर्वांच्या श्रमशक्तीचा कारखान्यात सरळ (डायरेक्ट) वापर ही या काळातील भांडवली शोषणाची अपरिहार्य लक्षणे असतात. किंबहुना या

काळात कुटुंबाचे एकत्र व्यवहारच या तिहेरी दबावाखाली इतके मोडकळीला आलेले असतात की कुटुंबव्यवस्था व तिचे पुरुषसत्ताक स्वरूप मोडकळीला आलेले आहे की काय असा भास व्हावा![२]

. . . आणि भीषण काळातील संबंधांची स्पष्टता

या काळाच्या भीषण आणि विदारक बाजूबरोबरच, शोषणाच्या स्पष्टतेचीही एक बाजू असते. कामाच्या तासांवरील नियंत्रण कामगारवर्गाने अजून जिंकून घेतले नव्हते असा हा काळ होता. कामाचे तास निश्चित नसल्यामुळे ताब्यात दिलेल्या श्रमशक्तीबद्दल वेतन दिले जात आहे हे स्पष्ट होऊ शकत होते. तसाच मामला कुटुंबसंस्थेबद्दलही दिसतो. या प्राथमिक काळात हे स्पष्ट होते की वेतन हे संपूर्ण कुटुंबाच्या श्रमशक्तीसाठी दिले जात आहे व संपूर्ण कुटुंबाची श्रमशक्ती भांडवलदारवर्गाच्या हातात ठेवली जात आहे.

उत्पादकतावाढीबरोबर उंचावलेल्या जीवनमानाद्वारे पुढील काळात जे घडते त्यातून नेमका हा स्पष्टपणा नाहीसा होतो. कामाचे तास निश्चित करण्यामधून कामगारवर्ग एक ऐतिहासिक पाऊल पुढे टाकतो पण त्याचवेळी त्याला एक मोल द्यावे लागते. वेतनाच्या बदल्यात किती श्रम घेणे वाजवी आहे हे ठरण्यातून पिळवणुकीच्या वाजवीपणाचे एक मापदेखील तयार होते हे आपण पाहिले होते. श्रमशक्तीच्या मूल्याचे श्रमाची किंमत हे क्रयवस्तूंच्या विभूतिकरणावर आधारलेले रूप दृढ होते. त्याच पद्धतीने भांडवली पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेचे संघटन होऊन पूर्वीच्या स्पष्टतेची जागा क्रयवस्तूंचे विभूतीकरण व पुरुषसत्ताक संबंध यांच्या विणीवर आधारलेले रूप घेते. आणि हे एका दुहेरी प्रक्रियेतून घडताना दिसते.

पहिली प्रक्रिया ही सापेक्ष वरकड–मूल्यातून झपाट्याने वाढणाऱ्या उत्पादकतेवर आधारलेली होती. यंत्राधिष्ठित भांडवलशाहीमधील वाढत्या उत्पादकतेमुळे उपजीविकेसाठी आवश्यक क्रयवस्तूंचे मूल्य घसरत होते. त्यामुळे संपूर्ण कुटुंबासाठी आवश्यक अशा क्रयवस्तूंचे मूल्य म्हणजे श्रमशक्तीचे मूल्य कुटुंबातील फक्त पुरुषाच्या उपलब्ध श्रमशक्तीच्या वापरातून जे श्रम मिळत त्यापेक्षाही कमी होत चालले होते. त्याचबरोबर वरील श्रमशक्तीचे मूल्य खालावत असूनसुद्धा वाढते जीवनमान जिंकून घेण्याचा आधार उत्पादकतावाढीमुळे घातला जात होता. पण पूर्वीच्या घरकामाचे शिरकाण झालेल्या जीवनमानापेक्षा वाढलेल्या पातळीवर आता जीवनमान जायचे तर

शिरकाण झालेले घरकाम पुनःस्थापित होणे आवश्यक होते. पुरुषसत्ताक गृहितांनुसार याचा अर्थ होता, स्त्रियांचा सामाजिक श्रमकाळातला सहभाग हा जास्त जास्त प्रमाणात घरकामाचा भाग बनणे. कुटुंबासाठी आवश्यक श्रमशक्तीचे मूल्य जसजसे एका व्यक्तीच्या कामाच्या तासापेक्षा कमी होत गेले तसा याचाही पाया घातला गेला असल्यामुळे प्रचलित भांडवली पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेच्या प्रस्थापनाचा भौतिक पाया घातलेला दिसतो.

पुरुषसत्ताक कामगार कुटुंबाचे संघटन

परंतु मोडकळीला आलेल्या व्यवहाराचे उत्पादकतेच्या आधारावर भांडवली–पुरुषसत्ताक पायावर झालेले पुनर्संघटन हे आपसूक अभावितपणे घडलेले नाही. या संक्रमणकाळाचे स्त्रीमुक्ती चळवळीने केलेले अभ्यास बोलके आहेत. घरकामाव्यतिरिक्त अर्थव्यवहारात भाग घेण्याच्या उर्मी देखील स्त्रियांमध्ये मागील काळाने जाग्या केल्या होत्या. कामगार चळवळीच्या अंतर्गत स्पष्टपणे पुरुषसत्ताक विचारांच्या विणीच्या आधारे या उर्मी दाबल्या जाऊनच हे घडले असे आपल्याला इतिहासावरून दिसते. निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये वाढत्या संख्येने शिरू लागलेल्या स्त्रियांना एका बाजूला कामगारांमधील स्पर्धा अकारण वाढवण्याच्या कारणाने व दुसऱ्या बाजूला त्यांचे आदर्श हे घरकामाचे असल्याच्या कारणाने थोडक्यात कामगार चळवळीच्याही अंतर्गत पुरुषसत्ताक विचारांच्या विणीतून पुन्हा घरकामाशी बांधून भांडवली–पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेचे संघटन झालेले दिसते. कामगारवर्गांतर्गत हे संघटन हे त्याचवेळी कामगार चळवळीत प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे पुरुषसत्ताक विचारसरणीच्या प्रभुत्वातून आले हाही क्रम महत्त्वाचा आहे. आणि अर्थातच त्यानंतर संपूर्ण कामगारवर्गाच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी दिले जाणारे मूल्य हे प्रातिनिधीकरीत्या पुरुष कामगाराच्या श्रमशक्तीचे मूल्य म्हणून दिले जाऊ लागले व स्त्रियांचे कामगारवर्गातले शोषित म्हणून स्वायत्त स्थान बव्हंशी नाहीसे होऊन त्यांना कामगारांच्या आया, बहिणी, पत्नी इ. चे रूप लाभले.

अर्थात हा बदल बहुतेक स्त्रियांनी स्वेच्छेने स्वीकारला व त्यांच्या नव्या स्थानाचे मोल देऊनही स्वीकारला, कारण पूर्वीचा त्यांचा घरकामाबाहेरचा सहभाग हा सर्वसाधारणपणे जीवघेण्या पद्धतीने खालावलेल्या जीवनमानामुळे घरकामाला कात्री लावून मिळवलेला सहभाग होता. ऐतिहासिक दृष्ट्या हे त्यांचे पुढचे पाऊल होते. पण त्याचवेळी स्त्रियांमध्ये वेगळ्या प्रकारच्या प्रक्रियेला जन्म देण्याचे काम या संक्रमणकाळाच्या अंतर्विरोधाने केलेले दिसते.

याच काळात स्त्रियांच्या चळवळीचा जन्म झालेला दिसतो व या संक्रमणकाळातच विशेषतः सुरुवातीच्या काळात ह्या चळवळींना स्त्रियांमध्ये व्यापक पाया मिळालेला दिसतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळानंतर पुन्हा एका वेगळ्या पद्धतीने स्त्रीमुक्ती चळवळीला उभारी आलेली दिसते. तिकडे वळण्याअगोदर भांडवली-पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेचे संघटन झाल्यावर स्त्रियांचे भांडवली शोषणातील स्थान काय याच्यावर आपण थोडक्यात नजर टाकू.

घरकामाचे भांडवलशाहीतील स्थान

घरकामाचे क्षेत्र हे भांडवली उत्पादनाच्या क्षेत्राबाहेरील पण नियंत्रणाखालील क्षेत्र असते. अशा क्षेत्रामधील उत्पादित सेवा क्रयवस्तूंच्या रूपात भांडवलदारांना कामगारांसाठी उपलब्ध करून द्याव्या लागल्या तर त्यांना त्या सेवेमध्ये खर्च झालेल्या श्रमांचा मोबदला (श्रमशक्तीचा नव्हे) मूल्याच्या रूपात कामगारवर्गाला देणे आवश्यक असते. भांडवलदारांच्या स्वतःच्या मालकीच्या नसलेल्या श्रमप्रक्रियांमध्ये खर्च होणारे घरकामाचे श्रम त्यांच्या हातात विनामोबदला येत असतात. यातून सर्वप्रथम त्यांचा उत्पादनखर्च कमी होतो व नफ्याचा दर वाढतो. नफ्याचा प्रस्थापित दर व त्यातून ठरणारा भांडवल-संचयाचा वेग हा नेहमी या पायावर उभा असतो. त्याचबरोबर घरकामाच्या प्रस्थापित पातळीपेक्षा जास्त सेवांचा घरकामामध्ये समावेश होऊ शकला तर वेतनकपात शक्य होते, अरिष्टाच्या काळामध्ये व तात्कालिक मंदीमध्ये वेतनकपातीमार्फत अरिष्टांचा भार घरकामाद्वारे वाढलेल्या शोषणाच्या आधारे स्त्रियांवर ढकलून नफ्याचा दर व भांडवल-संचयाचा वेग राखण्याचा भांडवलदारवर्गाला एक मार्ग उपलब्ध होतो.

वरकड-मूल्य या रूपाऐवजी वरकड श्रम या रूपात स्त्रियांचे शोषण होते यामुळे घरकामाच्या श्रमप्रक्रियेवर भांडवलशाहीचे होणारे परिणाम हे भांडवली कारखान्यामधल्या परिणामांपेक्षा संपूर्णपणे वेगळे दिसतात. भांडवलशाहीची सापेक्ष वरकड-मूल्याची जी क्रांतिकारक बाजू आपल्याला भांडवली कारखान्यामधील श्रमप्रक्रियेमध्ये प्रभुत्वस्थानी येताना दिसते, ती घरकामांच्या श्रमप्रक्रियेमध्ये या काळात प्रभुत्वस्थानी येत नाही. घरकामाचे श्रम विनामोबदला भांडवलदारांना मिळत असल्यामुळे, कोणत्याही एका ऐतिहासिक क्षणी घरकामात समावेश होणाऱ्या श्रमप्रक्रियांच्या सामूहिकीकरणाबद्दल त्याला सरळ (डायरेक्ट) कर्तव्य नसते. भांडवलशाहीत जेव्हा यापैकी काही प्रक्रिया

सेवा म्हणून भांडवली उद्योग हातात घेतात तेव्हा त्या सेवा घरकामाच्याही क्षेत्राबाहेर जातात! घरकामाचे क्षेत्र आहे त्या मागासलेल्या परिस्थितीत राहते. भांडवली बाजारपेठेच्या वाढीने व तंत्रवैज्ञानिक बदलांनी घरकामाबाबत एक निर्णायक टप्पा गाठेपर्यंत (त्याचा आपण शेवटी विचार करणार आहोत), घरकामाच्या श्रमांच्या उत्पादकतेवर भांडवलशाहीचा परिणाम हा याच स्वरूपाचा राहतो.

घरकामाच्या श्रमांचे जे काही सामूहिकीकरण/सामाजिकीकरण होते ते या प्रवृत्तीच्या प्रभुत्वाला तोंड देत होते, परंतु तिचे प्रभुत्व नाहीसे करू शकत नाही. त्याबरोबरच भांडवलदार व स्त्रियांमधील हा शोषणाचा संबंध पैशाच्या माध्यमातून बांधला जात नसल्याने तिथे निव्वळ वरकड-मूल्याला आळा घालण्यासाठी जशी उभी राहते त्याप्रमाणे सामूहिक प्रतिकारशक्ती देखील उभी राहत नाही. ज्याप्रमाणे स्त्रियांचे कामगारवर्गातील स्वायत्त स्थान मूल्यसंबंधांमुळे व पुरुषसत्ताक संबंधाच्या पूरक विणीमुळे नजरेआड ठरत असते तसेच त्यांचे कामगारचळवळीतील स्वायत्त स्थानही नाकारले जात असते!

याउलट कामगारवर्गाचे उंचावणारे जीवनमान जेव्हा नवनव्या मानवी शक्यता अंतर्भूत करीत जाते किंवा जुन्या शक्यतांना जास्ती मानवी स्वरूप मिळते तसतशी घरकामाच्या श्रमांची तीव्रता व व्याप्तीदेखील वाढण्याची प्रवृत्ती असते. उदाहरणार्थ, मुलांच्या शिक्षणाचा खर्च हक्क म्हणून कामगार जिंकून घेतात. त्यानुसार भत्ता तरी मिळू लागतो किंवा एखादा आयोग वेतन ठरवताना तो खर्च विचारात घेऊ लागतो. पण गोष्ट एव्हढ्यावर संपत नाही. मूल शाळेत जाऊ लागले की त्याला शाळेत पोचवावे लागते, त्याच्यासाठी डबा बनवावा लागतो, त्याचा अभ्यास घ्यावा लागतो, गणवेश शिवावा लागता, तो धुवावा लागतो . . . जीवन जास्त मानवी बनण्यासाठी जे बाजारातून घ्यावे लागते त्याची सोय वेतनातून होते, पण अशा प्रत्येक गोष्टीशी निगडित श्रम? ते घरकामातूनच येतात. सापेक्ष वरकड-मूल्यामुळे कारखान्यात जे घडत असते त्याचाच हा परिणाम असतो पण सापेक्ष वरकड-मूल्याचे इतर फायदे न मिळता!

भांडवलशाहीमधील इतर प्रक्रियांनादेखील घरकामाच्या श्रमांचा आधार असतो. स्त्रिया हा भांडवलशाहीच्या बेरोजगारांच्या राखीव फौजेचा मोठा घटक असतो. त्यांचे स्थान पूर्वी वर्णन केलेल्या विभागांना छेदून जाणारे आहे व त्यादृष्टीने त्यांना या फौजेचा एक वेगळा विभाग मानणे योग्य ठरेल. घरकामाच्या श्रमांची

'लवचिकता' हा या स्थानाचा आधार असतो. कामाच्या तासाबाबत जी परिस्थिती नियंत्रणाअगोदर कामावरील कामगारांची असते ती परिस्थिती स्त्रियांच्या श्रमशक्तीबद्दल सततची असते. भांडवली उत्पादनामधील दुय्यम स्थानावरच्या, एकसुरी कष्टाच्या, असंघटित क्षेत्रांमधल्या प्रासंगिक स्वरूपाच्या श्रमशक्तीच्या गरजा स्त्रियांची श्रमशक्ती भागवत असते खरी पण ती या श्रमशक्तीच्या जोडीला घरकामामध्ये खर्च होणाऱ्या श्रमशक्तीची जोड देऊनच. हीच आज कामावरील स्त्रियांची 'डबल शिफ्ट' या नावाने ओळखली जाते. याचा सामाजिक पातळीवरील अर्थ मात्र स्पष्टपणे ओळखणे आवश्यक आहे. कामाच्या तासाच्या नियंत्रणाअगोदर ज्याप्रमाणे कामावरील कामगारांच्या श्रमशक्तीचा भांडवलशाही आपल्या गरजेप्रमाणे कामाचे तास लवचिकपणे वाढवून उपयोग करत असते त्याच पद्धतीने स्त्रियांच्या श्रमशक्तीच्या वापराचे तास एकत्रितपणे वाढवून उपयोग करत असते; स्त्रियांच्या राखीव फौजेच्या स्थानाचा हा अर्थ असतो.

त्याचबरोबर स्त्रियांचे घरकाम हे कामगारवर्गाच्या वेतनातील तात्कालिक चढ-उतारांविरुद्ध कामगारवर्गाचे संरक्षण करीत असते. वेतन कमी झाले तर पूर्वी क्रयवस्तू म्हणून विकत घेतलेल्या सेवा स्त्रिया स्वतः करू लागतात व त्यातून जीवनमानाचे संरक्षण करण्याची एक शक्ती उभी करतात. किंवा खालावत चाललेल्या जीवनमानाला ज्या विभागाना तोंड द्यावे लागते तेथील स्त्रिया थोडेफार जीवनमान उंचावू लागलेल्या मध्यमवर्गाला मोबदल्याने घरकामाची सेवा विकून श्रमशक्तीच्या मोबदल्यातील विभागांतर्गत चढउतारांविरुद्धही एक शक्ती उभी करतात. अर्थात हे सर्व स्त्रियांच्या परिस्थितीचे मोल देऊन होते. वाढते कामाचे तास, श्रमांची तीव्रता वाढणे, आणि विश्रांतीस्थाने नाहीशी होणे यातून स्त्रियांच्या घरकामाला हे स्थान लाभते. थोडक्यात, स्त्रियांच्या वाढत्या दडपणुकीचे मोल देऊनच घरकाम कामगारवर्गाचे संरक्षक हत्यार म्हणून प्रत्यक्षात येते.

९. घरकामाचे यांत्रिकीकरण व नवी स्त्री-मुक्ती चळवळ

भांडवलशाहीच्या विकासाचा चोरपावलांनी का होईना पण घरकामांच्या श्रमांवर व श्रमप्रक्रियेवर परिणाम मात्र होत असतो. पण तो वेग इतका कमी असतो की त्याने एक निर्णायक टप्पा ओलांडल्याशिवाय त्यात झालेला गुणात्मक बदल हा स्पष्ट होत नाही. आमच्या मते असा निर्णायक बदल दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात झालेला दिसतो व गेली काही दशके फोफावलेल्या नव्या स्त्री-मुक्ती

चळवळीचा त्यानेच पाया निर्माण केला आहे. हे कसे घडले याची एक रूपरेषा मांडून आपण या परिशिष्टाचा समारोप करू.

तंत्रवैज्ञानिक क्रांती व उपभोगवाद

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील तंत्र-वैज्ञानिक क्रांतीचा व तिच्या स्वरूपांचा आपण मागे उल्लेख केलेलाच आहे. तिच्या काही पैलूंशी आपल्याला इथे जास्त कर्तव्य आहे. एकतर या तंत्रवैज्ञानिक क्रांतीच्या स्वरूपामुळे प्रगत भांडवली देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर सेवाक्षेत्राची वाढ होऊ शकली. सेवाक्षेत्रातील श्रमप्रक्रियांचे सापेक्ष वरकड-मूल्याच्याद्वारा झपाट्याने यांत्रिकीकरण व आधुनिकीकरण झाले. त्याचवेळी मक्तेदारी अवस्थेमुळे बाजारपेठेचा प्रश्न हा या देशांमध्ये अत्यंत निकडीचा बनत होता. त्यासाठी एका बाजूला शस्त्रस्पर्धा व युद्धखोरीचे धोरण जसे तयार झाले त्याबरोबर दुसऱ्या बाजूला उपभोगवादावर (कंझ्यूमरिझम) आधारलेले धोरण तयार झाले. हप्तेबंदीची खरेदी ही हे धोरण कामगारांमध्ये रुजवण्याचे एक महत्त्वाचे साधन होते.

या तंत्रवैज्ञानिक क्रांतीचा व उपभोगवादाचा परिणाम हा घरकामाच्या श्रमांवरही पडलेला दिसतो. घरकामाच्या श्रमांवर दोन परिणाम होऊ शकतात. एक म्हणजे घरकामांचे सामूहिकरण-सामाजिकीकरण. जेव्हा कपडे धुण्याचे घरकाम हे आता सेवेच्या स्वरूपात विकले जाऊ लागते, उदाहरणार्थ लाँड्रेट्स, जेथे जाऊन नाणी टाकून आपण कपडे वॉशिंग मशीनमध्ये घालून, धुतलेले कपडे थोड्या वेळाने बाहेर काढून घेऊन जाऊ शकतो किंवा नेहमीच्या परिचित लाँड्र्या. इथे कपडे धुण्याचे श्रम हे घरातील स्त्रीने वैयक्तिक श्रमप्रक्रियेत खर्च केलेले श्रम राहत नाहीत; त्यांची जागा आता सहकार्यावर आधारलेल्या सामूहिक श्रमांनी घेतलेली असते. हा पहिला सामूहिकीकरण/सामाजिकीकरणाचा शक्य असलेला परिणाम आहे. याउलट दुसरा शक्य परिणाम हा घरकामांचे वैयक्तिक स्वरूप कायम ठेवून होणाऱ्या यांत्रिकीकरणाचा असतो. उदाहरणार्थ घरामध्ये वॉशिंग मशीन घेतले जाणे. हे केवळ घरकामाचे यांत्रिकीकरण ठरते, सामूहिकीकरण बनत नाही.

घरकामाचे यांत्रिकीकरण

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात झालेले बदल हे मक्तेदारी अवस्थेच्या गरजेतून झालेले असल्यामुळे घरकामाच्या सामाजिकीकरणाची व्याप्ती व महत्त्व

हे दुय्यम राहिलेले आढळते. या काळात आपल्याला आढळते ते घरकामाचे वाढलेले यांत्रिकीकरण. किंबहुना आपल्याला असेही म्हणता येते की घरकामाचे हे निव्वळ यांत्रिकीकरण हाच मुळात घरकामाच्या सामूहिकीकरणाला एक अडथळा होता! आणि यामागील मक्तेदारी हितसंबंधदेखील स्पष्टपणे दिसतो. सामूहिकीकरणातून जितकी बाजारपेठ निर्माण होऊ शकते त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीनी बाजारपेठ निव्वळ यांत्रिकीकरणामुळे उपलब्ध होते. साहजिकच या तंत्रवैज्ञानिक क्रांतीचा मक्तेदारी भांडवली स्वरूपात घरकामावर निव्वळ यांत्रिकीकरणाचाच परिणाम प्रामुख्याने होताना दिसतो.

नव्या स्त्री–मुक्ती चळवळीचा भौतिक आधार

मात्र या यांत्रिकीकरणाच्या जोरावर स्त्रियांसाठी महत्त्वाची अशी एक अंतर्विरोधी प्रक्रिया चालू होते. मक्तेदारी अवस्थेच्या गरजांतून हे यांत्रिकीकरण होत होते. उपभोगवादाच्या माध्यमातून जास्तीतजास्त यांत्रिक व चमत्कृतिपूर्ण उपकरणे ही तंत्रवैज्ञानिक क्रांतीने शक्य केली होती व उपभोगवादाच्या प्रभुत्वातून अशी जास्त जास्त उपकरणे वैयक्तिकरित्या कुटुंबे विकत घेतील याची सोय करून उपभोगवाद एक मोठी आणि आवश्यक बाजारपेठ निर्माण करत होता. जाहिरातींच्या तंत्रशास्त्राचे शस्त्रदेखील याच काळात त्यामुळे मक्तेदारी भांडवलशाहीने अस्त्राच्या पातळीवर नेलेले दिसते.

परंतु वैयक्तिक यांत्रिकीकरणाला उपभोगवादाची जोड मिळाली की आणखीही एक महत्त्वाची गोष्ट घरकामाबाबत घडते. उपकरणांचा व उपभोगसाधनांचा पसारा जसा वाढत जातो तशी घरकामाची व्याप्ती व तीव्रता यादेखील वाढत जातात. बेटी फ्रीडनने तोंड फोडले त्या 'हाऊसवर्क सिंड्रोम' ची मुळे पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेबरोबरच या बदललेल्या घरकामाच्या परिस्थितीत सापडतात. थोडक्यात, घरकामाचा निरर्थक ताण हा केवळ स्त्रियांना ग्रासू लागतो व त्यातून त्यांच्यावर घरकाम लादणाऱ्या पुरुषसत्ताक संबंधांविरुद्धच्या बंडाचा एक आधार तयार होतो.

त्याचवेळी या यांत्रिकीकरणाची दुसरीही एक बाजू दिसते. उपभोगवादाशी निगडित जीवनमूल्ये जर नाकारली, किंवा त्यांचे महत्त्व कमी केले तर यांत्रिकीकरणामुळे स्त्रियांना घरकामाचा वेळ कमी करून घराबाहेरील कामासाठी श्रमशक्ती मोकळी ठेवणे शक्य होते. यांत्रिकीकरणापूर्वी घरकामाच्या श्रमांची

व्याप्तीच अशी असे की जीवनमान समाधानकारक ठेवून हे करणे फारसे शक्य होत नाही. घरकामाबाहेरील कामातील आपल्या सहभागाचा विचार स्त्रिया एका वेगळ्या व ठाम भौतिक पायाच्या आधारे, एक उगवत्या पण ठोस व्यावहारिक शक्यतेच्या व हक्काच्या स्वरूपात करू शकतात. ज्याप्रमाणे कामावरील श्रमप्रक्रियेच्या यांत्रिकीकरणातून सर्वांच्या गरजा पूर्णपणे भागवण्याच्या उत्पादनशक्ती कामगारवर्गाच्या नजरेत एक ठोस व्यावहारिक शक्यता म्हणून उभ्या राहतात, त्याचप्रमाणे घरकामाच्या यांत्रिकीकरणातून स्त्रियांचा घरकामाबाहेरील व परस्परन्यायाने पुरुषांचा घरकामात तेवढाच सहभाग हा स्त्रियांच्या नजरेत एक ठोस व्यावहारिक शक्यता म्हणून उभा राहतो. स्त्री-मुक्ती चळवळीची उद्दिष्टे आता केवळ दार्शनिक स्वरूपाची राहत नाहीत तर उगवणाऱ्या ठोस व्यावहारिक शक्यतांचे वर्णन ठरू लागतात. थोडक्यात, स्त्री-मुक्ती चळवळ ही आपले उद्दिष्ट केवळ बंडखोर पद्धतीने नव्हे तर ठोस क्रांतिकारक पद्धतीने समाजनिर्मितीचे उद्दिष्ट म्हणून पुढे आणण्याचा भौतिक सामाजिक आधार तयार होतो. आमच्या मते आज आपल्यासमोर उभ्या राहणाऱ्या स्त्री-मुक्ती चळवळीचे हे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व आहे.

आपण तसा बराच लांबचा पल्ला गाठला आहे. परंतु हेही लक्षात ठेवायला हवे की आपले सर्व विश्लेषण हे एका ठाम परंतु मुख्यत: रूपरेषेच्या स्वरूपातच झालेले आहे. ऐतिहासिक अभ्यासांच्या आधारे व्यावहारिक धोरणांच्या संदर्भातले सर्व प्रश्न अजून बाकी आहेत. तरीही मार्क्सच्या मूल्यसिद्धांताचे व या सिद्धांताच्या नेमक्या समजाचे कामगार चळवळीसाठी व स्त्रियांच्या चळवळीसाठी महत्त्व आपण स्पष्ट केलेले आहे. स्त्रियांच्या शोषणाचे स्वरूप व स्त्रियांच्या चळवळीचे बदलते स्वरूप यांच्या विश्लेषणाचा सैद्धांतिक पाया घालण्याची मार्क्सच्या मूल्यसिद्धांताची क्षमता आपण पुरेशी स्पष्ट केली आहे. आणि शेवटी तितकेच या बऱ्याच लांबलेल्या परिशिष्टाचे उद्दिष्ट आहे.

---

१ घरकामाद्वारे होणाऱ्या शोषणाची इतर प्रकारच्या शोषणाशी जी साम्यस्थळे आहेत त्यामुळे त्यांच्याशी या शोषणाची गल्लत होऊ शकते. उदाहरणार्थ घरकामाद्वारे होणाऱ्या शोषणाची तुलना ही गरीब व निम्नभांडवली शेतकऱ्यांसारख्या समूहांच्या शोषणाशी केली जाते. अशी तुलना करणारे प्रवाह शेवटी या ना त्या मार्गाने असमान विनिमयाच्या सिद्धांताचा आधार घेत असतात. ज्याप्रमाणे गरीब शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या मालामध्ये साठलेल्या श्रमकाळापेक्षा कमी मोबदला त्यांना मिळतो त्याप्रमाणे घरकामातून निर्माण होणाऱ्या श्रमशक्तीत साठलेल्या श्रमकाळापेक्षा कमी

मोबदला या क्रयवस्तूला मिळतो, अशा प्रकारची ही मांडणी असते. त्यासाठी निरनिराळी कारणे दिली जातात. उदाहरणार्थ या क्षेत्रांचे दुय्यमीकरण (मार्जिनलायझेशन) हे एक कारण असू शकते. किंवा या क्षेत्रांमध्ये वर्धित पुनरुत्पादनाऐवजी (एक्स्टेंडेड रिप्रॉडक्शन) निर्वाह पुनरुत्पादन (सब्सिस्टन्स रिप्रॉडक्शन) होत असते असे मांडले जाऊ शकते. परंतु त्याचा सैद्धांतिक गाभा हा शेवटी असमान विनिमयाचा असतो.

यातील असमान विनिमयाच्या भागाची आपण पूर्वी दखल घेतलेली आहे. (पहा परिशिष्ट २) परंतु त्यापलिकडे वरकड श्रमाद्वारे शोषण व वरकड–मूल्याद्वारे शोषण हा भेद इथे लक्षात घेतलेला नसतो. गरीब शेतकऱ्यांच्या श्रमांचे अमूर्तीकरण होऊन त्यांच्या उत्पादनात साठलेले असते. त्यामुळे या मूल्यावर क्रयवस्तूंच्या समान विनिमयाच्या अटी लागू होऊन त्या श्रमकाळाचे मूल्यरूपात वाटप होते. त्याच क्रयवस्तूच्या व्यवहारातले भांडवली क्षेत्र (व्यापारी, सावकार किंवा कारखानदार) हे त्यांच्या शोषणाचे आवश्यक माध्यम असते. याउलट घरकामाच्या श्रमांचे क्रयवस्तूंच्या नियमामुळेच अमूर्तीकरण नाकारले जाऊन त्यांच्याकडून फक्त वरकड श्रम काढले जातात. आणि घरकाम या स्वरूपात श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करणारे भांडवली क्षेत्र (!) त्यामुळेच त्यासाठी आवश्यक नसते.

[२] कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील कुटुंबसंस्था मोडकळीला आल्याबद्दलचे जे उल्लेख आहेत ते याच पार्श्वभूमीवर आधारलेले आहेत.

पारिभाषिक शब्द

मराठी-English

अनुत्पादक श्रम : unproductive labour
अभिसरणाचा काळ : circulation time
अभिसारणाचे माध्यम : medium oif circulation
अमूर्त श्रम : abstract labour
अरिष्ट : crisis
अर्थ भांडवल : money capital
आदिम संचय : primitive accumulation
आवर्तन-काळ : turnover time
आवश्यक श्रम : necessary labour
इच्छावादी : voluntarist
उत्तेजन : incentive
उत्पादक भांडवल : productive capital
उत्पादक श्रम : productive labour
उत्पादकता : productivity
उत्पादन संबंध : relations of production
उत्पादन साधनाच्या वस्तू : capital goods
उत्पादनाचे आकारमान : scale of production
उथळ अर्थशास्त्र : vulgar economics
उपभोगाच्या वस्तू : consumption goods
उपयोग मूल्य : use value
एकक उत्पादन : unit production
औद्योगिक भांडवल : industrial capital
कायम भांडवल : constant capital
कुंठित / साचलेला विभाग : stagnant category
कुशल कामगार : skilled worker
क्रयवस्तू : commodity
क्रयवस्तूंचे अभिसरण : circulation of commodities
क्रयवस्तूंचे विभूतिकरण : fetishism of commodities
क्रयवस्तूंचे स्थलांतर : transport of commodities
खर्ची पडलेले भांडवल : expended capital
खेळते भांडवल : circulating capital
गुंतलेले भांडवल : invested capital
घरकाम : housework
जिवंत श्रम : living labour
तंत्रवैज्ञानिक क्रांती : technological revolution
तरंगता विभाग : floating category
दडपणूक : oppression
दार्शनिक : philosophical

दुरावलेले श्रम : alienated labour
दुर्मिळ : rare
दुर्लभ : scarce
नफ्याचा दर : rate of profit
निम्न-मध्यमवर्ग : petit-bourgeois
निव्वळ वरकड-मूल्य : absolute surplus value
पिळवणुकीचा दर : rate of exploitation
प्रशिक्षित कामगार : trained worker
बिगर भांडवली : non-capitalist
बेरोजगारांची राखीव फौज : reserve army of labour
भणंग / बहिष्कृत विभाग : pauperised category
भांडवल : capital
भांडवल पूर्व : pre-capitalist
भांडवल संचय : capital accumulation
भांडवलदार : capitalist
भांडवलाची तांत्रिक जुळणी : technical composition of capital
भांडवलाचे आंगिक (आंगभूत) प्रमाण : organic composition of capital
भांडवलाचे केंद्रीकरण : centralisation of capital
भांडवलाचे घनीकरण : concentration of capital
मूर्त श्रम : concrete labour
मूल्य : value
मूल्यसंबंध : value relations
मूल्याचा आशय : substance of value
मूल्याचा साठा : store of value
मूल्याचे माप : measure of value
मूल्याचे रूप : form of value
मूल्याचे रूपांतर : transormation of value
यंत्रशास्त्र : mechanics
यंत्राचे अवजार : machine tool
यंत्राधिष्ठित उत्पादन : machinofacture
यांत्रिकीकरण : mechanisation
राजकीय अर्थशास्त्र : political economy
राष्ट्रीय कर्ज : national debt
वरकड श्रम : surpl;us labour
वरकड-मूल्य : surplus value
वर्धित पुनरुत्पादन : extended reproduction
वित्त भांडवल : finance capital
विनिमय मूल्य : exchange value
व्यापारी भांडवल : merchant capital
व्यूहाणू : molecule
श्रम : labour
श्रमकाळ : labour time
श्रमतास : labour hours
श्रमप्रक्रिया : labour process
श्रममूल्याचा सिद्धांत : labour theory of value
श्रमविभागणी : division of labour
श्रमविषय : subject of labour
श्रमशक्ती : labour power
श्रमसाधने : instruments of labour
श्रमसामुग्री : means of labour
संचित श्रम : dead labour
साधे पुनरुत्पादन : simple reproduction

सापेक्ष वरकड-मूल्य : relative surplus value
सामाजिक श्रम : social labour
सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ : socially necessary labour
सीमांत उपयुक्तता : marginal utility
सुप्त विभाग : latent category
स्थिर भांडवल : fixed capital
स्वयंचलितता : automation
हस्तव्यवसाय : handicrafts
हातकारखानदारी : manufacture

English–मराठी

abstract labour : अमूर्त श्रम
absolute surplus value : निव्वळ वरकड-मूल्य
alienated labour : दुरावलेले श्रम
automation : स्वयंचलितता
capital : भांडवल
capital accumulation : भांडवल संचय
capital goods : उत्पादन साधनाच्या वस्तू
capitalist : भांडवलदार
centralisation of capital : भांडवलाचे केंद्रीकरण
circulating capital : खेळते भांडवल
circulation of commodities : क्रयवस्तूंचे अभिसरण
circulation time : अभिसरणाचा काळ
commodity : क्रयवस्तू
concentration of capital : भांडवलाचे घनीकरण
concrete labour : मूर्त श्रम
constant capital : कायम भांडवल
consumption goods : उपभोगाच्या वस्तू
crisis : अरिष्ट
dead labour : संचित श्रम
division of labour : श्रमविभागणी
exchange value : विनिमय मूल्य
expended capital : खर्ची पडलेले भांडवल
extended reproduction : वर्धित पुनरुत्पादन
fetishism of commodities : क्रयवस्तूंचे विभूतिकरण

finance capital : वित्त भांडवल
fixed capital : स्थिर भांडवल
floating category : तरंगता विभाग
form of value : मूल्याचे रूप
handicrafts : हस्तव्यवसाय
housework : घरकाम
incentive : उत्तेजन
industrial capital : औद्योगिक भांडवल
instruments of labour : श्रमसाधने
invested capital : गुंतलेले भांडवल
labour : श्रम
labour hours : श्रमतास
labour power : श्रमशक्ती
labour process : श्रमप्रक्रिया
labour theory of value : श्रममूल्याचा सिद्धांत
labour time : श्रमकाळ
latent category : सुप्त विभाग
living labour : जिवंत श्रम
machine tool : यंत्राचे अवजार
machinofacture : यंत्राधिष्ठित उत्पादन
manufacture : हातकारखानदारी
marginal utility : सीमांत उपयुक्तता
means of labour : श्रमसामुग्री
measure of value : मूल्याचे माप
mechanics : यंत्रशास्त्र
mechanisation : यांत्रिकीकरण
medium oif circulation : अभिसारणाचे माध्यम
merchant capital : व्यापारी भांडवल
molecule : व्यूहाणू
money capital : अर्थ भांडवल
national debt : राष्ट्रीय कर्ज
necessary labour : आवश्यक श्रम
non-capitalist : बिगर भांडवली
oppression : दडपणूक
organic composition of capital : भांडवलाचे आंगिक (आंगभूत) प्रमाण
pauperised category : भणंग / बहिष्कृत विभाग
petit-bourgeois : निम्न-मध्यमवर्ग
philosophical : दार्शनिक
political economy : राजकीय अर्थशास्त्र
pre-capitalist : भांडवल पूर्व
primitive accumulation : आदिम संचय
productive capital : उत्पादक भांडवल
productive labour : उत्पादक श्रम
productivity : उत्पादकता
rare : दुर्मिळ
rate of exploitation : पिळवणुकीचा दर
rate of profit : नफ्याचा दर
relations of production : उत्पादन संबंध
relative surplus value : सापेक्ष वरकड-मूल्य
reserve army of labour : बेरोजगारांची राखीव फौज
scale of production : उत्पादनाचे आकारमान
scarce : दुर्लभ
simple reproduction : साधे पुनरुत्पादन
skilled worker : कुशल कामगार
social labour : सामाजिक श्रम
socially necessary labour : सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ

stagnant category : कुंठित / साचलेला विभाग
store of value : मूल्याचा साठा
subject of labour : श्रमविषय
substance of value : मूल्याचा आशय
surpl;us labour : वरकड श्रम
surplus value : वरकड-मूल्य
technical composition of capital : भांडवलाची तांत्रिक जुळणी
technological revolution : तंत्रवैज्ञानिक क्रांती
trained worker : प्रशिक्षित कामगार
transormation of value : मूल्याचे रूपांतर
transport of commodities : क्रयवस्तूंचे स्थलांतर
turnover time : आवर्तन-काळ
unit production : एकक उत्पादन
unproductive labour : अनुत्पादक श्रम
use value : उपयोग मूल्य
value : मूल्य
value relations : मूल्यसंबंध
voluntarist : इच्छावादी
vulgar economics : उथळ अर्थशास्त्र